Dhananjayarao Gadgil Library
GIPE-PUNE-004939

# ज्ञानप्रकाश

१८४९-१८६५

(भाग १)
Accn. no. 4939

## अनुक्रमणिका

| खंड | वर्ष | अंक |
|---|---|---|
| १ | १८४९ | फेब्रुवारी २६ |
| | | एप्रिल २,९ |
| | | ऑक्टोबर १,८ |
| | | नोव्हेंबर १९ |
| | | डिसेंबर २ अंक नाही |
| २ | १८५० | नोव्हेंबर १८ |
| २ | १८५१ | जानेवारी १२ |
| | | फेब्रुवारी २ |
| ९ | १८५७ | ऑगस्ट १७ |
| | | पुरवणी : नोव्हेंबर २०, |
| | | डिसेंबर ७ |
| १० | १८५८ | जून १४, १७,२१,२४,२८ |
| | | जुलै १,५,८,१२,१९,२२,२६,२९ |
| | | ऑगस्ट २,५,९,१२,१६,१९,२३ |
| | | सप्टेंबर २,६,१३,१६,२०,२३,२७,३० |
| | | ऑक्टोबर ४,७,११,१४,१८,२१,२५ |
| | | पुरवणी : मार्च ८. |

m2, M5
A849–A858
4939

३

# ज्ञानप्रकाश

सत्य ... ज्ञान

पुस्तक १ कागद २ शहर पुणे

तारीख २६ फेब्रुआरी सन १८४९ इंग्रजी मीती फाल्गुन शुद्ध ४ शके १७७०

ज्ञानप्रकाशनाम वर्तमानपत्राचा

| कीमत | रूपये |
|---|---|
| दरसाल १० | दरसहामास ६ |
| तीनमहिने ३॥ | दरमहिना १ |

---

आठवड्याचें पंचांग

| तिथि | तारीख | वार | विशेष |
|---|---|---|---|
| ४ फाल्गुनशुद्ध | २६ फेब्रुआरी | सोमवार | विं० ४ दि० २१ |
| ५ | २७ | मंगळवार | सु० |
| ६ | २८ | बुधवार | |
| ७ | २९ | गुरुवार | |
| ८ | १ मार्च | शुक्रवार | दग्ध० |
| ९ | २ | शनवार | दग्ध० |
| १० | ३ | रविवार | मृ० |

हांतेरा दिवसाचा पंध्रवाडा आहे क्षय आहे

---

तारीख

मागील कागद चनाणेस आहे

कोणास पंधरा पानच्याचा असेल तर ज्ञानप्रकाशाचा ... थोडे किमतीस मिळतील

---

तवा

कृष्ण अंश

---

विकावयाचे बंगल्याची

जाहीर खबर

पुण्यांत लष्करांत आगान मेहेरअफ... च्या खाजगी लिहीलेल्या माल विकावयाचा तो आहे

नंबर

कॅप्टिन डोबेल साहेब राहात असत ते बंगला कौलारू ...

बंगला सदरहू ...

घर ... पक्के बांधलेले सदर बाजारांत

सदर बाजाराजवळ ... घर

बंगला कौलारी ... बांधलेला - दुसरे पुरापी अव रजीमेन्टचे ...

बंगला पक्का बांधलेले असे हरीकर्णी त्यास जनराल वीलशार साहेबाचा बंगला आहे

७-८-९ तीन बंगले आठवे पलटणीचे ...

१० घोरपडीस ... बंगला १

यांपैकी माल घ्यावयाचा असेल त्याणें पाहिजे तर बंगल्यांस आगान मेहेर जाफर यास त्याप्रमाणे लिहून पाठवावें.

---

सरकारी कामदाराच्या नेमणुका

मीस्तर ... साहेब उत्तर भागाचे रेविन्यु कमीशनर नेमले

मीस्तर हन्टर साहेब पुण्याचे अगटाग ... नेमले

---

आह्मास पाहरुन आला चांगल्या

ज्ञानप्रकाशकर्ते यांस

तमन्ने नाप्रील इंगलास कायदा २ सन १८४१ यांतील हाकिम मजकूर आपला हा ठराव पाहून आह्मास फार संतोष जाहला. धोंडचे शिक्षा फारच वाईट व जुलुमाची हे मी पूर्वी आहात हें फार योग्य व कृपणी सरकारांच रीतिस संमत जाहलें तुह्मास हाली हे पत्र लिहिण्याचें कारण असें की आह्मी पुण्यांत नेहमी फिरताना पाहातो की केदी लोकांचे पायात खोडा घालून बुधवारचे चावडी जवळ उघड्यावर रस्त्यात टाकितात ही शिक्षा सामान्य अपराधास देतात ही मला वाटतें की धोंडी सारखीच आहे धोंडी के दी रस्त्यांत फिरवितात व खोड्यात घालून केदी रस्त्यावर टाकितात यांस काहि फार अंतर नाही येणे करून त्या शासनाची मात्र दहशत कमी होते व ज्यांस एकदा खोड्यांत घातल्या आणि त्याची आबरू गेली म्हणजे ते पुन्हा त्या गोष्टीची लाज धरित नाही असें पुण्यांत पाहिले खोड्यांत टाकिलेले बुधवारचे चावडी जवळ उघड्यावर टाकलेले शेकडो आहेत आणि ते महिन्यातुन दोन च्यार वेळ खोड्यात पडल्या खेरीज राहात नाहीत याचें कारण हेंच की त्या शासनाची दहशत गेली आहे. कायदा २ सन १८४१ चा याजवरून ही गोष्ट बंद व्हावी कारण की हाली खोड्याची शिक्षा देतात ती केवळ धोंडी प्रमाणे आहे.

पाहाणारा

पुणें येथील पुस्तक ग्रहाची कमीटीची सभा जाहाली त्या दिवशी हिंदू लोकांनी सर्व स्वदेशी लोकांस मजकूर समजाविला तो छापून घेतला आहे.

गशीन्तर कमीटि लेब्ररी याणी पुस्तक ग्रह होण्या विषई संमाविन लोकांची सभा करून पुस्तक ग्रह असल्याने लोकांची सुधारणा कशी येईल पत्र करून सर्वांस जाहीर केलें परंतु त्यांत काही लोकांचें सुधारण्या विषई भरंवसा येतच नाही तरी ते कमीटी करून संभावित लोकांस ज्ञानता प्राप्त जाहाली असेल तरी लेब्ररीची लोकांस आपले हीत आहे असे जाणून सर्व लोकांचा संतुष्ट करितो त्या लेब्ररीत येत जाऊन तेथील ज्ञानप्रकाशाची बुद्धि विवर्धक पुस्तके पाहून बुद्धि हिंमत व्हावी या करितां इंग्रज कमीटि याणी आज सभा करून सर्व लोकांस कळवि लें आहे पुस्तक ग्रह पेशजी सेनाभरचे समंई पुस्तक ग्रह ठेविल्या चें काम कायम होते ते रीती मजकूर नष्ट जाहले आहे सरकारांनी त्या अनस्य आपण मदत करून पुस्तक ग्रह चालविले या जवरून आह्मास फार संतोष जाहाला आहे त्याच प्रमाणे आपण ह्या नेपा कराल असी आम्ही खातरी बाळगतो येणे करून लोकांस मोठा लाभ व आह्मा सरकारास फार खुषी होईल आपण घरकाम अवकाश करून पुस्तक ग्रह

तील वर्तमानपत्रे ग्रंथ वगैरे पाहाण्या करितां येत जावे ह्मणजे सर्व राज्यांतील व देशांतील अहवाल कळेल माहीतगारी वाढेल व आपण आल्याने इतर लोकास उमेद येईल. वीद्येचा लाभ व संतोष बहुत आहे ते अनुभवाने करून आपल्यास [illegible] होईल व इंग्रज लोक असा [illegible] कार हुशार जाहाले आहेत यांच प्रमाणे [illegible] देशांतील लोकांनी हुशार व्हावे अशा तऱ्हेचा मनोदय आहे व [illegible] वर्तमानपत्र पुण्यांत काढले आहे. यांस आपण सर्वांनी आश्रय देऊन चालवीले पाहीजे. असे केले असतां नाना प्रकारची वर्तमाने व [illegible] र समजत जातील तेणेकरून सर्व देशात कोठे काय चालले आहे हे समजेल या गोष्टीचा संतोष आपला आपल्यास अनुभवांती वाटेल व सरकारी हवाल वगैरे सर्व लोकास अधीक जाहीर होतील व जीतके लोक अधीक हुशार होतील तीतके सरकार [illegible] उपयोगी पडून त्याजवर सरकार मेहरबानगी करीतील असे बहुत लाभ आहेत. आपण सुज्ञ आहात फार बोलावयास नको तारीख १३ फेब्रुआरी सन १८४९

[illegible]

---

ज्ञानप्रकाशकर्ते यांस

वीनंती विशेष याईश्वरकृत सृष्टीत बहुत चमत्कार आहेत ते सर्व मनुष्यांनी पाहावे व त्याचा विचार करावा हे योग्य आहे. शास्त्रांत पाच तत्वे या सृष्टीचे मूळ अंश आहेत [illegible] आहेत ते [illegible] तेज वायु आकाश. यांतील तेज हे तत्व चमत्कारीक आहे व ते सर्व ठिकाणी [illegible] पाहिजे [illegible] [illegible] परंतु जेथे तेज [illegible] असे नाही उष्णतेज [illegible] आहे काजवा [illegible] कीडा आहे तो [illegible] [illegible] सारिखा दिसतो परंतु त्याला न धरला तर [illegible] प्रमाणे [illegible] ती एकसमुद्रांत भासे असतात त्यांचा उजेड पडतो रात्री तारवांत बसुन जातांना पाण्यात दिवा सारिखे चकाकतात व रानात काळोखी रात्रीस बहुत ठीकाणी आशा वनस्पती ही आढळतात की त्यांचे तेज चकाकत असते कोकणांत गुली ह्मणून झाड आहे त्या झाडाचा हा गुण आहे. कीती एक पदार्थ कुप असतात परंतु ते जसे नसतात तोपर्यंत [illegible] उष्ण केले ह्मणजे त्याचे आंगी उष्णता येते परंतु तेज नसते. धंडीचे दिवसांत घोड्यांचे व मांजराचे पाठीवर हात फिरविला ह्मणजे. तेज दृष्टीस पडते कारण की मांजराचे केसांत त्याचा समुच्चय असतो. तसेच रेशमी लुगडे कींवा पीतांबर आंधरात नेसीत असतां त्यातून तेज निघते हे कीती कांनी पाहाण्यात असेल वीज पडते ही तेज समुच्चय आहे व नक्षत्रे आकाशांतून पडतात तेही चमकणारे पदार्थ आकाशांत आहेत जसे जमीनीवर आ

हे [illegible] निश्चय करतां [illegible] आहेत ते दृष्टीस पडता
त सूर्य [illegible] आहे
त्यांचे [illegible] कोणी जाऊन पाहिले [illegible] नाही प
[illegible] मान असे [illegible] आहे [illegible] तो तेज
[illegible] आहे [illegible] आपल्या [illegible]
[illegible]
आहे जे कोणी पृथ्वी वर आहेत त्या सर्वांचे
जीवन सूर्य ने होते व पीक होते ते सर्व त्याम्
ळेच होते- पृथ्वी वर प्राणी हा प्रकार आहेत ह
जी [illegible] सर्वांत स्थूळ असे शरीरिक प्रा
णी कीती आहेत त्याचा अंत नाही मागे ए
क कपतान [illegible] बसून जात हो
ता तो त्यास [illegible] समुद्राचे पाणी असे लागले
की त्यास [illegible] समुद्रावरून चालतो आहो
असे वाटु लागले म्हणून त्याणे पाणी पिऊन
पाहीले तो आत शरीरीक जीवांची भ्रांती जाहा
ळी म्हणून स्थूळ [illegible] आरशे पिऊन लागे
पाहिले तो आत अनंत जीव शरीरीक दीसु
लागले त्यांचा वर्ण पांढरा सफेद तेजस्वी त्या
चे योगाने पाणी तसेंच पांढरे दिसत होते
पुढे ते पाणी काही कोसावर सरले आणि
दुसरा एक कपतान समुद्रांत तारवांत बसू
न जात होता तो त्यास हीरवे पाणी पन्ना
स कोस पर्यंत दीसु लागले तेव्हा त्याणे त्या
पाण्याची बीनारकी केली तो त्याचे कारण
कीडेच असे सिद्ध जाहाले परंतु त्या कीड्यां
चा बारीक पणा ईतका की एक थेंब भर
पाणी यास उघड्या डोळ्याने कांही दिसाव
याचे नाही [illegible] आरशांतून [illegible]
[illegible] पाहिले [illegible] आत कृमी दिसु लागल
[illegible] थेंब पाण्याचा हिशेब केला तो [illegible]
[illegible] की जीतकी पृथ्वी वर माणसे आहे
त तीतकेच पाण्याचे येक थेंबांत प्राणी
आहेत- आणि [illegible] प्राण्याचा [illegible]
[illegible] वने फिरतात व स्वस्थ
पणे जसे [illegible] गावांत माणसे राह
तात [illegible] प्राणी स्वस्थपणाने [illegible]
[illegible] येक थेंबात आरामाने सुखाने करीतात ह
[illegible] ईश्वराचे [illegible] आहे अ
से अनेक चमत्कार या पृथ्वी पर आहेत-

बाबणारा

---

## ज्ञानप्रकाश

तारीख २६ [illegible] सन १८४९

[illegible] मुलतान हुन फौज नीघोन कमांदर
[illegible] पैलवर [illegible] आहेत ती कडे जाऊन
[illegible] मोठी लढाई सेरसी
[illegible] नदीवर होईल असा सुमार
आहे- पूर्वी लढाई जाहाली त्यामध्ये जेज
[illegible] लोक पडले ते लढाईंत [illegible]
ही आणि कितीएकास शीकानीं दुसरे
दिवशी [illegible] अवस्थेत मारले व माल ता
[illegible] घेतला अशी त्यांची अवस्थ
जाहाली [illegible]
तजवीज [illegible] नाही- लढाईचे [illegible]
नर्थ आहेत की निरेक प्राणी मरतात पै
सा खर्च होतो तीतका पैसा उपयोगी का
माकरीता [illegible] केवढी चांगली [illegible]

सु होईल परंतु लढाईचे काम फार वाढेल; (पुढे) मागावर खंड सरकारानी बाहुबीजा हाईपरार नेशी; उरचन कपुंत नाही बांधू खंड येथे हीजु लुगाची गोष्ट आहे असे म्हणतात पो खंड पुज्यवी फारनेस नीकडे बहीआ आ जब आप मुलतान शहचा वेढा १२/८ ठीक गाहाता नाही गावांत जेवेना माणसे भरलेली तुर्क ईफेदीनीकडे पडलेले आहेत नीकडे नीकडे भयंकर दिसते - लोकांची घरे कितीएक पु शाली किती मकाने आपमेळे असे अन र्थ जाहाले - मुलतानास मुंबई आणणार ही फुन बातमी आहे परंतु खचीत नाही; शीग गाव पंचवीस तीरा वर्षाचा आहे - ज्याने ही जाहाल्या त्याविषई त्यास अगदी खेद नाही तो म्हणतो की माझा नीरुपाय जाहा ला तेव्हा मी शरण आलो माझा तोटा फार जाहाला माझा एक शहचा खजीना आगल गुन उडाला त्यामध्ये तीन हजार माणसे मा झी चांगली लढाऊ मेली असे अनर्थ जा हाले माझा जेल पर्यंत दम होता तेथ पर्यंत ... आला नक्की पडीत ... बरोबर कप्तान ... ट्रन साहेबाकडे पाठवीर ला आहे त्याचा मानाने नीट ठेवीला आहे असे म्हणतात की एका जनराल साहेबाने या सनिंद व भाषण असे केले की त्याचे पाठीवर हात मारला आणि म्हणाला की शाबास बाबा तुझ्या गळ्याला फास लावू याचे त्या पक्ष मुक्षसून तुझी ईतकी नीमते बारीचा

लढाई आ ... पुन ... - तेव्हा मला वाटते व लुक गावाचा ... आहे ... स्वस्थपणाने ... तीन ... ता व ... धरु वर्षे येवाल ... स असे वाटते की इंग्रजी ... ची लढाई चा बंदोबस्त चांगला होता परंतु ... कीयफरल ... अयवा ... याचा बंदो बस्त ... आहे ... एक दुसरे लढाईचीतव बरोबर ... आहे

---

असे म्हणतात की मीस्तर रीडास साहेब रीविन्यु कमीशनरचे कामावर हो णार मीस्तर ग्रीन साहेब कौसलात जाणा र आहेत त्या जागा खाली जाहाल्यावर मीस्तर वेर संड साहेब यास उत्तर भागा चे रीविन्यु करून दक्षण भागाचे रीविन्यु रीडास साहेबास करणार ईश्वर साहेब यांस सुरतेस जड्ज करणार परंतु शाहा साहेब याणी कापुसाचे प्रकर्णात फार मेहनत केली ... पटकेली त्यापेक्षा धारवाडास त्यास नेम तील असें वाटते ईष्ट वार्ड साहेब जड्ज सुरतहे वीलायतेस जाणार आहेत -

---

शहर पुणे येथे तारीख १८ फेब्रुअ री रविवार तारीख लकडे कापड करी नावक र पेठ कसबा येथे राहातात त्याचे घरावर आठ वाजता रात्रीस रोडा आला ... चा

रा आसामी हे ते त्याणी घरात नीट जाउन
ल सापडला तो जमा केला त्याग इतर घराती
ल माणसे फार घाबरून कोणी उडी टाकली
त्यास दुखापत जाहाली बायका मुलास फार
लागली व एका बाण्याचा हात तोडला आ
हे- हा दरोडा घरातील माल घेउन जात तो
पर्यंत आस पास कोणास खबर नाही जे
व्हां चोर गेले नंतर लोकास हका मारल्या
जाहाल्या तो संसारी लोक भी
तीने दारे लाऊन बसले- आणी मदतीस को
णी नाही यामुळे चोर स्वस्थपणाने नदी
चे कागने पार गेले सरासरी पांच हजारा
चा माल नेला आहे माणसास दुखापत
केली आहे- हा जदार यांचे घरी लग्नाची
वरात होती त्यामुळे बार वगैरे काढण्या
ची बंदी त्यादिवसी नवती तीसंधी चोरां
नी पाहीली असे वाटते ही खबर फौजदा
रास कळतांच त्याणी तावडतोब पाहाला
गावर गेले परंतु तोपर्यंत चोर पार होऊन
गेले पाठलागाची मेहनत रात्रो पुष्कळ के
ली परंतु चोराचा ठीकाण लागला नाही
असे शहरात व पोलीसाची गेटे नजीक
असतां अशी धांदल जाहाली हे आश्चर्य
आहे परंतु आह्मास असे वाटते की आम
चे लोकामध्ये संकट काळी मदत करणार
फार थोडे असतात जेणो आपले जीवाचे
भय टाकता व फौजदारास ही खबर देत
नाहीत असे जरी लोक मदत धैर्याने क
रतील तर अशी गोष्ट होणार नाही व हा

प्रकार लोकावर त्यांच्याने जबत नाही तर
त्याणी नोकर फौजदारास तरी कळवावे ह्मण
जे कांही तरी बंदोबस्त होईल चोर सापडती
ल- गावरखऱ्याने लोक शहरचे लोकां पेक्षां
एकमेकांचे साहायास उपयोगी फार पडता
त येथे तीरसिगार फार वाईट व चांगली गो
ष्ट असली तर पाहावयास तयार मेर नजीक
ओढे किंबहुना माहीतच- व दुसरे असे की पाली
पाकडील राहिले तो नेमलेले की रात्रो आवा
ज काढु नये आवाज काढणे ह्मणजे चोराचा
डगा आहे असे सर्वांनी समजावे वतनेच की
गस्त फिरविण्याची खुण वगैरे पहिले प्रमाणे
आता नाही ती तसी राखणे जरुर आहे व
चोकीदारास साहावाजल्या मारून घस्तीव
र ठेवावे ह्मणजे दरोबस्त नीट राहिल-

कोंडो बल्लाळ सीरस्तेदार नीसबत
अशीस्टन जडज्य याजवर त्याणी फीर्याद
ऐका शेती वाईने केली आहे त्याची चौक
शी होणार आहे

कर्नेल ओटराम साहेब यास सिं
ध मुलूख घेतला तव्हां तेथील लुट साप
डली त्याची वाटणी फौजेत केली त्यांपैकी
हीस्सा साहे बारा आले तो त्याणे धर्मास
यास दिल्हा कारण की त्या साहेबाचे असे
मनात होते की सिंध देश अन्यायाने घेत
ला- यास्तव तेथील लुटीचे वर्चारा त्याणे
धर्म हावकेला- परंत हाली असे हरत आ

हेकी तेसरकारात परवानगी।

---

फोजदारी साहेबानी पोलीसाचे सुपरई न्टेंट बेळगावांत नेमले आहेत त्यांणी आ पल्या कामाचा बंदोबस्त केला आहे यास्तव महसुफ यांचा चांगले मेहनतीचा लौकि क आहे.

---

हाली एक दुश्चयाचा असा प्रश्नार्थ आला आहे कीं एक ब्राह्मण बेळगांत दुध का ढीत असतां गाईने त्यांस मारलें ह्मणून त्याणे गाईस दांडयाने मारिलें त्यामुळें गा य ठार मेली तेव्हां या ब्राह्मणास शास्त्री प्रमाणे बहीष्कृत ठेविला आहे त्यास प्रा यश्चित काय असावें-

क्रोधहा फार वाईट गुण आहे प्रा चीनकाळी रागाने जमदग्नीने आपली स्त्रि मारली व विश्वामित्राने रागाने वशिष्टा चे शंभर पुत्र मारले वगैरे पुष्कळ घ डीले- असे अनर्थ रागाने पुष्कळ होतात रागाची गोष्ट आहे कीं एक स्वामी व त्या चा एक शिष्य बरोबर जात असतां महार थाल शिवला ते स्वामीनीं ते पाहि ले न पाहिले से करून चालले तो शिष्या बरोबर होता ते ह्मणू लागले स्वा मी तुह्मास महार शिवला स्नानास चा लावे तेव्हां ते ह्मणाले त्यांस चिंता नाही- तेव्हां शिष्यास राग आला आणि ह्मणा त्या आह्मास आपले बरोबर यावयाचे ना

ही ... होतेते पुढे ... आणी ... आलेत येऊन स्नानास नदीवर ... शिष्या ... पाहिली तो स्वामीनी ... तेव्हां त्या ने ... पुष्कळ ... त्या ... स्नान करण्या ... रागास काय आणी सांगीतले ... स्पर्श झाला ... नाही परंतु तुझे ... आणि तुजला शिवलास तेव्हां मला ... टले कीं महारापेक्षा तुझा राग ... ह्मणून त्या रागाने दुरूषाचे स्पर्श करितो ... न करितो तेव्हां शिष्य सत्वर येऊन स्वामी चे सेवेत पूर्व प्रमाणे राहू लागला पूर्वी ... जे साधु झाले त्याणी रागाचे दमन केले अशी किर्ती आहे आणि ज्याने राग सोड ला तोच साधु आहे असे आमचे ... हे- सदरहु ब्राह्मणाने क्रोधाने ... ली हे अनुचीत कर्म आहे ... शास्त्र ... अशीले पाहिजे- हे योग्य ...

---

काली फर्नीया ... देत देश आहे तेथे एक सोन्याची खाण सा पडली आहे ... उली आहे ... पडते पाउन करिता ... तु सांप्रत अमेरीका ... फार नाद ... आहे कीं जीत ...

[illegible] पूर्वी [illegible] इंग्लंड अमेरिका लोक [illegible] एकोणीस [illegible] सत्तर [illegible] अनिर्मित [illegible] रोजगार धंदा कुणी उद्योग करणें [illegible] परंतु लाभ मोठा [illegible] यांच प्रमाणें ईकाडेल [illegible] कीमयागिरि नादात वदेशांतर [illegible] आहे कीं किति एक लोक माधवराव [illegible] आबा पुरंधरे इत्यादि लोक याणीं [illegible] फार पैसा खर्च केला परंतु लाभ कांहीं जाहाला नाहीं जे कीमया शिकविणारे लोक असतात ते फार लबाड असतात व कृत्रिम करून कमवितात व कीति एक वैरागी व गोसावी थोरपणांचें सोंग घेऊन ठेवी हारविल्याचा नाद लोकांस लावतात व त्या लोभानें लोक त्यांचे भजनास लागतात परंतु असा विचार करावा कीं जर त्यांस ठेवी व कीमयेनें द्रव्य काढतां येईल तर ते [illegible] [illegible] हे जुने [illegible] नाहीं [illegible] कीमया हा होण्या सारिखा पदार्थ नव्हे [illegible] बहुतांची खात्री जाहाली आहे [illegible] आशा सोडित नाहीत तरी हाली [illegible] कांहीं कांहीं लोकांची अवस्था जाहाली आहे.

---

[illegible] शीड साहेब हे [illegible] पलटणीचे [illegible] साहेब [illegible] यांणीं [illegible] केला त्यांत मास्तर [illegible] साहेब प्रमुख होते त्यांस [illegible] जाहाले ते [illegible] करून पैसा जमा केला आणि आठ हजार रुपये सरकारी पोदीत ठेऊन त्यांचे व्याजावर एक विद्यार्थी ग्रांट साहेबांचे [illegible] [illegible] [illegible] त्याचा [illegible] त्या विद्यार्थीचें नाव शीड [illegible] व बाकी रुपये राहातील [illegible] सर्व मजकुर [illegible] शीड साहेबांस [illegible] मान [illegible] आहे हाली साहेब लोकांनीं पारशी वगैरे सावकार मुंबईचे [illegible] आकडे [illegible] त्याचा आकार सरासरी नवहजार रुपये त्याच दिवशीं जाहाला.

---

मेजर [illegible] साहेब यांणीं ग्रंथ केले आहेत त्यांचे वर्णन पहिले पत्रांत केले आहे त्यापैकीं [illegible] [illegible] [illegible] ग्रंथ मेजर [illegible] [illegible] पुण्यांत [illegible].

---

[illegible] साहेब [illegible] यांणीं सरकारी [illegible] महत्वाचा हरबार करून [illegible] त्याविशीं मजकूर पुढल्या पत्रांत लिहूं.

---

[illegible] पुणें येथें [illegible] वार पेठें [illegible] [illegible] यांचे वाड्यांत [illegible] [illegible] छापखान्यांत [illegible] [illegible].

अव्हास बाहेरचीं पत्रें आलीं तीं

ज्ञानप्रकाशकर्ते यांस.

विनंती विशेष इंग्रजी सर्कार आमचे लोकांची विद्या दृध्धी होई न सुधारणा व्हावी ह्मणोन परम औदार्यानें व परोपकार बुध्धीनें कोरी शाळा घातल्या आहेत त्यांत पुण्यातील पाठशाळा मोठा खर्च करून त्या शाळेचा बंदोबस्त केला आहे परंतु मला असें वाटतें कीं हल्लींची त्या शाळेची स्थिती जर पाहाल तर असें लक्षांत येईल कीं सर्कारचा शाळेबदल एवढा खर्च होत असतां त्यापासून कोणताही विषय विद्यार्थी यांस चांगला अवगत होऊन कांहीं उपयोग व्हावा असा येकही दिसत नाहीं त्याविषयीं एक मुख्य गोष्ट सांगतो पाहा कीं सर्वांस उपयोग व सर्वांचे शरीराचें रक्षण करणारें असें जें मुख्य वैद्यशास्त्र त्याचीतर फारच अनास्था दिसते तेथें मी एकवेळ गेलो होतो तेव्हां तेथील व्यवस्था पाहिली ती अशी कीं विद्यार्थी इतर शाळे इतके असोन आणि गुरु येकच आहे व त्या विद्यार्थीस सिकावयाचे विषय इतर शाळे पेक्षां अधीक आहेत त्यामध्यें मला मनांत असें आलें कीं इतके विषय प्रत्येक विद्यार्थ्याचा मनांत भरणें हें कठीण दिसतें परंतु याजविषयीं पक्की माहीती व्हावी ह्मणोन तेथें जें सर्कारचे शारीर विषयक पुस्तक पाठ झाले आहे ते समजोन घ्यावे ह्मणोन प्रार्थना केली तेव्हां गुरूनें एका विद्यार्थ्यास सांगि तलें कीं हे गृहस्थ आले आहेत हे शारीर विषयक ज्या गोष्टी विचारतील त्यांचें सर्व सांग तेव्हां त्याणें उत्तर केलें कीं माझ्यानें सांगवणार नाहीं त्याप्रमाणेंच बहुतेकांचीं उत्तरे आलीं तेव्हां गुरूनें तो सर्व विषय समजाऊन दिल्हा त्याजवरून तेथील व्यवस्था राखणार सुपरिंटेनुडेंट यांणीं ही गोष्ट लक्षात आणून विचार करावा कीं सर्वोपयोगी व आवश्यक जें वैद्यशास्त्र याचा अभ्यासी फारच कमी व वैद्यशास्त्र कठिण आहे हें २।३। वर्षांत चांगलें येणार नाहीं याजकरितां सर्कारानें तेथील व्यवस्था चांगली ठेवावी ही आमची प्रार्थना आहे.

ज्ञानप्रकाशकर्ते महाराज हें पत्र चांगलें छापून प्रसिध्द करावें ह्मणजे तेथील मुख्य आहेत ते याचा बंदोबस्त करतील.

विद्यावृध्धी इच्छिणारा.

विद्याकल्पी तख्तिगार यांस
पत्र आला आपणे आहे त्यांस या
असा आहे कीं संस्कृत पाठशाळेत
विद्या शिकविण्याची जी रीति आ
हे याहून चांगली पध्धती करावी या
वि[illegible]ल्यास असें वाटतें कीं संस्कृत
शिकणें सुलभ करण्यास काहीं
अवघड नाहीं ग्रंथ सुलभ करावे
आणि लोकर प्रवेश होईल असें
करावे. सांप्रतकाळीं शाळेंत जे वि
द्यार्थी शिकतात ते फक्त दरमहा
चे नजरदारा प्रमाणें शिकतात आ
णि जी विद्या रुपये देऊन शिकविता
त त्या विद्येचें माहात्म्य किती रहीं
असावें बरें ? विद्या होसेने परस्पर
पैसा देऊन शिकतात अशी सर्व ज
गांत चाल परंतु संस्कृत विद्या पैसा
देऊन शिकवीत लागले पूर्वी गुरु न
शिष्य [illegible] कुरकुट शिकवीत
व शिकत आतां उभयतांस ही वेत
न द्यावे लागतें याचें कारण संस्कृत
शिकल्या अंती द्रव्य प्राप्ती नाहीं जे
संस्कृत शिकतात त्यांस रोजगार
नाहीं पोट भरण्याची विद्या शिकाव

याची काहुन पाठशाळेत दक्षिणेच्या
आशेनें येतात परंतु विद्या करव
याचें व्यय येथे चालउन पुरे नाहीं
निर्वाहाची सोय नाहीसी होत्ये योग्य
व अल्लास वाटतें कीं संस्कृत विद्या
लोकांमध्यें प्रसिध्द व्हावी असें
करणें अवश्य आहे व असें करण्या
स ग्रंथ नवीन सुलभ केले पाहिजेत
आताचे ग्रंथावरून येक व्याकर्ण
पणावयास १२ वर्ष लागतात व
धर्मशास्त्र ह्मणावयास १० वर्षे ला
गतात कारण कीं प्रथमतः भाषा
शिकवीत नाहीत परंतु मोठाले
ग्रंथ पाठ करवितात आणि पाठक
र्ता कर्ती त्या पढणाराचा कंठ शोष
होतो अशा रीतीनें जे शिकतात
त्यांस दाहा बारा वर्षें श्रम करून
येक शास्त्रांतले ग्रंथ सगळे पाठ
आहले असतात तितक्या पुरतीच
समजूत होत्ये फक्त धर्मशास्त्र प
ढला आहे आणि त्याला ह्मटलें प्रगण
[illegible] नरयेत नाही किंवा दुसरा
[illegible] ग्रंथ [illegible] पाहिला
नाहीं तो [illegible] कळत नाहीं असी री
ती शिकण्याचीतर कोठेंनाही आतां
इंग्रजी पारसी व इतर भाषा शिक

नात परंतु पाहिल्यानें भाषा पक्केपणें शिकतात नंतर जो ग्रंथ दिल्हा तो वाचावयाचें सामर्थ्य येतें तद्वत संस्कृत शिकणारास भाषाशिकण्याचे ग्रंथ असावे हें चांगलें व दुसरें येक कारण असें आहे कीं विद्यार्थ्यास संस्कृत नवीन शिकविण्यापेक्षां त्यांजकडू ग्रंथ मराठीत करवावे ते बरे जसें कोणी येक गृहस्थ आहे त्यास संस्कृत ज्योतीष काय आहे तें शिकावयाचे आहे तर त्यास ग्रंथ नाहीं याजमुळें प्रथम संस्कृत ग्रंथ शिकणें पडतें हें फार ओघड आहे· झाडुन सर्व संस्कृत ग्रंथ प्राकृत करावे ह्मणजे ज्ञान वृद्धी लोकांत लौकर होईल जसे इंग्रजलोक लाटीन व ग्रीक शिकल्या खेरीज त्याभाषेतील ग्रंथ व सर्वशास्त्रें पाहू सकतात तद्वत हिंदुलोकांस संस्कृत शिकल्याशिवाय प्राकृतद्वारा कळण्याकरितां साधन केलें तर मोठे लोकावर उपकार होतील पुराणें, उपपुराणें, माहात्में, व वैद्यक वगैरे सर्व प्राकृत असावीं संस्कृत ग्रंथ वाचावे अशी पुष्कळ इच्छा करितात परंतु उपाय काय? यास्तव प्राकृत ग्रंथ असले ह्मणजे संस्कृत बुडणार नाहीं ज्यांस अवकाश सापडेल ते तरी शिकतील च परंतु जे दुसरे उद्योगामुळें शिकण्यास योग्य नाहींत त्यांस सुद्धां येकदा वाचल्यानें सर्व विषय ध्यानात येतील हा केवळ लाभ आहे- यास्तव पाठशाळेकडून हें काम सिद्धीस जावें आणि हिंदू लोकांचो फायदा व्हावा ह्मणजे शाळेचें सार्थक आतापेक्षां अधीक होईल यांत संशय नाहीं·

पाठशाळेचे अंतर्गत येक शाळा इंग्रजी घातली आहे हें मोठें उपयोगाचें कृत्य आहे· आणि सदरी लिहिल्याप्रमाणें केलें असतां हे महत्कार्य होईल.

---

जडजाचे शिरस्तेदाराचा मनोदय चाकरी सोडण्याचा आहे त्याचे कारण नसिबीत असें आलें आहे कीं त्याचा पाय येक व्यंग आहे सबब त्याचानें कामाची मेहेनत होत नाहीं·

---

साताऱ्याचे राज्य खालसा सर्कारात करण्याचा लौकर येत आहे·

---

ज्ञानप्रकाशकर्ते यांस.

विशेष लोकामध्यें कितीयेक गोष्टी विषयीं खोड्या कंड्या उठवितात याचा अनुभव सर्वांस आहे. व कितीयेक लोक खोटे कागद नवे बनावितात व कितीयेक वह्या पुराव्यास खोटे जमाखर्च करून देतात असी खटली कितीयेक पाहण्यांत येतात व जेजे लोक भले म्हणुन म्हणवितात त्यांत देखिल खोटे पुष्कळ अस्तात तेव्हां तात्पर्य मला वाटतें कीं जे न्याय करितात त्याणी अशा गोष्टी मनांत आणून पुढी नजर पुरविली पाहिजे कीं वकील लोकांचें बोलण्यावर व फिर्यादीवर भरंसा नाहीं या कामांत मोठें फार थोडा सबब खोल बुद्धी लावून काढली पाहिजेत कींनाहींत हें?

येक दर्बारांत वाहणार.

---

सिकांचे लढाईचा अंत जाहला म्हणून मागील पत्रावरुन लोकांस कळलेंच असेल शेरसिंग सिकाचें लष्कर व तोफा घेऊन शरण आला परंतु त्याचे फौजेतील वेटन लोक इकडे तिकडे फिरत आहेत त्यास हजारो लोकांस शासन होत नाहीं याजकरितां इंग्रजानीं असी युक्ती काढली आहे कीं असे बंडवाले लोक जे आढळतात त्यांस चाकरीस ठेऊन घेतात व त्या लोकांस काहीं देशाभिमान किंवा स्वराज्यास झटावें ही समजुत नाहीं ते फक्त पोटार्थी आहेत जो खाण्यास देईल त्याची चाकरी करून सांगीतलें त्याज बरोबर लढावयास शिर हातात घेऊन उभे राहतील असे ते लोक आहेत तेंव्हां इंग्रजानी त्यांस चाकरीस ठेविले म्हणजे स्वस्थपणा होईल याजकरितां कांहीं कांहीं बंडवाल्यास चाकरीस ठेवित आहेत.

---

सदर अदालतीचे हुकुमावरून असें ठरलें कीं सर्कारचा जाहीरनामा लागला कीं सरंजामावर कर्जदार मेल्यानंतर कर्ज वसुल होणार नाहीं तो हुकुम इनामास लागु नाहीं असें रांझेकर याचे कज्जान्त ठरलें

---

# ज्ञानप्रकाश

सत्य गौरव ज्ञान

पुस्तक १ कागद ९ शहर पुणें

तारीख ९ अप्रील सन १८४९ इसवी मिती चैत्र वद्य २ सोमवार १७७१

पत्राची किंमत आगाउ रु॰
दरसाल १०  अर्धेसाल ६
तीन महिने ३॥॰ महिना १

आमचें पत्र वाचणारे यांस सुचना आहे कीं सदर्हू प्रमाणें किंमत पोचती करण्याची तजवीज करावी.

---

### आठवड्याचें पंचांग

| ति॰ | वा॰ | न॰ | यो॰ | क॰ | मु॰ | इं॰ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | चं | स्वा | व | तै | १५ | ९ | |
| ३ | मं | वि | सि | व | १६ | १० | |
| ४ | बु | अ | व्य | ब | १७ | ११ | |
| ५ | गु | ज्ये | व | कौ | १८ | १२ | |
| ६ | शु | मू | प | ग | १९ | १३ | |
| ७ | श | पू | शि | व | २० | १४ | |
| ८ | र | पू | सि | व | २१ | १५ | |

दिनमान ३०।३०

क्रांति अंश ९॥

सरकारी कामगारांचा नेमणुका- रिविनिसुरसाने.

---

मिस्तर डेविडसंन फष्ट अशिष्टंन कलकटर पुणें यांस १ मे पर्यंत रजा दिल्ही आहे.

### दिवाणी

मिस्तर बेजर अगटिंग जड्ज नगरास कामावर दाखल जाहले.

धपाळ्जी लक्ष्मण शिरस्तेदार नगरास अगटिंग मुनसफ नेमले.

त्रिंबक गोविंद गणपुले यांस अवसरी पेट्यास अगटिंग माहालकरी नेमले.

---

### जाहीरनामा.

सर्कारातून बाळहत्त्या रजपूत लोक करितात त्यांचे दूषणार्थ ग्रंथ करण्याकरितां ६०० व ४०० खर्चाचे बक्षीस नेमलें होतें त्यापैकी कुवरजी मोदी पारसी यास ४०० रुपये बक्षीस ग्रंथाबदल दिल्हें.

---

बाहेरून आलेली पत्रें.

ज्ञानप्रकाशकर्ते यांस

१ मागील येका पत्रांत तेज व उष्ण भिन्न पदार्थ आहेत असें लिहिलें होतें सांप्रत उष्णा विषयीं चमत्कारिक गोष्टी लिहितो याचप्रमाणें आपणीं त्याचा विचार करावा अशी आमची इछा आहे.

२ उष्णा विषयीं शास्त्रकारांनीं विचार फार केला आहे परंतु त्यांची एक वाक्यता जाहली नाहीं त्याचे तीन पक्ष आहेत.

३ कोणी ह्मणतात कीं उष्ण हा पदार्थ पाण्यासारिखा पातळ आहे.

४ दुसरे पक्षाचे ह्मणतात कीं हा पदार्थच नाहीं परंतु अणु, रेणु यांची स्थिती बदलली ह्मणजे हें उत्पंन होतें.

५ तिसरे पक्षाचे ह्मणतात कीं उष्ण हे रजःकण आहेत व त्यांस धारा आहेत त्या पदार्थांत शिरून तपन करितात.

६ यांजपैकीं पहिले पक्षाचें मत खरें आहे कारण कीं उष्ण, थंडी वगैरे ज्या पदार्थांस लागते तो पदार्थ पातळ होतो तस्मात् उष्ण हा कांहीं तरी जळासारिखा पदार्थ आहे असें वाटतें कारणकीं जसें जळ पदार्थास पातळ करितें तसेंच उष्ण ओं पदार्थास व्याप्त होतें त्याचे अवयव ढिले पाडितें ह्मणजे त्यास शैथिल्य आणितें.

७ जितके पदार्थ सृष्टींत आहेत ते अणु रेणु याचे घडलेले आहेत व या अणु रेणूंचा नाश कधीं होत नाहीं पदार्थांचें स्वरूपमात्र बदलतें ह्मणजे असें लक्षांत आणा कीं मनुष्य मरतें त्याची मृत्तिका होते त्याजवर झाडें होतात तीं मरून पुनः उगवतात असा अनुक्रम बदलतो मूळ परमाणु ते कांहीं नाश पावत नाहींत जर आपण येक लाकडाचा तुकडा घेतला आणि त्याची पूड केली तर त्याचे रजःकण किती होतील आणि ते सर्व त्या लाकडाचे पोटांत होते परंतु येकास येक लागून होते ह्मणून दिसत नाहीं खलाचा प्रहारानें त्याचा वियोग जाहला ह्मणून दृश्य जाहले याप्रमाणेंच येक दुधाचा थेंब तांब्याभर पाण्यांत टाकिला तर त्याचा रंगाचें तांब्याभर पाणी होतें तेव्हां त्या दुधाचे रजःकण किती बारीक असतील सूक्ष्म दर्शी आरसा यानें पाहिलें ह्मणजे पाण्यांत अतोनात किडे दिसतात परंतु नित्य पाणी आपण पितो त्यांत दिसत

नाहीं नसेन जितके पदार्थ आहेत तित क्यांचे पोटांत अणुरेणु आहेत परंतु तेजसुन असतात ह्मणून त्यांची फुट दिसत नाही. जा फुलाचा वास येतो त्या चें कारण असेंच आहे कीं त्याचे अति शय बारीक परमाणु नाकास व पुढारें स्पर्श करितात ह्मणुन वास येतो तेंव्हां हे परमाणू किती बारीक असतील?

८ आंत उष्ण अधीक असतें तो प दार्थ थंडापेक्षां वजन अधीक भरतो याजवरून उष्ण हा कांहींतरी पदार्थ अंतर्गत आहे असें सिद्ध होतें.

९ उष्णाच्या जाती दोन आहेत प्रग टीत आणि येक गुप्त सर्व पदार्थांत नगं दित उष्ण आहे तितकें मात्र आपल्यास कळतें परंतु गुप्त किती आहे याचा अंत नाहीं. असें समुद्राचे पाण्यांत व नदीनाप ण्यांत उष्ण अधीक उणें आहे परंतु त्यात उष्णदर्शक यंत्र टाकलें तर सार ख्याच पारा चढतो व पाणी गार करणें याचा प्रकार त्यांतील उष्ण काडुं शकणें असा नाहीं त्यातलें उष्ण त्यांत [illegible] रंतु तें गुप्त होतें सबब स्पर्शेंद्रियांस किं वा यंत्रद्वारें कळत नाहिसें होतें.

१० पदार्थांतील उष्ण प्रगट होण्या चे पर्याय तीन आहेत १ ताडण २ घर्षण ३ संयोग.

११ ताडणानें उष्ण प्रगट होतें या चें कारण असें कीं पदार्थांचे अणुरेणु येकामेकांस घांसतात आणि उष्ण बाहेर पडतें सोनार सोनें ठोकित अ सतांना तापतें तसाच लोहार ताशीत असतांना हत्यार तापतें व लाकूडही उष्ण होतें.

१२ घर्षणानें उष्ण प्रगट होतें याचें उदाहरण दोन लाकडें येकेजागीं घांसली ह्मणजे विस्तव पडतो चक मक झाडली ह्मणजे विस्तव पडतो. गाडीची चाकें व दुसरी यंत्रें फिरतां फिरतां [illegible] रानांत दोन झाडाच्या फांद्या येकामेकांस लागुन वारा सुटला ह्मणजे घांसतात आणि विस्तव पडुन वणवे लागतात.

१३ संयोग फळ असें आहे कीं चुन्याची कळी पूर्वी हातास थंड लाग ते आणि त्याजवर पाणी पडलें ह्मण जे त्याचे पोटांत अदृश्य उष्ण अ [illegible] होतें.

१४ कितीएक पदार्थ उष्णास अ गम्य असतात व कितीएक उष्णगम्य असतात जसें लाकूड येका अंगा स जळत असतें तरी हातांत धरितात

परतु जो खाद्र येका अंगास उन्ह केलें तर त्याचे शेवटा पर्यंत सारखें तापतें कारण कीं धातूमध्यें उष्णाचा प्रवेश लवरित होतो

१५ मनुष्याचे व इतर जीव जंतू वनस्पती इत्यादिकांचे अंगात उष्ण असतें उष्ण असल्याशिवायजीवन व्हावयाचें नाहीं ह्मणून मेलेले जीवाचे अंगांत उष्ण नाहींसें होतें.

१६ उष्णाचागुण असा आहे कीं ते पदार्थांत पसरतें सोन्याची अंगठी तापविली ह्मणजे तिचे वर्तुळ मोठे होतें याज करितां गाडीस व कांबील कडया बसवण्याचा असल्या तर तापऊन बसवितात ह्मणजे तिकडे जों जों निवतें तों तों घट्ट होऊन नियेनासी बसते.

१७ गंधकाचे आसिड व सोन्याचे आसिड येकत्र करून तेलांत थेंबटाकला तर तेल पेटतें असे चमत्कार रसायण शास्त्रांत पुष्कळ आहेत.

१८ तात्पर्य हा विषय फार मोठा आहे पुनः मी कधीतरी आणखी लिहीन परंतु ईश्वराचें भांडार मोटें आहे व त्याणें ज्या जीवास जितकें उष्ण पाहिजे तितकें त्याचे शरीरांत देविले आहे पाण्यातले जीव आहेत त्याचे अंगांत व पक्षी यांचेही अंगांत उष्ण अ धीक असत व मनुष्याचे अंगात त्याहून कमी सिवाय मनुष्यास जा ठिकाणी निर्माण करितो त्या ठिकाणी त्याचा निर्वाह व्हावा असी तजवीज करितो थंड हवेतील माणसें गोरवर्ण असतात उष्ण हवेताल सदा नगर फाके असतात याचें कारण कृष्णवर्ण अंगास उष्णाचा बाधा होत नाहा ह्मणून तसाच वर्ण त्यास देतो असे नानाप्रकारचे चमत्कार विचार केले तर आढळतात यासंबंधी विचार मात्र केला पाहिजे ह्मणजे ईश्वराचा योजना पाहून आश्चर्य आणि अल्हाद होता होवुनात.

रसायणशास्त्रज्ञ.

---

ज्ञानप्रकाश

तारीख १ अप्रील सन १८४१

सिक्कांची लढाई इंग्रज सर्कारातून जाहीरनामा लागला आहे त्याची नक्कल खाली लिहिली आहे त्याजवरून सर्व मजकूर कळेल—

जाहीरनामा.

विद्यमान वाल्टर गार्जी हंटर इ
स्कोयर अगटिंग यजंट जिल्हा दक्षण
यांजकडून. सर्कारी हुकुमावरून सर्व
लोकांस कळण्या करितां प्रगट क॰
ण्यांत येतें कीं शहर गुजराथ येथील
लढाई नंतर मेजर जनराल सर वालटर
गीलबर्ट. के. सिबी यास सिकांचे दुमाला
केले होतें तेंव्हा सीक अगदीं जेर होऊ
न तारिख १४ मार्च रोजीं सर्दार चतर
सिंग व राजा षेरसिंग अपरवी सर्दार
याणीं साहेब ममदुपाचें हवाली आपल्या
तरवारी व ४० तोफा केल्या व त्याची फौ
ज १६००० लोक याणी इंग्रजी लष्करा
चे समक्ष जमीनीवर आपली हत्यारें ठेव
कली आणि सर्व शरण आले. इंग्रजा
कडील जे लोक सिकांनीं कैदेत अड
किवले होते ते सर्व परत सलामत आले.

येकंदर सिकांच्या तोफा आजप
र्यंत १५८ घेतल्या त्यांचा तपसील मु
लतानांत ५४ चिलीयनवाल्याचे लढा
ईत १२ गुजराथचे लढाईत ५६ वह
ही ४१

इतकें जाहलें तरी अद्यापि लढाई
तमाम जाहली नाहीं दोस्तमहंमदखान
व काबूलची फौज यास पेषावरातून
काढुन देई पर्यंत किंवा त्यांचा नाश
होई पर्यंत लढाई जारी राहील.

इंग्रजी फौज अटकेवर जात
आहे. आणि परमेश्वराचे कृपेने
तिकडुन विजयी होऊन फत्ते
येईल अशी आशा आहे.

सिक शरण आले याचे फ-
ददा पूर्ती करितां २१ तोफांची स
रबती दरयेक लष्करांत करण्याचा
हुकुम फर्माविला आहे.

सही यजंट.

डाक्तर बुसट साहेब मुंबईत
आहेत त्याणीं असा येत केला आ
हे कीं बेवारसी मुलें मुंबईत पुष्क
ळ आहेत तीं चोऱ्या वगैरे करून
पोट भरतात कारण कीं त्यांस को
णीं संरक्षण करणारा नाहीं दरसा
ल पोलिसाचे कैदखान्यांत सरास
री दोनशें मुलगे सापडतात त्यां
स अन्न वस्त्राची सोय नाहीं ह्मणु
न ते अपराध करितात यास्तव त्यां
चें संरक्षणा करितां त्याणीं असा
~~येत केला आहे कीं येक अन्नछत्र~~
व शाळा येके ठिकाणीं घालावी
व सर्कारांनीं कायदा असा केला
आहे कीं जे धर्मात्मे बेवारसी मुला
चे संरक्षणा करितां शाळा व अन्नछ

घालतील त्यांस त्या मुलांवर अधि
कार या प्रमाणें आहे त्या काय द्याप्र
माणें मुलांस आणून तेथें ठेवावी व
त्यांस खावयास घालून दरयेकास
कसब व विद्या शिखवावी आणि चां
गले कामगार उपयोगी माणुस करून
वाढले ह्मणजे लाउन द्यावे याप्रमाणें ते
तयार करून काम चालु केलें आहे व त्यास
खर्चास पैसा पाहिजे तो पट्टी करून
जमवितात आहेत अशा कामास म
दत करणें हें फार चांगलें आहे कारण
कीं अशा उपयोगी अन्नछत्रा पासून
किती लोक सुधारतील व शाहणे होती
ल याचा अंत नाहीं. हल्ली टिपेच्या या
दी सर्वत्र ठिकाणीं पाठविल्या आहेत
व पुण्यांतही लेखरीत आल्या आहेत
जे धर्मात्मे लोकहितेच्छु आहेत ते
मदत करतील असें अह्मास वाटतें.
आजपर्यंत साहेब लोकानीं वगैरे मुंबई
तील सावकारांनीं रुपये दिल्हे त्याचा
आकार २००० अशा धर्मकृत्यास पैसा
लागेल तो सार्थकी लागेल

---

वादी लोक, आणि प्रतिवादी
सर्कार.

सर्कार चांगलें किंवा वाईट या
चें ज्ञान रयतेचे सुखावरून होतें जि
तकें रयतेस सुख तितकें सर्कार चांग
लें असें जाणावें तेव्हा यानेमाप्रमाणें
हल्लीचे सर्कारचा विचार केला असतां
मागील सर्कारांत रयत सुखी होती
तितकी यास र्कारांत नाहीं असें येकं
दर सर्व लोकांचें अनुमत आहे. मोटे
मोटे लोक ह्मणतात हें तर आश्चर्य नाहीं
परंतु सामान्य लोकही असेंच ह्मणता
त गोंधळ ह्मणून येक शूद्र प्रवृत्ती मा
र्ग आहे त्यांत गोंधळी पोवाडे वगैरे
मागील सर्कारचे स्तुतीचे ह्मणतात
आणि त्या गतसुखाचें वर्णन करित
त तेव्हां ऐकणारे यांचे अंतःकर्ण स
द्र होतें आणि अश्रु येतात आणि अ
सें वाटते कीं मागील सर्दारांची नावें
व त्या गोष्टी ऐकण्यास मात्र राहिल्या
आहेत आणि हल्लीचे सर्कारच्या रीती
भाती ज्या लोकांस पसंत नाहीत त्याचें
उद्घाटन करून वारंवार गोंधळांत
उपहास करितात याप्रमाणें ह्मार
वगैरे लावण्या ह्मणतात त्यांतही ह्या
च प्रकार आहे कंपणी सर्कारचे स्तु
तीचा पोवाडा अद्यापि कधीं ऐकण्यां
त आला नाहीं. पोवाडे करणारे जरी
विद्वान नव्हेत तरी रयतेचे मताचे

धोरणास ते योग्य आहेत कारण कीं ते अनुभवाची गोष्ट सांगतात मात्र व आह्मास वाटतें कीं कंपणी सर्कारानें व तत्पक्षी अधिकारी यांगीं असी तजवीज करावी कीं गोर गरीब यांचे सुखानेंहीं त्यांची स्तुती वर्णन व्हावी. मागें असें ऐकण्यांत आहे कीं मोगल सर्कारातून कोणी वकील शाहूराजाकडे आले त्याणीं तीन प्रश्न केले कीं तुमचे राज्यांत फौज किती व द्रव्य किती व प्रजेस सुख किती त्याचें उत्तर राजाकडील कारभारी याणीं दिल्हें कीं सर्व रयतेचे मनांत आमचें राज्य असावें असें आहे याजमुळें आह्मास सर्वांचा भर्वसा असा आहे कीं ते आमचें राज्य बुडु देणार नाहींत इतकी फौज आहे व द्रव्य सर्कारचे खजिन्यांत कांहीं नाहीं परंतु राज्यांत सावकार व सर्दार येकेक असे आहेत कीं प्रसंगी लाखो रुपये आह्मास होसेनें देतील व प्रजेस सुख इतकें आहे कीं दळणाऱ्या स्त्रियाही ओव्या आमचें राज्य चांगलें ह्मणुन गातात हें उत्तर ऐकून त्या वकिलाची समस्या परिपूर्ण होत्साता तो आपले घरीं गेला- वास्तवीक त्या राजाच्या ओंव्या तेव्हां गात असतील तर काय आश्चर्य परंतु अद्यापि गातात परंतु इतक्यांत येक चमत्कार आहे कीं मुसलमानाचे राज्यांतील सुख व मराठी स्वराज्यांतील दुःख व दुधा लोकांस सारखें वाटतें व दोहोंचें वर्णन समान करितात अस्तु मागील राज्याचे व हल्लीचे राज्याचे सुखांत एवढा फेर कां आहे.?

हा विषय आह्मीं पुढें कधीं लिहूं परंतु आह्मास असें वाटतें कीं या सर्कारानें एवढा प्रयत्न केला असतां स्तुतीस पात्र होतील यांत संशय नाहीं- सर्कारचे व त्यांचेकडील अंमलदाराचे हातीं बहुत आहे त्याणीं उद्योग केला असतां विद्या वृध्दी वगैरे कितेक गोष्टी सहज त्यांचे पदरास खार न लागतां होतील परंतु याविषयीं त्यांचे मनांत इतकें वागलें पाहिजे कीं या देशांतील लोकांचें हित करावें हें आमचें मुख्य कर्तव्य आहे- याचें उदाहरण मागें अल्फिन्सन साहेब याणीं कांहीं लोकांपासून पैसा जमा करून शाळा घातल्या व क्लार्क साहेब गौनेर याणीं पुस्तकग्रहें घातलीं चालली आहेत कीं नाहीं ? बरें यांत कांहीं खर्च त्यांस पडला ?

तथापि आमचें ह्मणणें असें आहे कीं हे लोक केवळ निस्वार्थ जाहले आहेत यां चे हातून सर्व कार्य घडणें कठीण याज करितां इंग्रज लोकानींही पदरचा पै सा खर्च करावा हें अशुध्य नाहीं अहो पाहा ! ज्या देशांतील लोकांचे मेहेनती वर हे लोक पोट भरतात असें नाहीं परं तु पांच पांच हजार रुपये पगार घेता त आणि लाखो क्रोडो रुपये संपादि तात त्याणीं या देशांतील लोकांचें हि तास असें कोणी ह्मणेल कीं काय. जर हुतकें ऐश्वर्य या देशातील लोकांस असतें तर अह्मी या देशांतील लोकांस नाव ठेविलें असतें मुख्य कर्तव्य यां देशांत सर्कारास असें आहे कीं विद्या वृध्धी करावी या सारखें दुसरें कर्तव्य कोणतेंही दिसत नाही.

---

बेळगावांस फष्ट असिष्टन क लकटर हाड्डो साहेब याणीं आपले मु नशी व दोन मामलेदार यांचा लबाड्या धरून तीन तीन महिन्याचा डेपा व २००० रुपये दंड दरयेका पासून घे तला असें ऐकतो.

---

आलीकडे ताजीखबर असी आहे कीं पंजाबातील बंदोबस्त करावा करितां ४ कमीशनर दरयेकास पगार २७०० रुपये प्रमाणें नेमिले आहेत.

---

रुम पहरास पहिलें सर्कार ब दलून लोकसत्तात्मक सर्कार लोकानीं चालू केलें रुमचा इतिहास पुढलें प त्रांत लिहू.

---

तासगांवकर बाईसाहेब यांस पुत्र जाहला तो परस्थळचा असा संशय उत्पन्न जाहल्याचें वर्तमान आहे.

---

मिस्तर जार्ज अंडरसन यांस नाईट असा अलकाब देणार ह्मणजे त्याचें नावा पाठीमागें सर अशी अक्ष रें लिहितील. विलायतेंत राणीनें दर्बा र केला त्या दिवशी या साहेबांची भेट जाहली नंतर ते मद्रास गौरनरीचे कामावर जाणार होते.

---

शहर पुणें येथे शुक्रवार पेठे तील बारामतीकर यांचे वाड्यांत कृष्णा जी त्र्यंबक रानडे याणीं ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापून प्रसिध्य केलें.

# ज्ञानप्रकाश

सत्य · सौम्य · ज्ञान·

पुस्तक १ कागद २४

तारीख १ अकटोबर सन १८४९ ईसवी मिती अश्वीन शुद्ध १४ सोमवार शके १७७१

पत्राची किंमत रुपये·

दरसाल· १२ अर्धेसाल· ६

तीन महिने [illegible] येक महिना १

छापखान्यांत विक्रीचे ग्रंथ· आणे·

१ लक्ष्मीज्ञान ह्मणजे पारि १२

दिकाल इकानोमी·

१ दृष्टांतिक वाक्यें ६

१ कामदारांशीं संभाषण ३

१ मोडीचे किते· ।·

१ बाळबोध किते ।

वसूल रुपये·

१० नमरची लैब्ररी·

पंचांग

| ति· | वा· | न· | यो· | क· | ता· | इ· | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | सो | पू | ध्रु | व | १२ | १ | कोजागरी अकटोबर |
| १५ | मं | उ | व्या | व | १४ | २ | |
| [illegible] | बु | रे | [illegible] | कौ | [illegible] | [illegible] | |
| २ | गु | अ | ह | ग | १६ | ४ | |
| ३ | शु | भ | व | ब | १७ | ५ | संकष्टी ४ |
| ५ | श | कृ | सि | कौ | १८ | ६ | अमृतसिद्धियोग |
| ६ | र | मृ | व्य | ग | १९ | ७ | |

सूर्योदय पांच तास ५२ मिनिटें सूर्यास्त ५ तास ४७ मिनिटें·

सरकारी नेमणुका·

जडकीय खातें·

डेपटी इनस्पेक्टर अशिष्टन रशिदंड दे यांस मराठी भाषेंत परिक्षा देण्यास महिन्याची रजा दिल्ही·

जुडिशाल खातें·

मिस्तर टकर अशिष्टन जड्ज नगर यांस येक आठवड्याची अणखी रजा दिल्ही आहे·

कृष्णाजी विठोजी यांस उरणास पाठउन त्याचे जाग्यावर आबाजी बापूस मुनसफ अगटिंग नेमले·

हिंमतराम प्राणजीव रडोलीस पाठउन त्याचे जाग्यावर गुलाम मोहिदिन यांस मुन·

दाजी गोविंद यांस ठाण्यास सरकारी वकील नेमले·

कप्तान मारिस यास खानदेशचा माजिस्त्रेट नेमला·

बाहेरून आलेली पत्रें·

नप्रकाशकर्ते यांस·

ज्ञने मागील पत्रांत लोकांचा रावा रावर कसा आहे यविषीं तुह्मी लि ते वाचून असाल काहा मजकूर तो हल्ली लिहून कळवितो

...रावा·

२ या सर्कारचे राज्यांत लोकांचें बहूत हित होऊं सकत नाही याचीं कारणें पुष्कळ आहेत·

३ प्रथम येक असें आहे कीं इंग्रज सर्कारचे कायदे फार फार आहेत व अधिकाऱ्यांस जसा वाईट कामाचा प्रतिबंध तसा चांगले कामाचाहि प्रतिबंध आहे· ह्मणजे ...जानें लांच खाऊं नये असा कायदा आ... तसेंच जर त्यास विनाअपराध किंवा ...ने येकाद्या कैदीस सोडावे तरी सोडून देऊं नये ... ...सकतो· परंतु ... देणे च हातीं नाहीं अणखी कितीयेक ...ी येकसाहेब कांहीं काम आरंभतो ...सरायेतो त्याचें तें कांहीं मनास येत नाहीं तो तें मोडुन टाकितो येकाचा तव सा येका कामावर अत्यंत असतो तो ...ले ध्यांकून विश्वासानें काम करितो दुसरा येतो तो त्यास कैदेंत टाकितो अणखी कोणी कांहीं लोकांचें हित करावयाचें मनांत आणील तर त्याचें कांहीं हातीं नसतें· येक पैसा हि देणें किंवा खर्च करणें चांग त्यासाठीं असो वाईटासाठीं असो· परंतु मग धरा अंमलदारांची रजावंदी ...पाहिजे· शेवटीं कोणीतरी ओढ फार त्यास घेतो आणि तें काम सिधीस जात नाहीं·

४ अणखी येक कारण असें आहे कीं या लोकांचीं दुःखें निवारण करण्याचें ज्ञान इंग्रजांस विशेष नाहीं इकडील लोकांस त्याचेपेक्षां ज्ञान आपले देशाविषयीं अधीक आहे परंतु त्याचे हाती सामर्थ्य नाहीं व ज्याचे हातीं सामर्थ्य आहेत ते जर करतील तर हा इसारखें आहे·

५ अस्तु आमचे लोक कसे आहेत ही तर येक प्रथम गोष्ट आहे· परंतु आमचें कल्याण करण्याकारतां आमचे राज ज हल्ली आहेत यांणी काय केलें आहे तें मा पाहता परंतु मला काठ फारसा पडत नाहीं तथापी लक्षांत आणावें कीं या देशांत अंमलदार इंग्रजलोक येतात

त्यांतून शेकडा ९० असे असतात कीं त्यांचें चित्त फक्त द्रव्यसंपादनावर असतें, मजूरीदाराप्रमाणें तें काम कसेतरी केलें पाहिजे ह्मणून या देशांत काळे पाण्यादरचे लोकांसारखें राहून काम करून पुढें पैसा बांधून घरीं जातात ते लोकांकडे पाहत नाहीत, व मुलुखाकडे पाहत नाहीत व लोकांचें बरें वाईट व्हावें यांची त्यांस किमपी गरज नसते. अणखी नऊ, असे असतात कीं त्यांस उगीच वाटतें कीं या देशांतील लोकांचें अन्न अशी काकप्रेतवत भक्षण करितो त्यापेक्षां यांचें बरें असावें. व बाकी अवशेष येक राहिला तो मात्र काळजीनें लोकांचें हित करणारा व त्यांजविशीं खटपट करून मनापासून झटणारा असतो आणि कवीनें ह्मटलें आहे कीं "परदुःखेनदुःखिताविरळा".

६ इतकी असली असण्याचे कारणही, मी, तुह्मास सांगतो, कीं इंग्रज इकडे अंमल करावयास येतात त्यांचें घरदार इकडे नाहीं त्यांस या लोकांशीं सोयरगत किंवा खाणें, पिणें, कोणचेही प्रकारचा संबंध करावयाचा नाहीं, व चाकरी सोडली ह्मणजे लागलेंच पश्चिम दिशेस सूर्यास्ताचे करून आपार त्यास पुनः इकडे यावचें नाहीं, गांठीनाही- मग या लोकांची काळजी त्यांस कशी असेल. आमचे लोकांत आहे कीं राजाची लेकरें काय खाता [illegible] पाहिजे" तीच आतां [illegible] ह्मणजे [illegible] करण्यास लाग[illegible]

७ आमचे लोकांत कोणाचे [illegible] लग्नाची असली ह्मणजे वराचा शोध करितात, परंतु संभावीत व खातें पितें घराणें सांपडत नाहीं तेंव्हा मनांत येतें कीं अरेरे! खाते पिते लोक नाहिसे जाहले. आतां मी काय आपली मुलगी नांगरधरणारास द्यावी की काय; तसेच ज्यास चार मुले असतात त्यास असें वाटतें कीं या मुलांस मी आतां कोणचा रोजगार शिकवूं यांचें कसें चालेल पहिला काळ अस[illegible] तर येकास फडावर त्याह्[illegible] असता, दुसऱ्याची पागेंत नेमणूक न घेतली असता, तिसरा कोणच्या सरदाराचे पदरीं राहता, चौथा फौजेंत चाकरी करिता, आतां काय करावें असे विचार लोकांस येऊन पडतात, तेंव्हां त्यांचे डोळे उघडतात कीं आतांचा काळ कसा आहे.

८ परंतु असले विचार इंग्रजलोकांचे नांत कधीतरी येवाल! मग त्यास या दे दुःख कशान समजेल, अरे या राज्यांत ा उदीन राहिला, कापड [illegible] तात, [illegible] राले, [illegible] ले, [illegible] कुनापषा जाऊन पागके, [illegible] गेले, पंडीत गेले, [illegible] ारी, सोनार, सर्व गेले यांचें पोषण जर कोणाजवळ पैसा असेल तर होईल, नाहींतर कशानें होतें, आमचे देशांत आतां अमीर कायते इंग्रज, ते तर आपले देशां तून [illegible]

९ पूर्वीचे सर्दारांत येक पेठे ह्मणून सर्दार होते, त्यांचे हल्लीं वंशज आहेत, त्यां चा डौल असा सांगतात कीं चौरंगावर भाजी पेरून ते स्वारींत बरोबर चालवीत, [illegible] राजवरची ताजी भाजी खात, इतकी [illegible] ही चांगली असें आह्मी ह्मण परंतु आतां तशी नाहींकीं काय? [illegible] लाकडाचे [illegible] [illegible] ाणसें लाऊन शेकडो रुपये खर्च क [illegible] हून हें कांहीं अधीक नाही.

१० महाभारतांत लिहिलें आहे कीं राजा कालस्यकारणं- जसा राजा करील तसा काळ होईल- याजकरितां सर्कारानी या लोकांत श्री सौभाग्य राहण्याची तजवीज केली असतां न होई असें आहे कीं काय- कोणी ह्मणतात हे लोक वेडे? सर्दार वेडे? परंतु माझें ह्मणणें असें आहे कीं वेडे केले कोणी? यांस कामें करण्यास लावा, विद्या करण्यास सांगा, सुधार होतील जर अंधारांत [illegible] तर पिवळे उगवेल मग पेरणाचा दोष कीं शेताचा दोष? लो कांस सुधार करण्यास सर्कारानें मनावर घेतलें तर कांहीं उशीर नाहीं परंतु यांचे कल्याण भारतांतील राज्यधर्मातील नियमाप्रमाणें करावयाचें असें मनांत वागलें पाहिजे.

येक रस्त्यावीस आलेला सर्दार.

---

ज्ञानप्रकाश.

तारीख १ अकटोबर संन १८४९

तारीख २३ माहे सपटंबर संन १८४९ इसवी रविवारी सायंकाळीं तुळशीबागेचे राममंदिरांत पुण्यांचे पाठशाळेतील शास्त्री व विद्यार्थी यांचा व इतर लोक यांचा समुदाय जमला होता याचें कारण इंग्रजी शाळेतील विद्यार्थी यांणी सर्कारास दक्षणेसंबंधीं अर्जी करून पाठविण्याचा बे

न केला होता, तो संस्कृत पाठशाळेंतील शास्त्रीमंडळीस बाबाराम परदेशी यांचे मार्फतीनें कळला, त्याजवरून शास्त्रीयांस विरुद्ध वाटून इंग्रजीशाळेंतील विद्यार्थ्यांस बोलावणी केली आणि पुरश्चित्त केली कीं अशी अर्जी करण्याचें कारण काय? व तुह्मी अर्जी परत नकाढाल तर जाती बाहेर ठेऊं त्याजवरून अर्जी परत घेण्याची कोणी कबुलायत केली त्यानंतर मंडळी उठली.

सदरहू समुदायांत कृष्णाजीत्र्यंबक रानडे यांपचात्रें छापणार यांसही बोलाऊन नेऊन जातीबाहेर टाकण्याची धमकावणी दिल्ही कारण कीं मागील पत्रांपैकीं कांहीं मजकूर शास्त्री यांस विरुद्ध वाटला होता.

आह्मी सदरहू समुदायाविषयीं आपला अभिप्राय सांप्रत देणार नाहीं, कारण कीं अगली देशावरचें वर्तमानपत्रांत येकिलीं अभिप्राय लिहितील तो आगोदर ऐकावा असा आमचा मानस आहे.

तथापि अह्मास वाटतें कीं गव्हरनर जनराल यांणीं अगट ११ सन १८२५ सालीं केला त्याजवरून छापखानेवाल्यानीं पाहिजेतसें ल्याहावें, अशी मोकळीक आहे, हें सर्वांस प्रसिध्द आहे, व छापणारांस सर्वांचा आधार आहे [illegible] लिहून पाठवाल तें लिहिलें पाहिजे कीं त्यांस आधार आहे [illegible] सर्कारकंपणीने राज्यानें अन्यथा व साधारण प्राचीन चालीस विरुध्द नयाणी बंदी करण्याची इच्छा केली येणेकरून आमचें खासगत नुकसान होईल यांत संशय नाहीं.

अह्मास वाटतें कीं संस्कृतपाठशाळेतील व इंग्रजीशाळेंतील विद्यार्थी हे दोनीं सर्कारचे कृपेनें रक्षण आहले आहेत, त्यांणीं अपसांत असा कज्जा करून लोकांचा जमाव करावा हें योग्य आहे असें आह्मास वाटत नाहीं, जो कांहीं मजकूर लावयाचा होता तो आपले अंमलदारांचे समजाऊन कज्जा [illegible] याचा होता, किंवा पाठशाळेंतील गुरुंनीं इंग्रजीशाळेंतील गुरु यांसी बोलणें केला असता तर चांगलें होतें, याकरितां परभारें येका सर्कारी शाळेंतील मंडळीनें दुसरे सर्कारी शाळेंतील मंडळी

स. व पुण्यातील पत्र छापणारास परभाराउ
न्द केला हें ठीक आहे कीं काय. ?

ाव जमला होता त्यांत दांडगाई
नरी फौजदार होते, तरी समया प
. व लोकांस उपद्रव आहला, व या ज
ांहीं बंदोबस्त नवता, व गर्दी फार
फा ादपत्रावर दसर लिहिलें नाहीं.
तेव्हां अशी रीती सभेची आहे कीं का
य ?

या आश्चर्यकारक वर्तणुकेची रीती
.स कारण अह्मी नूर्त लिहूं सकत नाहीं,
याजकरितां दुसरे वर्तमानपत्रांत काय
लिहितील त्याची वाट पाहात आहो.

---

पुण्यांत दसरे दोन जाहले येक बुध
वारी दाहवे दिवशीं व गुरुवारीं अकरावे दि
ं जाहला, बुधवारचा दसरा सर्व पुण्यां
ुरुवारीं फक्त पारशांत व
ध्दर कचेरींतमात्र जाहला. लोक अ
ह्मणतात की अकरावे दिवशी दसरा
हें वाईट आहे, पूर्वी सवाइमाधवरा
ांचे वेळेस अकरावे दिवसीं दसरा के
ला, तेव्हां पेशवे यांस देवाज्ञा जाहली.

---

पजंट कचेरीस, पुणें येथें दर्बार दस
ऱ्याचा होऊन पोषाक सर्दारलोकांस वा
ले व पानसुपारी, अत्तर, चालीप्रमाणे दे
ऊन सन्मान जाहला. मुख्यसर्दार रास्ते,
पुरंदरे, वांईकर, पवार, ढमढेरे, वगैरे होते.

---

खानवेलकर चिमाजीराव यांजपा
शी येक रुपया खोटा निघाला सबब
महिन्याची केप बाजारमास्तर याणी दि
ल्ही. मशारनिल्हे मोठे स
र्दार खानदानी आहेत त्यांजकडून
ही गोष्ट कपटानें होईल असें वाटत ना
ही सबब ठरावांत नाहींतरी चूक आहे
असें वाटतें.

---

कर्नेल औट्राम यांची प्रकृती फा
र बिघडली आहे असें वाटतें.

---

कमिशकोर्टातील शिपाई, व चोपदार,
हे वारीवगैरेपासून दस्तुरी घेतात
येविशीं सरपेरी ज्यइज्य याणी ताकी
द सक्त केली.

---

अमदाबाजचे कलकटराचा शिरस्ते
दार यास दोन हजार रुपये दंड नाहींतर

दोनवर्षे कैद असी शिक्षा दिल्ही- गुन्हा लाचेचा शाबूद जाहला सबब शिक्षा जाहली- दंड देऊन सुटला.

अशिस्टन जड्ज पुणे यांणी येके केदीवर व्यभिचाराचा गुन्हा शाबूद जाहला सबब तारीख २७ सपटेंबररोजीं दोनवर्षे सक्तमजुरीची शिक्षा दिल्ही व त्यापैकीं दोन महिने एकांतकोठडीत शिक्षा दिल्ही.

कमांडरचीफ मुंबईलष्कर यांची प्रकृती बिघाडली आहे.

अमदाबाजेस पोष्टहपीसात खोटी व नवें दाखवण्याचा गुन्हा आढळला आहे.

सर अरस्किन पेरी जड्ज सप्रिमकोर्ट मुंबई यांनी वैद्यशाळेंत जें भाषण केलें त्याचा मराठी तर्जुमा छापला आहे.

हिरालाल फौजदार अमदाबाज याणें अपील केलें होतें त्याचे तर्फेने दोन सप्रिमकोर्टातील वकील बोलण्यास सदरअदालतींत आले होते व जड्ज वार्डिनसाहेब व ग्रांट साहेब होते त्यांचेकडेस फौजदार यांची अपिलाची चौकसी होऊन शिक्षा रद्द केली.

गोरनर साहेब दोन ? रेकाप लेपटनट जनरल व एनसाइन फेफ यांचा विपर्यास पडला सबब गोरनरसाहेबांनी यांस आपलें आपले राजीमे दविले.

गोविंद पंत काळे ? निसेवून मास्तर यांस दंड व बेसफी कारण लाचेचा गुन्हा शाबूद.

कलकत्तासदीर फौजेची ठिकाण बदलण्याचा विचार करीत आहेत कारण कीं गालियर, पंजाब, सिंध, सातारा, वगैरे राज्यें घेतली याजमुळें लष्कराच्या हद्दी फिरल्या आहेत.

कोल्हापूरचा कारभारी दाजीकृष्ण पंडित ज्यामुळें दंगा पूर्वी कोल्हापुरास जाहला तो मेला याचे कामावर त्याचे भाई हल्लीं जमखिंडीस कारभारी हे त्यास नेमतील असें.

गोरनर साहेब येथ यावयाचे परंतु सालाबादप्रमाणे पुण्यातील ? व परिक्षा जाहल्यातरी ? रण कदाचीत घाई असेल असें वाटे.

फ्रान्सिस स्लेटन लेफ्टनेंट कर्नेल
...नी याणी मद्याची विक्री या देशांत
...ने या विषयीं महा प्रयत्न चाल
आहे त्याचा तपशील पुढें लिहू.

कायदा ८ संन १८३८ प्रमाणें सदर
... २०वे अगष्टबरापासून ... मुहि
... जिल्ह्यांतील दिवाणी कोडतें
दे... प्याचा हुकुम दिल्हा.

सर्कारी गाजेट.

जाहिरनामे.

विलायतची डाक दरमहिन्यास ३व
१७ वे तारखेस रवाना होत जाईल.

तारीख २१ नवंबर संन १८४९ बु
धवार दहा वाजतां मुनसफीचे जाग्याव
र उमेदवार लोक असतील त्यांची परिक्षा
सदर अदालतीत कमीटीभरून घेतील पू
...सीं नाव लिहून द्यावें व सर्टिफिकी

सहीराजिस्टर.

तारीख ३१ डिजंबर संन १८४९ पर्यं
त जानसर्कारचे नार्कतीने रसिडट हैद
... हे निजामाच्या फौजेकरितां दोन
म्हणजे १८५१ व १८५२ इसवी
... जें व त्याचें सामान लागेल त्याचा म
... कोणी बोलेल तर त्यास देतील. व या
कामांत रसिडंटाची मुखत्यारी आहे. मुकाम
हैदराबाद.

जान चेप मिलटरी स
क्रेटरी निसबत रसिडं
ट हैदराबाद.

...गष्टे ... संन १८४९.
...ांत असें ठरलें आहे कीं जो कोणी
कंपणीसर्कारचे लष्करांत फंदफितूर करी
ल त्यांस सातवर्षांपर्यंत मुलुखगात किंवा
समुद्रपार होईल याहून अधीक होणार नाही.

इंदुरास मासाहेब यांस देवआज्ञा
जाहली असे माळव्याचे अकबार पत्रा
वरून कळतें.

नानासाहेब रास्तेगीवाले यांचे घरी
चोरी १२०० रुपयाची, रुप्याची भांडी व
गैरे जाहली होती, ती फौजदार यांचे
हुशारीमुळें त्यांचेच घरचे शिप्यानें केली
होती ती सापडली.

तारीख ... तारायंत्रे ... 
... दीसंपूर्ण पडला ... त्या ... 
... तारा ... फारसा ... 
कृष्णाजी ... रानडे याणी पुणे ...

# ज्ञानप्रकाश

सत   सो·   तान·

पुस्तक १ कागद ३९ — शहर पुणे·

तारीख ८ अगटोंबर सन १८४९ इसवी मिती अश्वीन वद्य ७ सोमवार शके १७७१

पत्राची किंमत रुपये·

दरसाल १०   अर्धे साल ६

तीन महिने ३॥·   येक महिना १

छापखान्यांत ग्रंथ विकावयाचे·   आणे·

१ लक्ष्मीज्ञान· व पोलिटिकाल इ

कानोमि·   १२

२ दृष्टांतिक वाक्यें·

३ कामदारांशी संभाषण·   ३

४ कित्ते मोडीव बाळबोध·   ८—

पंचांग

| ति· | वा· | न· | यो· | क· | सु· | इं· | भरतीचे तास |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | सो | आ्र् | प | भ | २० | ८ | २ |
| ८ | मं | पु | शि | धा | २१ | ९ | ३ |
| ९ | बु | पु: | सि | ब | २२ | १० | ४ |
| १० | गु | आ | सा | भ | २३ | ११ | ५ |
| ११ | शु | म | शु | बा | २४ | १२ | ६ |
| १२ | श | पू | शु: | तै | २५ | १३ | ८ |
| १३ | र | उ | ब्र | व | २६ | १४ | ९ |

सूर्योदय ५ तास ५२ मिनिट्स सूर्योस्त ५ तास ५२ मिनिट्स

भरती जा तास म काळी त्याच तासास संध्याकाळी होत·

सर्कारी कामदारांचा नेमणुका·

जुडिशाल खातें·

मिस्तर क्रेर जड्ज धारवाडास येक महिन्याची रजा दक्षणेत फिरण्याकारतां दिल्ही आहे·

मिस्तर लिजिट जड्ज सदर अदालत यांस अणखी रजा तारीख ६ पर्यंत दिल्ही आहे·

लेपटनेंट ग्राहाम यांस अमदाबाजेस अशिष्टण माजिस्त्रेट नेमले·

महसूली खातें·

मिस्तर फासेट कलकटर सुरत यांस येक महिन्याची रजा दिल्ही·

मिस्तर डालजेल अशिष्टन कलकटर अकात मुंबई यांस महिन्याची रजा दिल्ही·

लेपटनेंट आंडरसन् निसबत भतर्वदी कर्नाटक यांस पंधरा दिवसाची रजा दिल्ही·

पबरमेंट ग्याजीट·

## बाहेरून आलेलीं पत्रें.

ज्ञानप्रकाशकर्ते यांस-

विनंती विशेष आलीकडे पुण्यांत व सर्वदेशांत मद्यप्राशनाची संवय बहुत विस्तीर्ण झाली आहे. आलीकडे [illegible] वाचा येक पाठशाळेंतील विद्यार्थी जातीचा ब्राह्मण असून मद्य पिऊन शाळेंत आला तो तेथें धरला आणि शाळेंतून हाकून दिल्हा ही येक गोष्ट सहजांत आढळांत आली ह्मणोन लिहिली; परंतु या खेरीज या आपले शहरांत कितीक, ब्राह्मण ग्रहस्त व, भट व शास्त्री देखील, या कर्मास लंपट आहेत, त्याचा ठिकाण नाहीं आणि आश्चर्याची गोष्ट असी आहे कीं शूद्रादिक जे लोक पितात तें औषधासारखें समजतात, परंतु ब्राह्मणधर्म ह्मणून तंत्राधारानें शाक्तमतानुसारी ह्मणऊन पितात, हें हिंदूधर्मावर या लोकानीं महान दूषण आणलें आहे, आणि शाक्ताची वर्तणूक ऐकिली तर काळजास घरटे पडतील, असी आहे. याचा प्रतिबंध व्हावा कसा हें सर्वांस संकट वाटतें, परंतु जर सर्वलोक मनावर घेतील आणि मत खात्र ठरवितील तर अवघड पडणार नाहीं, सांप्रतकाळीं लोक उगेच बसून शाक्तास बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत नाहींत, हें आश्चर्य आहे, पुण्यांत कोणी ब्राह्मण बहुधा असा राहिला नाहीं कीं ज्यास शाक्ताचा सांवसर्गिक दोष घडला नसेल, व सर्वलोक भ्रष्ट होऊन अनर्थी पुढें होणार, परंतु या विषयीं कोणी मनावर घेत नाहींत, व जे लोकांत पुढारी आहेत ते तर अगदींच निरुपयोगी जाहले आहेत, शास्त्री पंडीत द्रव्याधीन झाले जोडी मिळाली ह्मणजे पाहिजे त्यास शुद्ध करितात, पाहिजे त्यास बहिष्कृत करतात त्यांणीं तरी करावें काय? त्यांस दातावर मारावयास पैसा मिळत नाहीं, ह्मणून हा रोजगार आरंभिला आहे परंतु प्रमाणिकपणा व न्याय याजपासून हे लोक शंभर हातावर दूर आहेत, याजमुळें यांचें तेज काहीं दिवसांनीं नाहींसें होऊन यांचे आज्ञेस कोणी मानीत नाहींत असें होईल- जर काहीं सद्गुण पुरुषामध्यें असतील आणि तो धर्माकरितां खरी खरी मेहनत करील तरच त्याचा सन्मान होईल ना होतर यातांड फार दिवस चालत नाहीं ही इतकी सूचना असी देण्याचें कारण इतकेंच कीं सर्वांनी येकत्र होऊन शाक्त

मत मोडण्याचा यत्न करावा येणेकरून म
हत्कार्य होईल हे विनती.

मयाचा शत्रु.

ज्ञानप्रकाशकर्तेयांस.

विनंती विशेष सांप्रतकाळी ब्राह्म
णलोक निर्बंध जाहले आहेत असे कोण
तेही लोक दुसरे जातींत जाहले नसतील
पाहा कीं यास धर्म सांगणारा कोणी नाहीं
धर्माधिकारी नाहीं यांजमध्यें चांगला स
मास अळा घालणारा कोणी नाहीं व को
णी कोणास मानित नाहीं शंकराचार्यासदे
खील पुसत नाहींत गांवांत चार लुच्चे अस
तात तेच आपल्यास धर्मवेत्ते ह्मणवितात
परंतु असे मनुष्यांची सत्ता कोठपर्यंत नि
भेल त्यांचा नाश करणारा भटूनें ते मोडती
ल यांत संशय नाहीं यास्तव सज्जन यांस
ीकच मानास योग्य असे धर्मसंरक्षणाक
रितां व लोकांस मार्गावर आणण्याकरितां
नाहिजेत.

सांप्रतकाळीं अडाणी जातीस चौ
धरी असतो तो जातीचे नेम आहेत तित
के चालवितो व वैष्णव ब्राह्मणांत
जे स्वामी मुख्य असतात त्यांचे आज्ञेत
वैष्णव निर्बंधानें चालतात- बोहरी आ
पले मुल्लाजीचे धोरणानें चालतात- पार
शी आगेरुचे आज्ञेने चालतात- इंग्रज लो
कांत धर्माधिकारी पनार रीउंन ठेविलेले अ
सतात असे अनेक जातींत त्यांचा धर्म
नीतीरक्षणार्थ कोणीतरी श्रेष्ठ असतो
परंतु पुण्यातील वगैरे ब्राह्मणांस कोणी
श्रेष्ठ आहे कीं काय?

या अशा निरोधिपत्यामुळें लोकां
च्या अळा गेला, लोक अधार्मिक जाह
ले, कोणास कांही कळत नाहीं, ज्याचा
जें मनास येईल तसें तो करितो, ज्याचा
मनास येईल तसें तो करितो, त
सें तो शुध्द करितो, जातीबाहेर ठेवितो
व कितीयेक आपले अंगधट्टाईनें पुस
त नाहीत, कितीयेक ग्रामण्ये जिरतात,
द्रव्य साधन असलें ह्मणजे- शास्त्रीबावां
चे मत कोणत्याही कामास नाही असें
होत नाही.

या धांदलीमुळें लोक फार खरा
बीस आले व जरजर जाहले व त्यांज
मध्यें फूट पडली जो तो आपआपल्या
स अरेराव ह्मणवितो कोणास कोणी
मोजीत नाहीं कारण कोणामध्यें असा
गुण राहिला नाहीं कीं दुसऱ्यानें त्याचा

मान करणार लोक लबाड जाहले, व निर्गुणी जाहले, व अविचारी जाहले, दुसऱ्यास चांगलें पाहिलें ह्मणजे डोळे फुटतात त्याजवर विभू रचतात, शत्रुत्व करितात, व वाकडें व्हावें अशी इच्छा करितात, त्यांचे हातीं कांहीं चांगलें करण्याचें तर राहिलें नाहीं परंतु अप्त्सांत भांडावें इतकें मात्र राहिलें आहे.

आजपर्यंत अशा रीतीनें दशा आली, कारण कीं अपसांतील भांडण हें दरिद्रास कारण आहे त्या प्रमाणे दरिद्राची समृद्धी या लोकामध्यें कमी आहे असें नाहीं, त थापि अजून प्रयत्न करून दरिद्र आण वयास झटत आहेत, त्याचे पोटीं ते आप लाच नाश करुन घेतात, अणखी या पुढें आतां हे लोक अशा अवस्थेंत किती दिवस राहणार व त्यांची अवस्था पुढें कसी होणार या भ्रांतींत मी आहे तात्पर्य हें बुडणार हेंच प्रमाण.

सही सात्विक गृहस्थ.

ज्ञानप्रकाशकर्ते यांस.

तुमचे मागील पत्रांत तारीख २२ सपटंबर रविवारची हकीकत लिहिली आहे ती पाहून मला फार आश्चर्य वाटलें, व त्याहून अणखी आश्चर्य असें वाटलें कीं, अशा निर्बंध सभेपुढें जाणारानीं जावें कशास? सभा जमली तशीच उठली असती सर्कारांतून ही पाठशाळा आहे ह्मणून चार पंडीत शास्त्री आहेत, नाहींतर या शहरांत शास्त्री औषधास मिळणार नाहीं, असें असतां सर्कारास गैररीती दिसाव याजोगी याणीं करावी कशास अशा कामांत पडावें कां? त्याणीं असें मनांत आणावें कीं सर्कारांतून ही पाठशाळा बंद जाहली तर क्षणांत आमची अवस्था होईल काय?

कांहीं दिवसपर्यंत जों असल्यालोकांस कोणी, कोणी कांहीं केलें तरी भितात, तों पर्यंत हे दुसऱ्याची बे अदबी करितील परंतु ते असें समजत नाहींत कीं अह्मी तीन चार शास्त्री मिळालो आणि येकाद्यास मोठी अब्रू देऊं तर देऊं सकतील कीं काय?

असा पोरखेळ जर होऊं लागेल तर बाहेरच्या लोकांनी तरी माहात्म्य काय राहील, जसे काशींत तट आहेत, तसे पुण्यांत तट होऊन लोक पृथक् तुकड्या करून राहतील, तर असें न होऊं देतां ऐक्यता राखावी ही गोष्ट बरी आहे पुरावा नाहीं दस्त

ऐवज नाही येक परदेशाचा मुलगा (छप्परबंद जातीचा) साक्षीस उभा करून पाठशाळेतील मुलांचा नादी लागून शास्त्री जमले कसे- हेंच मला आश्चर्य वाटतें?

पुण्यांत वडेलोकांत ग्रंहस्त वस्ते वगैरे आहेत, असे कोणी मध्यस्त असून अनुक्रमानें जाहली असती तर ती सभा नाहींतर उपहास्यतेसपात्र कारण असेंस न जावें.

वाचणारा.

---

ज्ञानप्रकाश.

तारीख ८ अकटोंबर सन १८५३

संस्कृतशाळावादी- इंग्रजीशाळाप्रतिवादी कोणीमाणसाने सर्कारास अर्जी केली असता तेंकाम सर्कारापुढें गेलें त्यांत दुसरेमनुष्यानें हात घालावा असा अधिकार नाहीं, व शिवाय असें आहे कीं येक मनुष्यानें अमुकरीतीनि चौकसी करा म्हटल्यावर त्या रीतीने न करावयाचा आग्रह धरून बसणे हाच कमीपणा दिसतो- याजकरितां जातीमध्यें धर्माध्यक्ष मोठा असावा, परंतु तसा कोणी प्रस्तुत नाही जाचा तो धर्माध्यक्ष आहे व ब्राह्मणांस दोन पैशांची आशा दाखविली ह्मणजे पाहिजे तेथे जमतात अशी चाल आहे, तेव्हां ते पाहिजेत्यास नाव देउ सकतील, अशा अव्यवस्थीत सभा जमल्या ह्मणजे इंग्रजी हुकुमनाम्यासारखें होईल, येकाने हुकुमनामा करावा दुसऱ्याने अपील कोडतांत जाऊन तोच हुकुमनामा फिरऊन घ्यावा, असें करित, करीत, दाहा ठिकाणी जावें परंतु अशाने गांवांत भालेराई होईल, येवढाच परिणाम दिसतो, येबंद काम फारदिवस निभत नाहीं.

[illegible] असें वाटतें की शास्त्री जे करू तें होईल आणि असास चार लोक मानितात, किंवा आजच्या दिवस काहींतरी मितात, तर त्यांसजर आपली अब्रू कायम ठेवावयाची असली तर त्याणी रीतीप्रमाणे व न्यायाप्रमाणे चालावे याहून दुसरा मार्ग नाही- लोकांत मान वाढण्यास हेंच कारण आहे- याखेरीज जरी मान असला तरी तो मान ह्मणूनये, व बहुतदिवस राहणारनाही कारण कीं वाईटवर्तणुकीस लोक येकदा नाही, येकदातरी, नासतील आणि [illegible]ती.

हजार मुंग्या सापास खातात.
थेंब पडतां पडतां दगड झिजतो.
घाव मारतां मारतां ओंडे फुटतात.
लाहान फणगीनें मोटी आग लागते.

असु मागील पत्रांत आह्मी लिहिलें होतें की बाहेरील वर्तमानपत्रांतील आशय पुढें लिहू त्यास देशावरची वर्तमानपत्रें आह्मी पाहिली त्यांत संस्कृतशाळा तेथील शास्त्री व विद्यार्थी व त्याणी केलेली सभा एतद्विषयीं फारच शोभा वर्णन केली आहे (शोभा या शब्दाचा लाक्षणिक अर्थ आहे) ना सावस्तर पुढें लिहू.

---

सरजेमशेटजीशेट पारसी सावकार मुंबई याणी युरोपियन लोकांचें कुटुंबास पेनसिनें होतात त्याचा पैसा सर्कारांत आहे त्यांत पांच हजार रुपये धर्मादाव टाकले आणि त्याचें व्याज येईल तें देत जावें ह्मणून ठराव केला.

---

मागील पत्रांत खानवेलकर यांविषयीं मजकूर लिहिला होता ते गृहस्थ दंड देऊन कैदेंतून सुटले.

---

ब्रिगेडियर जेनराल मानसिनसाहेब पुण्याचे सेनापती साता-यास गेले होते तेथे राणीसाहेब माहाराज याणी त्यांस मेजवानी केली.

---

वार्डिणसाहेब माभळेश्वरास येक महिना राहून पुढें गुजराथेंत ज्युडिशाल कमिशनर जाणार आहेत.

---

सर्कारानें मोटें काम आरंभिलें आणि त्यांत बहूत पैसा खर्च केला तरी चिंता नाहीं हें बोर घाटावरून समजतें बोर घाटाचें उत्पन्न आजपर्यंत खर्चाचे बरोबर झालें व लोकांसही फायदा जाहला या प्रमाणे सर्कारानूं अणखीही कामें व्हावी.

---

पाठशाळा येथील परीक्षा मागले गुरुवारीं जाहली.

---

मिस्तर आरमरल गोरनर मकाव नजीक चीन प्रांत तेथील चीनलोकांनी दंगा करून ठार मारला हे बेट पोर्तुगालचे राजाकडे ह्मणजे जे हल्लीं गोंव्याचे राजे

आहेत त्यांजकडे होतें, ते चिनीलोकांचें अधिकाऱ्यापासून या खुनाचा जबाब घेणारआहेत व त्याचे दर्म्यान हल्ली इंग्रज फरासीस, व अमेरिकानलोक पडले आहेत, बहुधा लढाई चुकवितील [illegible]

हें बेट चीनदेशांत इंग्रजांचें ठिकाण कांटन शहर आहे, त्यांचे वाटेवर समुद्रांत मकाव बेट आहे, तें पोर्तुगाल लोकानी संन १६४० इसवीत घेतलें, तेथे ते गवरनर ठेवितात, तेथील चिनीलोकांपासून खंडणी घेतात व चीनचा अधिकारी तेथे आहे त्याचें नाव [illegible]

---

शियामबेट बंगाल्याजवळ आहे, तेथे पटकीचा वारवा होऊन ३०००० माणसें मेलीं.

---

विनायक वामन मामलेदार रावसाहेब यांचा मोकदमा आलीकडे सुरू आहे, व त्यांचे तर्फेचे २० साक्षीदार जाहले, व दाहा [illegible] होणार आहेत, मामलेदार याणी जा जा मुद्याकरितां पुरावा केला त्या प्रमाणे साक्षीदारावरून शाबुती जाहली.

खानदेश जिल्हा नवीन जाहला, त्यास खर्चाकरितां नगरचे अदालतीकडून १०० रुपये व पुणेअदालतीकडून ५० रुपये कमी करून घेतले. दोनी जिल्ह्यांत याप्रमाणे घेतले.

नगरास.

| | |
|---|---|
| इंग्रजी लिहिणार १ रुपये | २० |
| कारकून ४ दर १७॥ प्रमाणे | ७० |
| | १०० |

येणेप्रमाणे लोक खानदेशांत पाठविले

पुणें

| | |
|---|---|
| सादिलवारपैकी कमी. | ३० |
| तुरुंगातील [illegible] | १५ |
| शिपाईयाचीजागा खाली होती ती रद्द केली. | ५ |

या प्रमाणें कमी करून दिल्हे.

---

येक ब्राह्मण याणें मद्य पिऊन दांडगाई केली त्याजबद्दल शास्त्री निसबत अदालत यांचे अनुमताने कमान वेलस याणी दंड रुपये १० घेतले.

---

[illegible] अजम कासी[illegible] कुसागर याणे स्वतां उद्योग करून मुलींची शाळा त्या गावीं घातली आहे.

पुण्यांत मद्यपानी ब्राह्मण बहुत

आहेत परंतु त्यापैकीं काहीं उघड आहेत त्यांस जातीबाहेर टाकण्याकरितां सर्व ग्रहस्त जमणार आहेत- परंतु आमचे ऐकण्यांत असें आहे कीं काहीं शास्त्री यांचें मत असें आहे कीं शास्त्रमत शास्त्राधाराचें आहे सबब त्या मतानुसारी पिणारास जातीबाहेर ठेऊं नये- असल्या मतान ग्रहस्तांचे चांगले कामास अडचण पडेल.

---

सांप्रत मुंबईत मुलींचे शाळेचा उद्योग मोठा चालविला आहे व अल्फिष्टन साहेबाचा शाळेंतील लोकानीं आपण स्वतां शिकविण्याचें कबूल केले आणि आठ शाळा घातल्या त्या येणेप्रमाणे.

| | | मुलींचीसंख्या. | जागा. |
|---|---|---|---|
| १ | बैरमजीपार्सी. | १९ | किल्यांत. |
| २ | आर्देसर फ्रामजी. | १५ | चांदणवाडी. |
| ३ | पालनजी. | २० | अंगेरीरस्ता. |
| ४ | दादाभाई नवरोजी. | ११ | मिरजानगर. |
| ५ | भास्कर दामोदर व सखाराम दिक्षीत. | १४ | नवारस्ता. |
| ६ | माहादेवशास्त्री व शामराव. | ७ | कुंभारटुकडा. |
| ७ | लक्ष्मणजोशी व नारायणकृष्ण. | १४ | नवीवाडी. |
| ८ | धोंडोपंत व नारायणराव. | ८ | पाळवा. |

सदर्हू शाळेकरितां कोणी पैसा व ग्रंथ चित्रें वगैरे चमत्कारिक जिनसा पाठविल्या असतां उपकार समजतील

लोकांस स्त्रिया शाहण्या असल्यामुळें लाभ काय होतात हें समजत नाहीं त्यास्तव ते साहाय्य करीत नाहीत परंतु आतां आपलेच लोक या कामांत पडले आहेत येणेकरून सर्वांची खात्री अशी होईल जे विचार करितात त्यांस ही गोष्ट अवश्य आणि चांगली आहे असें समजतें ह्मणून येवढ्या हिमतीनें या लोकानीं भगीरथ यत्न आरंभिला आहे.

---

म्यास्तर गोल्ड स्मीड हे मुंबईस येऊन ते आपले सरकारीचे कामावर दाखल जाहले आणि कोर्टणी साहेब पुर्वीप्रमाणे पुण्याचे कलेक्टर होतील व रिविस साहेब बेळगांवास आपले कामावर जातील.

---

तारीख ७ रोजीं जड्ज साहेबानी आनंदा लकडवाले याजवर खुनाचा चार्ज होता तो मोकदमा फडशास लाविला.

---

पुणे येथें कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांनीं हें पत्र ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें.

# ज्ञानप्रकाश

सत्य सौख्य ज्ञान

पुस्तक२कागद४६ शहरपुणें

तारीख १८ नवंबर सेन् १८५० मि तिकार्तिकवद्य १४ सोमवार शाके १७७२

पत्राची किंमत रुपये.

रु. १० दरसाल रु. १ दरमाहा

विकावयाचे ग्रंथ

कि.

१२ लक्ष्मीज्ञान ६ गंगालहरी

२ कामदाराशी सं. ५ दृष्टांतीकथा

४ साहेबलोकाशी सं. २ पंदनामा

१८४ यंत्रज्ञान पंचांगे

लि. मो.

२ गायनप्रकाश ६१ ६१८

६६२ चतुष्टभागवती २ योगेश्वरीसहस्र श्लोक

अठवड्याचे पंचांग

| ति. | वा. | न. | यो. | क. | इ. | अ. | शास्त्रार्थ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | सो | भ | व | तै | १३ | १८ | वैकुंठ १४ |
| १५ | म | भ | प | भ | १४ | १९ | त्रिपुर |
| १ | बु | कृ | शि | बा | [illegible] | [illegible] | |
| २ | गु | मृ | सा | तै | १६ | २१ | |
| ३ | शु | आ | शु | व | १७ | २२ | संकष्टी ४ |
| ४ | श | पु | शु: | व | १८ | २३ | |
| ५ | र | पु: | ब्र | को | १९ | २४ | |

सूर्योदय ता. मि. ५-१० दिवसमान ता. मि. ११-११

सूर्यअस्त ५-२१ रात्रमान १२-४९

सरकारी कामदाराचा नेमणुका

रिविनयूखात.

मिस्तर स्पूनर कलकटर नगर यांस १५ दिवसाची रजा दिल्ही असे.

मिस्तर प्राईस कापुसाचा सूपरिंनटेंडेंट् अशिष्टन् खानदेश यांस १ महीन्याची रजा दिल्ही असे

मिस्तर बेल कलकटर धारवाड यांस माहाली फिरावयाचा हुकूम जाहाला.

न्यायखातें.

मिस्तर टकर साहेब यांस महिन्याची रजा दिल्ही असे

शेख अबदला बिन् फकि महंमद यांस ठाण्यास अगटींग नेमले आहेत.

पालिटिकालखातें.

मेजर ब्रौन पोलिटिकाल यजंट रेवकांठा यास महिन्याची रजा दिल्ही असे.

जनरालखातें.

मिस्तर आर्स्कीन डिपूटी रजष्टीरजेवर जातात.

म-ग्या.

बाहेरूनआलेलीपत्रें.

ज्ञानप्रकाशकर्तेयांस,

विनंती विशेष आपण तारीख२७ अगटोबर सन १८५० च्या पत्रांत असें लिहिलें आहे कीं, पुण्यांत कितियेक पंडीत व शास्त्रि शाक्त पक्ष स्वीकारून त्याचे प्रतिपादन करितात. कीं जसे वैष्णव, शैव इत्यादी धर्म आहेत. तसाच हा आहे. त्यापेक्षा यासच वाईट ह्मणावे कशाकरिता व याजवर आपला अभिप्राय असा होता कीं, हे मत्त चौघांत कसें प्रतिपादन होईल. हें नकळे कारण कीं द्रव्यादिकाचे अशेने एकाची बुद्धी भ्रष्ट जाहाली. तत्रापी सर्व लोकाची होईल. असें नाही. यास्तव जी वाईट गोष्ट ती एकानें चांगली ह्मणोन मान्य केली तर, सर्व लोकास मान्य होतनाही.

महाराज हें आपलें अनुमान सत्य आहे. परंतू, पत्रांवरून त्या शास्त्री पंडिताचे डोळे उघडून शाक्तमत्त सोडतील, असें मला वाटत नाही. यास्तव शाक्त मत्त कसें आहे. व त्या मत्ताचे अनुसरणारे कोणत्या प्रकारचे लोक आहेत. हें सर्वास कळावें. व त्यानीं त्याचा त्रास मानावा. व जे शाक्त असतील. त्यांस आपल्या जवळ देखील उभें करूनये. या हेतूने हें पुढील साक्त मत्त वर्णन आपल्या सुंदर पत्रांत प्रसिद्ध कर्ण्यास पाठविलें आहे. ईश्वराच्या कृपेने हे वाचण्यानें बहूतेकांच्या मनांत या अघोरी मत्ताचा द्वेष व त्रास उत्पन्न होवो

काली किंवा शक्ती यानावाची एक देवी आहे. तिची पूजा व भक्ती करणारे जे लोक यांस शाक्तदेवी उपासक किंवा वाममार्गी असे ह्मणतात. जसे, पाद्री लोक ब्राह्मणा पासून अति चांडाळा पर्यंत सर्वास आपल्या जातींत व धर्मांत घेतात. तसें यादेवी उपासनेत सर्व जातीचे लोकांस येकाठीकाणी होण्याची मोकळीक आहे. शक्तीस मद्य मांस, मत्स्य, हे पदार्थ हे फार प्रीय आहेत. आणि तिचा सर्व पुजेत ह्या पदार्थांची गरज फारच असते. जा गाईस हिंदुलोक आपल्या माते प्रमाणे मानितात. व जी हिंदू धर्मांत मुख्य दैवत अशी व

र्णिली आहे. तिचे मांस ही या श- क्तीचा नैवेद्य पात्रात असावें. अशी तंत्रात मोकळीक आहे. हे शक्तीउ पासक कोणतीहीं व्रतें व उपवास पाळीत नाहीत. माहाएकादशी, शि वरात्र, गोकूळअष्टमी ग्रहण, इत्या दी दिवशी हटकून दारु पीणे व मां स खाणे या लोकांत चालतें. शक्ती पूजेचा वेळी ब्राह्मण मुख्यस्थानी बसून सर्व मंडळीचा हातांत दारू चा वाट्या देतो. नंतर एक स्त्री दे विस्थानापन्न अवाहित करून बस विलेली असत्ये. कित्येक ठिकाणी मांग जातीची रजस्वला स्त्री आ- णून जिला या पूजेत नग्न उभी करितात. व तिजला प्रत्यक्ष देवी रूपच मानितात. त्या स्त्रीस प्रथ म एक वाटीभर दारू व एक मांसा चा तुकडा देतात. दारूला "प्रथमा" म्हणतात. व मांस तुकड्यास "गु- द्धी रज" म्हणतात. ती स्त्री यातू- न थोडीशी दारू पीत्ये. व मांसा चा अर्ध तुकडा चाऊन बाकी तें सर्व सो ब्राह्मणाचा स्वाधीन करित्ये. म- ग त्याजवर सर्वांचा उडया पडता त. शक्ती प्रसाद असे समजून

ती उच्छिष्ट दारु व मांस सर्वांस प्रीय व अमृत तुल्य वाटते. या अमंग ळ कर्माची शिमा झाली. असे नाही. पुढें पुष्कळ निर्लज्ज व अपवित्र क र्में सांगावयाची आहेत. जी नग्न मांगीण देवी स्वरुपी तेथे उभी अ सतें. तिजबरोबर मुख्य गुरू व्यभि चार कर्म करितो. व दुसऱ्या जा तर ण स्त्रिया तेथे असतात. त्या दारु चा अमलांत आल्या म्हणजे भल भलत्या जवळ जाऊन दुष्कर्मास प्र वर्त होतात. त्यांचे नवरे तथे अ सतात, परतू त्यांस आपल्या स्त्रि यावर त्यावेळेस काही अधिकार चालवायाची मोकळीक नसत्ये. ते ही स्वता अशा कर्मांत समाधान मानितात. कांकीं हा एक त्याचा मार्गातील अचार आहे. प्रमाण

॥ "मद्यमांसंचमत्सस्य मुद्रामे॥
॥ थुनमेवच॥ मकारपंचकंचैव॥
॥ माहापातकनाशनं॥ ॥ ॥

या प्रमाणे या अनुचित कर्मा चे कोठवर लिहित बसावें. जो कोणी सूज्ञ मनुष्य आहे. तो हें वा चितांच त्यास असें वाटेल, कीं या मत्ताचा स्थापक कोण, तरी

दुर्व्यसनी अधार्मीक, अमंगळ, खा
डाद, विषयलंपट, निर्लज्ज सकळ
दुर्गुणें करून परिपूर्ण असा नीच
प्राणी पापाचा अवतारच या भर
तखंडातील लोकांस अक्षय नर
कवास प्राप्त करून देण्या करिता
उत्पन्न झाला असावा. जे कोणी
शाक्त आहेत. त्याचेंही गूण याच
प्रकारचे समजावे. त्यांस आ-
पल्या अघोर कर्माचे फळ प्राप्त
इहलोकीच होतें. तें मनुष्य देह
धारी असतानाच गर्धभ पशु इ
त्यादी अवस्था भोगितात. जेव्हा
ते मद्य प्राशने करून मदांध हो
तात. तेव्हा त्याची बुद्धी भ्रष्ट हो
ऊन ते चतुपदाची पदवी पाव-
तात. मद्याचा व अतीशय खा
ण्याचा योगाने, त्यांस अमंगळ
कर्मे करायास प्रवर्ततात. त्यांस
पशूपेक्षाही नीच ह्मठलें तरी
शोभायासारखं आहे

हाय हाय व्यर्थ या शाक्त
लोकांचे जीणें !! हे ईश्वरा यांजव
र काही दया कर आणी यांस
फळीवर आणण्याची बुद्धी दे.
आता मीं आपल्या प्रीय मित्रास
विचारितो. कीं तुह्मी शाक्त आयो
र कर्मास चांगले मानतां कीं काय?

जर तुह्मास इहलोकीं अन्न सं
पत्ती शरीर सुख इत्यादिकाची
गरज नसली तर, हे मत्त तुह्मी
स्विकारा. ईश्वराने तुह्मास विचा
र दिल्हा आहे. तरि अशा अवि
चारास त्यागा.

शास्त्रमत्तें दारू पिणाऱ्यांस
प्रायःश्चिता विषईं सन् १८४६ च्या ज्ञा
नोदयांत विस्तारें करून लिहीलें
आहे. त्यांतून खाली काही लिहितो.

धर्म शास्त्रांतील प्रायश्चितेंदु
शेखर ग्रंथी सुरापान प्रायश्चित्त
सांगितलें आहे. तें असें.

॥ गुदजनकोन्न विकार विशे ॥
॥ षःसुरा ॥ ॥ ॥

अर्थ— मस्ती उत्पन्न करणा
रा असा अन्नापासून एक रस उ
त्पन्न होतो. त्याचे नांव दारू

॥ तस्याः विप्रे ज्ञानपूर्वकंका ॥
॥ मतः सकृद पिपाने मरणां ॥
॥ तमेवतेषां प्रायश्चितं ॥ ॥

अर्थ— ब्राह्मणानी एकवेळ —
दी पुरस्कार एकवेळ ही केलें असता
त्यांस देहांत प्रायश्चित्त द्यावे

या प्रमाणे दारु निषेध बोध क व भयकारक वाक्ये आपल्या शास्त्रांत असूनही जे लोक दारु पितात. त्यांस काही सांगीलें तरी ते ऐकणार नाहात. व यास उदाहरणें पुष्कळ आहेत. परंतू हें येवढें पत्र लाब लिहून फळ काय? असे कित्येक जाण ह्मणतील. तर आपण परमेश्वरा पाशी यालोका विषयी प्रार्थना करून असेच नेहेमी लिहीत गेलो तर हे खचीत रस्त्यावर येतील. यांत संशय नाही. एक क्षात्रिय शास्त्र.

सुबई लविद्यार्थी

तारीख २९ अगटोबर १८५०

ज्ञानप्रकाश,

तारीख १८ नवंबर सन् १८५०

इसवी

लखनौ

लखनौचे नबाबाचे राज्यात एकबोडा ह्मणून किल्ला आहे. तेथील राजा बदल्ला होता. त्याजवर सरकारची फौज नबाबाचे तर्फेने गेली होती त्यात लेफूटनेंट इथलूटनू साहेबांस त्या राजाने दगाबाजीने ठार मारलें. पुढें तो राजा धरून आणून त्यास व त्याचे मुलास खुनाबद्दल लखनौत फाशी दिल्हा. परंतू असे ह्मणतात कीं; नबाबाने या अभय वचन देऊन बोलाऊन आणून फाशी दिल्हा. त्यास असे असेल तर, रशिदन्ट साहेब कर्णेल स्लीमान यांणं नबाबाची ही गैर वर्तणूक नापसंत करण्याची होती.

नवीन शोध

आलीकडे आकाशांत नवीन एक नक्षत्राचे गतीचा शोध लागला आहे. तेव्हा त्या नक्षत्राचे नाव-विक्टोरिया- असे जोतिषानीं ठेविलें आहे.

तारीख १४ रोजी मिरजाफर आलिखान बाहादूर यांची स्वारी भवानी पेठत यऊन उतरली त्याचे सन्मानार्थ सरकारातून १७ तोफांची सरबत्ती होऊन सलामी दिल्ही.

क्रानिकल

तारीख १५ रोजी मोहोरमाचे सणाचा गावांत हिंदू व मुसलमानाचा उछाह झाला. या वर्षी डोले झाले गतवर्षापेक्षा ३० कमी झाले. शहरचा बंदोबस्त चांगला ठेवला होता, तत्रापी चवघडा गाड्या वरून जात असतां बैल बुजून एक मनुष्याचा हात वरून चाक गेलें.

---

## मुंबई

नेपाळचा वकील १४ तारखेस गुरुवारी द्वारकेस गेला. तेथून परत पांच साहा महीन्यानी येऊन नंतर रामेश्वर जगन्नाथ वगैरे ठिकाणी इकडे जाणार, नेपाळाहून खबर आली कीं, तेथील राजाची स्त्री महाराणी मेली सबब वकील वगैरे नेपाळचे लोक दुःखांत आहेत. द्वारकेस गेले तेव्हा १९ तोफा सन्मानार्थ झाल्या.

सरकुलर हुकूम नंबर १८१० तारीख २२ अगटबर सन् १८५० चा मेडीकालेबोर्डाने सर्व डाकूतरलोकास पाठविला. त्याजवरून असें दिसतें कीं, मुंबई इलाख्यातील डाकूतरलोक काम फार सक्तीने करतात. आणि काळे लोकाकडून सर्व काम करवितात. स्वताचित्त लाईन आंगदी काम करीत नाहीत असा सर्वांवर ठपका दिल्हा आहे.

---

लाला झूटी प्रसाद याणे काबल्या लढाईपासून सरकारांत मोदिपणाचे काम केलें. आणी चांगली चाकरी केली. असें त्याचें अर्जू पत्रावरून समजतें. त्याची बाकी कंपणी सरकाराकडे येणे पंन्नास लाख रुपये आहे. ती देत नाहीत. व, हिशेबाची रुजूवात ही घेत नाहीत. ह्मणून त्याणे कलकत्यास लावली आहे.

रैट हनराबल गोव्हर्नर मुंबईस तारीख २० रोजी येणार

पूर्वी तारीख १२ नवंबर १८३३ रोजी मोठा नक्षत्रपात झाला. ता प्रमाणे यामहिन्यांत व्हावयाचा आहे. असें जोतिषमत आहे.

## सिमला

सिमल्याचे पाहाडातून गोर्नर जनराल लार्ड डालहोसी निघून मुलखांत फिरावयास जाणार व सरचार्लस नेपीयर साहेब निघोन फिरोजपुरास जाऊन तेथून विलायतेस जाणार आणी सरग्रोम साहेब याजकडे बरोबर माल व जिम्मा पाठवितील.

रीडसाहेब कौसलदार विलायतेस गेले तेव्हा ८३०० रुपये लोकांनी त्यांचा मान करण्याकरिता जमा केले. त्याणी सांगीतले कीं, ते रुपये वैद्य शाळेस देऊन माझे नाव चालवावें. आणि तीनशे रुपये याचा मात्र एक जिन्नस मला द्यावा. त्या प्रमाणे दोन्ही बेत सिद्धीस नेले.

---

## सरकारी शाळा

आलीकडे सरकारी शाळे बद्दल रपोट छापला आहे. त्याजवरून दरएक जिल्ह्यांत लोक वशाळा व विद्यार्थी किती आहेत ते दाखविले आहेत.

| जिल्हा | शाळा | लोक | विद्यार्थी |
|---|---|---|---|
| पुणे | २३ | १४९२२५ | १११६ |
| नगर | २९ | १५६२५७ | १६७० |
| सोलापूर | १८ | ७२२७३ | ५७८ |
| खानदेश | ८ | [illegible] | [illegible] |
| सुरत | ११ | १२३३९८ | ६०२ |
| भडोच | ५ | ५५५३१ | ४३८ |
| अमदाबाद | ६ | ११७०[illegible] | ४८३ |
| खेडा | ६ | ७३११० | ५१९ |
| ठाणे | १० | ७५८२० | ६१५ |
| रत्नागिरी | १७ | ५८७२४ | १२३१ |
| धारवाड | १३ | ९२६४४ | ९०३ |
| बेळगाव | १३ | [illegible] | [illegible] |
| | १५० | | ९१५२ |

यावरून विद्या करणार शेकडा एक आहे. आणि १५० शाळेपेकी १३ शाळेचे पंतोजी ब्राह्मण नाहीत. बाकी सर्व ब्राह्मण आहेत. तसेच विद्यार्थी यांत ही ब्राह्मण जातीचे लोक फार आहेत.

हाली ची संख्या सनन् १८५१ सालाशी मिळविली असता फरक फार आहे. सन् १२८९ चि संख्या येणेप्रमाणे

| जिल्हा | शाळा | लोक | विद्यार्थी |
|---|---|---|---|
| पुणें | ५ | ५५८९०२ | २६६ |
| नगर | ४ | ५००००० | २३२ |
| खानदेश | २ | ३७७३२१ | ५१ |
| सुरत | २ | २५४८८२ | ९६ |
| भडोच | २ | २३८४२१ | ७५ |
| खेडा | २ | ५८४२९८ | १५७ |
| अम्मदाबाद | ३ | ४७०७२१ | २२७ |
| ठाणें | २ | ३८७२६४ | १८८ |
| रत्नागिरी | १ | ६५५७७६ | २१ |
| धारवाड | २ | ७९४१४२ | ९८ |
| | २५ | | १४१५ |

सरकारी शाळा पहील्यां इतक्या कमी होत्या. परंतू हे समजलें पाहिजे.- त्या वेळेस १६८० शाळा लोकाच्या आपल्या आपण घातलेल्या होत्या त्या आतां कमी झाल्या आहेत.

कर्णेल जार्विस साहेब विलायतेस चाकरी सोडून जाणार आहेत. आणि कर्णेल ग्रांट रजेवर जाणार परंतू परत येतील असें दिसत नाहीं

## मुंबई

एक शूद्र विधवेने आपले पोर उपजताच ठार मारलें. त्याचा पता लगून चौकशी होत आहे.

बोरी बंदरात येके रात्री अंधेरात नाव खचून साहा माणसें मेली.

### बक्षीस रुपये २००

गोपाळराव हैबतराव नाईक फदन पायाचे डाकेचा मक्तेदार निसबत पोष्ट मास्तर पुणें हे दोनशे रुपये बक्षीस देण्याचा ठराव करितात. कीं मागले मे महिन्यात पुण्यात नसता कोणी अदावत दाराने (त्याचे नाव गर्उकनार(?)) त्याणे त्यांचे चाकर माणसाशी मिलाफ करून त्यांचे कागदपत्र हिशेब वगैरे कागद होते त्यामध्ये कोरी सर्टिफीकीटें ठेऊन वरीष्ट अमलदारा ठपका आणावा असें केलें व ते कोरे कागद पोष्ट मास्तर यास पेटींत सापडले. यास्तव हें काम करणारे माणसाचा ठिकाण लाऊन देईल त्यास २०० रुपये मिळतील.

सही गोपाळराव नाईक मक्तेदार

पुण्यात कृष्णाजी त्र्यंबक रानडे याणी छापून प्रसिद्ध केलें.

# ज्ञानप्रकाश

सत्य ज्ञान

वर्ष ३ पत्र २ — शहर पुणें.

तारीख १३ ज्यानेवारी सन १८५१ इसवी मिती पौष शुद्ध ११ सोमवार शके १७७२


पत्रांची किंमत रुपये.

दरसाल १० दरमाहा १

---

विकावयाचे ग्रंथ.

गायनप्रकाश २ यंत्रज्ञान १६४

पद्यनामा ६३ लक्ष्मीज्ञान ६१२

---

बुधवारांत ढमढेरे यांचे पडवीत आमचे तर्फेचें दुकान आहे तेथे नानाप्रकारचीं पुस्तकें स्वस्त मिळतील

---

आठवड्याचें पंचांग.

| ति. | वा. | प. | इं. | शास्त्रार्थ |
|---|---|---|---|---|
| ११ | सो | १० | १३ | स्मा. एकादशी. |
| १२ | मं | ११ | १४ | भागवत. |
| १३ | बु | १२ | १५ | प्रदोष. |
| १४ | गु | १३ | १६ | |
| १५ | शु | १४ | १७ | शाकंबरी. |
| १ | श | १५ | १८ | |
| २ | र | १६ | १९ | |

सरकारी कामदारांच्या नेमणुका.

पोलिटिकाल खातें.

मिस्तर ओजिल्वी सातार्‍याचे कामावर दाखल झाले.

मजर जेकब साहेब यांस पोलिटिकाल यजंट कच्छ येथे नेमले.

मिस्तर आंन्डरसन सांवतांचे वाडीस नेमले.

रिविन्यू खातें.

मिस्तर रिड फष्ट असिष्टन कलकटर सुरत यांजकडे परचोल वगैरे महाल दिल्हे.

जुडिशाल खातें.

लेपटनेन्ट एलियट ठगलोक व डाकेकरी यांस धरणारे सुपरइन्टेन्ड आपले कामावर माळवा, गुजराथ, खानदेश; येथे दाखल झाले.

मिस्तर बाजट साहेब जड्ज्य खानदेश यांची रजा मार्च अखेरपर्यंत वाढविली आहे.

## जाहीरनामा

खालीं लिहिलेला जाहीरनामा सरकारी ग्याझेटपत्रांतून उतरून घेतला आहे.

संन १८५१ चे फेब्रवारी महिन्यांत लाहूर येथें शिख्खकतीचें मोटें लिलाव होईल येकंदर किंमत २९ लाख रुपये आहे.

अपूर्व जव्हाईर. हिरेजडित काकणें, हिर्‍यांच्या मण्यांच्या कंठ्या, मोटाले मोत्यांच्या कंठ्या, बाजुबंद, काकणें, बांगड्या, कलग्या, जाळ्या; वगैरे उंची दागिने जवाहिराचे फार किमतीचे.

२ सोन्याचे भरीव चवरंग, पलंग व राव्हटीचे खांब, हौदे, प्याले, चंबू, अपकरे, फार उंची नक्षीदार आहेत.

३ रुप्याचे पलंग भरीव धातूच, खांब. खुर्च्या, हौदे; वगैरे फार किमतीचे.

४ काश्मीरी तंबू; शाला, रुमाल, झकी, दुपट्टे, उंची कापडें;

५ हत्यारें फार उंची. तरवारा, बंदुकी, बरचीर. पेषकबाजे, फरशा, कुरकुड्या, ढाली; वगैरे नानाप्रकारचीं हत्यारें.

६ बिलोरी सामान, उंचा तबके, डबे. मेले, वगैरे

याप्रमाणे मोटाला माल ठिकाण्या विकावयाचा आहे याजकरितां ज्यास उंची पदार्थ घेण्याची इच्छा असेल त्याणी घेण्याची नजवीज ठेवावी असा समय पुनः येणार नाहीं.

सई अधसेंव हेजसाहेब-
लिलाजकरणारे

## बाहेरून आलेलीं पत्रें

ज्ञानप्रकाशकर्त्यांस.

विनंती विशेष कोणी येक पुरुष प्राचीन ज्योतिःशास्त्रावर दोष सांगून असें ठरवितात कीं पृथ्वी कंदुकाकृती असून मध्यें अचळ सूर्य त्याचे सभोंवता फिरते. त्यास मी असें पुसतो कीं जी पृथ्वी सूर्याचे सभोंवती फिरते ती खालून वरून फिरते किंवा भोंवतालून फिरते प्रथमपक्षीं आंतले भाग आंतच राहून फिरते अथवा खाली येत्येवेळेस जा. सूर्या कडील भाग. ता वर जातेवेळेस सूर्याकडे न होता. वरून राहतो. सूर्याकडील भाग खवता सूर्याकडे आला तर रात्रीची अनर्पपत्ती होईल दुसरे सूर्याचे वर पृथ्वी गेली म्हणजे पृथ्विस्थ खाली पडतील पृथ्वीत असा शक्तीचा विशेष आहे कीं लो

नाहीं·आता या दोनी अभिप्रायांचा न्याय करणें सुलभ आहे·

काळेमनुष्याचा अभिप्राय जरी कितीएकास वजनदार वाटणार नाहीं तरी अह्मी लिहिण्यास चुकूनये·

अह्मास वाटतें कीं मुंबईइलाख्यांतील ग्रंथकर्ते जें ह्मणतात हें खरें आहे· ह्यांचे काळीं ग्रंथ होण्याची घाई असावी दुष्काळांत कोणी पंचपक्वान्नानी भोजन करु ह्मणेल तर योग्य नाहीं·आणि मरणोन्मुख रोग्यास औषधाने येकदाच शक्ती आलीपाहिजे शनैःशनैःगुण येईल तर ठीक नाहीं असें वैद्य ह्मणेल तर अश्लाघ्य आहे· आणि निबिडकाळोखांत मशाल पाहिजे लाहानशी वात उपयोगी नाहीं हेहि ह्मणणें उचित नाहीं तसे ग्रंथ आणि वाचणारे बहुत झाले ह्मणजे भाषा सुधारण्याची रीती पडेल परंतु बहुतेंच येकाने मी सुधारीन असा आग्रह धरला तर सुधारणा व्हावयाची नाहीं· याजकरितां हल्ली जे ग्रंथकरणार तयार आहेत त्यास सर्वोपरि उत्तेजन द्यावें व भाषांतर करणारी मंडळी याणी द्यावें· सांप्रतकाळीं उगीच हायहाय करूनये हें बराबर दिसतें·

विलायतेहून नवाबमुस्ततावगवरनरसाहेब गोव्याचे आले आहेत हे गोव्यास लवकरच जाणार आहेत·

---

मिस्तर कोटनिसाहेब कमिशानर टपालचे चवकशीचे हे लंकेस ११ तारखेस जाणार तेथून कल्कत्यास जाऊन तीन कमिशानर येकत्र होऊन ठराव करणार आहेत· टेलेग्राफ·

दादोबादेवाजी गण्याचे माजीमुनसफ याणी सदरअदालतीस आपली शिक्षा रद्द होण्यासाठी अपील केलें आहे·

---

पेस्तनजी सोराबजी या नावाचे एका व्यापाऱ्याने पुण्याहून घोडनदीपर्यंत आणि अहंमदनगरपर्यंत डाकेची गाडी चालू केली आहे· प्रभाकर·

त्रावणकोरच्या राजाने विलायतचे राणीस नजर देण्याकरितां रत्नजडीत असें एक हस्तिदंती सिंव्हासन तयार केलें आहे हें सिंव्हासन थोडेचदिवसानी इंग्लंडास रवाना करणार आहेत

कालरोजीं येथील येक्या सावकाराच्या हुंड्या देशावरावरून परत आल्या त्याजमुळें त्या सावकाराकडे लोक पैसा मागावयास गेले. तो न देण्याचा वार शुक्रवार अशा प्रकारचें भाषण केल्यावरून त्याचें दुकानचें काम कच्चें पडलें असें साफ लोक बोलतात व दुकानीं सावकारांचे कुंवारेही बसले आहेत. २०००००रुपये लोकांचें देण्याचा अडावा निघाला आहे. व अणखी दोन असामी सावकार या अवस्थेंत यावयाचे दिसत येत आहेत·

येथे येक वेताळपेठेंत चमत्कारिक मनुष्य आलें आहे. त्याची आकृती लाहान आहे पाहाण्यावरून स्त्री आहे असें दिसतें व शब्द जनावरासारिखा आहे. त्यास पाहावयास दररोज शेकडो लोक जातात पाहाण्याबद्दल कांहीं पैसे मालकास घावे लागतात. यास वनमाणुस असें लोक म्हणतात. उमर सुमारें ३० वर्षांची दिसते.

---

मुंबइंत व येथे अद्यापि महामारीचा उपद्रव आहे.

सातारचे कमिशनरसाहेब मिस्तर ओगल्वी हे तेथील काम फार चांगलें चालवितात असें लोक ह्मणतात. व कमिशनरीचे जाग्यावर जे लोक आहेत त्यांच्या बदल्या लवकरच करणार आहेत· अशी बातमी आहे

---

तुळशीबागेजवळ गणपतराव नातू हे मोठे सज्जन गृहस्थ होते ते मृत्य पावले. त्यांचें वय सुमारे ७० वर्षांचें होतें. त्यांची चाल व धार्मिकपणा व सच्छीलता असे सद्गुण फार होते. त्यांचे मरणाने बहुतलोकास दुख झालें आहे.

---

येथील जडज्याकडून रघुनाथ या नावाच्या मनुष्याने खोटी शपत केल्यावरुन अपराध ठेऊन साक्षी व पुरावे जे फैरादी देईल ते घेऊन चौकशी करण्यास मामलेदार यांजकडे पाठविला होता त्याची चौकशी गेल्या शनवारी चालू होती पुरावे पुष्कळ घ्यावयाचे आहेत परंतु लोक असें ह्मणतात कीं जर बातमी येकमेकाचीयेकमेकास नसमजतां चौकशी दक्षतेने वक्तशीर होईल तर बरी.

हें पत्र ज्ञानप्रकाशछापरवान्यांत कृष्णाजी त्र्यंबक रानडे याणीं छापून प्रसिध्द केलें·

# ज्ञानप्रकाश

सत्य सौख्य ज्ञान

वर्ष ३ पत्र ५

तारीख ३ फेब्रूएरी संन १८५१ इसवी मिती माघशुद्ध २ सोमवार शके १७७२

पत्राची किंमत रुपये.

दरसाल १० दरमाहा १

पत्राबद्दल जमा रुपये.

१० मेजर क्यांडी साहेब संन १८५० बद्दल.

१० रेवरंड मिचल साहेब संन १८५० बद्दल.

२० तात्यासाहेब पुरंदरे.

जाहिरात.

पूर्वी गुलिस्तां ८ भागाचें मराठी भाषांतराच्या बुकास किंमत आणे आठ लिहिली होती परंतु घेणारास सुलभ पडावें या हेतूनें आणे पांच ठरविले आहेत. ग्रंथ चमत्कारीक व पाठण्यास हितकारक आहे.

आठवड्याचें पंचांग.

| ति. | वा. | न. | यो. | क. | फ. | इं. | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | सो | श | प | कौ | १ | ३ | रविहास्तर |
| ३ | मं | पू | शि | ग | २ | ४ | |
| ४ | बु | उ | सि | भ | ३ | ५ | विनायकी ४ |
| ५ | गु | रे | सा | व | ४ | ६ | वसंत ५ |
| ६ | शु | अ | शु | कौ | ५ | ७ | |
| ७ | श | भ | शु: | ग | ६ | ८ | रथसप्तमी. |
| ८ | र | कृ | ब्र | भ | ७ | ९ | |

दिनमान २८।

उष्णांश ७२

सरकारी कामदारांच्या नेमणुका.

पोलिटिकालखातें.

मिस्तर आन्डरसन याणी सांवतवाडीचें काम घेतलें.

कप्तान ग्राहाम याणी कालापूरचें काम घेतलें.

रिविन्यूखातें.

मिस्तर क्लार्क यास डिप्युटी टंकसाळ मास्तर तूर्त नेमले.

जनरालखातें.

मिस्तर टकर यांस वर्षाची रजा १ फेब्रूएरी पासून मिळाली आहे.

जुडिशालखातें.

मिस्तर पेली सिनियर अगटिंग असिष्टन जड्ज्य ठाणे भडोच जिल्हा सुरत यांस दोन दिवसांची अगखी रजा दिल्ही.

जाहीरनामा.

हुनगुंड, कामटगी, गोकाक, यादवाड, निपाणी, संकेश्वर, गुदूर, कंजूर, हुक्केरी, कौजलगी, चिकोडी, व अमीनगड काणी संन १८५० चा २६ आगष्ट चा रितीं सरकारास अर्जी केली आहे तरि १ एप्रिल १८५१ तेथील ज्यालोकांस आपली ये विषयीं इच्छा असेल ती रिविन्यू साहेब मेजिस्ट्रेट बेळगांव यास जाहीर करावें.

स. आ. एल्फिन्स्टन.

## बाहेरून आलेलीं पत्रें.

ज्ञानप्रकाशकर्तेयांस.

लिखित.

॥ स्वधर्मेनिधनंश्रेयः॥

...नंती विशेष या पत्राचे शिरोभागीं संस्कृ
[illegible]
...क्षात येईल. हिंदूलोकांचा धर्म म्ह
णजे काय याचें माहात्म लोकांमध्यें गुप्त
नाहीं वास्तव धर्मसंबंधीं व्याख्यान करून स
र्व जनास संतोषवावें हा माझा उद्देश आहे. वा
स्तव हें माझें लिखित आणि याउपर जीं लिही
न जाईन तीं वर्तमानपत्रद्वारें प्रसिद्धता पावोन
त्याचा अभिप्राय सर्वांतःकरणीं प्रविष्ट हो
त्याचा धर्मामृत प्राशन करून तुमचे पत्र वाच
णारे चिरंजीव व्हावे ही इच्छा मी करितो. आ
तां हें माझें प्रथम लिखीत आहे त्यापेक्षां मी
धर्म व्याख्यान करण्याचे आदीं धर्मसंबंधीं
ज्ञान मिळवणें जरूर आहे कीं काय व याचा
उपयोग काय व किती येविषयी प्रतिपाद
न करितो. लिखितारंभी श्रीभगवद्वाक्य लि
...चा अर्थ धर्मासारखें मरणकाळीं
...र दुसरे कांहीं उपयोगी नाहीं अ
...आहे त्यासच अनुसरून मी प्रवृत्त आहे.
मनुष्य हें इतर पशूसारखें अंगपिंडानें
श्रीपरमेश्वरानें निर्मिला आहे ... सर्वांस
आपआपल्या शरीराची व्यवस्था पाहून ल
क्षांत येईल. परंतु हें जाणावें कीं मनुष्यप
शू ज्ञानपात्र आहे हें लक्षण या पशूचें सर्वां
हून अधीक आहे. याजवर कोणी म्हणतील
कीं ह्रा पशु ज्ञानपात्र आहे तर बरें चिंता ना
हीं, प्रत्येक माणसास ज्ञान आहेच खाण्या
चे निजावयाचें द्रव्य मिळवावयाचे नानाप्र
कारचे उद्योग व्यवसाय करण्याचे. इत्यादि
ज्ञान असतच आहे तर याजवर उत्तर असें
आहे कीं हें ज्ञान मरणानंतर उपयोगीं पड
णार नाहीं आणि जर संसारिक ज्ञान मनु
ष्यास असून पारमार्थिक ज्ञान मनुष्यास
नसल तर मनुष्याचा जन्म व्यर्थ आहे असे
थोरथोर साधू ऋषी इत्यादि मान्य पुरुष
बोलले आहेत. याचें कारण असें आहे
कीं ही सर्व सृष्टी नश्वर म्हणजे नाश पावणा
री आहे या पृथ्वीचे पाठीवर जे जन्मास अ
नंत कोटी प्राणी येतात त्याचा क्षणभर वा
चण्याचा भरवसा नाहीं. हें परमेश्वर पदोपदीं
दाखवीत आहे. प्रत्येक प्राणी आपल्या ठिकाणीं
अनेक विवंचना आणि अहंता बाळगून अस
तो परंतु परिणामी त्या व्यर्थ जातात वास्तवी
क पाहिलें तर मनुष्य अति दुर्बळ प्राणी अस
न जरी कितीही योग्यतेस पावलेला असेल

तरी शेवटी सर्वांचा परिणाम येक होतो कोणी आपले ठिकाणी राजा, कोणी प्रजा, कोणी दरिद्री, कोणी श्रीमंत, कोणी बळवान कोणी दुर्बळ, कोणी अधिकारी, कोणी अनाधिकारी; असे अनेक स्थितींत मनुष्ये [illegible] परंतु या सर्व स्थितींची योग्यता किती आहे ती परिणामी समजत्ये. मागें अनेक असे होऊन गेले व पुढे होणार व हल्लीं आहेत परंतु त्यांचें कांहीं राहावयाचें नाहीं हा सर्व व्यापार स्वप्नवत आहे. आणि प्रत्येकाने असें पाहवें कीं या सृष्टीचा केवढा सा अंश हा प्राणी आहे दरयेक नक्षत्र आकाशांत आहे तें प्रत्येक पृथ्वीसारखें आहे त्याजवर निवासी लोक आहेत अशीं हीं अनंत ब्रह्मांडें आकाशमार्गी भ्रमत आहेत. आणि फक्त येक पृथ्वी जरी घेतली तरी तीचा पृष्ठभाग केवढा मोटा आहे त्याचा लाहानसा तुकडा दरयेक मनुष्याचे पायाखाली आहे कोट्यावधी लोक या पृथ्वीवर आहेत हिंदू, मुसलमान, क्रिश्चियन: नानाधर्म स्वीकारून प्राणी राहत आहेत त्या संख्येमध्ये येकमनुष्य किती लाहान होईल बरें. याचा कांहींच हिशेब लागत नाहीं असें आहे तरी दरयेकमनुष्यास आपलें महत्व आणि आशा केवढ्या असतात? आणि पाहिलें तर त्यांस कांहींच अर्थ नाहीं.

या सर्व सृष्टीचा निर्माणकर्ता, नाशकर्ता, व रक्षणकर्ता येक महत्कारण परमेश्वर आहे. तो स[illegible] मोटा शक्तिमान [illegible] मनुष्यावांचून कांही[illegible]हीं, त्याचे आज्ञेवाचून क्षणभर [illegible] व्हावयाचे नाहीं, सर्वांचा कर्ता जगदीश आहे. हा सूर्यही त्याचे सत्तेने उगवतो, व अन्नही त्याचे करून पिकतें, पाऊस त्याचे आज्ञेने पडतो, प्राण्याचा श्वासोश्वासही त्याचे आज्ञेने वाहतो, यांतील कांहीं रुला दुसऱ्या कोणाच्याने व्हावयाचें नाहीं. जर मोटा कारागार असला तरी त्याच्यान येक वृक्षाचें पान पानासारखें व्हावयाचें नाहीं आणि ईश्वरसत्तेने पाहा चिंचेचे झाडावर येकसारखीं लक्षावधी पानें उत्पन्न होत असतात तसें कोणासही करतां येणार नाहीं अशी सर्वत्र त्या परमेश्वराची सत्ता दिसते सर्व पदार्थ त्याचे सत्तेचीसा[illegible]

असा परमेश्वर सत्ताध[illegible] त्याजपासून प्राण्याचें त्याच[illegible] खें कल्याण होईल. अहो जर श्रीमंता[illegible] घरीं गरीब गेला तर दाहापांच रुपये मिळतात. त्याहून मोटे श्रीमंताचे घरीं गेला तर

शेपन्नास मिळतात व राजांचे घरीं हजारदो
नहजार मिळतात मग सर्वांहून श्रीमंत परमे
श्वर कीं ज्याचे श्रीमंतीस तुळणा या सृष्टींत
... जकडे गेलें तर काय मिळेल याचा गैन
ईश्वर श्रीमान असून दयालू आ
हे त्याचे कृपेकरून दिसतें कोणता
प्राणी त्याचे कृपेचे अनुभवावाचून आहे दरये
क जणास त्याची कृपा आहे ह्मणून आपले डो
के ज्ञान पाय इत्यादि सर्व यंत्र चालतात. हे जर
नचालतील तर मनुष्य काय करील. असो सा
रांश ईश्वराचे दयेवेगळीज कांहीं चालणार नाहीं.
असा जो दयाळू परमेश्वर यास जाणणें आणि त्या
चा उपकार मानून त्याचे भजन करणें याहून अ
धीक लाभ दुसरा कोणचा नाहीं. जसा आपला
येकादा यजमान साधारण मनुष्य असतो त्या
चे मर्जीप्रमाणे त्यास जें प्रिय तसें आचरण करा
वें लागतें. तद्वत सर्वांहून मोठा यजमान परमेश्वर
ज्याचे सत्तेने जन्म मरण आयुष्य, व मरणानंतर
... काय होणार ते त्याचे सत्तेने होणार तेंव्हां ये
त्या यजमानाची अवगणना करणें
आहे त्याहून अधीक पातक नाहीं
... त्याची सेवा अवघड नाहीं. ईश्वराची
सेवा अशी सुलभ आहे कीं तेणेकरून संसा-
रही उत्तम रीतीने निभतो. लोकांत अब्रू राहत्ये,
व सर्व प्रकारें कल्याण होतें

तर ईश्वराचे आज्ञेविरुद्ध ह्मणजे पा
पयुक्त कर्म केलीं तर दोनी ठिकाणी फजीती
होत्ये व सर्वस्वी नाश होतो व पुण्य ह्मणजे
ईश्वरभजन आणि ईश्वर आज्ञेप्रमाणे वाग
णें येणेकरून सर्व चांगलें होतें.

तेंव्हां इतकें सर्वस्वी कल्याण करणारं
जें ईश्वरभजन तें कसें घडावें याचें ज्ञान दु
सरें कोणचेंही पढल्याने व्हावयाचें नाहीं हें
धर्मांतमात्र आहे. ईश्वरसंबंधी ज्ञान याचें ना
व धर्म. सर्व शास्त्राचें मर्म जें ईश्वरभजन हें
नजाणून जरी शास्त्रें पुष्कळ पढली तरी
तीं व्यर्थ आहेत तेंव्हां शास्त्राचें जें मुख्य
सार आहे तें ग्रहण करावें. धर्म ह्मणजे ई
श्वरप्राप्तीचा मार्ग आणि ईश्वराच्या आज्ञा
काय आहेत व त्यास काय प्रिय आहे व
काय केल्याने तो कृपा करितो हें सर्व धर्मांत
आहे. यास्तव धर्म जाणणें जरूर आहे. व
हुत काळाने बहुत जन्मा अंतीं मनुष्य जन्म
प्राप्त होतो हे उघड आहे. दरयेक जीवास
८४००००० इतका प्रकारचे देह धारण क
रावे लागतात तेंव्हां शेवटीं या ज्ञानपात्र पशू
च्या जन्मास येतो. हा जन्म मोठ्या सार्थकाचा
आहे परंतु कितीयेक मनुष्यें विचारशून्य

...सादा ईश्वरभजन नकरितां मरतात-असो ...विचार भाग्यहीन पुरुषांचा बोललो-परंतु ...भाग्यपुरुषांनीं असा विचार केलापाहिजे ... हा देह बहुतकाळ राहावयाचा नाहीं- ... मरण उभें सर्वकाळ आहे केंव्हां येईल ...नियम नाहीं यास्तव त्वरा करून ईश्वर ...नास लागावें- व येथे कितीही संपत्ती मि ...ळाली तरी ती काय उपयोगी पडणार आहे- ...नंतर कोणी उपयोगी पडणार नाहीं- हे जे जे ...उनठेऊन गेले त्यांची अवस्था पाहून सम ... आणि शाहणे व्हा- आपले धर्मसंबंधीं ज्ञा ...च आपल्या उपयोगीं पडेल-आणि या अनिश्चित जगावर ममता कमी करून परलो ...यामध्ये कितीदिवस राहावयाचें त्याचा अं ...नाहीं त्याची तयारी करावी हेंच शाहणपण ...-पाहा सर्व प्राणी उद्याची तयारी आज ...तात, व पुढचे सालची बेगमी यंदा करि ...व रक्षापकाळीं उपयोगीं पडावें ह्मणून तरुणपणी संपादन करून ठेवितात-मग पुढ ...जन्मासाठीं संपादन नकरणें हें केवढें मूर्ख ...आहे- कोणास मरणाचा काळ ठाऊक ना ...हीं हें खरें परंतु काळ कधीस ठाऊक पाहिजे आज, उद्या, अथवा शंभरवर्षांनी कधीतरी जो प्राणी पृथ्वीवर आहे त्यास केंव्हांतरी येथून जाणें आहे-तेंव्हां पुढें काय आहे व पुढें आपले चिरकाळकल्याणाची संपत्ती कशी मिळवावी हेंच ज्ञान मिळविणें सर्वांहून श्रेष्ठ आहे-या ज्ञानावांचून सर्व ज्ञान आहे तें व्यर्थ धूर्वा सिक्षांत आहे आणि यास... आहा व पारमार्थ केलापाहिजे- रोग, घात, ...क्षा; इत्यादि मरणाचीं कारणें केंव्हां घडतील याचें प्रमाण नाहीं- हें मागें गेल्यांची अवस्था पुढच्यानीं सावध व्हावें आणि सावध होण्या स संसार सोडावा लागत नाहीं- कर्ता तेंच करा परंतु कर्मसंबंधीं ज्ञानमात्र मिळवा क्षणभर ईश्वराची सेवा करा ईश्वराचें भय धरा ह्मणजे इतररीतीने संसार केल्याहून चांगल्या रीतानें होईल आणि परलोकीं चिरकाळ सुख आहे तें प्राप्त करा- यांत कोणत्याहीप्रकारें तो टा नाहीं- असें धर्मसंबंधीं ज्ञान मिळविण्याचा उपयोग इहलोकीं आणि परलोकीं आहे- ह्मणून या गोष्टी कानादर लक्ष द्या यासारखें काळजीचें काम दुसरें कोणतें नाहीं हे तं समजा. हीच कृपा करा...

तारीख १ फेब्रुवरी १८५१ सहीधर्मी

---

## ज्ञानप्रकाश-

तारीख ३ फेब्रुवरीसंन १८५१ इसवी-

साहेबलोकांच्याबदल्या.

ड्रमसडंनसाहेबसकदारी यांची प्रकृती बरी नाहीं सबब फोंडाघाटाकडे जाण्यास त्ली आहे.

साहेब जड्ज्य पूर्वा सदरअदालती तें विलायतेहून येणार आहेत आणि त्यास कौन्सलीत जाण्याचा अधिकार मिळणार आहे.

हनशबल उलबीसाहेब पुढलेमहिन्यांत विलायतेस जातील त्यांचे स्थानी बेलसाहेब यांची नेमणूक आहे.

मिस्तर ब्रौनसाहेब पुण्यास येण्याकरितां मुंबईस आले आहेत.

चोरीसापडली.

पुण्याची डाक मारली ते चोर सापडून पनवेलीस चौकशी चालली आहे.

स्वदेशीयराज्ये.

मंगरूळचा राजा याणे आपल्ये राज्या लोक आहेत त्यांस फार इजा दिल्ही. कितीयेकांस काढून दिल्हें घरें. पेशजी इंग्रजसरकाराने ताकीद केल्यावरून कितीयेक दिवस याणे रयतेस उपद्रव दिल्हा नव्हता परंतु हल्लीचे कृत्यावरून राजकोटच्या यजंटाकडे रयतेने अर्जी दोनवेळ केल्या आहेत. पाहा या राजास काय अवदशा आली आहे!

बडोदें आणि भडोच यांचेमध्यें येक संस्थानी ठाकूर ह्मणजे राजा आहे तो कितीयेकदिवस चोरटेलोकांस आश्रय देऊन दरवडे घालवीत असे या वहिमावरून गाइकवाडाने त्यास धरण्याचा हुकूम केला आहे.

रांडबाजीचेंफळ.

वडेगांवचे जाहागीरदारदाभाडे यांचे येथील येक मनुष्य उमदवार दुर्व्यसनास लागला तो कसबिणीचे घरीं असता तीणे त्यास मद्य देऊन मूर्ख केला आणि अमलात मर्द त्याचे अंगावरील दागिने काढून घेतले अजमासें हजाररुपयाचें सोनें होतें त्याजबदल पुण्याचे फौजदाराकडे त्या गृहस्थाने शुद्धीवर आल्यानंतर फिर्याद केली आहे. लोकलज्जा, धर्मलज्जा, आणि शिवाय सर्वस्व हरण; हें फळ झालें.

संन १८५१ सालची मोजदाद लोकांची करावी ह्मणून मुंबईत हुकूम झाला आहे गेलेसाली मोजदाद केली तेंव्हा लोकांनी अशी गप उठविली कीं कांहीं कर बसणार आहे आणि कोणी बरोबरसंख्या सांगितली

नाहीं याजमुळें चुका पडल्या त्या आतां दुरुस्त होतील असें वाटतें. असें येका मुंबईच्या पत्रावरून कळत आहे.

मोरेश्वरशास्त्री यांणी मागले रविवारी … करण्याच्या प्रतिमा आणि नद्या अग्नि … रपदार्थ यांचें प्रयोजनप्रतिपादक संभाषण केलें.

निजामास भेटावयास कम्यांडरईन चीफ मद्रास याणी इच्छिलें आणि सांगून पाठविलें कीं जर आपण खुर्ची घालु तर येतो त्याजवर निजामानी उत्तर केलें कीं चालीप्रमाणें आमचे दरबारांत खुर्ची मिळावयाची नाहीं. त्या दरबारांत चाल अशी आहे कीं जो कोणी भेटावयास जातो त्याणे दोन्हीं हात रुमालानें बांधून समूर उभें राहवें लागतें ऐशी भेट घेण्याची चीफसाहेबाची नाखुषी म्हणून भेट न होतां परत गेलें.

हवेलीचा मामलेदार यास सस्पेन्ड केला आहे.

लाचेच्यामोकदम्याचअपील.

सदोबादेवाजी माजी मुनसफ जिल्हा … यांणी सदरअदालतींत अपील केलें होतें तें रद झालें.

जुडिशालखात्याचाहुकूम.

खालीलिहिलेलेलोकराणीसाहेबनर्फे पिसजष्टीस बादषाहीकायद्याप्रमाणे सरकारानें नेमले आहेत तरत्याणी शपथ घे… …

१ अगाननहंमद. २ आर्देसरहुर…
३ बमनजीहुर्मुसजी. ४ करसेटजीआर्देसरदादी.
५ करसेटजीरुस्तुमजी. ६ करसेटजीजमसेटजी.
७ दादाभाईवाडया. ८ फ्रामजीकावजी.
९ फ्रामजीनसरवानजी. १० जगन्नाथसंकरसेट.
११ जमसेटजीजिजीभाई. १२ महंमदइभ्राईम.
१३ माणिकजीलिमजी. १४ मिरजाअलीमहंमदखान.
१५ मन्चरजीपेस्तनजी. १६ मन्चरजीफ्रामजी.
१७ माणिकजी. १८ नारायणदिनानाथ.
१९ नौरोजीजेमसेटजी. २० रुस्तुमजीजमसेटजी.
२१ विनायकरावगंगाधरशास्त्री.

सही डिप्युटीसेक्रटारीआर्स्किन.

जाहीरनामा.

जेंव्हा पोलिटिकाल खात्याचा कामदार साहेब दुसरे ठिकाणी नेमला जाईल त्याणे कमीटी जमऊन आपले … नोजदाद करून पावती व रपोट लिहून …

तारीख २७ जान्युएरी १८५१. सरकारहुकुमावरून मालिटचीफसेक्रटरी.

लाचेच्याफिर्यादीजड्ज्यखात्यांत
रघुनाथकृष्णाजीनिसबत कानिकल
अफीस याने अजम बेजनजीसेट अगटिंग
ऽ्यफ पुणें यांजवर फिर्याद केली ती शप
थेदेऊन ... सांगितल्या
तथव खोटेशपतेचा गुन्हा केल्याच्या वहि
मावरून माजिस्त्रेटसाहेब यांजकडे जड्ज्य
साहेबाकडून आल्यावर त्या मनुष्याने पु
रावा शपतेअन्वयें दाखविला त्यावरून
माजिस्त्रेटसाहेबानी त्याजला मुक्त करून
पुरावा जड्ज्यसाहेबाकडे हजर केला त्याची
चौकशी जड्ज्यसाहेबाकडे सुरू आहे फेंस
ल्याचें कांही ऐकिलें नाहीं.

कलकटरखाते.

कलकटरसाहेब यांचे शिरस्तेदार व
मामलेदार हवेली यांस लांचेचे वहिमावरून
तूर्त सस्पिन्ड केले आहेत त्यांत चौकशी हो
ऊन लोकश्रुत अद्याप झालें नाहीं.

मिस्तर मेहेरवानजी दादाभाई माजी
पुणें यांजवर नेनसफकहरकोल
क खटले आणिले होते त्या कामांत
चौकशी करण्यास मिस्तर न्युटनसाहेब अ
सिस्टनजड्ज्य यांस कमिशनर नेमले होते
त्याणी सर्व खटल्याची चौकशी पुरी केली
आणि येविषयीं सरकारास रपोर्ट करणार
आहेत कितीयेक पत्रकर्ते लिहितात कीं
सदरीं लिहिलेल्या गृहस्थावरील सर्व
खटले दूर झाले असा मजकूर लिहिण्या
स आम्हांस ... अल्हाद आहे परंतु पत्रें
कळण्याची वाट पाहात आहो.

ठाण्याचे दप्तरदार मृत झाले हें व
र्तमान ऐकून बहुत लोकांस दुःख झालें व
त्या जाग्याकरितां येथील दप्तरदार व ...
जदार हे उभयता सरकारास अर्ज करणार
आहेत असें ऐकतो.

सोलापूरचे कलकटराचा चिटणीस
यास मामलेदार बारसीप्रगण्यांत नेमला
होता परंतु त्याणे पहिली चिटणीसीची जा
गा होती तीच असावी ह्मणोन कांहीं काम
केल्याचा संशय सरकारास आल्यावरून
त्याजला हलक्या कारकुनाची जागा दिली.

सरच्यार्लस नेपियर यांची स्वारी मुं
बईत आली आहे त्यांस तेथील लोकांनी विलायतेस जावात ह्मणोन मेजवान्या
केल्या.

हें पत्र ज्ञानप्रकाशछापखान्यांत कृष्णा
जी त्र्यंबक रानडे याणीं छापून प्रसिद्ध केलें.

**आसीरगड**— ता० १७ आगस्ट. फूं कंपनी ग्यारिसनची ही एथून मालेगांवास जाण्या करितां रवाना झाली, तापीनदीस महापूर आला आहे, एथें सर्व शांतता आहे. ग्या.

---

**महिसूरच्या** कमिशानरास हिंदुस्थान सरकारानें असा हुकूम पाठविला आहे कीं बंगालखात्यांत नोकरी करितां दोन हजार स्वार पाठविण्याची तजवीज करावी; कारण महिसूरचे स्वारांनीं मागें मराठ्यांचे लढाईंत मोठीं हुशारीचीं कामें केलीं आहेत, तशींच आतांही ते शिलेदार आपलें काम बजावतील त्यावरून एक हजार स्वार तयार आहेत; परंतु एक हजार शिलेदारांस घोडीं नाहींत तीं मात्र सरकारानें खरीदी करून देण्याची तजवीज करावी असें लिहिलें आहे. सदरहू मजकूर टेलिग्राफाधारें लिहिला आहे.

---

गेल्या सोमवारीं पैमाष खात्यांतील मिस्तर. डबल्यू. हारिसन साहेब व हापसन साहेब यांची मराठी भाषेविषयींची परीक्षा मेहेरबान रिवस साहेब रिविन्यू कमिशनर यांच्या कचेरींत झाली. परीक्षेचे पंच मेहेरबान रिवससाहेब; कप्तान फ्रान्सिस साहेब; मेहेरबान लोडन साहेब; व रावसाहेब भास्कर दामोदर हे होते. सदरहू परीक्षा मुंबई सरकारचे हुकुमावरून झाली आहे. परीक्षा उभयतां साहेबांची उतरली किंवा नाहीं हें निकडून कळेल.

**सुरतच्या** तारीख ५ आगस्टचें पत्र वर्तमानपत्रांत आहे त्यावरून समजतें कीं तेथें पर्जन्य तुरळक पडला. नारळीपौर्णिमेचे दिवशीं पुष्कळ लोकांनीं पाण्यांत नारळ टाकिले व हा उत्साह मोठा झाला, तेथें सर्व स्वस्थता आहे; विनाकारण राहणारे लोक कांहीं भीती घेतात त्यास मारेचास येथून आणखी कांहीं युरोप आले म्हणजे धारवाड, बेळगांव, बडोदें, मंडोच, सुरत, रत्नागिरी, सातारा, आणि अमदाबाद या ठिकाणीं कांहीं स्वार अधिक ठेवून लोकांस भीती वाळगण्याचें कारण अगदींच सरकारानें नाहींसें करून टाकावें असें पत्र लिहिणारानें सुचविलें आहे.

---

पुणें आबझरवरच्या तारीख १४ वीच्या पुरवणीवरून खालच्या मजकुराचा उतारा करून घेतला आहे.

—विलायतचें १९ वे जुलईचें वर्तमान, वर्तमानांतील एक आगबोट आली त्यांत आलें, तें तेथून एक गलबत १३ वे तारखेस मुंबईस आलें त्यावरून कळलें कीं, हिंदुस्थानांतील वर्तमान विलायतेस समजल्यावरून याविषयीं फार लक्ष त्या लोकांनीं दिलें आहे असें दिसतें. एथच्या बखेड्याप्रकरणीं लार्ड एलीबरो साहेबांनीं फार भाषण तारीख १३ रोजीं केलें, तेथच्या प्रधानानीं हिंदुस्थानचे गवरनरज्यनराल यांणीं जो क्रम चालविला आहे तो व तिने कडे जे स्वार पाठविले आहेत तेवढ्यांतील लार्ड एलजीन साहेब आहेत त्यांस बोलावण्याविषयींची तजवीज केली हें; आणि तूर्त सर पाट्रिक ग्रांट साहेब यांस बंगालचा कमांडर ईनचीफ नेमिलें हें; हीं सर्व बराबर आहेत असें उत्तर दिलें. लार्ड एलिनबोरो साहेबांनीं हिंदुस्थानांत

मेरीफोज पाठवावी ह्मणून सूचना केली आहे.

होस आफ कामन्स सभेनें विलायतेहून सर कोलीन कांबेल यांनी रवानगी करण्याविषयीं मोठ्या हर्षानें कबूल केलें.

आणखी २० वी, ३४ वी, ४२ वी याग, ५४ वी, व ९७ वी पायदळ असाहा पलटणीस हिंदुस्थानांत रवाना करण्याविषयीं हुकूम फिरला आहे.

पांच मळसूत्री आगबोटी स्वारांस नेण्याकरितां तयार झाल्या आहेत.

---

येथील सरवेरचे शाळेंतील परीक्षेस उतरलेले उमेदवार १८ त्यांस सरवेरच्या जागा नेमून २५ रुपये दरमाहाच्या द्याव्या आणि १ वर्षपर्यंत त्यांस प्रोबेशनरी ठेवून पुढें त्यांची परीक्षा घ्यावी आणि त्यांत जे पसंत होतील त्यांस ४० रुपये दरमाहा करावा असा हिंदुस्थान सरकारानें ठराव केला आहे. सदरहू उमेदवारांपैकी सात गुजराथ प्रांतांत, ७ दक्षणेंत, व ४ सिंधप्रांतांत रवाना करण्याचा ठराव होऊन त्यांनी नेमलेल्या स्थळीं जाऊन पोंचावें असा हुकूम त्यांस झाला. लोकांस आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं कीं पब्लिक वर्क्स खात्यांनी खर्च कमी करावा असा सरकारानें विचार धरला; तरी आपण कमाविलेले माणसांस बेकार किंवा गु——— असंतोषाकडे लक्ष सरकार ठेविते. यावरून या सरकारच्या दयाळू स्वभावाची तारीफ करावी असें मनांत आल्यावांचून राहणार नाहीं.

सरवेरचें काम नेकमें आहे. आणि त्या कामांत तयार झालेले लोकांस सदरहू पगार; आणि पाहिजे तिकडे या एवढ्या पगारावर त्यांणीं जावें इकडे लक्ष देऊन पाहिलें ह्मणजे विश्वास वाईट वाटतें. या एवढ्या रोजमुऱ्यावर त्यांणीं आपला व आपल्या कुटुंबाचा व गड्याघोड्याचा खर्च कसा भागवावा हें अनुमानकरों कोणाही सुज्ञाच्या लक्षांत येईल.

---

विंचूर— येथून तारीख ११ वीचें पत्र आलें त्यांतील मजकूर.

विंचूर येथील आसपासचे गावोगावीं मेघराज्यानें आपलें आगमन केलें नव्हतें ह्मणून सर्व लोक त्याची मार्गप्रतीक्षा करीत बसले होते; परंतु आश्लेषा नक्षत्राचा पर्जन्य इकडे चहूंकडे पडला तेणेंकरून लोक आनंद पावले आहेत. कोपरगांव एथें देवस्थान वगैरे आहे त्याचे खर्चास सरकारांतून कांहीं नेमणूक मिळत असते व त्याची व्यवस्था नीट चालत नसे याजबद्दल पुष्कळ विःसा उत्पन्न झाला होता; शेवटीं सरकारानें असा ठराव केला कीं श्रीमंत अण्णासाहेब विंचूरकर यांणीं सदरहू गांवचे संस्थानचा बंदोबस्त ठेवावा. आतां सदरहू संस्थानचा बंदोबस्त योग्य राहील अशी मी इच्छा करीत आहें.

---

टेलिग्राफचे समजण्यांत आलें आहे कीं, मेहेरबान रिवस साहेब यांचे जाग्यावर मुंबईचे कौन्सलांतील चीफ सेक्रेटर मिस्तर इनविरारीटी यांची नेमणूक होणार असें तो पत्रकर्ता लिहितो; परंतु अद्याप ये विषयीं मुकरर ठराव झाला नाहीं. कारण या जाग्यावर

# ज्ञानप्रकाश.

वर्ष १९ पत्र ३४. शहर पुणें.

सोमवार तारीख १७ आगस्ट सन १८५७ इ०


पत्राची किंमत रुपये.
१० दर साल.
१९ आगाऊ दिल्यास.

---

ज्ञानप्रकाश ता० १७ आग० १८५७

## मळसूत्रीगलबताचा नमुना.

गेल्या शुक्रवारीं सायंकाळीं येथील माणकेश्वर यांचे वाड्यांत नमुन्याकरितां केलेलें एक लाहानसें मळसूत्री गलबत होदांत चालविलें होतें. त्या गलबतांतील मुख्य गोष्ट ही होय कीं, त्यांत यंत्र केलें आहे; आणि घड्याळास किंवा वाज्याचे पेटीस किल्ली दिली ह्मणजे ती किल्ली संपेपर्यंत घड्याळ किंवा वाज्या ही चालतात त्याप्रमाणें ह्या गलबतास किल्ली दिली ह्मणजे पाण्यांत चालतें. सदरहू गलबताचा नमुना फारच लाहान ह्मणजे दीड वितीहून कमी रुंदी, व सुमारें १ हाताहून कमी लांबी होती तथापि ५ शेर वजनी ओझें त्यांत असून सुमारें एक घटकाभर तें पाण्यांतून चालत होतें. सदरहू नमुना येथील मोदिखान्यांतील राजश्री बाळाराम मेस्त्री यांणीं केला आहे. या नमुन्यावरून सदरहू कारागीर मोठे गलबत या तऱ्हेचें करील या विषयीं संशय नाहीं. सदरहू कारागिरीची कुशलता व यांत्रिक कामाचे बुद्धि विशेष चालत्ये; आणि तशांत हिंदू ह्मणून अधिक त्यांची तारीफ करणें योग्य आहे.

---

### चुकीची दुरुस्ती.

तारीख ३ आगस्टचे आमचे पत्रं आरंभीं जी जाहिरात दिली आहे ति टीं "पुस्तक पे [illegible] मेंचुकून पडलें आहे तेथें [illegible] नांवें लिहून पाठवावीं अगर [illegible] दिवाणी अदालतीचें निवाड्याचें पुस्तक त्यास मिळेल.

ज्ञानप्रकाशकर्ता.

---

खुन. – इंदापूर तालुक्यांतील क्षेत्र नरसिंगपूर एथें तारीख २७ ज्युलईस रात्रीं तेथील रखवालदार गोपाळा रामोशी यास तेथील राहणारे ४ असामी यांणीं माणकेश्वराचे वाड्यांत नेऊन त्याचा खून केला. सदरहू अपराधी असामी मोठ्या युक्तीनें इंदापूरचे महालकरी रा० रा० बळवंत सिद्धेश्वर यांणीं पकडले. तो खटला पोलिस अंमलदार यांणीं समागमें एथें आणिला आहे; त्याची चौकशी डिस्ट्रिकट डिपुटी माजिस्ट्रेट साहेब यांजकडेस होऊन खटला सेशन

कमीट हे लें असें वाटतें. अशावेळीं रहून सुधापर्णांनि वींपकडणें हें मोठें हुशारीचें काम समजलें पाहिजे आणि या कामदारास सरकारानें कामगिरी बज्याविल्याबद्दल शाबासकी दिली पाहिजे.

---

**पर्जन्याचें कोष्टक**— एथे चालता महिन्याचे आरंभापासून तो १६ तारखेपर्यंत ९ इं. आणि ९ टोकडे ह्मणजे $\frac{9}{100}$ इंच पर्जन्य पडला. त्याचा तपशील आह्मांस मेहेरबानी करून येथील सिविल हास्पिटलचे डाकटर साहेब यांणीं पाठविला त्यांचे आह्मी बहुत आभार मानितों, तो तपशील येणेप्रमाणें.

| तारीख. | रात्रौ. | | दिवा. | |
|---|---|---|---|---|
| | इंच | टोकडे | इंच. | टोकडे |
| रवि | ,, | १२ | ,, | ,, |
| २ सोम | ,, | ९ | ,, | ८ |
| बुध. | ,, | ,, | ,, | २४ |
| ६ गुरु. | ,, | २६ | ,, | १० |
| ७ शुक्र. | ,, | ८० | ,, | ९ |
| ८ शनि. | ,, | ३० | ,, | १० |
| ९ रवि. | ,, | १५ | ,, | १२ |
| १० सोम. | ,, | ९ | ,, | २० |
| ११ मंगळ. | ,, | ३० | ,, | १२ |
| १२ बुध. | ,, | २ | ,, | २ |
| १३ गुरु. | ,, | १५ | ,, | ४२ |
| १४ शुक्र. | ,, | १७ | ,, | २ |
| १५ शनि. | ,, | ३ | ,, | १७ |
| १६ रवि. | १ | १४ | ,, | २० |
| एकदर. | ३ | ५४ | १ | ९५ |

---

**अन्नछत्र**— मढे घाटचें अन्नछत्र सरकारांतून चालत होतें तें बंद केलें यामुळें लोक गृहस्थ पांथस्थ येणारे जाणारे गरीब लोकांस मोठी गैरसोय झाली होती; परंतु आमच्या ऐकण्यांत आलें आहे कीं तें अन्नछत्र पुनः चालविण्याचा विचार रावबाहादर केसोरामचंद्र जोग दसरदार यांच्या मनांत येऊन त्यांणीं तेथलीं भांडीं वगैरे अन्नछत्राचें सामान सरकारांतून घेतलें व ते स्वतः किंवा दुसरे हिंदू कृपाळू व परोपकारी गृहस्थ ह्या योग्य कृत्यास साहाय्य करतील त्यांच्या आश्रयानें चालू ठेवणार आहेत. सदरहू अन्नछत्राचा खर्च दरसाल अदमासें १५०० रुपये किंवा त्याहून ज्यास्त होईल असें दिसतें. हें अन्नछत्र चालू झाल्यानें अत्यंत गरीब जे लोक गृहस्थ लोक आणि पांथस्थ, यांस अन्न त्या मार्गानें पुनः मिळेल. असें झाल्यानें ते गोर गरीब लोक वास्तविकपणें या परोपकारकृत्यास आश्रय देणारे व पुढारी यांस दुवा देतील, व त्यांचें अभीष्ट चिंतितील. हा धर्म साधारण धर्मापेक्षां अधिक महत्वाचा आहे. रा० बा० केसोपंत तात्या यांचें लक्ष हितावह अशीं कृत्यें करण्याकडे फार असतें. ते स्वतः धर्मशील फार आहेत तेव्हां त्यांची स्तुति या प्रसंगीं करणें हें उचित आहे.

---

इंग्रज सरकारचें पायदळ, घोडेस्वार व तोफखाना मिळून दिल्ली पुढें तेरा हजार लोक हातयार बंद जमले आहेत व आणखी दररोज कांहीं कांहीं भरती होतच आहे. असें फ्रेंड आफ इन्डिया ता० ३० ज्युलईचे पत्र पाहून कळत आहे.

औरंगाबादेस निज्यामाचे स्वारांपैकीं ६ फौजमाहारानें बंड करण्यास मदत केली सबब त्या अपराधाची चौकशी कोर्टमार्शलांत होऊन त्यास देहांत शिक्षा ठरविली. मुं० ग्या०

---

मेहेरबान हेनरी रिवस साहेब दक्षण भागचे रिविन्यू कमिशनर यांस मुंबईचे गवरनर इन कौन्सलांत कौन्सलरची जागा मिळणार हें शिरस्त्यावरून पाहतां ठरल्यासारखेंच आहे; कारण नामदार लमसडन साहेब कौन्सलर यांची स्वारी विलायतेस जाणार आहे, आणि रिवस साहेब कौन्सलचे प्रोविज्यनल मेंबर पूर्वींच नेमले आहेत, तेव्हां यांचाच कौन्सलर होण्याचा नंबर आहे. नामदार लमसडन साहेब यांची नौकरी या देशांत चहुत वर्षें झाली आहे. साहेब लोकांच्या लाहान हुद्यांपासून ते या मोठ्या हुद्याच्या जाग्यापावेतों स्वपराक्रमानें येऊन पोंचले, ह्या साहेबांचा न्यायखात्यांतनतर न्याय करण्याविषयींचा लौकिक बहुत आहे. त्यांणीं आपल्या हिंदू लोकांच्या फौजदारीव दिवाणी मुकदम्यांचे इनसाफ बराबर व आश्चर्य करण्यासारखे केले आहेत. मुंबई गवरनर इन् कौन्सलचे सक्रेटरी होते तेव्हां त्यांणीं आपलें काम इतक्या चांगल्या रितीनें व निःपक्षपातानें केलें कीं त्याबद्दल कोणीही त्यांस बाह्यात्कारें किंवा अंतर्गत दूषण देत नाहीं. सदरहू साहेब नेटीव लोकां विषयीं उल्हासी व दयाळू होते असें बहुतांमुखीं ऐकिलें आहे. हिंदूलोक ज्ञानी व्हावे या विषयीं त्यांची इच्छा फार होती, स्त्रीशिक्षणा विषयीं व दुसऱ्या हिंदूलोकांच्या सुधारणुकीच्या कामा विषयीं ते आपल्या खासगी कामाप्रमाणें आश्रय व लक्ष देणारे होते. असे या देशास योग्य व भूषणाप्रमाणें नामदार लमसडन साहेब यांची स्वारी स्वदेशास जाते हें या आपल्या लोकांचें दुर्भाग्य होय; परंतु देशसंबंधानें व मनुष्यसंबंधानें पाहतां त्यांणीं आपल्या आयुष्याचा मुख्य अंश तो आमच्या देशाच्या स्वस्थ्येकडे लक्षपूर्वक व सक्त श्रम करून घालविला आहे त्यापेक्षां यापुढील अवशिष्ट आयुष्याचें क्रमण त्यांच्या जन्मभूमीचे ठायीं आप्तजन इष्टजन यांत व्हावें यास्तव गमन करितात, तेव्हां आपण या गोष्टीचा संतोष मानला पाहिजे. आह्मी हें त्यांस आमच्या पुर्ण्या माहितीवरून त्यांचें खरोखर वर्णन या देशांत मागें राहण्याकरितां केलें आहे. आतां आमची इच्छा हीच आहे कीं नामदार लमसडन साहेब यांस त्यांच्या जन्मभूमीचे ठायीं सुखरूप पोंचून त्यांचें त्यांच्या आप्तमित्र मंडळींत वास दीर्घकालपर्यंत होऊन उभयतांस सुख व आनंद होई असें सर्वसाक्षी परमेश्वर यांणें करावें.

आतां मेहेरबान रिवस साहेब यांचा लौकिक मोठा आहे. यांणींही अशीच योग्यता संपादन केली आहे. हेही अशा प्रकारेंच या पदवीस आले आहेत. यांची रिविन्यू कमिशनरचे जागेवर नेमणूक झाल्यापासून आजवेरीतें मोठें काम योग्यरितीनें चालविलें आहे. हेही दयाशील ख्रिस्ती मतानुयायी आहेत. या देशांतील ज्ञानशून्य लोकांस अज्ञान तमांतून काढून ज्ञानप्रकाश त्यांजवर व्हावा ही बहुत इच्छा त्यांचे ठायीं आहे. असो, आपणा सर्वांस मोठी आशा आहे कीं रिवस साहेब यांस आपल्या विषयीं या मोठे जागेवर गेले आहेत तरी विसर पडणार नाहीं. आपली सर्व स्थिति त्यांस चांगली माहित आहे. आपलीं सुखदुःखें व त्यांची कारणी व परिहार करण्याचे मार्ग त्यांस ठाऊक आहेत त्यापेक्षां आपण अशा पुरुषास हें स्थान प्राप्त झालें म्हणून संतोष मानला पाहिजे. व त्यांचा त्या स्थानावर बहुकाल क्रमण होण्याची इच्छा केली पाहिजे. आणि त्यांजपासून आपली स्थिती नीट होईल ही आशाही केली पाहिजे.

## खालीं लिहिलेला मजकूर जगन्मित्रांतून घेतला आहे.

## रत्नागिरी.

तारीख ३१ ज्युलई रोजीं कोल्हापूर एथें दंगा झाल्या बाबतचा मजकूर बोधामृतावरून आह्मी कोल्हापूर सदराखालीं लिहिला आहे, त्यावरून तेथील प्रकार वाचणारांचे ध्यानांत येईलच, त्या लाहानशा दंग्याचे बातमीवरून तेथील बंडवाल्यांतून पळालेले लोक इकडे येतील या करितां येथील लोक भयाभीत झाले होते, आणि साहेब लोकांनीं आपलीं बायकामुलें आगबोटींतून मुंबईस पाठवून दिलीं; परंतु एथें भीतीचें कारण कांहींच घडलें नाहीं व पुढेंही भीती बाळगावयास नको. कोल्हापुराहून जे सुमारें ९० पर्यंत लोक कोंकणांत उतरले ते मालवणाकडे गेले आहेत. आमचे ऐकण्यांत आलें आहे कीं, ते कोणास लुटीत वगैरे नाहींत, त्यांपैकीं दोन असामी सांवतवाडी एथें धरले आहेत. बाकींच्याही लोकांस इंग्रज सरकार लौकरच धरील. सदरहू लोक धरणारास बक्षीस ठरविलेलें आहे, त्याचा प्रकार खालीं लिहिलेल्या माजिस्त्रेट साहेबाचे जाहिरनाम्यावरून सर्वांचे उघड समजण्यांत येईल. आतां दंग्याचा प्रकार कांहीं एकूण राहिला नाहीं, सबब लोकांनीं स्वस्थ असावें. मुंबईहून जे सोजीर लोक कोल्हापुरास जाण्याकरितां वापोटण एथें उतरले, त्यांतून कांहीं रत्नागिरी एथें आले आहेत; व आणखीही कांहीं सोजीर लोक मुंबईहून एक दोन रोजांत एथें येऊन पोंचतील. आमचे माजिस्त्रेट साहेब व पोलिस सु॰ साहेब यांणीं पोलिसच्या लोकांकडून जागजागीं चांगला बंदोबस्त ठेविला आहे. व शिवाय आणखी पुष्कळ ठिकाणीं पाहारे वगैरे ठेवण्याकरितां गांववाल्यांतून जे हुशार बंदुक मारणारे मिळतील त्यास चाकरीस ठेवीत आहेत. तेव्हां अधिक बंदोबस्त चांगला राहील यांत संशय नाहीं. या सर्व बंदोबस्तावरून व दंग्याचा प्रकार कांहीं दिसत नाहीं यावरून सर्व लोकांनीं निरधास्त राहवें. ज्या आगबोटींतून सोजीर लोक वापोटण एथें उतरले तीच आगबोट एथें येऊन तींतून येथील तिजोरींतील शिलक (दीड लाख) व युरोपियन स्त्रिया व मुलें मुंबईस गेलीं— मि॰ पिन्ही साहेब (आमचे समजण्यांत आलें आहे कीं,) आजारी असल्यामुळें त्याच आगबोटींतून मुंबईस गेले, त्यांजबरोबर मि॰ किंग साहेब हे गेले आहेत. हल्लीं अदालतीकडील कामाचा चार्ज कलेक्टर साहेबांचे स्वाधीन आहे. मि॰ पिन्ही साहेब आगबोटींतून एक दोन रोजांत एथें येतील. मा॰ साहेबांचे जाहीरनाम्याचा सारांश.

सरकारी पलटणीपैकीं बदललेले लोकांस हात्यारासुद्धां कोणी पकडील तर त्यास ५० रुपये व हात्याराशिवाय पकडल्यास ३० रुपये दर एक असामीबद्दल सरकारांतून इनाम मिळेल. असा स॰ ग्या॰ न जाहिरनामा आहे, त्याप्रमाणें कोणी धरील त्यास बक्षीस मिळेल; व कोल्हापूर येथील २७ वि पलटणचे कांहीं लोक बदलले आहेत त्यांपैकीं ५० असामी हात्यारबंद मालवण तालुक्यांत आले आहेत त्यांस जे कोणी पकडतील त्यांस दर एक असामीबद्दल सदरीं लिहिल्या अन्वयें पन्नास किंवा तीस रुपये इनाम मिळतील.

जगन्मित्र.

११ आठवे कलमांतील ठरावा अन्वयें परवाने द्यावयाचे ते जरूर वाटतील तसे शर्तीमि-शीं द्यावे. आणि ते देण्याचा अधिकार असणारा मनुष्य, किंवा मनुष्यें ते परवाने रद्द करण्यास, किंवा तहकूब करण्यास मुखत्यार आहेत.

१२ गवरनर जनरल इन्कौन्सिलाचे किंवा राज्यकारभार चालविणारे सरकारचे परवान्यांवांचून इस्ट इंडिया कंपनी सरकारचे कबजांतील, व ताब्यांतील मुलुकाचे कोणते ही भागांत हत्यारें, किंवा युद्धसामग्री, आणि गंधक, किंवा सूर्याखार जलमार्गानें, किंवा खुष्कीने आणूं नये.

१३ कोणी मनुष्य सदरहू प्रकारचे परवान्यांवांचून कोणतीही हत्यारें, किंवा युद्धसामग्री, किंवा गंधक, किंवा सूर्याखार जलमार्गानें, किंवा खुष्कीनें सदरहू मुलुकाचे कोणतेही भागांत आणील, किंवा आणण्यास यत्न करील; अथवा सदरहू प्रमाणें आणण्यास, किंवा आणण्याचे यत्नास मदत करील; किंवा साह्य करील; अथवा सदरहू प्रकारचे परवान्यांवांचून आणलेलीं हत्यारें, किंवा युद्धसामग्री, किंवा गंधक, किंवा सूर्याखार जाणूनबुजून लपवील, किंवा लपविण्यास मदत करील तर, त्यावर माजिस्त्रेटासमक्ष गुन्ह्याची शाबिती झाली असतां तो फारकाश दोन वर्षेपर्यंत सक्तमजुरीनिशीं, किंवा सक्तमजुरीवांचून कैदेचे शिक्षेस पात्र होईल. आणि सदरहू प्रमाणें आणलेल्या जिनसा सरकार दाखल कराव्या असा ठराव गुन्हा ठरविणारा माजिस्त्रेट करील तर त्या सरकार दाखल होतील.

१४ खानगी उपयोगाकरितां हत्यारें व युद्धसामग्री वाजवी रीतीनें जितकी लागावयाची तितकी या देशांत आणली असतां तिला सदरील शेवटले दोनकलमांतील ठराव लागू आहेत असें समजूं नये. परंतु जकातीचे कलेक्टरास जरूर वाटेल तर सरकाराचा हुकूम त्यास पोंहचे तोंपर्यंत सदरहू प्रकारच्या कोणत्याही जिनसा कोणत्याही वेळीं अटकावून ठेवण्याचा अधिकार त्यास आहे. या आकटाअन्वयें हत्यारांविषयीं सूचना देणें अवश्य आहे ती देणें जरूर नाहीं असें या कलमांतील कोणतेही ठरावावरून होतें असें समजूं नये.

१५ खालीं लिहिल्या प्रमाणें हुकूम करण्याचा अधिकार गवरनरजनरल इन्कौन्सिल यांस आहे: म्हणजे हत्यारें, किंवा युद्धसामग्री किंवा लष्करीसामान, किंवा गंधक, किंवा सूर्याखार अथवा अमुक प्रकारचीं हत्यारें, किंवा युद्धसामग्री, किंवा लष्करीसामान हिंदुस्थानचे एके भागांतून दुसरे भागास पाठवूं नये, अथवा हुकुमांत लिहिलेले अमुक दिशेकडे पाठवूं नये; अथवा हुकुमांत नियम, व शर्ती लिहिल्या असतील त्यां खेरीज इतर रीतीनें पाठवूं नये अशी मनाई करण्याचा अधिकार गवरनरजनरल इन्कौन्सिलास आहे. आणि कोणतेही प्रेसिडेन्सीचे किंवा जागेचे राज्यकारभार चालविणारे सरकारासही आपले ताब्यांतील मुलुकांत सदरहू प्रमाणें अधिकार आहे.

१६ कोणी मनुष्य सदरहू प्रकारचे हुकुमाविरुद्ध किंवा त्यांत लिहिलेले नियमाविरुद्ध,

व शर्तीविरुद्ध कोणतींही हत्यारें, किंवा युद्धसामग्री, किंवा लष्करी सामान, किंवा गंधक, किंवा सूर्यारवार पाठवील, किंवा दुसऱ्यापासून पाठवील किंवा पाठविण्यास यत्न करील, किंवा दुसऱ्याकडून पाठविण्यास यत्न करील, किंवा पाठविण्याचे कामांत यत्न करील, तर त्यावर माजिस्त्रेटासमक्ष गुन्ह्याची शाबिदी झाली असतां तो पांचशें रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल; आणि ज्या जिनसा पाठविल्या असतील, किंवा पाठविण्याचा यत्न केला असेल त्या जिनसा सरकार दाखल होतील. कोणी मनुष्य सदर्हू प्रकारचीं हत्यारें, किंवा युद्धसामग्री, किंवा लष्करी सामान, किंवा गंधक, किंवा सूर्यारवार घेऊन, किंवा इतर युक्तीनें पाठवील, किंवा दुसऱ्याकडून पाठवील, किंवा पाठविण्यास यत्न करील, किंवा दुसऱ्याकडून पाठविण्यास यत्न करील त्यावर गुन्ह्याची शाबिती झाली असतां त्यास या कलमांत सांगितलेली शिक्षा होईल त्याखेरीज, तो फारकाष्ठा दोन वर्षें पर्यंत सक्त मजुरीनिशीं, किंवा मजुरीशिवाय कैदेचे शिक्षेस पात्र होईल.

१७ सार्वजनिक स्वस्थतेस भयावह होईल असे कोणतेही कायद्याविरुद्ध कामाकरितां उपयोग करण्याचे इरादानें, किंवा उपयोगीं पडण्याचे इरादानें हत्यारें, किंवा युद्धसामग्री, किंवा लष्करी सामान, किंवा गंधक, किंवा सूर्यारवार नेत आहे असा संशय येण्यास वाजवी सबब उत्पन्न होईल असे वर्तनें, किंवा रीतीनें हत्यारें वगैरे कोणी मनुष्य नेताना सांपडेल तर, त्या मनुष्यांस धरून त्याचा कायद्याअन्वयें इनसाफ होण्यासाठीं कैदेंत अटकावून ठेवण्याचा अधिकार या आक्टाचे ५वे कलमांत सांगितलेले सरकारी अंमलदारांस, किंवा इतर कोणी मनुष्यास आहे. माजिस्त्रेट, किंवा डेप्युटी माजिस्त्रेट, किंवा माजिस्त्रेटाचा असिस्टंट, किंवा पोलिस अंमलदार नसणारे कोणी मनुष्यानें कोणतेही मनुष्यास धरल्यानंतर, त्याणें त्यास बनू शकेल तितके लवकर पोलीस अंमलदाराचे स्वाधीन करावा. या आक्टाचे ठरावाअन्वयें पोलीस अंमलदारानें धरलेलीं, किंवा त्याचे स्वाधीन केलेलीं सर्व मनुष्यें माजिस्त्रेटासमक्ष, अथवा सदर्हू प्रकारचे सर्व गुन्ह्यांबद्दल शिक्षा करण्याचा अधिकार, किंवा इनसाफ सोंपण्याचा अधिकार कायद्याअन्वयें ज्या अंमलदारास असेल त्यांसमक्ष न्यावीं.

१८ गवरनर जनरल इन् कौन्सिलास, किंवा राज्यकारभार चालविणारे सरकारास जरूर वाटेल तेव्हां गंधक विकण्याचे मनाची विषयीं हुकूम त्याणीं करावा. आणि कोणी मनुष्य सदर्हू प्रकारचे हुकुमाविरुद्ध गंधक विकील त्यावर माजिस्त्रेटासमक्ष गुन्ह्याची शाबिती झाली असतां तो पांचशें रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल; आणि त्या मनुष्याचा गंधक सरकार दाखल करावा असा ठराव जेव्हां ठरविणारा माजिस्त्रेट करील तर, त्याचा सर्व गंधक सरकार दाखल होईल.

१९ कोणी मनुष्याचे कबजांत गंधक असेल तो कोणतेही वेळीं जप्त करून सार्वजनिक स्वस्थतेसाठीं आपणास जरूर वाटेल तितके मुदतपर्यंत अटकावून ठेव-ण्याचा अधिकार गवरनर जनरल इन् कौन्सिलास, किंवा राज्य कारभार चालविणारे सरकार

२ औषधासाठी जितका गंधक वाजवी रीतीनें अवश्य असेल तितका ठेवला अ-किंवा विकला असतां त्यास सदरील दोहों कलमांतील ठराव लागू आहेत असें समजावें.

१ आपणास शर्ती जरूर वाटल्यास त्या शर्ती अन्वयें १८वे, व १९वे कलमांतील ठराव अमुक मनुष्यास लागू नाहींत असें ठरविण्याचा अधिकार सरकारास आहे.

२२ खानगी उपयोगासाठीं जितकी युद्धसामग्री, किंवा इतर लष्करी सामान, किंवा गंधक वाजवी रीतीनें अवश्य वाटत असेल तीहून अधिक युद्धसामग्री, किंवा इतर लष्करी सामान, किंवा गंधक कोणी मनुष्याचे कबजांत असेल त्यानें त्याविषयीं सूचना माजिस्त्रेटास, किंवा सरकारानें ठरविलेले इतर अंमलदारांस द्यावी. असा हुकूम करण्यास सरकार मुखत्यार आहे. आणि कोणी मनुष्य सदर्हू प्रकारची सूचना देण्यास बुध्यां हयगय करील तर त्यावर माजिस्त्रेटा समक्ष गुन्ह्याची शाबिदी झाली असतां तो फार तर दोन वर्षेपर्यंत, सक्त मजुरीनिशीं, किंवा सक्त मजुरी वांचून कैदेचे शिक्षेस पात्र होईल, आणि पांच हजार रुपयेपर्यंत दंडासही पात्र होईल. आणि सदर्हू प्रकारचे मनुष्याचे कबजांत, किंवा त्याचे जागेंत युद्धसामग्री, किंवा लष्करी सामान, किंवा गंधक असेल तो सरकार दाखल होईल.

२३ सरकार दाखल करण्यास पात्र असणारीं हत्यारें, किंवा युद्धसामग्री किंवा, गंधक अमुक घरांत, किंवा इमारतींत, किंवा इतर जागेंत आहेत; अथवा अमुक हत्यारें, किंवा युद्धसामग्री, किंवा गंधक अमुक घरांत, किंवा इमारतींत, किंवा इतर जागेंत अमुक मनुष्याच्या कबज्यांत आहेत; आणि तीं त्याचे कबजांत ठेविलीं असतां सार्वजनिक स्वस्थतेस धोका पोंहचेल असा संशय कोणतेही माजिस्त्रेटास येण्यास वाजवी सबब असेल तर, सदर्हू प्रकारचे घरांत आपणास जरूर वाटेल तितकी मदत घेऊन रात्रीस, किंवा दिवसास, आणि जरूर असल्यास जबरीनें शिरून झाडा घेण्याचा, किंवा घेविवण्याचा अधिकार त्यास आहे. या कलमावरून आपणास मिळालेले अधिकार आपले युरोपियन असिस्टंटांपैकीं कोणतेही असिस्टंटास देण्यास माजिस्त्रेट मुखत्यार आहे.

२४ अमुक अंमलदारांनीं, किंवा मनुष्यांनीं अमुक प्रांतांत, किंवा जागेंत हत्यारांविषयीं, किंवा युद्धसामग्री विषयीं, किंवा गंधका विषयीं झाडा घ्यावा असा हुकूम करण्याचा अधिकार इंडियाचे गवरनर जनरल इन्कौन्सिलास, किंवा कोणते ही प्रेसिडेन्सिचे, किंवा जागेचे राज्य कारभार चालविणारे सरकारास, किंवा पंजाबचे, किंवा आयोध्येचे चीफ कमिशनरास, किंवा नागपूरचे, किंवा सिंधचे कमिशनरास आहे. सदर्हू प्रकारचे हुकुमावरून अखत्यार दिलेले मनुष्यांस, आणि त्यांचे हुकुमा अन्वयें चालणारे सर्व मनुष्यांस खालीं लिहिल्या प्रमाणें अधिकार आहेत: म्हणजे घरांत शिरण्याविषयीं, व झाडा घेण्या विषयीं; व जप्ती कर-

ज्या विषयीं, सदरील शेवटले कलमांत जे अधिकार दिले तले आहेत ते आ- हेत.

२५ झाडा घेत असतां कोणतेही हत्यार, किंवा युद्धसामग्री, किंवा गंधक झाडा घे- णाऱ्याजवळ हजर करण्यास, किंवा दाखवून देण्यास कोणी मनुष्य नाहीं म्हणेल, लपवील, किंवा लपविण्यास यत्न करील तर, त्या मनुष्यास वारंटावांचून धरावें, आ- णि मालिस्त्रेटासमक्ष गुन्ह्याची शाबिती झाली असतां, या आक्टाअन्वयें ज्या इतर शिक्षेस तो पात्र असेल त्या शिक्षेखेरीज आणखी तो पराकाष्ठा दोन वर्षेंपर्यंत सक्तमजुरीनिशीं, किंवा सक्त- मजुरीवांचून कैदेचे शिक्षेस पात्र होईल.

२६ या कलमांतील ठराव कोणतेही प्रांतास, किंवा जागेस सरकारचे हुकुमाव- रून लागू होतील त्या हुकुमांत लिहिलेले वेळे नंतर, किंवा वेळ लिहिली नसल्यास प्रांतांत, किंवा जागेंत सदरहू प्रकारचा हुकूम प्रसिद्ध झाल्यापासून एक आठवड्या नंतर कोणी मनु- ष्यानें इंडियाचे गवरनर जनरल इन् कौन्सिल यांपासून, किंवा कोणतेही प्रेसिडेन्सीचे, किंवा जागेचे राज्यकारभार चालविणारे सरकारापासून परवाना घेतल्यावांचून तोफ, किंवा हविटझर, किंवा गरनाळ करूं नये, किंवा तिचा उपयोग करूं नये, किंवा ती आ- पले कबजांत ठेवूं नये. सदरहू प्रकारचे परवान्यावांचून कोणी मनुष्य कोणतीही तोफ, किंवा हविटझर, किंवा गरनाळ करील, किंवा तिचा उपयोग करील, किंवा ती आपले क- बजांत ठेवील तर त्यावर माजिस्त्रेटासमक्ष गुन्ह्याची शाबिदी झाली असतां तो दोन ह- जार रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल. आणि पराकाष्ठा दोन वर्षेंपर्यंत कैदेचे शिक्षेस पा- त्र होईल आणि सदरहू प्रकारची तोफ, किंवा हविटझर, किंवा गरनाळ धरून सरकार दा- खल करितील. कोणतेही प्रांतांत, किंवा जागेंत हें कलम चालू होईल त्या वेळीं कोणी मनु- ष्याचे कबजांत कोणतीही तोफ, किंवा हाविटझर, किंवा गरनाळ असेल, आणि ती आप- ले कबजांत ठेवण्याविषयीं परवाना मागण्याची त्या मनुष्याची मर्जी नसेल तर, सदरहू मु- दतींत त्याणें ती माजिस्त्रेटाचे स्वाधीन करावी. कोणतेही तारवावरचे, किंवा गलबतावरचे नेहमीचे हत्यारांपैकीं कोणतीही तोफ, किंवा हविटझर, किंवा गरनाळ असेल तीस या क- लमांतील ठराव लागू आहेत असें समजूं नये.

२७ कोणी मनुष्य या आक्टाअन्वयें आपणास मिळालेले अधिकार चालवीत अ- सतां त्याशीं कोणी दांडगाई करील, अथवा त्याशीं दांडगाई करणारे, किंवा त्यास हरकत करणारे मनुष्यास मदत, किंवा साह्य करील तर त्यावर माजिस्त्रेटासमक्ष गुन्ह्याची शाबिदी झाली असतां तो दोनशें रुपयेपर्यंत दंडास, किंवा पराकाष्ठा साहा म्यालेंडर महिनेपर्यंत सक्तमजुरीनिशीं, किंवा सक्तमजुरीवांचून कैदेचे शिक्षेस पात्र होईल.

ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें.

योग्य असे आगरवीं दोनतीन साहेबलोक आमचे दृष्टीपुढें आहेत.

नामदार गिब्स साहेब यांची स्वारी गेल्या शुक्रवारीं येथून मुंबईस कौन्सलरचे कामावर रुजू होण्याकरितां गेली.

सोलापुराहून पांच मडमा एथें येऊन सुखरूप पोंचल्या आणि पंधरा मडमा लौकरांत सुखरूप येऊन पोंचाव्या असें आहे. त्यांच्या सोई ब्रिगेडियर हेल साहेब करीत आहेत. आवश्यर०

# नेमणुका.

हनराबल जे. सी. लमसडन यास हनराबल कंपनीची नोकरी सोडण्याची परवानगी मिळाली आहे.

मिस्तर नीव, खानदेशचे फस्ट असिस्टन्ट कलेक्टर यांचे हुकुमती खालीं मालेगांव, भडगांव, आणि चाळीसगांव असे तालुके दिले.

रावबाहादूर नारो विठ्ठल खानदेशडिस्ट्रिक्ट डिपुटी कलेक्टर यांचे ताब्यांत धुळें, बागलान, आणि पिंपळनेर हे तालुके दिले.

मिस्तर माट यास पुण्याचे कलेक्टराचे हाताखालीं अभ्यास होण्याकरितां दिले.

मिस्तर डेविस भडोचचा कलेक्टर यास ~~तीन महि[illegible]ची [illegible]दिली आहे~~

सिकारपूर येथील डिपुटी सु० कलेक्टर कप्तान हिवेट यास परत काळे पायदळ ११ वे पलटणीस जाण्याचा हुकूम झाला आहे.

लिफटनेन्ट स्टान लेस्काट सेकन्ड गोरी पलटण यास खानदेशांत रेविन्यू सरवे खात्याचा असिस्टन्ट सुप्रिन्टेन्डेन्ट नेमिला आहे.

मिस्तर एफ. डिसोजा. यास पैनाषखात्यांत सब असिस्टन्ट सुप्रिन्टेन्डेन्स गुजराथेंत नेमिलें आहे.

दक्षिण महाराष्ट्र घोडे स्वाराचा कम्यान्डन्ट डी. ब्याटी. यास विलायतेस जाण्याची तयारी करण्याकरितां १४ दिवसांची रजा मिळाली आहे.

ठाण्याचा आ० आ० पोलिसचा सुप्रिन्टेन्डेन्ट मिस्तर लीक यास १४ दिवसांची रजा मिळाली आहे.

हैदराबाद आणि शिकारपूर एथे पोलिसचे आइज्युटेन्ट गिलेसपे व गारडिनी यास नेमून पहिल्यानें तारीख २१ ज्यून व दुसऱ्यानें तारीख १७ ज्युलईस आपलीं कामें घेतलीं.

सन १८५१ चा आक्ट ४ कलम ४ वर हुकूम मिस्तर वार्डन सोलापुरचा सेकन्ड असिस्टन्ट माजिस्ट्रेट यास माजिस्ट्रेटचा अधिकार मिळाला आहे.

---

लाहोर येथील ज्युडिशियल कमिशनर यांचे आफिसांतून बातम्या आल्या येणेप्रमाणे.

तारीख २३ ज्युलई रोजीं दिल्ली शाहेर बंडवाले यांणीं येऊन बराबर तोफा ही होत्या, ते आह्मावर चालून आले व शहराचे तटावरू[illegible] परंतु ब्रिगेडियर ग्रावस साहबानें गर्दी उडविली आणि ते पळत सुटले तेव्हां त्यांणीं आपल्या तोफांनें मात्र संरक्षण केलें, आह्मांकडील नाश फारसा झाला नाहीं. आमच्याकडील थोडे आफिसर जखमी झाले, सातवे [illegible] फलपलटणीचे करनल द्राफ

ट साहेब ३९ काळे पायदळ पलटणीचे करनल सिडण तोफखान्यावरील मेजर टरनर आणि क्यापटन मनी व १० वे काळे पायदळ पलटणीचे लेफटनेन्ट ल साहेब मारले गेले·

तारीख २९ रोजीं दिल्लीचे बंडवाले अगदीं स्वस्थ होते· त्यांच्यांत अशी बातमी होती कीं टंक येथून कांहीं लोक येऊन त्यांस मिळणार आहेत· दिल्ली जवळ पुष्कळ पाऊस पडला· इंग्रजांनी दिल्ली जवळ छावणी पासून बातमी आल्यावरून खास कळतें कीं, सरपात्रिक ग्रांट साहेब हे कानपुरास गोरी फौज घेऊन आले आहेत· गोरी ३९ वी, ३७ वी, ६४ वी, ७८ वी, (पांगरी) आणि मद्रास फ्युजिलर, ह्या त्यांस मिळणार आहेत· आणखी दुसरी पलटण त्रिहिली आहे; परंतु बहुधा फिरोजपूर येथील सीक पलटण असावी— मुलतान एथें ६९ वे काळे पायदळ पलटणीचे सुभेदार मेजर नहूर खान यांजवर बंडाचा जमाव करण्याचा गुन्हा कोर्टमार्शलांत ठरून त्यास तोफेच्या तोंडीं दिलें, त्यावेळेस स्वार उभे केले होते· या पलटणी पैकी कांहीं लोकांवर अपराधाची चौकशी होणार आहे· या कामांत मेजर च्यांबरलेन साहेब यांची व त्यांस व दुसरे कांहीं अंमलदार विशेषें करून मीर बरकत अली दान हे मदत झाले सबब त्यांची तारीफ केली पाहिजे· १२१ लोक सिलकोट एथें बंड झालें त्यापैकी पकडून त्यांस मारून टाकिले·

तारीख २६ पर्यंत दिल्ली एथं स्वस्थता आहे· बंडवाले लोकांत बहुत बोलवा आहे कीं, त्यांणीं आमच्या लष्करावर मोठा हल्ला केला; परंतु अधिक कांहीं नाहीं· आग्र्याचे २२ वे तारखेचे पत्र दिल्लीचे छावणींत आल्यावरून कळतें कीं १२ वे तारखेस फत्तेपूर एथें नानासाहेब यांचे फौजेचा पराभव झाला, त्यांच्या सर्व तोफा घेतल्या, सात लक्ष रुपये घेतले· ज्यनरल हावलाक यांचे ताब्यांतील इंग्रजी फौज कूच दरकूच करीत आहे· स्वात येथील मौलवी याणें नरूसाई या खेड्यापाशीं येऊन तळ दिला आहे· तेथें २१ वे तारखेस त्याजवर हल्ला करून ५९ लोक ठार मारिले· व पुष्कळ जखमी केले· सदरहू मौलवी त्या लढाईत दिसेनासा झाला· उष्णता फार असल्यामुळें इंग्रजांचे स्वारांपैकीं ४० लोकांतून ९ मेले गेले·

तारीख २७ रोजीं दिल्लीस स्वस्थता आहे, पाऊस पुष्कळ पडला,— सीलकोट येथील बंडवाले व बुणगें यांपैकी गुलाबसिंग महाराजांनीं धरून सुमारें ५७२ पाठविले आहेत· गुजरात एथें तारीख २६ रोजीं तुरुंगांत दंगा झाला, कैदी लोक उठून आंतील सत्र्यांवर हल्ला केला; परंतु बाहेरच्या पाहारेकऱ्यांनीं सुमारें ५० कैदीस मारिलें व घायाळ केलें; आणि १८ कैदी रात्र काळोखी होती यामुळें पळाले·

सदरहू मजकूर पुणे आब्झरव्हर व बंबे ग्याझिट याधारें घेतला आहे·

लिफटनेन्ट कर्नेल· ली· ग्रांन्ट जेकब यास पोलिटिकल कमिशनर कोल्हापूर आणि सावंतवाडीचे नेमिलें आहे· असें बंबे ग्याझिट याधारें कळतें आहे·

---

हें ज्ञा० छा० कृष्णाजी त्रिंबक रानडे यांणीं छा० प्र० केलें·

## सन् १८५७ चा आक्ट २८ वा

इंडियाचे लेजिस्लेटिव्ह कौन्सिलानें ठरविला तो, गवरनर जनरल यांणीं सन् १८५७ चे सप्तेंबर महिन्याचे ११ वे तारखेस मंजूर केला:—

हत्यारें, व युद्धसामुग्री मुलुखांत आणण्याबाबद, व विकण्याबाबद, आणि तीं ठेवण्याचे, किंवा तिचा उपयोग करण्याचे हक्कासंबंधीं नियम करण्याबाबद आक्ट.

हत्यारें, व युद्धसामुग्री मुलुखांत आणण्याबाबद, व ती करण्याबाबद; आणि ती ठेवण्याचे, किंवा तिचा उपयोग करण्याचे हक्काबाबद नियम ठरविणें योग्य आहे; याकरितां खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविलें आहे:—

इंडियाचे गवरनर जनरल इन् कौन्सिल, किंवा कोणतेही प्रेसिडेन्सीचे किंवा जागेचे राज्यकारभार चालविणारें सरकारचे हुकुमावरून या कायद्यांतील ठराव ज्या प्रांतांत किंवा जागेस लागू केले असतील तेथील सर्व मनुष्यांना हुकुमांत लिहिलेले येवढ्यांत, किंवा वेळ लिहिला नसेल तर महिन्यांत, किंवा जागेंत हुकूम प्रसिद्ध झाल्यापासून पुढे आठवड्यांत खालीं लिहिलेल्या गोष्टीची लेखी सूचना माजिस्त्रेटास, किंवा राज्यकारभार चालविणारें सरकारानें नेमलेले इतर अंमलदारांस द्यावी: म्हणजे आपले कबजांत, किंवा आपले पदरचे मनुष्यांचे, किंवा चाकरांचे कबजांत अग्निशस्त्रें, किंवा संगीन, किंवा तरवार, किंवा भाला, किंवा भाल्याचें फळ, किंवा सदरहू हुकुमांत लिहिलेलें इतर मारक हत्यार असेल त्याविषयीं लेखी सूचना द्यावी. आणि सदरहू प्रकारचीं हत्यारें पुढें कोणतेही वेळीं आपले कबजांत येतील, किंवा सदरहू प्रकारचे आपले पदरचे मनुष्यांचे, किंवा चाकरांचे कबजांत येतील त्याविषयींही लेखी सूचना तात्काळ द्यावी. सदरहू प्रमाणें कबजांत असणारे हत्यारांची संख्या, व वर्णन सूचनेंत लिहावें; आणि पदरचे मनुष्यांचे, किंवा चाकरांचे कबजांत हत्यारें असतील त्या प्रसंगीं त्या पदरचे मनुष्यांचीं, किंवा चाकरांचीं नावें, व ते कोणकोणत्या कामावर ठेवले आहेत तीं कामेंही त्या सूचनेंत लिहावीं.

२ सदरहू प्रकारची सूचना देण्यास कोणी मनुष्य बुद्ध्या हयगय करील त्यावर माजिस्त्रेटासमक्ष गुन्ह्याची शाबिती झाली असतां तो पांचशें रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल; आणि सदरहू प्रकारचे मनुष्याचे कबजांत हत्यारें असतील तीं सर्व धरावीं; आणि गुन्हा ठरविणारा माजिस्त्रेट हुकूम करील तर तीं सर्व सरकार दाखल करावीं. आणि हत्यारांविषयीं सूचना देण्यास त्याणें सदरहू प्रमाणें हयगय केली असेल तीं हत्यारें त्याचे खानगी कामास वाजवी रीतीनें जितकीं अवश्य असावीं त्यापेक्षां अधिक आहेत असें वाटेल

[illegible] मनुष्य [illegible] दोन वर्षेपर्यंत सक्तमजुरीनिशीं, किंवा सक्तमजुरी शिवाय कैदेचे

[illegible], आणि पांच हजार रुपयेपर्यंत दंडासही पात्र होईल; आणि सदरहू

प्रकारचें मनुष्याचे कबज्यांत, किंवा त्याचे जागेंत हत्यार, किंवा कोणतीही युद्धसामग्री किंवा लष्करी सामान सांपडेल तें सरकारदाखल करावें.

३ हत्यारें कबजांत असणारे मनुष्याचे नावाची, आणि सदर्हू प्रकारचे हत्याराच संख्येची, व वर्णनाची याद माजिस्त्रेटानें सदर्हू प्रकारचे सूचनेवरून तयार करावी; आणि सदर्हू प्रकारची सूचना देणारे मनुष्यानें सूचनेचे तारखेस, किंवा, वर्तीत लिहिलेले हत्यारांचे संख्येचा, व वर्णनाचा दाखला मागितला असतां तो [illegible]

४ सदर्हू प्रकारचीं हत्यारें, किंवा युद्धसामग्री अमुक मनुष्याचे कबजांत राहिली असतां सार्वजनिक स्वस्थतेस भयावह होईल असें सरकारचे किंवा माजिस्त्रेटाचे नजरेस येईल तर तीं हत्यारें, किंवा युद्धसामग्री धरून जरूर वाटेल तितके वेळपर्यंत बंदोबस्तांत ठेवण्याचा अधिकार माजिस्त्रेटास आहे.

५ इंडियाचे गवरनर जनरल इन् कौन्सिल यांचे हुकुमावरून, अथवा कोणतेही प्रेसिडेन्सीचे किंवा जागेचे राज्यकारभार चालविणारे सरकारचे हुकुमावरून या कलमांतील ठराव ज्या प्रांतास, किंवा जागेस लागू करतील त्या प्रांतांत, किंवा जागेत सदर्हू प्रकारचें कोणतेंही हत्यार बांधून कोणी मनुष्य फिरेल, आणि हत्यार बांधून फिरण्याविषयीं आपणास परवाना मिळाला आहे, किंवा सदर्हू ठराव आपणांस लागू ना[illegible]नें ठरविलें आहे असा माजिस्त्रेटाकडील दाखला, किंवा सदर्हू प्रकारचा परवाना देण्याचा अधिकार सरकारानें ज्या इतर अंमलदारांस दिला असल त्यांकडील दाखला हजर न करील किंवा सदर्हू ठराव आपणांस इतर कारणांमुळें लागू नाहींत असें बाजवी प्रमाण न दाखवील, आणि हत्यारें बांधून त्यास फिरूं दिल्यानें सार्वजनिक स्वस्थतेस भयावह आहे असें खालीं लिहिलेले कोणतेही अधिकाऱ्यास वाटेल तर, त्या मनुष्यापासून हत्यारें घेण्याचा अखत्यार त्या अधिकाऱ्यांस आहे. ते अधिकारी बितपशील :— माजिस्त्रेट, किंवा डिपुटी माजिस्त्रेट, किंवा माजिस्त्रेटाचा असिस्टंट, किंवा राणीचे, किंवा इस्ट इंडिया कंपनीचे चाकरांतील कोणताही युरोपियन सनदी अंमलदार, किंवा सरकारचे हुकुमावरून केलेले "व्हालंटीयर कोर" या प्रकारचे पलटणींतील कोणी मनुष्य कामगिरीवर असेल तो; किंवा कोणताही पोलीस अंमलदार. परंतु असें ठरविलें आहे कीं कोणी मनुष्य ज्या प्रांतात, किंवा जागेत राहात असेल, किंवा असल त्या प्रांतातील, किंवा जागेतील माजिस्त्रेटाने त्या मनुष्याचे खानगी उपयोगासाठीं बाजवी रीतीनें अमुक हत्यारें अवश्य असावीं तीं हत्यारें प्रवासास जातानां बरोबर नेण्याचा त्या माजिस्त्रेटाकडील परवाना त्या मनुष्याजवळ असेल आणि परवानेवाल्याचें नाव, व पत्ता, आणि ज्या मार्गानें त्याचा जाण्याचा इरादा असेल तो मार्ग, व प्रवास [illegible] किती मुदत लागेल कोण कोणतीं हत्यारें नेण्याची परवानगी मिळाली असेल तीं हत्यारें

नक्कल सदर्हू माजिस्त्रेटाकडून घेईल तर, त्यांत लिहिलेले सर्व मातांतील, किंवा जाण्यांतील माजिस्त्रेटानीं हत्यारें बांधून जाण्याविषयीं परवानगी दिली असेली तर ती ज्या प्रमाणें चालती त्याप्रमाणें सदर्हू दाखला चालेल असें समजावें.

६ वरील ठराव खालीं लिहिलेल्यांस लागू नाहींत असें समजावें:--

१ राणीचे किंवा इस्टइंडिया कंपनीचे अम्मलदारी, किंवा आरमारी चाकरींतील अंमलदार, व शिपायी, व खलाशी लोक सरकारी चाकरीसाठीं हत्यारें, व युद्धसामग्री त्यांणीं बाळगिली असेल ती विषयीं.

२ व्हालेंटियर कोर या प्रकारचे पलटणींतील मनुष्यांस:--सदर्हू प्रकारचे हत्यारांविषयीं, व युद्धसामग्रीविषयीं मात्र.

३ पोलीस अंमलदारांस, व मुलकी अंमलदारांस, व इतर मनुष्यांस सरकारचे चाकरीसाठीं सरकारानें हत्यारें, व युद्धसामग्री दिली असेल तीविषयीं किंवा सरकारचे हुकुमानें सरकारचे चाकरीसाठीं त्यांणीं आपण स्वतः हत्यारें, व युद्धसामग्री घेतली असेल ती विषयीं.

४ सदर्हू प्रकारचे ठराव अमुक मनुष्यांस लागू करूं नये असें सरकारास वाटेल त्या मनुष्यांस.

कोणतेही सारखाचीं, किंवा गलबतांचीं हत्यारें, व युद्धसामग्री या गलबतांचे रक्षणार्थ जितकी अवश्य असावी तिच्याहून जास्त नसल्यास तीसही सदर्हू ठराव लागू नाहींत असें समजावें.

७ या आक्टांत मागें सांगितलेले प्रकारचीं कोणतीही हत्यारें परवान्यावांचून, किंवा परवान्यांतील कोणतेही शर्ती विरुद्ध कोणी मनुष्य करील, किंवा नीट करील, किंवा विकील, किंवा ठेवील, किंवा विकण्यास मांडील अथवा तोफा, किंवा बंदुकीची दारू, किंवा इतर युद्धसामग्री करील, किंवा विकील, किंवा ठेवील, किंवा विकण्यास मांडील त्यावर माजिस्त्रेटसमक्ष गुन्ह्याची शाबिती झाली असतां त्याणें ज्या किंमतीस हत्यारें, किंवा युद्धसामग्री विकली असेल त्या किंमतीचे दुप्पट रकमे खेरीज आणखी पांचशें रुपये पर्यंत दंडास तो पात्र होईल आणि गुन्हेगाराचीं सर्व हत्यारें व युद्धसामग्री सरकार दाखल करावी असा ठराव गुन्हा ठरविणारा माजिस्त्रेट करील तर तीं हत्यारें व युद्धसामग्री सरकार दाखल होईल.

८ तोफा करण्याचे, किंवा त्यांचा व्यापार करण्याचे परवाने गव्हरनरजनरल इन कौन्सिल यांणीं, किंवा राज्य कारभार चालविणारे सरकारानें द्यावे; अथवा सदर्हू प्रकारचे परवाने देण्याचा अधिकार ज्या अंमलदारास गवरनरजनरल इन कौन्सिलानें, किंवा राज्यकारभार चालविणारे सरकारानें मुद्दाम दिला असेल त्या अंमलदारानेंही द्यावे. तोफांवांचून इतर हत्यारें, व युद्धसामग्री करण्याचे, किंवा तिचा व्यापार करण्याचे परवाने देण्याचा अधिकार माजिस्त्रेटास आहे. आणि सदर्हू प्रकारचे परवाने देण्याचा अ-

त्या ज्या अंमलदारास गवरनर जनरल इन् कौन्सिलानें, किंवा राज्यकारभार चालविणारे सरकारानें दिला असेल त्यास ही आहे.

९ हत्यारें, किंवा तोफा किंवा इतर युद्धसामग्री करण्याचा, किंवा तिचा व्यापार करण्याचा परवाना ज्या मनुष्यास मिळाला असेल त्याणें एक वही ठेऊन तींत व्यापाराचा माल जे वेळीं आपले कबजांत, किंवा ताब्यांत येईल त्याचा हिशेब दाखल करावा; आणि विकलेलीं हत्यारें, व युद्धसामग्री जो मनुष्य खरीद करील त्याचें नाव, व पत्ता, आणि प्रत्येक प्रकारचे हत्यारांचा, किंवा युद्धसामग्रीचा प्रकार, व वर्णन, व तीं किती होतीं हें त्यांत दाखल करावें. सदर्हू प्रकारची वही माजिस्त्रेटास, किंवा योग्य रीतीनें अधिकार दिलेले अंमलदारांस पाहाण्यासाठीं खुली ठेवावी. आणि तींत लिहिलेले सर्व मजकुराच्या नकला घेण्याचा अधिकार सदर्हू अंमलदारांस आहे. सदर्हू प्रकारचा कोणी मनुष्य सदर्हू प्रकारची वही योग्य रीतीनें ठेवणार नाहीं, किंवा ठेवण्यास चुकेल, किंवा या कलमाप्रमाणें तींत जो मजकूर दाखल करावयाचा तो तींत दाखल करणार नाहीं, किंवा दाखल करण्यास चुकेल, किंवा सदर्हू प्रकारची वही पाहाण्यास मना करील, अथवा हरकत करील, किंवा तींत खोटा मजकूर दाखल करील तर त्यावर माजिस्त्रेटासमक्ष गुन्ह्याची शाबिती झाली असतां तो खालीं लिहिलेले रकमेखेरीज आणिक पांचशें रुपये पर्यंत दंडास पात्र होईल. म्हणजे तीं हत्यारें किंवा युद्धसामग्री विकली असेल, आणि तीविषयीं मजकूर सदर्हू वहींत त्याणें दाखल केला नसेल, किंवा खोटा दाखल केला असेल त्या हत्यारांचे, किंवा युद्धसामग्रीचे किंमतीचे दुप्पट रकमे खेरीज, आणखी पांचशें रुपये पर्यंत दंडास पात्र होईल; आणि त्या गुन्हेगारास हत्यारें, किंवा युद्धसामग्री करण्याचा, किंवा तिचा व्यापार करण्याचा परवाना मिळाला असेल तो रद्द करावा असा ठराव गुन्हा ठरविणारा माजिस्त्रेट करील तर, तो त्याचा परवानाही रद्द होईल.

१० हत्यारें, किंवा युद्धसामग्री करण्याचा, किंवा तिचा व्यापार करण्याचा परवाना मिळालेला मनुष्य ज्या जागीं हत्यारें, किंवा युद्धसामग्री करीत असेल, किंवा ठेवीत असेल त्या जागीं त्याचा माल पाहाण्यासाठीं कोणतेही वेळीं जाण्यास माजिस्त्रेट, किंवा सरकारानें अधिकार दिलेला इतर अंमलदार मुखत्यार आहे. आणि सदर्हू प्रकारचा कारखानदार किंवा व्यापारी आपले मालाचा कोणताही भाग सदर्हू प्रकारचे माजिस्त्रेटापासून, किंवा इतर अंमलदारापासून बुध्यां लपवील, किंवा तो जेथें ठेवला असेल तें ठिकाण दाखविण्यास नाहीं म्हणेल तर, त्यावर माजिस्त्रेटासमक्ष गुन्ह्याची शाबिती झाली असतां तो पांचशें रुपये पर्यंत दंडास पात्र होईल. आणि सदर्हू प्रकारचे मनुष्याचा सर्व माल धरून सरकार दाखल करावा असा ठराव गुन्हा ठरविणारा माजिस्त्रेट करील तर तो सर्व सरकार दाखल होईल.

२८ कोणी मनुष्यानें या आक्टाअन्वयें कोणतीही गोष्ट केल्याबद्दल त्या वर फिर्याद करणे ती किंवा काम चालविणें तें खालीं लिहिल्या प्रमाणें केल्या वांचून करूनये, किंवा चालवूंनये : म्हणजे फिर्याद करण्याचा इरादा असेल त्या विषयीं, व फिर्यादीचे कारणा विषयीं एक महिना पूर्वी सदरहू प्रकारचे मनुष्यास लेखी सूचना दिल्या वांचून फिर्याद करूंनये, किंवा काम चालवूंनये ; अथवा पुरता मोबदला देण्यास काढला असेल, अथवा फिर्यादीनें कारण उत्पन्न झाल्या पासून तीन महिने झाले असतील तर सदरहू प्रकारची फिर्याद, किंवा काम चालनार नाहीं.

२९ या आक्टाच्या आधारावरून माजिस्त्रेटानें, दंड किंवा गुन्हेगारी ठरविली असेलती तात्काळ नदिली तर, माजिस्त्रेटानें गुन्हेगारास तुरुंगांत पाठवावा. आणि दंड, किंवा गुन्हेगारी पांचशें रुपयांवर नसल्यास, पराकाष्ठा साहा महिने पर्यंत माजिस्त्रेटाचे नजरेस येईल त्या प्रमाणें त्यास कैदेंत ठेवावा ; आणि त्या खेरीज इतर प्रसंगीं पराकाष्ठा बारा महिनें पर्यंत ठेवावा. परंतु ऐवज दिला असतां सदरहु कोणते ही प्रसंगीं कैदेंतून त्यास तत्काळ मोकळा करावा.

३० या आक्टा विरुद्ध केलेले गुन्ह्याची शाबिती ज्या मनुष्यावर होईल त्याजवरून दंड, किंवा गुन्हेगारी वसूलतीं, अथवा त्या दंडाचा, किंवा गुन्हेगारीचा कांहीं भाग ज्या मनुष्याचे बातमी वरून गुन्ह्याचा शाबिती झाली असेल त्यास देण्याचा अधिकार आहे.

३१ माजिस्त्रेट या शब्दांत माजिस्त्रेटाचे संपूर्ण अधिकार चालविणारे मनुष्याचा समावेश होतो असें समजावें आणि गुन्ह्याचे शाबितीचा ठराव करण्याचा अधिकार, व गुन्ह्याची शाबिती झाल्यावर माल मिळकत सरकार दाखल करण्याचा ठराव करण्याचा अधिकार या आक्टावरून माजिस्त्रेटास दिला आहे, तो सर्व अधिकार प्रेसिडेन्सीचे मुख्य शहरांत, वस्ट्रेट्स सेटल्मेंटात पोलीस माजिस्त्रेटानें चालवावा. आणि या आक्टा अन्वयें माजिस्त्रेटास इतर अधिकार दिले आहेत ते सर्व चालविण्याचा अधिकार पोलीस कमिशनरास आहे ; आणि ज्या सूचना या आक्टा अन्वयें माजिस्त्रेटास दिल्या आहेत, त्या सूचना प्रेसिडेन्सीचे सदरहू प्रकारचे मुख्य शहरांत किंवा स्ट्रेट सेटल्मेंटांत पोलीस कमिशनरास द्यावा.

३२ कोणतेही प्रेसिडेन्सींत किंवा जाग्यांत पोलिसाचा अधिकार, व बंदोबस्त करण्याचें काम माजिस्त्रेटा खेरीज किंवा सदरहू प्रकारचे पोलिस कमिशनरा खेरीज इतर मनुष्यास दिलें असेल तेव्हां माजिस्त्रेटास या आक्टा अन्वयें दिलले अधिकारा पैकीं गुन्ह्याची शाबिती करण्याचा ठराव करण्याचा अधिकार, व शाबिती झाल्यावर मालमिळकत जप्त करण्या विषयीं ठराव करण्याचा अधिकार खेरीज करून बाकीचे अधिकार, किंवा त्यां पैकीं कितीएक अधिकार सदरहू प्रकारचे मनुष्यानें—

चालवावें, आणि या आक्टाअन्वयें ज्या सूचना माजिस्त्रेटास दिल्या पाहिजेत त्या सदरहु प्रकारचे मनुष्यास द्याव्या असा हुकूम करण्यास राज्यकारभार चालविणारे सरकार मुख्त्यार आहे.

३३ ज्या प्रांतास किंवा जागेस हा आक्ट इंडियाचे गव्हरनर जनरल इन्कौन्सिल याचे अथवा कोणतेही प्रेसिडेन्सीचे, किंवा जागेचे राज्यकारभार चालविणारे सरकारचे हुकुमावरून [illegible] किंवा त्याचा कोणताही भाग चालू होईल.

३४ कोणतेही प्रांतास किंवा जागेस हा आक्ट लागू केला असेल त्या प्रांताचे किंवा जागेचे कोणतेही भागास या आक्टांतील सर्व ठराव किंवा कोणताही ठराव लागू नाहीं असें वेळोवेळीं ठरविण्याचा अधिकार गव्हरनर जनरल इन्कौन्सिल, अथवा कोणतेही प्रेसिडेन्सीचे, किंवा जागेचे राजकारभार चालविणारे सरकारास आहे. आणि कारण पडलें त्या भागास या आक्टांतील सर्व ठराव किंवा कोणताही ठराव पुनः लागू करण्याचाही अधिकार त्यास आहे.

३५ हा आक्ट दोन वर्षे पर्यंत अमलांत राहील.

३६ सरकारचे कोणतेही अंमलदारानें सरकारचे हुकुमाअन्वये कोणतीही हत्यारें किंवा युद्धसामग्री किंवा लष्करी सामान, किंवा गंधक, किंवा सुर्यारवार धरला असेल किंवा अटकावून ठेविला असेल, किंवा त्या देशांत आणण्याची मनाई केली असेल त्याचे जोखीम त्याचे शिरावर नाहीं असें या कलमावरून समजावें. आणि सदरहू प्रमाणे धरण्याबद्दल किंवा अटकावून ठेवण्याबद्दल त्यावर फिर्याद, किंवा इतर काम सुरू होणार नाहीं, किंवा चालणार नाहीं.

(ज्ञानप्रकाशछापखान्यांत छापिलें.)

# ज्ञानप्रकाश

सोमवार तारिख १५ माहे जुन सन्न १८५८ इसवी.

## पत्राची किंमत.

१० दर साल रुपये. ९॥ आगाऊ दिल्यास.

## वसूल रुपये

१० गंगाधरराव बाळकृष्ण शास्त्री बडोदें १८५७ अखे.

**सूचना.** वर्तमानपत्राबद्दल.

आम्हीं ज्ञानप्रकाशपत्र घेणारांस कळवीत आहों, कीं ज्यांजकडे सन्न १८५७ गुदस्त सालची वर्तमानपत्राबद्दलची बाकी येणें राहिली असेल त्यांणीं सूचना वाचतांच पैसा पाठवावा.

## बुकाबद्दल.

आम्हीं दुसरें असें कळवीत आहों, कीं आमचे छापखान्यांतून ज्यांजकडे बुकें वगैरे गेलीं असतील त्यांणीं त्यांजबद्दल बाकी सत्वर पाठवावी.

आरबीयन नैट म्हणजे आरबी भाषेंतील फारस व चमत्कारिक गोष्टी याचे अंक घेणारांस सूचना करीत आहों, कीं पहिले पुस्तकापैकीं म्हणजे अंक १ तागाईत १२ अंक पर्यंत ज्या लोकांकडे पैसा येणें आहे त्यांणीं सत्वर पैसा पाठविण्याची तजवीज करावी.

मुंबईतील आरबियन नैटचे अंक घेणारांस असें कळवितों कीं मुंबईमध्येंचे बापुलजी अंबरनाथजी यांजपाशीं सदरहू अंक मिळतील.

---

**ज्ञानप्रकाश ता. १५ माहे जून सन १८५८ इ०**

## हवारिपोर्ट.

**पर्जन्य.** रोहिणी नक्षत्राचा पर्जन्य बहुतेक ठिकाणीं पडला यामुळें शेतकरी लोकांनीं मावळांत भाताचे व इतर ठिकाणीं ज्वारी (नो धळा) व बाजरीचे पेरे केले, परंतु मृग नक्षत्र निघून ८ दिवस होऊन गेले परंतु यांत अद्याप पाऊस पडला नाहीं, आणि शेतांतून कोंहीं ठिकाणीं मोड आले, परंतु ते पर्जन्य नसल्या मुळें जसें लहान बालकांस दूध न मिळाल्यास त्यांचीं मुखें सुकतात, तद्वत् या मोडांची दशा होत चालली आहे. गेल्या तीन दिवसांत, एथें उष्णता अतिशय जाहली, व उष्णमापक यंत्रांत पारा ९८ अंशांवर चढत चालला आहे, यावरून पर्जन्य लौकर पडेल असें अनुमान होतें. धान्याचा भाव मागील आठवड्याहून पल्यास ९८ आणें प्रमाणें चढला आहे. बाजरीची किंमत पल्यास ६॥ साडे साहा रुपये पडतात.

आम्हांस हुबळीहून तारिख ५ जूनचें पत्र आलें आहे त्यावरून असें कळत आहे, कीं सागांवचे मामलेदार रा॰ रा॰ श्रीनिवासराव ताडपत्री यांस पेनशन देण्याचा ठराव होऊन तूर्त एक महिन्याची रजा मिळून त्यांचे कामावर कोडचे मामलेदार स्वामीराव गुरुराव यांस, व कोडास धारवाड येथील चिटणीस भीमराव, व त्यांच्या जाग्यावर फस्ट असिस्टंटचे शिरस्तेदार कृष्णराव पांडुरंग अशा तूर्त अगटिंग नेमणुका झाल्या व यावगीचे त्याचा माहालकरी गोविंदराव जोंगळेकर यांस मामलतीचे जाग्यावर नेमिलें. असें लिहिलें आहे, परंतु कोणत्या तालुक्यांत हें सदहू पत्रांत लिहिलें नाहीं.

आम्हांस असें खास समजलें आहे, कीं मेहेरबान डब्ल्यू. जे टरकांड साहेब रत्नागिरी जिल्ह्याचे कलेक्टर आणि माजिस्त्रेट यांस सरकारानें आजारीपणाचे सरटिफिकिटावरून दक्षिणेंत येण्याकरितां चार महिन्यांची रजा दिली आहे.

मेहेरबान बरिंगटन साहेब पोलिस कमिशनर यांची स्वारी महाबळेश्वराहून पुण्यास येऊन दाखल झाली. व पुणें जिल्ह्याचे जे नवीन नेमलेले सुपरिटेंडेंट पोलिस कप्तान केबाल साहेब यांची स्वारी रत्नागिरीहून येथें येऊन कामाचा चार्ज ता॰ ८ मिनहूस घेतला.

आमचे वाचणारांस आगीच्या गाडीचा रस्ता पुण्यापासून खंडाळ्यापर्यंत सुरू होणार याविषयीं आज्ञा देतां देतां आम्हीं थकलों, व आमचें लिहिणें वाचतांना त्यासही कंटाळा आला असेल असें वाटतें. परंतु आजरोजी आगीची गाडी पुण्याहून खंडाळ्यापर्यंत सुरू होणार आहे. अद्यापि दर दाम याचे जाहीरनामे वगैरे कांहीं एक व्यवस्थेचा प्रकार प्रसिद्ध झाला नाहीं, पुण्याहून आगीची गाडी सकाळीं साडे नऊ वाजतां व सायंकाळचे ३॥ साडेतीन वाजतां निघत जाईल येवढें मात्र तूर्त कळलें आहे.

**पुणें एजेंट.**— प्रतिवर्षीं विजयादशमीस दक्षिणेंतील सरदार व बडे लोक किंवा त्यांचे वकील यांस त्यांच्या सरकारानें ठरविलेल्या मतीप्रमाणें पोषाक देण्याचा शिरस्ता आहे. या कामाकडेस सरकारचा दरसाल चा दोन हजारांपासून अडीच हजार रुपयांपर्यंत सरासरी होतो असें आमच्या ऐकण्यांत आहे. आतां पुढील वर्षापासून विजयादशमीस पोषाक देण्याची वहिवाट मना करून राणीसरकारच्या ता॰ २४ मेच्या जन्मदिवशीं दरसाल हे पोषाक बडे लोक व सरदार किंवा त्यांचे वकील यांस द्यावे, असा दक्षिणेचे मेहेरबान एजंट साहेब यांस सरकारानें हुकूम फर्माविला आहे. यांत एक फायदा लोकांस होण्यासारिखा दिसतो, कीं कित्येक मानकऱ्यांस कीं बाहेरून यावयाचे असतात, त्यांस विजयादशमीस येणें म्हटलें म्हणजे पर्जन्यकाळ, नद्या भरलेल्या, याजमुळें येण्याजाण्यास पंचाईत आहे. ती कुदली आणखी हाल्लींचें राणीसरकार यांचा जन्मदिवस हा आपले उत्साहाचा व आनंदाचा आहे. त्यापेक्षां याच दिवशीं सदहू लोकांस पोषाक देण्याचें ठरलें हें फार पसंद आहे.

पब्लिक वर्कस डिपार्टमेंट म्हणजे लोकोपयुक्त सरकारी कामें करण्याचें खातें. त्याविषयीं हिंदुस्थान सरकारानें मुंबई इलाख्यांतील कामगार वगैरे यांचे पगाराचे ठराव केले ते खालीं लिहिल्याप्रमाणें. ते येणें प्रमाणें ह्या पत्रांत येतील.

| [illegible] | नांवें. | महिन्याचा पगार. पलटणीअमलदाराचा पगार व भत्ता | पलटणीखेरीज अमलदारास. |
|---|---|---|---|
| | इंजनीयर खातें. | | |
| १ | मुख्य इंजनियर या खात्याचा.------- | २२५० | २२५० |
| १ | कितां सिंद्या. | १००० | १४०० |
| ३ | सुपरिंटेंडेंट इंजनियर | ८०० | १२०० |
| १ | सुपरिंटेंडेंट इंजनियर क्यानालुस सिंद.--- | ७५० | १००० |
| १ | सिविल आर्कीटेक्ट यारवात्यावरील--- | ७०० | |
| १ | म्यारिसन व गोदीचा इंजनीयर----- | ७०० | |
| | एक्झीक्यूटिव इंजनीयर आदन---- | ६०० | |
| ८ | मत १ } कितां | ६०० | ९०० |
| ९ | मत २ } कितां | ५०० | ७५० |
| १० | मत ३ } कितां | ४०० | ६०० |
| २ | मत ४ } कितां | ३०० | ५०० |
| ३० | माबेदानरी, असिस्टंट, स्पेशल असिस्टंट १ले व दुसरे मतीचे कहं वरचे हाताखालचे लोक | ११२ पासून ३०० | १०० पासून ५०० |
| २ | सब इंजनियर मत १ | २५० | ४०० |
| ४ | कितां मत २ | २०० | ३०० |
| ६ | मत ३. | १५० | २५० |
| ८ | सुपरवाईजर्स. | १२० | २०० |
| २ | ,, असिस्टंट | १०० | १५० |
| ५० | ओवरसीयर्स | ८५ | १०० |
| १२० | कितां असिस्टंट | ७० | ८० |
| | मोबेदानरी | ५० | ६० |
| | कनिष्ठ हाताखालचें खातें. | | |
| | सब ओवरसीयर्स मत १ | ६० | ६० |
| ४० | कारकुन १० वर्षांचे नोकर | ६० | ६० |
| | कितां पांच वर्षांचे | ५० | ५० |
| | सर्व इतर | ४० | ४० |
| | सब ओवरसीयर्स मत २ | | |
| [illegible] | दारकगार १ वर्षांचे नोकर | ३५ | ३५ |
| | ,, तीन वर्षांचे. | ३० | ३० |
| | सब ओवरसीयर्स मत ३ | | |
| [illegible] | लायक ५ वर्षांचे वर | २५ | २५ |
| | इतर | २० | २० |
| ३६ | सब सरवेयर कामाच्या वगैरे कारीच्या उपयोगाप्रमाणें; सब ओवरसीयर्स मत १।२ यांचे ठरावाप्रमाणें. | [illegible] | २५-६० |

सदरील लिहिलेला ठराव होऊन एके हुद्याचे कामगारास पगार प्रति महिन्यास घावयाचा ठराव केला आहे, तो तारिख ३ जून चे सरकारी ग्याझिटांत छापून प्रसिद्ध केला आहे.

या ठरावावरून कित्येक कामगारांचे तूर्त पगार वाढतील, आणि सबेरेव ओवरसीयर्स वगैरे हुद्दे कित्येकांस पायरी पायरीनें मिळण्याचा व त्याप्रमाणें पगार मिळण्याचा संभव ही झाला आहे.

बंबे म्याझिट ता० ९ जून रोजचें पत्रा-धारें असें समजतें, कीं मिसर देशांत वाफेच्या गाड्या तीन लोखंडी सडकेवरून जात असतां अशी एक गोष्ट घडली कीं त्या गाड्यांचा मार्ग कटूना त्या नैलनामें नदींत पडून त्यांतील उतारकरू बुडून मरण पावले. त्यांत तुर्कलोक नामांकित भरले होते त्यांपैकीं बहुतेक मरण पावले. त्यांत कित्येक लोक मोठ्या पदवीचे होते. त्यांचा तपसील

१ अहमद पाशाईब्राम. पाशाचा पुत्र व हा तुर्कराजाचा दुसरा वारस होता.

२ करीदीन पादशाहा पूर्वी रहदारीवरील व्याझेट होता तो

३ रफळअलवेग रेविन्युखात्यावरील.

४ हमीद पादशाहा महमद अलीचे मुलांपैकीं एक मुलगा याचा हात तुटला परंतु जीव वांचला गेला.

हें वर्तमान शिकंदराबादेस समजलें, त्या वेळीं मिसर देशाचे पेढींतील देणें घेणें बंद पडलें, परंतु त्याचा आकार काय झाला हें समजलें नाहीं.

सरकार असा कायदा करणार आहे, कीं सर्व व्यापारी वगैरे इंग्रेजी (हिंदुस्तानांतील) लोक सुमारें १७ वर्षांपासून ५० वर्षांपर्यंत वयाचे यांणीं शिपाई बाणा धरावा व त्यांना करण्याचा शाबूद युद्धास तयार व्हावें. कारण वेळ फार कठीण आला.

गुरखे लोकांचा एका सरदारास एक हिरा मिळाला, तो हिरा प्रख्यात सावकार जोतीप्रसाद यांणीं २ लाख रुपयांस मागितला. बीण लेस अगनिस

## पुणें सेशनकोर्ट. — कैदी भाऊ

विन हरि कडू राहाणार मौजे म्हसवली. इलाखा पंतसचीव. हा मौजे पांडें तालुके पुरंदर जिल्हा पुणें येथें आपले बहिणीच्या घरीं गेला. तेथें त्याणें आपले बहिणीचा तिसरा मुलगा लखू उर्फ लक्ष्मण उमर अजमासें वर्षें ५ यास सावर म्हणून सोमलाचें विष भुलथापीनें दिलें. तेणेंकरून तें अनाश्रित, अज्ञानी, व सुकुमार बिचारें मूल मरण पावलें. ह्या मुलास मारण्याचें कारण, कीं कैदीचे बहिणीचा व तिचे दिराचा जिनगीचे वांटणीवरून द्वेष होता. ह्या अकसानें व द्रव्यलोभामुळें ही बालहत्या कैदीनें केली. सदर्हू कैदीवर गुन्हा साबीद सबब मेहेरबान सेशन जज्ज साहेब यांणीं तारिख १७ माहे गुदस्त सन्न मजकुरीं फैसल करून फांशीची शिक्षा ठरवून ती बाहाल होण्यासाठीं सदरेस लिहिलें.

पुणें पोलिसाकडे एक मोकदमा असा आला आहे, कीं एका कुणब्यानें आपली बायको ही बाहेर त्याचे परवानगीवेगीज गेली, म्हणून तीस नशीयद लागण्याकरितां तिचे पायास एक लोखंडी कडी घालून तीस सांखळी खांबास बांधून त्या दोन्ही सांखळ्यांचीं तोंडें एकत्र करून त्यास कुलुप लावून एका खोलींत घालून ठेविली होती. हें वर्तमान तिचे आईस कळलें, त्यावरून तिनें सरकारांत फिर्याद करून तो खटला हल्लीं कैदीस त्या सांखळीसुद्धां आणून चौकशीस करत आहे.

रेवरंड डाक्तर विल्सनसाहेब यांणीं गेल्या शनवारीं संभाषण केलें, तें पुढील पत्रीं प्रसिद्ध करूं.

**रत्नागिरी.** राजापूरचे मुनसफ कोर्टांतील वकील रा॰ रा॰ धोंडो सदाशिव हर्डीकर यांजवर फौजदारी खटला होता त्याचा निकाल होऊन हर्डीकर हे निर्दोषी ठरून मुनसफिलीचे कामावर राजापुरास गेले. पी॰ एच्॰ लीली सरकारी पाद्रीसाहेब हे तारिख ४ रोजीं येथें आले, यांस साहा महिने पर्यंत येथें राहावें असा सरकारचा हुकूम झाला आहे. — मालगुंडचे माहालकरी राजश्री विठ्ठल परशराम लोवलीकर यांस खासगी कामाकरितां तीन महिन्यांची रजा मिळाली. तें काम हल्लीं बाबाजी नारायण आठवले हे इंचार्ज पणें चालवितील. — कोल्हापुराहून १९वे काळे पायदळ पलटणीचे सुमारें ८० लोक येथें तारिख २ रोजीं आले, व येथें असलेले सोजीर लोक कोल्हापुरास गेले. — रा॰ रा॰ विष्णु भिकाजी फडके यांणीं तारिख ५ रोजीं रात्रीं वैदिक ब्राह्मणांस निमंत्रणें करून, वसनपूजा केली, व दुसरे दिवशीं समारंभही चांगला केला. — येथील बापू सावंत याच्या मुली (तिघी बहिणी) तारिख ५ रोजीं तळ्यावर धुणी धुण्याकरितां गेल्या होत्या त्यांतून थोरले मुलीचे हातून एक लहान फडकें तळ्यांत पडलें तें काढण्याकरितां ती मुलगी तळ्यांत गेली, परंतु फडकें हातीं न येतां आपण गटंगळ्या खाऊं लागली. तिला काढण्यास दुसरी गेली, तिचीही तीच अवस्था झाली. नंतर दोघी बुडाल्या हें पाहून तिसरी लहान मुलगी तळ्यांत शिरली. इतक्यांत एका मुसलमानानें पाहिलें. त्यानें दोघींस बाहेर काढल्या. थोरली (पहिल्यानें जी गेली ती) मात्र मरण पावली. ही सुमारें १२ वर्षांची होती. दुसऱ्या तिजपेक्षां लहान होत्या. — या आठवड्यांत पर्जन्य बराच पडला यामुळें शेतांचा नाश झाला नाहीं. परंतु अद्यापि पी- [illegible] पडून हवा चांगली झाली नाहीं.

बाणकोटचे सरकारकून शिद्धेश्वर यादव यांस रत्नागिरी येथें सरकारकून नेमिलें.

जगन्नि.

**नादारांला हातीं धरण्याचा कायदा.** — आपले मुंबई सरकारानें वरिष्ठ जें हिंदुस्थान सरकार यांस एक मोठे अगत्याची सुधारणा करण्याविषीं सुचविलें आहे. त्याचा हविगार्थ बंबेग्याझिट नामें इंग्रजी पत्रांत घेतला आहे, कीं जिल्हानिहाय नादार होण्याकरितां एक आक्ट तयार करावा. लेजिस्लेटिव कौन्सल म्हणजे कायदे करणार मंडळीच्या गेल्या बैठकीत नामदार [illegible] साहेब बाहादुर यांणीं असें बोलणें केलें, कीं मुंबईसरकाराकडून पुणेजिल्ह्याचे माजिस्त्रेट यांचे रिपोर्टाचे नकलेसह जीं पत्रें त्यांजला आलीं, त्यावरून असें कळतें, कीं मेहेरबान डेविडसन साहेब पुणेजिल्ह्याचे माजिस्त्रेट यांणीं त्यांचे जिल्ह्यांतील जंगली प्रजेची अस्वस्थता होण्यास कारण एक पराकाष्ठेचें दरिद्र व दुसरें रयतेचा जुलूम हीं आहेत. असें दाखविलें आहे. आणि यासाठीं सरकारानें जिल्हानिहाय नादार होण्याविषींचा कायदा अगत्यानें करण्याविषीं लक्ष पोंचवावें, असें सुचविलें आहे. हा विषय सन १८५९ साली सरकारचे पुढें आला होता, आणि त्यावर मद्रास, मुंबई, व कलकत्ता या तिन्ही इलाख्यांतील अधिकाऱ्यांचे अभिप्राय येयानें काम

चाललें होतें. पैकीं सदरील शेवटच्या दोन इलाख्यांचे अभिप्राय या गोष्टीस अनुकूल ते चे असें पडले आहेत, कीं नादार होण्या विषयींचा आक्ट जिल्ह्यानिहाय लागू पडे असा सरकारानें करावा. हाल्लीं त्या कमेटींत असा विचार चालला आहे, कीं नादारांचा कायदा करण्याचें अगत्य आहे किंवा नाहीं, हेंच प्रथमतः ठरविण्याकरितां एक निवडक मंडळीनेमून तिचा अभिप्राय घ्यावा. नंतर आक्ट सदई बाबतीवर स्थापावा. हिंदुस्थान सरकाराकडून हरएक कायदे व आक्ट प्रसिद्ध होतात ते सर्व हिंदुस्थानचे सुधारणुके करितां वहिता करितां होतात. हें तर हरएक कायद्याचे व आक्टाचे वरील नमना वरून च उघड कळून येतें आहे. परंतु त्यांच्या पोटांतील रकमा केव्हां केव्हां उद्देशास सोडून वर्तन करितात असें ही पाहाण्यांत येतें. गरीब लोकांचा बचाव होण्यासारखे सुधारणुकेचे आक्ट केव्हांही झाले असतां फार उपयोगीं आहेत. कारण, कीं ते दीर्घकाल चालणारे आहेत. श्रीमंतापेक्षां गरिब पुष्कळपटीनें कोणत्याही काळीं व कोणत्याही स्थळीं पाहातां आढळतात. श्रीमंताचे गरीब होण्याचा संभव, गरिबाचे श्रीमंत होण्यापेक्षां अधिक आहे. हें यावरूनच काढतां येईल. तेव्हां आपण जरी श्रीमंत असलों, तरी आपल्या गरिबींत बचाव होण्यासारखे उपाय अवश्य शोधून ठेविले पाहिजेत, परंतु ते उपाय नीट नेटके दिसतील त्यापेक्षा करतांना निर्बोध असतील तर फार बरें असें समजलें पाहिजे.

हाल्लीं नादार लोक आपल्या या प्रांतीं बहुत आहेत, हें सांगण्यास नको. त्यांस दारीं आणण्यासाठीं सरकारानें व इतर श्रीमान् रयतेनें तजवीज अवश्य करावी. कारण, त्यांची गरिबी आपल्या श्रीमंतास भिकारीपणाचे कमताईपणा आणि तो, परंतु ती तजवीज अशी असली पाहिजे, कीं जेणें करून श्रीमंतांची श्रीमंती निदान कायम राहून गरिबांचा दरिद्रावस्था कमी होईल. नाहीं तर नांवे नर गाडा, आणि गाड्यावर नांव असें होऊन कायद्यापेक्षां दगदग मात्र पुष्कळ होईल.

या कायद्याचा विचार करतांना या देशाचे गरिब रयतेची योग्यता, ज्ञान, आणि उद्योग इत्यादि गोष्टी ध्यानांत पहिल्यानें आणून कायदा रचला पाहिजे. असो सदई कायद्याचा मसुदा तयार होऊन प्रसिद्धीस येईपर्यंत वाट पाहाणें प्राप्त आहे. तो प्रसिद्ध होऊन शेट साहुकर, उदमी, व्यापारी, यांच्या दृष्टीखालीं पडून त्यांस अरमोगल्या अडचणी दिसल्या नाहींत तर तो कायदा बरा आहे. असें आपण समजलें पाहिजे.

---

कायदे करणार मंडळीनें तारिख २२ मे सन अशी कुरी ज्या प्रेसीडेन्सीमध्यें कैदी कैदखान्यांत असेल, आणि सरकारास तो तेथून दुसरे कडे त्याच प्रेसिडेन्सीमध्यें हर कोठें ठेवावा असें वाटेल तर त्यास तसें करण्याचा अधिकार असावा. याबद्दल मसुदा तयार होऊन शिलेक्ट कमिटीकडे सोंपला आहे.

**विलायतची डांक.**— तारिख १७ माहे मे पर्यंतची पुण्यास तारिख १२ माहे जून रोजीं येऊन दाखल जाली. त्यांतील हशिलाची वर्तमानें.

नेकनामदार लार्ड क्यानिंग साहेब बाहादुर गवरनरजनरल यांस हिंदुस्थानच्ये गादीवरून विलायतेस परत बोलाविणार असा तेथें गवगवा जाला आहे, आणि त्यांचे जाग्यावर पंजाबचे कमिशनर सरजान ला... यांस नेमणार अशी बोलवा आहे. परंतु तारिख १७ वी मेची डांक आली त्यांत लिहिलें आहे, कीं नेकनामदार कोर्ट आफ् डिरेक्टर्स यांणीं गवरनरजनरल साहेब बाहादूर यांणीं बंडानें बंदोबस्ताचे कामांत फार श्रम घेतले, सबब मोठे बाहादारीचें पत्र ही त्यांस लिहिलें आहे असें कळतें.

लार्ड एलिंबरो विलायतेंतील प्रधान मंडळीपैकीं एक यांणीं राजीनामा राणी साहेब यांस हजर केला आहे.

हिंदुस्थानचे सरकालिन क्यांबेलसाहेब कमांडरर इनचीफ यांस सर्व फोजेवरील जनरल ह्मणजे मुख्य सेनाधिपति नेमिलें आहे. सरहेनरी बुलर यांस रूम व्यामचे दरबारीं इंग्रेज सरकार तर्फे वकील नेमिलें आहे.

पार्लमेंट सभेचे हौस आफ् कामन्स मंडळीनें हिशेब तपासतां कंपनीसरकाराला रेलवे कंपनीचे संबंधानें १६६७३५८४० रुपयांची रकमेची खोट आली असें त्याजवरून दिसतें.

तुर्कस्थान व मांटिनग्रो ह्या दोन देशाचे लोकांची पस्पर लढाई चालू जाली आहे.

अमेरिका व विलायत यांचे दरम्यान सागरांतून तारायंत्र बांधण्याचा विचार जाला आहे. त्याचा अंदमास एक कोट रुपयांचा आकार त्या कामावरील व्यापारी मंडळीनें केला आहे. त्यास फराशीस, पोर्तुगीस (फिरंगी), व स्पेन देशचे लोक, यांणीं याकामाकरितां आपला जबा दिला आहे. हें तारायंत्र समारें २००० दोन हजार कोस लांब होईल.

सालगुदस्तांपेक्षां विलायतेहून देशावरावर वकील व गवरनर वगैरे मोठे हुद्देदार यांची रवानगी करण्याकरितां व मेजवान्याकरितां सालीना खर्च १२६९६० जास्त जाला. सालगुदस्तांचा खर्च रुपये १९११५० झाला होता.

बायबल पुस्तकांची प्रसारणा करणारे मंडळीची वार्षिक सभा भरली तींत हिंदुस्थानांत ख्रिस्ती धर्म वृध्यर्थ वर्गणी गोळा झाली ती एकंदर १७०००० रुपयांची बेरीज आकारली आहे.

लिवरपूल येथें कापसाचा खप बहुत होऊं लागला आहे. आणि हिंदुस्थानचे कापसास भाव ही तेथें चांगला आहे.

एथें गेल्या गुरुवारीं आगीच्या गाडींतून मेहेरबान करसेटजी जमशेटजी सेट यांची स्वारी खंडाळ्याहून आगीच्या गाडीकडील सर्व कामगार साहेब लोक व गटाव लोक व कांहीं आपले दोस्त यांसहां पुणे मुकामीं आली, नंतर त्यांनी आपले बगल्यांत खाना वगैरे देऊन त्यांणीं हा रस्ता तयार करणारे यांचे श्रमाचें सार्थक झालें याविषयीं सरस भाषण केलें.

त्यानंतर मेहेरबान डेविडसन साहेब पुणें जिल्ह्याचे कलेकटर व माजिस्त्रेट यांणीं ही विशेष मसलतीचें भाषण केलें नंतर मेहेरबान करसेटजी सेट हे आपले मंडळीकडून येथून त्यांच दिवशीं त्याच गाडींतून सायंकाळीं चार वाजतां खंडाळ्यास जाण्याकरितां निघाले.

---

येथें श्रीमंत विष्णु महादेव गद्रे यांचे वाड्यांत काल एक मोठी सभा झाली. तेथें कामगार लोक, वैदे लोक, व व्यापारी वगैरे आले होते. त्या सभेचा उद्देश हा होता, कीं म्हैसूराहून एक शास्त्री येथें आले आहेत त्यांस अवधानी बाबा असें म्हणतात; त्यांचे स्मरण शक्तीविषयीं आम्ही मागील अंकांत लिहिलें आहे, त्याविषयींची खात्री करून घ्यावी. सबब मोठा समाज मिळून सर्वांनीं आपली खात्री करून घेतली. सदरहू शास्त्रीयांची विलक्षण बुद्धीची धारणा पाहून सर्वांनीं त्या शास्त्री बावाची कांहीं संभावना नाहीं केली. या कामाचा पुढारीपणा रा० विनायकराव डाक्तर यांणीं केला, याविषयीं सविस्तर लिहिण्यास आजच्या पत्रीं जागा नाहीं सबब पुढें लिहूं.

---

आम्ही असें ऐकतो, कीं पुणें अदालतीचे डिपोटी नाझरचे अक्टिंग कामावर विनायक विठ्ठल हे सुमारें १५ महिने होते, त्यांस हाली मेहेरबान जड्ज साहेब यांणीं मेहेरबानी करून एथील असिस्टंट जड्ज्च्या कोर्टांतील शिरस्तेदारीचे जाग्यावर मुकरर नेमिलें आहे.

---

आम्हांस आतां एक अर्जी लागली आहे, कीं एथील व्यापारी मंडळींनीं रेलवे कंपनीस कांहीं आचाराच्या कामांत विचार करण्याकरितां रीती एक गोष्टीविषयीं अर्ज तयार केला आहे. त्यांत कोण कोणत्या मुख्यत्वें करून कलमें आहेत तीं पुढील पत्रीं प्रसिद्ध करूं.

**नेमणुका.** — रत्नागिरीचा कलेकटर मिस्तर डब्ल्यू. जे टरकांट यांस आजारीपणाच्या सरटिफिकेटावरून दक्षिणेंत जाण्याकरितां ... महिन्यांची रजा मिळाली आहे. — मिस्तर जी. वाडिंगटन याची हिंदुस्थानी भाषेंत परीक्षा होऊन तींत तो उतरला. — शिकारपूर जिल्ह्यांतील तिसऱ्या कलासचा अक्टिंग डिपुटी कलेकटर मिस्तर जी. ऊड, आणि शिकारपूर तिजोरी वरील अक्टिंग डिपुटी कलेकटर मिस्तर टी. मेलस गेल्या सप्टेंबर महिन्याच्या १६वे तारखेपासून त्या कामावर मुकरर केले आहेत.

---

## आगीच्या गाडीचे दराबद्दल ओव्या आम्हांस पाठविल्या त्या.

अठराशें अठ्ठावन, तारिख नवदा वि जून यामाहीं ;
पुण्यग्रामापासुनि ; गाडी निघणार सत्य लवलाहीं. १
शहर पुण्यापासुनियां, खंडाळ्यापावेतों निरख ठरला ;
तोहा तिसरे भागाचा, आणे साडे दहा निर्धारला. २
खोपवलीपासुनियां, मुंबापुरि जावयासि दर माना ;
पावणे अठरा आणे ठरला दर घोड्यामध्यें जाणा. ३
घाटीं उतार ठरला, गाडीप्रति देइजे सहा आणे ;
तटुस बारा आणे, पडतील उतरावयासि नेमानें. ४

पुण्याहून घाटाकडां मुंबईपर्यंत आगीच्या गाडीस उतार तिसऱ्या प्रतीच्या सड्या मनुष्यास २८२९ दोन रुपये सवा दोन आणे पडतात असें दिस

---

हें पत्र ज्ञानप्रकाश छापखान्यांत कृष्णा... त्र्यंबक रानडे

# ज्ञानप्रकाश

गुरुवार तारिख १७ माहे जून सन्न १८५८ इसवी.

## जाहिरात.

मी सदाशिव नारायण केळकर राहाणार पेठ सदाशिव जाहिरात देतों जे रमाबाई भ्रतार रघुनाथ सदाशिव केळकर वस्ती पेठ मजकूर हिणें मला तिचे घराचें फक्त बक्षीसपत्र शके १७६६ ज्येष्ठ शुद्ध १० चें छापील कागदावर करून देऊन तिनें संन १८४५ माहे मे तारिख २३ रोजीं रजिष्टरही कराविलें आहे. त्या घराची दरोबस्त वहिवाट मालकीनें मी सदरील मितीपासून करीत आहें. त्यास त्या घरावर हरएक प्रकारें रमाबाईचा बिलकुल वारसा राहिला नाहीं. व तिला गाहाण विकत देण्याचा बिलकुल अधिकार राहिला नाहीं. याजकरितां कोणीही रमाबाईपासून या घराबद्दल बक्षीसपत्र, अगर गाहाणपत्र अगर खरेदीपत्र करून घेईल तर त्याबद्दल माझ्या घरावर त्याचा हरएक प्रकारें वर त्याचा वारसा पोंचणार नाहीं. तारिख १६ माहे जून सन्न १८५८ इसवी.

सही सदाशिव नारायण केळकर दस्तुरखुद

---

ज्ञानप्रकाश. ता. १७ जून सन्न १८५८ इ.

**किरकोळ. पुणे.** तारिख १५ मिनहूस पेठ वानवार येथील खवळ जाग्यांतील एका वेहिरींत एक गर्भ मुलाचा ७ महिन्यांचे वयाचा सांपडला. त्याची जुरी होऊन त्यांत असें ठरलें, कीं सदरहू गर्भ ज्या औरतेस जाला ती विनभ्रताची आबरूदार असेल सबब तिनें असें गर्भपातानें काम केलें असावें. सदरहू औरतेचा ठिकाण अद्याप लागला नाहीं.

ता. ११ रोजीं पेठ शुक्रवार बावनखाणींतील एका गटारांत एक मुलीचा गर्भ नऊ महिन्यांचा मिळाला. त्याजबद्दल जुरीचा अभिप्राय असा झाला, कीं मुल जन्मल्यानंतर तिचे आईनें हा गर्भ मारून टाकिला असावा. त्याजबद्दल पोलिसाकडे तपास चालला आहे. — पेठ कसबा येथें पुरंधरे यांचे वाड्यांत राहाणार वेदमूर्ति मोरभट्ट आपा घाणेकर यांची स्त्री रात्रीं निजली असतां तिचे घोटास एकजण डसून सदरहू बाईचें तोंडही दाबीत होता परंतु ती बाई मोठ्यानें ओरडल्यामुळें चोर दूर जाला. त्या बाईची मावभीमा ही तिच्याजवळच निजलेली होती. व त्या उभतां बायकांचे आंगावर दागिने समारें ५०० रुपयांचे होते. त्या बाईचे पलिकडेस एक मारवाडी व अदालतीचा एक शिपाई असे निजले होते. त्या जाग्यांत दुसरे लोक येण्यास मार्ग नव्हता. सदरहू खटल्याची चौकशी मेहेरबान नानामोरोजी डेपुटी माजिस्त्रेट यांजकडे चालली असतां सदरहू खटल्यांतील मारवाडी हा फिर्यादीचे घरीं चोरी करून पळून गेला. त्यास पोलिसानें पकडला. तो आपुलें नांव मणिराम उर्फ मेघराज सांगतो. यावर चोरीचा अपराध पुराव्याचा माल न मिळाल्यामुळें चालण्यासारखा नव्हता. परंतु त्यानें आपलें नांव लपवून खोटी साक्ष दिली सबब खोटे प्रतिज्ञेचा अपराध त्याजवर शाबीत होऊन तो खटला सेशन कमिट झाला. या मारवाड्यावर दुसरा खटला राहिलेला त्यांत मुचलका हजर राहण्याचा दिला असतां पळून गेला सबब तोही खटला चालणार. अशी हकीकत जाली आणि शिपाई याल ताहमद रद्द जाली असें ऐकण्यांत आलें आहे.

सरवीस मेसेजर.—पुढील लिहिलेली बातमी इंदुराहून तारिख ४ जूनची मुंबईचे पोष्ट मास्तर जनरल यांणीं प्रसिद्ध करण्यास दिली, ती पुनाआबझर्वरवरआधारें लिहिली आहे.

पुण्याहून डांक आतांच डिपुटी पोष्ट मास्तर यांजकडून आली आहे. तीअशी बातमी कळविते, कीं शिपरी आणि ग्वाल्हेर यामधील डांक नानासाहेब याणें कापून टाकली. दोन जाग्यांपैकीं दुसरें ठिकाण लुटलें. बंडवाले बाराहजार मजबूद आहेत. आग्रापासून डांक २५ तासांत आली नाहीं.

---

भडोंच येथून एक खासगी पत्र तारिख १० वीचें आलें, त्यावरून व बांबेग्याझिटांत एक पत्र आहे त्याजवरून असें समजतें, कीं तेथील लोकांनीं आज दिवसपर्यंत शहरदुरुस्तीचा कायदा अमलांत आणिला नव्हता, तो आणावयाबद्दल तेथील डिपुटी माजिस्त्रेट याणें रयत व सावकार वगैरे लोकांची समजूत करून दिली त्याप्रमाणें तेथें एक सभा झाली, आणि त्यांणीं एक अर्ज तयार करून सरकारास हजर केला आहे. त्यांत हंशील, कीं सरकारानें या कामास कांहीं मदत द्यावी. असें लिहिलें आहे

एक सोलजर याणें दारूच्या कैफांत मस्त होऊन, एका नेटीव शिपायास व दोन बाण्यास जखमी केलें आहे त्याची चौकशी व्हावयाची आहे

बडोद्—तारिख ७ माहे जून

महाराजांचे कनिष्ठ बंधू श्रीमंत महाराज दादासाहेब यांचा पुत्र ४ वर्षांचा होता, तो एकाएकीं आजारी होऊन मरण पावला! त्यास आज समारें १२ दिवस झाले. गायकवाडसरकारचे घरांत पुढें एवढाच वंशांत होता तो सांप्रत नाहींसा जाला. हें फार दुःखकारक आहे, ईश्वराची मर्जी.

बडोद्यांत मुजूमदार म्हणून मोठे मानांकित सरकारचे दरकदार आहेत त्यांची दरसाल तीस हजार रुपयांची नेमणूक महाराजांकडून चालत होती. व त्यांजला इंग्रेजसरकारची बाहादुरी होती, परंतु हाल्लीं थोड्या दिवसांमागें त्यांणीं आपला वकील कलकत्यास कांहीं कामाची अर्जी करण्याकरितां पाठविला होता. त्यांणीं महाराजांचे कामदार व रेसिदेंट साहेब यांचे नालस्तीची अर्जी कलकत्तेसरकारास केल्यावरून, रेसिदेंटसाहेबांचे इतल्याखेरीज परभारें वकील पाठविल्यावरून कलकत्ते सरकारास राग येऊन श्रीमंत रा॰ आपासाहेब मुजूमदार यांची बाहादुरी रद्द करण्याविषयीं कलकत्तासरकारानें हुकूम पाठविल्यावरून मशारनिल्हे यांस सनावणी करून महाराजांनीं त्यांजला बरतर्फी दिली आहे

इकडे सर्व स्वस्थता आहे. अद्यापि पर्जन्य चालू झाला नाहीं उष्णता बहुत होत आहे.

एथून एक बंडखोर मनुष्य पळून गेला होता तो पकडून आणला आहे. व त्याचा तपास चालला आहे. यास देहांत शिक्षा मिळेल असें वाटतें.

तारिख २१ वी मे पर्यंतची विलायतेची

बातमी. — ग्याझेट कर्त्यास सदरील तारिखेची तारायंत्रद्वारें अशी खबर आलीआहे, कीं पार्लमेंट सभेमध्यें "इंडियाबिल"

विषयीं मतभेद २२ वे तारि० होईल, व पार्लमेंटाचा मोड होईल असें पक्कें वाटतें.

हिंदुहिते.

---

पूना आबझरवर पत्रांत असें लिहिलें आहे, कीं १८व्या रायल ऐरिश पलटणीच्या दोन कंपनी, १७व्या लान्सर पलटणीचा एक स्क्वाडरन, आणि ६व्या काळ्या पायदळ पलटणीची एक कंपनी इतकें लष्कर जालन्यास जाण्याकरितां पुण्याहून निघालें तें गेल्या महिन्याच्या २१ वे तारिखेस सोमवारीं अहमदनगरास जाऊन पोंचलें. रोहिले, आरब, आणि बंगाली पलटणीचे पळून आलेले शिपाई यांणीं एक जूट करून निजामाच्या देशांतील ज्या ठिकाणीं रक्षण नव्हतें असे गांव लुटून फस्त केले आहेत. व जालनेंही घेण्याविषयींचें भय त्यांणीं घातलें आहे. २० व्या तारिखेस अहमदनगरामध्यें अशी बातमी उठली होती, कीं त्यांणीं जालन्यांतील सर्व बंगले जाळून टाकले. परंतु ही बातमी खरीच आहे असें अजून पक्कें समजण्यांत आलें नाहीं. निजामानें सर्व लष्कर लढाईच्या कामावर पाठविलें आहे, परंतु आतां त्यास त्याच्या लष्कराची गरज पडली आहे. हा प्रकार निजाम सरकारानें इंग्रेजसरकारास नीट समजावून दिल्यावरून त्यांनीं कांहीं पलटणें त्याच्या मुलखाच्या रक्षणार्थ सरकार परत आणणार आहेत, या लष्कराबरोबर अहमदनगर एथून नऊ रत्तली गोळ्यांच्या तीन तोफा देणार आहेत. व या लष्कराबरोबर पांच महिने पुरेशी अन्न सामग्री देणार आहेत.

फिनिक्स पत्रांत असें लिहिलें आहे, कीं हिंदुस्थानांत येण्याकरितां आलिकडेस जें १००० युरोपियन लष्कर जहाजावर चढलें आहे त्यापैकीं ७७६ लोक कलकत्त्यास येऊन दाखल झाले.

हरकारू वर्तमानपत्रात असें लिहिलें आहे, कीं बोस्टन एथील मिस्तर फ्रेडरीक ट्यूडोर याणें सर हेनरी हावेलाक याचे पराक्रम श्रवण करून त्याजला नजर करण्याकरितां एक तरवार आणि एक रिवालवर हीं करवून त्याचा एजेंट कलकत्त्यास होता त्याजकडेस पाठवून दिलीं आहेत. सर हेनरी हावेलाक मरण पावल्यामुळें हें बक्षीस पाठविलेले पदार्थ आतां त्याच्या पुत्राच्या स्वाधीन करणार आहेत.

ब्रिगेडियर जनरल ई. लुगर्ड याणें जगदीशपूर एथून मे महिन्याच्या २७ वे तारिखेचें तारायंत्रांतून सरकारास वर्तमान पाठविलें तें सरकारानें वर्तमानपत्रकर्त्यास दिलें आहे. त्यांतील सारांश कीं सदरहू ब्रिगेडियर जनरल यानें २७ वे तारिखेस दलेलपूर येथील बंडवाल्यांवर हल्ला करून आपल्या लोकांनीं बारा रत्तली गोळ्यांच्या २ दोन हाविटझार तोफा घालविल्या होत्या. त्या त्यांजपासून परत घेतल्या. याशिवाय २ हत्ती घेतले. व दलेलपूर आणि तेथें मुख्य बंडवाल्यांचें घर होतें तें, हीं जाळून टाकिलीं. ब्रिगेडियर बाबा यांसंगीं कांहीं

एक नाश झाला नाहीं.

इंडियन एंपयर वर्तमान पत्रांत अशी एक बातमी लिहिली आहे, कीं एक बरील-मांनांतला मुसलमान एका तरुण इंग्रेज पलटणी आफीसराच्या आंगावर थुंकला. या आफीसरानें हा अपमान शासन केल्या-वांचून जाऊं दिला नाहीं. त्याण त्याच्या हातांत काठी होती तिनें त्यास खूप झोडपलें. पुढें त्यास पकडून पोलिसच्या हवालीं केलें. असें ऐकण्यांत आलें आहे. धू. के.

---

आबझरवर आधारें असें समजलें आहे, कीं नरगुंदकर बाबासाहेब यास व त्याचे सात सोबती यांस तारिख १२ जून रोजीं क्रिस्तरम्यानसनसाहेब यास मारल्याबद्दलचे अपराधावरून फांशीं दिलें.

---

एथील पुणेपोष्ट हपिसांत वाफेची गाडी खंडाळ्या पर्यंत सुरू झाल्यामुळें कागद घेण्याचे वेळ फिरले आहेत. आतां रोज मुंबईची डांक दोन वाजतां बंद होत जाईल. आणि डाकेचे लखोटे तीन वाजत पर्यंत उघडे राहात जातील. दोन वाजल्यावर जीं पत्रें डांकेंत येतील तीं दुसरे रोजीं सकाळची गाडी १० वाजण्यापूर्वीं १० मिनुटांनीं निघेल, त्यांत जातील. या व्यवस्थेवरून आमचा मित्र पुणेआबझरवराचा कर्ता पत्रें पाठविणारांस पूर्वींपेक्षां मोठे गैर फायदे होतात, ते दाखवितो. ते आमच्या मतें बरोबर आहेत. दोन वाजल्यावर जीं पत्रें डाकेंत जातील तीं दुसरे रोजीं १० वाजतां म्हणजे पत्र घातल्यापासन वीस तासांनी एथून निघतील. नंतर बारा तासांनीं मुंबईस जाऊन पोंचतील. तेव्हां रात्रीचीं पत्रें न वांटतां दुसरे दिवशीं पत्रें वांटावयास आरंभ होई-तों ४४ तास जातील. पूर्वीं घोड्याची डांक होती तेव्हां १८ तासांनीं पत्रें वांटायास आरंभ होत होता. आणखी बंगीस दर पैंडास (फ आरे अच्छेरास पूर्वीं दोन आणे पडत होते आता या गाडींतून . पाठविल्यास ८ आणे पडतात. आतां बुकांच्या बंग्यांस हेंच हवाल पडलें तर मोठा जुलूम आहे. याजकरितां सरकारानें अवश्य तजवीज करावी.

---

या पर्जन्यकाळांत हिंदुस्थानांतील १०वी पायदळ १ली पलटण, ३२वी, ७८वी, आणि ८४वी. या गोऱ्या पलटणी विलायतेस परत जाणार आहेत. टैम्स

---

सरकालिन क्यांपबेल हिंदुस्थानचे कम्यांडर इनचीफ, व सरजेम्स औटराम, हिंदुस्थानचे मुख्य कौन्सलचे कौन्सलदार या दोघांस विलायतेचे मुख्य कौन्सलनें मोठ्या किताबा देऊन तेथील महाजन लोकांप्रमाणें सर्व मान पान मिळण्याचें ठरविलें आहे. त्या उभयतां शूरांस हजार रुपये किमतीच्या मसेकीं तलवार इनाम मिळणार आहे. टैम्स.

इंग्लिशम्यान पत्रांत लिहिलें आहे, कीं सरकालिन क्यांपबल साहेब एकदा उष्णकाळ अलाहाबादेस जाऊन घालवावा याहेतूनें त्यांणीं फौजेवरील हुकमत चालविण्याचें काम सोडिलें आहे; म्हणून ६०वे रैफलूस पलटणीवरील कर्नल जोन्स साहेब यांस पुढांत फौजेवर हुकमत चालविण्याचे कामावर नेमिलें आहे. टैम्स

---

हें पत्र ज्ञानप्रकाश छापखान्यांत कृष्णाजी त्र्यंबक

# एक्स्ट्रा.

## ज्ञानप्रकाशाचा

सोमवार तारिख २१ जून.

# ग्वाल्हेर सरह्यूरोझ यांच्या हस्तगत झाल्याबद्दल

आम्हांस खालीं लिहिलेली बातमी सांगण्यास आनंद झाला आहे, कीं लार्ड एल्फिन्स्टन यांस सरह्यूरोझ साहेबांकडून आलेली बातमी.

" ग्वाल्हेर येथील राजवाडा तारिख १९ जून सन्‍ १८५८

" आमच्या कम्यांड (हुकमतींत) जें सैन्य होतें त्याणें साडेपांच तास हल्ला केला. शत्रु किल्ला सोडून गेले. माझे घोडेस्वार, आणि तोफखाना त्यांचा पाठलाग करीत आहे.

आबझरवरचा एक्स्ट्रा.

ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिला.

# ज्ञानप्रकाश

सोमवार तारिख २१ माहे जून सन्न १८५८ इसवी.


## पत्राची किंमत.

१० दरसाल रुपये. ९॥ आगाऊ दिल्यास.

## वसूल

१७॥१२ रावसाहेब उफळे जाहागिरदार---- जत व करजगी संन १८५७ सेपतंबर अखेर.

---

## जाहिरात.

आम्हीं हिंदुनाटककार जे येथें दोन वर्षांपूर्वी आलों होतों. नवीन नाटकगृह बुधवारपेठेंत बांधून ११ खेळ केले तेच येथें पुनः आलों आहों. व नाटकगृह त्याच जाग्यावर बांधलें आहे तर येथील सर्व लोक आम्हांस मागच्याप्रमाणें उदार आश्रय देतील अशा भरंवशावर यंदा येथें चार महिने नाटक सुरू करणार आहों आमचा पहिला खेळ यंदा येत्या शनवारीं म्हणजे तारिख २६ माहे जून ज्येष्ठ वद्य ५ रोजीं होईल. या वेळीं आम्हीं लोकप्रियमनोरंजक असा वडसावित्रीआख्यान व पारिजातक हे दोन भाग करूं. या प्रसंगीं सर्वत्रांनीं आम्हांस उदार आश्रय द्यावा. व वाचकास बसावयास माडया दोन निराळ्या केल्या आहेत. व हा खेळ वाचकांस त्या दिवशीं पाहाण्यास अवश्य आहे. व सालमजकूरचे नाटकगृहांत विशेष चमत्कार केले आहेत. पुणें तारिख २१ माहे जून संन १८५८ इस.

सही गोविंद भट्ट गोरखले निसबत नाटक मुंबई.

---

## ज्ञानप्रकाश तारिख २१ जून संन १८५८

## ज्ञानप्रकाशकर्ते यांस.

अर्जी तर्फे मिस्तर टामस मोर साहेब सोलापूर नेटिव जनरल लायब्ररीचे सेक्रटरी यांजकडून. आमचे येथील लायब्ररीची वार्षिक सभा तारिख २ जून सन्न १८५८ इसवी रोजीं जाली, तेव्हां जो इंग्रजी व मराठी रिपोर्ट वाचून होऊन त्याजवर कमेटीचे ठरावाचें प्रोसिडिंग इंग्रेजी झालें. त्याचें भाषांतर करून सर्व लोकांस प्रसिद्ध होण्याकरितां आपले पत्रांत छापाल म्हणून पाठविलें आहे. तर कृपा करून येता पत्रीं छापावें.

### रिपोर्ट व प्रोसिडिंग.

तारिख २ माहे जून सन्न १८५८ इसवी रोजीं बुधवारीं लायब्ररींत वार्षिक सभा जाली. त्या वेळीं खालीं लिहिलेले गृहस्थ हजर होते.

१ रा[illegible] राव आपाजी सदर अमीन.
१ अज्जम यशवंतराव बापूजी मामलेदार.
१ अज्जम विनायकराव आपाजी मुनसफ.
१ अज्जम लक्ष्मणाचार्य विनदासाचार्य शास्त्री.
१ अज्जम काजी अबदुल आरई मुफ्ती अदालत.
१ अज्जम काशीम साहेब सोलापूरचे काजी.
१ अज्जम अली साहेब खतिब.

१ अज्जमबाळकृष्णसदाशिव इंग्रेजीस्कुलमास्तर
१ अज्जमविठ्ठलरावगुंडो फौजदारशहरसोलापूर
१ अज्जम लक्ष्मणदिनकरशास्त्रीरायदरअदालत
१ अ० जनार्दन रामचंद्र मराठी स्कुलमास्तर.
१ अ० रामचंद्र आपा शोटे पेठ शुक्रवार
१ अ० हरिबाळकृष्ण वडगांवकर.
१ अ० आपाराव देवा पांडे अक्कलकोटकर
१ अ० बाबाजीरघुनाथखरे वकील.
१ अ० गोविंदबाबाजी देवल अक्कलकोटकर.
१ अ० रामकृष्णश्रीधरडबीर.
४० मराठी शाळेचे विद्यार्थी
१५ इंग्रेजीस्कुलाचे फस्टक्लासचे वगैरे विद्यार्थी
१०० गावांतील शेटसाहुकार वगैरे मंडळीसुमारें

येणें प्रमाणें मंडळी हजर असून अध्यक्षस्थानीं मेहेरबान कामटनसाहेब बाहादुर जड्ज हे बसले असून सक्रेटरि यांणीं इंग्रेजी रिपोर्ट वाचला. तो कमेटीनें पास केला. आणि मराठी रिपोर्ट इंग्रेजी स्कुलमास्तर यांणीं वाचला. तोही कमेटीनें पास केला.

रिपोर्टाचें हसील.

१ तारिख १ मार्च सन्न १८५७ इ० तें ता० ३० एप्रेल सन्न १८५८ इ० पावेतों लायब्ररीचे जमाखर्चाचा १४ महिन्यांचा हिशोब व इतर कागदपत्रें कमेटी समोर हजर होते.

२ पुस्तकाल्यांत वर्गणीदार यांची संख्या ६७ असून वर्गणीचा दर उत्तमपक्ष चार रुपयांपासून कनिष्ठ पक्ष १२ आण्या पर्यंत आहे. आणि वर्गणीदार लोकांपासून ता० १ मार्च सन १८५७ इ० ते ता० ३० एप्रेल सन्न १८५८ इ० पावेतों १४ महिन्यांत वसूल आला ते रुपये ५०३८७८६ आणि गुदस्त सालची शिलक ता० १ मार्च सन १८५७ [illegible] रोजीं शिलक रु० १४४८१५८९ एकूण रुपये कंपनी ६४८८७८७ त्यांत १४ महिन्यांत लायब्ररीचा एकंदर वाजवी खर्च रुपये ५९९८१०८७ वजा जातां बाकी शिल्लक रुपये ४८८१७ तारिख १ माहे मे सन्न १८५८ इ० रोजीं राहिली ती.

३ या वर्षांत नेहेमीं वाचण्यास लोकपुष्कळ येत असून इतिहास, नामांकित पुरुषांचे वृत्तांत, व शास्त्रीय विषय यांचीं पुस्तकें. व प्रवासी लोकांचें वर्णन, कविता, हीं वाचावयास बरींच नेत असून यांहूनही कल्पित गोष्टी नाटकें, मनोरंजक गोष्टींचीं पुस्तकें यांजवर लोकांची अभिरुचि फार दिसते. व्यास्तव वाचणार यांचे अंतःकरणांत उत्तेजन येण्याकरितां कांहीं सोपीं व मनोरंजक असून उपदेशपर चमत्कारिक पुस्तकें खरेदी केलीं आहेत. आणि पुढेंही खरेदी करण्याकरितां आणखी कांहीं फंड जमा व्हावा. असें सेक्रेटर यांणीं कळविलें आहे.

४ या वर्षांत पुस्तकाल्यास ज्या गृहस्थांनीं पुस्तकें बक्षीस दिल्हीं त्यांची नांवनिशी खालीं लिहिल्याप्रमाणें.

१ मेहेरबान कामटनसाहेब जड्ज.
१ मेहेरबान डफसाहेब असिस्टंट कलेकटर.
यांणीं इंग्रेजी आणि मराठी पुस्तकें मिळून ४९ बक्षीस दिलीं.
१ अज्जम मानसिंग वा भानसिंग मुंबईकर यांणीं इंग्रेजी पुस्तकें दिलीं.
१ मेहेरबान दक्षिणा प्राईज कमटीकडून मराठी पुस्तकें ५ चार आलीं.
१ मिस्तर मोरसाहेब सक्रेटरी यांणीं ९ पुस्तकें इंग्रेजी दिलीं.
१ अज्जम लक्ष्मणदिनकर शास्त्री रायदर यांणीं [illegible] मराठी दिलें.

सदरहू गृहस्थांनीं लायब्ररीस पुस्तकांची देणगी दिली. यास्तव त्या गृहस्थांचा आभार मानणें हें कमेटीस योग्य आहे. म्हणून सक्रटारी यांणीं सूचविलें तें कमेटीनें कबूल केलें आहे.

५ लायब्ररींत नेहमीं इंग्रेजी आणि मराठी वर्तमानपत्रें तशींच मासीक पुस्तकें येतात तीं किती एक खरेदी व किती एक बक्षीस त्यांचा तपशील खालीं लिहिल्या प्रमाणें.

इंग्रेजी खरेदी

१ बबईग्याझिट नित्य येणार.

१ पुनाआबझरवर आठवड्यांतून दोन वेळां

१ फ्रेंड आफ् इंडिया शिरामपुराहून

मराठी.

१ ज्ञानप्रकाश पुणें. १ धूमकेतु मुंबई.

१ ज्ञानोदय मुंबई. १ ज्ञानप्रसारक मुंबई.

बक्षीस इंग्रेजी.

मेहेरबान गोल्ड फिंच साहेब बाहादुर कलेक्टर यांजकडून येतात तीं.

१ इलस्ट्रेटेड लंडन न्यूझ

१ चेंबर्स जरनल मासिक पुस्तक.

१ होस होल्ड वर्ल ७ माही पुस्तक.

१ बंबे रिव्यु मासिक पुस्तक.

मेहेरबान चारटम साहेब

१ टेलिग्राफ आणि कुरयर नित्य येणार

१ बंबेआडवरटैजर फत्तरर्त्या कडून. —

मराठी पत्रें.

१ बोधामृत सातारपत्र कर्त्या कडून

१ वृत्तसार मुंबई पत्र कर्त्या कडून

१ जगन्मित्र आणि हिंदुहितेच्छु हीं दोन पत्रें इंग्रेजी स्कुल मास्तर यांजकडून.

एकूण वर्तमान पत्रें आणि मासिक पुस्तकें बक्षीस आणि खरेदी मिळून १७ येतात. त्यांत जे गृहस्थ लायब्ररीस बक्षीस देतात, त्यांचा आभार मानणें कमेटीस योग्य आहे असें सूचविल्यावरून कमेटीनें कबूल केलें.

६ सन्न १८५७ सालीं लायब्ररीचे सेक्रटार मिस्तर सैजलंड साहेब डिपुटी अकौंटंट असून तारिख २० माहे फेब्रुआरी सन्न १८५८ रोजीं मरण पावले, आणि अज्जम जगन्नाथ पांडुरंग हेडअकौंटंट मेंबर असून मुंबईस गेले यामुळें लायब्ररीस ही गोष्ट न्यून तेची आहे, यास्तव या दोन जागा रिकाम्या जाल्या आहेत त्या भरण्याची तजवीज व्हावी म्हणून सूचविलें तेंही कमेटीनें कबूल केलें.

(पुढें चालेल.)

## सोलापूरचे बातमीदाराकडून

तारिख १६ जून. — "सात आठ दिवसांपासून आकाश अभ्रांनीं व्याप्त होऊन पर्जन्य पडण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. पर्वाचे दिवशीं वर बराच पाऊस पडून हवा थंड जाली आहे. — जमनी देवापांड्याचे प्रकरणांत पूर्वीं लिहिल्याप्रमाणें जे असामी ससिंड करण्या बद्दल करण्यास सरकारांत लिहिलें त्याची बरतर्फी मंजूर होऊन आली आहे. — पोलिसचे लोक हैदराबाद सरहद्दीचे सर्व ठिकाणीं पाठविले आहेत. — मेहेरबान फर्स्ट असिस्टंट व थर्ड असिस्टंट कलेक्टर व पोलिस सुपरिटेंडेंट यांच्या स्वाऱ्या येथें दाखल झाल्या आहेत. — अक्कलकोटचे राजेसाहेब यांची प्रकृति दरम्यानें फार बेआराम होती. परंतु मेहेरबान कलेक्टर साहेब यांणीं अज्जम आत्माराम बापूजी डाक्तर यांजला नोकर पाठवून औषधोपचार केल्यामुळें हल्लीं प्रकृति चांगली जाली आहे. कळावें हे विनंती.

**ग्रेटइंडियन पेनिनसुला रेल्वे कंपनी.**— हिंदुस्थानांतील वाफेच्या गाड्या व त्यांकरितां लोखंडी रस्ता करून पांथस्थ व माल नेण्याकरितां व्यापार करणारे मंडळीचे मुख्य पंच यांणीं आणखी या कामाकरितां दोन कोटी रुपये भांडवल गोळा करण्याविषयीं ठराव करून त्यास कंपनीसरकारानें पैसा जमा होईल त्याचें व्याज दरसाल दरशेंकडा ५ पांच रुपये देण्याचें कबूल केलें आहे. हें भांडवल गोळा करण्यासाठीं पंचांनीं दोनशें रुपयांची एक एक पाती केली आहे. म्हणजे पूर्वीचे जुने या मंडळीचे ७ पातीदार यांबरोबर हल्लींचा नवा पातीदार केला आहे. चालत्या महिन्याचे २७वे तारिखेस, नव्या पातिदारानें प्रथमतः २० रुपये भरले पाहिजेत. टैम्स.

---

तारिख ३१ माहे गुदस्तरोजीं भलाहाबादेहून जी. एच्. एडमंडस्टन साहेब यांणीं कलकत्यास पाठविलेली तारायंत्रावाटे बातमी "कीं दाराशेखो आणि हाजीशेखो दिल्लीचे दोन राजपुत्र त्यांस माहे गुदस्तच्या २८ते मिनहूस मुरादाबाद जिल्ह्यांतील हुसेनपूरचे ठाणेदारानें पकडलें होतें. काल्पी व इटूएकी एथचे बंडवाले बिजाल गांव व कुलिया याचे बाजूनें ग्वाल्हेराकडे चाल करते झाले, आणि ते २९वे गुदस्तच्या मिनहूस ग्वाल्हेरीपासून सुमारें १२ कोसांवर होते. शिंदे महाराजानें दोन पायदळ पलटणी, एक हजार स्वार, आणि १८ तोफा इतकें लष्कर त्यांस अडथळा करण्याकरितां मोरारचे छावणीवर रवाना केलें आहे. यांचा फौजेवर हल्ला करून त्यांस मारून टाकण्याचा हेतु आहे. दोन पायदळ पलटणी, पांचशें बॉडीगार्डचे स्वार, आणि बारा तोफा इतकें लष्कर ग्वाल्हेरचे बंदोबस्ताकरितां राहिलें असें मला वाटतें." टैम्स

हिंदुस्थानांत लोखंडी गजांची सडक करण्याचा यांतिजवरून वाफेनें गाड्या चालविण्याचा उद्देशानें विलायतेस एक मंडळी झाली. आणि त्या मंडळीस कंपनीसरकारानें आश्रय दिला. तेव्हांपासून आजवेरीं जें भांडवल कंपनीसरकारचे खजीन्यांत जमा झालें त्याचें दरसाल दरशेंकडा ५ टक्के व्याज सरकारानें दिलें. त्याचा एकंदर आकार रुपये १८८९४२६० झाला आहे. त्यापैकीं विलायतेस १८००७६८०, आणि हिंदुस्थानांत ८०६७८० रुपये द्यावे लागले. सदरहू रस्ता व त्याजवरून गाड्या चालविणें याजीतपर्यंत सहा मंडळ्या झाल्या त्या सर्वांचे रुपये सरकारचे खजीन्यांत १६०७३५८४०, रु० एकंदर जमा झाले आहेत. त्यापैकीं हिंदुस्थानांत ५७६६७९० रुपये मात्र जमा झाले आहेत. टैम्स.

---

कराची एथें आटलोप नामें आगबोटींतून १८० रिकुटस म्हणजे पलटणींत भरायाचे उमेदवार शिपायी, हे विलायतेहून पंजाब व वायव्यभागांत यांकरितां ४ थे मिनहूस येऊन दाखल झाले आहेत. टैम्स

मुंबईच्या शिटाधारें असें कळत आहे कीं सरकाराकरितां सीडनीहून १५० घोडे जाहाजांतून आले.

## नाझराचीचूक कोर्ट नंबर ५

एथील सदर्हू कोर्टांत एका वादीनें प्रतिवादीची जिंनगी जप्त करण्या करितां दरखास्त दिली. त्या दरखास्तीवर प्रतिवादीच्या जिनगीची नांवनिशी लिहिली होती, परंतु त्या यादीवर एकंदर बेरीज नाहीं. पुढें दरखास्तीवरून जिनगी जप्त केली. त्यांत रोख रुपये ९५ सांपडले, परंतु पैकीं ५० मात्र पूर्वी दरखास्तींत लिहिले होते. पुढें इतके रुपये सांपडले असतां जातील सबब त्या दरखास्तीवर ५० रुपये आंकड्याने मागें ; हा आंकडा घातला. सदर्हू आंकडा दोजे पासून दूर व निराळा दिसतो. असें आम्ही ऐकतों. यावरून त्या दरखास्तींत फेरफार वादी, नाझर, व कारकून यांच्या मिलाफानें हा झाला असावा. असा बाक आला आहे. अद्यापि याप्रकरणीं काय झालें तें आम्हांस समजलें नाहीं. परंतु मेहेरबान जड्ज साहेब याजविशीं आपलें लक्ष पोंचवितील. आम्हांस असें वाटतें, कीं दरखास्त नाझराकडे गेल्यावर त्यांणीं तपासून पाहावी ती पाहिली नाहीं. व कारकुनानें दरखास्त बार करावयाची ती केली किंवा नाहीं हें पाहणें नाझराचें काम असतां तें त्यांणीं बजाविलें नाहीं. यावरून नाझराची हुशारी किती आहे याचें अनुमान केलें पाहिजे.

आमचे ऐकण्यांत असें आलें आहे, कीं रावबाहादूर कृष्णाजी वासुदेव शाहाणे नाशीक येथील डिस्त्रीकुट डिपुटी कलेक्टर यांणीं पोलिसचे कामास चकशीर मदत दिली नाहीं सबब त्यांस कामांतून दूर केलें आहे. ही द्वितीया हजिआहे.

---

तारीख १६ मिनहूचे टेलिग्राफावरून कळतें, कीं निजामाचे मुलखांतील ५०० रोहिले लोक वायव्य प्रांतांत पोलिसांत भरती करण्याकरितां सरकारचे हुकमावरून जमा केले आहेत.

## ग्वाल्हेर संस्थान.

या संस्थान प्रकरणीं टेलिग्राफाच्या कर्त्यानें जो मजकूर आपल्या कालच्या अंकांत लिहिला आहे, त्याचा सारांश आम्ही आपल्या वाचणारांसाठीं उतरून घेतों.

नानासाहेब हा एक सरदार असें दर्शवीत आहे. सरह्यूरोझ हा काल्पी येण्यामध्यें आणि सरकोलिन क्यांपबेल बेरिली व शाहजहानपूर येण्यामध्यें गुंतले अशी संधी पाहून भिठूर (ब्रम्हवर्त) चा मुख्य यानें दक्षिणेंत चाल केली. यास शेंकडों लोक मिळाले होते. आणि जेव्हां काल्पी एथील लोकांची आणखी मदत घेऊन पोंचली, तेव्हां याजपाशीं दाहांपासून १५ पंधरा हजारांपर्यंत फौज जमली. यमुना नदीच्या किनाऱ्यावर असतां शिंदे सरकारास लिहून पाठविलें, कीं मी मित्रत्वाच्या अथवा शत्रुत्वाच्या रीतीनें येण्याचा बेत करितों. यावरून शिंद्याचे मनांत विकल्प येऊन लढाईस सिद्ध झाला. यानें आपले कप्तान वगैरे लोकांस बलावून नानास भेटावयास जाण्याचा निश्चयांचा केलेला बेत समजाविला. आणखी असें दर्शविलें, कीं आपण त्यांस जिंकून काल्पीकडे हांकून देऊं. म्हणजे तेथें सरह्यूरोझ याचें सैन्य आहे, तें नानाच्या लोकांस छाटून टाकील. बरें एकादे समयीं उलट झालें तर

आपण परत स्वस्थानास येऊं. याचे हे बेत बरोबर होते. असा निश्चय करून आपली फौज घेऊन बाहेर पडला. आणि थोडे अंतरावर गेला नाहीं तों शत्रूचा "आडवान्स गार्ड" दृष्टीस पडला. याची फौज उल्हासानें लढायास चालली होती, परंतु नानासाहेबाची मोठी फौज आणि मराठ्यांचा झेंडा नजरेस पडतांच शिंद्याचे सर्व लोक जाऊन बंडवाल्यांस मिळाले. या प्रसंगीं शिंद्याचा बाडीगार्ड (खासगीस्वार) मात्र राजनिष्ठेनें याजपाशीं राहिला. आणि इनक्यांच्या मदतीनें आपली मोकळीक करून आग्र्यास गेला. इकडे नानासाहेब एकदम ग्वालेरीमध्यें शिरले. ग्वालेरच्या ठिकाणाविषयीं थार्नटननें वर्णन केलें आहे तें असें, कीं हें ठिकाण थोडें मजबूत आहे. व या किल्ल्यांत लढाईचें सामान जर पुष्कळ असेल तर बराच टिकाव धरतां येईल. एथील किल्ला उंच व ७०० वार जमिनीच्या टेंकडीवर बांधलेला असून ती टेंकडी त्रिकोणाकृति आहे. व आग्नेय, दक्षिण, आणि नैर्ऋत्य या दिशांस तशाच टेंकड्या आहेत. या ठिकाणाच्या नजीक आणि पूर्वेस "सूवनरीका" नामें नदी वाहात असते. ह्या नदीस जिनंत उदक नाहीं. उष्णकाळीं कोरडी असते. ज्या टेंकडीवर ग्वाल्हेरचा किल्ला बांधलेला आहे. तिची बरोबर लांबी ईशान्यदिशेपासून नैर्ऋत्यदिशेपर्यंत दीड मैल आहे. तशीच रुंदी ३०० वार (प्रत्येक वार पावणे दोन हातांचा असतो) उंची उत्तरेकडच्या बाजूनें ३४२ फूट आहे. टेंकडीच्या कडे वरून तट बांधलेला आहे. किल्ल्यांत शिरण्याचा जो रस्ता आहे. त्याच्या शेवटीं एका मागें एक असे सात दरवाजे आहेत. मुख्य दरवाज्यास "हतीपूल" अथवा हत्तीचा दरवाजा असें म्हणतात. किल्ल्यांत उदकाचे तलाव पुष्कळ आहेत. ग्वाल्हेरचा जुना किल्ला या किल्ल्याच्या पूर्वेकडे बांधलेला आहे. हा मोठा मजबूत असून सभोंवतीं पाषाणी मजबूत हवेल्या बांधलेल्या आहेत. या किल्ल्यांत एक मोठी हवेली पाषाणी बांधलेली आहे. तिच्या खालीं "महमदघौस" यास पुरलेला आहे. हा अकबराच्या वेळेस मोंगल प्रख्यात झाला होता. ग्वालेरमध्यें मोंगले कारखाने वगैरे कांहीं नाहीं; फक्त दारूचा कारखाना मात्र आहे. ग्वाल्हेर किल्ल्याविषयीं विलफोर्ड नामें गृहस्थानें वर्णन केलें आहे. त्यांत त्याणें असें लिहिलें आहे, कीं हा किल्ला सन ७७३ मध्यें "सर्वसेना" नामें राजानें बांधला. हा राजा, जवळच्या एका परगण्यांत टेंकडीवर राहात असे. सन १०२३ मध्यें या किल्ल्यास गिझनीचा प्रख्यात महमदानें वेढा घातला होता. परंतु कांहीं इलाज न चालून निराशपणानें यास परत जावें लागलें. या प्रसंगीं यास कांहीं बक्षीस मिळालें होतें. सन्न ११९६ च्या सालीं "घोर" च्या महमद अथवा शाबुदीन यांचा लेफ्टनेंट कुतबुदीन इबक याणें किती एक दिवसपर्यंत वेढा घालून शेवटीं जिंकून घेतला १२११ त हा किल्ला मुसलमानांच्या हातून गेला. परंतु सन १२३१ च्या सालीं दिल्लीचा गुलाम राजा शमसुद्दीन अल्तमश याणे १ वर्ष झुंजून शेवटीं घेतला. नंतर पुष्कळ दिवस गेल्यावर सन्न १३९८ मध्यें तैमुरलेन नामें सरदारानें वेढा दिला असतां एक हिंदुस्थानी नरसिंग

## नेमणुका.

राजकीयखातें. क्यापटन एफ्. लेउर द-क्षिणमहाराष्ट्र देशांतील अक्टिंग पोलिटिकल एजंट यांणीं ता॰ ५ मिनहूस आपले कामाचा चार्ज घेतला.—न्यायखातें. डी॰ हारपर यांणीं रत्नागिरीचे पोलिस सुपरिंटेंडेंन्चा चार्ज ता॰ २८ मे रोजीं घेतला. —नामदार सुपरिम् कोडतचे जड्ज्य यांणीं मेहेरबानी करून ता॰ १९ मे पासून १२ महिन्यांची रजा मिस्तर ब्रुकफील्ड डिपुटी क्लार्क बादशाही गादीचा यास दिली, आणि त्या कामावर मिस्तर एच्. ग्यांबल तूर्त नेमिला आहे.— सन्न १८५१ चा आक्ट ५ बरहुकूम रत्नागिरीचा २ रा आ॰ माजिस्त्रेट यास तपासणी व फटके वगैरे करून सर्व अखत्यार माजिस्त्रेट्चा दिला. — मिस्तर वार्डण अमदाबादचा जड्ज याणें आपले कामाचा चार्ज असिस्टंटयाजवळून ता॰ २ जून रोजीं परत घेतला. — मिस्तर वाशिंग्टन यांस गण्याहून मुंबई परीक्षा देण्याचे कमेटींत हजर होण्याविषयीं परवानगी मिळाली आहे.— लेफ्टेनंट ज हावसन पैमाष खात्याचा पुणे व ठाणें एथील असिस्टंट सुपरिंटेंडेंट यांस ता॰ ११ पासून ३० मिनहूपर्यंत नगरास जाण्याकरितां रजा मिळाली आहे.— मिस्तर आर॰ स्पुनर, कस्टम, मिठागर, अफू, या खात्यावरील कमीशनर यांस दक्षिणेंत येण्याकरितां ३ महिन्यांची रजा मिळाली. त्यांचें काम मिस्तर जंकीन यांणीं रजा संपेपर्यंत करावें — मिस्तर जी॰ एफ्. शेपार्ड यांस नगरास सेकंड असिस्टंट कलेक्टर व माजिस्त्रेट् नेमिले आहे. — खालीं लिहिलेले मामलेदारांचे वर्ग. साकुशान जालें.— शामराव रामाजी दुसऱ्या प्रतीचा डंबळचा, व कृष्णाजी जयराम दुसऱ्या प्रतीचा हुबळीचा यांजमध्यें वर्ग झाला.

---

आमचे ऐकण्यांत असें आलें आहे, कीं सोलापूर जिल्ह्यांतील मुदेबिहाळ तालुक्याचे मामलेदार अज्जम नरसिंह कृष्ण ऊर्फ दाजिबा शिंदगी यांस पुणे हवेलीचे मामलेदारीचे जागेवर नेमणार याविषयीं आमचे सोलापूरचे बातमीदारानें लिहिलेला मजकूर तारिख २६ अप्रेल सन्न मजकूरचे ज्ञानप्रकाश पत्रांत प्रसिद्ध जाला आहे ही नेमणुक जाली असतां येथील मामलेदार परत इंदापूरतालुक्यांत जातील. असें म्हणतात.

---

**सिलोन** (लंका) येथें तारि॰ २८ मे रोजीं एका दारूच्या कारखान्यास अग्नीचा स्पर्श लागल्यामुळें मोठा नाश जाला. त्यांत ७ जीव जळाले. त्यांत एकजणाचें शरीर त्या दारूचे जोरानें इतकें उंच गेलें, कीं नारळी झाडाचे शेंड्यावरून कमारें १५६ हातांचे अंतरावर येऊन पडलें. त्या शरीराचा एक हात शेजारचे छपरावर पडला. त्यांत दोन लहानें मुलें आणि दोन मुलम्या होत्या. असें दुःखकारक वर्तमान बंबे ग्याझिट पत्रांत कोलंबो, एक्झामिनर पत्रांतील घेतलें आहे.

---

**पैमाषखातें**— तांतो बल्लाळ आपटे तरमयाणें निमान्यांत गफलत केली सबब मेहरबान कानविस साहेब सर्व्हे खात्याचे सुपरिंटेंडेंट यांणीं त्यास बरतर्फ केलें असें ऐकतों.

---

राय याणें मध्येंच घेतला. तो मुसलमानांच्यानें मग १५१९ पर्यंत परत घेववला नाहीं. या सालीं दिल्लीचा पठाण राजा इब्राहीम यानें घेतला. परंतु पुढें बाबर याच्या बरोबर यानें जी लढाई केली तिजमध्यें पराजय झाल्यामुळें एका फिरस्त पठाणानें बळकावला. सन १५२६ त कांहीं युक्तीनें बाबरनें जिंकून घेतला. आणि लवकरच १५४३ मध्यें याचा पुत्र हुमायू याच्या पदभ्रष्टपणामुळें तो किल्ला याचे प्रतिस्पर्धी शेरशाहा याचे हातीं लागला. परंतु हुमायू परत राज्यावर आल्यानंतर याचा पुत्र अकबर यानें १५५६ त्याच्या सालीं पुनरपी त्या किल्ल्याचें अधिपत्य मिळविलें, आणि कांहीं दिवस याचा उपयोग बंदिशाळेच्या ठिकाणीं केला. अकबरानें या किल्ल्यांत आपला चुलत बंधु अबुल फजल यास कांहीं दिवस कैदेंत ठेवून शेवटीं मारला. या किल्ल्यांत अवरंगजेबानें ही आपला बंधू मुराद यास कैदेंत ठेवला होता, व पुढें मारला. या दुष्ट राजानें मुरादचा मुलगा आणि दाराचे मुलगे सालिमान व सेफरशेकू यास याच किल्ल्यांत कैद करून मारले. पुढें कांहीं दिवसांनीं दिल्लीचा जेव्हां अगदीं मोड झाला. तेव्हां "गोहुद" चा राणा जाट याणें ग्वाल्हेर घेतली. नंतर एकाच्या अकत्यारांतून दुसऱ्याच्या असें होतां होतां सन्न १७७९ मध्यें शिंद्याच्या ताबेंत आली. इच्या पासून ईस्ट इंडिया कंपनीच्या फौजेनें सायासा वांचून आगष्ट महिन्याच्या ३ रे तारखेस घेतली. ती अशी, कीं मध्यानरात्रीस शिड्या वगैरे चढण्या करितां तयारी करून सैन्य सिद्ध झालें आणि दोन वाजतां हल्ला सुरू झाला. तो सूर्योदया बराबर सर्व फौज किल्ल्याच्या तटाजवळ जाऊन पोंचली, आणि प्रथम हेरांनीं लांकडाच्या शिड्यांवरून तटावर चढून शिड्या मजबूद जोरानें बांधल्या. वर सैन्य आंत उतरूं लागलें. त्या वेळेस प्रथम जराशी हरकत झाली. परंतु मग कठीण पडलें नाहीं. पुढें इंग्रेज सरकारानें ग्वालेर संस्थान गोहदच्या राण्याकडे सोंपविल्यावर महादजी शिंद्यानें १७८४ मध्यें जिंकून घेतलें. यापासून १८०३ मध्यें इंग्रेजांनीं पुनरपी घेतलें होतें. परंतु १८०५ मध्यें परत दिलें. तें सन्न १८४४ सांच्या सालीं जानेवारी महिन्यांत इंग्रेजांनीं घेतलें. तो प्रकार असा, कीं प्रथम ग्वाल्हेर कंटिंजेंट फौजेनें वेढा दिला. आणि लढाई करून आपल्या ताब्यांत तो घेतला. ग्वाल्हेरचा किल्ला आग्र्यापासून ६९ मैल; दिल्लीपासून १७५ एकशें पंचेहत्तर. काल्पीपासून १०० आलाहाबादेपासून २७७ आणि कलकत्यापासून ७७२ मैल. याप्रमाणें अंतर आहे

मद्रास आथेनियमांत वर्तमान करून लिहिलें आहे, कीं २री गोरी लैट पायदळ त्रिचनापल्ली एथून नागपट्टणच्या मार्गें कलकत्यास प्रायः जाणार आहे. टैम्स.

आमचे एकण्यांत असें आलें आहे, कीं पुणें, ठाणें, नगर आणि धारवाड या चार जिल्ह्यांत दिवाणी कामाची शिल्लक वाजवीपेक्षां जास्त झाल्या कारणानें एकेक जाइंट जड्ज नेमण्याचा सरकारानें ठराव केला आहे. त्यांतील जाइंट जड्ज्याचे कचेरी करितां अदालतींत जागाही तयार होत आहे असें ऐकतों

तारिख १४ वीच्या बंबे टैम्स पत्रांत लिहिलें आहे, कीं अलाहाबादेस तारिख ३ माहे मेरोजीं तेथच्या नव्या बांधलेल्या बराकी पैकीं पांच साहा बराकी जळाल्या. त्या बराकींत ८० वी, ५४वी, आणि ३२वी या पलटणींच्या तुकड्या राहात होत्या. त्या बराकींत कोणी तरी मनुष्यानें आग लावली असावी, असें दिसतें. वहमावरून कांहीं काळे लोकांस कैद करून ठेविलें आहे. या आगीपासून कोणा जीवांचा नाश झाला नाहीं, असें नाहीं. ८० वे पलटणीचे दोन सोजीर घृतप्राय भाजले गेले आहेत. व ३२वे पलटणीचे कांहीं भाजले आहेत. भाजून गेलेले सोजिरांचें तोस्तानही जळून खाक जालें होतें. एकवेळ गवरनरजनरालसाहेब बाहादूर ज्या बंगल्यांत राहात होते, तो मोठ्या संकटांत होता. आग लावणारा जो कोणी दुष्ट त्याणें आपलें काम चांगलें केलें. वारा ज्या दिशेनें चालला होता त्या दिशेस त्याणें आग लावून दिली. याचें कारण, कीं सर्व बराकी जळून जाव्या. ती आग लवकर पेटत गेली. अलाहाबाद एथील थोड्या सोल्जरांत आजाराचा बराच प्रादुर्भाव जाला आहे. आणि उष्णता विशेष, या कारणानें रुधिराभिसरणाची विशेष गति होते, यामुळें रोज लोक मरण पावतात. एथें खोटी गटार बातमी उठली होती, कीं नानासाहेब आठ दिवसपर्यंत अलाहाबादेस होता. टैम्स.

---

मस्तर हार्ट. आमचे सरकारनसक टतार यांहीं चालत्या महिन्याचे दुसरे तारिखेस एक सरक्युलर काढलें आहे. त्यांत ताकीद केली आहे, कीं भडोंच जिल्ह्यांतील मौजे कावी एथील रेविन्यु (वसूलाती) पोटेल बापुभाईजी याणें आपल्या गांवांत सरकारी शाळेचें स्थापन होऊं दिलें नाहीं म्हणून त्या पाटलास सरकारी नोकरींतून बरतर्फ करून सर्व सरकारी नोकरांस कळविलें आहे. त्या पाटलास अतःपर कोणत्याही सरकारी कारखान्यांत ठेवूं नये. आणि त्याच प्रमाणें त्या सरक्युलरांत ताकीद केली आहे, कीं सरक्युलरांत ताकीद केली आहे. हें सरक्युलर आपआपले हाताखालचे सर्व नेटीव नोकरांस हें वाचून त्यांस माहीत करावें आणि त्यांस ताकीद करावी, कीं जो कोणी विद्येच्या कामांत आड येईल तर त्याचेही हेच हाल होतील. दु॰ सा॰

---

बंबे ग्याझिट आधारें कळत आहे, कीं रामदुर्ग एथील तारिख ७ जूनची बातमी अशील अशी आहे, कीं कोपालचा जागा हस्तगत जाली. मेजर ह्यूज यांस लीनसरचें सैन्य येऊन मिळालें. त्यांणीं भीमराव यास असा निरोप पाठविला, कीं तीन तासांचे आंत बायका व मुलें किल्ल्या बाहेर पाठवावी, त्याचें उत्तर त्याणें दिलें नाहीं. तेव्हां बारा वाजतां तोफखाना सुरू केला. तेणें करून सदरहू किल्ल्यास माणसें आंत जाण्यासारखें भोंक पडलें, आणि त्यावर पार्टी तयार होऊन हल्ला केला. त्यांत १०० लोक बखेड खोराचे मारले गेले. त्यांत भीमराव व किचनगोडा हे मारले गेले. मेजर ह्यूजसाहेब असें कळवितात, कीं त्यांतून कोणीही सुटून गेला नसावा. ते लोक तीन वाजतां शरण आले.

तींत १५० लोक कैद केले आहेत. शिवाय शहर हस्तगत झालें. आमच्याकडील लोक एकसरजन व ७४वे पलटणीचे ६ शिपाई मेले. व म्हैसूरचे घोडेस्वारांतील एक दफेदार जखमी झाला आहे.

---

आमचे गेल्या पत्रांत एका औरंगेस शिरा नवऱ्यानें पायांत लोखंडी सांखळी घातल्या बद्दल आम्हीं लिहिलें होतें. त्या मोकदम्याची चौकशी मेहेरबान नाना मोरोजी इस्कोयर डिपुटी माजिस्त्रेट यांजकडेस होऊन सदरहू नवऱ्यास दोन महिन्यांची सक्तमजूरीची शिक्षा मिळाली.

---

## पुणें एजंट.

साल मजकुरीं आपले राणीसाहेबांचा जन्म दिवस मेच्या २४ वे तारिखेस होऊन गेला. आणि १८५८ सालचे दक्षिणेंतील सरदार, बडे लोक, व त्यांचे वकील यांस पोषाक विजया दशमीचे द्यावयाचे; परंतु सरकारानें ठराव केलेला दिवस तर निघून गेला, याजकरितां सरकारानें मेहेरबान होऊन राणी सिंहासनारूढ झाली, ती तारिख २० माहे जून आहे. त्या दिवशीं पोषाक वांटावे. असें मनांत आणिलें. परंतु त्या दिवशीं रविवार आला आहे. सबब तारिख २१ माहे जून सोमवार म्हणजे आज रोजीं पोषाक मेहेरबान एजंट साहेब याचे हातून होत असे. आणखी हे पोषाक खरेदी करण्याची वहिवाट आजपर्यंत एजंटीकडील हेडकारभारी यांचे हातून होत असे. परंतु या सालापासून या कामावर कमेटी नेमली आहे. त्या कमेटीचे पंच रावबाहादूर वामनराव जगन्नाथ, म्युनसिपाल सदर अमीन, अज्जम आबाजी बाबूराव मुनसफ. आणि अदालतीचे शिवा दक्षिणा कमेटीचे रिवेंदर शास्त्री नेमिले आहेत.

पोषाक देण्याचा दिवस फिरला ही गोष्ट बाहेर गांवगन्ना सरदार बडेलोक असतील. किंवा गेले असतील, तर त्यास हा दिवस समजून तेथवर हजर होण्याची अडचण आहे. सबब या विषयीं मेहेरबान एजंट साहेबांनीं तजवीज करावी, आणि त्यांचे दिलखुष करावे. असें आम्हांस वाटतें.

## पुणें अदालत.

— एथील शिरस्तेदार अज्जम विठोबा धामणसकर हे गेल्या बुधवारीं सकाळीं येथून नगरास जाण्याकरितां निघून गेले. त्यांचे जागेवर मुंबईचे कोणी एक सदर अदालतीचे कारकून अज्जम मोरोबा जनार्दन यांणीं शिरस्तेदाराचे कामाची गेल्या मंगळवारी शपथ मेहेरबान जड्जसाहेबांसमोर केली. या शहरांतील कोर्टांस पेठा वांटून दिल्या होत्या, ज्या पेठेंत प्रतिवादी असेल त्या पेठेचे मुनसफाकडे फिर्याद करावी. असें होतें. येणेंकरून वादीप्रतिवादीस केव्हां केव्हां अडचण व नाखुष वाटत असे. त्र्यवस्थेंकरून वसरी जड्ज्यास होत असे त्यास ती वहिवाट मोडून वादीचे खुषीप्रमाणें फिर्यादी घ्याव्या म्हणून मेहेरबान जड्जसाहेबांनीं सदर अदालतीस लिहून पाठविलें आहे.

**अष्टावधानीबावा.**— १७ मिनहूस तिसऱ्या प्रहरीं, एथें एक म्हैसूरचा राहाणार श्रीनिवासाचार्य अष्टावधानी बावा आला आहे. त्याची स्मरण शक्ति पाहाण्याकरितां श्री॰ रा॰रा॰ विष्णुमहादेव गद्रे यांचे वाड्यांत सभा केली होती. त्या समयीं श्री॰ रा॰रा॰ गणपतराव बल्लाळ व विश्वासराव बल्लाळ मानू, मोरो रघुनाथ दंदेरे; बाव्यासाहेब पटवर्धन, दयाराम आत्माराम यांचे मुनिम, दत्तराम मोतिचंद, बापूभाई मनसाराम, रावबाहादुर केसोराम चंद्र, वामन जगन्नाथ, बापू कृष्ण सोमण, आणि विनायक; मेहेरबान नाना मोरोजी, गोपाळराव हरि, वसदाशिव बल्लाळ; रावसाहेब महादेव गोविंद शास्त्री व नारायणभाई, खानसाहेब कामजी शेट, मोफेसर कृष्ण शास्त्री, व केरो लक्ष्मण. यांखेरीज इतर गांवचे गृहस्थ पुष्कळ होते. या अष्टावधानी बावाचें वय सुमारें २७ वर्षांचें आहे. यांस वेद पठन असून संस्कृतभाषा येते. हा रामानुज पंथी आहे. अवधानें चालवावयाच्या पूर्वीं व्यवस्था झाली ती येणें प्रमाणें एकानें पंचाग तिथिवार नक्षत्र वगैरे घटिका पळें यासुद्धां सांगण्याकरितां घेतलें होतें. एकानें संस्कृत पुस्तक त्यांतील श्लोकांचे चरण सांगण्याकरितां घेतलें होतें. एकानें मराठी पुस्तक यांतील वाक्यें सांगण्याकरितां घेतलें होतें. एकानें इंग्रेजी पुस्तक यांतील वाक्यें सांगण्याकरितां घेतलें होतें. एकानें संस्कृत श्लोक त्यांतील शब्दांवर अनुक्रमें आंकडे घालून पाहिजे तो शब्द व त्यांवरील आंकडा हें सांगण्याकरितां लिहून घेतला होता. एकेकानें आरबी, फारशी, इंग्रेजी भाषेंतील मजकूर घेतले होते. एकानें पांच साहा रकमांची आणेपैसुद्धां बेरीज तयार करून घेतली होती. दोघे बुदबळांचा पट मांडून बसले होते. तिघे गंजिफांचा डाव खेळण्याकरितां बसले होते. एक गृहस्थ त्या अवधानीबावाचे पाठीवर एकेक हरभरा मारण्याकरितां याचे मागें हरभरे घेऊन बसला होता. इतकी सिद्धता झाल्यावर त्या अवधानी बावानें गंजिफा खेळणारांपैकीं एकास बोलावून त्याजपाशीं दरएक अवतारांपैकीं कोणकोणतीं पानें आहेत हें विचारून घेऊन त्यास परत पाठविलें. नंतर बुद्धिबळें खेळणारांपैकीं एकानें चार डाव टाकल्यानंतर दुसऱ्यानें ते कसकसे टाकले हें सांगितल्यावर त्यास बावानीं अमुक मोहोरीं अमक्या ठिकाणीं ठेवावयास सांगून, पंचांगांतील वार, घटिका, पळें हीं विचारलीं. नंतर संस्कृत श्लोकाचे चरण ऐकून घेतले. याप्रमाणें अनुक्रमें विचारले. असें हें विचारण्याचें चक्र सात आठ वेळां झाल्यावर; ज्यांनीं ज्यांनीं जें जें सांगितलें तें तें सर्व जुळून बोलून दाखविलें. गंजिफांचीं दुसऱ्या जोडीदाराचीं काय काय पडलीं तीं विचारून आपल्या पक्षाचे खेळणारास अमुक अवतारांपैकीं अमुक पान टाक असें सांगत असे.

हें विचारण्याचें त्या बावाचें आणखी चक्र चाललें असतें. परंतु दिनावधि नसले कारणानें थोड्यांतच मंडळीनें संपविलें. शिवाय अवधानें चालविण्याची त्या बावाची इच्छा होती, परंतु मंडळीस तसा अवकाश नव्हता. वरील एकंदर १७ अवधानें, खेरीज मध्यें मध्यें संस्कृत श्लोक नवीन

रून लिहावयास तो सांगत असे. व मधून मधून विनोदाच्या गोष्टी ही करीत असे. शिवाय त्यासमयीं मंडळीच्या बोलण्याचा क्रम व रस्त्यांतील वाद्यांचा गजर हीं अवधानें त्यास चुकवावीं लागत. असो, त्या पुरुषास अष्टावधानी नांवमात्र आहे परंतु त्याची शक्ति तिसांहून हीं जास्ती अवधानें चालविण्याची आहे. त्याची ही स्मरणशक्ति अपूर्व पाहून प्रत्येक वेळीं सर्व मंडळीच्या मुखांतून वाहवा असे उद्गार मोठ्यानें होत. नंतर या बाबाच्या गुणांची त्यांनीं पुरी खात्री झाल्यावर सर्व प्रसन्न होऊन वर्गणी झाली, तेव्हां त्याच बैठकीस त्यास १००रुपये मिळाले.

---

अलाहाबाद ता० २७ मे. सदरहू तारखेचें वर्तमान,आग्रा एथें मार्गांत तारायंत्रास हरकत आली. या कारणानें तारिख ३० मे रोजीं तारायंत्रद्वारें पोंचलें तें.

४ तोफानिशीं १००० लोकांची टोळी हमीरपुराहून निघाली असावी, असें वाटतें. ती टोळी गेल्या रात्रीं फत्तेपूर आणि कानपूर यांचे दरम्यानच्या ग्रांटरक नांवें रस्त्यावरून येऊन पोंचली. सदरहू रस्ता अगदीं बंद झाला आहे.—अशी बातमी आहे, कीं बिलवा येथून नसिराबाद शिपाई, घोड्यांचा तोफखाना यासुद्धां गोग्रा नदी उतरले. त्यांस महंमद हुसेन हा जाऊन मिळाला आणि तांडा येथून १५०० लोकही मिळाले आहेत. त्यांचा हेतु मानसिंगावर हल्ला करण्याचा आहे. असें म्हणतात, कीं अयोध्येपासून पश्चिमेस २० मैलांवर बेगम इचें ६ पलटणी पाठविल्या आहेत. त्या गोग्रा नदी उतरणार आहेत.— अयोध्येंतील बंडवाल्यांनीं गोरखपूर परगण्यांतील बनसी, तहसील, गणा, आणि शहर ही लूटून फस्त केली आहेत. याच परगण्यांतील आमोरा एथें ४ तोफानिशीं कांहीं शिपाई लोक पाहिले आहेत. जौलन परगण्यांतील मोती वाहरावर २७ मे रोजीं बुंदेली बंडवाले यांणीं हल्ला केला, आणि तो गांव तहशील ही जाळली आहेत. अशी बातमी आहे. या बंडवाल्यांवर २६ मे रोजीं सर ई लुगार्ड साहेब यांणीं हल्ला केला. आणि आमच्या २ तोफा गेलेल्या होत्या त्या परत घेतल्या. शत्रूचा पुढारी याचें नांव माव दिलें नाहीं. तो आणि पुष्कळ शिपाई यांस ठार मारलें. आणि त्यांची फौज अद्यापि त्यांचा पाठलाग करीत आहे. टैम्स.

---

**हवा**—गेल्या आठवड्यांत एथें हवा मापः परमावधीची उष्ण होती. सर्व उन्हाळ्यांत प्रत्येक मनुष्याचे शरीरांतून जो घर्म गेला त्याच्या बेरजेहूनही जास्ती घर्म या गेल्या आठवड्यांत गेला. मृगनक्षत्रानें अगदीं दगा दिला. असें म्हणण्यास चिंता नाहीं. गेल्या गुरुवारीं तिसरे प्रहरीं कांहीं मृगाचे तुषार पडले. ते थोडे होते पण आळसावलेले दिसत. कालपर्यंत मेघांनीं छत्र बांधून ठेविलें आहे. पण वर्षाव होत नाहीं. अद्यापि शीततेपेक्षां गरमीचा जोर जास्त वाटत आहे. ईश्वर कृपेनें दृष्टि लवकर होईल तर सर्वांचें शांतवन होऊन विचारे आनंदी ही होतील.

---

हल्लीं शिक्क्याच्या कंपनीच्या वर्तीशीं भाव दों कडा ५। टक्के बदला आहे.

---

पुण्यांत मुंबईचे नाटककारांपैकीं येक नाटककरणारांची मंडळी आली आहे. तिची जाहिरात आजच्या पत्रांत दिली आहे. त्यावरून सर्वांस समजेल. लोकांनीं त्या नाटकास आपला आश्रय द्यावा अशी आमची शिफारस आहे.

---

हें पत्र ज्ञानप्रकाश छापखान्यांत कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांणीं छा०

# ज्ञानप्रकाश

गुरुवार तारिख २४ माहे जून सन्न १८५८ इसवी

## जाहिरात.

आम्हीं भिवर्ग बळवंतराव भिकाजी केळकर हे मयत यांचे पुत्र गोपाळराव व मोरो व चिंतो बळवंत केळकर कसबे नेवासें जिल्हा नगर. जाहिरात देतों ऐशीजे तारिख १४ माहे जून सन १८५८ चे ज्ञानप्रकाशांत रमाबाई कोम रघुनाथ सदाशिव केळकर राहाणार पेठ सदाशिव पुणें आपले वाड्याचें बक्षीस पत्र सदाशिव नारायण यांचे नांवें पूर्वी केलेलें रद्द करून आपले भाचाचे नांवें नवीन बक्षीस पत्र केलें आहे त्यास आमचे वडील बळवंतराव हे बाईचे भरतार चुलतपुतणे असून सदर्हू वाड्यांत आमचा निमे भाग आहे, बाई मयत जाल्यावर वाड्यावर व इस्टेटीवर मालकी आमची आहे. या करितां आमचे मान्यते खेरीज रमाबाईस वाड्याची कोणतीही व्यवस्था करण्यास अधिकार नाहीं. सदर्हू स्थावर वडिलोपार्जित असून शास्त्राप्रमाणें स्थावर मिळकत जवळचे वारीस असतां त्यास विकत किंवा बक्षिस देण्याचा अधिकार नाहीं. व पूर्वी सदाशिव नारायण यांचे नांवें जालेलें बक्षीस पत्राचा मजकूर हल्लीं आम्हांस समजला. या करितां आम्ही रमाबाईस व वाडा बक्षीस घेणारास कळवीत आहों. कारण या बाबें वाडा बक्षीस घेणारावर आम्ही दावा करूं. हें समजून कोणीं वाडा बक्षीस घेऊं नये. घेतल्यास त्याचे सर्व हस्तऐवज रद्द होतील. कळावें दस्तुरखुद्द गोपाळ बळवंत केळकर.

सह्या

| | |
|---|---|
| तारिख १७ माहे जून सन १८५८ मुक्काम नेवासें रोज गुरुवार | १ सही गोपाळराव बळवंत केळकर दस्तुरखुद्द<br>१ सही मोरो बळवंत केळकर दस्तुरखुद्द.<br>१ सही चिंतो बळवंत केळकर दस्तुरखुद्द. |

## जाहिरात.

आम्हीं हिंदु नाटककार जे येथें दोन वर्षां पूर्वी आलों होतों, व नवीन नाटक गृह बुधवार पेठेंत बांधून ११ खेळ केले. तेच आतां येथें पुनः आलों आहों व नाटकगृह त्याच जाग्यावर बांधलें आहे. तर येथील सर्व लोक आम्हांस मागच्या प्रमाणें उदार आश्रय देतील अशा भरंवशावर पंधरा येथें चार महिने नाटकें सुरू करणार आहों. आमचा पहिला खेळ पंधरा येत्या शनवारीं म्हणजे तारिख २६ माहे जून ज्येष्ठ वद्य १ पुरोजीं होईल. या वेळीं आम्ही लोकप्रिय मनोरंजक असा वडसावित्री आख्यान व पारिजातक हे दोन भाग करूं त्या प्रसंगीं सर्वांनीं आम्हांस उदार आश्रय द्यावा व बायकांस बसावयास माड्या दोन निराळ्या केल्या आहेत. व हा खेळ बायकांस त्या दिवशीं पाहावयास अवश्य आहे. व साल मजकुरीं ने नाटकगृहांत विशेष चमत्कार केले आहेत. पुणें तारिख २१ जून सन्न १८५८

गोविंदभट्ट गोरवले निसबत नाटककर्ते सुद्धां.

**डांकेविषयीं.** कराचीहून मुलतानपावेतों आजपर्यंत डाक दोन दिवसांआड जात असे परंतु हाल्लीं उंटाची डांक ठेवून ३८ टप्पे केले आहेत आणि त्याकडे एकंदर उंट १५००—२००० ठेविले आहेत यामुळें सदर्हू डाक एक दिवसाआड जात असते. उष्णता पराकाष्ठेची आहे यामुळें सदर्हू डांक रात्री चालते. पावसाळ्यांत डांक जाण्यास २० दिवस लागत ते आतां त्याचे निमे दिवस लागतील असा अदमास दिसत आहे.

सदर्हू मजकूर सिंदियनपत्रांतील टेलिग्राफ आधारें लिहिला आहे.

---

मेहेरबान विनायकराव वासुदेव एतद्देशीयभाषांची परीक्षा साहेब लोकांची घेणारे कमीटीचे सेक्रटार यांणीं सरकारी ग्याझिटांत जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे, कीं एतद्देशीय भाषांत परीक्षा देण्याची ज्या साहेब लोकांची खुषी असेल त्यांणीं त्या भाषेचें नांव व आपलें नांव यास्तव्यां तारिख २५ मिनहूस आमच्या कडे पत्रें पाठवावीं. नंतर परीक्षा पुढील महिन्याचे पांचवे तारिखेस सुरू होईल.

**आकुट.—** गेल्या सरकारी ग्याझिटांत कायदे करणारे मंडळीनें अकुट सन्न मजकूरचा पसार झालेला प्रसिद्ध केला आहे. सदर्हू आकुट कलम त्यांतील छापील कागद छापण्याचे हपीसांतून छापील कागद पुरविण्याविषयींचा आहे. हा आकुट सालगुदस्तां हिंदुस्थानांत बंडावा झाले कारणानें छापील कागदांत अव्यवस्था होऊन लुटींत वगैरे गेले असल्यास त्याविषयीं पुढें बंदोबस्त राहावा म्हणून सन्न मजकूरपासून नवीन कागद तयार करण्याचे प्रकार या आकुटांत सांगितले आहेत. सदर्हू आकुट बंगालरगात्याचे सन्न १८२९ चे १० वे कायद्यास अनुसरून आहे.

---

कलकत्ता एथील सरकारी विद्यालयांत दरमाहा दरमुलाकडून फी अवल प्रतीस ५ रुपये येत असत. ती हाल्लीं १० रुपये केली आहे असें इंग्रेजी वर्तमानपत्रावरून कळत आहे. एथें इतकी फी वाढण्याचें कारण एक मुख्य श्रीमंती, व दुसरें इंग्रेजी आदिकरून भाषेंतील विद्येविषयीं बाबुलोकांस अभिरुचि, व तिसरें सरकारचे मनांतून एतद्देशीय लोकांनीं विद्येकरितां पैसा द्यावा हीं होत.

---

संगमनेर एथून आम्हांस एक पत्र आलें त्यांतील मजकूर.

शाळाखात्यावरील इन्स्पेकूटर यांणीं सरक्युलर ता॰ १५ अकूटोबर सन्न १८५६ इसवीस केलें, कीं "कमिटीदार यांणीं दरमहिन्याचे शेवटले शनवारीं एक कमेटीदार यांणें दरआठवडा शाळेंत जाऊन मुलांचा अभ्यास कसा चालला आहे याविषयीं आपला शेरा लिहून ठेवीत जावा. व मुलांचे आईबापांस विद्येविषयीं उत्तेजन देत जावें." त्याप्रमाणें संगमनेरचे शाळेचे कमिटीदारांपैकीं रामचंद्र बापाजी

हे आस्थापूर्वक वेळ राखून शाळेंत जाऊन मुलांची परीक्षा घेत असतात. व त्याविषयीं शेरा लिहून ठेवीत असतात. व मुलांचे आईबापांस उत्तेजन देतात. व मुलांकरितां कांहीं बुकें ही बक्षीस वांटतात. यावरून या गृहस्थास विद्येची गोडी आहे. व विद्या करणारास आश्रय होईल तितका करणें हें आपलें काम आहे असें सर्वांनीं समजलें पाहिजे. आलीकडील मामलेदार व मुनसफ हे शाळेकडे कांहीं लक्ष देतात असें माझे पहाण्यांत आलें आहे. तेव्हां सदरहू शाळा उत्तम अवस्थेंत राहील असें दिसतें

डांक.— वाफेची गाडी एथून खंडाळ्यापर्यंत चालू झाल्यानें मुंबई डांकेतून पत्रें पाठविण्याचे वेळ फिरले होते याविषयीं आम्ही आपले मागील पत्रांत लिहिलें होतें. या नवीन व्यवस्थेपासून अधिक अव्यवस्था झाली. हें अधिकाऱ्यांस वाटून त्यांणीं पूर्ववत् वहिवाट चालविण्याचें ठरावून त्याप्रमाणें हाल्लीं वहिवाट चालली आहे.

---

विद्याखातें.— या खात्याचे डेरेक्टर मिस्तर हावर्ड यांची स्वारी मुंबईहून गेल्या सोमवारीं एथें आपल्या कचेरीसुद्धां येऊन पोंचली. पर्जन्य काळ अखेर होईतों येथें राहील. हल्लीं दक्षिणतुकडीचे इन्स्पेक्टर क्यापटन लेस्टर व त्यांचे सर्व डिपुटी इन्स्पेक्टर यांच्या त्याच्या तूर्त येथें आल्या आहेत.

---

सरकारचा असा हुकूम झाला आहे, कीं रस्ता चालू होतांच दिल्लीच्या राजाला कलकत्यास पाठवून द्यावें. त्याला कोणत्या ठिकाणीं कैद करून ठेवणार तें अद्याप समजण्यांत आलें नाहीं. केप आव गुडहोप येथें पाठवितील असें कोणी म्हणतात.

सरकारचा असा ठराव जाला आहे, कीं बंगालखात्याच्या आठ पलटणींच्या ठिकाणीं घोडेस्वारांच्या गोऱ्या पलटणी ठेवाव्या.

नागपुराजवळील चंद्रपरगण्याच्या जमीनदारानें रोहिले आरब वगैरे दंगेखोर लोक मोंगलाईतून जमा करून बंड केलें, आणि रेलवे खात्यांतील एक साहेब मारला. कमिशनर साहेब तिकडे लष्कर घेऊन गेले आहेत. आतां या जमीनदाराची धूळधाण होईल हें सांगायास नको. या मूर्ख लोकांस उगेंच बसून सुखाची भाकर खाववत नाहीं कोण जाणें? ज्ञा० द०

---

टेलिग्राफ पत्रकर्त्यांच्या समजण्यांत असें आलें आहे, कीं गुजराथमधील लोकांजवळून हत्यारें काढून घेण्याचें काम तूर्त सरकारानें चालविलें आहे. त्यामुळें तेथील लोकांमध्यें फार नाखुषी उत्पन्न जाली आहे. यामुळें तें पुढें चालवूं नये. हें बरें असी सर रिचर्ड मीड स्पियर याणें आपली इच्छा सरकारास प्रगट केली होती. त्याचा सरकारानें त्यास असा जबाब पाठविला, कीं ज्यापेक्षां तूंच पहिल्यानें त्या लोकांपासून हत्यारें काढून घेण्याविषयीं शिफारस करून त्या कामास आरंभ केलास. त्यापेक्षां आतां तसेंच तें पुढें चालवून शेवटास नेलें पाहिजे. धू० के०

## जाहिरात.

बाळाजी माहादेव रानडे मुक्काम पुणें सुदाशिव पेठ. बिऱ्हाड घारे यांचे वाड्यांत, यांशी. रिणको नाम सदाशिव नारायण घारे. कळवितों, कीं आमचें राहातें घर तुम्हांपाशीं गाहाण आहे. त्याबद्दल आपले रुपये २४७ व व्याज घेऊन आमचें घर खुलें करून द्यावें. न दिल्यास तुमचें व्याज आजमितीपासून बंद झालें असें समजावें. व शिवाय आमचें नुकसान जें होईल तें आजपासून तुम्हांपासून भरून घेऊं. तुम्हीं व दुसरी रिणको तुमची बहीण असल्यामुळें मिलाफ करून घराचा अभिलाष करावा अशी तुमची इच्छा आहे. याजकरितां व्याज कडून रुपये देववितों, त्याचे ताब्यांत घर व घरासंबंधी हिशोबाचे कागदपत्र कर्झा त्याचे हवालीं करावे. आणि रुपये घ्यावे. याजवर तुमचा काम जाब असेल तो पुढील गुरुवारचे पत्रांत याच पत्रकर्त्याचे द्वारें अम्हांस कळविला पाहिजे. ही नोटीस तुम्हांस कळावयाकरितां व सर्वांस जाहीर राहाण्यासाठीं दिली आहे. तारीख २० जून सन १८५८

सही सदाशिव नारायण घारे दस्तुरखुद्द.

---

ग्वालेर.— ग्वालेर बंडवाल्यांपासून सरह्यू रोझ याचे हस्तगत जाल्याबद्दल मुंबईचे गवरनर साहेब, व कलकत्याचे गवरनर जनरल साहेब यांस सरह्यू रोझ याजकडून तारायंत्रद्वारें खबरा पेऊन पोंचली. ती त्यांणीं सर्वांस जाहीर होण्याकरितां दिल्या आहेत. त्या येणें प्रमाणें

"मुकाम ग्वालेर येथील राजवाड्यांतून ता. १९ जून रोजीं गवरनर साहेब यांस कळविलें, कीं माझ्या हुकमतींत जें सैन्य होतें त्यानें साडेपांच तास पावेतों लढाई करून ग्वालेर शहर घेतलें. बंडवाले किल्ला सोडून चालते जाले, त्यांचा पाठलाग माझे स्वार व तोफखाना करीत आहेत"

"ता. २० जून रोजीं गवरनर जनरल साहेब यांस कळविलेले बातमींत विशेष कीं झांशीची राणी मारली गेली. हाली गवरनर जनरल साहेब असें फरमावीत आहेत, कीं दक्षिणेंतील सर्व प्रांतांत व हिंदुस्थानांत ही बातमी प्रसिद्ध करावी, आणि आमच्या इंग्रेजी फौजेच्या मारफतीनें शिंदे अलिजाहा बाहादर जो इंग्रेज सरकारचा शूर आणि इमानी दोस्त यांस पुनः त्यांच्या गादीवर बसविलें आहे. हें वर्तमान प्रसिद्ध करावें.

---

**आग.** येथें शनवार पेठेंत भावे यांच्या वाड्यांत गेल्या मंगळवारीं दोन प्रहरानंतर एक भाडेकरी गवळ्याचे कुडव्यास आग लागली. पोलिसानें तावडतोब विझविली. फार नाश झाला नाहीं.

हालीं येथें म्युनसिपाल कमिटी जाली आहे. आणि तिचा खर्चही मोठा वाढला असून अद्यापि यंत्र वगैरे शहराचे बचावाचीं मुख्य साधनें ही आणण्याची तजवीज जाली नाहीं. याचें कारण काय तें समजलें नाहीं. परंतु सदरहू कमिटीनें या बाबतींत अवश्य आणि सत्वर तजवीज करण्याविषयीं आपलें लक्ष पोंचवावें असें आमचें सांगणें आहे.

---

आम्हांस संतोषाची एक खबर लागली, कीं शिंदे महाराज अलिजाहा बाहादर यांस पुत्ररत्नाचा लाभ जाला. या गोष्टीस किती दिवस जाले हें खास समजलें नाहीं. परंतु तेथच्या धांदलींत हा लाभ जाला असावा असें अनुमान होतें.

---

हें पत्र ज्ञानप्रकाश छापखान्यांत कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांणीं छा-

# ज्ञानप्रकाश

सोमवार तारिख २८ माहे जून सन्न १८५८ इसवी.

### पत्राची किंमत.

१० दर साल रुपये. ९॥ आगाऊ दिल्यास रुपये.

### वसूल.

१० श्रीमंत राजश्री दिनकरराव दिवाणसाहेब निसबत शिंदे सरकार सन्न १८५८ चे तारिख ५ जून पर्यंत

१० बापूसाहेब वकील निसबत शिंदे सरकार मरहूम

### आगाऊ दिलेले.

९॥ अज्जमरूबराव कृष्ण मुनसफ कोर्ट सोदकी. सन्न १८५९ चे तारिख १७ एप्रील पर्यंत.

## ज्ञानप्रकाश तारिख २८ जून सन्न १८५८

टेलिग्राफ आधारें असें समजतें की, धारवाडास मिस्तर सी. फारबस आणि पुण्यास मिस्तर बकर हे जाइंट जड्ज नेमणार. ठाण्यास कोणाची योजना होणार हें अद्यापि समजलें नाहीं.

---

**हवा.**— गेल्या आठवड्यांतील रविवार, सोमवार आणि मंगळवार या तीन दिवसांत उष्णतेनें एथें फार बेजार केलें होतें. घर्म आंगांतून वाहात असे. वउफाडाही बहुत होत असे. तेणेंकरून एथील लोकांचे नेत्र वरचेवर आकाशाकडे पर्जन्यवृष्टीचें नोममान पाहण्याकरितां जात; परंतु क्वचित् शुभ्र अभ्रें मात्र इकडे तिकडे पांगलेलीं दिसत. मधून मधून कृष्णाभ्रें येत. परंतु तीं शुभ्राभ्रा खालून नैर्ऋत्य व पश्चिम दिशांकडून येऊन पूर्व व ईशान्य या दिशांकडे गमन करितांना दृष्टीस पडत. तेणेंकरून लोकांची निराशा व काळजी यास उत्तेजन येई. शुभ्र ढगें जीं दिसतात तीं कृष्ण ढगांपेक्षां अधिक फार असतात तेणें करून त्यांचें वजन कमी झालेलें असतें; आणि त्याच मुळें तीं आकाशांत दूर वर राहातात. कृष्ण वर्णियांत द्रवता विशेष असल्याकारणानें वउष्णता जाजती झाली म्हणजे हवेंतील द्रवांश कमी होऊन तिचें वजन कमी झाल्याच्या योगानें ते मेघ खालीं म्हणजे आपल्या पासून जवळ जवळ येतात. नंतर पर्जन्यवृष्टि होऊं लागते, असा एक विद्वानांचा सिद्धांत आहे. असो. गेल्या बुधवारा पासून तों रविवार पर्यंत एथें व आसपास वृष्टि चांगले प्रकारें जाली. कृष्णवर्ण मेघांहीं आकाश मंडित झालें असें. या दिवसांत क्वचितच सूर्य व चंद्र दर्शनें झालीं. बुधवारचे रात्री पासून तों शनिवारचे रात्रीं पावेतों एकसारखा वर्षाव होत होता. मधून मधून थोडा वेळ वृष्टि थांबे. कालमात्र उघाड बरीच होती. परंतु अद्यापि मेघांचें आगमन होत आहे. यावरून आणखी पर्जन्य पडण्याचा संभव आहे. हवा बरीच थंड झाली आहे. व लोकांच्या मुद्रा टवटवीत झाल्या आहेत. जरी आमचे डाकतर साहेब आजारी आहेत, तरी आमची प्रकृति आतां शीतता पडेल तसतशी बरी होत जाईल असें आम्हांस दिसूं लागलें आहे.

**कापसाचे गठ्ठे.**—मुंबईहून विलायतेस प्रतिवर्षी कापसाचे गठ्ठे ४७४०१० रवाना होतात असें गेल्या वर्षाचे हिशोबावरून कळून येतें. परंतु मागील वर्षापेक्षां या वर्षी ११२१६४ कमी रवाना जाले असें दिसतें.

दु. सा.

सरख्यालीन क्यांपबेल साहेब कम्यांडर इन्चीफ यांची स्वारी वाफेच्या गाडींतून अलाहाबादेस ता. ९ जून रोजीं दाखल झाली आहे. तेथें उष्णवायु भयंकर प्रकारचा मोठा सुटला आहे. सदरहू मजकूर इंग्लिशांच्या वर्तमानपत्रांतून आवझरवर आधारें कळत आहे.

आम्हांस सिंद हैदराबादे कडून एक गृहस्थ आला त्याचे सांगण्यावरून असें कळत आहे कीं, मेहरबान फ्रेयरसाहेब यांणीं तिकडील प्रांतांत उतारकरू लोकांस राहाण्याच्या जागांची मोठी अडचण पडत असे म्हणून सरकारांतून व गांवकरी लोकांकडून पैसा खर्च करून धर्मशाळा गांवोगांव बांधविल्या आहेत. आणि त्या स्वच्छ राहाव्या म्हणून त्यांची व्यवस्थाही उत्तम करून ठेविली आहे. यामुळें पांथस्थ लोक सदरहू धर्मशाळेचा उपभोग घेऊन साहेब महशूफ यांस दुवा देत आहेत. आमचे स्मरणांत असें येतें कीं, आसाहेब जेव्हां सातार जिल्ह्यांत कमिशानर होते, तेव्हां त्यांणीं अशाच धर्मशाळा गांवोगांव बांधविल्या. व याप्रमाणेंच जाहागीरदार लोकांसही तजविजीनें सांगून त्यांचे गांवींही धर्मशाळा बांधविल्या. हें काम प्रशंसा प्रकारानें आणि सर्वांस उपयोगाचें केलें.

---

**दवाखाना.**—येथील धर्मार्थ दवाखान्यावरील सब असिस्टंट सर्जन बाळकृष्ण विठोबा जोशी यांस आराम नसल्यामुळें त्यांचे कामावर नूर्तउत्तरभाग व दक्षिणभागचे रेविन्यू कमीशानर यांस प्रत्येकीं एक सब असिस्टंट सर्जन सरकारानें दिले आहेत त्यांपैकीं एकास नेमिलें आहे

**विलायत.**—चालू महिन्याचे अखेरीस विलायतेहून स्वार व पायदळ मिळून १०००० दाहा हजार लष्कर हिंदुस्थानांतील राणी सरकारचे फौजेस कुमक करण्याकरितां गलबतावर चढणार आहे. विलायतेहून डाकेची जी आगबोट नुकीच मुंबईस आली, त्या आगबोटींतून ४७१०००, रुपयांचें नाणें मुंबई इलाख्याकरितां आणलें आहे.

आवझ.

**आगबोट.**—विलायतेस हिंदुस्थानांतील नद्यांतून चालविण्याकरितां जहाजें कंपनीसरकारानें तयार करविलीं आहेत त्यांत दोन फारच चांगलीं आणि चमत्कारिक आहेत. त्यांची लांबी ७०० फुटांची आहे. त्यांचे निरनिराळे भाग साहा होतात, आणि त्यांतून पाहिजे तितके परस्परांचीं जुळून एक नौका करितां येते. कदाचित् नदींत खडक वगैरेचा अडथळा त्या गलबतास होऊं लागला असतां त्या जाहाजाचा एक भाग दुसऱ्या इतरभागांपासून निराळा राहातो. आणि या गलबताचा पुढील भाग आगबोट आहे. सदरहू जहाजांचे भाग सोपेपणानें बांधलेले असून तें हवें तिकडे वळवितां येतें. सदरहू मजकूर होमन्यूजच्या उतारणींतून घेतला आहे.

**विलायत.**— विलायतची डांक तारिख २९ मे पर्यंतची मद्रासेस आणि तारिख २ जून पर्यंतची मुंबई एथें आली. त्यांतून हशिलाचा मजकूर पाहतां विलायतेस पार्लमेंट सभेंत अद्यापि हिंदुस्थानचे पुढील राज्य व्यवस्थेविशीं वादविवाद जारीच आहे. अद्यापि तडीस तो वादविवाद गेला नाहीं. वास्तविक पाहतां हिंदुस्थानची व्यवस्था वर्तमानकाळीं कंपनीसरकारचे हातून जेवढी होत आहे, तिजहून अधिक व्यवस्था करणें तर, पोक्त विचार केलाच पाहिजे. कारण, राणीसरकारचा दरारा आपले कंपनी सरकारावर आणि हिंदुस्थानचे प्रजेस दाद मागणें जाल्यास आश्रयस्थान राणीसरकार आहे. तेव्हां त्या सरकारास हिंदुस्थानची आश्रित प्रजा आपले छापेखालीं घेण्याचे. राणीसरकारास सर्वोपरी उभयतांचा सुख वृद्धि होण्याचा विचार मनांत आणला पाहिजे.

कंपनी सरकारचे बोर्ड आफ् कंट्रोल नामें पगारी पंचांचे रिक्त मुख्य अध्यक्षाची जागा भरली. लार्ड स्टानली हे इंडिया बोर्डाचे मुख्याध्यक्ष झाले; आणि सर एडूवर्ड बुलवर लिटन यांस परदेशीय संस्थानांचे सक्रटारीचे जाग्यावर नेमिलें.

सरजेम्स औटराम साहेब यांस बारोनेटची विलायतेंतील [illegible] वडेलोकांची पदवी देणार असें म्हणतात.

---

ग्वाल्हेर, बंडवाल्यांचे हातांतून इंग्रेजसरकारचें हस्तगत जाली, नंतर इंग्रेजसरकारनें शिंदेमाहाराजांस पुनः सिंहासनारूढ केलें. या आनंदाप्रीत्यर्थ गेल्या मंगळवारीं एथें जनरल परेड म्हणजे लष्करी शिपायांची कवाईत जाली.

---

**पुणें एजेंट.**— मागें आम्हीं वडे लोकांचे पोषाकाप्रकरणीं लिहून कळविलें आहे; परंतु गेल्या सोमवारीं पोषाक बांटण्याचें काम, बाहेरून पोषाकांचे मानकरी यावयाचे सबब महकुफी होऊन पोषाक शिरस्त्याप्रमाणें उद्यां मिळणार आहेत.

---

गेल्या मंगळवारीं मेहेरबान ररकांड साहेब रत्नागिरी जिल्ह्याचे कलेकटर यांची स्वारी येथें आली. त्यांस मिळालेली रजा प्रायः ते तनदुरुस्ती करितां ते येथें घालवितील असें म्हणतात.

---

सरकारी ग्याझिटांत डांकेंतून बंग्या ठाणें, कल्याण, वासिंदें, खोपवली, खंडाळें, खडकी, अथवा पुणें या ठिकाणीं सरकारी बंग्यांतून घेतल्या जाणार नाहींत अशी जाहिरात डिपुटी पोष्टमास्तर याणें लाविली आहे.

---

**रत्नागिरी.**— तारिख २१ जून.— आलीकडे [illegible] पर्जन्य [illegible] पडत आहे; मिस्तर लाईड असिस्टंट जड्ज्य साहेब यांणीं दहा वाजतांच कोर्टांत येऊन चार वाजतां किंवा काम आटपल्यास पूर्वींही कोर्टाचें काम बंद करावयाचा क्रम चालविला आहे. तेणेंकरून सर्वांस सुख जालें आहे.

**फ्रेंड आफ् इंडिया.**— तारीख १० जून.— लेडी क्यानिंग गवरनर जनरल साहेब यांची पत्नी, इची स्वारी आलाहाबादेहून परत कलकत्यास जाणार आहे, म्हणून आगबोट तयार ठेविली आहे.— न्यूयार्क एथील जडज्य मिस्तर सिटीणकार साहेब यानें एका शिपाई सरकारास फार वाईट शब्द बोलल्यावरून त्यास सात वर्षांची [illegible].— इंग्लिशम्यान तारीख २९ मे.— गया येथें ६ असामी बंडांत मुख्य पुढारीपणानें काम करीत होते म्हणून त्यांस फांशीची शिक्षा मिळाली. पांजरपूर.— एशिया खंडांतील तुर्कस्थानचें आलेपो म्हणून एक मुख्य शहर आहे. तेथें एका गृहस्थानें पांजरापुरासारखी इमारत बांधली आहे. तींत ८००० आठ हजार माजरें ठेवून त्यांस खाणें पिणें घालीत असतात. त्यास आम्ही मार्जारपूर असें नांव देतों. त्यापराकडून कोणी लांबून येऊं लागला, कीं सर्व माजरांचा कलकलाट व मोठा गोंगाट त्यास ऐकूं येतो. हें ग्राम्य उंदरांनें काळ आणि कुतऱ्यांचें दास आहे. सदरई मजकूर गुजराथी स्त्रीबोधनमें बुकांतून घेतला आहे.

**नगर.**— तारीख १७ पावेतों येथें परजन्याचे दिवशीं फार काळोख पडतो, यामुळें जाणाऱ्यांस फार इजा होते, ती नव्हावी म्हणून छावणीच्या रस्त्यानें दिवे लावण्याचें काम पा. रघुजी सरकारानें केलें आहे.— गोलंदाजांची एक पांचवी कंपनी आदनाहून येथें येऊन दाखल झाली आहे. व गण्याकडील कांहीं पेनशनवाले लोक एथील कितीएक तालुक्यांत वांटून देणार आहेत, व कांहीं लोक नाशिकाकडे पाठविले.— इकडे पर्जन्याची दृष्टि बरेच वर होऊन धान्याचा भाव उतरला आहे. हिं. हि.

---

**बडोदें.**— तारीख १५ जून सन १८५८ येथें घोडयांचा तमाशा आला आहे. यांचा पहिला खेळ कालरोजीं येथें महाराज सरकारांनीं करविला. हा तमाशा फार उत्तम प्रकारचा जाला. कांपांतील सर्व साहेब लोक व रसिडेंट साहेबही आपल्या रिसाल्या सहित तमाशा पाहाण्याकरितां आले होते. महाराजांनीं तमाशाची जागा फार चांगली सुशोभित केली आहे; व हा तमाशा पाहाण्याकरितां महाराजांनीं आपले सरदार व मोठेमोठे कामदार वशिलेदार व सावकार यांजला आमंत्रणें करून बलाविलें होतें, व उभयतां दिवाणही हजर होते. पुढें आणखी दोन अगर तीन तमाशे होतील असें वाटतें. हा इंग्लिश तमाशा पाहून महाराज फार खुष जाले आहेत असें आम्हांस वाटतें.

"ग्याझेट" कर्त्यांचे ऐकण्यांत असें आलें आहे, कीं मुंबई प्रसिडेन्सीकरितां एक चवथा म्याजिस्त्रेट नेमण्याचा सरकारचा विचार आहे, आणि पोलिस आफिसाचा हेडक्लार्क मिस्तर ब्रौन व स्माल काझ कोर्टाचा तिसरा जज्ज शेठ माणकजी खरसेटजी, हे त्या नवीन हुद्याकरितां उमेदवार आहेत. हिं. हि.

**कोल्हापूर.**— श्रीमन्महाराज छत्रपती बाबासाहेब यांची (बडोदे येथील) राणी साहेब हीं गेल्या शुक्रवारीं दिवसास बारांवर तीन वाजतां प्रसूत होऊन पुत्र जाला. हें शुभ व आनंदकारक वर्तमान लिहिण्यास आम्हांस परम संतोष वाटतो. या पूर्वीं बाबासाहेब महाराज यांस तीन पुत्र होऊन ते अल्प वयींच हक्क जाले. हा चवथा पुत्र. हा तरीं दीर्घायु होवो. हेंच ईश्वराकडे मागणें आहे.

## बडेलोकांचें आगमन.

गेल्या आठवड्यामध्यें श्रीमंत उभयतां मिरजकर, व चतुर्वर्ग कुरुंदवाडकर, व सांगली संस्थानचे कारभारी शाहापूरकर, यांच्या स्वाऱ्या एथें येऊन दाखल जाल्या. ह्या स्वाऱ्या येथें येण्याचा मुख्य हेतु, मेहेरबान कर्नेल जेकब, स्पेशीयल कमीशनरसाहेब यांच्या मुलाकतीकरितां असावा. व त्या प्रमाणें मेहेरबान कर्नेल जेकबसाहेब व मेहेरबान मि॰ राबर्टसन पोलिटिकाल सुपरिटेंडेंट साहेब यांच्या भेटी घेऊन कालरोजीं त्यांणीं कचेरी करून साहेब मवसूफ यांस बोलावणें केलें होतें. या स्वाऱ्यांचा मुक्काम आणखी कांहीं दिवस एथें होईल असें म्हणतात.

**मुंबई.**— एथील सदर अदालतीचे वकील फकीर आपा यांजवर धारवाड जिल्ह्यामध्यें नरगुंद वगैरे बंडाईत सामील असल्याचा वहमा असून तो धारवाडाहून मुंबईस जात असतां त्यास सातारस मुक्कामीं धरून गेल्या मंगळवारीं एथें आणिला. त्या वरून दुसऱ्या दिवशीं एथून धारवाडाकडेस चौकशीकरितां रवाना केला. पुढें चौकशी अंतीं कसा निर्णय होतो तो पाहावा.— आमच्या ऐकण्यांत आलें आहे, कीं धारवाड एथील कित्येक सरकारी नोकर लोक बंडाईचे कामांत असल्याचे वहिमावरून कैद केले आहेत. आतां ही गोष्ट जरखरी असली तर सरकारी नोकर अशा भिंच व निमक हरामी च्या विकल्पानें आपल्या मनें विटाळूं लागल्यास सहज प्रायश्चित घ्यावें लागेल. हें सर्वांनीं खचित समजावें. व॰ सं॰

---

**आकट.**— सन १८५८ चा २० वा आकट ज्यारी झाला आहे तो बंगाल इलाख्याचे वायव्य प्रांतांत मुकता दंगा झाला त्या धांदलींत दुसऱ्याची मालमत्ता किंवा जमीन कोणी दाबली असल्यास ती पुनः चौकशी करून परत ज्याची त्यास मिळावी. या बाबे आहे, या चौकशीकरितां कमीशनर नेमणार आहेत. व सदहू आकट तीन वर्षमुदतीचा केला आहे.

आकट ११ वा जाला आहे तो, कंपनीसरकारचे अमलांतील जलमार्गानें सफर करणारे नेटिव लोक यांच्या गैरसोई कमी करण्याचे बाबतींत आहे.

---

पैमाष खात्याकडील सुपरवैझर, कलेकटर, डिपुटी सुपरिंटेंडेंट, व असिस्टंट, यांस सरकारी कामाबद्दल लखोटे हवील दिल्यावांचून पाठविण्याचा अधिकार दिला आहे.

---

१० नोव्हेंबरच्या रपोर्टांत लैब्रेरीचा मजकूर झाल्यापुढे तसा ठंकमेटीत मेंबर होते ते खाली लिहिल्याप्रमाणें

मेहेरबान गोल्डफिंच साहेब बाहादूर कलेक्टर मुख्य अध्यक्ष,

मेहेरबान कामटन साहेब जज्ज उपाध्यक्ष

सभासद.

१ मेहेरबान फेर साहेब डिपुटी कलेक्टर
१ अज्जम जगनाथ पांडुरंग हेडआकाउंट
१ मिस्तर सिल्वर साहेब हेड क्लार्क
१ मिस्तर मकासर साहेब जेलर
१ राव बाहादूर हणमंतराव पितांबर दसरदार.
१ रावसाहेब शामराव आपाजी सदरअमीन
१ अजम यशवंतराव बापूजी मामलेदार
१ अजम विनायकराव आपाजी मुनसीफ

कामदार.

१ रावसाहेब शामराव आपाजी खजीनदार
१ अजम विनायक आपाजी हिशेब तपासणार
१ मिस्तर सेनलेंड साहेब सेक्रेटर
१ अज्जम पांडुरंग भिकाजी लैब्रेरियन

या प्रमाणें वर लिहिलेले गृहस्थ पुढील सालासही कायम असोन वर लिहिलेले गाहीनासे कामें जाग्याची व्यवस्था व्हावी म्हणोन जे सेक्रेटर साहेब यानीं सूचविलें त्याप्रमाणें लोकीं ही कबूल करून नवीन दुसरे तीन गृहस्थ कमिटीचे मेंबर नेमिले त्यांचीं नांवे खालीं लिहिल्या प्रमाणें

१ अज्जम आत्माराम बापूजी नेटिव्ह डाकटर.
२ अज्जम बालकृष्ण सदाशिव इंग्रेजी स्कूलमास्तर.
१ अज्जम विठ्ठलराव गुंडो फौजदार.
१ मि० टामस मोर साहेब सेक्रेटर.

सदरहू ४ गृहस्थांस कमिटीचे व्यवस्थापक मंडळीचे सभासद नेमिल्या प्रमाणें त्यांनीं कबूल केलें.

८ शाळा व लैबेरी एका इमल्यांत असल्या मुळें शाळेस जाग्या मुळें मुलें अधिक होतील तर लैब्रेरीची जागा शाळे कडे घेऊन, लैब्रेरीस नवीन इमारत बांधून देण्याबद्दल गावकऱ्यानीं ग्रेन हजार रुपये फंड जमा करून इमारत तयार करावी असा जो ढराव मेहेरबान डायरेक्टर साहेब यानी कमिटी करून केला होता त्याप्रमाणें कितीएक लोकांचे मत नसून लैब्रेरी येथेंच असावी आणि शाळेस जाग्याची कमताई असेल तर या इमल्याचे पश्चिमे कडचे बाजूस इमलाथाटवावा त्याचे खर्चास गावकऱ्यानीं दिल्यास उत्तम असोन न दिल्यास शहर सुधारणीचे फंडा पैकीं खर्चास घेऊन इमला तयार करावा म्हणून सूचविल्यावरून कमीटीने कबूल केलें तें असें कीं, शहर सुधारणीचे फंडांतून देण्यास हरकत नाहीं तथापि सन १८५० चा आक्ट २६ सावा यास हा ठराव विरुद्ध असेल तर या खर्चा बद्दल सरकारची मंजूरी आणविली पाहिजे, याजविषयी इतर कमिटीदार यांचें ही मत घेण्यास प्रत्येका कडे पाठवावे.

९ इतिहासादि पुस्तकें आणि मासिक पुस्तकें विकत घेण्यास अशी एक योग्य युक्ति योजण्याचें मनांत येतें कीं, दाहा रुपयां पासोन पांच रुपये पर्यंत ज्या लोकांस पगार आहे त्यांजवर कमिटीस योग्य दिसेल त्याप्रमाणें दर शेकडा पट्टी बसवावी म्हणजे तेणें करून हा-

च्ही पैसा वर्गणीचा फंड विशेष जमा होऊन पुस्तकें व सामान खरेदी करण्यास सवड मिळेल तेणें करून लैब्रेरीचे स्थिती लवकर येऊन फार चांगलें होईल, म्हणोन सूचविलें त्यावरून कमिटीनें असें ठरविलें कीं, हें काम स्वसंतोषाचें असून धर्मादाया सारखें आहे यास्तव वर्गणी दारांवर आली पट्टी ठरविण्याचें कारण नाहीं. कदाचित् ज्या समयीं बुकें, व सामान घेण्याचें जरूर पडेल तेव्हां एक निराळें लिस्ट करून प्रत्येक वर्गणी दाराकडे पाठविलें असतां ते प्रत्येक गृहस्थ स्वसंतोषा प्रमाणें पैसा देण्यास कबूल करतील.

१० सन १८५९ सालची सभा झाली त्या समयीं साहेबलोक आदिकरून मोठे गृहस्था पासोन पुस्तकें किंवा पैसा याची देणगी बुध्याजाऊन मागून घेऊनये असा जो ठराव झाला होता तो रद्द असावा असें वाटतें कारण, त्यापासोन लैब्ररीचें नुकसान फार होतें म्हणून सूचविल्या वरून कमिटीनें ठरविलें कीं, जे गृहस्थ आपल्या स्वसंतोषानें लोकांस उपयोग व्हावा आणिखी आपल्यास लौकिक मिळावा या हेतूनें लैब्ररीस पैसा किंवा, पुस्तकें बक्षीस देतील तर त्यास हा ठराव प्रतिबंध करीत नाहीं.

पुस्तकालयांत इंग्रेजी आणि मराठी वगैरे पुस्तकें हल्लीं विद्यमान आहेत त्यांची संख्या खाली लिहिल्या प्रमाणें

| | | | |
|---|---|---|---|
| | इंग्रेजी पुस्तकें | १८० | मराठी |
| २९ | संस्कृत | ९ | कानडी |
| १८ | गुजराथी | ८ | फारशी |
| ३ | हिंदुस्थानी | | उग |
| | | ८ | ६३१ |

येणे प्रमाणें पुस्तकें आहेत.

या प्रमाणें अध्यक्ष साहेब यानीं ठराव वगैरे झाल्यावरून आसाहेब यानीं श्रम घेतले त्याबद्दल कमिटीनें व सर्व गृहस्थानीं त्यांचा आभार मानल्यानंतर ६ वाजण्याचे सुमारें अत्तर गुलाब व पान सुपारी रीती प्रमाणें होऊन सभा विसर्जन झाली.

सही मिस्तर टामस मोर आकूटिंग सेक्रेटरी यांची

---

## कालिकट

येथील चालत्या महिन्याच्या ३ रे तारखेचें वर्तमान आलें तें. गेल्या मंगळवारच्या स्टांडर्ड नामक पत्रांत लिहिलें आहे त्याजवरून कळून येत आहे कीं, तिकडे पावसाळा सुरू होऊन सुमारानें १५ दिवस जाहाले. अद्याप परजन्य एकसारखाच पडत आहे. पुष्कळ पाऊस पडल्यानें पाडी नामक धान्याचा फारच नाश झाला असें दिसून येतें. आणि धान्याची फार महर्गता झाली या कारणावरून गरीब गुरीब लोकांचे फार हाल होत आहेत. आणि हाई जितकी महागाई झाली आहे तितकीच हाऊ राहात नाही, तर दिवसानुदिवस अधिक अधिक माहागाई होईल असा अजमास दिसत आहे. एका पत्तेमारीचा [illegible] २०० पेल्या भरून कोचीन व्यापिकांमधीं जात असतां बुडाली. या पत्तेमारीवर १२००० रुपयांच्या किमतीचा माल होता आणि त्याचा विमा उतरलेला नसल्यामुळें सगळा तोटा मालकास सोसावा लागेल. व. दीपिका.

## किरकोळ बातम्या.

हेरात एथील कमीशनर कर्नल टेलर हा गेल्या मंगळवारीं "आसाई" आगबोटींतून इराण आखातांतून एथें आला.— साहारण प्रांतांतून कंपनीची कांहीं फौज एक वेळ गेली त्यावेळेस त्या फौजेमुळें तेथील कांहीं पिकाची खराबी जाल्यामुळें रयत लोकांचें नुकसान जालें असेल, त्याचें तें नुकसान भरून द्यावें असा गवरनर जनरल यानें हुकूम केला आहे.— बंगाल इलाख्या मधील तोफखान्याच्या खात्यांतील लेप्टेनंट ली. टी. विलोघ्बिजो दिल्ली एथें मरण पावला. त्याच्या आईला कोर्ट आफ् डरेक्टर्स यांहीं सालीना पंधराशें रुपये देण्याविषयीं ठराव केला आहे.— लालाजोती प्रसाद यानें सरकारच्या कंत्राटदाराचें काम पत्करून त्यांस जी मदत केली तीजबद्दल बक्षीसदाखल इंग्रेज सरकारानें त्यास ग्लेल्हेरच्या मुलखांत जप्त केलेले रोटा आणि पाटी या नांवाचे दोन गांव दिले आहेत.—बुलंद शहराचा डिपुटी कलेक्टर दुरगाप्रसाद यानें सांप्रतच्या बंडाच्या प्रसंगीं फार चांगल्या प्रकारची वर्तणूक केली म्हणून इंग्रेजसरकारानें त्यास पांच हजार रुपयांची खिलत देऊन त्याचा पगार दरमहा आठशें रुपये इतका केला आहे.— पेनिन्शुलर आणि ओरियंटल कंपनीची पाटिआला आगबोट गेल्या बुधवारीं सकाळीं मुंबईहून चिनेकडेस निघून गेली तींतून मालव्यामधील अफिनीच्या पेट्या १०५६ तिकडेस रवाना जाल्या.

अमरचिंदीच्या राजाचा तपास अजूनपर्यंत लागू न राहिला होता तो आतां लवकरच लागणार आहे. या राजाच्या तर्फेनें मुकदमा चालविण्या करितां एथील फाजदारी कोर्टांतील एक बालिस्टर मिस्तर बार्टन यास त्या राजानें निवडून काढला आहे.— गेल्या शनिवारीं बेरेनिसे आगबोट मुंबईस आली, तींतून कपूतान पिडिकोंब यांच्या हाताखालीं ७ व्या काळ्या पायदळ पलटणीच्या डाव्या विंगचे ४ आफिसर आणि ३५० शिपाई इतके लोक अमराबादेहून मुंबईस आले. ध्रू. के.

**पुणें म्युनिसीपाल कमिटी.**— या कमिटींत पूर्वी पंच सरकारानें नेमिले आहेत, त्यांशिवाय खालीं लिहिलेले साहेब लोक व हुद्याचे लोक पंच नेमिले आहेत.

१ एक्झीक्युटीव इंजिनियर पुणें व खडकी.

१ सिविल सरजन पुणें.

१ सुपरिंटेंडेंट पुणें पोलिसचे

१ मिस्तर डी. सी. आर लैडण फस्ट असिस्टंट कलेक्टर पुणें.

१ मिस्तर. आर. ह्यूईट असिस्टंट जड्ज पुणें

१ लेफ्टेनंट सी. जे. ग्रिफिथ इनाम कमीशनर उत्तर तुकडीचे.

१ लेफ्टेनंट पी. डांडस् असिस्टंट इनाम कमीशनर उत्तर तुकडीचे.

१ मिस्तर एच्. कोक. पुण्यांतील इंजनीयरींग शाळेचे सुपरिंटेंडेंट.

---

कोल्हापुराकडेस मृगाचा पर्जन्य नसल्यामुळें रोतें अगदीं वाळली होतीं, परंतु आर्द्रा नक्षत्राचा पाऊस पडल्यामुळें त्यांची फारशी खराबी होणार नाहीं असें कळत आहे.

## प्रसिद्धवातम्या.

**पाटणा.**— येथील ८ जूनची खबर अशी आहे, कीं बंडवाले कर्मनाशा नदी उतरून गाडनर मुकामीं गेले. तेथें ते कुमकव दारूसामान घेऊन मिळण्याची वाट पाहात आहेत. नंतर ते जंगलांत शिरतील असें म्हणतात. ते आपल्यांतून टोळ्या नदीपार करून बाकसर येथील बंगले जाळीत आहेत. त्या ठिकाणीं जनरल लुगार्ड यांणीं तारिख ७ मिनहूस सध्याकाळीं बादशाही ८४ वी पलटण, आणि कांहीं स्वार, व तोफा बरोबर घेऊन कूच केला आहे.

**आलाहाबाद.**— येथील ८ वे जून पावेतों वर्तमान कळत आहे, कीं काशीचे कमीशनर यांस अशी खबर लागली आहे, कीं ५०० बंडवाले शिपाई यांची टोळी काशी परगण्याची हद्द आणि कर्मनाशा नदी यांचे दरम्यान गाझीपूर परगण्यांतील गुळीच्या (निळीच्या) वखारी आणि बंगले जाळणार आहेत. याकरितां कर्नल कंबर्लीज यांणीं बंडखोरांस अडथळा करण्याकरितां एक फौजेची टोळी रवाना केली आहे.

**जालौन.**— सररावर्ट हामिलटन साहेब जालौने येथून ४ थे मिनहूस लिहितात, कीं ब्रिगेडियर स्टुअर्ट याचा कालम (सैन्यभाग) त्यादिवशीं जालन येथें होता. कर्नल राबर्टसन हे इंदोरकी येथवर ब्रिगेडियर स्टुअर्टची फौज त्यास जाऊन मिळे पर्यंत कूच करून लढ देणार आहेत.

**बांडा.**— येथून तारिख ६ जून पावेतों वर्तमान आलें आहे, कीं जनरल व्हीटलाक तारायंत्रद्वारें खबर लिहितात, कीं शीरशान याचे नजीक इंग्रेजी फौज आल्याचें वर्तमान ऐकून नारायणराव हा बंदीत झाला आहे. आणि त्या भोंवतीं वेढा पडून तो हल्लीं छावणींत प्रतिबंधांत आहे. तथील अमिसेंस डेव्हन हा बातमी देत आहे, कीं मार्तंडराव तात्या यांणीं मारें १०० जवानव दोन लहान तोफा आपल्या ताब्यांतील बरोबर घेऊन हमीरपूर जिल्ह्यांतील राहाट या ठिकाणीं हल्ला तारिख ७ मिनहूस केला. त्याजवर चिकारीच्या राजानें एक टोळी पाठविली. त्या परस्परांची लढाई होऊन मार्तंडराव तात्या मरणप्राय जखमी झाले; त्यांची ७० मनुष्यें मारलीं गेलीं, आणि २ तोफा घेतल्या या पुरुषास धरुण्याकरितां ५००० रुपयांचें इनाम लागलें होतें. आतां तो मेला असें वर्तमान समजत आहे

**बकसर.**— येथील वर्तमान काशीचे कमिशनरास असें लागलें आहे, कीं तारिख ४ थी जूनचे पुढें उमरसिंग याणें जगदीशपूर जंगल सोडून तो गंगेचा पूर्व तीरीं घीरनर या रछ्याजीक १० ० पायदळ ५०० स्वार यांसहित राहिला होता, त्याचा पाठलाग ७० शीख स्वारांनिशीं क्यापटन बालनर यानें विक्रमगंज येथून बकसार पर्यंत केला. बंडवाले यांचा उद्देश भागीरथी उतरून अयोध्येस परत जाण्याचा होता.

**सासीराम.**— येथून तारिख ७ जून

च्ये तेथील डिपुटीमाजिस्त्रेट यांकडील वर्तमान, की बंडवाल्यांचा मुख्य निशाणसिंग याची चौकशी तेथला कमिशनर गोरहअर सबब लष्करी अधिकाऱ्याकडून होऊन कोर्टमार्शलांत ठराव जाल्याप्रमाणें आजरोजीं सकाळीं त्यास तोफेच्या तोंडी उडविलें.

---

आलाहाबाद एथून ९ मिनहूचे खबरेंतील उमरसिंगाविषयीं गाझीपूरचे माजिस्त्रेटानें रिपोर्ट दिलेला लिहिला आहे, कीं तो घीरनर एथें मोठें सैन्य घेऊन अद्याप आहे. आणि तो त्याकरितां नौका जमवीत आहे. जे हेर येतात ते असें सांगतात, कीं या बंडखोरांचा गाझीपुरावर हल्ला करण्याचा मनसोबा आहे.

पंजाबा कडील अशी खबर आहे, कीं तारिख २ जून रोजीं बंडवाले शिपायांचे एका टोळीनें रावी नदी उतरून तेथच्या कालव्यावरील पुरभये मजूर यांस मेळ्यांत घेऊन माधवपूरचा बाजार लुटला. एका गोरे कारकुनास जाळलें. त्याची बायको व मूल आणि दुसरीं दोन मुलें मारून टाकलीं. त्या बंडवाल्यांवर मारा करून त्यांस हांकून लावलें. अगे ते सदर्हू नदी परतोन उतरत असतां एक दोन मारले गेले. व पुष्कळ बुडाले. अशी पक्की खबर लागली आहे, कीं काश्मिरचे महाराजानें या बंडखोरांतले पुरभये कडवां २५० असामी कैद केले आहेत.

सिरोहन एथचे नारायणराव व माधवराव यांची चौकशी होण्याकरितां बेडा त्या भोंवतीं पडला आहे. सिरोहन मुकामीं १८०० बंदुका, एक कोटी रुपये आणि शिवाय मोलवान् असा सांपडली आहे.

तारिख १० मिनहूची खबर, गाझीपुराकडील बातमी अशी आहे, कीं ७ किंवा ८०० बंडवाले रुसड्याच्या उत्तरेस चालते झाले, आणि उमरसिंग हा त्यांस जाऊन मिळण्याकरितां ती नदी उतरत आहे असें वाटतें. त्याचे बरोबर दोन तोफा जाघुली एथेंकरून घेतल्या त्या आहेत.

ब्रिगेडियर डुग्लास हा आजरोजीं बक्सार एथें होता

तारिख ११ मिनहूची खबर कीं, त्याच रोजीं सकाळीं असें वर्तमान येऊन पोंचलें कीं, उमरसिंगाचे हाताखालचे बंडवाल्यांनीं बनारसेवर हल्ला केला असावा; परंतु बनारसेहून आजच दोन प्रहरांनंतर तारायंत्रद्वारें खबर आली, त्यावरून समजतें कीं, उमरसिंगाची टोळी गाझिपूर परगण्यांतील झमिनार ओलांडून उत्तर दिशेनें चालती झाली. आणि पुढें ती सय्यदपूर भित्रा परगण्याचे त्याच नामाचे तालुक्यांतून चोचकपूरचे घाटानें जाऊन गंगानदी उतरले. आतां ते कोणत्या दिशेनें जातील हें समजलें नाहीं, परंतु बहुधा अयोध्येस जातील. आब. ए.

मीनपुरी—एथील १८ चे जून पावेतों खबर समजण्यांत आली आहे कीं, सुमारें १०० पासून १५० डेकोइती स्वार व पायदळ यूंनीं दोकोबादेचे नजीक साधोपूर म्हणून गांव आहे, त्याजवर हल्ला केला. हे डेकोइती लखचा आहिया, या लुटारूंचे टोळी पैकीं असावे असें वाटतें. तेथचा तहशीलदार पणें त्या लोकांस अडथळा करण्यासाठीं एक टोळी

उभारली आहे. परंतु आग्र्याहून जाणारे येणारे वाटसरू यांणीं जपून असण्याविषयीं त्यास ताकीद दिली पाहिजे. तारिख ७ जून रोजीं मीनपुरी एथें मोठी नवलाची रव्यापेक्षां जाजती वाढवलेली गोष्ट झाली कीं, बर्कंदाजांपैकीं एकानें बेफाम होऊन ५ दुसरे बर्कंदाजांस जखमी केलें, व ठार मारलें.

आम्हांस आमच्या एका बातमीदार मित्रानें आग्रा एथून ग्वालेरीविषयीं वर्तमान मेहेरबानी करून लिहिलें तें येणेंप्रमाणें. "मुकाम आग्रा ता. १० जून सं. १८५८

१ काल्पीहून पळून आलेले बंडवाल्यांनीं ता. १ माहे मजकुरीं ग्वाल्हेर शहर आपले हस्तगत करून घेतलें. महाराजसाहेब यांची फौज पाहिलीच फितलेली होती; परंतु बरोपस्वारी मात्र माहाराजसाहेबांस इमानीपणा दाखवीत होती. ग्वालेरीस ता. १ रोजीं मुरार छावणीजवळ माहाराजसाहेब यांचे जातभाई बाडिगार्ड (बारीघाट) स्वार व बंडवाले यांजमध्यें थोडे वेळपर्यंत लढाई जाली, परंतु पलटणी लोकांनीं त्यास बिलकुल मदत नकरितां उलटे तमाशा पाहात उभे राहिले. आणि शेवटीं त्यांस मिळाले. महाराजसाहेब दिवाण आदिकरून ३०-४० मंडळी आग्र्यास पळून आली आहे. बाईसाहेब व इतर खटलीं शिपरीकडे पळून गेलीं. बाकीचे लोक खटल्यानिशीं ग्वालेरीस राहिले आहेत.

१ ग्वाल्हेरीस इंग्रेजी फौज तीन बाजूनें येत आहे. आग्र्याहून कांहीं फौज आज रवाना जाली. काल्पीकडून आलेली फौज इंदुरखी [illegible] राहिली असून मागून पुराव्याची वाट पाहात आहे. तसेंच शिप्रीकडूनही फौज येत आहे. सारांश १०-१२ दिवसांत ग्वालेरचा बंदोबस्त होईल.

१ बंडवाल्यांमध्यें झांशीची राणी, बांद्याचा नबाब, नानाचा पुतण्या, आणि तात्या टोपे प्रमुख आहेत, त्यांणीं ग्वाल्हेरीस धामधूम चालविली आहे. सरकारी खजाना लुटला. घोडे व हत्ती जप्त केले. आणि नवीन राज्य स्थापनेचा घाट घालीत आहेत. असो!!

## नेमणुका.

२ रे किंवा ग्रेनेडियर कालेपायदळ पलटणचा कप्तान जे. ब्लाक यांस महीकांठ्याचा अक्टिंग असिस्टंट पोलिटिकाल एजंट, व त्याच प्रांतांतील गायकवाड काँटिनजेंटच्या कोट्याचा सुपरिंटेंडेंट क्यापटन डाईली कामठण गेरहजीर आहे पर्यंत किंवा दुसरा हुकूम होई पर्यंत नेमलें आहे.

— नेकनामदार गवरनर इन् कौन्सल नें मेहेरबान होऊन खालीं लिहिलेल्या अंमलदारांस सन्न १८३५ चा आक्ट १४ याअन्वयें असिस्टंट माजिस्त्रेटचा आणि सन्न १८५१ चे आक्ट ४ कलम ४ बरहुकूम तपासणी त्याचे खेरीज करून पूर्ण माजिस्त्रेटीचा अखत्यार दिला आहे. त्यांचीं नांवें.

पो. असि. सुपरिंटेंडेंट

| नांव | ठिकाण |
|---|---|
| मेजर आरथर | नगर. |
| क्यापटन केंबाल | पुणें. |
| क्यापटन ग्राहाम | भडोच |
| लेफटेनंट हारपर | रत्नागिरी. |

लफ्टेनंट ध्यान्वर.

आणि कपतान पालीन खान [illegible] पहिले भिल पलटणीचा दुय्यम [illegible] चालविणारा.

रत्नागिरीचे कलेकटर मिस्तर डब्ल्यू जे० टरकांड यांची रजा ७ महिने [illegible] वाढवयाची; परंतु त्यांणीं आपले कामाचा चार्ज त्यांचे व हाताखालचे फस्ट असिस्टंट मिस्तर जी० स्काट यांस ता० १६ मिनहूस दिला. —अहमदनगरचे कलेकटर आणि माजिस्त्रेट यांचा ३रा असिस्टंट मिस्तर ए० टी० क्राफर्ड यांस नेमिलें. — नेकनामदार गवरनर इन् कौन्सल यांणीं मेहेरबान होऊन पब्लिक वर्केस खात्यांत नेमणुका केल्या त्या.

मेझर सी० एफ० नार्थ यांस सेंत्रल सरकलचे सपरिंटेंडेंट इंजनियर नेमिलें, व त्यांणीं तूर्त या इलाख्याचे दगडी व सरकारी किल्ल्यांचीं कामें पाहावीं. — लफ्टेनंट ई० सोदी यांस तूर्त त्याचे कामाखेरीज गोदीचे इंजनियर नेमिलें. — कप्तान सी० स्काट यांस कराची बंदर व ठाणें यांचा एकझीक्युटीव्ह इंजनियर नेमिले, तूर्त पुणें आणि खडकीचे आक्टिंग एकझीक्युटीव्ह इंजनियर नेमिलें. — मिस्तर [illegible] यांस दुसरे क्लासचे सब इंजनियर नेमिलें. — मिस्तर एच्० विकटर यांस ३रे क्लासचे सब इंजनियर नेमून त्यांणीं पुण्यांत सरवेयर व मिस्त्री शाळेवरील सपरिंटेंडेंटचे हुकमांत काम करावें. — मिस्तर बाळ कृष्ण देव बापू यांस सबरवेझर नेमिले. — मिस्तर राजी नीलकंठ नगरकर यांस असिस्टंट सबरवेझर नेमून त्यांणीं पुण्याचे सरवेयर शाळेंत राहून काम करावें. — खेडयाचे कलेकटरीकडे अंज्जाम विनायक दिवाकर दुसऱ्या प्रतीचे प्रोबेशनरी मामलेदार मुंद्रा येथील यांस नडियाद येथें १ल्या प्रतीचे मामलेदार नेमिलें.

---

**पुणेंसेशनकोर्ट.—** तारीख १४ जूनचे ज्ञानप्रकाशांत कैदी भाऊ बिन हरी कडू राहाणार मौजे म्हसवली इलाखा पंतसचीव. यांणें आपले बहिणीचे पुतण्यास विष देऊन मारलें, हा अपराध येथील सेशन कोर्टांत शाबीद सबब मंजूरीकरितां सदरफौजदारी अदालतीस रवाना जाला होता. तेथें कैदीवर शाबीद नाहीं, सबब सोडून देण्याविषयीं हुकूम होऊन कैदी गेल्या गुरुवारीं खुला जाला.— आणि दुसरा बंडाम करणीं खोटे कागद, जाहीरनामे, बनविणार खेड तालुक्यांतील कैदी सखाराम बिन तुकाजी पानवंद थाजवर येथील सेशनांत चौकशी होऊन तो अपराधी सबब फांशीची शिक्षा ठरवून मेहेरबान जड्ज साहेब यांणीं सदरहू शिक्षा बाहाल होण्याकरितां सदरफौजदारी अदालतीस लिहिल्यावरून तेथें चौकशी अंतीं निकाल जाला कीं, सदरहू कैदीवर गुन्हा ठेवणें तो बंडाम करणी नवीन आक्ट जाला आहे त्या अन्वयें चौकशी करावी. म्हणून लिहून आल्यावरून सदरहू कैदीस चौकशी करण्याकरितां माजिस्त्रेटाकडेस रवाना केला आहे.

---

पंजाबामध्यें इंग्रेजसरकारानें दरसाल दरशेंकडा साहा टक्क्यांच्या व्याजानें [illegible] काटलेला पैका परत देण्याविषयीं सरकारानें आपलें संमत [illegible] आहे.

हें पत्र ज्ञानप्रकाशाचा छापखान्यांत [illegible] पुणें [illegible]

# ज्ञानप्रकाश

गुरुवार तारिख १ जुलई सन १८५८ इसवी.

## जाहिरात

१ बापू गंगाराम परदेशी. शुक्रवार.
१ रावजी भिकाजी गांडापूरकर पेठरविवार.
१ भाऊ बिन खंडापा संपेकर पेठरविवार.
१ भागचंद भारमल चौधरी. पेठरविवार.
१ एसू बिन काशीबा गुंजाळ पेठशनवार
१ विठोबा बिन रामजी शिंदे. पेठरविवार.
१ मारोपरशराम काणे यांचे यत्नीनें इंद्रगीर गुरु खडकगीर गोंसावी.

तुम्ही व आम्ही लिलावांत घेतलें घर तारिख १६ माहे एप्रेल रोजीं म्युनसिपाल सदर अमीन कोर्टांतून व्यंकोजी मेहरजी पारशी यांचें घर पेठ रविवार येथील रुपये ७६०० यांस भागीनें घेतलें. पैकीं भागचंद खेरीज बाकीस कळावें कीं, सदरहूचे भागाप्रमाणें रुपये तुम्ही न दिल्यामुळें मजला सरकारांत भरणें आल्यामुळें आज मितीपर्यंत व्याज मनूती स्टांपाचे वगैरे रुपये ७६० १५२ ४४ मिळून रुपये जाले. ८५५६ असून

तुम्ही कोणी पैसा दिला नाहीं सबब आजपासून तीन दिवसांचे आंत सदरहूचे हिस्सरशीदीनें आपले भागाचा पैसा दयाराम आत्माराम याचे दुकानीं तुम्ही आमचे नांवें जमा करून न देवाल तर, आम्हांस कळेल त्या रीतीनें वाड्याची विक्री आम्हीं करूं आणि तोटा तुम्हांस भरून द्यावा लागेल. तारिख १ माहे जुलई सन्न १८५८ इसवी

पुणें सही सखाराम पांडुरंग देवळणकर

## जाहिरात.

आम्ही हिंदु नाटककार जे येथें दोन वर्षांपूर्वी आलों होतों, व नवीन नाटकगृह बुधवार पेठेंत बांधून ११ खेळ केले तेच आतां येथें पुन: आलों आहों. व नाटकगृह त्याच जाग्यावर बांधलें आहे. तर येथील सर्व लोक आम्हांस मागच्या प्रमाणें उदार आश्रय देतील अशा भरंवशावर येथें चार महिने नाटकें सुरू करणार आहों. आमचा दुसरा खेळ येत्या शनवारीं म्हणजे ता० ३ जुलई संन १८५८ रोजीं होईल. या वेळीं आम्ही लोकप्रिय व मनोरंजक असा सुलोचना अप्स्यानाचा खेळ, सतीजाण्याचा भाग प्रत्यक्ष दाखविला जाईल. या प्रसंगीं सर्वांनी आम्हांस उदार आश्रय द्यावा. व बायकांस बसावयास माड्या दोन निराळ्या केल्या आहेत. व सालमजकूरचे नाटकगृहांत विशेष चमत्कार केले आहेत. पुणें तारिख १ जुलई सं० १८५८

सही गोविंद भट गोरखले निसबत नाटक मुंबई

जाहिरात. सदाशिव नारायण घारे यांस उत्तर कीं, आमचें घर गहाणावरील रुपये व्याजसुद्धां फडशा जाली म्हणजे घर खुलें करून देऊं असा तुमचा व पार्वतीबाईचा खतांत करार आहे. त्याप्रमाणें रुपये आम्हांस दिले म्हणजे उभयतां रिणको यांचें घर खुलें करून हवालीं करण्यास तयार आहों. असें पूर्वीच तुम्हांस समक्ष बजावलें आहे पुणें. सही बाळाजी महादेव रानडे दसुरखुद.

**ग्वालेर—** इंदुराहून कप्तान हचिन्स यांणीं तारिख २७ माहे जून रोजीं ११ वाजतां मुंबईचे गवरनरसाहेबयांस पाठविलेली खबर कीं, जूनचे २० वे तारिखेस सिंदे महाराज आपले राजवाड्यांत गेले, तेव्हां त्यांचे समागमें बादशाही ८ वे हूजार्स व १४ वे लैटडूगून्स स्वार, ७१ वे हैलंडर्स (पागरेषाले) आणि ८६ वी, व ९५ वी पायदळ यांचे लोक होते. कित्येक दुष्ट बंडखोर किल्ल्यांत राहिले होते. त्यांणीं या समारंभानें चाललेल्या लोकांवर गोळ्या झाडिल्या, परंतु कोणाएकासही नुकसापत झाली नाहीं. शिंदे सरकारांनीं आपले फौजेपैकीं कांहीं लोकांस, त्या किल्ल्यांतील लोकांस घालवून किल्ला खालीं करण्यासाठीं हुकूम दिला. या लोकांनें कुमकेस मुंबईचे २५ वे काळे पायदळ पलटणीची एक कंपनी दिली होती, व तिजवरले लेफ्टेनंट रोझ यांस नेमिलें होतें, त्यांस त्यांचे पाठीला आसन्न मरण जखम लागली. तिच्या योगें ते २१ जून रोजीं मरण पावले. ग्यारिसनचे चबहा लोकांस तरवारीनें मारिलें. तेथचे बंडखोर करवलीचे रस्त्यानें पळून गेले. ब्रिगेडियर जनरल नेपियर हा त्यांचा पाठलाग करीत आहे. तोफा वगैरेचे आवाज ऐकूं येतात, परंतु त्यावाबद कच्चा मजकूर सरावर्ट हामिल्टन साहेब यांस छावणींतून डाक, २१ जूनचे तिथेपर्यंत लिहून आला नाहीं.

**गुणा—** एथून कपतान मेनी यांणीं मुंबईचे गवरनरसाहेबांस तारिख २७ जून रोजीं संध्याकाळीं खबर कळविली कीं, आपले पाठलाग करणारे फौजेचे टोळ्यांनीं ग्वालेरचे बंडवाल्यांस चहूं कडे पळवून लाविलें. नेपीयर साहेब त्यांचे मागें आहेत व त्यांणीं २५ तोफा घेतल्या आहेत. एका बाजूनें सरह्यूरोझ साहेब आणि दुसरे बाजूनें हैदराबाद कांटिंजेंटचे लोकांनिशीं कप्तान हेर यांनीं २४ वे जून रोजीं चाल केली. आणि ते गुणा वसिधी या बाजूनें इलिचपुराकडे येणार आहेत.

---

**मृत्यु—** बादशाही गोरे पागरीपलटणचा लेफ्टेनंट विंडहमनीज हा १६ वे जून रोजीं ग्वालेरीस बंडवाल्यांबराबर लढाई चालली असतां तींत मारला गेला, असें पुणें आबझरावरून कळतें.

---

आपले मुंबईचे नामांकित सावकार सरजमशेटजी जिजीभाई नैट यांचा पुतळा बनविण्याकरितां आपल्या हिंदुस्तानांत व विलायतेंत वर्गणी मागें जमा जाली. त्या वर्गणीचा पैका त्या कामाकडे लागून विलायतेस सदर्हू पुतळा बनावून तो गलबतांवर चढविला. असें विलायतेचे खबरपत्रावरून आमचा मित्र दूतसारकर्त्या याणें लिहिलें आहे. सदर्हू पुतळा मुंबईचे बंदरीं येऊन दाखल झाल्यावर त्याची प्रस्थापना तेथील टौनहालांत होईल.

हल्लीं कोल्हापुरास तेथील कारकून लोकां-

ज्या परीक्षा कमेटी भरून चालल्या आहेत. इकडे काजीवगैरेकडे कारकून किंवा उमेद्वार यांच्या परीक्षा दोन दोन वर्षांनीं होतात. त्याप्रमाणेंच पुरीक्षेचा प्रायः प्रकार चालल्यानें वर्तमानसंग्रहात्मक कळतें.

रेलवे.— या कंपनीस चालू महिन्याचे सातवे तारखेपासून एका आठवड्यांत १६४७१, उतारूपासून ८६७० रुपये, उत्पन्न जाले, आणि मालाचे उतारापासून ८११९ मिळून एकूण १६८६९ रुपये जमा जाली. सालगुदस्ताचे याच आठवड्याची जमा सदरील जमेशीं लावून पाहिली असतां यावर्षी २६२१ रुपये कमी आकार आला असें समजतें.

हितोपदेश.— गेल्या गुरुवारीं व शनवारीं एथील विद्यालयांत मेहेरबान डेरेक्टर हावार्ड साहेब यांची स्वारी गेली होती. शनवारीं त्यांणीं तेथील मुख्य विद्यार्थी यांस जमवून लेसनपद्धति व भाषांतर याविषयींवर सुरस भाषण केलें. गुरुवारीं शिक्षक व विद्यार्थी यांस बसवून त्यांसमक्ष सांगितलें कीं मी या हुद्यावर आल्या दिवसापासून बिननांवाच्या अर्जी महिन्यांतून निदान दाहा बारा तरी येतात. असें पाहातों. त्यांत कांहीं इंग्रेजी व मराठी असतात. त्यांत किल्येकांची भाषा वाईट असते. असो. या अशा अर्जी पाठविणें हें अतिनीच व अतिनिंद्य कर्म होय. इंग्रेजींत विद्या शिकलेले लोकांनें हें असें अयोग्य आचरण असणें ही मोठी दुःखदायक गोष्ट आहे. पण माझी खात्री आहे कीं, चांगले शिकलेले विद्वान लोक या अशा गोष्टीस कदापि अनुसरणार नाहींत. आतां तुम्हांतून मनुष्यपणास अनुचित जें हें कर्म कोणी करीत असतील, त्यांणीं हें सर्व थेंव सोडून कोणास कांहीं बोलावयाचें असेल तर समक्ष येऊन बोलावें.

या आमच्या लोकांत अशीं नीच कर्में करणारीं माणसें अझून बरींच आहेत. बिननांवाच्या अर्जा पाठविणें, अयोग्य जाहिरनामे प्रसिद्ध जाग्यांत उकविणें, अयोग्य पत्रें कोणा संभावितास लिहिणें हे प्रकार अझून फार आहेत. पण असें करणारे लोक आपला भित्रेपणा, दुष्टपणा, अज्ञान, आणि तस्करपणा. हे दुर्गुण प्रकट करून दुसऱ्याचे मनांतून ते उतरून जावे असें ते आपल्यास आपणच करून घेतात. या शहरांत असे लोक फार आहेत. आणि त्यांस किलेक खानदानीचे मनुष्यांची प्रसंगीं कुमकही मिळते. असें शोधांतीं कळून येतें. प्रायः अर्जा बिननांवानें पाठविणारे लोक देशावरावरील येथें जमलेले त्यांपैकीं असतात. असें तपासांतीं कळून येतें. त्यांस कोणताही दुसरा चांगला धंदा करण्याचा आळस वगैरे मतलबें याचें कारण त्यांस मुळापासून हा टाकाबूनीच धंदा करून आपला गुजारा करण्याची सवई झालेली असती. या अशा लोकांस जे कोणी सल्ला वगैरे देण्याची मदत करितात, ते ही उपहासास पात्र व समागमास त्याज्य, असें सुज्ञांनी समजलें पाहिजे. जे अयोग्य गोष्टीस

त्यांचीनें मदत करण्यास राजी होतात, ते आपल्या शत्रूशीं त्यांचीनें फितूर होऊन आपल्या विरुद्ध आचरण करणार नाहींत असें कोणींही समजूं नये. हा आमचा उपदेश कामगार व खटपटी व शहाणपणाची घमेंड बाळगणारे गृहस्थ यांनीं स्वीकारावा. आणि खरे शूर जसें सामना करून आपली हार किंवा जीत दाखवितात. तद्वत् कोणाचें खरें वैगुण्य असल्यास समक्ष होऊन दाखवावें. हा खोटा व चोरटा व्यापार करण्यांत कांहीं उपयोग नसतो.

---

## ज्ञानप्रकाश कर्ते यांस.

विशेष आपल्या लोक हितेच्छु सुंदर पत्रांत थोडासा मजकूर लिहून पाठवितों तो कृपा करून येत्या अंकांत छापून प्रसिद्ध करावा. मी मागील रविवारीं म्हणजे तारिख २० माहे जून संन १८५८ इ॰ रोजीं सायंकाळीं येथील सरकारी इंग्लिश शाळेंत सभा भरली होती ती पाहाण्यास गेलें होतों. ती सभा भरण्याचें कारण येथील सरकारी मराठी नंबर २ चे स्कुलमास्तर वेदशास्त्र संपन्न राजश्री गोपाळ बापूजी शास्त्री यांची बदली नाशिक येथें जाली. यांनीं येथें जे लोकांवर मुख्यत्वें करून येथील विद्यार्थ्यांवर उपकार केले. ते विद्यार्थ्यांनीं कृतज्ञपूर्वक स्वमुखें सर्व लोकांत प्रकट करावे, या हेतूनें भरली होती. सदर्हू सभेंत रावबाहादूर डेपुटी कलेक्टर, खानबाहादुर नेनसीण — सदर अमीन, मुनसफ, मामलेदार, शाळी फौजदार आदिकरून तमाम अमलदार लोक, व शेटसावकार आल्यावर प्रथम विद्यार्थ्यांनीं स्कुलमास्तर यांचे गुण, उपकार, लोक-सुधारण्याचे कामांत मेहेनत वगैरे, सर्व दर्शित केल्यावर, रावबाहादुर रामचंद्र अमृत डिपुटी कलेक्टर, व रावसाहेब सदाशिव बल्लाळ मुनसिफ यांणीं ही त्यांचे गुण व उपकार यांजवर, व थोडेसें लोकोपदेशपर सरस संभाषण केलें. नंतर पानसुपारी गुलाब अत्तर हारतुरे वगैरे वांटून, व स्कुलमास्तर यांस विद्यार्थ्यांनीं पागोटें बांधून सभा विसर्जन जाली. सदर्हू मास्तर यांची स्थलांतरीं योजना जाली म्हणून येथील सर्व लोकांस भावी वियोगामुळें फार गहिंवर वाटत आहे. कळावें.

मुकाम नगर ता. २९ जून संन १८५८ इ. } आपला एक सभेचा चमत्कार पाहाणारा नगर रहिवासी.

---

नागपूर — एथून ११ जून पावेतों जी फ्लोडन साहेब यांजकडून सरकारी खबर आली आहे कीं, चंदरपरगण्यांतील आरपिलीचा बंडखोर जमीदार व्यंकटराव यास अहिरीची जमीनदारीण लक्ष्मीबाई हिचे नैनातेंतील लोकांनीं पकडलें आहे. उभयपक्षाचे लोक मारले गेले, व जखमी जाले. या खेरीज विशेष कांहीं कळलें नाहीं. आव॰

बंबेग्याझीटच्या समजण्यांत दिल्ली ग्याझिटावरून असें दुःखकारक वर्तमान आलें आहे कीं, मिस्तर सी. सी. जाकसन आग्र्याचे सदर बोर्डांतील मेंबर हे ता. १३ जून रोजीं मरण पावले.

---

हें पत्र ज्ञानप्रकाश छापखान्यांत कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांणीं छा

# ज्ञानप्रकाश

सोमवार तारिख ५ माहे जुलई सन् १८५८ इसवी.

पत्राची किंमत

१० दरसाल रुपये. ९॥ आगाऊ दिल्यास.

## ज्ञानप्रकाश ता. ५ जुलई सन् १८५८

**ग्वालेर.—** एथील माहे मजकूर १लीचे मुंबई ग्याझिटांत त्याचे मद्रूचे बातमीदारानें मजकूर लिहून पाठविला आहे कीं, रजपूतस्थानांतील लढाऊ फौजेचा कालम जो ब्रिगेडियर स्मिथ याचे हाताखालीं आहे, तो कोट्याचे सराई (उतारूकरितां धर्मशाळा) एथें आन्हून १७वे गुदस्तरोजीं घेऊन दाखल झाला. तेव्हां त्यांस ग्वालेरीजवळील एका मजबूत ठाण्यांत बंडवाले आढळले. बादशाही ९५वे व १०वे काळेपायदळपलटणींनीं जीं ठाणीं बंडखोरांपाशीं होतीं तेथपासून मागें दोन मैलांवर असून आपले ब्यागनेटांचे जोरानें चाल करून गेले. बादशाही ८वे हुजार्स, यांणीं ३रा घोडेस्वारांचा तोफखाना व सदरील पायदळ यांचे मदतीनें ग्वालेर कांटिंजेंटचे लोक जे बंडखोरांचे छावणीचे उजवे बाजूस होते त्या मोठे फौजेवर निकरानें मारा चालविला. त्यांत ९५वे पलटणीचा लेफ्टेनंट रिडली हा मारला गेला. व लेफ्टेनंट कीलाह जखमी जाला. आम्हीं असें ऐकतोंकीं, झांशीचे राणीनें अस्मानी रंगाचा आंगरखा, तांबडी तुमान असा वेष पालटून एका आरबी घोड्यावर बसली होती, ती एका खोल व कठीण चरांतून जात असतां तिच्यानें जावेना, अशा संधींत ती मारली गेली १९वे व २०वे जूनला ब्रिग्रूरोझ याचे फौजेचे तुकडी जी १८वे मिनहूस कोट्याचे सराईस घेऊन दाखल जाली होती. तिनें ग्वालेर सगळें शहर व किल्ला सर केला. असें एकसारखें आम्हीं ऐकतों. या खेरीज विशेष वर्तमान ऐकण्यांत आलें नाहीं. १ले लान्सर्स (भालेवाले स्वार) पलटणीचा लेफ्टेनंट मिल्स, आणि २५वे मुंबई काळे पायदळ पलटणचा लेफ्टेनंट रोझ हे मारले गेले, आणि कर्नल रेन्स, व कपतान सेक्स्टन ९५वीचे आणि कपतान आंडरसन १ले लान्सर्सचा हे जखमी झाले आहेत. उष्णकाळ गोरे लोकांस उष्णतेच्या जोरामुळें पीडा नेहमीं होत असते. तरीं या प्रसंगीं शत्रूंपासून आपला नाश जाला तो फार थोडा आहे, असें ऐकतों. २०वे जूनरोजीं सकाळीं आपले सर्व फौजेच्या समक्ष शिंदे सरकाराला पुनरपि स्थानापन्न केलें.

---

**विवरा.—** एथून २९वे जूनला मुंबईचे गवरनरांस खबर तारायंत्रांतून आली आहे कीं जनराल नेपियर याणें बंडखोरांच्या चवतीस तोफा व दारू वगैरे युद्धोपयोगी सामान घेतलें. व त्यांचे पळणारे लोकांतून पुष्कळ लोक मारले.

## प्रसिद्ध बातम्या.

**आलाहाबाद.**— एथून १२ वें जूनचें वर्तमान आलें आहे कीं, मीनपुरीचे बंडखोर राजा तेजसिंग याचे भोंवतीं ११ जून रोजीं दोन प्रहरानंतर वेढा पडून तो हालीं कैदेंत आहे.

१२ जूनची खबर कीं, १० वे मिनहूस सरह्यूरोझ यांस ब्रिगेडियर स्टुअर्ट आणि कर्नल राबर्टसन जे सिंदी नदी उतरून गेले, त्यांजकडून रिपोर्ट आला आहे कीं, बांडा, काल्पी, आणि बरेली, व सिंध्याची दुष्ट फौज यांजमध्यें वैमनस्य वाढलें आहे, असें म्हणतात. आणि त्याचें कारण कीं, शिंद्याचे बंडावलेले लोकांपासून त्यांच्या तोफा बाकीच्या बंडवाल्यांनीं घेतल्या. बंडवाल्यांपाशीं तोफांचा भरणा पुष्कळ असून त्यांनीं ब्रिगेडियर स्टुअर्ट व कर्नल राबर्टसन हे सिंदी नदी उतरून जात असतां अडथळा केला नाहीं.

**सासिराम.**— एथून आलाहाबादेस १५ जूनची खबर येऊन पोंचली कीं, तेथच्या दोन बराकी ज्यांत रोगी वगैरे ठेवून इस्पितळ केलें होतें. त्यांस १२ जून रोजीं सायंकाळीं आग लागून जळाल्या. त्यांत रोगी १२६ होते. ते आपलें सामान व हत्यारें याखेरीज बचावून निघाले. एका बराकींतील ५० मनुष्यें लागलीच निराळीं जालीं.

**ग्याझिपूर.**— एथील १५ जून पर्यंतची खबर आली, तिजवरून समजतें कीं. सरहद्द परगण्यांत अगदीं अव्यवस्था होऊन गेली आहे. बलिया एथें हल्ला होणार आहे. व कोरनादी याला दहशत पडली आहे. सरकारी सर्व घोड्यांव खर्ची केलेले घोडे बंडवाल्यांनीं नेले.— आमीरसिंगाचें लष्कर शाहाबादेपासून कर्मनाशा नदी उतरणार होतें असें म्हणतात. —फिरतवाहरांतील व छावणींतील हत्यारें घेण्याचें काम चालू आहे.

**आग्रा.**— एथून १६ पावेतों आलाहाबादेस खबर आली कीं, १३ वे जून रोजीं तेथून ग्वालेरीस जाण्याकरितां शिंदे माहाराजांची स्वारी जनराल इंडिया नामें लढाऊ सेना केली आहे. व ती ग्वालेरचे रस्त्यावरच आहे, तिला जाऊन मिळण्याचे उद्देशानें निघाली. १३ वे जून पावेतों जयपुरास व १४ वी पावेतों भरतपूर एथें सर्वप्रकारें स्वस्थता आहे. सरह्यूरोझ यांचे हाताखालचें सैन्य १४ वे जूनला कपूलिया एथें पोंचलें. बंडखोर लोक सामना करण्याविशीं इच्छा दाखवीत नाहींत. व त्यांतून पुष्कळ सोडून चालते झाले. सिमी ब्रिगेड हें १० वे जूनला सूरजपूर एथें होतें. आणि ११ वीस माहरा एथें जावयाचें होतें. बंडखोरांपैकीं पुष्कळ ग्वालेरीहून कोटयाचे हद्दीकडे पळाले असें म्हणतात.

**देगाहन.**— हें गांव ग्वालेरीपासून २१ मैलांवर आहे. तेथून सरह्यूरोझ यांणीं आलाहाबादेस १७ जूनला येणें प्रमाणें लिहून पाठविलें आहे कीं, ज्या कालमास (फौजांस) ग्वालेरीभोंवतीं जमण्याविशीं हुकूम फर्माविले आहेत. ते आपल्या गण्यावर नेमल्या वेळीं, येऊन दाखल होतील असें या फौजांवरील हुकमत देणारे सरदार यांजकडून जबाब मला येऊन पोंचले आहेत कर्नल रिडल यांस धोलपुराहून आपले फौजेनिशीं कूच करून ग्वालेरीस येण्याविशीं हुकूम फर्माविला आहे. बंडवाल्यांचा परत जाण्याचा रस्ता बंद करावा

आणि तो मायः दक्षणेकडचा असावा. याविशींचा बंदोबस्त केला आहे. ब्रिगेडियर जनरल नेपियर व कप्तान टर्नबूल या उभयतांची फौज एकत्र जाली आहे.

**फत्तेगड.**— एथील माजिस्त्रेटानें १७वे जूनला आलाहाबादेस केलेला रिपोर्ट येऊन पोंचला आहे कीं, पाचीन एथें बंडखोर मौलवी मारला गेला. त्या ठिकाणीं त्याणें बरोबर ५०० स्वार नेले होते.

**काशी.**— एथच्या कमीशनरानें १७वे जूनला आलाहाबादेस रिपोर्ट पाठविला कीं, बक्सार एथील वर्तमान असें कळत आहे कीं, उमरसिंगाचे ताब्यांतील बंडखोरांहीं जंगल पुनरपि सोडिलें. आणि ते गया व फत्तेपुर एथें उघडपणें जाण्याकरितां सोनीकडे जात आहेत.

**आझिमगड.**— एथील माजिस्त्रेटाकडील सदरील तारिखेचा रिपोर्ट आहे कीं, मेहादीहुसेन कडे बेगम इणें कुमकेकरितां उप्रकसैन्य रवाना केलें आहे. दक्षिणेकडून उत्तरेकडे ज्या शिपायांच्या टोळ्या उतरून जातात, त्यांच्या जाण्यानें आझिमगडपरगण्यांत अव्यवस्था जाली आहे. ग्याझीपुरांत पुनरपि स्वस्थता होत आहे.

## रत्नागिरी.

बहुतेक मृगनक्षत्र कोरडें गेल्यामुळें लोकांचीं (मुख्यत्वें करून) शेती लोकांचीं तोंडें उतरून जात होतीं. इतक्यांत मेघराजानें दृष्टि केली. तेणेंकरून त्यांचें तोंडास टवटवी आली. व आणखीही येत होती. आणि लावणी आणि मांडणीचें काम मोठे झपाट्यानें चालले होते. असें कीं, एका दिवसास दोन, कदाचित् तीन आणि समयीं पांचही रुपये मजूरी एका कुणब्यास द्यावयास केली असती, तरीं आपले शेताचें काम सोडून रुपयांवर नजर न देतां असें मोठे झपाट्यानें आणि आनंदानें कृषि कर्माचें काम चाललें असतां, मेघराजाची अवकृपा गेल्या शुक्रवारापासून झाली, तेणेंकरून तोंडास आलेली टवटवी कमती होत चालली आहे. गेल्या रात्रीं तर अगदीं निरभ्र आकाश होतें. चंद्राचा प्रकाश स्वच्छ पडला असून त्यास पिंगट वर्ण अगदीं नव्हता.— पेटा लांजें येथें गुदस्तसालीं जिवावणें मारून आणणारे असामीस इनाम द्यावयाचे कामांत कारकुनांनीं दगलबाजी केल्याचें प्रकरण चालत होतें तें कारकुनास रजा पोंचल्याशिवाय संपेल असें त्यांस व इतर लोकांस वाटत होतें, परंतु त्याबाबद शिरस्त्याप्रमाणें रुवढला करण्याचा मि॰ स्काट्साहेब यांणीं गेल्या आठवड्यांत हुकूम दिला. त्याप्रमाणें दोन कारकून आणि एक पोतदार एकूण तिघांस सस्पेंडीची दशा प्राप्त जाली. पुढें त्यांचें नशीब. त्यांस कोणती दशा अनुभवविणार हें कळत नाहीं.

जगन्मि॰

---

हिंदुस्थानचे कमांडर इन्चीफ सर कोलीन क्यांबेल यांणीं बंडवाल्यांचा मोड करण्यांत फार शौर्य दाखविलें म्हणून त्यांस नामदार राणी साहेबांनीं लार्ड क्यांबेल आफ् क्लैड असा किताब देऊन लष्करी हुद्याचा जनरल या पायरीस चढविलें आहे.

ज्ञा॰ र॰

---

रं॰ रा॰ रावसाहेब भास्करराव दामोदर यांची स्वारी ता॰ २ जून रोजीं मुंबईहून येथें दाखल जाली आहे

## नेमणुका.

अज्जम त्र्यंबकराव बापूजी यांस ठाणें कलकटरीकडे साकसी एथें मामलेदार नेमिलें. — सदर दिवाणी अदालतीनें धोंडो आबाजी आणि कृष्णाजी हरी यांस पुणे जिल्ह्यांतील कोर्टांत वकीलाचें काम करण्यास सनदा दिल्या. — नेकनामदार गवरनर इन्कौन्सलानें मेहेरबानी करून खालीं लिहिलेल्या नेमणुका मुकर केल्या आहेत.

१ मिस्तर टी. ये. कामटनसाहेब यांस ठाण्यास जाइंट जडुज्य व सेशन जडुज्य.

१ मिस्तर एच्. पी. सेंट. जी. टकर साहेब यांस सोलापुरास जाइंट जडुज्य व सेशनजडुज्य.

१ मिस्तर. एच्. न्युटन साहेब पुण्यास जाइंट जडुज्य व सेशनजडुज्य.

१ मिस्तर आर एच्. पील्ही साहेब यांस साताऱ्यास जुडिसीयाल असिस्टंट कलेक्टर.

१ मिस्तर एफ्. लाईड साहेब यांस ठाण्याचा व रत्नागिरीचे तुकडीचा जाईंट जडुज्य व सेशनजडुज्य.

लेफ्टेनंट ड्युकेट यांस करानीस पालिसचा आडजुटेन.

दुसऱ्या खानदेशभील कार्पचा पलटणीचा आडज्युवट लेफ्टेनंट स्कार्थ हा गैर हजर आहे तों पावेतों लेफ्टेनंट मौबीन यांस नेमिलें आहे. — बेळगांवचे असिस्टंट माजिस्त्रेट् यांस सन् १८१८ चा आक्ट ११ कलम ११ बर्हुकूम माजिस्त्रेट्चा अधिकार दिला आहे, त्रिकोडी असिस्टंटाकडे, — व हुजूर डिस्त्रिक्ट डिपुटी माजिस्त्रेटच्या कडे अशीं कामें दिलीं आहेत.

मिस्तर मुतुकुमार बेळगांवचे कलेक्टर आणि माजिस्त्रेट यांणीं कायद्यांतील परीक्षा देऊन कामास लायक ठरले. — मिस्तर ग्लास कृष्ण भीड वगैरे कडील असिस्टंट कमीशानर यांस आजारीपणाचे दाखल्यांवरून बिलायतेस जाण्यास गेल्या महिन्याचे १० वे तारिखेपासून १२ महिन्यांची रजा मिळाली आहे. — मिस्तर जे. आडीग उत्तर तुकडीचे सब असिस्टंट इनाम कमीशानर यांस जरूरीचे खासगी कामाकरितां कोंकणांत जाण्यास चार दिवसांची रजा मिळाली. — पुणें आणि ठाणें एथील पैमाषखात्याचे असिस्टंट सुपारिंटेंडेंट कप्तान प्रेसकट हे आपल्या कामावर पुनः ता. २९ जून रोजीं रुजू जाले.

आलाहाबादच्या कमांडानर यांणें गवरनर जनरल साहेब यांस असें लिहून पाठविलें होतें कीं, जे शिपाईलोक रजेच्या दिवसां बाहेर हजर होतील त्यांस देहांतशिक्षा असावी; परंतु सदरहू विषयांची मान्यता सरकारानें नामंजूर केली.

दिल्लीचा पदच्युत राजा हा आपले कालव्यांतील पाणी बागेस व त्यांचे खासगी कामाकडे बिलकुल देत नसे, त्या विषयीं कोर्ट आफ् डिरेकटर्स यांणीं असा हुकूम केला आहे कीं, सदरहू कालव्यांतील पाणी नेण्याविषयींची मोकळीक सर्वांस केली आहे

**पर्जन्य.**— दक्षिण मुलखांतील जिल्ह्यांचे पर्जन्याबद्दलचे रिपोर्ट जून चे १५ वे तारिखेपर्यंतचे आले आहेत ते येणें प्रमाणे.

**पुणें.**— या जिल्ह्यांतील पावळ तालुक्या वांचून बाकीच्या सर्व तालुक्यांत थोडथोडा पर्जन्य पडला. शिवनेर तालुक्यांतील ५८ गांवांत पर्जन्य कमी सबब ते खेरीज करून बाकीचे ठिकाणीं पेरण्या होऊं लागल्या आहेत. शिवनेर तालुक्यांत गुरांस कचित् रोग होऊं लागला आहे.

**नगर.**— या जिल्ह्यांतील २२७५ पैकीं १५५ गावांत पुष्कळ पर्जन्य; ४५३ गांवांत मध्यम; आणि ३७५ गांवांत सरासरी पर्जन्य पडला. बाकीच्या १२९२ गांवांत पर्जन्य पडला नाहीं. वर्सातीचा पहिला पेरा, नगर, जामखेड, खर्डे, नेवासें, राहुरी, आणि कोपरगांव या तालुक्यांत बेताचा पर्जन्य पडले कारणानें झाला आहे. आकोलें, पाटोदे, संगमनेर, नाशीक, चांदवड, शिन्नर, आणि वनदिंडोरी, या तालुक्यांत पर्जन्याच्या कमताई मुळें पेरण्याचें काम बंद पडलें आहे. आणि याच कारणामुळें आकोलें व कावनई या तालुक्यांतील भात, व नागली यांचीं रोपें सुकून चाललीं आहेत. रोगराई या जिल्ह्यांत नाहीं.

**सोलापूर.**— या जिल्ह्यांतील ६७० गांवांत थोडाबहुत पर्जन्य पडला. सोलापूर, माढें, आणि करमाळें या तालुक्यांत खरीपाचे पेरे चालू जाले आहेत. इंदापूर तालुक्यांतील सुमारें १६ वा हिसा पेरणी जाली आहे. हिपरगा, मुद्देबिहाळ, आणि मनगोळी या तालुक्यांत थोडेशी पेरणी जाली आहे. बारसी व मोहोळ या तालुक्यांत पर्जन्याचे कमताईमुळें पेरण्याचें काम बंद पडलें आहे. माढें व करमाळें तालुक्यांत ५० गुरें मेलीं. रोगराई जिल्ह्यांत नाहीं.

**रत्नागिरी.**— तारीख १ पासून १३ पर्यंत मालवण तालुक्यांत थोडा पाऊस पडला, यामुळें रोपें लावण्यास अवकाश जाला. १४ पासून बेताचा पाऊस पडला. विजयदुर्ग, रत्नागिरी, अंजनवेल, आणि सुवर्णदुर्ग, या तालुक्यांत थोडा पर्जन्य पडल्यामुळें रोपांस धोका थोडासा बसला आहे. बाणकोट आणि खेड माहाल एथें ज्वर व अतिसार या रोगांचा प्रादुर्भाव जाला आहे. आणि केळसी व पालगड एथें देवीची सांथ दिसूं लागली आहे.

**सातारजिल्ह्यांतील जाहागीरदार**

पंतप्रतिनिधि, आणि फलटणचे संस्थानी यांचे जाहागिऱ्यांत पाऊस पडून पंतप्रतिनिधीचे जाहागिरींत पेरण्या तमाम जाल्या. व फलटणकरांचे जाहागिरींत जेथें बेतापुरता पर्जन्य पडला तेथें पेरण्या सुरू जाल्या आहेत. पंतसचिव यांचे जाहागिरींत पाऊस नाहीं. मेमहिन्यांत वळवाचा पाऊस पडून ज्या ठिकाणीं लावण्या जाल्या, तीं रोपें सुकून गेलीं आहेत. जथचे जा~~हागीरदारांचे मुलखांत [illegible] करण्या~~चे बेताचा पाऊस पडला नाहीं. रोगराई कांहींच नाहीं. पर्जन्यमापक यंत्राचें मान लिहिलें नाहीं.

**पुणें एजंट.**— ता. १ मिनहूस बडे लोकांस पोषाक वाटून दरबार जालें. त्याविषयीं [illegible] आम्हांस संकोच्यामुळें पुढील पत्रीं सविस्तर लिहून कळवूं

गेल्या बुधवारच्या टेलिग्राफ पत्रांत असें लिहिलें आहे, कीं थोडे दिवसांवर कलकत्यास मेस्तर स्काट, व मूल यांस ज्यानें मारलें होतें, त्यास फांशीं देण्याची शिक्षा ठरली.

आमच्या समजण्यांत असें आलें आहे कीं. मुंबई शहरांत "ग्यास लैट" म्हणजे (धुराचे दिवे,) करण्या करितां इंग्लंडांत "ग्यासलैट कंपनी" नें एथील एका इंजनेराच्या मार्फतीनें म्युनसिपालखात्याचे बोर्डास विचारण्याविषयीं लिहिलें होतें, व असें कळविलें होतें कीं, जर बोर्ड प्रजेच्या कल्याणाकरितां १००० दिवे खरेदी करील तर कलकत्यांत ज्या भावानें देणार त्या भावानें दिले जातील. यावरून बोर्डानें असें उत्तर पाठविलें कीं, आम्ही ५०० दिवे घेण्याविषयीं बेंचच्या सभेस शिफारस करूं.

मुंबईहून सांवतवाडी पर्यंत तारायंत्राच्या कामास तारिख १८ जूनचे दिवशीं सुरू झालें. दीपि.

या महिन्याच्या १२ वाराच्या तारखेच्या दिल्ली ग्याझेट पत्रांत अलीकडे अयोध्येमध्यें इंग्रेजां विरुद्ध जे जमीदार वगैरे उठले आहेत ते व त्यांपैकीं प्रत्येका जवळ किती लोक व किती तोफा आहेत याचा तपशील लिहिला आहे तो येणें प्रमाणें.

## लखनूरच्या आग्नेय दिशेस बेनसीवारा जिल्ह्यामध्यें.

रघुनाथसिंग तालुकदार याजवळ हाजीपूरच्या किल्ल्यांत ८ तोफा व १५०० लढाऊ लोक आहेत.

बाबूराम बक्ष तालुकदार याजवळ धुंडीखेरा या नांवाच्या एका ठिकाणीं ४, किंवा ५ तोफा आहेत व तो बेनीमाधव याजबरोबर आहे असें वाटतें.

ललताप्रसाद, मयत बसंतसिंग याचा दिवाण सेमरपाहा या नांवाच्या एका मजबूद किल्ल्यांत आहे, त्याजवळ ४ तोफा व २५०० लढाऊ लोक आहेत.

बेनीमाधव तालुकदार जंगलानें वेष्टित अशा शंकरपूर नामक किल्ल्यांत आहे. त्याजवळ १६ तोफा (जनरल ग्रांट याणें घेतलेल्या तीन तोफा धरून) व ८००० लोक आहेत

## जगदीशपूर जिल्ह्यांत.

राजा अलीबक्षखान, मोहोरम या नांवाच्या एका लहानशा मातीचे किल्ल्यांत ६ तोफा व १५०० लोकांनिशीं आहे.

बाबू पाहारखान तालुकदार सगावनगड या नांवाच्या एका मातीच्या किल्ल्यांत ५०० लोकांनिशीं आहे, तोफा मुळींच नाहींत.

गुलाबखान तालुकदार कचनांव या नांवाच्या एका ठिकाणीं आहे. त्याजवळ ५०० लोक आहेत. तोफा मुळींच नाहींत.

अबदुल्लाखान तालुकदार वेहमार नांवाच्या एका ठिकाणीं आहे. त्याजवळ ६०० वों लोक आहेत. तोफा मुळींच नाहींत.

गुलजारखान तालुकदार कुंपुरा या नांवाच्या एका ठिकाणीं आहे. त्याजवळ २०० लोक आहेत. तोफा मुळींच नाहींत.

## इनोना जिल्ह्यांत.

बिकनखान, फत्तेबहादुरखान, आणि रोशनजमाखान, तालुकदार भोवाया नांवाच्या एका मातीच्या किल्ल्यांत २ तोफा व ७०० वों लोकांनिशीं आहे.

मीरखान तालुकदार बनभेरिया या गांवाच्या एका मातीच्या किल्ल्यांत २०० दों लोकांनिशीं आहे. तोफा मुळींच नाहींत.

देवीसिंग आणि दीनासिंग तालुकदार बनौना या गांवाच्या एका मातीच्या किल्ल्यांत १ तोफ, व ४०० लोकांनिशीं आहे.

रूबखान तालुकदार बीजापूर या गांवाच्या एका मातीच्या किल्ल्यांत २ तोफा, व २०० लोकांनिशीं आहे.

गंगासिंग आणि उसारीसिंग तालुकदार याजपाशी भिकरा किल्ल्यांत २ तोफा व ५०० लोक आहेत.

बाबूसी आमनसिंग तालुकदार याजवळ साहामन किल्ल्यांत ३ तोफा व १००० लोक आहेत.

राजा सेहजराम याजवळ रेहुनी किल्ल्यांत ४ तोफा व २००० लोक आहेत.

आनंदी आणि खुशाल तालुकदार याजवळ मोहोरी आणि नाग्रांव या गांवांत २ तोफा व ५०० लोक आहेत.

मुसाहिब अल्ली तालुकदार याजवळ धोरा किल्ल्यांत २ तोफा व १००० लोक आहेत.

हुसेनबक्स तालुकदार याजवळ वडोली किल्ल्यांत २ तोफा व १०० लोक आहेत.

महंमदहुसेन, मेधीहुसेन, रौरैयादिल इमाम या तीनच किल्लेदारांचे लोक व तोफा (१०००० लोक व २७ तोफा) अयोध्येंत सुलतान पुराजीक जमा झाले आहेत. व त्यांपैकीं कांहीं लोक जालवण एथें आहेत.

जगरनाथ बक्स, भगवानबक्स बसंतसिंग, आणि जगरनाथ या चार तालुकदारांजवळ नाइन मुकामीं ८ तोफा व ६००० लोक आहेत.

गुलाबसिंग याजवळ प्रतापगड किल्ल्यांत ६ तोफा व ७००० लोक आहेत.

यावरून पाहातां अयोध्येमध्यें अजून चाळीस हजारां पेक्षां जासती बंडवाले आहेत. व त्यांजवळ सुमारें शंभर तोफा आहेत असें दिसून येतें. धू. के

---

लाहोरच्या कमिशनरानें नामदार गवरनरजनरल साहेब बाहादुर यांस अशी शिफारस लिहून पाठविली कीं, ३६ वी आणि ६१ वी काळी पायदळ पलटणींतील लोक इमानी राहून त्यांणीं सरकारची नोकरी उत्तम केली. ही शिफारस गवरनर जनरल साहेब यांणीं मान्य केली, आणि त्या राहिलेल्या पलटणांतील लोकांस इनाम देऊन त्यांची एक इमानी पलटण असें नांव देणार आहेत. या लोकांपैकीं लोक जलंदर एथें बदलून गेले, आणि या लोकांनीं सरकारची नोकरी केली. हें स्तुत्य काम केलें.

**ज्ञानप्रकाशकर्ते.** मुकाम पुणें मिती ज्येष्ठ वद्य ४ मंगळवार.

तुमचा मित्र विरस्ता विनंती विशेष. आम्ही श्रीसप्तशृंग देवीचे दर्शना करितां गेलों होतों, तेव्हां मार्गी आम्हांस पर्जन्य लागला त्याजमुळें डिंडोरी तालुक्यांत एका गांवीं चावडींत राहूं लागलों, तों पावसामुळें सारे गांवचे लोक लहानमोठे बसले होते. तेथें आम्हीही बसलों. तरी गांवकरी आपापल्यांत बोलत होते तें आम्ही ऐ-

किलें. असें कीं, या तालुक्याचें मामलेदार यांचा स्तव फारच करीत होते. त्यावरून आम्हीं बोललों कीं, दुसरे मामलेदार थोडे आहेत? त्यावर त्यांचें बोलणें कीं, भास्कर गोविंद मामलेदार आमचे तालुक्यांत आल्यापासून रयत लोकांचीं कामें व खुनशीर जेव्हांचे तेव्हां चाजवी स्वतां पाहून जर त्यांची समजूत न पडे तर त्याचे गांवीं जाऊन दोन्ही धणी खुषी राहात अशी समजूत देऊन करीत आहेत. व चोरी भगदीं होत नाहीं. जर चोरी कधीं जाली तर तेच वखतीं स्वतः मेहनत घेऊन चोरीचा थांग मुद्यासहित लावितात. व पेठ तालुक्यांत बंड जालें होतें, त्याजविषयींही मेहनत त्यांहीं स्वतां बंडाचे तोंडावर राहून आपले तालुक्यांत उपद्रव न होई असा बंदोबस्त राखिला होता. तशांत कांहीं चोरट्यांचा उपद्रव जाला होता. ते लोक तत्काळ धरले. व वसूलबाकी करण्याची रीति फार चांगली. या कारणावरून त्या पुरुषाचा स्तव करणें जरूर आहे. म्हणून करितों. असा अंमलदार आमचे एथें कधीं आला नाहीं, याजमुळें त्यांचे आम्हीं आभारी आहों, असें बोलत होते.

२. दुसरी या पुरुषाची गोष्ट आम्हीं अशी ऐकतों कीं, तालुके राहुरी येथें हे गृहस्थ होते. ते समयीं तालुके नेवासें येथें कोणाचा खून जाला होता. तो सुमारें दोन वर्षे नाशाबीद असून यांणीं सरकार हुकमानें स्वतां मेहनत घेऊन शाबीद करविला. अशी करण्यास मोठी विचित्र गोष्ट आहे. हाली माळनर्कस पैमाषीचें काम चालत आहे. त्या कामांत हे गृहस्थ पराकाष्ठेची मेहेनत करीत आहेत. सारांश अशा पुरुषास मोठी जागा असावी. असा आमचा हेतु फार आहे. कारण यांचे मेहेनतीची व्यवस्था फार चांगली आहे. यास्तव आपल्या पत्रांत या पुरुषाची प्रशंसा होईल अशी आमची पूर्ण खातरी आहे. आपण आपल्या सुंदर वर्तमानपत्रांत सदर्हू मजकुरास जागा दिली असतां आम्हीं फारच आपले उपकारी होऊं. आम्हांस पूर्ण भरंवसा आहे, तरी आपण पत्रद्वारें सदरील मजकूर प्रसिद्ध करावा. कळावें लोभ करावा हे विनंती.

फिरस्त तुमचा मित्र. मुकाम वणी.

पुणें पोलिसचे स्वारांत बाबाजी बिन हरी भोंडरे म्हणून एक स्वार होता त्यानें ता २६ जून रोजीं रात्रीं फिर्यादी जमना भड बुजीण इच्या घरीं दोस्तीच्या सबबेनें जाऊन ती निजलेली असतां तिचे गळ्यांतील पानपोतपुतळ्या सर्व मालाची किंमत अदमासें ४० रुपयांच्या चोरून नेला. या अपराधाबद्दल सदरहू केदी स्वार यास दोन महिने सक्त मजूरीची शिक्षा मिळाली. याविषयीं पुणें आबझरवर कर्ता असें म्हणतो कीं, ही शिक्षा फार कमी जाली. त्यास याच पोलिसांतील नारायण माटेरे शिपाई याणें दोन चोऱ्या केल्याबद्दल मोकद्दमे शाबीद होऊन एक वर्ष सक्त मजूरीची शिक्षा मेहेरबान डिपुटी माजिस्त्रेट यांणीं दिली असतां सदर्हू पैकीं अपराध कोणता कमी अगर जास्त हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे.

**चीन.**—एथें तहाचा सल्ला न बसले कारणानें इंग्रेज व फरासीस यांचे नाविकसैन्याबरोबर चिनई लोकांनीं युद्ध चालविलें आहे.

पुणें ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें.

**किरकोळ.**— अयोध्या आणि रोहिलखंड यामध्यें अहमुदुल्लाखान मौलवी यानें उपद्रव दिला होता त्यास शाहापूर एथें पवानीच्या राजाचे लोकांनीं त्याजवर गोळी घालून मारिलें.— राजमंदीरचे बंडवाल्यांतील मुख्य कारकुडा रुभारउ यांस व कोव्याचा बंडवाले यांस निजामाचे राज्यानजीक गोदावरी नामें नदीजवळ पकडलें. यांस धरण्याबद्दल सरकारचा पहिल्यास २५०० दुसऱ्यास २०० रुपये देण्याबद्दल जाहीरनामा लागला होता.— आलीगडचा महबुबखान पोस्तांतील रिसालदार याणें मिस्तर टकर साहेब फत्तेपूरचा जडूज्य यांस मारण्याचे कामांत हा होता सबब त्यास ता. १७ जून रोजी फांशीं दिलें.— कलकत्ता सरकारानें भवानसिंग मीनपूर येथील, याणें सरकारची नौकरी उत्तम केली, म्हणून तयासिंगाचा स्थावर माल जप्त केलेला होता तो त्यास देऊन शिवाय खिलात (पोषाक) दिला. सदरहू मजकूर टेलिग्राफ व त्याखेट याग्रंतून घेतले आहेत.

---

**हिंदुनाटक.**— गेल्या शनवारच्या मागल्या शनवारीं रात्रीं एथें मुंबईचे नाटककारांचें नवीन हिंदुनाटकगृहांत झालें त्यांत वटसावित्री कथा आणि पारिजातकपर्व हीं आख्यानें लाविलीं होतीं, लोक बरेच जमले होते आणि खेळही लोकरंजक झाला असें लोकांच्या बोलण्यावरून समजतें.

आमच्या ऐकण्यांत टैम्स आधारें असें आहे कीं, दक्षिणेंतील हैदराबादचे नामदार निजाम यांस ता. ८ जून रोजीं मुलगा झाला.

---

**लष्करीखातें.**— नेकनामदार गव्हरनर इन्कौन्सल यांणीं दोन बलोची पायदळ रैफल पलटणी नवीन करण्याविषयीं हुकूम गेल्या सरकारी ग्याझिटांत प्रसिद्ध केला. सदरहू पलटणी ब्रिगेडियर जनरल जेकब यांचे हुकमतींत राहून वरील सिंध प्रांतांत त्या राहातील. सदरहू दरएक पलटणींत शिपाई, अमलदार, व त्यांचे पगार यांच्या संख्या येणें प्रमाणें.

| लोकसंख्या | हुद्दा | पगार रुप |
|---|---|---|
| | गोरे | |
| | कम्यांड (हुकूमचालविणारा) | १००० |
| | दुसरा कम्यांड. | ६०० |
| | आज्युटंट | ५०० |
| | क्वार्टरमास्तर | ५०० |
| | असिस्टंट सर्जन | ५०० |
| | काळे | |
| | रुभेदार मेजर. | १०० |
| | रुभेदार प्रत्येकीं. | ६० |
| | नेटीव आज्युटंट | ५० |
| | नेटीव क्वार्टरमास्तर. | ४५ |
| | जमादार प्रत्येकीं | ४० |
| | मेजर हावालदार. | [illegible] |
| | बिगुलमेजर. | ३० |
| | क्वार्टरमास्तरहावालदार | २५ |
| | पेहावालदार प्रत्येकीं | २० |
| | हावलदार प्रत्येकीं | १५ |
| | नाईक प्रत्येकीं. | १२ |
| | बिगुलवाले प्रत्येकीं | १५ |

| | | |
|---|---|---|
| ६०० | शिपाई . ------- . | |
| | **कारागीर .** | |
| १ | हेडआरमरर (हत्यारें करणार) - | |
| २ | सदर्हू प्रत्येकीं - - - | |
| २ | फिला मत २ प्रत्येकीं . - - - | |
| २ | घन मारे प्रत्येकीं - - - - - | |
| २ | भाते वाले मुलगे प्रत्येकीं - - - | ८ |
| १ | तोफा ओतणारे . - - - - - | ३० |
| १ | सदरहू दुसरा . - - - - - | ३० |
| १ | तांडेल . - - - - - - | १२ |
| १० | खलाशी प्रत्येकीं - - - - | ६ |

सदर्हू दरएक पलटणी करितां तंबू नेमणुक येणेंप्रमाणें.

२ तंबू पलटणीचे सामाना करितां

१ तंबू कारागिरांचे सामानाकरितां

३ तंबू इस्पितळाकरितां .

एक सरकारी गाडी पलटणीचे वरलिहिलेले कारागिरांचे हत्यारें व १०००० गोळ्या वगैरे सामानाची पुरवणी करण्या करितां छावणींत राहील.

हत्यारें, कपडे, व दुसरें शिपाइगरीचें सामान पहिले खेपेस सरकारांतून मिळेल तें पुढें ज्याची त्याची मालमत्ता समजावी. नंतर याबाबद खर्च ज्याचा त्यानें केला पाहिजे.

**आकूट**— गेल्यासरकारी ग्याझिटांत २३ वा आक्ट प्रसार झालेला मसिद्ध केला आहे. सदर्हू आक्ट, सन्न १८५७ चे आक्ट १४, १६, आणि १७ हे सन्न १८५८ सालीं अखेरपर्यंत जारी ठेवण्याविशीं व कित्येक गुन्हेगारांस तीन वर्षांहून जास्ती केदेची शिक्षा ठरवून त्यास काळेपाण्यावर पाठविण्याविशीं आहे

---

ता॰ १० जून सालमजकूरचे पत्रांत रमाबाई कोम रघुनाथ सदाशिव केळकर पेठ सदाशिव पुणें बक्षीसपत्र रद्द केल्याविषयींची जाहिरात दिली होती ती बाई गेल्या सोमवारीं मरण पावली. हिला सरकारांतून पेंनशन १९ रुपये दरमाहा मिळत असे.

---

मेहेरबान गोपाळराव हरि देशमुख असिस्टंट इमाम कमीशनर यांची स्वारी आज रोजीं एथून साताऱ्यास जाण्या करितां निघाली असें समजतें.

पुणें हवेलीचे जाइंट पोलिस रा॰ रा॰ विरूपाक्षराव शंकर यांस साहा महिन्यापूर्वी आक्टिंग नेमिलें होतें. त्याच जाग्यावर त्यांची हुशारी पाहून पोलीस कमीशनर यांणीं त्यांस मुकरर केलें आहे. हें ऐकून आम्हांस संतोष जाला आहे.

कलकत्ता इंग्लिशम्यान पत्रावरून असें समजतें कीं, कित्येक धनवान गृहस्थांनीं वर्गणी करून कमारें ६००० रुपये जमविले आहेत. त्यांच्या खर्चानें सदर हजारी करून विलायतेहून नवें लष्कर पतरगांव त्यांस देणार. ता॰ द॰

श्री॰ रा॰ रा॰ आबासाहेब शास्त्री पटवर्धन यांची स्वारी मुंबईहून पुण्यास ता॰ १ जुलई स येऊन दाखल जाली.

---

## ज्ञानप्रकाशकर्त्येयंस.
## नरकोत्तारणार्थ केलेलें कन्येचें दान.

विनंतीविशेष कसबे संगमनेर जिल्हा नगर एथें कोणीएक देशस्थ ब्राह्मण ऋग्वेदी आहे त्यानें कांहीं वर्षापूर्वी एक शूद्री ठेविली होती, तिचे पोटीं त्यास एक कन्या जाहाली ती सुमारें ½ वर्षाची असतां तिची मातोश्री यमसदनास गेली त्यादिवसापासून वर लिहिले गृहस्थानें आजपर्यंत त्या मुलीचें पाळण पोषण वगैरे करून आपले घरीं तीस लहानाचें मोठें केलें. हल्लीं या मुलीचें वय १६ अगर १७ वर्षाचें आहे. ही चौदा वर्षाची जाहाली तेव्हांपासून तिचे जनक यांस या मुलीचे लग्नाची काळजी पडून खर्चाकरितां दोन पैसे मिळविण्याचा यत्न ही करीत होते व चांगला नवरा कोठे मिळेल याचाही तपास चालू होता या गृहस्थाचें घरीं म्हटलें म्हणजे एक याची मातोश्री सुमारें ७० वर्षाची व लग्नाची एक बायको व तिचे पोटीं जालेला एक मुलगा व एक मुलगी इतकीं माणसें आहेत. हल्लीं वराचा शोध करितां करितां गेले माघमासीं येथें बाजारांत एक हलवई वयानें सुमारें २५ वर्षाचा आहे, तो पाहून कन्येचें उदक त्याचे हातावर घालावें. असा या गृहस्थानें निश्चय केला हा हलवईही त्याचे कन्ये प्रमाणेंच आहे. पुढें लग्न त्याकाळींच व्हावें, परंतु मुहूर्त चांगला नव्हता, व खर्चाची पुर्ती तजवीज जाली नव्हती. सबब बेत रहित जाला. हल्लीं तोच उद्योग चालु असतां ज्येष्ठ शुद्ध १२ उर्फ तारिख २१ जून रोजीं मुहूर्त पाहून कन्यादान करावें असा निश्चय होऊन तारिख २० रोजीं लग्नाबद्दल सुपारी वगैरे झाली आतां या हलवायापासून मुलीचें पाळण करणारे यांनीं ७२ रुपये रोख व कांहीं वस्त्रें म्हणजे लुगडीं चोळी वगैरे घेतली अशी लोक वार्ता आहे. नंतर द्वादशीचे दिवशीं या गृहस्थानें लग्नाचा मांडव बोहोलें वगैरे घालून सर्व सिद्धता केली घरांत ही यांचे मातोश्रीनें व कुटुंबानें लग्नाचें साहित्य वगैरे करून तयार ठेविलें होतें. लग्नाचे अगोदर मुलीकडील देवदेवक बसविणें करितां एथील एक कुळंबी यास कांहीं रुपये देऊन कबूल केला, आणि या गृहस्थास जातीनें देवदेवक ठेवण्याची व कन्यादान करण्याची लाज वाटली सबबही सर्व कामें त्या कुणब्याकडून करविली. लग्न लागल्यावर दुसरे दिवशीं यांनीं आपले घरीं कन्यादानाची सांगता करावी, म्हणून कांहीं ब्राह्मणभोजन केलें त्यांत दोन अग्निहोत्री ब्राह्मण, एक कोपरगांवकर व एक एथचे असे होते, ब्राह्मण वगैरे जेवल्या नंतर यांनीं आपले घरांत जांवई व त्याजकडील कांहीं मंडळी यांस जेवण्यास बसविलें जांवई व कन्या हीं शिरस्ते प्रमाणें एके ठिकाणीं बसलीं होतीं. उभयतां वधूवरांनीं घांस परस्परांस दिलेले पाहून या गृहस्थांस व यांचे मातोश्रीस वगैरे बहूत आनंद होऊन आज आम्ही कृतकृत्य जालों असें वाटलें, नंतर सर्व समारंभ यथास्थित होऊन सायंकाळीं वरात नेली तेव्हां या गृहस्थास व याचे मातोश्रीस फार दुःख कन्येचे वियोगानें जालें. आतां एकदोन रोजांनीं जांवयाकडील राहिलेले मंडळीस मेजवानी आहे, असें ऐकतों असो. याप्रमाणे मजकूर कळला आहे, तो आपणास कळविण्याकरितां लिहिला आहे. तो आपले द्वारें सर्वांस श्रुत व्हावा कळावें.

तारिख २४ माहे जून } तुमचा एक प्रवासी
सन १८५९ इसवी } नीरचा.

* आम्हास हें सदरीलं पत्र एक
** लिहिलें आहे त्यांत या खेरीज जो मजकूर लिहिला आहे तो पाहून हा ग्रहस्थ कोणी मद्य शत्रु, आणि वेश्याप्रिय असावा असें दिसतें तो आपले गृहिणीचे, व मुलांचे हाल करितो. व मुलांचे विद्याभ्यासा प्रीत्यर्थ अतिअल्पद्रव्य खर्चायास ही इच्छीत नाहीं असें करून येतें. यावरून तो जातीचा ब्राह्मण जरी आहे तरी अंतःकरणाचा कोणी अज्ञानी मूर्ख असावा यांत अंदेशा नाहीं. आह्मास वाटतें कीं, हा ग्रहस्थ ज्या लग्नांत मुख्य वराडी होऊन मिरवला. त्या मंगलकार्यार्थ हा आमचा आहेर त्यास आह्मी यथा शक्त्या दिला आहे. त्याचा अनादर न करितां तो संतोषानें ग्रहण करून आपल्यास शोभवून घेईल व ह्यापासून चांगला लौकीकही मिळवील

ज्ञा० म० ।

---

चांगल्या आधारावरून आमच्या ऐकण्यांत असें आलें आहे कीं, **मिस्तर हारिसन,** फष्ट असिस्टन आकौंटेंट जनरल आफ इंडिया हे थोडके दिवसांत नेव ईस येऊन बंगाल मध्यें हिशेब ठेवण्याची रीती कशी आहे हें शिकविणार आहेत नंतर ते **मिस्तर अरस्कीन** मुंबईचे फष्ट असिस्टन आकौंटेंट जनरल यांस समागमें घेऊन पुणें, खानदेश, बेळगांव, अहमदनगर इत्यादिक जिल्ह्यांत जाऊन त्याप्रमाणें कलेक्टर रहापीसांत हिशेब ठेवण्यास समजाविणार. सध्या हारिसनसाहेब मद्रासेस येऊन याच कामांत गुंतले आहेत असें ऐकतों.

**परभ्रष्ट सरदार.**—गेल्या सरकारी ग्याझिटांत नादारीचें सरटिफिकिट मागणारांच्या यादींत एथील विश्वास खंडेराव रास्ते यांचें नांव आम्हीं पाहिलें. तें पाहून आम्हांस फार वाईट वाटलें. कारण या गृहस्थाचे कारभारी श्रीमंत कैलासवासी बाळाजी पंत दादा नातु होते. त्यांणीं आपले या यजमानाचें काम कांहीं कारणानें सोडिलें. तेव्हां बरेच पुष्कळ धन स्वाधीन केलें. याशिवाय दरमाहा ५०० रुपये पेनूशन व इनक्याचें उत्पन्नाचें इनामी गांव त्यांस आहेत, असें असतां सर्व दौलत वगैरे इस्टेट जाऊन हजारों रुपये कर्ज झालें. यावरून बडे लोकांची ही व्यवस्था पाहून लोकांत उपहासास्पदता झाल्याचें आश्चर्य काय आहे.

---

आम्हीं असें ऐकतों कीं, रा० रा० काशी माधविनायक लोंढे पुणे जिल्ह्यांतील खेड तालुक्याचे मामलेदार यांस ठाणे जिल्ह्यांतील वसई तालुक्यांतील मामलेदारीचे कामावर नेमून तेथें पुणे जिल्ह्यांत नेमण्याविषयींचा रिविन्यु कमीशनर साहेब यांचा ठराव जाला आहे.

---

**धोलपूर.**—एथून २७ जूनला रात्रीं वर्तमान येऊन पोंचलें आहे कीं, जावरा एथील शिंघाचा दुष्ट खजानीस आमिरचंद बेदीयास एका फोजेच्या टोळीनें पकडलें आहे. तात्याटोपे व बाडयाचा नवाब ह्यांचा लढा झाल्यापूर्वीं नेहमीप्रमाणें ग्वाल्हेर सोडली. आणि ते सबळगड व जयपूर यांचे रस्त्यानें गेले असें म्हणतात. त्यांजवळ चार मोठ्या आणि तीन घोडयाच्या तोफा आहेत. ब्रिगेडियर जनराल नेपियर त्यांचा पाठलाग करीत आहे.

हें पत्र पुणें ज्ञानप्रकाश छापखान्यांत कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांनीं छा

# ज्ञानप्रकाश

गुरुवार तारिख ८ माहे जुलई सन्न १८५८ इसवी.


## राजकीयखबरी

**ग्वालेर—** हिंदुस्थानचे नेकनामदार गवरनरजनरल साहेबांनीं सर्वांस मालुम होण्याकरितां जाहिरनामा पर राजकीय खात्याचा १८५५ नंबरचा प्रकट केला तो मुंबईचे सरकारी ग्याझिटाचे गेल्या शनवारीं एक्स्त्रि आर्डिनरी ग्याझेट (आनंदाचें वर्तमान पत्र) पुनरपि सर्वांस मालुम होण्याकरितां काढलें आहे. हा जाहिरनामा आलाहाबाद मुकामचा २४ वे जून सन्न मजकूरचा आहे. तो आनंददायक जाणून आम्ही आपले वाचणारां करितां उतरून घेतों.

मेजर जनरल सरह्युरोझ साहेब यांणीं १९वे जूनरोजीं ज्या बंडवाल्यांनीं ग्वालेरीस येऊन शिंदे महाराजांच्या अधिपत्याचा अपहार केला होता त्यांजबरोबर युद्ध करून त्यांत त्यांचा सर्वथैव पराभव केला. आणि ग्वालेर व तेथचा किल्ला हीं पुनराधीन करून घेतलीं. हें नेकनामदार गवरनरजनरल साहेबबाहादूर मोठ्या आनंदानें प्रसिद्ध करिताहेत.

नंतर २०वे जूनरोजीं शिंदे महाराज, माळव्याचे गवरनरजनराल साहेबांचे एजंट, व सरह्युरोझ, आणि इंग्रेजी फौज यांसह वर्तमान आपले पूर्वज्यांचे राजवाड्यांत प्रवेश करिते झाले. या प्रसंगीं महाराजांचे प्रजांनीं महाराजांविषयीं प्रामाणिकपणें व सन्मानबुद्धिपुरःसर त्यांचे आगमनाचा संतोष मानला.

जूनचे १ले तारिखेस बंडवाल्यांस शिंदे महाराजांचे कांहीं शिपाई दगाबाजीनें साहाय्य होऊन त्यांणीं शिंदे महाराजांची राजधानी घेऊन त्यांचे राज्यांत नवीन राज्य स्थापावयाचें ढोंग फैलावण्याची इच्छा केली; परंतु अठरा दिवस लोटले नाहींत तों ग्वालेर शहर व किल्ला सोडून देण्याचें आणि अधिकाराचा अपहार करण्याचा यत्न केला होता तो सोडण्याचें त्यांस प्राप्त पडलें.

इंग्रेज सरकारचे सामर्थ्यानें ही फत्ते आणि जलदी होऊन त्यांनीं आपले इमानी दोस्ताच्या मुलखाचें मुख्य शहर पुनरपि घेतलें; आणि आलिजाहा बाहादरापाशीं त्यांचे मुलखाचा पुनरपि बंदोबस्त होण्याकरितां इंग्रेजी फौज नेहमी ठेविली आहे. यावरून सर्वांची खात्री होईल कीं, जे कोणी शिंदे महाराजांप्रमाणें इमानीपणानें राहातील, व जे उपकारबुद्धि वागवतील त्यांच्याशीं इंग्रेज सरकार दोस्ती ठेवण्यास खूब समर्थ आहे.

नेकनामदार गवरनरजनराल साहेब बाहादूर, शिंदे महाराजांची दोस्ती आणि आलिजाहा बाहादर यांचे परंपरागत राज्याची पुनःप्रस्थापना झाल्याचा आनंद हें दाखविण्याकरितां असा हुकूम फर्मावितात, कीं, राजकीय सन्मानाच्या तोफांची सरबती हिंदुस्थानांतील मुख्य मुख्य शहरीं केली पाहिजे.

सरई लुगार्ड साहेब हे आपला हुद्दा हुकूमत चालविण्याचा सोडून लवकर विलायतेत जाणार आहेत.

**दरबार**— एथें तारिख १ माहे जुलई सन्न मजकूर रोजीं संगमावर वडे लोक, व सरदार लोक, त्यांचे वकील, व दुसरे कामगार लोक यांचें दरबार मेहेरबान एजंट साहेब यांणीं भरविलें होतें. सालदरसाल दसऱ्याचे दिवशीं पोषाक मिळत असत. ते राणीसाहेबांचे जन्मदिवशीं द्यावे, म्हणून मेहरबान एजंटसाहेब बाहादूर प्रांत दक्षिण यांणीं सरकारास शिफारस केल्यावरून सरकारांनीं मंजूर केलें, परंतु राणीचा जन्मदिवस सन्न मजकूरचा गुजरून गेल्यानंतर राणीसाहेबांचे गादीवर बसण्याचे दिवशीं देण्याची योजना सरकारचे हुकमाप्रमाणें केली; परंतु तोही दिवस बहुतेक सरदार लोक एथें नसले कारणानें गुदरला. सबब सदरील दिवशीं पोषाक देऊन दरबार केलें. यासमयीं सरदार व वडे लोक आदिकरून थोर गृहस्थ हजर होते ते येणें प्रमाणें.

सरदारमत

१ माधवरावसाहेब फडनीस. ------ १ली.
१ बापुसाहेब विंचूरकर ------ २री
१ रामराव बाबासाहेब रास्ते. ----- २री
१ बळवंतरावजी मेहेंदळे. ------ २री
१ दामोदर रावजी पानसे. ----- २री
१ आबासाहेब पटवर्धन.
१ महमद आलमखान वेल्हेकर नबाब.
१ वकील निसबत शिंदे सरकार.
१ वकील निसबत होळकर.

सदरील गृहस्थांस साडेतीन वस्त्रें म्हणजे पागोटें, शेला, किनखाप, आणि महमोदीचें थान हीं दिलीं. आणि खालील गृहस्थांस दोन वस्त्रें, म्हणजे पागोटें, शेला, हीं दिलीं.

सरदारमत

१ मोरोपंत तात्यासाहेब ढमढेरे. ---- २री.
१ कोंडिरामसिंग शिंदे ------ २री
१ भगवंतराव कुंजर. ------ ३री.
१ रामराव कुंजर. ------- ३री
१ वकील निसबत बाळासाहेब मिरजकर.
१ वकील निसबत कुरुंदवाडकर.
१ कृष्णराव मुजुमदार.
१ वकील निसबत गायकवाड.
१ वामनराव पानसे.

येणेंप्रमाणें १८ पोषाक दिले. श्री० रा० रा० आबासाहेब पटवर्धन खेरीजकरून बाकी सर्व दरबारास आले होते. आणि याशिवाय रावसाहेब नातू प्रत २री, जिवनराव मुजुमदार प्रत ३री; गोकुळ शेट ठाकुरदास, सरदारप्रत ३री; आण्णासाहेब ढमढेरे बंधूसहित; वकील निसबत फडणीस; वकील निसबत शेखखान महमद वाईकर; रावबाहादुर प्रिन्सिपाल सदरअमीन पुणें; अर्देसर शेट मुनसफ पुणें, आबाजी बापूराव मुनसफ पुणें; खानसाहेब फौजदार पुणें, एजंट साहेब पुणें, व असिस्टंट एजंट साहेब अदालतीचे शास्त्री व मौलवी, होते. याशिवाय सरदार वगैरेचे कारकून ही होते. असा दरबार होऊन एजंट साहेब यांणीं पोषाकाचा दिवस बदलल्याचा मजकूर लोकांस सांगितला. नंतर रावसाहेब फडणीस आदिकरून मंडळीपाशीं एजंट साहेब यांणीं खैरखुषीच्या गोष्टी बोलून पानसुपारी दिली. नंतर सर्व लोकांच्या भेटी पृथक्पृथक् घेऊन पांच वाजतां दरबार बरखास्त झालें.

जमखिंडीकर यांचे वडिलास सालमजकुरीं

पोषाक दिला नाहीं. आण्णासाहेब मिरजकर यांचे वकिलास ते वकील आहेत अशी माहिती घेऊन पोषाक देणें आहे तो त्यांस एक दोन दिवशीं मिळेल.

आणखी पोषाक देणें शिलक आहेत ते छ-णराव सोमोशी मनशी वखरे ; वकील निसुडकर विंचूरकर, आणि नीलकंठराव रास्ते, हे गृहस्थ आले नाहींत सबब त्यांची आणखी एक दोन दिवस राहा पाहून सदरहू पोषाक त्यांस देण्यांत येतील.

तारिख मजकुरीं पोषाक दिले त्यांचा आकार एकंदर ८१९६१२ झाला आहे. व देण्याचे राहिले आहेत त्यांचा आकार सुमारें १३५ रुपयांचा आहे.

---

टेलिग्राफ पत्रावरून असें समजतें कीं, मुंबईखात्याच्या २७ व्या काळ्या पायदळ पलटणींतील ज्या लोकांनीं कोल्हापूर व कराची एथें बंड केलें होतें, त्यांस सरकारानें बरतर्फ केलें आहे. आणखी सर्वत्र पलटणींमधून कांहीं लोक काढून दोन नव्या पलटणी करणार त्यांस ३०वी आणि ३१वी काळ्या पायदळ पलटणी असें म्हणतील. लोक कमी भरतील त्यांची भरती भील महार वगैरे लोकांतून करतील.

बंडांचे वेळेस भिरतच्या कमीशनर गेथेड साहेब यांचा जीव एका जमादारानें व एका माळ्यानें वांचविला म्हणून सरकारानें जमादाराला १००० आणि माळ्याला ५०० रुपये इनाम देऊन जन्मपर्यंत पेनशनेंही करून दिलीं.

सिंध कासीद पत्रांत असें लिहिलें आहे कीं, २१ व्या काळ्या पायदळ पलटणी च्या लोकांस कोणी असें समजाविलें होतें कीं, त्यांस जाहाजावर घालून नेऊन बुडवावें, असा सरकारचा इरादा आहे, त्यावरून ती पलटण बंड करणार अशी वदता होती. अशा कित्येक कारणांवरून बंगाल्यांतील बंडें झालीं असावीं. ज्ञा० दे०

---

मुंबईचे पोलिस शिपायांची वर्तणूक रयतेकडेस बरोबर नाहीं याजकरितां एथील रहिवासी लोक एक अर्जी तयार करून पोलिसचे कमिशनर यांस देणार आहेत. कांहीं एक दिवसांवर एका पोलिस शिपायानें एक विधवा स्त्रियेस मारलें, त्याचें कारण इतकेंच कीं, हा आपले हद्दीवर असतांना तिचे घरांत निजण्यास जागा मागूं लागला, ती तिनें दिली नाहीं. या बाबद त्या शिपायावर पोलिसांत तिणें फिर्याद केली होती. दीपि०

---

बंबे टाईम्स पत्रांत नाशिक येथील बातमीदारानें असें लिहून कळविलें आहे कीं, ताल-भुपाल येथून मुसलमान कैदी ५० जण ठाण्याचे तुरुंगांत ठेवण्याकरितां नेत आहेत. त्यांचा मुकाम येथें जाला आहे. त्यास सदरहू पत्र पाठविणारा असें म्हणतो कीं, त्यांस आंदमान बेटांत सरकार ठेवील तर बरें होईल. ठाण्याचा सर्व तुरुंग भरून जाणार नाहीं

आग्रा येथें अद्याप पाऊस पडला नाहीं धान्याचा दर दुपटी तिपटीनें चढला आहे. आलाहाबादेहून गवरनर जनरल साहेब बाहादुर यांची स्वारी कलकत्यास जून

अखेर जाणार होती. असा मजकूर बंबेग्याझिटांत ता. १७ जूनची खबर आला हांवाह्नी लिहिली आहे त्यावरून कळत आहे

पटवर्धन इलाख्यांतील बडे लोकांच्या साऱ्या येथें आल्याचें मागील अंकांत लिहिलें होतें. त्यास श्रीमंत बाळासाहेब व अण्णासाहेब मिरजकर हे गेल्या बुधवारीं, व कुरुंदवाडकर श्रीमंत दादासाहेब, आपासाहेब, आबासाहेब हे गेल्या शुक्रवारीं आपआपल्या संस्थानास परत निघून गेले. आतां फक्त श्रीमंत बापूसाहेब शाहापूरकर यांची स्वारी अद्यापि एथें आहे. दोनचार दिवसांनीं त्यांचाही कुच होईल असें वाटतें. व. सं.

---

सिलोन एथें लोखंडी रस्ता होऊन वाफेची गाडी चालावयाकरितां ठराव जाला आहे.

---

पुणे पोलिसाकडे एक जिवा या नांवाचा मरव्यात गवंडी आला आहे; त्यानें या आठ दिवसांत एथील पुष्कळ लोकांस भलभलतीं कारणें सांगून फसविलें. याबाबतींत त्याजवर खटले आहेत. त्यांतील हकीकत लिहितों. लांकडाचा माल असल्या गृहस्थास पाहिजे म्हणून खरेदी करून दुसऱ्यास देऊन त्याजपासून पैसा घेऊन तोंड चुकविलें. व एका मुउमेस दुध देतों म्हणून भांडें नेलें. तिसऱ्यास मी गवंडी आहें, असें सांगून पाणी आणावयास घागर नेली. वगैरे बाहाणे सांगून फसविलें. यानें मागेंही असेंच लोकांस फसविल्यावरून शिक्षा मिळाली होती.

---

लार्ड एल्फिन्स्टन साहेब गवरनर यांची स्वारी दक्षिणेंत येण्याकरितां मुंबईहून ता. १० जुलईस निघणार आहे. त्यांजबरोबर मिस्तर यंग साहेब व करनल मेलविल असे सरदार येणार आहेत. आपः गवरनर साहेब यांची स्वारी पावसाळा अखेरपर्यंत सरकारी बंगल्यांत दापोडीस राहील असें दिसतें.

रोहिलखंडांतील गफूर ५०० शिपाई सरकारानें नोकरीस ठेवण्याकरितां त्यांचीं नांवें याद्यांत नोंदलीं आहेत.

## जाहिरात.

आम्ही हिंदु नाटककार जे येथें दोन वर्षांपूर्वीं आलों होतों. व नवीन नाटकगृह बुधवार पेठेंत बांधून ११ खेळ केले. तेच आतां येथें पुनः आलों आहों. व नाटकगृह त्याच जाग्यावर बांधलें आहे. तर येथील सर्व लोक आम्हांस मागल्या प्रमाणें उदार आश्रय देतील अशा भरंवशावर येथें चार महिने नाटकें करू करणार आहों. आमचा तिसरा खेळ येता शनवारीं म्हणजे ता. १० जुलई सन १८५८ रोजीं होईल. यावेळीं आम्ही लोकप्रिय असें नलाख्यान करूं होईल याआख्यानांत अजगराचा चमत्कार केला जाईल. याप्रसंगीं सर्वांनीं आम्हांस उदार आश्रय द्यावा. बायकांस निराळ्या दोन माळ्या बसावयास केल्या आहेत. हल्लींच्या नाटकगृहांत विशेष चमत्कार केले आहेत. पुणें ता. ८ तांदूळकुलम ता. १७ माहे मजकूर रोजीं श्रियाळ चरित्र व वीरभद्र आख्यान होईल.

सही गोविंद भट्ट गोखले निसबत नाटक मुंबई.

हें पत्र पुणें ज्ञानप्रकाश छापखान्यांत कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांनीं छा-

# ज्ञानप्रकाश

4939

सोमवार तारीख १२ जुलई सन्न १८५८ इसवी.

पत्राची किंमत.

१० दरसाल रुपये. ९॥ आगाऊ दिल्यास


## ज्ञानप्रकाश ता. १२ जुलई सं. १८५८

**बंगीडांक.**— गेल्या सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध केलें आहे कीं, गेल्या मे महिन्याचे ३रे तारिखेस मुंबईहून व त्याच महिन्याचे १० वे तारिखेस महू एथून इंदुरास डांकमार्गें बंग्या पाठविल्या त्या लुटल्या गेल्या. त्यास या बंग्यांतून ज्या कांहीं डांक वाहणारे जासूदांस सांपडतील; त्या त्यांणीं मुंबईचे पोष्ट आफिसांत पाठवून द्याव्या. ज्या लोकांच्या बंग्या गेल्या त्यांचीं वजनें, नाटपेड, किंवा पोष्टपेड, अथवा सरकारी, व त्या पाठविणारांची नांवनिशी लिहिली आहे. व त्या कोठून कोठें पाठविल्या, त्याचा पत्ताही लिहिला आहे. त्यांत पुण्याचे सावकारांतून मथुरादास, हुकमळ, व नैनसुख आनंदराम यांणीं मालेगांवाहून ग्वालेरीस रवाना करण्याकरितां पहिल्यानें १७५ तोळ्यांची व दुसऱ्यानें १९९ तोळ्यांची, अशा नाटपेड बंग्या बंगीडांकेंत घातल्या आहेत. वयेथील कित्येक साहेब लोकांचींही नांवें आहेत.

**पुणेपोलिस.**— एथील पोलिसांत मान्हादूपोळ या नांवाचा एक मेजर हवलदार १६ रुपये दरमाहाचा आहे. त्यानें एका शिपायास फौजदारांनीं नायकीची जागा रिकामी झाली ती दिली. पुढें त्या नायकापाशीं सदरील हवालदार यानें मी शिफारस केल्यावरून तुला जागा मिळाली असें खोटें सांगून त्यापासून १२ रुपये लांच खाल्ला. हा खटला पोलिसांत रुजू आहे. हा हवालदार या पोलिस खात्यांत थोडे दिवसांचा नोकर असून इतक्या मोठ्या पगारावर चढला. यावरूनच या खात्यांत मोठ्या पगाराच्या जागा ज्यांची नौकरी पुष्कळ वर्षांची, किंवा ज्यांनीं कांहीं हुशारी दाखविली, अशा लोकांस नंबरवारीनें मिळत नाहींत. यामुळें हे लांच खाण्याचे व ठकपेचे अपराध होतात, या करितां पोलिस अमलदारांनीं नांवनिशी नंबरवारीनें करून जागा चढवाव्या हें पुष्कळ चांगलें आहे, असें आम्हांस वाटतें.

**स्वारी.**—नेकनामदार लार्ड एल्फिन्स्तन गवरनर साहेब बाहादूर यांची स्वारी मुंबईहून गेल्या शनिवारीं आगीच्या गाडींत बसून एथें खरखूप येऊन दाखल जाली. वहिवाटीप्रमाणें स्वारी येथील दापुडीचे बंगल्यांत राहिली आहे. खासा स्वारी बरोबर लष्करी वगैरे खात्याचे सक्रेटार मेलविल साहेब, व जुडिशियल वगैरे खात्याचे सक्रेटार आंडर्सन साहेब हे बरोबर आले आहेत. आपल्या गवरनर साहेबांची स्वारी पावसाळाजाईपर्यंत एथें व दक्षिणेंतील मोठमोठ्या शहरांस करणार ऐकून फार संतोष वाटतो.

**पुणेअदालत.**— एथील जाईंट जडज्यांचे शिरस्तेदारीचे जाग्यावर एथील अदालतीचे पहिले कारकून रा. रा. विष्णु परशराम मराठे यांस नेमिलें आहे. सदरहू जडज्यांकडेस सुमारें ३०० शांवर आपिलें दिलीं आहेत. असें ऐकतों कीं, गेल्या बुधवारचे आवझरवरांत जाईंट जडज्य नेमण्याचें कारण कीं, येथें आपिलें फार शिल्लक आहेत, आणि आपिलें अव्वल कज्जे मुनसफ कोर्टांत बरोबर होत नाहींत. सबब आपिलें फार होतात; याकरितां हा खर्च सरकारास जाजती करावा लागतो. याकरितां दरएक कोर्टांतील अव्वल कज्जावर अपिलें किती होतात, त्यांनी यारकरून ज्या कोर्टावरून आपिलें फार होतील त्यांस काढून टाकावें. यावर आमचें म्हणणें असें आहे कीं, ही गोष्ट केवळ नेटीव अधिकारी यांसच लागू करावी, हें आणि वरिष्ठ कोर्टांस कां लागू करूनये? नुकतेच सदर अदालतींत जाइंट जडज्य नेमावे लागले, तर हा खर्च कशानें सरकारास जाला. याचें कारण आमच्या बंधूंच्या लक्ष्यांत कां आलें नाहीं? आपिला बाबद दोष कोर्टावरच लागू करावा असें आमचें मत नाहीं. आमचे लोकांची समजूत अशी आहे कीं, दिवाणींत कज्जा भाउन असावा. निकाल होणें तो कसाका होईना. परंतु अखेरेक रावी. हाल्लीं ज्या पायच्या दिवाणीविषयीं ज्या केल्या आहेत, त्यांवरून जरी आणखी दोनचार केल्या तरी त्या अदालतीस फुरसद मिळणार नाहीं इतका कामाचा गंज पडेल. तेव्हां यादिवाणी ख्यात्यांत वादीप्रतिवादी वकील वगैरे सर्व लोकांचे दोषापासून हा घोटाळा वाढतो, असें आमचें मत आहे.

आमचे एकण्यांत असें आलें आहे कीं, रा. रा. बापूराम बकरे विजापूरचे माजी मामलेदार यांजवर लबकरी लोकांस बक्रशीर मदत केली नाहीं, असा आरोपावरून सुमारें ६ महिने अमानत केलें होतें. त्यांची चौकशी मेहेरबान रोज साहेब सातारचे कलेक्टर यांणीं करून, त्यांजवरील गुन्हा रद्द करून हाल्लीं त्यांस जागा तारगांव पेट्यांत मामलेदारांची दिली. हें ऐकून आम्हांस संतोष जाला आहे.

विजापूर तालुक्यावर रा. रा. नागोराव कृष्ण मामलेदार अॅक्टिंग काम करीत होते, त्यास त्यांची हुशारी पाहून मेहेरबान रोज साहेब यांणीं विजापुरासच त्यांस मुकरर मामलेदार नेमलें आहे. असें समजतें.

**हवा.**—गेल्या आठवड्यांत एथें पुनर्वसु नक्षत्राचा पाऊस बराच पडला. गेल्या शुक्रवारीं पुष्कळ पर्जन्यवृष्टि जाली. तथापि हवेंत अजून थंडाई आली नाहीं. यावरून आणखी पर्जन्याचें पतन होईल असें वाटतें. आभ्रांहीं आकाश व्याप्त आहे. या आठवड्यांत धान्यें धातू नाणें आदिकरून जिनसांत कांहीं फेरफार जाला नाहीं. रोगराई सामान्य सालाप्रमाणें आहे.

गवरनर जनरल साहेब यांची मडम लेडी क्यानिंग महासेस होती ती कलकत्यास जाण्याकरितां आगबोटींत बसली.

रामपूरच्या नवाबानें बंड जालें होतें, तेव्हां सरकाराबरोबर इमानीपणाची चांगली वर्तणूक केली, सबब सरकार सदरहू रामपूरच्या नवाबाचे मोठें आभारी जालें आहे. वं. ग्या.

वायव्य प्रांतांत गुलाम कादरखान सरदार यानें बंड केलें होतें, तेव्हां त्याची जिनगी सरकारानें जप्त केली होती, ती जिनगी मिस्तर टामली यानें सरकारास त्या समयीं मोठी मदत केली, म्हणून सरकारानें मेहेरबान होऊन सदरहू जप्त केलेली जिनगी सदरहू गृहस्थास दिली.

---

वं. ग्या.

पुणें येथील पोलिसांतील स्वार याणें एका औरतेच्या घरीं रात्रौ जाऊन तिला झोंप लागली असतां तिच्या गळ्यांतील दागिना नेला. त्या खटल्याबद्दल एक अगरीं तरुण माजिस्त्रेटानें त्याफेरीस दोन महिन्यांची शिक्षा दिली होती, त्याजबद्दल मजकूर आम्हीं मागील पत्रांत प्रसिद्ध केला होता. हाल्लीं तो खटला मेहेरबान माजिस्त्रेट साहेब यांणीं रद्द करून पुनः खटला त्याजवर चालणार आहे.— येथें हवेली तालुक्यांत माळीमुजेरीचे हद्दींत गोमाजी माळी भायरकर म्हणून खराब चालीचा राहात असे. त्याजवर पोलिसाची नजर असे. तो दोन दिवस दृष्टीस पडला नाहीं, यामुळें शक घेऊन पोलिस चौकशी करीत होते. इतक्यांत त्यानें एका बायकोस हेल नेण्याकरितां म्हणून नेली आणि तीनाहींशी जाली, यावरून चौकशी करितां त्यास कोणी मारलें असें चौकशींत शाबीद जालें. नंतर त्या गोमाजीस पोलिसानें पुण्यांत पकडलें आहे. पूर्वी या गोमाजी माळ्यास एकवार शिक्षा मिळाली होती.

आम्हीं असें ऐकतों सातार जिल्ह्यांतील वाई तालुक्याचे जाईंट पोलिस यांचे हद्दींत भालिकडेस एक दोन चोऱ्या जाल्या होत्या. त्या चोरीचा माल व चोर असे तेथील पोलिसानें पकडले आहेत. यांत विशेष इतकें आहे कीं, ते चोर अट्टल चोरांपैकीं, व पुण्यांत नुकते गणपतसिंग यांचे चोरींत सांपडले. त्यांतील कांहीकांस शिक्षा होऊन राहिलेले चोरांपैकीं आहेत. कितीएक चोर असे बिलंदर आहेत कीं, जसें सरकारानें ठक लोकांचा इनसाफ करण्याकरितां बेळगांवास एक सुपरिंटेंडेंट नेमून त्या दुष्ट अपराध्यांची चौकशी होऊन त्यांस शिक्षा मिळत असते. त्या मतींतील हे लोक आहेत. या ठकलोकांची एक शाखा मुंबईस गेली आहे. ती मेहेरबान फारजिद साहेबांचे दृष्टीखालीं असेलच. आतां सदरहू कैदी कोणत्या आब्रूचे आहेत हें वाईचे जाईंट पोलिस यांस सदरहू खटल्यांत दाखल करण्याकरितां पुरावा पाहिजे असल्यास पुणे पोलिसांकडून मागवावा. कारण, या लोकांचीं कामें कोणतीं याविषयीं पोलिसाजवळ दफ्तर आहे. व तें किरकोळींत असेल असें नाहीं. चालत्या कामांतच असेल, असें आम्हांस वाटतें.

इनाम कमिटी.— मुंबईच्या ग्याझिट पत्रकर्त्यांचे ऐकण्यांत आलें आहे कीं, सरकारचे लष्करी आणि आरमार खात्याचे सेक्रटारी कर्नल मेलविल यांची स्वारी येत्या नोवेंबर महिन्यांत विलायतेस जाणार आहे. त्या जाग्यावर कप्तान कौपर एलिनेशान खात्याचे रिविसुकमीशानर हे बहुत करून होतील. पुणें-आबक्षरवराचा कर्ता म्हणतो कीं, हें एलिनेशान खातें मोडणार असें आम्हांस चांगले आधारावरून कांहीं दिवसांपूर्वी कळलें आहे. आणि आतां मोडण्याचा क्रमि होईल हें हीं खचित दिसतें. हें खातें लोकांस अप्रिय आहे, आणि हें मोडण्यापासून लोक आनंदी होतील.

गाइकवाड.— हालींच्या मन्वंतरांत ज्यांचा निर्दोष प्रामाणिकपणा दृष्टीसची-स येतो, त्यांस त्याचा योग्य देणगी प्राप्त होते. याविषयीं एक चिन्ह घडून आलें आहे. हिंदुस्थानांत बंड उठल्यापासून वर्तमान काळचे गाइकवाड महाराजांनीं इंग्रेजसरकारचे सत्तेला मिळून राहून जें कांहीं उचित तेंच साहाय्य करण्याचा प्रयत्न केला, सबब नेकनामदार कोर्ट आफ डिरेकटर्स यांणीं मेहेरबान होऊन गुजराथ कांटिंजेंट नामें लष्कराच्या खर्चासाठीं बडोदे संस्थानांतून दरसाल ३,३२,०००, तीन लक्ष बत्तीस हजार रुपये घेण्याची वहिवाट होती, तो ऐवज त्यांजपासून पुढें घेऊं नये म्हणून हुकूम फर्मावला आहे। आपासाहेब गाइकवाड यांच्या इमानीपणास हें मोठें आनंदाचें बक्षीस आहे. आणि जसजसी त्यांची वर्तणूक दिसण्यांत येईल, तसतसा प्रमाणें त्यांची योग्यता वाढेल. यांत संदेह नाहीं. टेलिग्राफ कर्ता लिहितो कीं, सर राबर्ट शेक्सपियर यांणीं १९वे जून रोजीं मोठा दरबार करून तेथें पुष्कळ थोर व वजनदार गोरे व काळे आलेले लोक जाल्यावर कोर्ट आफ डिरेकटर्स यांजकडील आलेला हुकूम वाचून दाखविला. सेनाखासखेल यांणीं इंग्रेज सरकारचें हें औदार्य पूर्णपणें जाणून आपल्या प्रधान मानकऱ्यांस उत्तम देणग्या दिल्या.

---

मुरार.— एथून २५वे जून रोजीं सर ह्यू रोझ साहेब यांणीं लिहिलें आहे कीं, ग्वालेर परत घेतली त्या वेळेस किल्यांतील तोफा खेरीज करून लढाईंत त्यांचे फौजेनें बंडवाल्यांपासून १९वे जून रोजीं १६ तोफा घेतल्या. त्यांत एक २४ रतली व दुसरी १८ रतली, आणि तिसरी ८ इंच गोळ्याची अशा पितळी तोफा आणि खेरीज बहुत विलायती ९ रतली, व दुसऱ्या तऱ्हतऱ्हेच्या तोफा घेतल्या. व दारूसामान, व युद्धोपयोगीं साहित्य, गाड्या आणि सत्तर हत्ती घेतले. जनराल नेपियर यांणीं बंडवाल्यांचा पाठलाग करून त्यांतून पुष्कळांस मारिलें. त्यांचीं प्रेतें चोहींकडे पडलेलीं आढळतात. नेपियर साहेबांनीं २५ तोफा पाठलागांत पराभव करून घेतल्या. या ग्वालेरच्या बंडखोरांपासून एकंदर ५२ तोफा घेतल्या. असें सरकारी वर्तमानावरून कळलें

## ज्ञानप्रकाशकर्ते यांस.

विनंती विशेष. मौजे काटी बागज कर्यात बारामती तालुके इंदापूर येथें ता० २० मे सन १८५८ इसवी. ऊर्फ अधिक ज्येष्ठ शुद्ध रोज गुरुवार या दिवशीं रात्रीं दोन प्रहरचे सुमारें एका गुजराच्या घरावर दरवडा पडला त्याची खबर इंचार्ज पोलिस अंमलदार वासुदेवराव तालुके मजकूर यांस लागतांच ते स्वतां मौजे मजकुरीं जाऊन त्यांणीं सदर्हू प्रकरणीं मागलाग आदिकरून चौकशी करण्यांत पराकाष्ठेची मेहेनत घेतली. ती इतकी कीं, ते स्वतां चौकशीच्या कामांत निमग्न असल्यामुळें एक दिवस त्यांस उपोषणाही जालें. तथापि त्या वेळेस त्या गोष्टीचा शोध न लागतां ठाण्यांतील कांहीं जरूरीचें कामासाठीं सदर्हू ठिकाणचें काम पोलिसाकडील लोकांस सोंपऊन ठाण्यांत आले. तथापि ठाण्यांतूनही त्या गोष्टीचा बारीक विचार करण्यास त्यांजकडून अंतर झालें नाहीं. पोलिस लोकांकडून पत्ता लागण्याची आशा दिसेनासबब (अजमासें पंधरा रोज जाले असावे.) त्या हद्दीकडे जाऊन आणखी तपास करण्यांत निरालस्यपणें त्या कृत्यास उद्युक्त जाल्यानें सदर्हू दरोडा संपूर्ण सांपडला. तो असा कीं, पांचशेंपासून साहाशेंपावेतों मुद्देमाल व फेरी असामी ११ अकरा सांपडले इतकेंच नाहीं, तर ते गुन्हेगार लोक मुद्दासही कबूल आहेत असें ऐकतों. (सदर्हू दरोडा धरल्यामुळें लोकांच्या मनांतील जी "असेच दरोडे पडतील कीं काय?" असी भीति होती ती गेली.) सारांश यांच्या कामांत त्यांच्या मेहनतीप्रमाणें त्यांस सोळा आणे यश मिळालें असें म्हणण्यास कांहीं चिंता नाहीं. लोक बोलतात कीं, या कामांत कोणी गांवचे लोकही अनुकूळ आहेत, असें ऐकतों. त्यास हें काम मित्रभेद करून उघडकीस आलें असावें. सदर्हू कैदींवर आतां खटला तयार होऊन जाईल. त्यानंतर जें वर्तमान समजेल तें मागाहून कळविण्यांत येईल. साल मजकूरचें साल केवळ नारवस्तीचें आहे. सरकारचा हेतु रयतेस समजाऊन देऊन तालुके मजकूरचा वसूल बहुतेक केला. यावरून पूर्वोक्त गृहस्थाची काम करण्याची शैली मोठी गहन असून स्पष्ट दिसून येते. याशिवाय यांचे काम करण्याचे प्रकार आणखी जे स्तुत्य आहेत, तेही दर्शित केले असते. परंतु पत्रविस्तारभय जाणून हविठार्थमात्र कळवीत आहें कीं, तालुके मजकूरचे रयत व इतर लोक यांजला फार खुष आहेत. याशिवाय आणखी एक दरवडा सुमारें आठ महिन्यांमागें मौजे कळंब तालुके मजकूर येथें पडला होता. त्यावेळीं पोलिस लोकांकडून तपास लागण्यास पुनासब तजवीज जाली तरी देखील न सांपडलेला हाली सांपडण्याचे उद्योगांत ते असल्याचा मजकूर जरी अजून पावेतों समजूं देत नाहींत तथापि थोडे दिवसांत याही गोष्टीचा तपास सदरप्रमाणेंच लाऊन ते यश मिळवितील अशी आशा आहे.

---

बेळगांव जिल्ह्यांतील संपगांव तालुक्याचे मामलेदार यांजवर लांच खाल्ल्याबद्दल शक आला आहे. त्याजविषयीं चौकशी होणार आहे.

आलाहाबादचे २२वे जूनचे सरकारी ग्याझेटांत नेकनामदार गवरनरजनराल साहेबबाहादूर यांणीं बेंगालवाल्युंटिअर्स (रोजमुरा ठरल्यावांचून खुषीनें नौकरी करणारे) स्वारांचे टोळीस फांदा देण्याविशीं या हुकूम प्रकट केला आहे. या गोरे स्वारांनीं लखनौस वेढा पडला त्यासमयीं सरहेनरी हावलाक, आलमबागेस, सरजेम्स औटराम, असतां वारंवार लढाया करून फत्ते मिळविली. या करितां गवरनरजनराल साहेब बाहादूर यांचा बहुत आभार मानीत आहेत. आतां या लोकांच्या नौकरीची अपेक्षा नाहीं यास्तव हा जाहिरनामा प्रकट झाल्यापासून त्यांची नौकरी बंद जाली असें समजावें. आणि या लोकांनीं पराक्रम केले एतदर्थ मेहरबान होऊन गवरनरजनरालसाहेब यांणीं या स्वारांपैकीं दरएकास ३०० रुपये इनाम द्यावें म्हणून ठराव केला आहे.

---

मेजर जनराल सरह्यूरोझ यांचे हुकमतींतील मध्यहिंदुस्थानांतील युद्धार्थ सेना समूह याणें नौकरी बजावली सबब, व मद्रास इलाख्यांतील, फत्तेपूर, कानपूर, आणि बनी व लखनौ यांभोंवतीं वेढा पडला होता त्याप्रसंगीं ज्या पलटणी होत्या त्यांस व मद्राशी ४थी व ६वी घोडेस्वार पलटणी यांस ६ महिन्यांचा भत्ता देण्याविशीं गवरनर जनरालसाहेब बाहादूर यांणीं सांक्शान केलें आहे.

---

जागजागीं बंडें होऊं नयेत व झालीं तर त्यांवर ताबडतोब फौज जाऊन पडावी. अथवा बंडवाले इकडे तिकडे अधिक फिरत्याची इच्छा करतील, तर त्यांस फिरकतां येऊं नये. या करितां ठिकठिकाणीं फील्डफोर्स म्हणजे युद्धार्थ सैन्याचे समूह सरकारानें योजिले होते. आतां त्यापैकीं एक सातपुड्या पाशीं जो सेनासमूह होता तो मोडून पर्जन्यकाळक्रमणार्थ जागजागीं रवाना करण्याविशीं हुकूम फरमावला आहे. यामुळें आकबरपूर एथून कप्तान सीली यांचे हाताखालचा पाहाडावर चालणारा तोफखाना २२वे जूनला नगरास येण्याकरितां निघाला. लेफ्टेनंट लाटोची यांचे हाताखालचा घोडनदीचा रिसाला खानदेशांत राहाण्याकरितां २७वे जूनला निघाला. आणि बाकीचा १९वी, आणि चौथी रैफल या काळ्या पायदळ पलटणींचा कूच होऊन रैफल महूकडे गेली. आणि १९वीचा एक भाग बरवानी एथें व दुसरा भाग राजपूर एथें गेला.

---

पंजाबच्या झिदावरून कळतें कीं, सरकारानें असा ठराव केला आहे कीं, पंजाबांत एक नवी गुरखा लोकांचें पलटण भरावें. याविषयीं ठरावाचीं कलमें प्रसिद्ध जालीं आहेत. त्या पलटणीस १५ वी पंजाबी पायदळ पलटण असें नांव देणार आहेत. बं. ग्या.

---

एथून गेल्या बुधवारीं कप्तान लेष्टरसाहेब शाळाखात्याचे इन्स्पेक्टर यांची स्वारी बेळगांवीं जाण्याकरितां चालती जाली.

---

आमचे ऐकण्यांत असें आले आहे कीं, जनराल लेस्टर साहेब गेल्या सोम वारीं अवचित बेळगांवास मरण पावले. मृत्यूचें कारण कांहीं कळलें नाहीं. हा सरदार वृद्ध आणि कसीला असे. तेव्हां त्याच्या मरणानें पुष्कळांस दुःख जाल्या वांचून राहाणार नाहीं.

---

ग्वालेररसिदंटीतून ता॰ २४ जूनची खबर आलेली टेलिग्राफ पत्रांत लिहिली आहे कीं, सरकारची फौज बंडवाल्यांचा पाठलाग करीत असतां त्यांणीं साहा लक्ष वीस हजार मोहोरा त्यांजपासून हिसकाऊन घेतल्या अशी बातमी लिहिली आहे. व पुढें ही पाठलाग करण्याकरितां फौज गेली आहे.

---

गोरखपूरचा राजा ब्यानसी यानें सरकाराबरोबर इमानीपणानें काम केलें, सबब त्यास ५००० पांच हजार रुपयांचा पोषाक देऊन शिवाय नगरच्या राजाचा कांहीं मुलुख जप्त केलेला होता तोही त्या राजास सरकारानें दिला.

---

## पर्जन्य.— (ता॰ १ पासून १५ जूनपर्यंत)

**धारवाड.**— याजिल्ह्यांतील दंबळ तालुक्यांतले २६ गांवीं, व नवलगुंद तालुक्यांतील ८ गांवीं चांगला पाऊस पडला. या पंधरवड्यांत धारवाड, बंकापूर, हांगळ, हुबळी, राणीबेदनूर, आणि कोडी या तालुक्यांत पाऊस पडला नाहीं. मे महिन्यांत पहिला पाऊस पडला, तेव्हां धारवाड तालुक्याचे पश्चिमदिशेकडील गांवांत, आणि राणीबेदनूर व कोडी तालुक्याचे कांहीं जागीं भात वगैरेचे पेरे जाले; परंतु अनावृष्टीमुळें रोपांची खराबी होत आहे. याचप्रमाणें बंकापूर तालुक्यांतील कित्येक ठिकाणीं भात व दुसरे खरीपांच्या रोपांची खराबी होत आहे. हांगळ व हुबळी या तालुक्यांतील थोड्या गांवीं, भाताचे पेरे जाले आहेत; परंतु त्यांचीही दशा आहे. नवलगुंद व दंबळ या तालुक्यांतील जमिनी खरिपाच्या पेरणी करितां तयार केल्या आहेत. व कोठें कोठें पेरेही केले आहेत. पण ओलावा नसले कारणानें खराबी होत आहे. धारवाड, दंबळ, राणीबेदनूर, आणि कोडी या तालुक्यांत उसरान चांगले प्रकारचें आहे. नवलगुंद तालुक्यांत उसाची लागवड झाली आहे; हांगळ तालुक्यांतील ऊसरान अर्धे चांगले प्रकारचें आहे; आणि हुबळी तालुक्यांतील ऊसरान कांहीं जागीं चांगलें आहे, व बाकीचे ठिकाणीं चांगलें नाहीं. नवलगुंद तालुक्यांतील आनिजेरी एथें ताप वाइताप यांची साथ व हुबळी तालुक्यांत देवींची साथ आहे. या दोन तालुक्यांवांचून जिल्ह्यांत आरोग्यता आहे. बंकापूर तालुक्यांतील दोन गांवीं, व कोडी तालुक्यांतील बिल्लहळ्ळी एथें गुरांचा रोग जारी आहे. तेथें १५ गुरें रोगानें मेलीं.

**बेळगांव.**— या जिल्ह्यांतील बिडी, परसगड, तासगांव, पादशाहपूर, संपगांव, चिकोडी, आणि आथनी या तालुक्यांत पाऊस पडला नाहीं. सरील शेवटल्या चार तालुक्यांत भात, नाचणी व दुसरी पहिल्या पेऱ्याचीं धान्यें

यांचे पेरे झाले आहेत, परंतु त्यास ओलाव्याची गरज आहे. संपगाव तालुक्याचे थोड्या जागीं मात्र धान्याचे मोड आले आहेत. चिकोडी, परसगड, तास-गांव, आणि गोकाक (एथें पर्जन्य पडला नाहीं) यांचा पेरा या तालुक्यांत पडिले पेरे होऊन ते चांगले प्रकारें आहेत. बागलकोट, बदामी, आणि हुनगुंद या तालुक्यांत बारिकसा पाऊस पडला. यापैकीं पहिले तालुक्यांत पावसाची हाकाहाक आहे. दुसऱ्यांत पेरे सुरू झाले आहेत; आणि शेवटच्यांत पहिले पेरे चांगले प्रकारें आहेत. गोकाक तालुक्यांचे पेऱ्यापैकीं थोड्या गांवीं पाऊस थोडा पडून शेतें चांगल्या प्रकारचीं आहेत. चिकोडी तालुक्यांत एक पटकीचा रोगी आढळला. त्यांवांचून या जिल्ह्यांत आरोग्यता आहे. व पार तालुक्यांतील एका गांवीं गुरांच्या रोगाची साथ उठून १०१ जनावरें मेलीं. या जिल्ह्यांत पर्जन्यमापक यंत्रें तालुक्यानिहाय नाहींत. बेळगांव ते जिल्ह्यांत मात्र यंत्र आहे, परंतु तेथें या पंधरवड्यांत पाऊस पडला नाहीं.

**सातारा.** — या जिल्ह्याचे कोरेगांव, वांई, वाळवें, आणि तासगाव हे तालुके शिवाय करून सर्वत्र थोडा फार पाऊस पडला. पेरण्या सुरू झाल्या आहेत. वळवाड, पंढरपूर, आणि विजापूर या तालुक्यांत पेरे होत आहेत. खानापूर, जावळी, आणि कऱ्हाड या तालुक्यांत पेऱ्यांचें काम बंद पडलें आहे; आणि मेच्या पर्जन्यांत पेरे होऊन शेतांत धान्यें उगवलीं आहेत, तीं पर्जन्याभावामुळें कोमेजून गेलीं आहेत. सदरील शेवटच्या लिहिलेल्या दोन तालुक्यांतल्या कांहीं गांवीं जूनच्या १ल्या व २ऱ्या तारखेस पाऊस पडला, त्यामुळें रोपें चांगलीं झालीं आहेत. सातारा तालुक्यांत बाजरी खेरीज करून खरीपाचे आणि माहाबळेश्वर जिल्ह्यांत नाचली प्रमाण यांचे पेरे तमाम जाले आहेत. रोगराई कांहीं नाहीं. सातारा, वांई, जावळी, आणि खानापूर या तालुक्यांत गुरांचा रोग थोडासा जारी आहे.

**उत्तर तुकडी.** — या तुकडींत या पंधरवड्यांत ठाणे जिल्हा खेरीज करून फारसा थोडा म्हणजे सांगण्यासारखा पाऊस पडला नाहीं. ठाणे जिल्ह्यांत जमिनींची उखळणी करण्याचे कामास रयत लागली आहे. या सर्व तुकडींत रोगराई कांहीं नाहीं.

---

**उद्योगाचें फळ.** — बंगाल इलाख्यांत द्राक्षांचे फळाची लागवड आजवर उत्तम प्रकारची होत नसे, म्हणून तेथील लोक त्या मुलखांत द्राक्षें उत्तम व्हावयाचीं नाहींत असें समजत असत. परंतु हालीं द्राक्षांचे फळाची मशागत करून वेली लावल्यामुळें तेथें द्राक्षें उत्तम प्रकारचीं निपजूं लागलीं आहेत.

---

बंगाल खात्यांत डिपुटी माजिस्त्रेट जाजती नेमण्याविषयीं सरकारानें [illegible] केलें आहे, परंतु ते किती असावे, याविषयीं इंडियन फील्ड पत्र आधारें करून नाहीं.

वं. म्या

पुणें ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें.

## जाहिरात.

सखाराम पांडुरंग देवळणकर पेठ शनवार यांस जाब देतों कीं, पेठ रविवार येथील घर येकोजी मेहेरजी पारशी यांचे लिलावांत रुपये ७६०० यांस सर्व भागीदार मिळून तारीख १६ एप्रल सन १८५८ रोजी तुमचे नांवें घेतलें यांत हिसा आमचा असोन नावनिशीची याद आहे त्या प्रमाणें आम्ही आपले हिशाचे रुपये दुसरे दिवशी पासून आठ दिवस पावेतों घ्या म्हणत असतां घेतले नाहींत त्या बद्दल शायदीदार आहेत, व त्या घरावर नफा रुपये २०० दुसरे घेणार लोक देत होते त्यांस ही दिले नाहीं ते लोक आहेत आणि हाली व्याज मनोतीची तकार दिवाळखोरा सारखी ज्ञानप्रकाशांत छापून दाखविली ही आम्हास कबूल नाहीं आमचे हिशाचें रुपये लिलावाचे वेरजे पैकीं आज पासून तीन दिवसांत आमचे हिशाचे मालकीचा लायक जामीन देऊन घ्यावे; इमला मोडण्याचा तुमचा आमचा करार नाहीं मोडला असतां नुकसान तुमचे शिरावर आहे. आम्ही नफा भरून घेऊं.

येसूजी बिन काशीबा गुंजाळ.

---

## जाहिरात.

सखाराम पांडुरंग देवळणकर पेठ शनवार. तारीख १६ माहे एप्रल रोजी प्रिनसिपाल सदरअमीन कोडतांतून येकोजी मेहेरजी पारशी यांचें पेठ रविवार येथील घर लिलाव झालें, तें तुमचे नांवें रुपये ७६०० यांस घेतले त्यांत भागीदार तुम्हा कडून असामी आठ पैकीं मी खालीं सही करणार कळवितों कीं, तुम्ही तारीख १ जुलई सन १८५८ रोजी नोटिस दिली कीं, घेन रुपये ७६०० व व्याज रुपये ७६० व मनोति रुपये १५२ व छाप वगैरे रुपये ४४ एकूण ८५५६ रुपये करून तीन दिवसांचे आंत आपले भागाचा पैसा दयाराम आत्माराम यांचे दुकानीं आमचे नावें जमा करून ठेवावा न ठेविल्यास नुकसान भरून घ्यावें लागेल त्यास व्याजाचा व मनोतीचा छाप वगैरेचा पैसा तुम्ही बदतका होत नसून नोटिशींत खोटें लिहिले याचा विचार होईल परंतु आम्ही आठवे भागाचा पैसा रुपये ९५० रोख पेशजी लिलावाचे तारखेस देत असतां तुम्ही घेतले नाहींत व हाली तुमचे नोटिशी प्रमाणें दयाराम यांचे दुकानीं लिहीहत सदाशिव त्र्यंबक जोशी वकील निसबत अदालत यांस समक्ष बरोबर घेऊन गुरुवार निल्हेबे दुकानीं सदरहू रुपये ९५० भरण्यास नेले असतां ते बोलले कीं, आम्हास मुळींच मजकूर माहित नाहीं यास्तव आम्ही पैसा जमा करीत नाहीं सबब आम्ही पैसा माघारा आणून ही नोटीस तुम्हांस कळवितों. लिलावाचे तारखे पासून आज पावेतों आमचे व्याज रुपये ९६। तुमचे आंगावर शिवाय भागीचा नफा तुम्हावर पडेल हें खुप समजून दोन दिवसांत रुपये घ्यावे आणि आमचा आठवा भाग आम्हास घ्यावा न दिल्यास सदरहु व्याज व नफ्याचे रुपये ५०० आम्हास तुम्ही घावे लागतील पुढें व्याज कडां तुम्हावर पडेल.

राकजी भिकाजी गांडापूरकर.

## जाहिरात.

पुणें रविवार पेठ येथील, उमेद हतीभाई गुजर यांस. कळवीत आहों कीं, माझा भाऊ वसनजी मुरारजी याने तुमच्या पाशीं हिंगाचीं आरवीं १३ किंमत अदमासें ४०० यांचीं ठेवली आणि तो गुन्ह पावला आहे त्यास तुम्हांस कळवीत आहों कीं, माझे परवानगी शिवाय तुम्ही मजकूर हिंग अगर त्याचे किमती बद्दल रुपये माझे भावास अगर कोणासही यालतर नरते देऊनये कारण कीं, मी त्याचा वारस आहे सबब पुणें येथील जज्जा कडे वारसा चें सरटिफिकिट मिळे तों पावतों तुम्ही माझे परवानगी खेरीज त्या मालाची आफरातफर करूनये सबब ही नोटीस मी तुम्हास दिली आहे.

ठाकर नारायण मुरारजी मुंबईकर हाल्लीं मु॰ पुणें.

---

कोल्हापूर– श्रीमन्महाराज छत्रपति साहेब यांस पुत्र झाला आहे. त्याचे नामकरण संबंधी उत्साहा गेल्या शनवारीं जाहाला; त्यावेळेस ५० तोफांची सरबत्ति झाली. नांव विठोजी महाराज ठेविल्याचें ऐकतों. वर्त संग्रह.

---

भावी व्यवस्था– कपतान जार्ज फोर्ड साहेब यांनीं इंग्रेजींत एक ग्रंथ केला आहे. त्यांत हिंदुस्थानांत विलायतेहून फौज पाठविण्याविषयीं कशी व्यवस्था ठेवावी हा विषय आहे. ते असें म्हणतात कीं, पहिल्या प्रतीच्या आगबोटींची माळका केप आफ् गुड् होपचे वाटेनें करावी ती प्रत्येक आगबोट दाहा हजार खंडी ओझें नेण्याजोगी असून तिचें सामर्थ्य हजार घोडया एवढें असावें. या आगबोटीच्या योगानें ४१ एके चाळीस दिवसांत विलायतेहून हिंदुस्थानांत व हिकडून तिकडे जातां येतां येईल व दर आगबोटींत २००० फौज, अंमलदार, घोडे, तोफा, सामान आणि २४ दिवसाचें सर्पण व शिवाय सर्व बेताची सामग्री राहील या विषयी आवझरवर कर्ता असें म्हणतो कीं, जरी युरोपखंडांत लढाया चालू होऊन हाल्लीच्या आगबोटी येण्याची रहदारी बंद होईल तरी हिकडून हिंदुस्थानांत येण्यास जाण्यास कांहीं हरकत पडणार नाहीं.

---

यात्रा. सालाबाद प्रमाणें पंढरपुरास आषाड शुद्ध ११ चे दिवशीं जाण्याकरतां आसपासचे लोक येऊन जाऊं लागले आहेत. आतां जेव्हां येथून सोलापूर पर्यंत वाफेची गाडी सुरू होईल, तेव्हां यात्रा पुष्कळ जाऊं लागेल. व पर्जन्य काळचे सर्व श्रमही दूर होतील.

---

पार्लमेंट सभेंतून एक दस्तऐवज प्रकट झाला आहे, त्यावरून कळून येतें कीं, सर्व हिंदुस्थानांत १८०८८४२९७ मनुष्याची वस्ती असा अजमास काढला आहे. द॰ सा॰

---

हिंदुनाटक– गेल्या शनवारीं व त्याचे मागील शनवारीं येथें नाटकें झालीं. मागील शनवारीं सुलोचना आख्यान झालें तें सुरस होऊन त्यांत सतीचा भाग चांगला झाला होता. गेल्या शनवारीं नळदमयंतीचें आख्यान ही सुरस झालें. या प्रसंगीं अजगरानें दमयंतीचें भक्षण केलें. हा भाग सुरस झाला त्या दोन्ही खेळास लोकसमाज पुष्कळ जमला होता. पुढील शनवारीं श्रियाळ चरित्र होणार आहे. यांस शिरच्छेदाचें लोकांचे समक्ष चमत्कार नाटककार करून दाखवणार आहेत. सालगुदस्तां हारवेक येथें यांनीं केलें होतें तें पहाण्यासारखा आहे या करतां लोक तेथें जाण्यास अनमान करणार नाहींत.

---

**मद्रास.**— बंगालहरकारू पत्रावरून आवझरवर पत्रांत असा मजकूर लिहिला आहे कीं, मद्रास इलाख्यांत कंपनीच्या नाण्याची तूट आली. या कारणानें हिंदुस्थान सरकारानें हैदराबाद येथील फौजेस इतर इलाख्यांतील नाण्यांचा पगार त्या हिसाबानें वट्याच्या प्रमाणें करावा असा हुकूम फर्माविला आहे.

**डाक.**— सदई पत्रांमध्ये वर्तमान आहे कीं, डांकेच्या खात्यांवरील मुख्य डिरेक्टर यानें मुंबई इलाख्यांतील पुण्यापासून आमरावतीपर्यंत डांक पूर्ववत् बसवावी, म्हणून शिफारस केल्यावरून हिंदुस्थान सरकारानें ती शिफारस मान्य करून सदई डांक सुरू करण्याविषयीं हुकूम फर्माविला आहे. या व्यवस्थेंत नेमणुकीवर कांहीं जास्ती खर्च वाढणार नाहीं.

---

**गमन.**— मेहेरबान हरिसन साहेब पुणे अदालतीचे जड्ज व सेशन जड्ज आणि दक्षिणेंतील सरदारांचे एजंट यांची स्वारी आजारीपणाचे सर्टिफिकिटावरून विलायतेस लवकर जाणार अशी वर्दंता आहे. आवझरवर कर्ता म्हणतो कीं, साहेब महसूफ यांची स्वारी गेल्यावर त्यांचे जागेवर एथील जाइंट जड्ज हेनरी न्यूटन साहेब हे होतील.

---

**आगमन.**— मेजर जनराल सर ह्यूरोझ यांची स्वारी ग्वालेरीहून निघून आग्रा आणि इंदूर यांचे रस्त्यानें पुण्याकडेस येण्याकरितां निघाली आहे. आणि ग्वालेर येथील काम चालविण्याकरितां फौजेवरील हुकमत चालविण्याचे कामावर ब्रिगेडियर जनरल नेपियर यांस तेथें ठेविलें आहे. माळव्यांतील युद्धोपयोगी सेनासमूह मोडून यकून त्यापैकीं मोठा भाग महू येथें छावणी करून दूर्त राहील. सर्व हैदराबाद कांटिंजेंट यास पुनरपि दक्षिणेंत जाण्याविशीं हुकूम जाला आहे. आव.

---

**वर्दंता.**— अशी आहे कीं, उत्तरभागचे रेविन्यु कमीशनर फासिट साहेब यांची स्वारी पर्जन्यकाळ संपल्यावर चाकरी सोडून विलायतेस जाणार आहे. परंतु आवझरवर कर्ता म्हणतो कीं, साहानेंच आम्ही बातमी अशी ऐकतों. त्यास आसाहेबांचे मुंबईहून गलबतें जातात, त्यांवरील उतारूंचे नांवनिशींत नांव पहाण्यांत येईल, तेव्हां आम्ही खरें मानूं. आणि दरसाल ४० रुपयांची प्राप्ति, व हिंदुस्थानांतील मोठा हुद्दा सोडून देणें ही कांहीं लहान गोष्ट नाहीं.

---

मुंबई खात्याचे २०वे काळे पायदळचा लेफ्टनंट कर्नल जेम्स पोप यांस चाकरी सोडून विलायतेस जाण्याविशीं परवानगी मिळाली. बादशाही २३वे गोरे पायदळचा लेफ्टनंट लेस्ताकरीड फार्बस यांस चाकरीचा राजीनामा देण्याविशीं परवानगी मिळाली. आव.

---

**मृत्यु.**— खानदेश जिल्ह्याचे असिस्टंट कलेक्टर आणि माजिस्त्रेट डिग्बीनीब साहेब हे आसलावर शिकार करीत असतां त्यांचे बाहूस थोडे दिवसांपूर्वीं

एक ज़बर जखम जाली होती. त्यायोगें साहेब महसूफ मालेगांवीं मरण पावले. यांचेच सरवे बंधु ग्वालेरच्या लढाईंत मारले गेले. हे दोघे बंधु अल्प कालांत मरण पावले ही गोष्ट मोठी दुःखदायक आहे.

---

विलायत.— येथील ९ जून पर्यंतची डांक मद्रासेस ७ जुलई रोजीं येऊन पोंचली. त्यावरून कळतें कीं, पार्लमेंट सभेनें पुनरपि हिंदुस्थानचे राज्यकारभाराचे व्यवस्थेबद्दलचा विचार चालविला आहे. परंतु अद्याप कोणताही निकालाचा ठराव जाला नाहीं. ७वे जून रोजीं मिस्तर ग्लाडूस्तन यांणीं हिंदुस्थानाचे राज्य व्यवस्थेबद्दल ठराव ठरण्यांत आले नाहींत. तरी कंपनी सरकारानें हाल्लींचे आकृदावरून हिंदुस्थानचे राज्य कारभार चालविण्याचे राणीचे नांवें कौन्सल पुढील पार्लमेंट सभा भरे पर्यंत करून कारभार चालवावा. व त्यावर एका प्रधानाची देखरेख असावी. असें भाषण केलें, परंतु लार्ड स्तानली याणें याविरुद्ध भाषण करून त्याचे पक्षास बहुत लोक अनुकूल जाल्यावरून हा ठराव नाकबूल जाला.

मिस्तर रोबक याणें कौन्सल हा शब्द काढून टाकावा, आणि एक प्रधान हिंदुस्थानचे राज्यकारभाराविशीं विलायतेस नेमून त्यानें पार्लमेंटावर जबाबदारी नठेवितां सर्व राज्याची व्यवस्था ठेवावी. असा अभिप्राय कळविला. त्यावर पुष्कळ भाषण होऊन विषय तसाच अपुर्ता राहिला. अमेरिकेंत अडचणी वाढतात असें दिसतें, परंतु लढाई होण्याचीं कांहीं वास्तविक चिन्हें दिसून येतात असें वाटत नाहीं.

---

## नेमणुका.

अज्जम बळवंतराव रामचंद्र यांस ठाणे जिल्ह्यांतील कोळवण येथें मामलेदार नेमिलें.— अज्जम काशिनाथ विनायक यांस ठाणे जिल्ह्यांत वसईचे मामलेदार नेमिलें.— मिस्तर जे. आर. स्मायरस नगरचे डिस्त्रिक्ट डिपुटी कलेक्टर आणि माजिस्त्रेट यांणीं आमदाबाद येथील हुजूर डिपुटी कलेक्टरीचें काम करावें.— रावबाहादुर जगन्नाथ गीरधारीलाल यांणीं नगर येथील डिस्त्रिकटर आणि माजिस्त्रेटचें काम करावें.

खालीं लिहिलेले साहेबलोक यांणीं जुनीयर दिवाणी नोकरींतील भाषेची परीक्षा दिली, त्यांचीं नांवें, व भाषेचें नांव

| | |
|---|---|
| मिस्तर ए. के. नेरनी | मराठी. |
| मिस्तर स्त्रे | गुजराथी. |
| मिस्तर आर. बी. वाथिंगटन. | हिंदुस्थानी. |
| मि. जे. ए. सी. ज्यरवाईस. | हिंदुस्थानी. |
| मि. सी. डब्ल्यू. बेल. | हिंदुस्थानी. |
| मि. सी. ए. मिडलटन. | हिंदुस्थानी. |

---

मिस्तर. जे. एम्. आरस्कीन यांस स्पेशाल ड्यूटीवर प्रांतांत नेमिलें.— मिस्तर टकर यांणीं मिस्तर आरस्कीन स्पेशाल ड्यूटीवर आहेत तोंपर्यंत आकौंटेंट जनरलचे फस्ट असिस्टंटचें काम करावें.— मिस्तर एच. एल. आंडरसन सरकारी पोलिटिकल व सिक्रेट खात्याचे सक्रेटर नेकनामदार

गवरनर साहेब दक्षिणेंत आहेत तोंपर्यंत सद्री ल सरकारीचें काम लार्ड ह्यीपसचे पाहावें.

पालनपूर येथील पोलिटिकल सुपरिंटेंडेंटचें कामाचा चार्ज लेफटेनंट कर्नल जे. आर केली यांणीं क्यापटन जेकाल पासून ता॰ २८ जून संन मजकुरीं घेतला.

**इनाम.**— शिंदे आलिजाबाहादर यांची ग्वालेर राजधानी इंग्रेजी फौजेनें सर ह्युरोझ साहेब यांचे हुकमतीनें हस्तगत करून घेतली. त्या लोकांस एक एक रुप्याचा चांदमानाचा देण्याविषयीं महाराजांनीं आपला अभिप्राय गवरनरजनराल यांस लेखनद्वारें जाहीर केला आहे.

**प्रयाग.**— येथें २६ जून रोजीं आग्र्याहून वर्तमान आलें आहे कीं, ग्वालेरीकडून बंडवाले पळालेते चंबळनदी उतरले. व त्यांस श्रीमथुरा एथील दुसरे पळालेले बंडवाले पुष्कळ जाऊन मिळाले आहेत. हें वाहर धोलपुराच्या पश्चिमेस पंधरा कोसांवर आहे. परंतु आतांच खबर येऊन दाखल जाली आहे कीं, ते मकळीपुराकडेस चालते जाले. ते जयपुरास जातील असें वाटतें; परंतु ते जयपुरास जाणार अगर भरतपुरास जाणार हें त्यांचे दुसरे मुकामावरून समजेल. त्यांजवळ तोफा नाहींत. परंतु १७ हत्ती आहेत, आणि ७००० सात हजार पायदळ व स्वार मिळून फौज आहे; कपतान ओरसाहेब २४ जून रोजीं गुणाकडेस चालते जाले. ग्वालेरीस पुनः अंमल बसला.

ता॰ २७ जून रोजीं असें वर्तमान कळलें कीं, २४ वे जून रोजीं सकाळीं ग्वालेरीहून निघालेले सर्व बंडवाले हिरोन मुकामीं पोंचले होते, आणि २६ जून रोजीं सकाळीं त्यांचे धुणग्यास करां १५००० पंधरा हजार संख्या गणली आहे. आणखी दिसतें कीं, त्यांजवळ हत्तीवरील थोडे जंबुरे आहेत. ते टोळ्या करून भरतपुराकडे अगर जयपुराकडेस जाणार असें दिसतें. क्यापटन इडन असें लिहितात कीं, बंडवाल्यांचा कुच जाल्याचें पहिलें वर्तमान आल्याबरोबर मोठें नवल जालें; परंतु ते आतां मावळले. कपतान निकसनसाहेब मोठ्या मर्दुमीनें भरतपुरास बसले आहेत. ब्रिगेडियर चावर्स थोड्या फौजेनिशीं काल रात्रीं फत्तेपूर शिकरीकडेस निघून गेले. त्यांस वाटेनें धोलपुरावर सैन्याच्या टोळ्या रवाना केल्या आहेत. व त्या हल्लीं आग्रा येथें परत येत आहेत त्या मिळतील.

**म्युनिसिपालकमिटी**— एथें मुख्य कमिटी गेल्या बुधवारीं सायंकाळचे तीन वाजतां भरली. नवीन गोरे पंच आजती भरले आहेत. तेव्हां सबकमेटींत अध्यक्ष कोणीं युरोपियन करावा. असा विचार होऊन कांहीं थोडेशी बदलाबदली झाली आहे ती पुढें लिहूं.

बंबे ग्याझिटांत प्रसिद्ध बातमी आहे ती येणेंप्रमाणें.

**आग्रा** ता॰ २६ जून.— ग्वालेरीहून पळून गेलेले बंडवाले याविषयीं वर्तमान

भरंवसा ठेवण्याजोगें आलें आहे. तें असें कीं, बंडवाले लोकांच्या तीन टोळ्या आहेत. त्याचा तपशील.

**पहिलींत**- तात्या टोपे आणि रावसाहेब नानाचे पुतणे हे मुख्य आहेत. त्यांत बहुतकरून घोडेस्वार आहेत.

**दुसरींत**- ग्वालेरचे बदमाशी असें योग्य नांव दिलें आहे. त्यांत मोठा नामांकित पुढारी कोणीही नाहीं त्यांत सर्व पायदळचे लोक आहेत.

**तिसरींत**- बांडयाचा नबाब मुख्य आहे. तींत घोडेस्वार व पायदळचे लोक आहेत. आणि १८-२० हत्ती आहेत. व भेरी आहेत, परंतु तोफा नाहींत. सदरीं लिहिलेले लोक चंबळ नदी उतरून धवलपूरप्रांतांत कितीएक ठिकाणीं गेले. त्यांची मुख्य जमावाची जागा श्रीमथुरा आहे. त्यांणीं करावलीप्रांतांतून मचलपूर येथें गमन केलें. अद्यापि त्यांणीं ती जागा सोडून गेल्याची खबर आली नाहीं. बंडवाले लोक मचलपुराहून निघून भरतपुरास गेले. ती जागा भरतपुरापासून तीन कोसांवर आहे.

---

**विलायत**.- एथील डांक १७ जून पर्यंतची मुंबई ता. ९ जुलई रोजीं दाखल जाली. त्यांतील वर्तमानें. या आगबोटींतून बादशाही ५६ वे पायदळपलटणीचे १७२ लोक आले आहेत. हिंदुस्थानाविषयीं वादविवाद चालला आहे न. कांहीं ठराव ठरण्यांत आले आहेत. हिंदुस्थानचे राज्यकारभार चालविण्याकरितां विलायतेस कौंसल होणार त्याचे पंच १२ हून कमी, व १५ हून जाजती नसावे. असा ठराव जाला आहे. पार्लमेंटसभेंत यहुदी म्हणजे इस्रायल लोकांस पंच नेमण्याची आजपावेतों वहिवाट नव्हती. त्याविषयीं मोकळीक होऊन पुढें हे लोक सभासद होतील. नेकनामदार कोर्ट आफ डैरेक्टर्स यांणीं सरकालिन क्यांबेल हिंदुस्थानचे कम्यांडर इनचीफ यांस सालीना २०००० वीस हजार रुपये. व सर जेम्स औट्राम यास सालीना १०००० दाहा हजार ताहांयात देण्याविषयीं ठराव केला आहे. कंपनी सरकारानें हिंदुस्थानांत फौज पाठविण्याकरितां वीस जहाजें घेतलीं आहेत.— नेपलसच्या राजानें जे इंग्रेजी दोघां रयतेस सजा केल्या होत्या, त्याबद्दल तीस हजार रुपये विलायत सरकारास देण्याचें कबूल केलें.— मागें फरासीसाचे बादशाहानें आरमार व लष्करी रवानगी पाठविली, असें आम्हांमें वर्तमान उठलें होतें, परंतु फरासीसचे सरकारी मानथोर पत्रावरून ही बातमी खोटी असें कळल्यावरून मुख्य प्रधान मिस्तर डिसरायली याणें खरें असें मानलें आहे.— फरासीसचे सर्व लष्करास रैफल बंदुका देणार आहेत. क्यांडियाचे टांतील ग्रीक लोकांनीं केलेलें बंड मोडलें.

---

हरकारूवरून समजतें कीं, जो मरप्यात महामारीवर औषध देणारा डाक्तर हानीकबरज्यर यांस माहामारीनें गांठलें, परंतु तो त्या रोगांतून वांचेल अशी आहे. सदर्हू मजकूर पुणें आब्जरवरावरून समजत आहे.

---

हें पत्र पुणें ज्ञानप्रकाशाछापखान्यांत कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांणीं छा॰

# ज्ञानप्रकाश

सोमवार तारिख १९ जुलै सन्न १८५८ इसवी. ७

## पत्राची किंमत.

१० दरसाल रुपये. ९॥ आगाऊ दिल्यास रु०

## वसूल रुपये आगाऊ आले ते.

९॥ अज्जम हरिगंगाधर सोमण मुनसफ कोर्ट मालेगांव.

९॥ आनंदराव शिवाजी हेड कारकून निसबत इंजनियर.

९॥ सदाशिव तुकदेव देशमुख चांदवड

## ज्ञानप्रकाश तारिख १९ जुलै सन्न १८५८.

**नाटक,**—गेल्या शनवारीं पर्जन्य पुष्कळ पडल्यामुळें नाटक जालें नाहीं. उद्यां रात्रीं पर्जन्य पडला नाहीं तर रावणवध व भरतभेट लेकरणार आहेत असें समजतें.

---

**रेलवे,**—या कारखान्यापासून जितका संतोष आहे, तितकेंच दुःखही आहे. दुःख बहुधा, रेलवे कंपनीच्या कंजुषपणामुळें, व तिचे कामगारांवर तिचा भरंवसा पराकाष्ठेचा असल्यामुळें, उतारू लोकांस सहन करावें लागतें. या गाड्यांत तिसऱ्या क्लासांत घाशीरामी, व घष्पाघोळ जो आहे, त्याच्या प्रतिध्वनीनें आमचे कर्ण लवकरच बधिर होतील, व आमचें मस्तक या कटकटीनें फिरून जाईल याचें आम्हांस भय पडलें आहे. या तिसरे क्लासाविषयीं जर रेलवे कंपनी विचार करील, तर बरें आहे. आणि दुसरे क्लासाचे दर अधिक वाढविले आहेत ते कमी केले असतां संभावित लोक अधिक अधिक जाऊन या कंपनीची किफायत होईल. हल्लीं खोपवली व नारळें यांचे दरम्यान या गाडीचे रस्त्यावर पावसामुळें दरडी खालीं कोसळून पडले कारणानें १३ मिनहूस अटकाव जाला होता, परंतु रोज रुपयाप्रमाणें १५० मजूर या कंपनीनें लावून रस्त्यावरील मलमा काढून टाकला. आतां पूर्ववत् गाडी जात येत आहे.

---

**हवा.**—गेल्या आठवड्यांत पुनर्वसू नक्षत्राचा पुष्कळ पर्जन्य पडला. अहोरात्र सरीमागून सरी मोठ्या येत असतात. सूर्यदर्शन आठवड्यांत क्वचित् जालें अद्यापि ढगें येत आहेत. हवा थंडशी जाली आहे. पर्जन्यवृष्टि चोहोंकडे होऊन पेरे होऊन शेतें हिरवीं दिसूं लागल्याचें कळलें.

---

**जयपूर.**—एथें ग्वालेरीचे बंडवाले गेले त्यांस जयपूरचे कांटिजेंटचे लोक चार तोफांनिशीं जाऊन मिळाल्याची बातमी आहे. या बंडखोरांचा अध्वर्यु तात्याटोपे आहे असें म्हणतात.

---

**मुंबई.**—एथें सरकारानें मुंबई आणि सुरत यांचे दरम्यान दर्यांत तोफखाना ठेवण्याविशीं हुकूम केला आहे. या लोकांच्या ८० लोकांची एकेक कंपनी अशा दोन कंपन्या करणार आहेत. याचें कारण कीं, मुंबईचे कोटांतील तोफखाना महूवर पाठविला आहे.

---

**अबकारी.**—३ मिनहूपर्यंत मुंबईस एका आठवड्यांत तमाखू, गांजा, व तपकीर यांवरील पट्टी २०७६९८ रुपये जमा जाली आहे.

## प्रसिद्ध बातम्या.

**आग्रा,**— एथून प्रयागास खबर ता· २६ जून रोजीं आली कीं, ग्वालेर येथील पळालेले बंडवाले यांची एक टोळी चंबळ नदी उतरून गेली. तीस धोल्पूरचे पश्चिमेस तीस मैलांवर श्री मथुरा आहे तेथून दुसरे पुष्कळ पळालेले बंडखोर येऊन मिळाले आहेत. आणि आतांच आणखी वर्तमान आलें त्यावरून कळतें कीं, ते सर्व मकाली पुराकडे चालते जाले. असा तर्क होतो कीं, त्यांचा रोख जयपुराकडे असावा, परंतु त्यांच्या दुसरे मजलेवरून त्यांनें भरतपुराकडे किंवा जयपुराकडे जाण्याचें धोरण करून येईल. त्यांजवळ तोफा कांहीं नाहींत, परंतु सतरा हत्ती व सुमारें सात हजार स्वार व पायदळ आहे कपूतान ओर याणें २४ वे मिनहूस गुण्याकडे चाल केली. ग्वालेरींत पुनः अमल बसला. सदरील वर्तमानाचे दुसरे दिवशीं खबर आली कीं, २४ वे तारिखेस ग्वालेरीहून गेलेले बंडखोर सर्व हिंदनमुकामीं येऊन पोंचले. आणि २६ वे तारिखेस सकाळीं त्यांच्या छावणींतील गणती १५००० ची होती. यांजवळ हत्तीवरील जंबुरे थोडे आहेत असें दिसतें. जयपुराकडे किंवा भरतपुराकडे स्वारी करावी याविषयीं मनसोबा बंडवाल्यांचा चालला आहे असें दिसतें. कपूतान एडन हा लिहितो कीं, बंडवाल्यांना पहिले हालचालीचें वर्तमान कळलें तेव्हां मोठा आचंबा जाला कीं, हे सर्व दबले. कपूतान निक्सन हा भरतपुरास बेफिकीर दिलानें बसला आहे. ब्रिगेडियर शोवर्स हा गेल्या रात्रीं थोड्या फौजेनिशीं फत्तेपूर सिक्रीकडे चालता जाला. त्यास धोल्पुरास फौजेच्या टोळ्या पाठविल्या आहेत त्या आग्र्यास परत येतात. त्या येऊन मिळतील.

**गया,**— एथून २५ वे मिनहूची खबर आलाहाबादेस येऊन पोंचली आहे कीं, एका नहान बंडवाले बदमाश लोकांचे टोळीनें २३ वे जून रोजीं सकाळीं गयेच्या तुरुंगांत जाऊन कैदी खुले केले. नजिबांनीं त्यांस अडथळा केला नाहीं. गया शहरांत स्वस्थता आहे. तेथें कांहीं लूट किंवा जाळपोळ जाली नाहीं. ५० नजिब बरोबर देऊन गयेहून श्रीगोमतीस कांहीं दिवसांपूर्वी ११६ कैदी सुरक्षित राहाण्याकरितां पाठविले होते. ते जेव्हां श्रीगोमतीजवळ गेले तेव्हां कांहीं नजिबांनीं भाईबंदपणानें कैद्यांशीं मिलाफ करून, त्या नजिबांवरचा अंमलदार जमादार यास गोळी घालून मारलें, आणि ते पळून गेले. सीक पोलीसचे ३०० पायदळ, ५० स्वार यांस गयेस जाण्याविषयीं हुकूम जाला आहे

**गोरखपूर,**— एथून २३ वे जून रोजीं सुमारें ४०० किंवा ५०० बंडवाल्यांची एक टोळी गोग्रा नदी सारन परगण्यांतून उतरली. आरा परगण्यांतील जाहानाबादेचा दरोगा त्या बंडखोरांनीं मारला. आणि डांकेचा बंगला, मुनसफाची कचेरी, आणि ठाणें ह्यांचा सर्वा नाश केला. कप्तान राट्रे यास तिकडे कूच करून त्या दुष्टांस बंद करण्याचा यत्न करण्याविषयीं सूचना गेली आहे.

**आलाहाबाद,** तारिख २६ जून. पाटणा डिविझनचे कपूतान मिल्स यांचे हाताखालील स्वारांवर गेल्या रात्रीं— एथें (तारायंत्रांतून गांवाचें नांव उमटलें नाहीं.) बंडखोरांनीं हल्ला केला. सूर्योदय होतांच त्या स्वारांनीं बाहेर पडून शत्रूचे बारा लोक मारून त्यांस पराजित केले. या स्वारांनीं चांगली वर्तणुक ठेवून व मोठी उत्कंठा ही यासमयीं दाखविली-

रायलवीचे कर्नल बिंग व कप्तान सोथबी; व यांस ब्रिगेडियर राक्राफ्ट यांचे लोकांची कुमक, यासर्वांनीं मिळून महंमद हुसेन याजवर कप्तानगंजी यापासून पश्चिमेस ५ मैलांवर हल्ला केरून त्याचा अगदीं पराभव करून टाकला. त्याची सर्व छावणी व सामान हीं घेतलीं.

शाहाबादेस बंडखोर येणार असें म्हणतात. जे आपले उपयोगीं पडले त्यासर्वांस मारून टाकण्याचा किंवा त्यांजवर जुलूम करण्याचा प्रकार बंडवाल्यांनीं चालविला आहे. व त्यांचीं घरें जमीनदोस्त करून टाकिताहेत. आमीरसिंग यानें वसूल घेण्याचें काम चालू केलें आहे.—

नौकामसंदिरी नामें शहर गयेचे वाटेवर आहे. त्याजला बंडवाल्यांनीं २४ वे जून रोजीं वेढा घातला आहे. व त्यांणीं बर्कंदाजां पैकीं एकास ठार मारलें. गया एथील नजिबांस बिनहत्यारी करून तेथच्या बुरुंगांत लहान तोफा ठेविल्या आहेत. १२ वे रिसाल्याच्या पाटया गयेस व दक्षिणेकडील दुसरे रस्त्यावर घस्ती घालिताहेत.—

एथून रीडचे लोक आगबोटींत बसून चपऱ्याकडे जाण्याकरितां निघाले.

**पाटणा,—** एथून १ ले जुलैरोजीं वर्तमान आलाहाबादेस आलें कीं, गयेच्या रस्त्यावर जे बंडखोर होते, ते पूर्वेचे बाजूनें सिरसाकडे २६ जून रोजीं चालते जाले. स्वार त्यांचे पाठलागावर आहेत. रात्रे हापीलगंज एथें आहे तो पीलगंजाचे नीट पश्चिमेस दुसरी एक टोळी उतरून गेल्यावर काल रोजीं साहा मैलांवर जाणार होता— गोऱ्या पलटले चपऱ्यांचे बंडखोरांवर हुरंग— यांणीं गोळ्या घालून त्यांस पळविलें.

मिरझापूर एथील नजीब आजरोजीं येऊन दाखल जाले.

---

**मद्रास,—** मद्रासेस रायपूर पेठेंत पाद्री लोक आपलीं पोरें लेंकरें व बाटलेले यांसुद्धां राहात असतात. त्यांच्या देवळांत ता. २ जुले रोजीं संध्याकाळीं सुमारें १५ गांवातील हिंदुलोक जमून जाऊन त्यांणीं तेथील सर्व बुकें, सामान, गाबदाने, हांड्या दिवे वगैरे जें त्यांच्या हातास लागलें त्याचा नाश करून टाकला. इतकें होत असतां त्या ठिकाणा शेजारीं पोलिसाची चौकी असतां त्यांणीं कांहीं एक तजवीज केली नाहीं. हा जमाव ५ वाजल्यापासून जमत होता. हें पाहून एका पाद्रीनें दंगा माजेल याकरितां पोलिसास वर्दी दिली होती. परंतु कांहीं मदत पोलिसाकडून जाली नाहीं. नंतर एक दोन गृहस्थ त्या मार्गानें जात होते त्यांणीं हा दंगा पाहातांच पोलिसाचे गेटावर जाऊन कळविलें. नंतर पोलिसचे शिपाई जमून येतात तंव दंगा करणारे लोक जिकडे तिकडे पांगले. आठ आसामी मात्र सांपडले आहेत. मद्रास आथेनिअमकर्ता म्हणतो कीं, या धांदलींत एका मनुष्याचा मात्र प्राण गेला. तेथचे पाद्री बिचारे एका खोलींतून दुसऱ्या खोलींत, व + + + + + + त्या देवळांतून बाहेर पडून दैवयोगें शेजारचे बागेंत जाऊन दडाले. नाहींतर त्यांच्या प्राणांवर कदाचित् येऊन बेतली, असती.

---

नगरकर यासही नें पत्र आलेलें पावलें. दुसऱ्या पत्रीं तें दाखल होईल.

**म्युनिसीपाल कमीटी;**— ता· १७ मिनहूंन कमिटी भरून त्यांत फेरफार जाला तो येणें प्रमाणें. सबकमेटींत पूर्वीं एथील डि- पुटी मजिस्त्रेट नानाभाई मोरोजी होते, त्या जा- ग्यावर एथील सर्वे व मिस्त्री खात्यावरील कोक साहेब, आणि श्री· रा· रा· गणपतराव बल्लाळ नातू, व रावबाहादूर वामनराव जगन्नाथ म्यु- न्सिपाल सदरअमीन, या पंचांचे जाग्यावर इनामकमीशानर ग्रिफीथ साहेब व डिपुटीक- लेक्टर नानाभाई मोरोजी हे जाले. व सबअ सिस्टंट इनामकमीशानर बापुरावजी मांडे, व पुणे विद्यालयाचे प्रोफेसर मेगडुगल हे का- यम आहेत.

---

**विलायत,**— एथील मागील डाकेंत आलेल्या खबरांपैकीं कांहीं लिहावयाच्या रा- हिल्या त्या.— विलायतचे टैम्स पत्रांत लि- हिलें आहे कीं, विलायतेहून हिंदुस्थानाचे कुमके करितां २५००० फौज तीन चार घो- डेस्वार पलटणी असून तावडतोब पाठवि- णार आहेत.— फरासिसांचें मार्सेल्स व दुसरीं त्यांच्या देशाभोंवतालचीं बंदरें एथें कडाकोट बंदोबस्त देवण्याविषयीं एकाएकीं फ्रेंच सरकारानें हुकूम फर्माविला आहे. — युरोपखंडांतील इटली देशाचे दक्षिणेस सिसिली नामें द्वीप आहे. त्या द्वीपांत विसू- विअस नामें ज्वालामुखीपर्वत आहे. त्यां- तून ज्वालाग्राही रसाचे मोठे प्रवाह चालले आहेत.— ऐर्लंडांतील बेलफास्ट नामें शहरांत धर्माचे संबंधानें जो दंगा चालला आहे, त्या करितां तेथें लष्करी फौज पाठवि- ण्याची आवश्यकता जाली आहे.— प्रुशि- या देशाचा राजा हा अद्यापि आजारी आहे. तेव्हां त्याचा पुत्र जो विलायतेच्या राणीचा जां- वई यास आणखी तीन महिने पावेतों कारभार पाहावा लागेल.— हिंदुस्थानचे लष्करी खा- त्याची नवीन फेरफार कशी काय करावी याविषयीं कमिशानर नेमण्याचा सरकारचा हेतु आहे.

---

## सोलापूरचे बातमीदाराकडून.

१ ता· १० दिवसांपासून पर्जन्यवृष्टि यथोचित चालली आहे, यामुळें हवा थंड होऊन शेतकीचें काम चांगलें चाललें आहे.

२ मेहेरबान कामटन साहेब येथील जड्- ज्य यांची नेमणूक ठाण्यास जाइंटजड्जयाचे जाग्यावर जाली होती, परंतु पगारांत कांहीं नुक- सान होऊं लागलें सबब साहेब मोसूफ यांहीं नाकबुलीचा जबाब पाठविला आहे.

३ मेहेरबान डफ साहेब जे पूर्वीं येथें सेकंड असिस्टंट असतां सिंद्हैदराबादेस तेथून अडों व येथें फस्ट असिस्टंट नेमिले होते ते पुनः परत येथें आपले पूर्वीचे जागेवर येणार अशी खास बातमी आहे.

४ माढें येथील मुनसिफ परशुराम विनायक यांजला दिसत नाहीं व ऐकूं येत नाहीं. वृद्धपणामुळें ही अवस्था होऊन काम बरोबर चालत नाहीं. म्हणून जड्ज्य साहेबांकडे अर्ज्या रयतलोकांच्या पडल्यावरून त्यांजला हुजू- र येण्याविशीं आमंत्रण जालें आहे.

५ मेहेरबान कलेक्टर साहेबांनीं आपले ताब्यांतील कामगार लोकांची बहुतीं इच्छिणारे उमेदवारां- ची परीक्षा सुरू केली आहे. प्रथमदर्जानीं रा· सदा- शिवपंत भाऊ चिटणीस व दुसरे २ असामी पसंत प- डले आहेत. ता· ११ जुलै सन १८५८ इ·

## लांचास शिक्षा.

पुणे पोलिसांत माहादू पोळ म्हणून मजर हवलदार १६ रुपये दरमाहाचा नोकर होता त्यानें एका शिपायापासून १२ रुपये लांच त्यास हवालदारीची जागा मिळाली. सबब कामगारास देण्यास पाहिजे म्हणून भुलथाप सांगून घेतला. त्याची चौकशी कप्तान कंबालसाहेब सुपरिंटेंडेंट पोलिस. यांणीं स्वतः केली. त्यांत खानसाहेब फ्रामजी नसरवानजी फौजदार यांची साक्ष जाली: त्यांणीं असें लिहून दिलें कीं, सदर्हू लांच देणार नाईक हा एका शिपायापाशीं हा लांच विनाकारण पोळ मागतो, असें बोलला, ही बातमी त्यांस कळली आहे. असें त्यांणीं जबानींत लिहून देऊन नंतर फौजदार यांणीं वेष पालटून तो लांच देणारा हा सदर्हू शिपायानें विचारिल्यावरून बोलला कीं, अरे सर्व गांवभर तूं लांच पोळ यास दिला म्हणून पुकार जाली आहे. तेव्हां जर फौजदार यांणीं आणि साहेबांनीं मला याविषयीं विचारलें तर मी काय सांगूं ? तो लांच देणारा बोलला. अरे, मी तुजपाशीं जिवली हालविली म्हणून तूं पुसतोस खरें, परंतु मी सर्व गोष्ट नाकबूल जाईन, व तूंही मला ठाऊक नाहीं असें बोल म्हणजे जालें. हें बोलणें जालें तों फौजदार हे वेष पालटून दाराचे आड छपून उभे होते त्यांणीं तो मजकूर ऐकून त्या लांच देणारास शिपाई बाबा राम राम म्हणून बोलून ओळख दिली, आणि कांहीं बोलले, नंतर त्या शिपायानें मनांत आणिलें कीं, जेव्हां यांणीं माझें भाषण ऐकिलें तेव्हां आतां नाकबूल करून फळ नाहीं. असें म्हणून त्यानें सर्व हकीगत लांचाप्रकरणीं कळविली. याप्रमाणें फौजदार यांची जबानी जाली. नंतर मिस्तर देवराव, सुपरिंटेंडेंट पोलिसचे कचेरींत एक इंग्रेजी रैटर आहे. त्यानें असें लिहून दिलें कीं, सदर्हू पोळ हा मजकडेस आला होता आणि कांहीं गुन्हा रद्द करण्याबद्दल मजपाशीं वगैरे बोलत होता. अशा जबान्या जाल्यावर सुपरिंटेंडेंट पोलिस यांणीं सदर्हू हवालदार यास बडतर्फ करून, हा गुन्हा त्यानें केला याविषयीं सर्व पोलिसाचे समक्ष सांगून थोडेसें संभाषण केलें. कीं, या मनुष्याविषयीं मागें मी जेव्हां येथें होतों, तेव्हां गैर वर्तणूक ऐकिली होती, परंतु शाबिदी नव्हती. हाल्लीं हा गुन्हा शाबीद जाल्यावरून त्यास नोकरींतून दूर केलें आहे. सदर्हू मजकूर आमचे समजण्यांत आलेला लिहिला आहे. आम्हीं सर्वांस पुनः सूचना करून कळवीत आहों कीं, लांच घेणें हें केवढें पाप आहे ? याविषयीं या छापखान्यांत एक बूक छापलें. त्याची दुसरी आवृत्ति तिच्या प्रती आहेत त्या सर्वांनीं वाचून पाहाव्या असें आमचें सांगणें आहे.

---

**शाळाखातें.**— ठाणे जिल्ह्यांतील डिपुटी इन्स्पेक्टर विश्वनाथ नारायण यांस त्याच जिल्ह्यांत मुनसफ नेमून त्या जागेवर धुळ्याचे शाळेवरील इंग्लिश स्कुलमास्तर नारो बल्लाळ लिमये यांस व त्यांचे जागेवर कप्तान लेस्टर साहेब इन्स्पेक्टर यांचे हाताखालील मुख्य इंग्रेजी कारकून नीलकंठ माहादेव यांस नेमण्याविषयीं शिफारस जाली आहे असें ऐकतों.

या इलाख्यांत स्थापित झालेल्या शाळांत सरकाराकडून "ग्रांटसइनएड" (आश्रय) मिळण्याबाबदचे नियम कालच्या सरकारी ग्याझिटांत प्रगट जाले आहेत. ते येणेंप्रमाणें,

१ मुलखी सरकार ज्या शाळांमध्यें इंग्रेजी किंवा एतद्देशीय भाषेच्या द्वारें मुलांस किंवा मुलींस किंवा दोघांस चांगल्या व्यावहारिक (धर्मसंबधानें नव्हे) विद्या शिकविल्या जात असतील व ज्या शाळा चांगल्या व्यवस्थे खालीं असतील अशा शाळांत, ज्या प्रांतामध्यें शाळा असेल त्या प्रांतांत त्यांची किती गरज आहे, हा प्रकार पाहून, व जें फंड सरकारच्या स्वाधीन असेल त्या हिशेबानें ) पैका, पुस्तकें, यांच्या किंवा दुसऱ्या हरएक द्वारें सरकारास ठीक वाटेल, अशा प्रकारांनीं मदत करील.

२ ज्या शाळांस मदत मिळण्याविषयीं सरकारास अर्ज येईल त्या शाळांबाबद खालीं लिहिलेल्या गोष्टींची पुरी माहिती सरकारास दिली पाहिजे.

१ लें:— शाळेला अक्षयी किंवा तूर्त चालणारा अशा पैक्याचा आश्रय मिळाला आहे.

२:— शाळेचा सालीना एकंदर खर्च किती आहे तो.

३ रें:— शाळेमध्यें येणाऱ्या मुलांची एकंदरीला संख्या, वय, आणि तो कितीकाळपर्यंत एकंदरीला शाळेमध्यें शिकावयास येतात तें.

४ थें:— शाळेच्या व्यवस्थेविषयीं व ती चालविण्याविषयीं, कोण गृहस्थ जोखीमदार असतील ते व ते किती काळपर्यंत ती शाळा चालविण्यानें जोखीम आपल्यावर घेत असतील तो काळ.

५ वें:— शाळेमध्यें कोणत्या प्रकारचे व कोणकोणते विषय शिकविले जात असतील ते.

६ वें:— शाळेवरील पंतोजीपणाचें काम चालविणारे पुरुष किंवा बायका यांची संख्या व नांवें आणि ती कोणकोणते विषय शिकवितात तें.

७ वें. शाळेंतील निरनिराळ्या वर्गांत जीं पुस्तकें शिकवित असतील तीं.

८ वें. शाळेला कोणत्या प्रकारची व किती मदत पाहिजे व तिचा कोणत्या कार्याकडेस उपयोग करणार.

३.— ज्या शाळेला मदत मिळेल ती शाळा सरकारानें त्या कामाकरितां नेमलेला कोणी कामगार पाहिजे त्या वेळेस पाहावयास येऊन तिची परीक्षा घेईल, व त्या शाळेचा सर्व हिसाब व आंतील विद्यार्थ्यांची नांवनिशी वगैरे पाहील; परंतु या परीक्षेचा धर्मसंबंधी ज्ञानाशीं कांहीं संबंध असणार नाहीं.

४ ज्या शाळेस मदत मिळेल त्या शाळेच्या व्यवस्थेमध्यें सरकार कांहीं हात घालणार नाहीं, परंतु त्या शाळेंतील विद्यार्थ्यांस चांगलें व्यावहारिक ज्ञान प्राप्त होतें किंवा नाहीं याविषयीं आपल्या इन्सपेक्टरांजवळून वारंवार रपोट मागवील, व हे रपोट जर पुष्कळपर्यंत चांगले नसले तर सरकार मदत देण्याचें बंद करील.

५. नार्मल स्कूलें व मुलींच्या शाळा याखेरीज दुसऱ्या कोणत्याही शाळांस त्यामध्यें विद्यार्थ्यांजवळून थोडी बहुत तरी फी घेण्याचा नियम असल्या वांचून मदत मिळणार नाहीं. व ही मदत कांहीं विशेष कार्याकडेस मात्र दिली जाईल.

६ शाळेला लोकांकडून जो आश्रय मिळत असेल त्यापेक्षां जास्ती मदत सरकाराकडून

कधींहा मिळणार नाहीं.

७ ही परत देणांना धर्माच्या संबधानें पूर्णपणें तिन्हाईतपणा राखला जाईल. व शाळेमध्यें अमुक मताचा धर्म शिकवितात किंवा शिकवीत नाहींत, म्हणून त्यांस अधिकउणी मदत मिळणार नाहीं.

---

## नंबर १ ज्ञानप्रकाशकर्तेयांस.

महाराज! या हिंदुस्थानाचें नष्टचर्य जाणून पुष्कळ दुःख करितात. हा देश भिकारी जाला अशी या देशाचे लोकांची ओरड ऐकतों, परंतु हें दरिद्र या देशास आलें तरी कशानें? यांविषयीं लोकांस जर विचारलें, तर दरएक व्यक्तीचें मत निरनिराळें पडतें. कोणी म्हणतात कीं, या देशाचे लोकांनीं आपआपले जातिधर्म सोडले, म्हणून ईश्वर कोपायमान होऊन या लोकांस त्याणें नीचावस्थेस आणलें आहे. कोणी म्हणतात कीं, लोक यथाशास्त्र वागत नाहींत, यास्तव हे भ्रष्ट होऊन ईश्वरी अवकृपा झाल्याच्यायोगें हे भिकारी जाले. कोणी म्हणतात कीं, लोक मूर्ख जाले या कारणानें त्यांस भिकारपण आलें. असो इत्यादि अनेक मतें या आपले देशाचे दरिद्रावस्थेविषयीं आहेत.

या मतांपैकीं ज्यांस या देशाचे लोक मूर्ख आहेत असें वाटतें, ते लोक आपल्या बुद्धीनें कांहीं तरी या लोकांस शाहाणे करण्याविशीं झटतात. पाद्री लोकांचा उद्योग चालला आहेच; सरकारचा उद्योग चालला आहेच; जे कांहीं इंग्रेजी शिकलेले लोक आहेत, व ज्यांस आपण सुधारलेले म्हणतों, त्यांचाही उद्योग चाललाच आहे. असो मी यांच्या उद्योगास दोष लावून लिहीत नाहीं. त्यांचे उद्योग कांहीं अंशीं बरेच आहेत, पण त्यांचे एवढे करण्यापासून देश चांगला होईल असें मला वाटत नाहीं; आणखी पुष्कळ गोष्टी केल्या पाहिजेत.

पहिली गोष्ट मला दिसते, ती ही कीं, या देशाची सुधारणा झाली पाहिजे असें वाटत असेल तर पहिल्यानें या देशाची लोकसंख्या मनांत आणून त्यांत खरे भिकारी किती, व खरे श्रीमंत किती, याची सरासरी निवड केली पाहिजे. भिकारी म्हणजे केवळ भिक्षा मागणारे; आणि दरिद्री म्हणजे ज्यांस अन्नवस्त्र मेहनताचानें, त्यांच्या उद्योगाचे माफक मिळत नाहीं. असे दोन तऱ्हेचे दरिद्री मनांत आणले पाहिजेत. यासारखेंच श्रीमंत म्हणजे ज्याजवळ पैसा पुष्कळ असून तो व्यापारांत आहे; आणि एक जवळ पुंजी बाळगून उशाशीं बांधून आहे, एक नांवाचे पिढीजात श्रीमंत आहेत; हे मनांत आणलें पाहिजे.

आपल्या देशांत भिक्षा मागून पोट भरणारांची संख्या फार आहे. अशी दुसऱ्या देशांत सांपडणार नाहीं. एका मनुष्यानें दुसऱ्या मनुष्यापाशीं आर्जवानें याचना करावी, यासारखें लाजिरवाणें व हलकें कर्म या जगांत दुसरें नाहीं, हें प्रत्येकानें मनांत धरलें पाहिजे.

असें असतां आपले देशांत भिक्षा मागण्याची मोठी प्रतिष्ठा मानतात. भिक्षा मागून कमाई करणें हा एक धंदाच जाला आहे. कोणी तरुण असो, शक्तिमान् असो, मूल असो, स्त्री असो; किंवा अंध, अशक्त, पंगु असो. कोणी

णाहे जे त्यांनीं भिक्षा मागावें. असे कोणत्या ही देवाचा, जातीचा, धर्माचा, असो. त्यास आमच्या देशांत भिक्षा मागण्यास मनाई म्हणून कांहींच नाहीं. व लोकांचे दृष्टीस ही गोष्ट हलकट आहे असें येत नाहीं.

या भिक्षा मागून पोट भरणाऱ्यांत दोन भेद आहेत. एक मतिमिनपणें भिक्षा मागणारे, व दुसरे दांडगेपणा करून, किंवा आपलें कर्म सोडून भिक्षा मागणारे आहेत. या दोघां भेदांस भिक्षा मागण्यास आधार कांहीं तरी संस्कृतांत व आलीकडच्या साधूंनीं केलेल्या प्राकृत ग्रंथांत एकादा चरणाचा किंवा एकादे तुकाचा ओढून ताणून मिळतो. त्यावरच त्यांचा हा धंदा यथाशास्त्र आहे. असें मानतात. त्या भिक्षा मागणारांत असे ही कित्येक धूर्त असतात कीं, या जगांतील सर्व धंदे व भिक्षा मागण्याचे धंद्यापुढें निर्माल्यवत् आहेत असे भासवितात.

आतां मी या भिक्षा मागण्याचे धंद्यावर थोडथोडें लिहावें, असें योजिलें आहे. तर आपण कृपा करून माझ्या पत्राचा स्वीकार करीत जावा. माझे या लहानशा पत्रांनीं शाहाणे लोक माझा हेतु कसा आहे व तो वास्तविक आहे किंवा कसें हें मनांत तरी आणतील. मग तजवीज करणें त्यांच्या हातीं आहे. कळावें तारिख १२ जुलै १८५८

तुमचा मित्र के.

**कोल्हापूर** ता० १३ जुलई. — ता० १० मिनहू पासून पर्जन्य लागला आहे. ता० ११ मिनहूस श्री० रा० रा० बापुसाहेब शाहापूरकर यांची स्वारी शाहापुरास आण्याकरितां येथून निघून गेली. — नरगुंदकर यांणीं जे लोक बरोबर नेले होते त्यांपैकीं बाळकृष्ण, कुळकरणी हा फरारी जाला होता, त्यास हालीं पकडून कलादगी येथें कैद करून नेलें आहे.

इं० सं०

सरकारी दरबांकडा पांच रुपये व्याजाचे लोन म्हणजे कर्जासंबंधी हौस आफ् कामन्स सभेकरितां जे हिशेब आलिकडेस छापले आहेत त्यांमध्यें लोकांकडून जो भरणा जाला त्याचा तपशील दाखविला आहे तो येणें प्रमाणें.

सन १८५१–५२ सालचे कर्जाबद्दल.

साहेब लोकांकडून रुपये ३८४३०५००

एतद्देशीय लोकांकडून रु० १९५८७६००

१८५४–५५ सालाबद्दल.

साहेब लोकांकडून रुपये. १७३६०७००

एतद्देशीय लोकांक० रुप० १०१३९३००

१८५६–५७ बद्दल.

साहेब लोकांकडून रुप० ५६९१२००

एतद्देशीय लोका० रुप० २७१३८००

इं० सं०

**धार** – या संस्थानांत साल गुदस्तां दंगा होऊन तेथील अव्यवस्था जाल्याकारणानें हिंदुस्थान सरकार व त्यावरील कंपनी सरकार यांचे विचारास तें संस्थान इंग्रेजांचे राज्यास शिरस्त्याप्रमाणें जोडावें, असें आलें होतें. परंतु विलायतेस पार्लमेंटांत याविषयीं विचार होऊन सदरहू संस्थान हिंदुस्थानांतील इंग्रेजी राज्यांशीं तें साक्षात् न जोडतां तूर्त निराळा परगणा ठेवावा असा त्यांणीं अभिप्राय ठरविला आहे.

पुणे ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें.

**मृत्यु.**— बादशाही (१७ वेलानसर्स) घोडे स्वारांचे पलटणीवरील मेजर (ब्रिवेटलेफ्टेनंट करनल) उलीयम मारीस यांस अतिसाराचा उपद्रव होऊन ते पुणे येथील लष्करांत गेल्या रविवारीं रात्रीं मरण पावले. दुसरे दिवशीं त्यांस लष्करी आमलदाराचे मरातबाप्रमाणें येथील सेंटमेरी नांवाचें देऊळ ज्यास एथील लोक मुंबादेवी असें म्हणतात तेथें त्यांस सन्मानानें पुरलें.

---

## नेमणुका.

मिस्तर एच्.बी. लाकेट अंग्रिटिंगपोलिटिकाल एजंट दक्षिणमहाराष्ट्रदेशांतील यांस ता. २९ मेरोजीं प्रांतांत फिरावयास जाण्याची परवानगी मिळाली.

खालीं लिहिलेले साहेबलोकांनीं आपले कामाचे चार्ज घेतले.

**सुपरिंटेंडेंटपोलिस,**— मेजर आर्थर नगरास ता. २९ मे. कप्तान ग्राहाम भडोंचेस ता. २६ मे. कप्तान कॆंबाल पुण्यास ता. ५ जून.—

लेफटेनंट प्रोबीन आक्टिंग आडजुटंट खानदेश भील कोर यांणीं ता. १२ जून रोजीं कामाचा चार्ज घेतला.— कप्तान पालीन खानदेश भील कोरचे सेकंड कम्यांड यांणीं ता. २० जून रोजीं कामाचा चार्ज घेतला.— मिस्तर लेटन साहेब सिविल सरवीस यांस रत्नागिरीचे कलेक्टर आणि माजिस्त्रेटचें काम चालविण्यास मिस्तर दरफांड साहेब रजेवर गैरहजीर आहेत तोंपर्यंत, अगर दुसरा हुकूम होई पर्यंत त्या जागेवर नेमिलें आहे.

अज्जम आनंदराव नारायण कारनीक गणेजिल्ह्यांतील बसईचे १ले मतीचे मामलेदार यांस पुणे जिल्ह्यांतील खेड तालुक्याचे १ले मतीचे मामलेदार नेमिलें आहे.

---

**येवलें एथून,**— जिल्हा पुणें तालुके इंदापूर पैकीं निमगांव केतकी येथील बाब्याजी बिन तुळशीराम सोनार यानें शक्तीचे पराक्रमाचा खेळ गणपतराव भाऊ दर्वे सरदेशमुख यांचे वाड्यांत केला तेसमयीं मंडळीची सभा जमली होती. मुनसफ साहेब व मामलेदार साहेब व इतर मंडळीचा समुदाय अजमासें तीनशें पर्यंत होता. सदरहू पैलवान यानें खेळास आरंभ केला तो खालीं लिहिल्याप्रमाणें

१ कवडा दोन्ही हातांचे मध्यें धरून चुरा केला.

१ भवनीं कवड्या धरून नखानें तोडून टाकल्या.

१ नारळ डोक्यावर हाणून फोडून टाकला.

१ नारळ जमिनीवर ठेवून बुकीनें फोडून चुरा केला.

१ भांड्यामध्यें आठ घागरी पाणी भरून त्या भांड्यास शिंकाळी बांधून दांतानें धरली. व दोन हातांत दोन घागरी पाण्यानें भरलेल्या घेतल्या. व दोन माणसे मोठालीं जवान एकेक खांद्यावर बसून घेऊन बारा चौदा हात सुमारें दोन एरझारा केल्या.

१ लोखंडाची फास वजन सुमारें दाहा अकरा शेरांची होती, ती हातानें वांकवून बागडीचे निमेभागाप्रमाणें केली.

१ काथ्याचा दोर मनगटासारखा मोठा कंबरेस बांधून पायांचे नेटानें तोडला.

१ विड्यांचे पानांची सुरळी बोटांचे सांधींत धरून दोन भाग कारल्यासारखे केले,

वरचा तुकडा तीन हात सुमारें जोरानें ने-
टानें उडून गेला. या प्रमाणें पांच चार वेळ
केलें.

येणेंप्रमाणें सदरहू गृहस्थाचें सामर्थ्य असू-
न त्यास गर्व बिलकुल नाहीं. आणि पुष्कळ
साहेब लोकांनीं व सरकारी कामगार लोकांनीं
यास फार चांगलीं सरटिफिकिटें दिलीं आ-
हेत. हें पाहून मुनसफसाहेब व मामले-
दारसाहेब व बडे लोक जमीदार वगैरे यां-
णीं पैलवानास सरटिफिकिट देऊन, अज-
मासें रुपये १०० बक्षीस दिले. असें समज-
तें. तारिख ७ जुलै सन्न १८५८ इसवी.

---

## सन्न १८५८ चा आकृट १० वा कलम १२ पर्यंत मागील पत्रीं मजकूर जाला आहे तो पुढें चालू.

१३ या आक्टाअन्वयें केलेली जप्ती माफ
करावी, असें गवरनर इन्कौंसलास, किंवा
राज्यकारभार चालविणारे सरकारास योग्य
वाटेल तर, सदरहू प्रकारचे जप्तीवरून ज्या
मनुष्यांची नुकसानी झाली असेल त्या मनु-
ष्यांस, जप्ती कधीं जाली नव्हती या प्रमाणें,
आपले हक्क परत मिळतील.

१४. या आक्टाचे अधिकारावरून को-
णतीही गोष्ट कोणी मनुष्यानें केली असेल,
तीबद्दल त्यावर फिर्याद, किंवा इतर काम
करूं होणार नाहीं, किंवा चालणार नाहीं.

१५. गवरनर जनरल इन्कौंसलाचे
अथवा कोणतेही प्रेसिडेन्सीचे, किंवा जागेचे
राज्यकारभार चालविणारे सरकारचे हुकमा
वरून ज्या तालुक्यास, किंवा जागांस हा आक्ट
लागू करतील त्या तालुक्यांत, किंवा जागांत
जाम हा आक्ट चालेल. मद्रासप्रेसिडेन्सीचे ता-
ल्युक्यांतील, किंवा मुंबई प्रेसिडेन्सीचे ताल्युक्यांतील
तालुक्यांत किंवा जागांत हा आक्ट लागू करतील
तेव्हां या आक्टाअन्वयें कमिशनरास दिलेले
अधिकार राज्यकारभार चालविणारें सरकार
जो अंमलदार, किंवा जे अंमलदार नेमील.
त्यांणीं चालवावे, आणि जे रिपोर्ट कमिशनरां
कडे केले पाहिजेत, ते रिपोर्ट सदरहू प्रकारचे
अमलदाराकडे किंवा अंमलदाराकडे करावे.

१६. या आक्टाअन्वयें माजिस्त्रेटास दिलेले
अधिकार चालविण्याची मुखत्यारी राज्यकार-
भार चालविणारे सरकारानें ज्या मनुष्यास
दिली असेल त्याचा समावेश "माजिस्त्रेट"
या शब्दांत होतो, असें समजावें. आणि युरोप-
खंडांत जन्मलेली ब्रिटिश रैयत म्हणून ज्या
मनुष्यास नेहमीं म्हणतात, त्याचा समावेश
"युरोपियन" या शब्दांत होतो असें समजावें.

(समाप्त)

---

आम्हांस आमचे एका खातमीदार मित्रानें ग्वाले-
रच्या मागील हकीकतीविषयीं हें पत्र पाठविलें
आहे, त्याविषयीं त्याचे आम्ही फार आभारी झा
लों आहों.

"मुकाम ग्वालेर मिती ज्येष्ठवद्य १० रोज मंगळवार

ता० २७ माहे मे सन १८५८ इसवी रोजीं सायंकाळीं काल्पी
येथील बंडवाल्यांचा मोड होऊन तमाम तेथून निघून ग्वा-
लेरचे रस्त्यानें पळ काढीत निघाले असून पाठीमागून
इंग्रेजी फौज स्वार व तोफखाना वगैरे बरोबर लोक बं-
डवाल्याचा पाठलाग करीत निघाले होते, परंतु सुमारें
ता० २६-२७ माहे मजकूर रोजीं पर्जन्य पडल्यामुळें
इंग्रेजी फौजेचा बहुतेक लोकांचा सुमारें तीन चार

मजलांची तफावत राहिली. ती अवधी सांपडतांच पचपटे लोकांनीं ग्वालेरीचा मार्ग जवळ करण्याचा प्रकार चालविला. नंतर ते लोक इंदुरखी म्हणून एक गांव ग्वालेरीहून २०।२२ कोसांवर आहे. तेथें पोंचल्यावर त्यांचा एक पुढारी तात्याटोपे हा कांहीं ग्वालेरचे शहर गुंडे काल्पीकडून पळून आले होते, त्यांस बरोबर घेऊन एकंदर जमात सोडून वेष बदलून तीन दिवस अगोधर ग्वालेरीस येऊन छत्रीबाजारांत *** यांचे घरीं राहिला होता, असें म्हणतात. त्यानें अमरचंद बाटिया म्हणून महाराजांचा खजानीस होता त्यास सामील करून २००००।२५००० हजार रुपये महाराज साहेब यांज कडील पलटणी लोकांस अंतर्यामी देणगी देऊन बंडवाल्यांवर आपण शस्त्र धरणार नाहीं. अशा महाराजांकडील फौजेकडुन शपथ घेऊन तात्या टोपे निघून आपले फौजेंत जाऊन मिळाला पुढें ता. १ माहे जूनरोजीं संकेताप्रमाणें बंडवाले एकदम चाल करीत मुरार छावणीपलीकडे १॥ कोस पर्यंत आले. त्यांस अडथळा करण्याकरितां सिंदेसाहेब यांणी कजाकोटीचा घाट माड केला होता. परंतु महाराजसाहेब यांस आपले पलटणी लोकांचें कृत्रिम बिलकुल अश्रुत असल्यामुळें त्यांणीं आपले जातभाई लोकांस बंडवाल्यांवर चाल करून तोफांचा भडिमार करण्याविशीं आज्ञा केली. त्याप्रमाणें बाडिगार्ड लोकांनीं काम चालविलें परंतु पलटणी लोकांनीं निमकहरामीपणा करून निरुद्योगी राहिले. इतक्यांत शत्रूकडील स्वार एकदम तुटून बाडिगार्ड यांचे लोकांवर पडून त्यांच्या तोफा हिसकून घेतल्या याप्रमाणें झाल्यावरही महाराजसाहेब यांणीं पलटणीचे अमलदार लोकांस बहुतप्रकारें सांगितलें. परंतु ते ऐकतना, तेव्हां शेवटीं निरपेक्ष होऊन ग्वालेरीत राहणें करवावह होणार नाहीं, असें पूर्णपणें जाणून आग्र्याकडील पंथ धरिला. त्या पाठीमागून दिवाणसाहेब, सेनाधिपती ज्यांस लाटसाहेब असें ग्वालेरींतील लोक म्हणतात ते, तसेच शिनसीवाले म्हणजे तोफखान्याचें काम पाहणार आदिकरून २०।२५ मंडळी जीव घेऊन आडवेतिडवे रस्त्यानें ६०।७० कोसांची मजल करून आग्र्यास तिसरे दिवशीं म्हणजे ता. ३ रोजीं प्रातःकाळीं जाऊन पोंचले. तेथें महाराजसाहेबांस घेण्याकरितां साहेब लोक दोन तीन कोस पर्यंत आगोदरचे इशाऱ्यांवरून येऊन तयार राहिले होते नंतर सलामीच्या तोफाही झाल्या.

१ इकडे तांतिये पेशवे यांची फौज ग्वालेरीस येऊन पोंचली. परंतु पहिले दिवशीं त्यांचे मनांत भीतीस होती, म्हणून शहराबाहेर तळ देऊन राहिली. दुसरे दिवशीं आतां कांहीं भीति राहिली नाहीं, अशी खात्री झाल्यावर त्यांणीं कारकीर्द करण्याचा रंग मांडण्याचा क्रम चालविला. त्यांस वरील लिहिलेले निमकहराम अमरचंद बाटे हे सामील होऊन महाराजसाहेबांचा भांडारखाना व पोषाखखाना आदिकरून मालमत्ता मिळाली. नंतर त्यांणीं म्हणजे बंडवाले यांणीं सत्यनारायणाची पूजा करून एक एक रुपया ब्राम्हणास दक्षणा दिली. या पूजेस रघुनाथशास्त्री आत्रे पाचवडकर व सखाराम गुरुजी आंग्रे यांचे गोटांतील तीन यज्ञेश्वर अपा तोंडानें पुराण सांगणारे वगैरे बहुतेक संभावित विद्वानांनीं अ. ध्य दिल्यामुळें बहुत सुशोभित पूजा झाली. पुढें मंडळीनें घरीं तसेच +++ व +++ यांचे येथें बंडवाल्यांतील एक एक मंडळी आपल्या योग्यतेप्रमाणें भोजनास रोजाव असे.

१ दोन तीन दिवसांनंतर फौजेनें तनख्याचें व्यांचें काम चालू जालें. त्याचवेळेस महाराजांकडील बहुतेक कारकून पलटणींतले व रिसाल्यांतील कामगार व शिपाई स्वार आदिकरून फौजेनें मन मानेल तसा अंक सांगून सात आठ महिनेपर्यंतचा तनखा महाराज साहेबांचे भांडारखान्यांतून घेऊन बंडवाल्यांस पूर्ण अनुकूळ जाले.

१ नंतर रोज बरोज कचेऱ्या भरून कामकाज शिराळशेटीचे राज्यासारिखें होऊं लागलें इतक्यांत इंग्रेजी फौज चहूंकडून ग्वालेरीवर चढाई करून येत आहे, अशी खबर ऐकून बंडवाले मनांत खचले. परंतु वरोपचरी म्हणतकीं, शंभर कोसांत इंग्रेज राहिला नाहीं आणि कदाचित् असले तरी ४००–५०० वर नाहींत असा बोलण्याचा थाट घालीत. परंतु पुढें कसें करावें याविचारावर होते. पुढें यांचें लढाई करितां चारी बाजूंनीं लावून बंदवस्त केला होता, परंतु इंग्रेजलोकांचे लढण्यापुढें त्यांचें शौर्य न चालून ता. १९ रोजीं सायंकाळीं लष्करग्वालेर येथें इंग्रेजी फौजेनें शिरून बंडवाल्यांस पळविलें. लढाई दोन तीन दिवस चालत होती. त्यांत झांशीची राणी लक्ष्मीबाई घोड्यावरून पडून इतर स्वारांचे तुडविण्यानें मरण पावली. तिचें तानाचे पुतण्यानें आणून दहन करविलें असें म्हणतात.

१ या ग्वालेरची स्थिति झांशीप्रमाणें करावी, असें इंग्रेजी फौजेचे मनांत होतें, परंतु हामिल्टन साहेब यांचे सांगण्यावरून महाराज साहेब यांस नाखुषी होईल म्हणून बिलकुल लूट किंवा मारामारी केली नाहीं. याप्रमाणें ग्वालेरचा जय होऊन शिंदे आणि आ[illegible]दुर यांचे कपूई जाली.

१ बंडवाल्यांचा पाठलाग करून इंग्रेजी फौज गेली होती, तिनें सुमारें २५ तोफा उंट आदिकरून बहुत सामान परत हिसकून आणिलें आतां ते लोक जयपुराकडे गेले असें लोक म्हणतात.

१ अमरचंद बाटिया पळून गेला होता, त्यास धरून आणिला असून चौकशी चालली आहे.

१ उष्णता बहुत पडते. आठ दाहा दिवसांपूर्वीं पाऊस पडला होता.

**तारायंत्र**.—मागें आम्हीं लिहिलें आहे कीं, विलायतेहून तों मुंबईपावेतों तारायंत्र जलमार्गानें करण्याकरितां विचार विलायतेस होत आहे. हालीं या कामाकरितां एथें एक कंपनी जाली आहे. तिचें नांव ग्रेट इंडिया सब्म्यारिन टेलिग्राफ कंपनी; म्हणजे हिंदुस्थानापावेतों समुद्रांतून तारायंत्र करविणार मंडळी असें आहे. हिचें भांडवल एक कोट रुपयांचें ठरवून १०००००००
एक भाग २०० रुपयांचा केलेला आहे. या कंपनीचा विलायतेहून तारायंत्र, मुंबईहून डांक विलायतेस जाते व येते त्या मार्गानेंच आणण्याचा विचार आहे.

---

सोलापूर जिल्ह्यांतील बारशीचे मामलेदार रा. रा. त्र्यंबकराव जिवाजी हे दोन महिने रजेवर गेले होते, ते परत आपले कामावर येऊन रुजू जाले असें पत्रावरून समजत आहे.

---

**ग्वालेरीस** तारीख ९ जुलई पावेतो दोन वेळा पाऊस पडला. हवा कांहींशी थंड होऊं लागली आहे. महाराजांनीं इंग्रजी फौजेस मदत बऱ्याप्रकारें दिली असें समजतें.

---

पुणें ज्ञानप्रकाशछा. कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांनीं छापिलें.

# ज्ञानप्रकाश

गुरुवार तारिख २२ माहे जुलै सन्न १८५८ इसवी.

## जाहिरात

रावजी महिपत कुळकर्णी कसबे थोतूर हाल्लीं राहणार पुणें पेंठ बुधवार तुम्हांस कळावेंकीं, सखाराम रघोजी शिरके पानसरे व आणाकरोन सोवती यांणीं तुम्हांपाशीं पैसा ठेवीस ठेविला. तो कांहीं दिला, आणि सखाराम याचा पैका बाकी तुम्हीं देत नाहीं. तो एक महिन्यांत यावा न द्याल तर दोन रुपये सेंकडा व्याज फडशा तारिखेपर्यंत पडेल. ही नोटीस तुम्हांस कळावयाकरितां दिली. ता. २१ माहे जुलै सं. १८५८

सही सखाराम बिन रघोजी शिरके पानसरे कसबे रूपें दस्तूर खूद.

## ज्ञानप्रकाश तारिख २२ जुलै सन्न १८५८

**बेदर;- सुरापूर;-** एथून ९ मिनहूची खबर आली आहे कीं, तो नवा हस्तगत जालेला बेरडांचा मुलुख कप्तान मीडोस टेलर याची व्यवस्था व शाहाणपण यांच्या योगें शांत व खुष आहे. या साहेबांचा पगार पूर्वीपेक्षां जाजती ५०० रुपये नवीन काम त्यांस झाल्यावरून वाढवून एकंदर १७०० रुपये दरमाहा पगार त्यांस मिळण्याचें सरकारानें ठरविलें आहे. हें ऐकून आम्हांस संतोष होतो.

**शाहाजहानपूर;-** एथून २ जुलैचें वर्तमान आहे कीं, बंडखोर हे रवेनीच्या पलीकडे व महोमदीच्या सुमारास असावे. असें म्हणतात. ते वादा बदलून किंवा आपलें वर्चस्व राखावें याकरितां ते केव्हां केव्हां एक अगर दोन पवेनीच्या राजाचे गांव जाळतात. त्याचें कारण कीं, त्या राजानें मौलवीचे बाबदींत अति नीच कृतघ्नता केल्याचा प्रतीकार ते त्यास करतात. या बंडखोरांपासून त्या राजानें आपला बचाव करावा यासाठीं त्यास त्याच्या तोफांपैकीं तीन तोफा कांहीं दिवसांपूर्वीं परत दिल्या आहेत. गोरे फौजेकरितां येथें छावण्या तयार करण्याचें काम चालू केलें आहे. परंतु त्या पंधरा तीनवार पावेतों तयार होण्यास लागतील. जेव्हां एथें दंगा जाला तेव्हां एका पाद्रीचा वध करण्यास असामी प्रवृत्त जाले होते. त्यांपैकीं सातांस फांशीं दिलें. व चौघांस जन्म ठेपाची शिक्षा दिल्या. बंडवाल्यांची एक मोठी टोळी गोमती नदी उतरून गेली, असें म्हणतात. पवेनीचा राजा सदर्हू मौलवीस मारणारें यांस बक्षीस देण्याचे कामांत तीन दिवस गुंतला होता.

---

**कानपूर;-** एथील २४ वे जूनची इंग्लिशम्यान पत्रांत खबर लिहिली आहे कीं, हजारों बंडवाले गंगेच्या तीरीं जमले आहेत. कित्येक बिठूरच्या (ब्रह्मावर्ताच्या) समोर, व कित्येक जंदीमौचे समोर, आणि कित्येक त्याचें खालचे बाजूस आहेत. त्यांचा हेतु जमून काय करण्याचें असेल तें कळत नाहीं. कदाचित् सरकारास कळला असल्यास तर त्यानें तो स्वतः करितां ठेविला असेल, परंतु भूमिगत द्रव्य खणून नेण्याकरितां ते जमले असावे असा तर्क करितात.

---

**नाटककार** पेशावरवारीं ख्याल नाटकराशी दाहावा जवळ [illegible] करणार आहेत.

**हैदराबाद दक्षिणेंतील,**— ता. २ जुलै रोजीं निजामाच्या दिवाण सालारजंग यानें निजाम सरकारास व त्या गादीचा वारस होणारा, औरस पुत्र जाला यासाठीं खुषीची जाफत तेथील रसिडेंट कर्नल डेविडसन यांस दिली. या समारंभास साहेब व मडमा सारे ३०० जणांवर जमल्या होत्या. मेजवानीचा थाट दिवाणाचे बारादरी महालांत केला होता. खाना मद्य आदिकरून पदार्थांची समृद्धि केली होती, त्यांची धन त्या पाहुण्यानें घेतली. या लोकांस छावणींतून शहरांत मेजवानीच्या महालापाशें तों आणण्यासाठीं ५० हत्ती शृंगारून तयार केले होते. ही मेजवानी मागेंच व्हावयाची, परंतु निमंत्रण फिरल्यावर पर्जन्य वृष्टि जाली या कारणानें राहिली होती. निजामाचा दिवाण, निजाम, व इंग्रेज सरकार यांजमध्यें ऐक्य फार आहे. ही एक आनंदाची गोष्ट आहे. हा सर्व मजकूर ९ मिनहूच्या बंबेटैम्स पत्रांत आहे; परंतु त्याच्याच मागील पत्रांत त्याच्या एका बातमीदारानें पाठविलेली खबर लिहिली आहे कीं, निजामानें करापुराकडे नऊहजार फौज पाठविली आहे. आणि त्याचें कारण दिवाणास विचारतां तो सांगत नाहीं. तेव्हां या गोष्टींतून कोणती गोष्ट खरी मानावी, याचा अंदेशा आहे. तरि पहिली गोष्ट अधिक खरी असें वाटतें.

**फैजाबाद,**— या नजीक शाहागडचे किल्ल्यांत मान सिंग आहे. त्या भोंवतीं पुष्कळ शिपायांचे फौजेनें वेढा घातला आहे. व त्यास बेगमचे लोक तोफांनिशीं साहाय्य जाले आहेत. राजाचा दुडप्पीपणा पाहून हे शिपाई लोक फार रागावले आहेत. आणि त्यांनीं अयोध्येभर अशी कंडी उडविली आहे की, मानसिंग हा ख्रिस्ती जाला आहे, परंतु या लोकांविरुद्ध त्याजपसले सर्व मनुष्यांस हसेरें घावीं लागतील.

**बांडा,**— एथें पूर्ववत् स्वस्थता होऊन पोलिस, मामलती यांचीं गार्णी बसवूं लागले आहेत. दिगुराकडील बंडखोरांच्या टोळ्या या वाटेनें जातांना त्यांनीं या प्रांतांत फार उपद्रव चालविला.

**रेल्वे,**— आपले मुंबइ इलाख्याचे रेल्वे कंपनीची बढती होऊं लागली, असें दिसतें. जूनचे २० तारिखेचे आठवड्यांत या कंपनीला एकंदर २२९१४ रुपये उत्पन्न आलें. फक्त ११७१८ उतारूंपासून १४००८ रुपये, आणि मालाचें भाडें ८८०६ रुपये मिळाले.

**रोहिलखंड,**— यांतील इटावा परगण्यांत अजून स्वस्थता होण्यास बंडखोर रूपसिंग हा विघ्न आणील असें भय पडलें आहे. तो ४थे मिनहूस बंडखोर शिपाई व दुसरे दंगेखोर लोकांचे टोळीनशीं यमुनानदी उतरण्याच्या तयारींत होता. हाल्लीं त्यावर हल्ला करण्याकरितां तेथचा नवा माजिस्ट्रेट मिस्तर जी. ई. लेन्स हा आपलेंसर्व उपयोगी सैन्य गोळा करीत आहे. दिल्लीग्याझेट मुंबई.

**खजिना,**— मुंबई सरकारचे सूचनेवरून हिंदुस्थान सरकारनें कलकत्याचे सर्व तिजोरीवाले यांस येत्या जूनच्या आगबोटींतून वीस लक्ष रुपये मुंबईस रवाना करण्याविषयीं हुकूम केला आहे.

## गांवव्यवस्थापक पंच. अथवा
### ( म्युनिसिपाल कमेटी पुणें. )

१ कोणीचा महसूल व जकात वगैरे जें उत्पन्न इंग्रसान सरकार घेतात, ते सर्व मुलखांतून घेतात. त्या पैकीं कांहीं अंशाचा खर्च कोणचे एक ठिकाणीं केला असतां त्या ठिकाणचा फायदा होईल खरा; परंतु ज्या ठिकाणीं असा खर्च होणार नाहीं तेथील लोकांचा अन्याय आपण केलासें होईल असें सरकारानें पाहून, कोणी एक गांव अगर शहर येथील राहाणारे लोकांची त्या ठिकाणची दुरुस्ती वगैरे बंदोबस्त करण्याची मर्जी असल्यास सरकारास कळवावें म्हणजे सरकारांतून पंच नेमले जाऊन त्यांस लोकांचे इच्छेप्रमाणें बंदोबस्त करण्याचा व त्याबद्दल खर्चास उत्पन्न पाहिजे तेंही त्या ठिकाणीं उत्पन्न करण्याचा अखत्यार त्यांस देण्याविषयीं सन्न १८५० चा कायदा (आक्ट) २६ सरकारांनीं केला.

२ हा कायदा जाल्यादिवसांपासून पुणें शहरांतील लोकांनीं शहर दुरुस्ती वगैरे करितां कायदा सुरू करण्याविशीं सरकारास अर्ज करावा म्हणून बहुत संभावित गृहस्थ व सरकारी कामगार यांणीं उद्योग केला, त्यांत पंच नेमण्याविषींचा अधिकार लोकांकडे असावा. असें कितीएक संभावित पुरुषांचें म्हणणें असल्यावरून असें होऊं देण्यास सरकारची हरकत नाहीं, म्हणून हार्टसाहेब सकटदार यांचें पत्र कीजसाहेब अक्टिंग जड्ज यांस आलेलें त्यांनीं प्रसिद्ध सभेंत वाचून दाखविल्यावरून फार गृहस्थ कायदा सुरू करण्यास अनुकूल जाले, परंतु थोडेसे लोकांची प्रतिकूलता असल्यामुळें तेव्हांकाहींच जालें नाहीं.

३ यास्तव सरकारांनीच पुणें शहरांत जकात सुरू करून उत्पन्न शहर दुरुस्तीकडे कलेकटर मार्फत खर्च व्हावा म्हणून ठराव केला, त्याप्रमाणें सन्न १८५७ सालीं जकात घेऊन त्यापैकीं शहर दुरुस्तीकडे म्हणून कांहीं पैसा खर्चही पडला आहे

४ सदरहू प्रमाणें जाल्यावर लोकांनीं एकमतानें कायदा चालू करण्याविषयीं अर्ज केल्यावरून सरकारानें अर्ज कबूल करून पंच नेमले ते येणेंप्रमाणें.

१ माजिस्त्रेट साहेब सरपंच.
२ जड्ज्यसाहेब पंच.
३ हुजूर डिपुटी नाना मोरोजी साहेब.
४ मिनूसिपाल सदर अमीन रा. वामनराव जगन्नाथ.
५ मुनीमनिसबन दयाराम आत्माराम.
६ बापूभाई, पेढीसखाराम मनसाराम
७ नरपतगीर बावा.
८ बदरोदिन शेट, पेढीजीवनभाई फत्तेअली.
९ गणपतराव बल्लाळ ऊर्फ रावसाहेब नातू.
१० वामनराव तात्या रुद्रीकर.
११ रावसाहेब बापूरावजी मांडे.
१२ रावसाहेब भास्करराव दामोदर

सदरहू पंचमंडळीपैकीं बहुमताचे नांवानें कार कोणते रीतीनें चालावें, व पैसाही कोणते रीतीनें उत्पन्न व्हावा म्हणून ठराव होऊन कायद्याप्रमाणें सरकारपसंतीकरतां माजिस्त्रेट साहेब यांणीं पाठविल्यावरून बहुमताचे नांवानें जालेला ठराव सरकारांतून पसंत होऊन आला.

६ पुढें शाळेंतील गुरु, आरनाल्ड साहेब व मेगडुगल साहेब यांस सरकारांनीं पंचांत नेमिलें.

७ नंतर दिनचर्येचें काम ठरावा प्रमाणें जुलई महिन्या पर्यंत पाहण्याकरितां पंचांनीं आपणांपैकीं ज्यांनीं लिहिलेले गृहस्थ नेमिले.

नाना मोरोजी साहेब, सरपंच

२ मेगडुगलसाहेब. पंच.

३ रावसाहेब नानू. सदर.

४ वामनराव जगन्नाथ. सदर.

५ बापूरावजी मांडे. सदर.

८ या पंचां पैकीं बहुमतानें खालीं लिहिले प्रमाणें नोकर नवे नेमले.

१ मिस्तर गुडाल इंग्रेजी लिहिणार दरमहा पगार ५०

२ बळवंत कृष्ण ओक कारकून सदर पगार १२

३ विष्णु परशराम घारपुरे. सदर पगार १०

४।६ शिपाई तीन, दरमाहा रुपये ५ प्रमा. १५

८७

९ सदर्हू नोकर लोकांखेरीज गेले वर्षी सरकारी जकात चालू होती तेव्हां शहर दुरुस्तीचे कामा करितां माजिस्त्रेट् साहेबांचे मार्फत ठेविलेले नोकर सरकारांनीं माजिस्त्रेट् साहेबांचे शिफारशी वरून कमेटी कडे दिले ते.

७ पांडुरंग बाळकृष्ण ओवरसीयर दरमहा रु. १००

८ रामचंद्र आत्माराम आळेकर कारकून प. १५

९ गणेश नारायण गोडबोले दरमहा पगार रु. २०

१० तुकाराम नंदराम मेस्त्री सदर प. रु. ३०

११।१३ शिपाई तीन दरमाहा रु. ५ प्रमाणें १५

१४।१५ पायनीर २ पगार रु. ५ प्रमाणें १०

रु. १९०

१० कलम चार यांतील पंच मंडळीचा अधिकार मार्च महिन्याचे प्रारंभापासून सुरू जाला, व त्यांनीं उत्पन्न करण्याकरितां जी जकात घेण्याचें ठरविलें, त्याचें उत्पन्न ही त्या महिन्याचे प्रारंभापासून त्यांस मिळूं लागलें, व त्याच महिन्यापासून कलम ७ यांत लिहिलेली मंडळी काम पाहूं लागली.

११ सदरहू पंचमंडळ यांनीं मागील चार महिन्यांत शहर दुरुस्ती कशी काय केली हें सर्व लोकांस महशूर आहेच. पुणे शहरांतील फिरणारे लोकांस सदरहू पंचमंडळीचे प्रयकाराचें व हुशारीचें वर्णन आम्हीं करण्याची गरज नाहीं. ज्याचे हात पाय मोडतात व ज्या वायका रस्त्यानें पाणी आणतात, त्या पंचांस पूर्ण दुवा देतच आहेत.

१२ आलिकडे सरकारांनीं पंच जाजती नेमिले आहेत ते येणें प्रमाणें.

१५ एक्झिक्युटीव इंजनिजर पुणें व खडकी.

१६ सिविल सरजन.

१७ पोलिस सुपरिंटेंडेंट.

१८ फर्स्ट असिस्टंट कलेक्टर साहेब.

१९ असिस्टंट जडज्य स्मईट साहेब.

२० इनाम कमिशनर ग्रिफिथ साहेब.

२१ असिस्टंट इनाम कमिशनर उास्त साहेब.

२२ इंजनेर स्कुलाचे सुपरिंटेंडेंट कोक साहेब

१३ हाल्लीं जुलई महिन्यापासून काम पाहाणारे पंच नेमले आहेत ते येणें प्रमाणें.

१ कोकसाहेब सरपंच

२ ग्रिफिथसाहेब पंच

३ मेगडुगलसाहेब सदर.

४ नाना मोरोजी साहेब. सदर

५ रावसाहेब बापूरावजी सदर.

१४ पंचांनीं काम चालविण्याविशीं व शहर दुरुस्ती खेरखर्चाबद्दल उत्पन्न करण्याचे ठराव केले आहेत. ते आम्हीं हाल्लीं जागेचे संकोचामुळें पुढील एके पत्रांत सविस्तर प्रसिद्ध करूं.

१५ सदरहू शिवाय मागील चार महिन्यांत काय काय कामें जाली, व त्यांस काय काय खर्च जाला याचा तपशील पंचांनीं आम्हांस दिल्यास संक्षेप रूपानें छापून प्रसिद्ध करूं.

१६. हाल्लीं पंचांचे ठरावा प्रमाणें या शहरांत जकात घेणें पडते तिचा मखता दरसाल अजमासें रुपये २५००० जाला आहे. हा सर्व

पैसा आपण सरकारास देतों असें नाहीं तर,वर लिहिले मजकुरावरून आपले खुषीनें बाहेर दुरुस्तीकरितां देण्याचें कबूल केलें आहे. पंच सरकारांनीं त्यांची व्यवस्था करण्यास नेमले आहेत, असें सर्वांचे लक्ष्यांत येईल. त्यास या पैशाच्या व्यय कोणते रीतीनें होतो, याजवर सर्वांनीं नजरठेविली असतां त्यांचेभीतीनें सद्व्यय होईल. यांत संशय नाहीं, परंतु लोकांनी डोळे झांककांकेलेम्हणजे मग अव्यवस्था जाली तर कोणास बोलण्यास जागा राहाणार नाहीं.

१७ पंचलोक संभावित, आब्रूदार, श्रीमंत, मोठे हुद्देदार असें आहेत. त्यांस बाहरदुरुस्तीचें काम करण्याकरितां पगार मिळतो असें नाहीं, ते आपले अकले प्रमाणें काम करण्याविशीं नौकरलोकांस हुकूम देतात, व आपआपले धंदे करून राहिले वेळीं नौकरलोक काम कसें करितात, तें पाहातात. हीं कामें दुरुस्त व वाजवी खर्चांनीं व्हावीं यांत सर्वांचा फायदा आहे. यास्तव पंचांचे नौकरांची चूक अगर गैरवाजवी वर्तणूक कोणाचे समजुतीस आल्यास ती त्यांणीं पंचांस कळवावी, हा सर्वांचाधर्म आहे असें आम्हांस वाटतें.

१८ पंच जे हुकूम करतात, ते लोकांस पसंत किंवा नापसंत हें एकाचे अभिप्रायावर नाहीं, बहुमतानें ठरलें पाहिजे. यास्तव बहुमताचा अभिप्राय दर्शविण्याचा मार्ग असा आहे कीं, एकामताचे लोक जितके आहेत, त्यांणीं एके दिवशीं एके ठिकाणीं जमून व्यवस्थेनें बसून विचारपूर्वक जोगतें पाहिजे तें ठराव करून ते ठराव पत्राद्वारा बर अगर एक दोन संभावित पुरुषद्वारा बराबर विचार होण्यास पंचांकडे पाठविल्यास पंचांस त्याचा विचार करणें अवश्य पडेल, असें आम्हांस वाटतें.

---

**चीन,**—एथील कंतान बंदरीं जनराल स्ट्रावेन्सी यांच्या एका चूर टोळीनें पराभव केला. या टोळीवर सदहू जनराल यानें १००० कट्टे-जवानानिशीं जाऊन हल्ला केला. त्यांत सुमारें ६० लोकांहून जाजती लोकांचा नाश होऊन, त्यांस मागें हटावें लागलें. यासपाठ्यांत डाक्तर टर्नबूल हा त्या चूर लोकांचे हस्तगत जाला त्यांणीं त्याचें डोकें उडविलें.

२२ मेची, चीनचे उत्तर दिशेकडील पीहो शहर आहे तेथच्या लढाईची खबर आली आहे तिजवरून कळतें कीं, सर्व तहाचा प्रकार सुटला. पिहोच्या तोंडाशीं किल्ले आहेत त्यांजवर वरचेवर हल्ले जाले त्यांत फ्रेंच्यांचे ६६, व इंग्रेजांचे २२ मेले. व जखमी मिळून जाले. १९वे मेचीजीं हल्ला जाला तेव्हां एका अवरानें सर्व फौज किनाऱ्यावर उतरली. नंतर त्या किल्ल्यांवर एका बाजूनें फ्रेंच्यांनीं व एका बाजूनें इंग्रेजांनीं हल्ला चालविला. फ्रेंच्यांस त्या किल्ल्यांखालीं सुरुंग लावतांना फार इजा पोंचली. लार्ड एलजीन याचा पुढें पिकीन राजधानी पावेतों जाण्याचा मनसोबा दिसतआहे. चिनी लोक मोठ्या धैर्यानें वागले, रशियाचा वकील एकत्र जालेले फ्रेंच व इंग्रेजीआरमार व जे लढाईंत गुंतले आहे, त्यांच्याशीं व चीनसरकाराशीं मध्यस्थासारिखा अलग राहिला आहे. या सदरील किल्ल्यांत २०००० वीस हजार जवान आहेत, आणि एकत्र जालेले सैन्याचे १५०० पंधराशें जवान मात्र आहेत.

## शीतबैठक.

अमेरिकेंतील एका मनुष्यानें एक खुर्ची उष्णकाळांत बसण्याकरितां तयार केली आहे तिजवर जो मनुष्य बसतो त्यास तिचे बाजूस चार साहा भाते लाविले आहेत. त्यांतून आपोआप वारा लागतो.

ज. म्नि.

---

गेल्या सोमवारच्या टेलिग्राफपत्रांत असें लिहिलें आहे कीं, बिकानीरच्या राजानें इंग्रेज सरकारास चांगली मदत केल्यावरून गवरनरजनरल लार्ड क्यानिंग यांणीं मोठे आभार मानिले. याचा पूर्वज एका लढाईमध्यें गेल्यामुळें अपरमाअन्नमधील अंमलदारानें या राजास सालीना एक लक्षापेक्षां जाजती उत्पन्न होई, इतकी जाहागीर देण्याविषयीं शिफारस केली आहे.

बेरलीच्या आसमंतांतील ठाकूर लोकांनीं खानबाहादुर यास पकडून आणण्याविषयीं प्रतिज्ञा केल्या, असें गेल्या बुधवारच्या टेलिग्राफपत्रांत लिहिलें आहे.

दिल्लीच्या आसमंतांतील ज्यां नवाब आणि राजे लोक यांच्या जाहागिरी सरकारानें जप्त केल्या आहेत, त्या जा राजे लोकांनीं सांप्रतच्या प्रसंगीं इंग्रेज सरकारास मदत केली आहे, त्यांस देणार. या राजांपैकीं ज्यांनीं पुष्कळ मदत केली, त्यांचीं नांवें.

पथियाला एथील माहाराज, नारेंडरसिंग, आणि झिंडचा सरूपसिंग.

रीपि

---

**टंकसाळ,**- कलकत्यास तांब्याचें नाणें पाडण्याकरितां एक नवी टंकसाळ बांधण्याचें काम चालविण्याविषयीं कंपनीसरकारानें सांकडान केलें आहे.

## कैलासवासी हरिकेशवजी.

कैलासवासी हरिकेशवजी पाठारे सोमवंशी क्षत्रिय, मुंबई इलाख्यांतील सदरदिवाणी फौजदारी अदालतींतील भाषांतर कर्ते, यांस ता॰ ११ जुलई सन्न १८५८ इसवी रोजीं देवाज्ञा जाली. हें ऐकून आम्हांस फार दुःख जालें. या गृहस्थाचें वय समारे ५४ वर्षांचें होतें. त्यांचा जन्म सन्न १८०४ इसवी मध्यें जालेलें आहे. यांणीं इंग्रेजी व मराठी भाषांचा अभ्यास मुंबईचे सरकारी विद्यालयांत केला. यांची या दोन्ही भाषांत मर्मज्ञता, व प्रवीणता बहुत होती. हें त्यांणीं इंग्रेजींतून मराठी भाषेंत सिद्धपदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, व्यवहारशास्त्र, इंग्लंडचा वृत्तांत, नीतिग्रंथ, इत्यादिपुस्तकें केलीं आहेत, त्यावरूनच कळून येईल, सरकारी व दुसरी लोकोपयोगी सभा वगैरेचीं कामें करून फाकीचे वेळांत या गृहस्थानें लोकोपयोगी अशीं पुस्तकेंही फारस केलीं आहेत. या ग्रंथांची भाषा कैलासवासी बापूछत्रे यांणीं केलेले ग्रंथांचे मागें यांच्या ग्रंथांचीच पसंद आहे. हे गृहस्थ, अतिनम्र, गर्वरहित, व सदाचारी, असून दयालु व मित्रत्वास अतियोग्य होते. यांस ज्ञानेश्वरी फार चांगली लावतां येत असे, प्राचीन प्राकृत पद्यग्रंथ पाहण्याचा यांस छंद होता. ईश्वरभक्तीवर फार लय असे. असो आपल्या देशाचें हें एक अपूर्व रत्न गेलें, एणेकरून आलीकडचे तरुण विद्वानांस खरोखर दुःख जाल्यावांचून राहाणार नाहीं. आम्ही परमेश्वरापाशीं मागतों कीं, या पुरुषाचें योग्य आचरण, व त्यानें आपल्या देशबांधवांस जें (पुस्तकांचें) चिरकाल राहाणारें धन देऊन ठेविलें आहे. त्य पुरुषास स्वर्गलोकीं वास होई असें करवो. तथास्तु.

## ज्ञानप्रकाशकर्तेयांस.

विनंती विशेष - एथील सरकारी इंग्रेजी शाळेचे मास्तर यांनीं सरकारच्या नवीन ठरावावरून एक अतिशूद्राचा मुलगा शाळेंत घेतला म्हणून ब्राह्मणादि आपणास उंच म्हणविणारे हिंदु यांनीं आपलीं मुलें शाळेंतून काढून घेतलीं आहेत. केवढा जातिअभिमान हा! केवळ स्पर्शाच्या भयास्तव ज्यांनीं विद्येपासून होणारे जे अनंत लाभ त्यांस लात मारली. "दैव आलं देयाला आणि पदर नाहीं घेयाला." हल्लींच्या दयाळू सरकारानीं आपल्या देशांतील विद्या जी हजारो विद्वान व परोपकारी गृहस्थांनीं पूर्णदशेस आणिली आहे ती ह्या देशांत चालू करून येथील लोकांस अज्ञानावस्थेपासून मुक्त करावें आणि आपण ज्या उत्तम सुखांचा उपभोग घेतात तीं सुखें यांनां साध्य करून द्यावीं, ह्या इराद्यानें लाखों रुपये वेंचून जागोजाग शाळा घातल्या आहेत, परंतु हे लोक अल्पस्वल्प कारणावरून आपलें अनहित करून घेतात.

ज्यांनीं आपलीं मुलें शाळेंतून काढिलीं ते केवळ सारेच साधारण लोक आहेत असें नाहीं, ह्यांमध्यें मोठमोठ सरकारी कामगारही आहेत. ह्यांनीं सरकारचा योग्य हेतु जितका सिद्धीस नेववेल तितका नेण्याविषयीं झटावें तें टाकून उलटा त्यास प्रतिबंध करितात ही केवढी दुःखाची गोष्ट आहे. त्यांनीं स्वतां इतर लोकांस समजून द्यावी तसें न करितां "आमचीं मुलें आणि महारांचीं मुलें एके ठिकाणीं शिकल्यावर मग काय राहिलें" असें बोलून त्यांस ज्यास्ती हट्टास पेठवितात. पण हेच लोक, जे अशा नाक उंच करून गोष्टी करितात ते कचेरींत जाऊन साहेबाच्या खुर्चीशीं खुर्ची भिडवून बसतात आणि तहान लागली असतां तसेंच जाऊन पाणी पितात, जसें जणूं साहेबलोक फार नीच महारा मांगांपेक्षांही नीच अशी जी त्यांची समजूत आहे, तिचें त्यावेळेस त्यांस भान रहात नाहीं. पण महाराज, असें नाहीं केवळ रामाजीपंताच्या प्रीत्यर्थ ते आपले सोहळे गुंडाळून ठेवितात. पैस्यापुढें त्यांस सोहळे कसचे सुचतें. आतां जर त्यांच्या मुलांस विद्या शिकण्याबद्दल सरकार कांहीं दरमाहा देतें तर ते त्यांस शाळेंतून काढते ना. पाहा, त्याच शाळेचा आसिष्टंट मास्तर ब्राह्मण वर्णाचा असून तो राजिनामा देऊन घरीं बसला नाहीं. कशा करितां? त्यास पंधरा रुपये दरमाहा पगार मिळतो. तो कां यांच्या नादीं लागून आपल्या दरमाहावर पाणी सोडील. जर महारापासून त्यांस कांहीं प्राप्ति असती तर त्यांस शिकवायास त्यांनीं मागें पुढें पाहिलें नसतें. पण विनाकारण ते आपला अभिमान कां सोडतील. ते त्यांच्या धर्मातले आहेत खरे, परंतु ज्यांस त्यांनीं पहिल्यापासून अज्ञानांत व दारिद्र्यांत ठेऊन त्यांनीं अक्षय्य ह्याच स्थितींत असावें म्हणून जी त्यांनीं व्यवस्था करून ठेवली आहे. ती सरकार मोडूं पाहातें ही गोष्ट त्यांस कशी सहन होईल. याकरितां त्यांच्या पूर्वजांनीं जे श्रम केले आहेत ते कां ते व्यर्थ जाऊं देतील? मुसलमान लोकांकरितां त्यांनीं अशा प्रकारचे कांहीं श्रम केले नाहींत. म्हणून जरीं त्यांचें शास्त्र "न नीचो यवनात्परः" असें सांगणें तरीं तें त्यांस न जुमानून एक खाणें पिणें शिवाय करून इतर सर्व व्यवहार बेधडक करितात. त्यांच्या श्रमाबद्दल सरकारांनीं त्यांस योग्य बक्षीस दिल्यावांचून ते बिचाऱ्या अतिशूद्रांस त्यांच्या खऱ्या हक्कांचा उपभोग घेऊं देणार नाहींत. असें जर न होईल तर ते सरकारच्या उद्देशास असेच अडवें येतील.

पत्र कर्ते महाराज, सरकारांनीं आज इतका

खर्च करून जी एथें शाळा घातली, ती या आपलपोट्या ब्राह्मणां करतांच का? केवढें मामाचें ठगें! आपण विद्या शिकावी, आपण मोठमोठे हुद्दे मिळवावे, आपण कीर्तिमान व्हावें, आणि दुसऱ्यांनीं अज्ञानांत व दरिद्रदशेंत राहावें म्हणजे यांना गोड. यांनीं इतके दिवस त्यांची धुळधाण केली आणि अझून तरी शाणपड्यांचा पिच्छा कां सोडूं नये बरें? ते अमंगळ, ते मूढ, ते हलके, अशीं त्यांस व्यर्थ दूषणें देतात. मागें सर्व सत्ता त्यांच्या हातीं, आणि ते केवळ त्यांच्या हातीं चिखलाच्या गोळ्याप्रमाणें होते. त्यांनीं त्यांस जसा आकार व रंग दिला, त्याप्रमाणेंच ते अद्याप आहेत. याचा त्यांजकडे काय दोष. आतां त्यांचें राज्य नाहीं. निष्पक्षपाती इंग्लिश लोकांचें आहे. यांत यांचे हे वेडेचार चालणार नाहींत. याचा त्यांनीं आपल्या मनांत विचार करावा. परदेशीय ज्ञानी लोक त्यांच्या मूर्खपणास हसतात, हें पाहून त्यांनीं वाटेवर यावें. आणि ह्या व ज्या दुसऱ्या अनेक कारणांनीं आपला देश निकृष्टावस्थेस पावला आहे, तीं कारणें लक्ष्यांत आणून ज्या गोष्टीमध्यें आपलें खरें हित आहे, त्या गोष्टीस अनुसरावें.

पत्रकर्ते महाराज, या वर ज्या चार ओळी लिहिल्या आहेत त्या केवळ लोकहितावर नजर ठेवून लिहिल्या आहेत. या आपल्या येत्या अंकांत छापून प्रसिद्ध कराल तर मजवर फार उपकार होतील. कळावें ही विनंती.

ता॰ १५ जुलै सन १८५८ मुकाम नगर. — तुमचा मित्र एक नगरकर.

*.* हें पत्र सर्वांनीं विचार करण्यासारिखें आहे, व या पत्राचे लिहिणारानें चांगलें योजून लिहिलें आहे, परंतु त्यांत क्वचित् वाक्बाण वाजवीपेक्षां जाजती झाले आहेत असें आम्हांस वाटतें.

ज्ञा॰ प्र॰ कर्ता.

**पाटणा** — एथून २० जून रोजीं खबर आली आहे कीं, बंडवाले बहुतेक सोनीचे पार जाले आहेत. परंतु असें म्हणतात कीं, एक मोठी टोळी निसोप्याचे जवळ नदी उतरून जाण्याचे बेतांत आहे. स्वारांची टोळी हिलशाकडेस गेली ती परत आली नाहीं. कपतान राट्रे हा काल आर्वल येथें होता. ठाणें आणि बरवार जाळून तो उठल्याचे पूर्वी सोनी उतरून गेले, आणि तो दाउद नगराकडेस चालता जाला. शाहाबाद हें अगदीं बंडवाल्यांचे हस्तगत आहे. ते पाससांनून फौज नयावी याकरितां पूल वगैरे मोडीत आहेत. चपरा येथील बंडवाले ईशान्येकडेस चाल करितांना पाहिले. त्यांचा हेतु गोविंदगंज एथें नदी उतरून जाण्याच्या बेतांत आहे असें म्हणतात. याकरितां बेतियाचे राजाचे पोलिसास आणि दुसऱ्या शिपायांस आ नदीतून बंडखोरास उतरून न जाऊं देण्याविषयीं ताकिदी पाठविल्या आहेत. मद्रास रैफलची एक कंपनी जहानाबाद एथें आहे. ती सर्व व्यवस्था बरहरा चालू होईपर्यंत तेथें राहील. बंडखोर रस्त्यांतून पळून जातात. बक्सर आणि आरा यांमधील डांक बंद जाली आहे. शिरगोटी एथील रिपोर्टावरून कळतें कीं, बंडवाल्यांची एक टोळी टिकारी याचे जाहागिरींतील रफीगंज एथें १ ले जुलै रोजीं होती. तेथल्या राजानें त्यांस प्रतिबंध करण्याविषयीं तयारी करून आणखी कुमक मागितली आहे

हें पत्र ज्ञानप्रकाश छापखान्यांत कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांनीं छा

# ज्ञानप्रकाश

सोमवार तारिख २६ जुलै सन्न १८५८ इसवी. ६९


## पत्राची किंमत.

१० ६ साल रुपये. ९॥ आगाऊ दिल्यास रु.

## वसूल.

९॥ क्यापटन मेडोज टेलर साहेब कराडूरचे कर्मदान
१० कसानकान्सीससाहेब कपरिंटेंडेंट रेविन्युसरवे.
१० अज्जमशामराव गोविंद मामलेदार येवलें.

## सूचना.

आम्ही ज्ञानप्रकाशपत्र घेणारांस कळवीत आहों कीं, ज्यांजकडे सन्न १८५७ सालची बाकी येणें राहिली असेल त्यांनीं पैसा पाठवावा, व बुकांबद्दल बाकी असल्यास तीही पाठवावी.

---

## ज्ञानप्रकाश तारिख २६ जुलै सन्न १८५८

**पाटणा,**— चपरा एथील बंडखोर गुथनीच्या मार्गें गोरखपुरीं गेले. त्यांनीं आपल्या बरोबर दरलैवीच्या रखेल्यास धरून नेलें. त्यास त्यांनीं मारलें असेल यांत अंदेशा नाहीं. पांचवें किंवा साहावें शिपायांनीं उद्वंतनगर आप्याचे नजीक आहे, त्यास जुलैच्या ५ वे तारिखेस हस्तगत केलें. यामुळें शहरांत मोठा दंगा जाला आहे

**जयपूर,**— एथील ४ थे मिनहूची खबर कीं, जनराल राबर्टस् हा जयपुराचे पूर्व दिवस नादिराबाद ब्रिगेड (फौजे) सह वर्तमान चाल करणार आहे. त्या समागमें कपतान इडन आहे. अशी बातनी सांगतात कीं, तिकडील बंडवाले ३ मिनहूस लालसूंत एथून टोंक्याकडेस चालते जाले.

**आग्रा,**— एथून १७ मिनहूची खबर आहे कीं, जनराल राबर्टस् याचें जयपुरापासून आगमन पाहतांच बंडखोर टोंक्याचे दक्षिणेकडेस चालते जाले. त्यांनीं तें बाहर यत्किंचित् अडथळा जाल्यावांचून हस्तगत करून लुटलें. आणि ते बूमगड म्हणून किल्ला आहे त्यांत तेथचा नवाब राहतो, व तो आपले जे लोक इमानी राहिले आहेत, त्यांनिशीं त्या किल्ल्याचें संरक्षण करीत आहे. त्या किल्ल्यास ते वेढा घालणार आहेत असें दिसतें.

होमुस् याचे स्वार व घोड्यांचा तोफखाना हें दृष्टीस पडतांच बंडखोर बनिटाकडे पळाले त्यांच्याविशीं अखेरचें वर्तमान जें लागलें तें पाहतां सदर्हू बंडवाले रानपुराकडे अथवा उनियारा एथें असावे, असें कळतें. ११ मिनहूस होमची ब्रिगेड (फौज) बनिटा एथें पोंचली असावी. त्याच रोजीं टोंक्यासही पोंचली असावी. जुलाई याचाशीं एक शिपाई पकडला, तो लोकवदंते प्रमाणेंच सांगतो कीं, बंडवाल्यांचे पुढारी तात्या टोपे, बांद्याचा नवाब, रहीमअल्लीखान, आणि बरेलीचा नवाब प्रायः धोंडाखान हे आहेत. असें म्हणतात कीं, टोंक्यास त्यांला ३ तोफा मिळाल्या आहेत

---

**एडन,**— एथील १२ जुलैची बातमी कीं, ज्युडा एथें इंग्लिश कोन्सल, फ्रेंच कोन्सल, ग्रीक व्यापाऱ्याची बायको, व जर्मन व्यापारी १५ शिवाय दुसरे लोक यांस आरबांनीं ठार मारलें. दैवयोगें १५ गोरे लोक त्यांचे हातून निसटले

बं. ग्याझि.

## ज्ञानप्रकाशकर्त्तेयांस.

म्हाराज, एथें मिशनरी लोकांनीं इंग्रेजी व मराठी शाळा घातल्या आहेत. परंतु यांची व्यवस्था जर त्यांवरचे अधिकारी चांगले ठेवतील तर त्यांचा या शाळा घालण्याचा उद्देश लोकांस व विद्यार्थ्यांस चांगला, कळून येईल. अगोदर याशाळांविषयीं जे ग्रह लोकांत आहेत, त्यांस सरोसर अधिक प्रेरणा मात्र करितात. पहा, अलीकडे त्यांणीं एक बाटलेला मनुष्य इंग्रेजी शाळेंत गणित शिकविण्याकरितां आणला आहे, तो आल्यापासून या कामावर कांहींच नजर पोंचवीत नाहींत. यामुळें पगारी अगर साधे विद्यार्थ्यांच्याठायीं आळस मात्र वाढत चालला आहे. यास्तव पाद्री मिचल व पाद्री म्याकून साहेब, याविषयीं चौकशी करून त्या कामगारास आपले नेमलेले कामास लावून त्याचा हिसाब वरचेवर पगवीऊ तर, आम्हांवर बहुत उपकार होतील.

मुक्काम पुणें २९ जुलै. सन १८५८ इस. } एक पाद्री शाळेंतला.

**अदालत.**— हल्लीं या मुंबई इलाख्यांत दिवाणी मफुस्सल कोडतांतून ज्या त्या कोडतांचें नाझरीचें काम चालविण्याची वहिवाट आलीकडेस घातली आहे. ती बराबर आहे किंवा तिजपासून कांहीं अडचणी उत्पन्न होतात याविषयीं प्रत्येक जिल्हा जड्ज्याचे अभिप्राय सदरदिवाणी अदालतीनें मागितले आहेत. हे अभिप्राय मागण्यास कारण जालेलें आमचे ऐकण्यांत आलें आहे कीं, अमदाबादेच्या जड्ज्यानें या कामांत अव्यवस्था होते ती सदरेस कळविली आहे कीं, एक कोडतांतून नाझरमार्फत जसी जाते, त्याच मालावर दुसरे कोडताची जसी जाते, याप्रमाणें प्रकार वरचेवर होऊन जसीचे कामांत वेळ, व घोंटाळा होतो. याकरितां हुजूरचे कोर्टातील नाझरीचें काम पूर्वीप्रमाणें हुजूर नाझराकडेसच ठेवावें, म्हणजे हा गोंधळ होणार नाहीं. आम्हांस ही वाटतें कीं, ही व्यवस्था जाल्यानें कोर्टानें जें तकरारी काम वाटलें आहे तें कमी होऊन मुनसफ वगैरे नेटीव न्यायाधीश यांचे फैसले कमी होतात ते न होतां शिल्लक दरसाल राहते त्यापेक्षां कमी राहात जाईल. आणखी हलके पगारांचे कामगारांचे हातीं एवढें जोखमीचें काम दिल्यानें जे अंतरंग दुराचारी प्रकार चालत असतील तेही बंद होतील. जड्ज्य हुजूर नाझर आपणास काम फार पडेल ही गोष्ट मनांत न आणितां रयतेच्या हितावर नजर देऊन आपले योग्य अभिप्राय देतील अशी आशा आम्ही करतों.

---

**भडोच.**— एथें बंबे टैम्स पत्रांत खबर लिहिली आहे कीं, धेज परगण्यांतील एका जाहागीरदार देसायाकडे डाकेचें काम सरकारानें ठेविलें आहे. त्यानें तीन महिनेपर्यंत सरकारी व लोकांचे कागद न वांटतां आपले पाशींच ठेविले. पत्रें लोकांस व सरकारी कामगारांस पोंचलीं नाहींत. याबाबद त्याजांतांत ओरड जाली, तेव्हां अंतरंग चौकशी करतां सुमारें दोनशें लखोटे त्या देसायाचे घरांत सांपडले. हे कागद छपावून ठेवण्याचें कारण असें म्हणतात कीं, सदहू देसाई हा अट्टल आफू खाणारा आहे यामुळें त्यानें त्या धुंदींत ही कामगिरी वजावण्यांत दुर्लक्ष केलें.

टाके विषयीं बोभाट चहूंकडे आलीकडे असा चजालेला ऐकतों. चांगलें लक्ष सरकारानें पोंच-विल्याविना पाकारखान्यांत व्यवस्था होईल असें आम्हांस दिसतें.

---

**झनादी तोफ,**— भरतपूर एथें एक मोठी जड तोफ जमिनींत समारें १० हात गडलेली आहे. तिची लांबी समारें १७ हात आहे. ती बंडवाल्यांनीं उकरून नेण्याकरितां मोठा इलाज केला, परंतु ती त्यांस निघाली नाहीं.

---

**किरकोळ,**— मद्रासेंत ब्लाकटोन नामें रस्त्यावर एक गृहस्थ राहात आहे. त्याची स्त्री गेल्या महिन्याचे २३वे तारिखेस प्रसूत होऊन चार मुलें जालीं, त्यांत ३ मुली आणि १ मुलगा अशीं आहेत. हीं सर्व खुशाल आहेत.

स्त्रीबोध वृत्तांत असें आहे कीं, उत्तरेचे राज्यांत एक वाटनवर्न म्हणून एक जागा आहे तेथें मिस्तर थी ओड हेलगर्ड म्हणून एक जणाचा छापखाना आहे. त्या कारखान्यांत १६० मुकें आणि बहिरे असे अक्षरें जुळणारे नोकर आहेत. हे आपलें काम बरोबर चालवितात. हें तेथील राजानें पाहून त्या सर्वांस पदकें इनाम दिलीं.

---

**प्रयाग,**— एथील ९ मिनहूस बादशाही ३२ वी, ६ वी पंजाबी पायदळ, लाहोरी रिसाला, राजकीय घोड्यावरील अर्धी तोफखाना ज्यांत दोन १८ रत्तली तोफा आहेत. इतकी फौज यामध्ये तांतून गंगानदी उतरून चालती जाली. चपरा एथील बंडखोर जलदीनें एक मजल नैर्ऋत्य दिशेनें जाऊन त्यांणीं त्रिसूर ठाणें जाळून इकोमाचे वायव्येस वंदुक एथें मुकाम केला. मेजर बेमिशहा त्यांस अडथळा करण्याकरितां हुसेनपुराकडे चालता जाला आहे. असें म्हणतात कीं, ते गाझिपुराकडे परतणार आहेत. त्यांस कोणी येऊन मिळाले नाहींत. पाटणेकडून खबर अशी आहे कीं, ६ मिनहूस बंडवाल्यांनीं आऱ्याचे ठाण्यांत शिरून कांहीं गोळागोळी केली व मिस्तर विक्टर्स याचा बंगला जाळला. ग्यारिसनचे लोक बचाव करतात असें दिसतें. ७ वे मिनहूस घोडेस्वारांचा एक स्काड्रन बाहेर निघाला, त्याचे मागें बंडवाल्यांचे ४०० किंवा ५०० जवान आहेत. फौज बाहेर आली आणि बंडवाल्यांपैकीं थोडे मारले जाऊन मागें हटले. १० वीचा १ शिपाई जखमी जाला. घोड्यांवर बसलेले ४ आणि २० पायदळ बंडवाले यांणीं ७ वे तारिखेस गयेचा रस्ता जनानाबादेच्या पलिकडे ५ मैलांवर ओलांडून पूर्वदिशेस गेले. ब्रिगेडियर ग्यांस जनान्याबादेस घोडेस्वारांची पाटी पाठविण्याविशीं व जमीदार लोकांनीं आपली रयत हत्यारबंद करून या लोकांस प्रतिबंध करण्याविशीं हुकूम जाला आहे.

---

(सिविल) दिवाणी कामगारांस सन १८५८।५९ चे राजकीय वर्षांत विलायतेस रजेवर जाण्याची परवानगी मिळणार नाहीं. असा हिंदुस्थानसरकारानें ठराव केला आहे. असें आवझूरवर पत्रावरून कळतें.

---

कलकत्त्यास हैदरअली यानें समारें ऐंशी हजार रुपयांच्या प्रामीसरी नोटी वायव्य प्रांतांतून आणिल्या आहेत. त्याविषयीं कांहीं संशय आल्यावरून चौकशी चालली आहे.

---

विलायतसरकारानें असा हुकूम केला आहे कीं, बेसनदी नोकर यांस सालांतून पंधरा दिवस पावेतों आजारीपणामुळें पगार न कापितां रजा देत जावी.

**दिनापूर,**— एथून २५ जूनची खबर इंग्लिशम्यान पत्रांत लिहिली आहे कीं, गाझीपुराकडील बंडवाल्यांनीं सारन बळकावलें. तेथें कुमके करितां फौज मागितली आहे. दरम्यान एथें लढाई जाली, त्यावेळीं म्याकडोनल्ड यांचे स्वार चांगले वागले. एथें २२वे जून रोजीं रात्रीस सुमारें २०० बंडवाले आले असें सांगतात. आणि त्यांवर २३वीस सकाळीं कपूतान् मेल्स यांनीं हल्ला करून त्यांस हटविलें. त्या झपाट्यांत त्यांचे १२ ठार जाले. दोन कैदी जाले. आणि १ उंट व हत्यारें पुष्कळ ते टाकून गेले. कपूतान मेल्स याचे फौजेपैकीं एक ठार व एक जखमी जाला. याचे फौजेंत ७० राट्रेचे सीक, १७० शिवरन स्वार होते. या फौजे बरोबर पोलिसचे लोक होते, त्यांणीं आरंभापासून पाय मागेंच काढले. पुढें सिवान रिसाल्यास कवाइती देणार आहेत.

**गाझीपूर,**— एथून उशिरा वर्तमान आलें आहे कीं, त्या परगण्यांत अस्वस्थता आहे. आणि सरकारी अंमलदार जे बंडवाल्यांस सांपडेल, त्यास ते ठार मारतात व छळतात.

**आरा,**— एथून पत्रें आलीं त्यांत लिहिलें आहे कीं, उमरसिंग व त्याचे १००० एक हजार कट्टे जवान लोक यांचा हल्ला येण्याची वाट पहातात.

**गोरकपूर,**— एथचें वर्तमान ऐकतों कीं, ब्रिगेडियर राक्रोफ्ट हे महमद हुसेन यास जेर करीत आहेत. या प्रसंगीं मद्रासी रिसाला चांगला शौर्यानें वागत आहे.

---

**बहार,**— या प्रांतांतील खबर पाटण्याच्या एका इंग्लिशम्यान पत्रकर्त्याचे बातमी दारानें २६ जूनची लिहिली आहे कीं, २२ जून रोजीं [illegible]

रगणा संकटांत होता. २०० शिपाई १० किंवा ३० स्वार बंडवाले शिपायांची एक टोळी गोग्रा नदी उतरली आणि एका आगबोटीवर चढ करून जाऊन कपूतान मेल्स यास त्यांनीं वेढा घातला. त्यावेळीं सदर्हू कपूतानाचे हुकमतींत ३० सीक व १२० डयाझलर्स होते. हे सर्व त्या बंडवाल्यांशीं टक्कर मारण्यास फार आधिर जाले होते. पुढें लढाईस आरंभ सकाळीं जाला. नंतर इच्छेप्रमाणें त्यांस एकदम हांकून लावलें. सदरील सीक लोक व उपझलर्स मोठ्या शिताफीनें या प्रसंगीं वागले. जर हा जय न होता, तर सारन परगणा सगळा बंडवाल्यांच्या हातांत गेला असता. आणखी जर या सारन परगण्याचे हद्दीवर फौज संरक्षणार्थ रवाना होणार नाहीं, तर तो परगणा बंडखोरांच्या हातांत जाईल. बहार प्रांतांतील सर्व नजिबांस बोलावणें जालें आहे. त्यांचा जमाव पाटणा एथें करणार आहेत.

---

**कोचीन,**— एथील राजानें आपले दिवाणाच्या कांहीं तक्रारी मद्रास सरकाराला कळविल्या, आणि तो दिवाण त्या कामास नालायक आहे याकरितां त्यास पदभ्रष्ट करावें म्हणून जाहीर केलें. परंतु राजाचा बाह्मणा सरकारानें त्याच्या इच्छेप्रमाणें मान्य केला नाहीं, सबब तो राजा आपील करणार आहे.

---

**इसलामनगर,**— एथें बाबुराम नारायण हा आपली फौज व चार तोफा यांनिशीं होता त्यावर रामपूरचे नबाबाचे तैनातींतील हकीम सारन अल्लीखान याणें फौज व ६ घोडयांच्या तोफा यांनिशीं जाऊन मेच्या २९ वे तारखेस हल्ला करून रामनारायण याचा त्या हकिमानें पराभव केला. व त्याचे फौजेपैकीं २० लोक मारले व ५७ जखमी केले. आणि त्याच्या ३ तोफा व पुष्कळ रणसामान मिळविलें. आणि त्या हकिमाचे फौजेपैकीं फारच थोडी नुकसानी जाली. हा सर्व मजकूर सदर्हू हकीमानें आपल्या नबाब यजमानास लिहून पाठविला तो नबाबानें सरकारास लिहून पाठविला आहे.

# आगगाडी.

## ज्ञानप्रकाश कर्त्यांस.

विनंतीविशेष. पूर्वी आमचे ऐकण्यांत फार येत होतें कीं, आगगाडी जाली म्हणजे तीपासून लोकांस फार सुख व फायदा होईल. हाल्लीं पुण्यापासून मुंबईपर्यंत आगगाडी सुरू जाली आहे. तीपासून फायदा किती होईल हें आज सांगवत नाहीं. कांहीं दिवसांनीं अनुभवाअंतीं कळेल. परंतु सुखाचें थोडेसें वर्णन करितों.

आगीचे गाडींत जाणार येणार लोकांपैकीं दर शेंकडा नव्वदांवर लोक कनिष्ठ म्हणजे तिसरे मताचे गाड्यांत जातात. ह्यांपैकीं दरएक गाडी लांब सुमारें हात व रुंद हात असून दरएकींत पन्नासांपासून ऐंशीं पर्यंत बायका पुरुष पोरें बाळें मेंढरांप्रमाणें ठासून ठासून भरतात, तेणेंकरून दरएकाचे वांटणीस इतकी जागा येते कीं, त्यानें हात किंवा पाय हलवूं म्हटलें तर मुष्कल पडते. दरएक गाडीवर तक्तपोशी चांगली असते. व डावे उजवे बाजूस तक्तपोशीचे आंगास सुमारें दोन हात खुली असते. तेणेंकरून डावे उजवे तोंडाजवळ उभें राहाणारास वारा बराच असतो, परंतु मध्यें जे सांपडतात त्यांचा दाटीमुळें घाम घाम होऊन श्वासोच्छ्वास देखील टाकण्याचें त्यास कठीण पडतें. तेव्हां आगगाडीवरील कामगार अधिकारी यावीरामदाचे अधिकारी आहेत अशी त्यांची खात्री सहज होते. पावसाळ्यांत तर दोन्ही बाजूंचे उघडे आंगानें गाडींत भरभर पाऊस भरतो. मग त्या दशेस काय पुसावयाचें आहे. तळीं पाणी जाण्यास मार्ग आहे, पण विरळ जात नाहीं. निदान तळवा बुडण्यापुरता सहज असतो. त्यांत बिचारा अन्हाणी पाचांगा बायकापोरें वगैरेस तीन प्रहर वेळ काढावा लागतो. वाहवा [illegible] सुख हें. तथापि एवढाच त्रास आहे इतकेंच नाहीं. गाडींत दिवा नसतो, व बायकापुरुष यांचा एकचेप जाल्यामुळें लुच्चे लोकांस फावतें. मग बायकांची काय दशा. त्यांस नाना तऱ्हेचीं बीभत्स भाषणें ऐकावीं लागतात, एवढेंच नाहीं, अंगस्पर्श देखील सोसावे लागतात. असे तमाशे क्वचित् होतात असें कोणीं समजूं नये. नित्यशः चालू आहेतच. गरिबाचे बायकोची दशा आगीचे गाडींत काय होईल, तें कोणाच्यानें सांगवत नाहीं. यांत रात्रींस भांगट गांजेकस दारू प्यालेले देखील भरले असतात. हरहर आगीचे गाडींत जे काय हाल व विटंबना होते, त्यांची आठवण जाली असतां आंगावर रोमांच उभे राहातात. या गाडीस दुरूनच नमस्कार असो. ईश्वर गरीब अनाथ लोकांची दाद कधीं लावील तो सुदिन म्हणावा. पण लवकर दाद लावणें हें लोकांचे स्वाधीन आहे, असें मला वाटतें. कोणी म्हणेल कशी दाद लावावी, व कोणी खटपट करावी, तर मोठें विलायतेस अशीच अव्यवस्था होती, ती कशी बंद जाली व कोणाचे उद्योगानें जाली याची चौकशी करावी म्हणजे सहज कळून येईल. मी तिचा शोध लागल्यास करून तपशीलवार पत्र आपणास लिहीन. कळावें ही विनंती. ता. १८ जुलई सन १८५८ इ.

एक नुकताच आगीचे गाडींत बसलेला.

** या पत्राचा मजकूर अगदीं खरा असावा असें संभवतें. आणि आम्हांस शोधांतीं दुराचार प्रवृत्ति या आगगाडींतून नित्यशः होतात असें समजतें. यास्तव याविषयीं लोकांनीं विचार अवश्य केलाच पाहिजे.

ज्ञा. प्र. कर्ता.

---

"बेळगांव—१७ जुलई. या आठवड्यांत

पाऊस फार चांगला लागला आहे. मेहेरबान पोलिटिकाल एजंट साहेब यांची स्वारी नरगुंदकडेस आणि असिस्टंट पोलिटिकाल यांची स्वारी सांगली कडेस गेली आहे. सर्व जिल्ह्यांत स्वस्थता आहे. मिस्तर न्यूहाम एथील कलेक्टरचे मदतनीस यांस दक्षिणभागचे एड्युकेशन इन्स्पेक्टर नेमणार अशी वदंता दाट आहे. एथील जाहगीरदार लोकांची शाळा ही हल्लीं मेहेरबान हावर्डसाहेब डैरेक्टर्स यांचे ताब्यांत सरकारानें दिली आहे."

## नेमणुका.

सदर दिवाणी अदालतीचे जडज्यांहीं नारायण मोरेश्वर यांस वकिलीची सनद देऊन खानदेश जिल्ह्यांतील कोडतांत काम चालवायास अधिकार दिला.— कापटन जे· ब्राक यानें गायकवाडचे कोंटाचे घोड्यांवरील महीकांठच्या आणि असिस्टंट पोलिटिकाल सुपरिंटेंडेंट याचें काम ता· २ जुलै रोजीं घेतलें.— लेफ्टेनंट डवे, व बाकन यांस सावंतवाडी कम्यांडवर पाहिल्यास दुसरे, आणि दुसऱ्यास तिसरा कम्यांड ता· १ जुनास दुसरा हुकूम होई तोंपर्यंत नेमिलें.— मिस्तर सी· एम्· हारिसन पुण्याचे आक्टिंगजड्ज्य यांस विलायतेस आजारी पणाचे सरटिफिकिटावरून जाण्याकरितां तयारीस एक महिन्याची रजा मिळाली.— मिस्तर जी· वाडिंगटन यांस कुलाब्याचे एथें मराठी भाषेचा अभ्यास करण्याकरितां राहण्यास परवानगी मिळाली.— मिस्तर जे· ए· एल्फिन्स्टन सिंद एथील हालाचे डेपुटी कलेक्टर यांस पुढील ता· १ सपटंबर पासून २ वर्षे त्यांची रजा मिळाली.— मिस्तर जे· जी· मुर यांनीं डिपार्टमेंट टलची पहिल्या प्रकारचीं पर[illegible]

रीक्षा दिली.— मिस्तर सी· एफ· नार्थ यानें अक्टिंग कार्य· इंजनीयर सेंत्रल सरकलचे ता· २८ जून रोजीं कामाचा चार्ज घेतला.

---

**आक्ट,**— सन १८५८चा ७वा आक्ट पसार जाला आहे, त्यांतील हशील कीं, मद्रास इलाख्यांतील कर्नूल प्रांतांत इंग्रेजी कायदे कानूची वहिवाट इतर जिल्ह्यांप्रमाणें सुरू करावी. सदरहू आक्ट १८५७ चा १०वा, यावर दुरुस्त केला आहे.

---

**लष्करीखातें**— दोन जाएती काळ्या पायदळ पलटणी मुंबई इलाख्यांत वाढविण्याविशीं ठराव जाला आहे. दर एक पलटणीची ११वी व १२वी या दोन कंपन्या काढून वाढवायाच्या आहेत. १ली पलटण पुण्यांत असेल, व दुसरी अमरावतीस राहील.

---

**पुतळा,**— विलायतेचे कारागीर लोकांनीं सर जेमसेट जिजीभाई बारोनेट यांचे आकृतीचा संगमरवरी पाषाणाचा एक पुतळा तयार केला आहे. तो बसलेल्या आकृतीचा आहे. तो हल्लीं तयार होऊन मुंबईस येण्याकरितां जाहाजावर चढविला. तो प्रतापी पुरुषाचा पुतळा पाहाण्यास राणीसाहेब यांची स्वारीही आली होती. हा पुतळा मुंबईस आल्यावर त्याची स्थापना टौनहालांत करण्याचा पूर्वींचा विचार होता, परंतु हाल्लीं वंबेग्याझिटआधारें असें कळतें कीं, तो पुतळा पृथक् जाग्यांत नेऊन तेथें सुंदर इमारत बांधणार. या स्वदेश नेटीव पुरुषाचा पुतळा प्रथमच हिंदुस्थानांत स्थापन करणार हें ऐकून आम्हांस संतोष जाला आहे. हा पुतळा सर जेमसेटजिजीभाई बारोनेट यांचे मित्रमंडळीनीं खर्च करून [illegible] आहे.

**परीक्षा,**– गेल्या सरकारी ग्याझेटांत सदर अदालतीचे रजिस्टर मिस्तर फाक्सन यांचे सहीची जाहिरात प्रसिद्ध जाली आहे कीं, तेथील भाषांतरें करण्याची जागा रिकामी जाली आहे, त्यास त्याजागेविशीं जे उमेदवार असतील त्यांची परीक्षा मुंबईस त्याच अदालतींत ता० १७ माहे आगष्ट सन मजकुरीं परीक्षा घेतली जाईल. यास्तव ज्या कोणास परीक्षा देण्यास पावयाची खुषी असेल, त्यांणीं सदरील महिन्याचे १४ वे तारिखेच्या आंत सदई रजिस्टर यांजकडेस अर्ज पाठवावे.

**करवीर,**– गेल्या आठवड्यामध्यें एथें एकसारखा पर्जन्य लागला. कालपासून किंचित् उघाडी आहे. पंचगंगेस पूर मनस्वी आला आहे, त्याजवरून घाटावरही पर्जन्य पुष्कळ पडला असावा असें वाटतें. कस०

**तासगांव,**– तारिख ५ जुलै सन १८५८ सर्वत्र स्वस्थता आहे. तेथें दाहा हजार वस्ती आहे. त्यांत ब्राह्मण वस्ती मोठी आहे. बदमाशी लोक पुष्कळ आहेत. तेही बंड करिते, परंतु सरकारानें त्यांचीं हत्यारें घेतलीं. आतां ते स्वस्थ बसले आहेत. कर्नेल जेकब यानें २२ वे पलटचा एक उईंग एथें पाठविला. तेणेंकरून तेथून निजामाचे राज्यांतील लोकांशीं जो पत्रव्यवहार होत असे तो बंद जाला. तेथून अकरा कोसांवर मिरजेचा मजबूत किल्ला आहे. तेथें एक महिन्यापूर्वीं ५१००० पौंड (सुमारें ६५ खंडी) दारु, १७००० गोळ्या व गोळे, थोडयाशा तोफा, आणि बाण वगैरे कांहीं दारुकाम व कांहीं हत्यारें जमिनींत पुरलेलीं सांपडलीं. सांपडलेली दारु नासून टाकली. आणि गोळ्या व गोळे कोल्हापुरास दक्षिण महाराष्ट्र देशाचे असिस्टंट कमिशनर मिस्तर लाकेट साहेब यांजकडे पाठविले. तासगांव आणि मिरज यांमध्यें सांगली आहे. तेथें दुसऱ्या युरोपिअन पलटणीची एक कंपनी आणि २२ वे काळे पायदळ पलटणीची एक कंपनी राहील. तेथें परचुत बाई आहे. ती इंग्लिशांचा डिटाचमेंट तेथें राहावा अशी इच्छा करीत आहे. ज०मि०

आमचे ऐकण्यांत आलें आहे कीं, कामगार लोकांचे पगाराचे आवस्ट्राक्ट मुंबईस आकौंटंटाकडेस पाठवून तें पास होऊन आल्यावर पगार आज चार महिने मिळत असे. यामुळें नोकर लोकांस फार अडचण पडत होती. हें सरकारचे कानावर आल्यावर त्यांनीं कामगार लोकांचे पगार पूर्वीप्रमाणें देण्याविषयीं हुकूम फरमाविला आहे. या सबबीं कितीएक रेविन्यु सर्वे कडील साहेब लोक अमलदार यांणीं व इनामकमिशनर खत्यांतील कांहीं अंमलदार यांणीं आपले हातारवालचे नोकर लोकांस पैशाची अडचण न पडावी म्हणून त्यांणीं कांहीं रकम आपले लोकांस मोबदला ठळवळा आणून दिलेल्याचें आमचे ऐकण्यांत आलें. हें ऐकून व हल्लींच हुकूम आल्याचें ऐकून आम्हांस संतोष जाला आहे.

**सातारा,**– मिस्तर पिनीसाहेब यांणीं ता० १ जूनपासून ता० १० जुलैपर्यंत चाळीस दिवसांत १५७ अपिलें तपासलीं. त्यांणीं चार्ज घेतला तेव्हां एकंदर १४०० अपिलें त्यांचे ताबीन जालीं. त्यांतून सदरांचीं संपलींच. ता० ११ जुलै रोजीं १२४३ शिल्लक होतीं. त्यांची दर्याप्ती करण्यास सदरीचे मानाप्रमाणें १० किंवा ११ महिने लागतील. फौजदारी कामही तेच माहेत व पाहात

असतांत. माजिस्त्रेट साहेबाच्या सल्ल्यानें सेशनांस रवाना व्हावयाचे सर्व खटले माजिस्त्रेटाकडे न पाठवितां परभारें आम्हांकडे सत्वर पाठवीत जावे. असे हुकूम मामलेदारांस आसहेबांनीं दिले आहेत. आम्.

---

**विलायत,**— एथील डांक २९ जूनपर्यंतची आर्बस्थानांतील एडन बंदरीं आगबोटींतून आली आणि तेथून मुंबईस गेल व तांतून आली ही डांक फारच लौकर येऊन तव्हांत गेल व तार्ह आली व्हां देवयोगें वारा अनुकूळ होता असें दिसतें. आतां जुलैच्या २ तारिखेपर्यंतची डांक आजउद्यां येऊन पोंचावी असें आहे. या डांकेंतून आलेल्या वर्तमानावरून कळलें कीं, हिंदुस्थानचे भावी राज्यव्यवस्थे विषयीं पार्लमेंटांत विचार व वादविवाद चालले आहेत. कंपनी सरकारचे या हिंदुस्थानचे नवीन राज्यव्यवस्थेवर विचार करण्याकरितां सभा भरली होती. आणि यातव्यानें ३० वी जून रोजीं सभा भरणार होती.— विलायतेच्या लंडन नामक राजधानींत एथील टेम्स नदीचें पाणी नासल्ले कारणानें व अपूर्व गरमी संचरल्यामुळें पटकीचा उपद्रव पुनरपि उठेल असें दिसतें.— युरोप खंडांतील राज्यें काय ठराव करतात, त्याविशीं रूमशाम वाट बघत आहे, तोंपर्यंत मांटिंग्रो एथील लढाईचे बाबरींत रूमशामनें तहकुबी केली आहे.— फराशिसाचे पारिस नामक राजधानींत या मकरणीं दरबारी सभा पूर्व रूमशामच्या वकिलाची तबियत आराम नसल्ले कारणानें महकूफ राहिली आहे. ही अखेरची सभा १५ जुलैस भरेल असें वाटतें.— परराज्यांत उपयोगार्थ तोफांचे आरमार विलायतेंतील पार्टस्मोथ बंदरीं तयार करून ठेवण्याविषयीं हुकूम फर्माविला आहे.

**कपटाचें लग्न,**— नगरजिल्ह्यांत तालुके शेवगांव येथील पोलिस अंमलदारापुढें एक खटला असा आला आहे कीं, रावजी एकनाथ व त्याची आई पार्वती जात ब्राम्हण धाउजांव बिडकर राहाणार मौजे चिरवली तालुके पाठोदे जिल्हा नळदुर्ग. या उभयतांनीं रावजीची मुलगी सरूनांवाची उमर वर्षे ५ इचें प्रथम लग्न ११५ रुपये घेऊन मौजे धामणगांव तालुके आस्टी. एथील बाळदे वभट्ट याचे मुलाबरोबर केलें, तो जिवंत नवरा असतां त्या मुलीचा बाप रावजी बिडकर याचे मनांत असें आलें कीं, या मुलीवर कांहीं तरी आणखी द्रव्याची पैदास्त होईल तर करावी, म्हणून पाथर्डी तालुके शेवगांव येथें रावजी बिडकर हा शाळा घालण्याचें मिस करून तेथें कांहीं दिवस राहून त्या गांवचा सावळयाराम गोविंद याचें लग्न व्हावयाचें आहे, हें जाणून, त्याचे मित्रां कडे जाऊन माझी मुलगी लग्नाची आहे असें सांगून त्याजपासून ३५१ रुपये घेऊन त्या मुलीचें लग्न सावळयाराम याजबरोबर रावजी व पार्वती बाई यांणीं लाऊन दिलें. पुढें सावळयारामास हें कपट कळल्यावरून त्यानें पोलिसाकडेस फिर्याद केली. त्याची चौकशी पोलिस अंमलदार यांणीं करून धर्मासि विरुद्ध केल्याचा खटला हरदूकेदीवर तयार करून हुजूर सेकंड असिस्टंट माजिस्त्रेट जिल्हा नगर यांजकडेस ता·१७ मिनहूस कमिट केला असें समजतें. सदरहू मजकुराचें पत्र ता·१९ मिनहूचें आम्हांस आल्यावरून ही हकीकत कळली आहे. पुढें आमचा मित्र याचा फैसला ही लिहील, तर आम्ही त्याचे फार उपकारी होऊं.

---

सरकारानें सागर आणि ग्वालेर यांचे मा॰ दोन शिरनिराळे करावे, असा हुकूम केला आहे. त्या दोन ठिकाणांवरील अंमलदार पृथक् नेमिले आहेत. सं·ग्याझि.

हें पत्र ज्ञानप्रकाश छा॰ कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांणीं छा॰ न॰ के॰

# ज्ञानप्रकाश

गुरुवार. तारिख २९ माहे जुलै सन्न १८५८ इसवी.

## जाहिरात.

देण्यांत येते कीं,

१ कृष्णाजी गोपाळ घवे.

१ विठ्ठल यशवंत पाडे.

१ रावजी सनगर.

१ नारायण सनगर

तुम्हा चौघांस असें जाहिरात देऊन कळविते कीं, मी रमुबाई कोम सरदारमल मारवाडी पेठ रविवार माझा सासरा लछिरामजी मणीयार मारवाडी यांचें घर शहर पुणें येथें रविवार पेठेंत दाणेआळीचे खुटावर आहे. व तो हल्लीं मयत जाला आहे. त्याचे स्थावर जंगम मालाची वारस मी आहें. परंतु सदरहूबद्दल सरटिफिकिट घेण्याविषयीं मेहेरबान जडुजसाहेब पुणें यांस अर्ज केला आहे, तर सदरहू घरांत सदरीं लिहिलेले भाडेकरी यांस कळावें कीं, तुम्हीं आजपासून सदहू घराचें भाडें कोणास देऊंनये. व तुम्ही माझे हुकमाखेरीज बाहेर निघूंनये. कदाचित् तुम्ही या जाहिरातीविरुद्ध वर्ताल तर तुम्हांपासून येविषयीं जबाब घेतला जाईल, व आजतारिखेपासून भाडें मला द्यावें अगर तुम्ही आपणापाशीं ठेवावें. विरदाई कोम श्रीकृष्ण मारवाडी इजला कळावें कीं, तुं माझे घरांतून निघून जावें, तसें न केल्यास त्याजबद्दल नुकसान होईल त्याविषयीं तुला खर्च द्यावा लागेल. व माझे पासच्याची जिनगी तुजपाशीं आहे ती मला द्यावी. त्याची अफरातफर करूंनये. तारिख २९ जुलै सन्न १८५८ इसवी.

निशाणी तुळशीची माळ रमुबाईचे हातची

दस्तुर आबाजी गंगाधर पंडीत

## ज्ञानप्रकाश ता. २९ जुलै सं. १८५८

बंबेग्याझिट आधारें समजतें कीं, सरकारानें मिरत आणि आग्रा या प्रांतांत घातलेला (लष्करी कायदा) रद्द केला होता तो हाल्लीं मकूफ केला आहे.

सिंद एथें सातारच्या राण्यांतील मुख्य राणी नुकतीच नेऊन ठेविली होती, तिची प्रकृति बिघडून तीन दिवस आजारी होती. त्यास औषध उपाय डाक्तर मार्फत जाले, परंतु ती राणी ता. २० जुलै रोजी मरण पावली.

काबुलचा राजा दोस्त महंमद याचा मुलगा गुलाम हैदरखान हा मरण पावल्याची बातमी आली आहे.

दक्षिणेंतील हैदराबादेच्या रसिदंटाचा सेकंड असिस्टंट यांस सरकारानें करापूरचे राज्यांत अव्यवस्था असण्याचे नोकरी करण्याकरितां नेमिलें आहे. असें टेलिग्राफावरून कळतें.

कोर्ट आफ् डैरेकदर्स यांणीं हिंदुस्थान सरकारास असा हुकूम फर्माविला आहे असें बंबेग्याझिटच्या समजण्यांत आलें आहे कीं, बादशाही तोफखान्यावरील नोकर हे प्रेसिडेन्सीपासून १०० कोसांवर दूर गेले असतां त्यांतील एकास दररोज पाऊण आणा दारूकरितां द्यावा असा सरकारानें ठराव केला आहे.

**नाटककार,**— ता. ३१ जुलै शनवारीं वस्त्रहरण व अभिमन्युविवाह हीं दोन आख्यानें ते करणार आहेत असें ऐकतों.

**एकाधिकसूर्यदर्शन,**— तारिख ४ जुलैचे जगन्मित्रांत, मालवणतालुक्यांतील पिंदरकर यांनी दोन सूर्य एका कालीं दिसल्याबद्दलचें पत्र छापिलें आहे तें.

"ता॰ ३० जून बुधवार रोजीं सायंकाळीं पांच वाजल्याचे सुमारें आकाशांत दोन सूर्य दिसूं लागले. त्या रोजीं थोडें थोडें अभ्र होतें, परंतु पांच वाजल्याचे सुमारास आकाश निरभ्र होऊन दोन सूर्य स्वच्छ दिसूं लागले. हा चमत्कार मी एकट्यानेंच पाहिला असें नाहीं, शेंकडों लोकांनीं पाहिला आहे. दोनही सूर्य एका कालींच मावळले. हा चमत्कार आणखी कोठें कोणीं पाहिला असेल, तर त्यांणीं कृपा करून वर्त्तमानपत्रद्वारा प्रसिद्ध करावें, म्हणजे असें होण्याचे कारणाविषयीं विद्वान् लोक विचार करतील."

दोन सूर्य दृष्टीस पडतात त्याचें कारण असें आहे कीं, सूर्याचे किरण पडून त्यांचें परावर्तन मेघांत होतें, आणि आरशाचे कवडशाप्रमाणें सूर्याचें प्रतिबिंब दिसतें या अशा सूर्याचे दर्शनास इंग्रेजींत पारेलिया, म्हणजे सूर्यप्रतिबिंब अथवा सूर्यानुकरण अशी संज्ञा आहे. असेच चमत्कार चंद्राचेही दर्शनांत येतात. पण हे चमत्कार सर्वत्र, सर्वदा पाहाण्यांत येतात असें नाहीं. शीत देशांत मात्र हे चमत्कार केव्हां केव्हां दिसण्यांत येतात. उष्ण देशांत क्वचित् दिसतात. सन १६१९ यांत फ्रान्स देशांत सात सूर्य दिसले होते. १७०२ सालीं विद्यायतेंस साहा सूर्य दिसले. जर्मनी देशांत चार सूर्य दिसले. उत्तर अमेरिकेंत किती एक दिवस पावेतों साहा सूर्य दिसत होते. सूर्यप्रतिबिंबांचे आकार निरनिराळे प्रकारचे होतात. कोठें कोठें व केव्हां केव्हां खरे सूर्यबिंबापेक्षां सूर्यप्रतिबिंब लहान किंवा मोठें दिसतें, कंकणाकृतिही दिसतें. हीं दर्शनें झाल्यानंतर पर्जन्यवृष्टि होते. दंव पडतें. असें प्रायः लोकांचे पाहाण्यांत आलेलें आहे.

---

**चीन,**— एथील ३ रे जूनचे डांक आली तिजवरून कळतें कीं, तेथील इंग्रेजी राज्यसंबंधी व्यवस्था असावी तशी नाहीं. चिनी बंडखोर कंतान बंदरास वेढा घालण्याकरितां तेथून चार मैलांवर जमा झाले आहेत. हांग शहर परत घेण्याविषयींची दहशत आहे. कंतानास परस्थांचीं डोकीं उडवील, त्यास इनामें मिळतील असे जाहिरनामे जाग जागीं लाविले आहेत. जरी या चिनी बंडखोरांस इंग्रेज हुसकून लावतील तरी तूर्त तेथें गोंधळ आहे. आइन.

---

**कराची,**— या बंदरीं कस्टम (जलमार्ग) खात्यांत सरकाराला मे महिन्यांत उत्पन्न १२१५६ रुपये झाले. याच महिन्यांत सालगुदस्तां ७५६ रुपये उपये उत्पन्न झाले होते.

---

**रेलवे,**— याचे कंपनीला जूनचे २७ वे तारखे पावेतों एका आठवड्यांत १८४७२ उतारूंपासून ११६३२।७।८२ आणि मालाचें भाडें ८६२६।६।६ एकूण २०२५८।१३।१० पैदास्त झाली. यावरून पाहातां गेल्या सालीं याच आठवड्यांत जी पैदास्त या आगीच्या गाडीपासून झाली तीपेक्षां सालमजकुरीं ६८५०।११।१ जाजती पैदास्त झाली.

---

**अमेरिका,**— एथील स्वतंत्र संस्थानांतील खबर गेल्या विलायतेच्या आगबोटींतून आलेली आहे कीं, त्या संस्थानाचा प्रेसिडेंट (मुख्य अध्यक्ष) याचे मर्जीवरून ५००००, लोक आरमारांकडे, वृत्तपत्रांत देऊन यासाठीं एक कोटी

डालर्स म्हणजे सुमारें दोन कोटी रुपये खर्चण्या करितां एक पार्ट तयार केली आहे. आणि ती सेनेटनामें सभेकडे गुजराविली आहे. ही नवी म तर्तूद करण्याचें कारण कीं, जर अगत्य पडेल, तर ग्रेटब्रिटन (विलायत) यांचे डावपेंचास अडथळा करण्यास अडचण पडूंनये. त्यांणीं विलायतेस एक वकील पाठविण्याचें ठरविलें आहे.

आव.

रशिया,— एथील लोक पूर्व दिशेस (एशियाखंडांत) सरसावूं लागले. असें आग्रा एथील मुफसिलैट नामें इंग्रेजी वर्तमान पत्रकर्त्याचे एका शाहाण्या बातमीदार मित्रानें लिहून पाठविलें आहे कीं, काबूलचे एका नेटिवास पत्र आलेलें माहिलें त्यावरून कळतें कीं, रशियन लोकांनीं कोकन हस्तगत केलें. व त्याची लुटालूट केली. सालगुदस्तांपेक्षां हे लोक आपल्या राज्याचे हद्दीपासून २६ मजलांचे जवळजवळ आले आहेत. याकरितां सरकारानें लक्ष देणें. मागें दाहावास वेळां कोकन रशियनांनीं घेतलें अशा वदंता उठल्या होत्या, परंतु तें मस्कोवियन लोकांनीं घेतलें असें आलिकडचें वर्तमान आहे.

आव.

पब्लिकवर्कसखातें,— या खात्यांतील गोरे नोकरांस विलायतेची रजा गैरहजीरीचे रजेबाबदचे ठरावाचीं कलमें आहेत, त्या अन्वयें रजा मिळत असे. त्यांबद्दल हाल्लीं नेकनामदार कोर्ट आफ्डिरेक्टर्स यांणीं कमी रजा करून दोन वर्षांची रजा देण्याचें ठरविलें आहे. आणि जाण्यायेण्याचा खर्च रजेच्या कारणावरून होईल तो ज्याचे त्याचे माथ्यावर आहे असा ठराव केला आहे. दोन वर्षांची रजा काय थोडी जाली?

मद्रास,— एथें विलायतेहून निघालेले ७३९ ६० वे रेजमेंटचे लोक १२ वे मिनहूस दाखल जाले.

मेजर जनरल सरह्यू रोझ साहेब यांची स्वारी कल्याणचे आगगाडींतून पुण्यास ता. २२ मिनहूस येऊन दाखल जाली, आणि दुसरे दिवशीं त्यांणीं पुण्याचे सैन्याचे कामाचा चार्ज घेतला. त्यास सलामीच्या तोफा जाल्या.

आव.

क्याप्टन कोशीअन यांस पुण्याहून मद्रास लोकर जाऊन माळवाडिविजनचे असिस्टंट आडज्युटंटचे कामास दाखल होण्याचा हुकूम जाला आहे.

टेलिग्राफपत्रांत एक बांधाहून पत्र आलेलें आहे. त्यांत असें आहे कीं, ४३ मद्रास काळेपायदळपलटणींतील कंपन्यांस (जनरल व्हिटलाक सध्या का [illegible] ल,) [illegible] तेथें १४० गाड्या, सोन्याच्या नाणी व कांहीं जवाहीर भरून जात होत्या त्या हस्तगत जाल्या. त्यांची किंमत नऊ कोट रुपयांची आ[illegible] असें पत्रांत बातमीदारानें लिहिलें आहे.

ग्वालेरी(?),— टेलिग्राफ आल्यावरून असें समजतें कीं, [illegible] राजानें सरकारास बंडाचे समयीं घोडे, [illegible] उदार, व तोफा शिवाय हरएक प्रकारची मदत केली, म्हणून सरकारानें त्यास दोन लक्ष रुपयांचे उत्पन्नाचा मुलुख दिला. शिवाय एक वाडा बक्षीस दिला. आणखी यास मरातबाचा अलकाब “ फिरजंदे दिलबंद रासिखुल एतकाद दौलते इंग्लिशिया राजा [illegible] ” अमीर अलउमरा माहाराज राजराजश्री माहाराज राज्यासना बहादूरसिंग बाहादूर या प्रमाणें किताब दिला.— असें [illegible] सिंदे राजास एक लक्ष तीस हजार रुपयांची जमीन दिली.

[illegible]

बतावरून ब्रिटिश लोक व ते लोक यांजमध्यें वैमनस्य आलें आहे. तें मोडून उभयतांचा सल्ला होईल असें दिसतें. हिंदुस्थानांत फौज रवाना करण्याचें काम चाललें आहे. रूमशामचें बेलग्रेड नामें मोठें मजबूद शाहर आहे. तेथें रूमशामचे सरकार व इंग्रेज यांचे मध्यें कांहीं कारणावरून तंटा पडून तेथें कौन्सल बसलें होतें. त्यांत रूमशामचे कडे कांहीं दोष नाहीं असें ठरलें. —स्पेन देशांत प्रधानमंडळींत कांहीं चलबिचल झाली आहे.—विलायतेस आगीच्या गाडीस दोन वेळा विघ्न होऊन चार पांच माणसें ठार जालीं. व पुष्कळांस बहुत इजा जाली आहे.— हिंदुस्थानचे दंग्यांत कर्नल डब्ल्यू जोन्स, ६१वीचा; सी. स्यूअर्ट १४वे लैट ड्रगूनचा; जे. जोन्स, ६०वीचा; आणि डी. रसल, ८९वे पलटणचा यांणीं चाकरी बजाविली सबब त्यांस १००० हजार रुपये पेनशन देण्याचें ठरलें आहे. अशी बातमी आहे कीं, रशियाचे पुष्कळ थोडे लोकांनीं भूमध्यसमुद्रांत आरमार घेऊन जावें असा हुकूम रशियाचे बादशाहानें फर्माविला आहे. हे लोक इटली देशाच्या पश्चिम तीरीं वेनिसचे आखातांत जातील असें वाटतें.— रूमशाम एथील वर्तमान आलें त्यावरून कळतें कीं, ग्राहोवो एथील चोरफरी लोक जर लवकर उगीच पूर्ववत् राहाणार नाहींत तर त्यांजवर मोहीम करावी असा रूमशामचे बादशाहाचा हुकूम जाला आहे. आणि याकरितां तयारी होत आहे. रूमशामचे जवळ क्यांडिया नामें बेट आहे तेथें दंगा उद्भवला होता त्याचें शांतवन होऊन ते बंडखोर लोक आपआपले घरीं गेले असें म्हणतात. विलायतेच्या दर्बीशायर नामें परगण्यांत महावृष्टि जाली. विजा पडल्या. येणेंकरून पुष्कळ घरें, पवनचक्क्या, व दुसरी मालमत्ता यांचें बहुत नुकसान जालें आहे.

हें ज्ञानप्रकाश छापखान्यांत कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांणीं छापिलें.

# ज्ञानप्रकाश

सोमवार तारिख २ आगस्ट सन्न १८५८ इसवी. ५


## पत्राची किंमत.

१२ सालाचे रुपये. ९॥ आगाऊ दिल्यास रुपये

## वसूल रु०

१० मेहेरबान लेंडन साहेब असिस्टंट कलेक्टर मि० रिव्हियुस.
१६।२ मेहेरबान हारिसन साहेब पुणे जज्ज.
१) दामोदर दिक्षित ऊर्फ बाबा करवे.
१० नारायणराव व्यंबक किवे निसबत पोलिस कमिशनर

## ज्ञानप्रकाश ता. २ आगस्ट सन्न १८५८.

**अपघात,**— नगर जिल्ह्यांतील असिस्टंट कलेकटर मिस्तर थेलवाल हे घोडनदीहून नगरास घोड्यावर येत होते तों त्यांस घोड्यानें टाकून दिलें. तेव्हां ते एका मोठ्या धोंड्यावर आपटले. त्यामुळें त्यांचे डोक्यास मोठी दुखापत होऊन ते मरण पावले. आव.

---

**अपमृत्यु,**— ता. २८ जुलै रोजीं येथील शनवार पेठेंत खबुतरखाना म्हणून मोठी मसिदजागा आहे. ती जागा सरकारांतून एथील रा. विठोबा बर्वे सोलापूरकर यांणीं खरेदी घेऊन तींत बाग करावी म्हणून त्यांणीं विहीर खणून बांधण्याचें काम चालविलें आहे. ता. मजकूर रोजीं सुमारें सायंकाळचे तीन वाजतां तेथचा मजूर ग्यानू सिंदे उमर वर्षे २५ हजामत करून डोकें धुण्याकरितां त्या विहिरींत उतरून डोकें धुतो आहे तों विहिरीचा एक भाग एकाएकीं कोसळला. त्या मलव्याखालीं तो मजूर दडपून मेला. शहर पुण्याचे फौजदार यांणीं सायंकाळपासून पंधराचीस मजूर त्या माणसास काढण्याकरितां लावले होते. परंतु त्याचा मुरदा पाहाटेच्या चार वाजतां सांपडला. याचें कारण, विहिरीचा भाग मोठा न कोसळला. त्याच दिवशीं सदाशिव पेठेंत पर्जन्यवृष्टीचे कारणानें एक घर कोसळलें. परंतु माणसें ईश्वर कृपेनें वांचलीं.

---

**यात्रा,**— पंढरपुरास सालाबादप्रमाणें येथून पालखी गेली होती ती परत खुशरूप येऊन पोंचली. यावरून समजतें कीं, पंढरपुरास या आषाढ मासांत महामारीचा उपद्रव फारसा नवता. व देवदर्शनाचा बंदोबस्त सरकारांनीं नीट ठेविल्यापेक्षां बडवे लोकांनीं आपले यात्रेकरू लोकांस सोइलोईनें नेऊन श्रीपांडुरंगाचें दर्शन करविलें हीं वर्तमानें ऐकून आम्हांस संतोष जाला आहे. सविस्तर मजकूर पंढरपूरचा बातमीदार आम्हांस लिहून कळवील असें आम्ही इच्छितो आहों.

ग्वालेर एथें जेव्हां बंड जालें त्यावेळेस तिजोरींतून बंडवाल्यांनीं ६८००००० लाख रुपये लुटले. व शिवाय जवाहीर नेलें.

---

**पुणे माजिस्त्रेट,**— नारायण पेठेंत रोडगे याचे घरीं रात्रीं दोन जण चोरटे भिंत फोडीत होते त्याजबद्दल मोकद्दमा सेशन कमिट जाला. यांतील एक कैदी डाक्तर कीथसाहेब गंजकडेस रामोशी पणाचे नोकरीस होता. म्हणजे मालमत्ता संभाळण्याचे कामावर होता त्याणेंच भिंत फोडण्याची गोष्ट केली हें मोठें आश्चर्य आहे.

---

**बहार,**— एथें सख्तता झाल्याचारिवें दिसतें. या प्रमाणेंच पाटणा व बगरा एथची स्थिति आहे. अल्लाहाबाद एथें तीन हजार बंडवाले अद्यापि असून त्यांत हजार बाराशें शिपाई हत्यारबंद आहेत. त्यांणीं जगदीशपुराचे जंगलांतेथल्या पासचा प्रांत व्यापला आहे. सरकारची फौज शिपायांची टोळी आरा एथें बहुतकरोड यांवर आहे. ब्रिगेडियर डुग्लास हा शत्रूंच्या सभोंवार डांकेच्या ठाण्याची हार करण्याच्या बेतांत आहे. या शत्रूंजवळ तोफा नाहींत. आणि ते भिकार शत्रु आहेत. रस्ते व हवा यांत फेरफार जाले कारणानें ते अगदीं जेर जाले आहेत.

---

**विजयापट्टण,**— एथील क्रानिकल पत्रांत सरकारी जाहिरात प्रकट जाली त्यांत हकील कीं, कंपनीसरकारचे पलटणींत (रिक्रूट) उमेदवार शिपायांची भरती कलकत्त्याकडे पाहिजे यास्तव मद्रास व विजयापट्टण एथील अंमलदारांस हुकूम फर्माविला आहे कीं, जो कोणी या भरतीस येईल त्या प्रत्येकास २५ रुपये इनाम दाखल मिळून त्यास पगार गोरे पलटणींतील शोल्जराप्रमाणें मिळेल. हा मजकूर बंबे टैम्स आधारें कळतो. इतके दूरवर शिपायास जाणें तर पगार त्या मानानें मोठाच असला पाहिजे. यांत संशय नाहीं.

---

**गमन,**— मिस्तर रिकेट्स पगारकमीशनर यांची स्वारी येथें फिरून सोलापुराकडे चालती जाली. एथें कांहीं सरकारी नोकरांच्या पगारांची व त्यांजकडे कामें कोणकोणतीं आहेत यांची चावपणी आसाहेबांनीं घेतली, अशीच चौकशी ते सोलापूर मुकामींही करतील असें वाटतें.

---

**आक्ट,**— सन १८५८ चा २४ वा आक्ट पसार जाला आहे तो सन १८५४ चा आक्ट १ या अन्वयें मयत करनाटकचा नबाबाचे कुटुंबावर किंवा त्याचे जिनगीवर किंवा मालमत्तेवर सदरहू आक्ट पसार जाल्यापासून ६ महिनेपावेतों दावा अगर जप्ती चालूं नये. असा ठराव सदरहू आक्टांत आहे.

---

धारवाड एथील इंजिनियरचे आफिसांत एक स्टोरकीपरचे जागेवर मनुष्य पाहिजे आहे. त्यास इंग्रेजी जलद लिहितां येऊन त्याचें इंग्रेजी अक्षर चांगलें पाहिजे. व त्याला जमाखर्चांत वाकबगारी चांगली पाहिजे. ही जागा ४० रुपयांची आहे. जे कोणी उमेदवार असतील त्यांणीं धारवाडचे एक्झिक्युटी इंजिनियर यांजकडे पोस्टपेड अर्ज पाठवावे.

---

**करवीर,**— ता० २७ जुलई. भूधरगड येथें पाऊस पडून लावणीचीं कामें चालली आहेत. एथील कमीशनर मेहरबान करनेल जेकब साहेब यांस ब्रिगेडियर जनरल नेमिल्याची बातमी मागें उठली होती ती हल्लीं खरी जाली आहे.

नं० सं०

---

लखनौंच्या बंडवाल्यांचा पराभव करण्यांत जे लोक होते, त्यांस पदकें देण्याविषयींची राणी सरकारानें मान्यता केली आहे.

---

**विलायत,**— विलायतेचे व्यापारीवरील बोर्ड (मंडळी) हिनें गेल्या मे महिन्याचा विलायतेहून माल परदेशीं किती गेला, त्याचा हिशोब आकारला आहे त्याची साल गुदस्तांच्या मे महिन्याच्या

हिशोबाची तुलना करून पाहतां साल मजकुरीं १११७५५६० रुपयांचा माल कमी गेला असें कळून येतें.

## फिरकोळ

**पोस्टमास्तरीण.**— विलायतेंतील होमन्यूजनामें वर्तमानपत्रांत असें आहे कीं, न्युयार्क एथील पोस्टआफिसांत एक स्त्री लखोटे देण्याकरितां नेमली आहे.— अमेरिकन एथील कागदांत असें आहे कीं, आगीचे गाडींतून उतारकरूंपैकीं एका जणानें असें मनांत आणिलें कीं, थोड्या पैशांत आपण कांहीं हिकमत करून दूर जाऊं. परंतु ज्या स्टेशनापर्यंत त्यानें पैसा दिला होता तेथपर्यंत तो गेल्यावर आगगाडीचे नोकरानें त्यास हटकलें, अरे अमुक प्यासेंजर (उतारकरू) हा एथें कां उतरला नाहीं, असें म्हणून त्याचा शोध करूं लागला तेव्हां इतर उतारकरूंयांस असा शक आला कीं, तो कदाचित् गाडीचा दरवाजा उघडल्यावर उडी टाकून मेला असेल. असी चिंता करूं लागले, आणि त्याचा शोध तो ज्या ठिकाणच्या खोलींत बसला होता तेथें ते करीत होते. तो एके मडमेच्या घागरावाली छपला होता. त्याचे बुटाचे पाय दिसले. तेव्हां नोकरी करणार म्हणतो, अरे हे चार पाय एकास कसे दिसतात! असें म्हणून शेवटीं त्यास बाहेर काढलें आणि एकदम सर्व लोक हसले.

**भावी पुणेंव्यांक (पेढी).**— एथें गेल्या शनवारीं सायंकाळीं श्री. रा. रा. विश्वासराव बल्लाळ ऊर्फ राजी साहेब नातू यांचे दिवाणखान्यांत सभा जाली, मागें आम्ही कल्याणास व पुण्यास यंत्रानें सूत व कापड काढण्याचा कारखाना चालविण्याचे कामांत मुख्य उद्योगी जे लोक आहेत व आहेत, म्हणून लिहिलें आहे. त्यांची सारी एथें आली आहे, त्यांणा हा सभा कांहीं कांहीं श्रीमान, व्यापारी, शाहाणे लोकांस बोलावून करविली. या सभेचा उद्देश हा होता कीं, पुण्यास एक मोठी व्यांक म्हणजे पेढी भागीनें काढावी. मुंबईस जशा मुंबई व्यांक, ओरिएंटल व्यांक, आग्रा व्यांक इत्यादि आहेत. व त्यांचीं भांडवलें कोट्यावधी रुपयांचीं आहेत. व त्या आज कितीएक वर्षें चांगल्या प्रकारें चालत आहेत. त्याप्रमाणेंच काढावी. तिचें भांडवल पंचवीस लक्षांचें करावें. आणि प्रत्येक भाग पांचवीं रुपयांचा करावा. या कामास मुंबईचे शेटसावकार व साहेब लोक खुषी होऊन ते आपल्या पाल्या पाळण्यास राजी आहेत. आम्हांस वाटतें कीं, या शहरांत अशा पेढ्या व कारखाने चालू केले असतां फायदा होईल. आणि ही पुणें व्यांक खास होते असें सरकारास कळलें असतां सरकारही आपला पूर्ण आश्रय देईल, असा आमचा तर्क धांवतो.

**दस्तुरजीचा मक्ता.**— पुणे जिल्ह्यांतील अवसरी पेठ्यांतील मनचरचे नजीक पेठेच्या घाटावरील दस्तुरीचा व हवेली तालुक्यांतील मौजे हडपसर एथील सोलापूर वाटेवेसाच्या रस्त्यावरील दस्तुरीचा मक्ता एक सालचा रा. पुरुषोत्तम रघुनाथ दाते यांणीं घेतला. प्रथमचा मक्ता १९४७ रुपयांस, व दुसरा १५०७० रुपयांस घेतला आहे. या मक्त्याचा तारीख १ माहे आगस्ट सन १८५९ इसवी पासून आरंभ जाला आहे. या मक्त्याचे दस्तुरी घेण्याचे दराचे बाबदी विषयीं सरकारी जाहिराती आमचे पत्रांत मागें प्रसिद्ध जाल्या आहेत.

र्वेम्याछिटपर्यंत आलाहाबाद (प्रयाग) चीखबर ता. १५ जुलै पावेतोंची आली आहे कीं बंडवाले रामपुरास जाऊन दाखल जाले. आणि तेथें कांहीं गोळागोळी जाली, परंतु त्याचा शेवट कळला नाहीं. जर त्यांचे हातीं रामपूर लागलेंच असलें तर त्यांस दारूगोळा आणि १२ तोफा मिळाल्या असाव्या.— ककुरा हें ठिकाण रामपुरापासून ७॥ साडेसात कोसांवर आहे. त्या ठिकाणीं एक ब्रिगेड रवाना जाली आहे. सररावर्ट हामिल्टन साहेब अशी बातमी कळवितात कीं, बांद्याचे नबाबाचा जातलग अबुज्यान व शाहाराबाद प्रांतांतील मसवारा येथील किल्लेदार अहमदुल्ला असे ता. १२ जुलैस पकडले आहेत.— आग्रा येथून ता. १५ वीची बातमी आली आहे कीं, क्याप्टन एडन भगरी ठिकाणाहून ता. १० जुलै पर्यंतची खबर अशी देतात कीं, बंडवाले लोकांनीं शंकप्रांतातील भूमगड येथें हल्ला चालविला होता, परंतु त्या बंडवाल्यांनीं हामसाहेब सैन्य घेऊन निघाल्याचें वर्तमान ऐकून, ते तो किल्ला सोडून देऊन ता. ९ जुलैस बुनीदा कडेस निघून गेले. आतां अशी कल्पना मनांत येते कीं, ते रामपुरास दुसरे दिवशीं गेले असावे. हामसाहेब यांचें सैन्य बुनेदा येथें ता. ११ रोजीं गेलें असावें. आणि त्याच तारिखेस जनरल राबर्टसन् मुख्य सैन्यासह टोंक येथें पोंचले असावे. जनरल राबर्टसन् कर्नल स्मिथचे सैन्याची तुकडी सिपरीहून लावडतोंव बोलाविली आहे. टोंकच्या नबाबाचें सैन्य बंडवाल्यांकडेस पुष्कळ गेलें. ज्यलपी येथें एक शिपाई पकडला आहे. तो असें सांगतो कीं, बंडवाल्यांतील मुख्य तात्या टोपे, बांद्याचा नबाब, रहीमअली खान, आणि बरेलीचा नबाब असे आहेत. बंडवाल्यांचे घोडेस्वार जे भरतपूरचे हद्दीकडेस गेले होते ते तेथून पळून **धून** येथें गेले. ही जागा **धवलपूर** आणि **करवली** यांचे दरम्यान आहे. **कोटा** एथील बंडवाले जे ग्वालेर प्रांतांतून जयपूर प्रांतांत **माधव** पुरास गेले होते ते परत ग्वालेर प्रांतांत **शारापूर** येथें गेले. आम्हास वाटतें कीं, शारापूर म्हणजे सोपवली ग्वालेरीपासून ८ आठ कोसांवर आहे ती असावी.

---

**पाटणा,**— एथील कमिशनराकडून खबर आली त्याहेंतींत असें आहे कीं, आरा एथें जसा प्रकार मागें होता तसाच हालींही आहे. बंडवाले हे मोठे धीट होत चालले आहेत. बंडवाल्यांनीं कोइलवार व कुबन्युज आऱ्यापासून ६ मैलांवर आहे तेथील कांहीं इमानी जमेदारांचीं घरें जाळलीं.

---

**बळारी,**— एथील खबर कळत आहे कीं, तेथें गोरा व काळी फौज जमा जाली आहे. व त्यांस कूच करण्याचा हुकूम तावडतोब जाला आहे. परंतु कोणते ठिकाणीं जाणार हें समजलें नाहीं. दक्षिण महाराष्ट्र देशांत सर्व शांतता आहे.

---

**हैदराबाद,**— एथील खबर आहे कीं, निजामाचे राज्यांत आरबांचें महत्व फार आहे. सुमारें दाहा, अगर अकरा हजार आरब लोक हत्यारबंद असतात. आणि ते जाहागीरदार, इनामदार त्या मुलखांत असून त्यांच्या सोबती पुष्कळ मुसलमानांशीं आहेत. इतकें महत्व असून ते लोक इंग्रेज सरकारचें वजन ओळखून स्वस्थ आहेत. सदरहू मजकूर बंबे टैम्स आधारें घेतला आहे.

---

**हवा,**— गेल्या आठवड्यांत शुक्रवार पर्यंत पर्जन्य पुष्कळ पडला. पावसाचे सरकारी रिपोर्ट व लोकांची खबर यांवरून कळतें कीं, हिंदुस्थानांत बहुतेक ठिकाणीं पर्जन्य पडून पिकापाण्याचे पेरे जाले आहेत.

# पुरवणी ज्ञानप्रकाश तारीख २ माहे आगष्ट सन १८५८ इसवी.

**जमखंडी.** — रामचंद्रराव आपासाहेब जमखंडी संस्थानचे मालक यांणी रैट हनराबल ज्यान लार्ड एल्फिनस्तन मुंबईचे गवरनरसाहेब यांस याद पाठविली ती टेलिग्राफपत्रांत छापिली आहे. सदरहु याद सरकारानें आंतील मजकूर खरा आहे, किंवा कसा हें समजण्यासाठीं कर्नेल. ली. ग्रांड्‌जेकब यांजकडे पाठविली आहे. असें वाटतें. आतां आपासाहेबांस सोडून देतील किंवा त्यांचा न्याय करतील हें लवकरच समजण्यांत येईल.

अर्जीतील मजकूर येणें प्रमाणें. मी सांप्रत बेळगांवच्या किल्यांत कैदी आहे. मला न्याय केल्याशिवाय कैदेंत घातलें; कायदा व न्याय यां विरुद्ध तीन महिने पर्यंत मला कैदेत ठेविलें आहे. मी इंग्रेज सरकारचा पूर्ण रक्षक असून लहानपणापासून सरकारचे कामदारांचा मित्र असून त्यांशीं दोस्ती ही ठेविली आहे. सांप्रतचा दुःखकारक दंग्यामुळें मजसां अधिक कोणासही दुःख झालें नाहीं.

नीचत्वानें आणि खोटेपणें माझ्या शत्रूनीं मजवर बंड केल्याचा जो आरोप ठेविला आहे, त्याप्रमाणें बंड नकरितां उलटें ब्रिटिश सरकारास माझ्या हातून कसा उपयोग होईल, याचा विचार करीत होतों. सभोंवारचे सरदारांतून कित्येक सरकाराशीं विश्वासानें वागत नाहीं. असा मला संशय आला आणि बेळगांव व धारवाड येथील स्थितीनें मला भय उत्पन्न झालें. सरकारचे सर्व शिपायांची सरकारास गरज लवकर लागून अशा समयीं आपला किल्ला आणि शहर याचा बंदोबस्त करणें कठीण पडून लुटारू लोक सहज लुटतील असें मला वाटलें.

त्यावेळीं मजजवळ हत्यारबंद शिपाई ४०० मात्र होते. किल्याचा तट कोसळा होता. तोफा नासून जाऊन, सर्व जागा गैरबंदोबस्ताची होती. याकरितां व अशा प्रसंगी दोनशें शिपाई अधिक ठेवणें, तटबंदी दुरुस्त करणें, व तटावर तोफा चढविणें, अशा कीं, तेणेंकरून माझी प्रजा, संपत्ति आणि मी निर्भय होईन. याविषयीं परवानगी देण्यासाठीं बेळगांवचे पोलिटिक्याल एजंट मिस्तर: सेटनकार साहेब यांस लिहिलें होतें. यावरून तर साहेबांचे मनांत मजविषयीं अगदीं संशय येणार नाहीं सदरहु तजवीज माझ्या आणि माझे प्रजेच्या साधारण बचावाची होती असें नाहीं. राज्याच्या बंदोबस्तासाठीं ती कारणें अवश्य च होतीं. कमी बंदोबस्तामुळें जमखंडी जर बंडवाल्यांनीं घेतली असती, तर ती पुनः आपल्या हस्तगत होण्यास पुष्कळ आणि काळ खर्च झाला असता.

मि॰ सेटनकार पोलिटिक्याल एजंट यांणीं आमचे म्हणणें एकदम कबूल केलें आणि त्यांजकडून लिहून आल्यावर तट दुरुस्त केला. तोफा चढविल्या, आणि २०० शिपाई व स्वार नवीन ठेऊन तयार केले. आणि ही सर्व तयारी झाल्यावर आपला बचाव होईल असें मला वाटलें. लोकांस भरवसा आला. आणि आपली प्रजा, आपलें राज्य याकरितां आणि स्वतां करितां आपलें कर्तव्यकर्म आपण केलें. असें मी मानलें. शहराचा बंदोबस्त राखण्याची तजवीज मी केली नसती, आणि कारण पडून माझा इलाज हरेपर्यंत किंवा इंग्रेज सरकाराकडून त्याचा बंदोबस्त होई पर्यंत, शहराचा बचाव मी केला नसता, तर हल्लीं मी दुःखकारक कैद जी भोगीत आहें, त्याहींपेक्षां अधिक दुःखकारक शिक्षा भोगण्यास मी योग्य होतों, असें मानलें असतें. आपल्या अन्यायाचा दुःखकारक गोष्टीविषयीं आंता लिहितों. माझ्या सारख्या स्थितींत असणाऱ्या मनुष्यांस शत्रू नाहींत असें थोडकेच मिळतील. दुर्दैवानें मला ही कांहीं शत्रू आहेत, त्यांणीं कौशल्यानें खोट्या खोट्या गोष्टी बेळगांव येथील

अधिकारी यांस समजाऊन माझ्याविषयीं त्यांच्या मनांत संशय उत्पन्न केला. व बंदोबस्त आणि अंधपणा यांविषयीं ज्या ज्या मी तजविजी योजिल्या. त्या सर्वांचा अर्थ उलट करून त्या सर्व तजविजी बंडासाठीं केल्या असें झालें. वाढविलेले शिपायांचाही तसाच अर्थ जाला. माझ्या दौलतीविषयीं लोक अतिशयोक्तीनें बोलूं लागले. आणि माझे कल्पित बंडाविशीं सर्व लोक बोलूं लागले. त्या सर्व बातम्या मिस्तर कारसाहेब यांच्या कानीं जाऊन त्यांणीं स्वतः जमखिंडीस जाऊन खरें खोटें पाहाण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें ते जमखिंडीस आले. व बारकाईनें चौकशी करून सर्व बातम्या खोट्या अशी त्यांची खात्री होऊन ते बेळगांवास परत गेले.

नंतर आपण स्वस्थ जालों असें मला वाटलें, परंतु या माझे आशेचा भंग होण्याचें माझे नशिबीं आलें, मिस्तर मानसन यांची नेमणुक पोलिटिकाल एजंटचे कामावर होतांच त्यांच्या मनांत मजविषयीं संशय आणून देण्याचे यत्नास माझ्या शत्रूंनीं संधी साधली. कारसाहेबाप्रमाणेंच यांणींही जमखिंडीस जाऊन आपली खात्री करून घेण्याचा निश्चय केला. व त्याप्रमाणें ते आले. परंतु माझ्या एका अतिद्वेष्ट्यांच्या सांगण्यावरून जीं जीं वाईट वर्तमानें चालत होतीं, तीं बंद करण्याकरितां किल्ला पाडावा आणि तोफखाना व दारूसामान बेळगांवास पाठवून द्यावें, असा हुकूम साहेबांनीं केला. कुरकुर केल्याशिवाय किंवा नाखुषी दाखविल्याशिवाय साहेबांचा हुकूम एकदम मान्य केला. मिस्तर मानसन साहेबांचे पत्राप्रमाणें व्यवस्था करून आमचे खजिन्याची किल्लीही त्यांचे हस्तगत केली. सरकारच्या आज्ञा मानण्याशिवाय माझा दुसरा विचार नव्हता. मी आनंदानें साहेबांची प्रत्येक आज्ञा मानून सर्व त्यांचे स्वाधीन केल्यावर त्याप्रमाणें बिनहरकत इतर सर्व हस्तगत केलें. त्याप्रमाणेंच मीही त्यांचे स्वाधीन जालों. नंतर किल्ल्यावरील कामदार किंवा लोक यांतून एकानेंही असंतोष अगर हरकत न करितां कर्नल मालकम यांणीं किल्ला आपले ताब्यांत घेतला. दक्षिण महाराष्ट्र स्वार पलटणचे १४ स्वारांनीं मला कैद करून बेळगांवास ता. २२ मार्च रोजीं आणलें. तेथें मला किल्ल्यांत ठेविलें. तेथें दुःखाचे तीन महिने मी काढिले. येथें मला वागवितात त्या रीति व कांहीं एक मिळत नाहीं, त्याचें दुःख, हीं संपूर्ण दुःखें मी निरपराधी आहें अशी माझी खात्री आहे म्हणून मला अधिक भासतात.

या प्रकारें पूर्वी कांहीं एक कळूं न देतां मला धरिलें, माझी माल मिळकत घेतली, किल्ला हस्तगत केला, आणि माझ्या सर्व प्रजेच्या समक्ष मला दुःख दिलें.

जर मला बंड करावयाचें असतें, तर किल्ल्याची दुरुस्ती करण्याविषयीं पोलिटिकाल एजंट साहेबांची परवानगी मागितली नसती. तें काम मी गुप्तपणें केलें असतें. जर दंगा करण्याचा माझा इरादा असता, तर मिस्तर सेटनकार यांस जमखिंडीचे बंदोबस्ताची कशी तजवीज ठेवली आहे, लोकांची मनें कशीं आहेत आणि मी प्रतिदिवशीं काय काय करतों या विषयींची बारीक चौकशी करूं दिली नसती. तसेंच मिस्तर मानसन साहेब यांस तोफा नेणें, किल्ल्याचा तट पाडणें, लोकांचीं हत्यारें घेणें, आणि खजिना स्वाधीन करून घेणें हीं करूं दिलीं नसतीं. जर मी दंगेखोर असतों, तर मी लढाई केली असती. किंवा पळून गेलों असतों. परंतु त्यांतून मीं कांहींच केलें नाहीं. मी निर्दोष आहें हें पक्के समजून आणि इंग्रजसरकारचे न्यायाचा भरंवसा ठेवून कांहीं एक कुरकुर न करितां सर्व

सर्व कांहीं हस्तगत केलें आणि साहेबांकडे त्याविषयीं गान्हाणें सांगितलें नसतें. परंतु कैदखान्यांत राहाण्यानें मला फारच दुःख होतें. आणि कैदेंत असल्यामुळें माझी शक्ति गेली नाहीं तोंपर्यंत आणि सर्व मानसिक शक्ति जा, कैदेंत राहल्यामुळें नष्ट होत असतात त्या मला आहेत तोंपर्यंत माझा न्याय करावा. यासाठींच सरकारास मी तसदी देत आहें.

मी मोठ्या नम्रपणें अशी विनंती करितों कीं, माझ्या प्रकरणांत ज्यांचा हात नाहीं. असे न्यायाधीश असावे. माझे द्वेषी आपल्या उद्योगांत दक्ष आहेत. आणि मनुष्यांचीं मनें अविचारानें मजविषयीं उघडलीं आहेत. जर घडूं शकेल तर फौजदारी कोर्टाचे जडज्यांनीं आणि साहेब लोकांचे कमेटीनें न्याय करावा, अशी माझी इच्छा आहे. आणि तसें होण्यास हरकत असेल तर मोठ्या उत्कंठेनें इच्छितों कीं, निष्पक्षपातानें आणि शुद्ध मनाचे अशा न्यायाधीशांकडून माझा न्याय व्हावा. माझ्या वर्तणुकेची चौकशी करून सत्यतेनें व निःपक्षपातानें माझा न्याय व्हावा अशी विनंति करितों मग तो कठीण जाला तर होऊ. मी मोठ्या नम्रतेनें आणखी अशी विनंति करितों कीं, माझा निरपराधीपणा स्थापित होऊन माझे शत्रु शोधून जावे अशी तजवीज करण्यास मला मदत करण्याची परवानगी द्यावी.

माझा न्याय करून तुरुंगाचे दरवाजे उघडून सन्मानपूर्वक माझ्या घरांत व कुटुंबांत मला घालवून, गेल्या मार्च महिन्यांत माझी माल मिळकत जुलुमानें हिरावून घेतली आहे, ती माझी मला परत मिळावी; या आशेनें माझें प्रकरण साहेबांचे हातांत देतों.

सरकारचे मोठमोठ्या कामदारांस माझे पूर्वींचे वर्तणुकेविषयीं चांगली माहिती आहे; माझी वर्तणूक आजपर्यंत निःकलंक आहे. बंड करण्याचा माझा मुळींच हेतु नव्हता. माझे हक्क आणि मोकळिक मी पूर्णपणें अनुभवीत होतों. यास्तव इंग्रेजसरकाराविरुद्ध बंड केल्यास मला प्राप्ति व्हावयाची नव्हती, परंतु तोटा मात्र व्हावयाचा. माझ्या निरपराधीपणाविषयीं सदरींचे सर्व हकीकतीचा विचार केला असतां दृष्टोत्पत्तीस येईल. अशी माझी पूर्ण आशा आहे.

ज. मि.

---

## ईश्वरी क्षोभाचा चमत्कार.

## ज्ञानप्रकाश कर्त्ते यांस.

विनंती विशेष. आपले नामाभिधानावरून अंधकारास नाशप्राप्त पावविणारे आपण समर्थ आहां. त्यास आमचा मित्र व कंपनी सरकाराचा खरा नोकर असा एक गृहस्थ नोकरी गेल्यामुळें अंधकारांत लोटला गेला. सबब त्याची हकीकत आपणास कळून आपले प्रकाशकीरण त्याजवर पडले असतां अंधकारांतून मुक्त होईल. यास्तव खालीं लिहितों तो मजकूर अमोलिक ज्ञानप्रकाशपत्रीं प्रसिद्ध व्हावा.

या गृहस्थाचें नांव बळवंतराव रघजी पेंडसे. म्हणजे आपले पुण्यग्रामचे माजी मामलेदार.

आतां याची तथ्य स्थिति व त्याजवर ईश्वरी क्षोभ कसा चमत्काराचा जाला तो कळवितों.

हे गृहस्थ नगर जिल्ह्यांत मोठे नामांकितांतील मामलेदार असून त्यांणीं या जिल्ह्यांत चार तालुक्यांत मामलेदारीचें काम केलें. त्यांत कमीपणा न होतां चारी तालुक्यांतील रयत व कामगार लोक त्यांजवर फार संतोषी होते.

आणखी यांची इमानपूर्वक वागणूक व सरकारकामांत दक्षता इतकी समजली पाहिजे.

वागणुकी निर्मळ नी परीटधुणीचे कपड्या प्रमाणें-स्वच्छपणानें वागण्याविषयीं याचा महत् कटाक्ष असून ती गोष्ट सर्वत्राचे मनांत ठसावी म्हणून त्यांही बोधपर बुकें हीं केलेलीं आहेत.— यांणी नगर जिल्ह्यांत आपलें काम संभाळून मामलत्याचे कामासंबंधी किती एक बुकें तयार केलेलीं आहेत, त्यास जाणें कधीं तालुक्याचें काम पाहिलें नाहीं त्याजपाशीं तीं बुकें असतील तर हुकुमाचे वगैरे माहितीस कोणाचीही जरूर नपडून बिनचूक आणि मुदतीचे मुदतीस सर्व कामें करण्यास मार्ग समजतो व त्याच्या नकला नगरचे कलेकटर साहेबांनीं प्रांत दक्षणचे रिविन्यु कमीशनर साहेब यांजकडे पाठविल्या असोन रत्नागिरिचे कलेकटर मेहरबान टरकांड साहेब यांणीं ही मागून नेल्या आहेत.— याचें काम फार हुशारीनें चालत असल्यामुळें साहेबलोकांनीं बहुतवेळ शिफारशी केलेल्या असून बक्षिसेंही दिलेली आहेत. व ते आपले कामकाजाचे जोरावर नगर जिल्ह्यांत फष्टक्लासचे पदवीस पोंचले होते.— पुणे जिल्ह्यांत हवेली तालुक्यात काम फार सबब तेथील कलेकटर साहेबांनीं त्या तालुक्याचे कामास या ग्रहस्तास हुषार मागून घेतले, व त्यामध्यें तशीं काम करण्याची शक्ती होती. सबब जरी नगरांत फायदा नव्हता तरी पुढील उपयोगावर दृष्टि देऊन कबूल होऊन आले.

असें होत्साती आलीकडे या ग्रहस्तावर ईश्वरी क्षोभाचा विलक्षण प्रकार कसा गुजरला तो पाहा.

१ घरीं प्रपंचाचें खटले संभाळण्यास एकटी कुलनी होती ती प्रथम गुदरली.

१ पुढें तिचेच सुतकांत १७५ रुपयांवरून १२५ रुपयांवर नेमणूक झाली.

१ या जाग्यावर आठ दिवस काम केलें नाहीं इतक्यांत नोकरीतून आजी रजा मिळाली.

१ नंतर घरीं जाऊन पंधरा दिवस झाले नाहींत तों तीर्थरूपांस एका एकीं पांच सहा रोज ज्वर येऊन ते मृत्यु पावले यामुळें त्यांजला पेनशान मिळत होतें तेंही बंद झालें.

याप्रमाणें दशा होऊन गेली, त्यास या ग्रहस्ताचे तीर्थरूप राघजी सदाशिव पेंडसे माजी सरदार नाशिक यांणीं आपला काळ आबूनें बहुत वर्षें सरकारचे नोकरींत दवडला असून खुद्द बळवंत यांचीही नोकरी महीन्याच अठरा वर्षें झाली त्यावरून कंपणी सरकारांत यांचे आब्रूस कधी ही धोका येणार नाहीं असें वाटत होतें आणि हे तर सर्व प्रसंग एकदम प्राप्त होऊन आतां त्याचे घरांत सरकारी प्राप्ती एक पैशाची देखील राहिली नाहीं. तेंव्हा हा ईश्वरी क्षोभाचा तडाखा कसा तो पाहा. हार हार सन्मार्गानें चालणारावर कशी हो इतकी निष्ठुरता होते.— ही गोष्ट ऐकल्यापासून जे वडे लोक या ग्रहस्तास जाणतात तेवढ्यांसही परम आश्चर्य वाटतें. त्यांस या पैकीं जी मनुष्य हानीची गोष्ट आहे ती ईश्वराधीन येणेंकरून त्याविषयीं इलाज नाहीं. परंतु नोकरी विरहीत केल्याचा जो प्रकार घडला तो केवळ अल्प कारणानीं असून ज्याचे ज्याचे मनांत ना लायकपणा आला असेल त्यांणीं पुनःश्च तपास करून या ग्रहस्ताची चाल चलणूक इतर ठिकाणीं कसे रीतीनें काम केलें आहे हें पाहिलें म्हणजे सर्व हारद ध्यानास येईल. व मग त्याचेच कृपा दृष्टीनें त्याजला पूर्व स्थिती प्राप्त होईल ही आम्हां पूर्ण आशा ठेवितों.— या ग्रहस्तास आपण ही जाणत असाल त्यास वास्तविक गोष्टीचे अभिमानास आपण मदत कराल यांत संशय नाहीं.— सदरहु प्रमाणें माहीत झालेला मजकूर कळविला आहे कळावें लोभ करावा हे विनंती. तारीख २८ जुलई संन १८५० इसवी.

तुमचा मित्र नगरवासी.

---

पुणे ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें.

## रावसाहेब नातू आणि कोर्ट नंबर ३ पुणें

श्री० रा० रा० नारो बल्लाळ ऊर्फ नानासाहेब नातू यांचा त्यांचे चपराशी जारी यास कर जोशी यांचे घराचे हद्दीम करणी कज्जा कोर्ट नंबर ३ एथें जारी आहे. त्या कज्ज्यांत वादी जोशी यांचे तर्फे गांवांतील मोठमोठे गृहस्थ साक्षीदार गेल्या गुरुवारीं कोर्ट मजकुरीं हजर जाले होते. त्यांत प्रतिवादी नातू यांचे उभयज्येष्ठबंधू होते. आम्हीही एक गरीब साक्षीदार या प्रसंगीं होतों. प्रथमतः श्रीमंत रा० रा० गणपतराव बल्लाळ ऊर्फ रावसाहेब नातू यांची साक्ष कोर्टांत जाली. त्यावेळीं नातू मजकूर यांस शिरस्त्याप्रमाणें कोर्टानें प्रतिज्ञा देते वेळीं उभें केलें नाहीं, असो कोर्टानीं त्यांची सर्व प्रकारें योग्यता ध्यानांत आणून त्यांस उभें केलें नसेल. पुढें साक्ष देते वेळीं नातू यांणीं जबाबांत बहुत दुरुस्ती केली, या कारणानें जबानींत खोडाखोडी होऊन शोध वर लिहावे लागले. जवानी पुरी जाल्यावर कोर्टानें साक्षीदार यांस शोधाचे आद्यंतीं स्वदस्तुर सही करण्याचा हुकूम केला असतां नातू मजकूर यांणीं एका शोधावर सही करून दुसरे शोधावर सही न करितां कोर्टाची बेअदबी होण्यासारिखें भाषण करून स्वारी स्वखुषी जाली.* असो जबानी देणार यांच्या स्वदस्तुरसह्या शोधांवर करण्याची वहिवाट सयुक्तिक आहे. नातू मजकूर यांस त्यांच्या जाहागिरी गांवाचे दिवाणी व फौजदारी इनसाफ करण्याचा अधिकार परीक्षा घेऊन दिला आहे. तेव्हां त्यांस कायदे व वहिवाटी सरकारच्या माहीत असतील. न असल्याच पाहिजेत. असें असतां थोर मनुष्यानें कोर्ट मजकूरची बेअदबी न करावी ती केली, यांचें व कोर्टाचे हुकुमास अमान्य करून बेअदबी केली असतां त्यांणीं या बेअदबी बद्दलचा कायदा अमलांत आणला नाहीं. याचें आम्हांस फार आश्चर्य वाटतें. आम्हांस आशा आहे कीं, दिवाणी वरिष्ठ अधिकारी याविषयीं अगर पुढें असें कोणी करूं नये. याविषयीं तरी आपलें लक्ष पुरवतील. नाहीं तर "गरिबकी जोरू सबकी भाबी; आणि जबर दस्तका पैदान्यारा." असें काय ह्याचें महत्व लोकांचे मनांत वसूं लागेल.

* त्या समयीं त्यांचे बरोबरीं आसपास रे लोक पबरुने आपजवीं म्हणून न जाहाण्याकरितां बरेच जमले होते.

---

**आल्हाहाबाद,**—एथील खबर १० वे जुलैची बंगाल हरकारू नामें पत्रांत लिहिली आहे कीं, तें शहर अधिक संकटांत पडत चाललें आहे. सुमारें बारा हजार बंडखोर तेथून नदीचे पैलतीरीं कडाक्रोशीनें राहिले आहेत. असें आहे तरी शत्रूंनीं तेथें तळ देऊं नये म्हणून त्यांवर फौज पाठविली आहे. टेलि.

**नागपूर,** ता० ७ जुलै,—एथील खबर टैम्स आधारें कळत आहे कीं, नागपुराचे आहेरी येथील राणीनें व्यंकटराव आरवेलीचा बंडखोर यास पकडलें आहे, परंतु ती इंग्रेज सरकारच्या हस्तगत करीत नाहीं. याचें कारण कीं, तिचे मनांतून त्याचे जिवाचें संरक्षण करावें असी कबुलत नंदाचे डिपुटी कमिशनर यांणीं केली असतां ती देणार.

**वृथापेक्षा,**—कलकत्याचे इंग्लिशम्यान पत्रावरून कळतें कीं, नानासाहेबांनीं बंड होण्याचे पूर्वीं एक पत्र लिहिलें तें सांपडलें आहे. त्यांत बंड होण्याचे कारणाविषयीं लिहिलें आहे कीं, सरकारानें त्यांच्या वडिलांचें दरसाहा पाऊणलक्ष रुपये पेनशन त्यांच्यामागें त्यांस देण्याचें बंद केलें. त्यास सदरहू पेनशन कैलासवासी श्रीमंत जाल्यापासून आजवर सव्याज सरकाराकडून घेऊं किंवा देहांत करूं. श्रीमंत कैलासवासी बाजीरावसाहेब पेशवे यांस नानासाहेब औरसपुत्र नाहींत आणि श्रीमंतांस हयात पेनशन पाऊणलक्ष दरसाहा होतें. आव०

ज्युडा— एथील ख्रिस्तीलोकांची कत्तल तेथच्या आरबलोकांनीं जूनचे १०वे तारिखेस केली त्याविशीं कच्ची हकीकत मुंबईचे जामेजमशेद नामें गुजराथी वर्तमानपत्र कर्त्यांचे एडन एथील बातमीदारानें पाठविली तिचा तर्जुमा बंबेग्याझिटकर्त्यानें करून छापिली आहे त्यावरून पाहतां केवळ सामान्य कारणानें केली हें आमच्या वाचणारांचे लक्षांत यावया करितां सांप्रत उतरून घेतों.

"ज्युडा एथें इंग्रेजी कोन्सल, फ्रेंचकोन्सल, व त्याची मडम, एक ग्रीक व्यापारी, एक जर्मन व्यापारी, आणि १५ दुसरे ख्रिस्ती यांचा वध तेथचे आरबांनीं केला. बाकीचे १५ ख्रिस्ती दैव बलवत्तर म्हणून या सपाट्यातून वाचले ते सेक्लोप्स नामें आगबोटींत बसून सुएझ शहरीं गेले ही गोष्ट मागें एथच्या इंग्रेजी कोन्सलजनरालच्या एका तुर्की शिपायानें छळकरून जखमी केला होता. त्याप्रमाणें झाली असावी असें वाटतें. फ्रेंचलोक खाली आरबी आखातांत येण्याची वाट कशी केव्हां येते याची मार्गप्रतिक्षा करित होतो तर आतां हा एक समयच त्यांस झाला आहे, आणि या दंग्याचा परिणाम पाहतां एक नवा युद्धसंग्राम होईल. ही सदरील गोष्ट घडण्याचीं कारणेंहीं आहेत. कलकत्याचा जवाहीर नांवाचा धनाढ्य व्यापारी, ज्यांची खासगीचीं पुष्कळ जाहाजें आहेत तो थोड्याच दिवसांपूर्वीं मरण पावला. त्याची मोठी दौलत आहे. त्याचा मुलगा लहान कायद्यांत आलेला नाहीं. याकरितां मयतानें आपला सर्व व्यापाराचा कामकारभार एका गोलेम नामे आरबाचे हवाली केला. आणि त्याजशीं ठराव केला कीं, सदरहू मुलगा कायद्यांत येईपर्यंत त्याणें व्यवस्था बघावी, आणि उत्पन्न जें होईल त्याचें निमें गोलेम यांणें घ्यावें. गोलम हा ज्युडा एथें जाऊन त्याणें तेथें आपल्या गलबतास इंग्रेजी निशाण उभारावें तें नकारतां तुर्कीचें निशाण उभारण्यास त्याणें हुकूम केला. पुढें मुलगा कायद्यांत आल्यावर त्याणें या आपल्या गुमास्त्यास माझे बापाचे काय गुजराणीं आहे. व पेढीचा हिशोब पाठवावा म्हणून बहुतपत्रें पाठविलीं. परंतु त्याणें एकही जबाब केला नाहीं, तेव्हां तो मुलगा ज्युडा येथें जाऊन त्यास विचारूं लागला. तो गुमास्ता दांडगाईस येऊन त्याचें बापाचें काय होतें तें देईना व हिशोबही दाखविना, आणि तुझें कांहीं एक नाहीं जें आहे तें सर्व माझेंच आहे असें बोलूं लागला असा निरुपाय तो मुलगा झाला म्हणून त्याणें तेथचे ब्रिटिश कोन्सलाकडे फिर्याद केली. तेव्हां शिरस्त्याप्रमाणें जाब देण्याकरितां त्या अधिकाऱ्यानें गोलेमास समान केलें. तेव्हां गोलेमानें इंग्रेजलोकांशीं माझा कांहीं संबंध नाहीं असें म्हणून हाजर होऊन जाब देण्याचें नाकारिलें. पुढें त्या कोन्सलानें गोलेमास हाजर होऊन जाब देण्याविशीं जे उपाय शिरस्त्यान्वये करावयाचे तितके तितके केले. परंतु कांहींएक चालले नाहीं. जेव्हां धणी सरकारची सेक्लोप्स नामें आगबोट तेथें आली, तेव्हां तो कोन्सल, त्या आगबोटीचा कम्यांडर, आणि दोघे संभावीत व्यापारी यांची एक कमेटीकरून तिच्यापुढें गोलेमानें येऊन हाजर व्हावें म्हणून समानत्यास केलें. आणि त्यांत असें दर्शविलें कीं, तूं इंग्रजांचे रयतेपैकीं, एक रयत आहेस याकरितां तूं या कमेटीचा अधिकार मानून. तिचे या कज्याप्रकरणीं जो ठराव करील तो तूं कबूल केला पाहिजे. असें असतां त्या गोलेमानें हालकटपणानें हेच उत्तर केलें कीं, इंग्रेजांशीं माझा कांहीं संबंध नाहीं. अशीं तीनवेळा समन्सेंकरून त्यास कळविलें कीं, जर तूं हुकमास अमान्य करशील, तर तुला

याची शिक्षा मिळेल. तरी त्यानें कांहीं जुमानलें नाहीं. त्यावर त्यास धरून कैद केलें आणि त्याचे गलबतावरील तुर्की निशाण काढून इंग्रेजी निशाण उभारविलें. त्याबद्दल त्या आरबांचे जातभाईमध्यें गवगवा उठला. नंतर सुमारे दोन तीन शें आरब बंदुका घेऊन त्यांणी रेसिडेन्सी (छावणी) वर हल्ला करून तो इंग्रेजी कौन्सल ठार मारून त्या गलैमास कैदेंतून सोडविलें. नंतर ते दीन दीन! म्हणत गोरे लोकांच्या महल्लयांत शिरून त्यांणीं फ्रेंच कौन्सल, त्याची मडम आणि दुसरे १५ ख्रिस्ती यांस ठार मारलें. तेथचा पादशाहा त्या प्रसंगीं जुदाशहरांत नव्हता, तो दुसरे रोजीं आल्यानंतर त्यानें हें कसें काय प्रकरण जालें, तें समजून घेण्याकरितां सैक्लोप्स नामें आगबोटीवरील कमांडर यांस बोलावणें केलें. परंतु त्यानें बादशाहाचे बोलाविण्याकडे लक्ष न देतां तो तावडतोब राहिलेले १५ ख्रिस्ती यांस आगबोटीवर घेऊन चालता जाला."

जुदा एथून अशी खबर आलेली जामेजमशीद कर्ता लिहितो कीं, जुदाचे पादशाहानें त्या मारलेल्या गोरे लोकांचीं प्रेतें सन्मानानें पुरण्याविषयीं हुकूम केला आहे."

बंबेग्याझिट कर्त्यानें लिहिलें आहे कीं, एक जर्मन व त्याची मडम आणि सिद्दी गुलाम मुलें २४ यां सहवर्तमान सकसेस नामाचे आगबोटींत कुवत जुदाहून एडन एथें आलीं नंतर तें दंपत्य विलायतची डांक घेऊन जी आगबोट आली तींत स्वस्वरूप येऊन पोंचलें. या दंपत्यानें त्या आरबांनीं सर्वस्व लुटलें. ही कत्तल जाली त्याबद्दलचे सरकारी कागदपत्र तेथून रवाना मुंबईकडे जाले. परंतु आलिबागेपाशीं जें विलायतेहून दारू भरलेलें जहाज आलें होतें तें थोड्या दिवसांपूर्वीं बुडालें त्यांतच गेले असें वाटतें.

मुंबईस ही दुःखकारक खबर पोंचल्यावर मुंबईहून गेल्या महिन्याचे २४वे तारिखेस सरकारानें कांहीं गोरे शिपाई व मोठमोठाल्या तोफा आसाम नामें आग बोटींत चढवून रवानगी केली आहे.

जुदा हें बंदर आरबी आरवाताचे वर आहे. आणि तें मक्केपासून पश्चिमेस ४० कोशांवर आहे.

---

आम्हांस नळदुर्गाहून पत्र ता· २७ जुलेचें आलें त्यावरून कळतें कीं, अक्कलकोट तालुक्यांतील गणेदार याणें लांच घेतल्याची शाबिदी होऊन त्यास दोन वर्षे सक्त मजूरीची शिक्षा मिळाली आणि त्याजाग्यावर भीमराव गणेदार यांस नेमिलें. भीमरावचे गणेदारीची जागा भरावयाची आहे.—मेहेरबान क्यापटन टेलर साहेब यांस करा पुराव सेटल्मेंट आफिशीयेटिंग कमिशनर नेमून नळदुर्गास, लेफ्टेनंट क्याडल यांस नेमिलें आहे.

एथें पाऊस पडून शेतांचें काम चांगले प्रकारें चाललें आहे.

---

आम्हांस एका खाशगी पत्रावरून समजलें आहे कीं, नगर एथील खजीनदार यांणीं आपल्या नौकरीचें पेनशन घेतलें. त्या जाग्यावर तेथील कलेक्टरीचे चिटणीस रा·रा· केशवराव उत्तम यांस खजीनदार नेमून रा·रा· विनायक गोविंद दुय्यम कारकून यांस चिटणिशीचे जाग्यावर नेमलें आहे.

---

"माहाबळेश्वर ता· २८—एथें पाऊस आज दोन महिने सतत लागला आहे. फार काय सांगावें. लोक अपले घरीं शेगड्या पेटवून बसून राहिले आहेत. बाहेर पडण्याची बिलकुल सोय नाहीं."

## नेमणुका.

धारवाड, हुबळीचे मामलेदार अज्जम स्वामीराव रामाजी व उंबळचे मामलेदार अज्जम कृष्णराव जयराम हे उभयतां दुसरे मतीचे यांचा परस्परांत वर्ग केला.

**अहमदनगर,—** आपाजी रावजी ध्याम- तीचे मामलेदार यांस शेवगांव एथें मुक्रर केलें.

मिस्तर सी· एम्· हारिसन आक्टिंग जज्ज पुणें यांणीं अदालतीचे कामाचा चार्ज मिस्तर स्वईट यास ता· १५ जुलेस दिला.— ठाणेजिल्ह्यांतील २ असिस्टंट कलेक्टर मिस्तर हंटर यांस फटके व तपासणी खेरीज सर्व माजिस्त्रेटचा अधिकार दिला.— नेकनामदार गवरनर इन्कौन्सलानें मे हेरवानी करून बेळगांव जिल्ह्यांत लेफ्टनंट ज्यरझेन यांस पोलिसाचे असिस्टंट सपरिंटेंडेंट नेमिले.

खालीं लिहिलेले साहेब लोकांस कलेक्टर आणि माजिस्त्रेट यांचे प्रांतांतील असिस्टंट नेमिले आहेत, त्याचा तपशील.

मिस्तर ये· एच् ग्रे———————खेडा
मिस्तर आर· बी· वाथिंगटन }
मिस्तर ए· ए· ब्यरवाईस. } ——————नगर
मिस्तर ए· के· नेरनी——————खानदेश

खालीं लिहिलेले साहेब लोकांस भाषेचा अभ्यास करण्याकरितां नेमिले आहे.

### मराठी भाषा.

मिस्तर सी· डब्ल्यू· बेल.———————ठाणें
मिस्तर सी· ए· मिउलन.——————मुंबई.

### हिंदुस्थानी भाषा.

मिस्तर एन्· एम्· डब्ल्यू· अमील. }
मिस्तर एच्· केपलानूर.——— } ———पुणें
मिस्तर डब्ल्यू· आर· फरक्युसन. }
मिस्तर आर· एस· स्मिथ.——— } ———नगर
मिस्तर जे· हंटर————————मुंबई.

मिस्तर ए· आर· स्मै यास प्रयाग येथें घरगुती कामास जाण्याकरितां ६ महिन्यांची रजा मिळाली आहे.— मिस्तर ए· आर· ग्रांट, खेस खानदेश जिल्ह्यांत कलेक्टर आणि माजिस्त्रेटचा फस्ट असिस्टंट नेमिलें आहे.— मि· सी· जी· केवाल, यास मिस्तर हेवन गैरहजीर आहे तों पर्यंत अगर दुसरा हुकूम येई पर्यंत पुणे जिल्ह्याचे फस्ट असिस्टंट कलेक्टर आणि माजिस्त्रेट नेमिलें आहे.— मिस्तर एच्· बी· सेंट ज्यान, टेकर, यांणीं अक्टिंग डप्टी असिस्टंट, आडजुटेंट जनरलचे कामाचा चार्ज ता· २७ जुलेस घेतला.— मिस्तर विनायक रावजी याकदेव यांस मिलटरी एक्झामिनेशन (मराठी) चे सेक्रेटरी नेमिलें आहे.

---

आमच्या समजण्यांत असें आलें आहे कीं, नेकनामदार लार्ड एल्फिन्स्टन साहेब मुंबईचे गवरनर यांची स्वारी हल्लीं दापोडीस आहे. ते एक नामांकित नेटिव लोकांकरितां चालत्या महिन्यांत दरबार करून भरवणार आहेत.

---

**लष्करी खातें,—** ७ वे काळे पायदळचा कप्तान जे· थाकर यास कमिसरीकडे ओवरसीअर नेमिलें.— ११ वे काळे पायदळचा लेफ्टनंट ए· फेल्पस् यांस जालन्याचे फिल्ड फोर्स वरील सब असिस्टंट कमिसरी जनरल नेमिलें.— २४ वे काळे पायदळचा ब्रिवेट मेजर जे· रे, डिपुटी क्वार्टर मास्तर जनरालचे कामावर रुजू जाला.— लक्ष्मण कराडी गांडेळ यास शिपंगचे हुद्यावर चढविला आहे.

---

हें पत्र ज्ञानप्रकाश छापखान्यांत कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांणीं छा· प्र· केलें

# ज्ञानप्रकाश

गुरुवार तारिख ५ आगष्ट सन्न १८५८ इसवी.


## जाहिरात.

देण्यांत येतेजे, सखाराम बिन रयोजी शिरके पानसरे कसबे कर्पे, यांस कळावें कीं, तुम्ही व मी आणि मोराजी बिन विठोजी पाटम पानसरे या त्रिवर्गांचा जमीनीवरील हकदारीचा पैसा घेऊन शिरके व पाटम या उभयतांचे वाटणीचा तंटा पडला सबब तो राजश्री रावजी महिपत ओतुरकर शहर पुणें पेठ बुधवार यांपाशीं अमानत ठेवला. पुढें या पैसा मजकूर हा आपल्या हिशाचा बहुतेक ऐवज घेऊन गेला. आसने शिरके याचा हिशाची कांहीं उचल होऊन शेंसवाशें रुपये बाकी राहिली आहे. ती सखाराम मागूं लागला तेव्हां रावजी महिपतांनीं तुम्ही मालक त्रिवर्ग येऊन आपला हिशोब पाहून पावती एकंदर देऊन पैसा नियेल तो घेऊन जावा, असें सांगितलें. परंतु सखाराम मला एकट्यालाच द्या म्हणूं लागला. तें न ऐकलें सबब त्यानें कपटानें २२ जुलै सन्न मजकुरीं बापतीनें त्यास सखारामाच्या हिशाचा ऐवज मुळीं राहिला नाहीं. माझे हिशाचा ऐवज आहे त्यास तुला पैसा व व्याज बिलकुल मिळावयाचें नाहीं. रावजी महिपत याचे अब्रूस खोडसाळपणा आणायाकरितां व माझ्या पैशाचा अभिलाष करायाकरितां तूं कपट केलें आहेस कळावें ता० २ आगस्त सन १८५८

सही विठोजी बिन नानाजी शिरके पानसरे

निशाणी काठी हातची.

## जाहिरात.

येत्या शनवारीं म्हणजे ता० ७ आगस्ट रोजीं रात्रौ आम्ही आपल्या नाट्यगृहांत सरस व मनोरंजक मराठी जन्म व रां बृताकर वधू म्हणजे या खेळाचे दोन्ही भाग करूं. या प्रसंगीं लोकांस आम्ही विनंती करितों कीं, त्यांणीं अवश्य यावें खेळ चांगल्या प्रकारें केला जाईल. नेहमीप्रमाणें आम्हांस आश्रय दिल्हा असतां आम्हीं त्यांचे फार आभारी होऊं. व या खेळांत पुरुष मंडळी अंगरखी बसविण्याची बंदी आहे. सही गोविंद भट गोरवले नि० ना०

## ज्ञानप्रकाश. ता० ५ आगस्त सन्न १८५८

**ग्रामण्य,**—एथील मुख्य वैदिक ब्राम्हणांतील वेदमूर्ति बाबाजोशी मेणवलीकर व भाऊकाणे यांस ग्रामण्य ओढीन कांहीं लोक जमून त्यांणीं सदरहू गृहस्थांस अमुक्याचे घरीं हे जेवावयास गेलां सबब बहिष्कृत आहेत असें शिष्या मार्फत डांडोरा दिला. या प्रकरणाची चौकशी एका घरीं रात्रीं मंडळी जमा होऊन त्या उभयतांकडेस अपराध नाहीं, असा ठराव जाला. असो हा बहिष्कार सांगून पाठविला तोच गेरशिस्तपणाचा यास आधार त्यांणीं कांहीं गुप्त नेम केले आहेत. त्यांत एक असा आहे कीं, निमंत्रण जमल्या खेरीज हर एकाचा ब्राम्हण ज्ञातीतील अभ्यंकरणें जाल्यास करूं नये. असें असतां हालीं ज्या प्रकरणांत एक चतुर्थांश देखील नसतील असें म्हटल्यास चालेल. असो दुसरा मजकूर असा आहे कीं, सदरहू प्रकरणीं ज्या वेळीं विचार चालला होता तेव्हां एका वैदिक ब्राम्हणानें एका पोक्त आणि सभ्य गृहस्थास व दोन तरुण गृहस्थांस जें भाषण केलें तें आमच्या कानावर आलें आहे. हें खरेंच असलें तर त्या मंडळीनीं कांहीं तरी खोल विचार गंभीरपणाचा केला असेल असें वाटतें याप्रमाणें मजकूर आहे. पुढें हेंच ग्रामण्य होपेणास डोकावूं पाहात आहेत.

आलाहाबादकडील बातमी गेल्या आठवड्यांत आली आहे, तिजवरून असें समजण्यांत येतें आहे कीं, उखनूरची बेगम इणें सुमारें ४० हजार लोकांनिशीं आलाहाबादेवर हल्ला करण्याचें भय घातलें आहे. अशी गेल्या महिन्याच्या २० वे तारखेस आग्र्यास बातमी उठली होती. ही बेगम आलाहाबादेवर चाल करून येणार, अशी बातमी आल्यामुळें, फत्तेगड, आग्रा वगैरे ठिकाणांहून पुष्कळ लष्करी लोकांस तेथें येण्याविषयीं हुकूम जाल्याची बातमी आली आहे. आलाहाबाद एथील प्रख्यात मौलवी लियाकत अली हा पुनः सराऊन एथें येऊन आपल्या छावणीभोंवतीं खंदक वगैरे खणून तें ठिकाण मजबूद करून राहिला आहे. या मौलवीजवळ बारा हजार लोक आहेत. (नेटिव लोक तर त्याजपाशीं २० हजार फौज आहे, असें म्हणतात.) व त्याची छावणी व आलाहाबाद यांच्या मध्यें अगदीं उथळ असा एक पाण्याचा प्रवाह मात्र आहे. असें असतांही तो, ज्या आलाहाबादेमध्यें हिंदुस्थानचा गवरनर जनरल लार्ड क्यानिंग आणि कमांडर इन चीफ सर कालिन क्यांबेल या दोघांच्या स्वाऱ्या आहेत त्या आलाहाबादेपासून इतक्या थोड्या अंतरावर मोठ्या डौलानें कांहीं एक भीति न धरितां आपला तळ देऊन बसला आहे. आलाहाबादपासून थोड्याच कोसांच्या आंतल्या प्रदेशामध्यें अझून सुमारें तीन चारशें किल्ले बंडवाल्यांच्या हातीं आहेत असें म्हणतात. या किल्ल्यांपैकीं कांहीं किल्ल्यांचा विध्वंस करण्याकरितां आलाहाबादेहून इंग्रेजांची एक फौज गेली होती, तिनें सराऊन आंबेजारीं एका किल्ल्यांत सुमारें सातशें बंडवाले आपणाभोंवतीं खंदक करून घेऊन राहिले होते त्यांवरून हल्ला करून त्या किल्ल्याचा विध्वंस केला. या प्रसंगीं लाहोर लैट हार्सचा आडजुटंट लेफ्टेनंट ग्राहाम यास एक बरीच मोठी जखम लागली. व इंग्रेजांचे आणखी कांहीं थोडेसे लोक जखमी जाले. परंतु त्यांणीं त्या किल्ल्यांतील सातशें बंडवाल्यांपैकीं एकसेरीज करून दुसऱ्या कोणास ही तेथून जिवंत पळून न जाऊं देतां तेथच्या तेथेंच सर्वांस ठार मारून टाकलें. असें गेल्या महिन्याच्या १९ वे तारिखेच्या दिल्ली ग्याझेट पत्राच्या एक्स्त्र्यावरून समजण्यांत येतें आहे.

या इलाख्यांतून जें लष्कर वर बंगाल्यांत बंड मोडण्याच्या कामीं मदत करण्याकरितां गेलें आहे. त्याजवरील जनरल सरह्यूरोझ हा गेल्या महिन्याच्या २२ व्या तारिखेस परत आला व त्यानें पुनाडिविझनच्या क्म्यांडरचें काम घेतलें. जनरल सरह्यूरोझ हा ग्वालेरीहून इकडेस येत असतां मार्गांत गुण्यास कांहीं चोरांनीं मध्यरात्रीच्या सुमारास येऊन सरह्यूरोझाच्या त्याजला सुलतानानें बक्षीस दिलेली एक व दुसऱ्या दोन अशा तरवारी व त्याचे सर्व चांद वगैरे चोरून नेली. यामुळें आतां सरह्यूरोझ याजला या महिन्याच्या ३ रे तारखेस एथें भायखळ्याक्लबमध्यें जी मेजवानी होणार आहे त्यावेळेस आपले चांद वगैरे यांशिवाय नुसतेंच बसावें लागेल. सरह्यूरोज यास त्याच्या तलवारी वगैरे नेणाऱ्या चोरांनीं त्याच्या स्टाफवरील आफिसर याचें ही सामान सर्व चोरून नेलें.

---

धू. के.

इंग्रेजी पत्रावरून असें समजतें कीं, पंजाबचे कमिशानेर जनरल सरजान लारेन्स साहेब हे विलायतेस आजारीपणाचे कारणानें जाणार आहेत आणि त्यांचे जाग्यावर मेहेरबान केयर साहेब सिंदचे कमिशानर यांची नेमणूक होणार आहे

मोफ्युसिलीट पत्रावरून गेल्या बुधवारच्या टेलि ग्राफपत्रांत असें लिहिलें आहे कीं जुलईच्या २० व्या तारखेस आग्र्यामध्यें अशी वदंता उठली होती कीं लखनूर येथील बेगमच्या हाताखालील ४०००० बंडवाल्यांनीं अलहाबादेवर घेरा केला होता.

त्याचपत्रावरून असें कळून येतें कीं दोस्ताचा गुलाम हैदर मेल्याची बातमी आली आहे. मौलवी हा काबुल येथें धर्मसंबंधीलढाईचीं भाषणें बोलत असे. बुखारा येथून एक वकील काबुलास आला आहे. व काश्मिराहून ही दुसरा एक आला आहे.

समशेरबाहादूरपत्रावरून कळून येतें कीं पुढीलवर्षी सिंधुनदीवर ओरिएन्टल स्टीमन्याविगेशन कंपनी आपल्या आगबोटी लोकांस जाण्या येण्याकरितां ठेवणार आहे.

कापुस पिंजुन वस्त्रें करण्याचें यंत्र.— या कारखान्यामध्यें एक पारशी सुताराचा एक सुमारें १४ वर्षांचे वयाचा मुलगा काम करीत असतां एकाएकीं पाय चुकून वाफेच्या यंत्रावर पडला तो तावडतोब अगदीं बेशुद्ध झाला आणि कांहीं वेळानें मेला.

**रजपुताना.**— १९ वे तारिखेच्या दिल्ली ग्याझेट पत्राच्या एकस्थानरून कळून येतें कीं तारिख १२ वी रोजीं बंडवाले चंबलनाचें ठिकाणावर हल्लाकरण्याकरितां चालले होते. त्यांचा पाठलागकरण्याकरितां करनलहोमची फौज माद्पुरा येथें येऊन पोंचली होती. बंडवाल्यांपैकीं सुमारें ११ असामी १६ नी. एकसरदार. आणि ९ स्वार इतक्यांस जुलरच्या [illegible]गानें पकडून कैदकरून टोंक येथीलजनरलच्या छावणीमध्यें १९ वे तारिखेस पकडून आणले होते. हल्लीं जयपुर येथें स्वस्थ आहे. सदरीं लिहिलेल्या ठाकुरानें बंडवाल्यांपासून जिंकून ४००० रुपयांच्या मोहोरा आणल्या होत्या त्या सरदारकेद केला. त्यास हल्लीचा अहीमोद् उल्लाखान असें म्हणतात. रा. डी.

**बडतर्फ शिपाई.**— अलहाबादेचे कमीशनरास सरकारानें हुकूम फर्माविला आहे कीं, ज्या शिपायांस सरकारांतून बडतर्फी मिळून ते घरोघरजातील तेव्हां त्या गांवचे राहाणारे असतील तेथच्या सरकारी कारभाऱ्यानें आपले जवळचे पोलिस अमलदारांस दरआठवड्यास ते गांवीं हजर असून त्यांची वर्तणूक बरी आहे कींवा कसें याबाबद रिपोर्ट करीत असावा. आणि ते गांवचे आमलदार त्या लोकांविषीं जबाबदार आहेत असें समजावें. हा बंदोबस्त जितका चांगला आहे तितका त्याचे कामीं अंमलदार आपले इकडल्या सारिखे ढंगोरे असतील त्यास जारी देवण्यास कठीण आहे.

**निमच.**— येथून २१ वे तारखेचें असें वर्तमान आलें आहे कीं निमचपासून ४० मैलांच्या अंतरावर बंडवाल्यांची सुमारें ३००० फौज येऊन पोंचली आहे. याच्या पारिपत्याकरितां निमच येथून गणीच्या ७२ वे हैलंडरस् पलटणीचे २०० लोक आठविनस् आपारीच्या चार तोफा दुसरे लेटस्याबटरीची एक तुकडी आणि रायल एनजिनीरची एक येथी अशी फौज जाणार होती व सुमारें १०० गोरे आणि ५०० काळे स्वार निमच येथें संवरक्षणार्थ राहणार होते. निमच येथील फौजेचा कमांडिंग ब्रिगिडियर मकोन हा आजारी पडला आहे.

ठाकोरी रुपसिंग बंडवाला याणें आपल्या फौजेकडून अजीतमल हें शहर या महिन्याच्या ७ वे तारखेस आटोपलें होतें. याच्या फौजेमध्यें शिंद्याचे बंडावलेले कांहीं शिपाई व ग्वाल्हेर कंटिंजेंटचे स्वार आहेत.

बेळगांव येथील प्रांतांत पर्जन्य चांगला पडून शेतकीचीं कामें चांगलीं चालली आहेत.

## रावसाहेब नातू आणि पर्वती पंच

श्रीपर्वती संस्थानावरील सरपंच श्री॰ रा॰ रा॰ गणपतराव बल्लाळ ऊर्फ रावसाहेब नातू यांणीं आपले साथीदार इतर पंच यांची संस्थानमजकूरचे कामांत कसूर व मतरणा आहे आणि अलिकडे जे या सरपंचास व दुसरे एका पंचास लोकांनीं मोल्दा कटा कटींनिवडून काढलें. त्यापैकीं तो पंचही जुन्या पंचांस अनुकूळ जाला, वगैरे मजकुराची एक याद तयार करून मेहेरबान कलेक्टरसाहेब पुणें यांजकडे गुदराविली. त्यावरून नातू मजकूर यांस असा शेरा मिळाल्याचें ऐकण्यांत येतें कीं, जर पंचांनीं गुन्हा केला आहे असें आपल्या नजरेस येत असेल, तर इकडून चौकशी वगैरेची तजवीज करतां येईल. आणि पैसा वगैरेचे बाबदींत कांहीं दिवाणीकडे इलाज करणें दिसल्यास फिर्याद करावी. आणखी पंचापैकीं वेदशास्त्रसंपन्न गोविंद वामन शास्त्री साठे यांची जागा रिकामी आहे, तर त्या जागेवर कोणाची योजना करावी हें त्या यादींत होवे, त्याविषयीं आसाहेबांनीं हुकूम केला आहे कीं, हें काम पुण्याचे रयतेचें आहे. याकरितां त्यांजविशीं या इलाज निवडून घ्यावा. असो, नातूतात्यातकपरंया धर्मशास्त्राचे वचनानुसार आपले श्रीपर्वती संस्थानचे सरपंच वर्तन ठेवतात. असें या त्यांच्या यादीवरून त्यांणीं स्पष्ट दाखविलें आहे. परंतु या सरपंचांनीं जर कलेक्टर अगर सरकार यांस असा प्रश्न केला असता की, सदरहू पंचांपैकीं कोणाची संस्थानचे कामांत कसूर किंवा मतारणा उघड दिसून आली, तर त्या पंचास काढून त्याजागीं दुसरा पंच बहुमतानें नेमण्याचा अधिकार रयतेस आहे किंवा कसें, तर यांच्या शहाणपणाची तारीफ होऊन सरकारास ही याविशीं जबाब देण्यास कांहीं विचार करावा लागता, असें आम्हांस वाटतें.

---

## प्रसिद्ध वातम्या.

**टोंक,—** येथून १५वे जुलईस कपूतान [illegible] लिहितात कीं, जनराल राबर्ट हे त्या मुकामीं [illegible] आहेत. कर्नल होमसर हे १२वे तारिखेस संतारा येथें होते. [illegible] तेथून मागें आमस्लम् येथें त्याच रात्रीं त्यांणीं कूच करण्याचें कारण समजलें नाहीं. कर्नल होमूस असें म्हणतात कीं, बंडवाले चहूंकडेस पसरले आहेत, आणि सुमारे ७००० हजार जवानांची एक टोळी त्यांची आहे आणि ती टोळी जदरगडा नजीक धिपरी घाटापाशीं आहे असें म्हणतात, आणि ते चंबळानदी उतरून ग्वालेरच्या परगण्यांत सोपूर येथें जातील असा तर्क दिसतो. टोंक येथील लोकांपासून कपतान एडेन यांस असें समजतें कीं, माधवपुराकडे देकुणाचे मार्गानें कांहीं बंडवाले गेले आहेत, आणि बांधाचा नवाब माधवपुराला वेढा घालण्याची इच्छा करीत आहे. जयपूरच्या फौजेनें त्यांस मिळण्याचें नाकबूल केलें. परंतु त्यांस सामग्री नेण्याविषयीं त्यांणीं सल्ला दिली. ते सोपुरास अगर मालवाराकडेस जाण्याविषयीं बोलतात. त्यांजजवळ तीन तोफा आहेत.

---

आम्हांस अशी खबर लागली आहे कीं, अगराबाद एथील खानबाहादूर शरीफ शेख मिनुसिपाल सदरअमीन यांची उमर अदमासें ७७ वर्षांची जाली आहे, त्यांणीं सरकारची नोकरी मौलवीपणाची, सदरअमीनाची, व प्रिन्सिपाल सदरअमीनीची अशा नोकऱ्या केल्या. हाल्लीं त्यांणीं सरकारास पेनशन मिळण्याविषयीं अर्ज गुजराविला आहे.

---

हें पत्र ज्ञानप्रकाश छा॰ कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांणीं छापलें.

# ज्ञानप्रकाश

सोमवार तारिख ९ माहे आगस्ट सन्न १८५८ इसवी.


## पत्राची किंमत.

१० दरसाल रुपये. ९॥ आगाऊ दिल्यास रु.

## जाहिरात.

देण्यांत येते जे पुण्याचे आगीचे स्टेशन म्हणजे गणें याचे मजीक एक होटेकची जागा तयार केली आहे. त्या जाग्याच्या जवळ हुंडेभाडेकरी यांचें काम व्यापारी वगैरे लोकांचें सामान नग दागिने मुंबईहून रेलवेच्या मार्फतीनें आलेले पुणे एथील आगगाडीचे स्टेशनमास्तर यांपासून आम्हीं नंबरवार डिलवर घेऊन जे देशावरावर रवाना करावयाचे असतील त्याविषयीं पूर्वी हुकूम मिळाल्यावर ते त्याठिकाणीं गाड्यांतून मोठ्या खबरदारीनें व फायदा होईल अशा प्रकारें रवाना करण्यांत येतील याप्रमाणें देशावरून कोणी हरएक जिन्नस रवाना आमच्या नांवावर मुंबईस रवाना करण्याकरितां पाठवितील तर त्याची खबरदारी ठेवून पुण्याचे स्टेशनमास्तरचे डिलीवर नोकराकडून पाठविले जातील. हें काम चालविण्याकरितां आश्रयाची जागा तयार केली आहे. येथून हें काम गेल्यामहिन्याचे २० वे तारिखेपासून चालू केलें आहे. यास्तव देशावरावरील तसेंच मुंबईचे शेटसावकार व्यापारी यांस अशी विनंती करीत आहों कीं, यासर्वांनीं कृपा करून आम्हांकडे दागदागिना व जिन्नस पानस पाठवावे त्यांच्या हुकमाप्रमाणें देशावरावर आम्हीं कायदेनें आमच्या आडत्याचे मार्फत तावडतोब ते माल रवाना करण्याची दरकगिरी ठेवूं. या आमचे आडतेपणाचे कामाविषयीं पूर्ण आश्रय मिळेल त्यास आम्हांवर त्यांचे मोठे उपकार होतील, आणि जे आमची आडत देतील ती आम्हीं घेऊं. आणि ओझ्याची रशीद तावडतोब मिळत जाईल कळावें.

पुणें ता. ७ आगस्ट सन्न १८५८ इ.

सही दादाभाई कामजीची कंपनी.

## ज्ञानप्रकाश. तारिख ९ आगस्ट सन १८५८

दिल्ली ग्याझेट पत्रांत ग्वालेरचें २१ जुलैचे आलेले पत्रावरून लिहिलें आहे कीं, ९५ वी पलटण लष्करांहून शिप्रीवर जाण्याकरितां निघाली, आणि त्याच्या जागीं ७१ वे यागरी पलटणचे १५० शिपाई यावयाचे आहेत. तेथें पर्जन्य मनस्वी पडून हवा दुरुस्त होत चालली आहे. छावणीमध्यें आजार उद्भवला आहे. विशेषतः तापाचा सांत आहे. झांशी येथून वर्तमान आलें कीं, तेथील जवाहीर सुटलें, त्यांची निदान किंमत दहा लक्षांची असावी. याखेरीज कांहीं वर्तमान नाहीं. यावर आखबरवरकर्त्यांचें म्हणण्यांत आहे कीं, तेथचें सर्व जवाहीर कायम आहे. हें वर्तमान अगदीं अफवा आहे.

---

आम्हांस बेळगांवचें पत्र ता. ७ आगस्टचें आलें आहे. त्यांतील मजकूर कीं "असिस्टंट इनामकमिशनर हे आपल्या कारकुनांसह जमखिंडीस गेले आहेत. कारण समजलें नाहीं. मेहेरबान भकूरिंग पोलिटिकाल एजंटसाहेब यांची स्वारी सांगलीस एथें आहे. ती पाऊसकाळ अखेर तेथें राहाणार आणि १५० गोरे लोक सांगलीस ठेवण्याचा विचार जाला आहे. असें ऐकतों."

**चीन,**— एथील खबर १८ मिनबूची प्रि-कीन गांवीं आगबोटींतून कागद पत्र आले त्यांजवरून कळतें कीं, तिकडील खबर संतोषकारक कांहीं सांगण्याजोगी नाहीं. कंतानचे आसपासचे चिनी शत्रु जमले आहेत त्यांचे मनांत कंतानास व इंग्रेज व फ्रेंच यांच्या एकत्र जालेल्या सैन्यास विघ्न करावें हें डाचत आहे. चिनई लोकांचे शत्रुत्वाचा बाणा कपटी आहे तो ते चालवीत आहेत. चीनच्या बादशाहाचा, अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानाशीं व रशियाचे सरकाराशीं तह होणार त्याची तहाची कलमबंदी झाली आहे. त्यांतील लहान सहान कलमें पाहातां चीन देशांत या हरदू देशांतील व्यापारी लोकांस त्या मुलखाशीं व्यापार करण्याची मोकळीक चीन सरकारानें दिली आहे. इंग्रेज सरकाराशीं व फ्रेंच सरकाराशीं तह करण्याचा मानस चीन सरकारचा दिसतो. परंतु असा वा तसा बेतास अद्यापि आला नाहीं. विलायतेकडून फराविसाचे तेथील सैन्यानें कुमक मागविली आहे. व ती येऊन पोंचेल अशी अपेक्षाही आहे.

---

**अपवाद,**— आम्हांस एका गृहस्थाकडून पत्र आलें आहे त्याजवरून कळतें कीं, एथील यजुर्वेदी वैदिक ब्राम्हण सखाराम शंकर मरगुंडे व रामकृष्णभट कुलमामरीकर यांच्या जातीव कुळाविशीं फार संशय आहे. जर ही अशी गोष्ट असेल, तर सर्व ब्राम्हण ज्ञातीनें याविशीं चौकशी पुरी करावी. आणि ही चौकशी पुरी होई पर्यंत या लोकांस अपंक्ते ठेवावें, आतां ही तजवीज करणें, एथील सर्व ब्रम्हवृंदांचें काम आहे. त्यांस विशेषतः यजुःशाखी ब्राम्हणांचें काम आहे. आणि ते करतील असा भरंवसा आम्हांस आहे. धर्मास पोटाळा करणारे पुष्कळ आढळतील. परंतु ते कोठावयास निस्पृही व आस्तावान् असे सत्पुरुष फारच क्वचित् सांपडतात. आम्ही तूर्त सर्वांस जाहीर करण्याचें जें काम तें आम्हीं बजाविलें. आतां स्वबर लक्षपूर्वक एथील खरे धर्मानुयायी शास्त्री, वैदिक, व गृहस्थ यांजकडे आहे. ते दुर्लक्ष करणार नाहींत. अशी आमची आशा आहे.

---

इंग्लिशम्यानपत्रांत लिहिलें आहे कीं, खासमहालराणीनें सरकारास अर्ज केला आहे कीं, माझे आप्त लखनौंत कैदी करून ठेविले आहेत त्यांची मुख्य सरकारानें चौकशी करावी. त्यावर सरकारानें शेरा दिला आहे कीं, अयोध्येच्या मुख्य अमलदाराकडे तुमचा अर्ज पाठविला आहे, ते अर्जान्वयें चौकशी करतील.

---

**समयानुसार विचार,**— कलकत्याचे इंग्लिशम्यानपत्रावरून कळतें कीं, कोर्ट आफ् डिरेक्टर्स यांणीं हिंदुस्थान सरकारास बंडाचे प्रसंगीं ज्या कोणी संस्थान्यानें किंवा सरदारानें द्रव्यद्वारा अथवा फौजेनी सरकारास मदत केली असेल, त्यांची नांवनिशीवार याद करून त्यांस जप्त केलेले मालमिळकतींतून इनाम द्यावें, अशी कमास केली आहे.

---

**नागोंडें,**— एथील बंगले जाळण्याकरितां तुरुंगाचे ज्या कैदी लोकांनीं यत्न केला होता त्यांस मारून टाकिलें. त्याकरितां ५० वे काळे पायदळ पलटणीस चांगलें बक्षिस देण्याविषयीं सरकारानें ठरविलें आहे.

---

काशी एथील मयत सेरसिंग राजाने उत्तरकार्याकरितां सरकारानें १७०० रुपये शीखसरदारास दिले आहेत.

मुंबंईच्या

## प्रसिद्ध बातम्या.

**डेहरी.**— येथून तारिख १८ जुलैचीस बर कपतान राद्र्े असे देतात कीं, श्री नामसिंग याणें रोटाचे आसपास कांहीं खून केले, आणि रस्ता रोखला याकरितां मीं आपल्या पलटणींतून कांहीं निवडक लोकांची पार्टी पाठविली तीस श्री नामसिंग यांस ठार मारावें किंवा धरून आणावें असा हुकूम दिला होता. या टोळीनें जाऊन चांगला जय संपादन केला, तिणें बंडखोर शिपायाप्रमाणें वेष धारण करून तारिख १७ रात्रौ श्रीनामसिंग यांस धरून आणिलें त्याचा भाऊ ज्याणें श्रीनामसिंग याचे हुकुमावरून मागें खुन केले तो त्याचा भाऊ, त्याचे मुलगे, पुतणे, आणि नातु मिळून सर्व नऊ मनुष्ये ठार मारून त्यांचीं शिरें आणिलीं. या बंडखोरास पकडून आणिल्यामुळें दक्षणभागचे सर्व लोक आनंदी झाले आहेत, एथील डोंगरावर तूर्त बंडखोर नाहींत उद्यां श्रीनामसिंगाची चौकशी मी करणार आहें.

**पाटणा.**— येथून तारिख ७ जुलैची खबर तेथच्या कमीशनराने दिली आहे कीं, डुगलास हा आजमितीस बुलीया येथून परत आला त्याणीं गाझीपुर येथील शत्रु नाहींसे केले. आज रात्रीं तो आऱ्याकडेस जाणार आहे. मेघहरसिंग किंवा ज्युधहरसिंग या दोघांपैकीं नेकराडेच्या रस्त्याकडे मोडनीपा येथें गेले आहेत, याखेरीज विशेष वर्तमान कांहीं नाहीं. त्यावर तारिख २१ रोजीं अशी खबर आली कीं, बादशाही १८ साबीच पलटणचे १०० व साठावीचे १०० सोजीर, ४० शिकारी पायदळ, १५ शिकाचे स्वार इतकी फौज आग येथून काल रोजीं जाऊन तिणें ज्यलपारा येथील बंडवाल्या बरोबर जयाची लढाई मारिली त्यांत बंडवाल्यांचे २० किंवा ३० यांचे आंत लोक मारिले इकडील एक शीक दफेदार मारला गेला.

**पावसाळ्याचा रिपोर्ट,**— उत्तर तुकडींतील गेल्या जून महिन्याच्या १० व्या तारखेपर्यंतचा पावसाळ्याचा रिपोर्ट आला आहे त्याचा सारांश येणें प्रमाणें.

**अमदाबाद**— या परगण्यांत बहुतकरून सर्वत्र ठिकाणीं पर्जन्य चांगला पडला. वीरमगांव कोद्रा, बेजरी आणि परांतेज यामध्यें कापूस आणि बाजरी यांचे पेरे जाले. धंदोका आणि गोगो यामध्येंही ज्वारी आणि बाजरीचे पेरे जाले होते. जेथलपूर, धोलका आणि दस्कोयी यामध्यें नांगरणीचीं कामें तमाम चालली होतीं.

**खेडा,**— या प्रांतांत सर्वत्र ठिकाणीं थोडा थोडा पर्जन्य पडून धान्याचे पेरे चालले होते.

**भडोच,**— या प्रांतांत पाहिजे तितका पाऊस विपुल पडून धान्याचे पेर करण्याचीं कामें तमाम चालली होतीं.

**सुरत,**— या प्रांतांत पाऊस बराच पडून कोठें कोठें पेरे चालले होते. व कित्येक ठिकाणीं धान्यें उगवून हवटवीत जालीं होतीं. सालमजकुरीं उसांचीं शेतें फार चांगलीं आहेत. सर्व तलाव पाण्यानें विपुल भरले होते.

**ठाणें,**— या जिल्ह्यांत बहुतकरून सर्वत्र ठिकाणीं पाऊस बराच पडून पेरे होऊन धान्यें उगवलीं होतीं. कित्येक ठिकाणीं उगवलेलीं धान्यें पाऊस न पडल्यामुळें सुकत चाललीं. अशी लोकांस बोलवा उठली होती. परंतु कोठें लावण्याचेंही काम सुरू जालें होतें.

**कुलाबा.**— एथें पाऊस चांगला पडला पेरे पुरे जाले उगवलेल्या धान्याची स्थिति चांगली असून, लावण्या सुरू जाल्या होत्या. खारींच्या जमिनींत धान्यें पेरण्याचें काम सपाट्यानें चाललें होतें.

**सासीराम,**— तारिख २७ जुलैची खबर एथील डिपुटी माजिस्त्रेटा कडून आली आहे कीं, कर्मनाशा आणि जहानाबाद यांचे दरम्यानचा ग्रांडत्रंक नामें रस्ता बंद जाला आहे. अजमाबाद एथें पूर्वीं जी टोळी होती तिला जहानाबादेजवळच्या पुलाचें रक्षण करण्याकरितां मागें जाण्याविषयीं हुकूम जाला आहे. बादशाही ७३ वे पलटणीची तुकडी एथें तळ देऊन आहे. बंडवाले निरनिराळ्या टोळ्यांनीं आहेत. सब तुकडींत बंडवाल्यावर पाठविण्याकरितां फौज नाहीं. यावर ता० २२ जुलैस शाहा कमरुद्दीन अहमद यानें श्रीगोंदाच्या मार्गानें खबर पाठविली आहे कीं, पश्चिमेकडील डांक आज रोजीं घेऊन पोंचली. काशीहून शीक लोक येऊन पोंचले. आणि त्यांचें दुर्गावतीजवळ बंडवाल्यांशीं युद्ध जालें, बंडवाले त्या ग्रांडत्रंक रस्त्याचे उत्तर बाजूस पळाले, दुर्गावतीचा पूल सुरक्षित आहे. तोरव्याजवळ बंडवाल्यांचे थोडेसे रोकडे आहेत. आणि कांहीं त्या ठिकाणच्या दक्षिणबाजूचे डोंगरांत आहेत.

---

**बनारस,**— ता० २१ जुलैची खबर आली आहे कीं, ७३ वे गोरे पायदळचा मेजर पी दो असा रिपोर्ट देत आहे कीं, त्याणें ग्रांटत्रंक रस्त्यापासून बंडवाल्यांस हांकून लावलें. त्यांचे १० मात्र गार मारले. बाकीचे मोठ्या जलदीनें पळाले, तो रस्ता दुरुस्त जाला आहे, असें म्हणतात आणि कलकत्त्याची डांक तुकतीच येऊन पोंचली.

---

**प्रयाग,**— एथून २२ वे जुलैची जी खबर सरकारी मिलटरी सक्रेटरी यांणीं गवरनर जनरल साहेब यांस फौजेच्या व्यवस्थेविषयीं दिली आहे ती येणें प्रमाणें— लेफ्टेनंट कर्नेल टरन् यांस ग्रांटत्रंक रस्ता व त्याचे आसपासचीं सर्व लष्करी ठाणीं यांचा चार्ज घेण्याविषयीं, व ब्रिगेडियर डुग्लास यानें हुकमतींत आऊजुटंटचे कामांत मदत देण्याविषयीं हुकूम फर्माविला आहे. व सदरहू रस्त्याचे रक्षणार्थ कानपुरापासून सांडणीस्वारांनीं जावें म्हणून ताकीद दिली आहे. आणखी तिसरे सीकस्वारांचे दोन स्कादून, ७३ वे पायदळ पलटणीच्या २ कंपन्या यांणीं बंडवाल्यांस प्रतिबंध करण्याकरितां अजनाबाद एथें तळ द्यावा असा हुकूम जाला आहे.

---

**कानपूर,**— एथील २७ वे जुलैचे आग्राफस्लिलेट पत्रांतून खंबेग्यांशिरांत मजकूर घेतला आहे कीं, वेणीमाधवाची टोळी नदीउतरून समोर धक्कोदा खालीं आली आहे. ती कानपुरावर हल्ला करण्याच्या मनसोब्यांत आहे. हा विचार त्या लोकांचा बहुत दिवस आहे. परंतु सरदोबदी उन्नाऊकडे त्यांणीं खोटी हुल दाखविली आहे. व ते नदी उतरून जात आहेत, परंतु त्यांचा कणा व अन्नाचा तोटा लागला आहे. कांहीं लोक भरून एक आगबोट खालीं जाण्याविशीं हुकूम जाला आहे.

या शत्रूंस उतरून जाण्यासारखा भागीरथीत उतार जाला आहे. परंतु या दुष्ट बंडखोरांनीं खूब समजून असावें, नाहीं पेक्षां त्यांच्या मनांत जी अपेक्षा नाहीं तें फळ प्राप्त होईल. हें वर्तमान आगबोट रवाना होईपर्यंत गुप्त राहिलें होतें. परंतु तिची रवानगी होतांच समजुतीस आलें आहे.

---

सर एडवर्ड ल्युगार्ड जो शरीर प्रकृतीमुळे विलायतेस जाणार तो अदरांचे तारिखेस कलकत्त्यास पोंचला होता.

---

विलायतेंतील पार्लमेंट सभेच्या हौस आफ कामन्स (ग्रहस्थाची) मंडळीनें जो नक्शा प्रसिद्ध केला आहे. त्याजवरून हिंदुस्थानांत बंड झाल्याचे योगानें आपल्या सरकारच्या लष्करी खात्याचें बळ पहिल्यानें किती होतें व तें किती कमी झालें हें आह्मास समजून येतें. त्या नक्शावरून पाहातां विलायतेहून फौज रवाना होणारची व हिंदुस्थानांतील गोरी फौज मिळून ८० हजारांची संख्या व्हावयाची होती. प्रथमतः मोठ्या उत्कंठेनें लोक रवाना करण्याचें मान्य केलें. नंतर प्रश्न होऊं लागले; त्याजवर नक्शांतील जाब झाला, तेव्हां सदरहु नक्शा साधारणपणें दुरुस्त आहे. असें कबूल येतें हिंदुस्थानांकडे येकदम ऐंशी हजार फौज आली नाहीं. परंतु वास्तविक ८० हजारांचे भरतीचे लोक निघून रवाना झाले १८५७ चे पहिले जानेवारीस हिंदुस्थानांत सर्व गोरी फौज कंपनी सरकारचे नोकरीतील १२००० हजार फौज सुद्धां ७५९५४, होती, त्या मितीपासून ३१ वे अप्रेल १८५८ चे दरम्यान बादशाही फौज ४१५९९ आणि कंपनी सरकारचे फौजेकरितां भरतीचे गोरे लोक १९२९ इतकें सैन्य हिंदुस्थानांत विलायतेहून रवाना झालें, तेव्हां हिंदुस्थानांत सर्व फौज क्रमानें ९५००० हजार झाली असावी. असें असतां रोग, तलवार, आणि उष्णता वगैरे मुळें येवढ्या मोठ्या फौजेंतून एककाळीं पन्नास हजार लोक चाकरी करण्यास असमर्थ होते, आह्माची निरनिराळे इलाखे या देशांत आहेत

तेथें कारणपरत्वें या संख्येंतून कमी करून निरनिराळे रवाना फौज झाली. फेब्रुवारी महिन्यांत विलायतेहून बंगाल इलाख्या करितां पुष्कळ फौज रवाना झाली तेव्हां त्या महिन्यांत लाहोर डिविज्यन (तुकडी) मेरीज करून सर्व फौज बंगाल इलाख्यांत ३९८०० होती, त्यांतून ३६१६ आजारी किंवा दुसरे कारणांनीं निरुपयोगी होती.

असें असतां ही काळी फौज लोकांका सुद्धां धरली असतां गोरे लोकां इतकीच होती, तेव्हां या देशांत एकंदर बंगाल इलाख्यांत ५८००० हजार लोक आणिबाणिच्या वेळेस होते. त्यांत ५६७४ कडाबिनीचे व पिशोरचे इरेग्युलर स्वार कडील होते आपल्यास या प्रसंगीं आपली व्यवस्था ठेवण्याचें किती अगत्य झालें आहे हें कबूल येतें. १८५७ चे जून महिन्यांत ७०००० हजार फौज एकाएकी बंडाऊन ती आपल्या मोहर्‍याकडेस गेली, त्यामुळें आम्हा लोकांपर्यंत सत्ता त्या बंडवाल्यांनीं नाहींशी केली. हें वर्तमान विलायतेस जुलई पावेतों खास समजलें नव्हतें. फेब्रुवारी महिन्यांत ही गडबड बंद झाली नाहीं. सर्व देश खवळला, सर्व शत्रू मोठ्या जेरानें ही सत्ता नाहींशी होण्याची वाट पाहात होते परंतु विलायतेहून बंडवाल्यापेक्षां जाजती फौज हिंदुस्थानांत येऊन दाखल झाली. वायव्य प्रांतांतील हजार बंदलोक या गडबडींत उत्कंठेने कसे जाऊन मिळाले हें ध्यानांत येतें. जिकडे तिकडे शत्रूंची गांठ, आणि आमच्या फौजेपेक्षां त्याची संख्या अधिक. लखनौ येथें, गोरखपुरांत, सर्व बुंदेलखंडांतून आणि आमच्या लढाईच्या हरएक ठिकाणीं शत्रु एकास पांच या प्रमाणापेक्षां कधीं कमी नव्हते. जेथें बिनहत्यारी शिपाई लोक होते, तेथें त्याची संख्याही गोरे लोकांपेक्षां अधिक होती, जर चोकशी केलीच तर जानेवारीच्या मागील दिवसांत मुळचे बंडवाल्यापेक्षां खरोखरीच त्यांची वृद्धी होत गेली, पकापक्षीच्या योगानें, संहाराच्या योगानें, व आजारीपणें आपल्यापेक्षां त्यांच्यामध्ये कमी होतां, तरी

मोठा होता. या सर्व कारणांमुळें त्यांची संख्या क-मी झाली, तरी ६०००० यांपेक्षां कमती नव्हती. आ-णल्या परोपरच्या लोकांनी गरवीस आणीव असती. आणि कित्येक त्यांनीं सांगतात कीं, त्यांनीं कधीं पुलटण उभारले नाहीं, तरी सामान्य भुळें लोक ते-रीज करून त्यांची संख्या एकलक्षाहून त्यावेळीं कमी नव्हती.

उष्ण कालामुळें आणखीहून सर्व लष्करांत उपद्रव झाला म्हणून पुष्कळांचा संहार झाला. तथापि वरचे-वर भरतीचे लोक येऊन दाखल होत आहेत. बारा हजार १२००० लोक गेल्या जुलईचे १५ वे तारिखे-स विलायतेहून रवाना व्हावयाचे होते. व तेराह-जार १३००० लोक पुढील आगदोंबरांत हिंदुस्था-नाकडेस रवाना व्हावयाचे आहेत.

तेव्हां पुढील हिवाळ्यांत एकंदर ४६००० हजार तयार गोरे आणि ३५००० तयार काळे इतकी फौ-ज फक्त बंगाल इलाख्यांत होईल. हल्लीं जी का-य फौज आहे ती मोठमोठ्या शहरांतून आहे आ-णि तिणें बंड करणारांस डाकुती लुटारू लोकांच्या टोळ्या प्रमाणें बहूं कडे पांगविलें आहे. तेव्हां उ-टें मोठी फौज जमली म्हणजे तिला बंड वाल्यांस प्रतिबंध करण्याचें सामर्थ्य कितपत राहील याचा विचार यांचा त्यांणींच करावा. आम्ही त्यांजवर सोंपवितों.

या सर्व गोष्टींवरून विलायतेचा कमतरपणा व सामर्थ्य हीं दोन्हीं दृष्टोसत्तीस येतात. तेथ-ल्या सरकारच्या स्वतःचा पूर्ण भरंवसा आणि प्र-धानमंडळी वरचेवर बदलून तिची लोभ दृष्टि या योगानें गोरी फौज कमी केली. आणि ती लवकरांत न बसवासांपून व रोगा बांधून नवीन कोणत्याही पद्धतीपासून अलग होवी. त्यामुळें खर्चाची व्यवस्था नाहीं असें नाहीं. म्हणून आपले फौजेपैकी बहुतेक

फौज १००००० एक लाख आणि गोरी ४०००० चा-ळीस हजार इतकी लष्करांत होती. तथापि सन १८५८ चे आखेरीस हिंदुस्थानांत कधीं नव्हती अशी मोठी फौज हल्लींच्या फौजेच्यापेक्षांही पांच पट ज-मीन होईल. आणि ती येणें प्रमाणें.

| इलाखा. | गोरी फौज. | काळी फौज. |
|---|---|---|
| बंगाल. | ४६००० | ३५००० |
| मद्रास. | १२००० | ६१९५० |
| मुंबई. | १२००० | ५५६५३ |
| | ७०००० | १५२६०३ |

एकंदर गोरी संख्या २७०००० पर्यंत होईल. व या हकीकतीवरून लोकांस जे दोन मोठे ग्रह जाले आहेत ते दूर होतील, अशी कल्पना आहे कीं, सालगुदस्तां पेक्षां सालमजकुरीं गोरी फौज कमी होत गेली. आणि यास खरेपणा हाच कीं, त्या वे-ळी हालीचे कारकिर्दीत पाहातां साधारणपणें खरें आहे त्यास प्रत्यंतर येणें प्रमाणें.

| सन | गोरी. | काळी. |
|---|---|---|
| १८५२ | ४८७०९ | २३९०७३ |
| १८५३ | ४६९३७ | २३०७४५ |
| १८५४ | ४७१४६ | २३६८४१ |
| १८५५ | ४६९९३ | २३७०९१ |
| १८५६ | ४५१०४ | २३४२२१ |
| १८५७ | ४५५२२ | २३२२२४ |

जेव्हां बंड जालें, दुसरीं विप्राचीं कारणें, भरतीची खानगी न जाली, इराणांत लढाई, आणि वेढ, या समयीं चुकी वगैरे घडोन आले, तेव्हां सुमारें चार हजार लोक कमती जाले. परंतु गोरी फौज जज-ती वाढविणें जरूर असतां वाढविली नाहीं. तरी गोरे लोकांचे कायम फौजेपैकीं फारशी कमी जा-ली नाहीं. आतां अशी कल्पना होते कीं, नवीन मलुख राज्यास जोडले करणानें, त्याणी कामगारां-

च्या जागा लष्करी लोकांस दिल्या त्यामुळें अमलदार लोकांची संख्या फार वाढली. पांजाब जिंकल्यावर वास्तविक फौज कमी होत गेली. आणि त्या वेळेपासून क्रमाक्रमानें दुसरे खात्यांत लोक नेमून संख्या कमी पडत चालली. आणि उलटी समजूत अशी होऊं लागली कीं, दिवाणी दुधाची कामें लष्करी लोकांस यावीं. बंगालच्या मध्यें अंमलदार येणप्रमाणे

| अंमलदार | सन १८५१ | १८५७ |
| --- | --- | --- |
| कर्नल | १५ | ७ |
| लेफ्टनंट कर्नल | २७ | १५ |
| मेजर | २३ | २४ |
| कप्तान | २४८ | २५३ |
| लेफ्टनंट | २५६ | १९३ |
| कार्नेट अगर एन्सैन | २२ | १ |
| | ५९१ | ४९३ |

यांशिवाय मद्रास इलाख्यांत १८५१ सालीं पासून १८५७ पर्यंत ५५० अंमलदारांची संख्या वाढली, आणि त्या मुलखांत अजी बखेडा जाला नाहीं. आणि राज्यास नवे मुलुख जोडल्यामुळें बंगाल्यांतील शिपाई लोकांस बंड करण्याचें रिकांत आहे. हा सर्व मजकूर जुलैचे २२ वे तारखेस फ्रेंड अफ इंडिया नामें पत्राधारें लिहिला आहे.

---

**जलालाबाद**—एथून २८ जुलैचें आलेलें पत्र बंबेग्याझिटांत छापलें आहे कीं, शाहजहान पूरचे रगण्यांत बंड जाले येवढ्यांत अशी वदंता उठल्यावरून तयारी चालली आहे. या शाहजहानपुरावर हल्ला करण्याचा बंडखोरांचा बेत आहे असें वर्तमान लागलें परंतु आमचे हेरहें वर्तमान अगदीं खोटें आहे. त्यांचा तोरव जखला वाकून किल्ल्यावर आहे असें सांगतात. आणि त्यांची पलटणीवर नजर आहे, असें दिसतें. कारण तेथील त्या राजानें त्यांचा मौलवी ठार मारल्यामुळें त्याविषयीं त्यांचे मनांत भारी डाव्वें आहे. परंतु त्यांचा सूड उगवेल असी आशा करण्याची त्यांस जागा राहिली नाहीं. समारें २०००, बंडखोर २० तोफांनिशीं आहेत, त्यांस सामग्रीची अडचण आहे असें सर्व बातम्यांचे हकिकावरून कळतें. त्यांचा मोहरण्या खान अल्लीखान हा मूर्त आहे. बेगम ही तह करण्यास उत्कंठित होऊन तिनें नेपाळचे मनुष्यास तिच्या तर्फेनें आपले सरकाराबरोबर तहाविषयीं बोलणें लावण्याविषयीं लिहिलें आहे. ही जर गोष्ट खरी असेल, तर सर्व बंदोबस्त होईल. नानासाहेब कोठें तरी दडून राहिले असावें. त्यांची खबर कोणास कळत नाहीं. ते कांहीं तरी दुरपेक्षा धरून लपत फिरताहेत.

---

**बलोची पलटण**— नवीन सरकार करणार. त्यांतील शिपायांस प्रत्येकीं दाहा रुपये पगार देणार आहेत. व हुद्देदारांसही रोजमुरा जास्ती देणार आहेत. पूर्वीच्या दोन बलोची पलटणी आहेत त्यांतील दरएका शिपायास सात रुपये दरमाहा आहे. त्यापैकीं पहिले पलटणीनें कर्नल फर्कारसन याचे हुकमतींत दिल्लीचे वेढ्याचे समयीं, व दुसरे पलटणीनें इराणांत मेजर हफ याचे हाताखालीं राहून चांगली मर्दुमकी केली आहे. असें असतां त्या लोकांचे पगार आहेत तसेच कायम ठेवून नवीन भरतीचे बलोची शिपायांस प्रत्येकीं १० रुपये पगार करणें हा अन्याय होय. असें जालें असतां बेंग्याल्हिराल्डचा कर्ता म्हणतो कीं, जुन्या बलोची पलटणींतील लोक आपल्या चाकऱ्या सोडून ते नव्या पलटणींत पगाराचे आशेमुळें जातील. आणखी दुसऱ्या ज्या इमानी पलटणी सध्या

बंडावर तुज्या चाकऱ्या बजावितात त्यांचेही पगार याप्रमाणेंच वाढविले असतां सरकारच्या पक्षपाती कोणा चांगल्या विषयाविषयीं नाहीं असें लोकांच्या दिलांत वाटूं लागेल.

---

## ज्ञानप्रकाशकर्तेयांस.

विनंती विशेष सर्व लोक म्हणजे ज्यांला चांगलें म्हणतात असा मनुष्य पृथ्वीवर कोणीही नाहीं. फार तर काय सर्व जगाचा उत्पन्नकर्ता व पालनकर्ता जो परमेश्वर त्यालाही कोणी चांगला व कोणी वाईट म्हणतात. जे न्यायाधीश आहेत त्यांस एक पक्षकार चांगलें व एक पक्षकार वाईट ही म्हणतो. तेथेंही त्यांचें तें वाईट म्हणणें किंवा चांगलें म्हणणें उपयोगी नाहीं. तर ज्याला बहुत लोक चांगलें म्हणतात तोच मनुष्य चांगला म्हणावा.

ता० २ जुलैचे बंबे टैम्स मध्यें कोणी एकानें एथील रावबहादूर डिपुटी माजिस्त्रेट यांची निंदा द्वेषभावानें फारच केली आहे. ती वाचतांना मोठें आश्चर्य वाटतें आणि त्याचें लिहिणें केवळ द्वेष किंवा अजाणतेपणाचें असावें असें वाटतें. कांतर तो म्हणतो यांस इंग्रेजीचें कांहींच ज्ञान नाहीं. व हे मोठे आळशी आहेत. तर आतां त्यांचें तें लिहिणें जे कोणी आमचे डिपुटी साहेबांस ओळखणारे मुंबईतील व बेळगांवांतील नेटिव व युरोपियन विद्वान् आहेत ते कबूल करतील. कांतर यांचे हुशारीची माहिती त्यांस पक्की आहे. शिवाय हे आळशी असून यांस इंग्रेजीचें ज्ञान कमी असतें तर या एवढ्या बेळगांव शहरचीं व तालुक्याचीं कामें आज पर्यंत निभावलीं असतीं काय? सन १८५५ सालीं वर हे माझें काम संभाळून दुसरे असिस्टंट रजेवर गेले होते त्यांचेंच डिस्ट्रिक्ट उंचपें काम महाल होतें, तथापि सर्व कामें वेळचे वेळीं आटोपून टाकीत. जर यांस आळशी म्हणावें तर आळशीपणा पुढें रखडायाचा तो आलेला अद्याप ऐकण्यांत नाहीं. दुसरें ऐजनेपजाल्याचा एक खटला यांजकडे कांहीं दिवस चालून मग गेल्या कमिट झाला परंतु जडज्यांनीं चार्ज बराबर नाहीं असें ठरवून पुनः परत पाठविला, असें तो पत्र लिहिणार म्हणतो. आणि यावरून यांस कांहींच ज्ञान नाहीं असें त्याचें म्हणणें. त्यास न्यायाधीशाचे कामास न्यायाधीशाचे नजरेचें हें काम आहे. आतां जडजानें चार्ज बराबर नाहीं म्हणून खटला परत पाठविला. यावरून तो शाहाणा असें जर म्हणावें तर पहा! एथील इनामकमेटीपैकीं एक खटला थर्ड असिस्टंट माजिस्त्रेट यांजकडे चालून त्यांणीं तो अ० जज कडे कमिट केला. असिस्टंट जडज्यानें तपास करून कैद्यांस सजा दिली. परंतु पुढें कैदी लोकांनीं मुख्य जडज्याकडे अपील केलें. यावरून जडज्यांनीं अ० जडजाचा व माजि० ठराव रद्द करून कैद्यांस मोकळे करून पुनः परत चौकशी साठीं खटला पाठविला. तसेंच सालमपुरी संपगांव तालुक्यांपैकीं वरचाडी बद्दल एक खटला पोलिसनें धरून मामलेदार यांजकडे पाठविला. तो अनुक्रमें करून सेसन जडज्याकडे गेला. तेथें जडज्यांनीं त्यास सजा दिली. परंतु जेव्हां कैद्यांनीं सदरेस अपील केलें तेव्हां तो अंधळा आहे असें ठरवून त्यास सोडण्याविषयीं हुकूम दिला. तात्पर्य असे तऱ्हेचे खटले वारंवार फरतात व फिरतात म्हणून सर्व अंमलदारांस वाईट म्हणणें हें ठीक नाहीं. "तिसरें एका संभावित गृहस्थाचा खटला यांजकडे येऊन आज सहा महिने जाले तथापि अद्याप त्याचा निकाल जाला नाहीं." असें तो म्हणतो. यास पाविषयींची कच्ची हकीकत जरी मला पक्की माहित नाहीं तथापि मी असें ऐकतों कीं, तो खटला कांहीं साक्षीदारांचे हरकतीमुळें राहिला होता. व सोलापूरचे इंजनेर साहेबांस त्याप्रकरणीं कांहीं लिहून गेलें होतें त्यांकडून ही अवकाश लागला. सारांश हे गृहस्थ निष्पक्षपातानें व चांगले रीतीनें काम करतात आणि त्यांच्या गुणास लोक वाईट म्हणतात. अशा गृहस्थाची कांहीं लोकांनीं जरी निंदा केली तरी ईश्वराचे कृपेनें खरे मनुष्यास जय आहे. असें समजून आमचे रावबहादूर यांणीं स्वस्थ बसावें हे विनंती.

मुक्काम बेळगांव
ता० ५ आगस्ट

तुमचा मित्र एक उमेद-
वार.

**रजेचा ठराव.**— सरकारानें आपले नोकरांस दरसाल अमुक रजा द्याव्या असा ठराव करून एक सरक्युलर केलें आहे परंतु या सरक्युलराप्रमाणें रजा देणें सर्वत्र योग्य नाहीं. याविशीं आम्ही मागें आपले पत्रीं प्रसंगानुसार लिहिलेंच आहे. अलिकडे सरकारानें आपलें लक्ष पुरवून असा ठराव केला आहे कीं, सरसालांत अमुक रोजां रजा देणें त्या दरएक खात्याचे किंवा कचेरीचे मुख्य अंमलदार यांस योग्य दिसल्यास देत जाव्या. असा सरकारानें ठराव करून त्याचा बदहुकूम फिरविला आहे, असें ऐकण्यांत आलें आहे. आम्हांस ऐकून माहीत आहे कीं, या रजेयांप्रकरणीं आमचे पत्रांतील आमचे अभिप्रायाचें भाषांतर होऊन तें सरकाराकडे जाऊन त्यांणीं इनाम कमिटीचे व दुसरे अंमलदार साहेबांचे अभिप्राय घेऊन सरकारानें हा ठराव कबूल केला आहे.

---

**आरा.**— एथून इंग्लिशम्यानचे कर्त्यास आलेलें पत्र २० जुलैचे पत्रांत छापिलें, व ते ग्याझिटांत घेतलें आहे. तो लिहिणारा प्रश्नरूपानें लिहितो कीं,

अमरसिंग महाराज होऊन जगदीशपूर येथें दरबार करून न्याय मनसोक्त करीत आहे, व त्याजवळ २००० शिपाई आणि ५०० स्वार आहेत. हें तुम्हांस माहीत आहे काय? हा सर्व प्रांत मनापासून बंडवाल्याचे आधीन आहे. ते जमाबंदी करितात आणि वसूल न मिळाल्यानें त्या गांवचा लिलाव करून आपसांत तो लिलाव घेतात हें तुम्हांस समजलें आहे काय? या बंडखोरांनीं मागें त्या ठिकाणचा एक बंगला गडबड केल्यावांचून जाळला, ते आमच्या लोकांस मोर्चांतील घरासमोर गांवकऱ्यांकरितां नित्य जाळपोळ, व लूटफूट करितात हें तुम्हांस कळलें आहे काय? हे बंडखोर बहुधा आमचे पासून तीन कोसांचे आंत असतात. हद्दींतले गांवकरी यांस आपले सरकारविशींचा अंदेशा राहून ते बिचारे त्यांच्या इच्छेनुरूप मदत करण्यास त्यांस भाग आलें आहे. हें तुम्हीं जाणतां काय? या मुक्कामीं ७०० गोरे, २०० काळे, आणि २ तोफा यांहून जाजती सरंजाम असतां अद्यापि आपल्या शेजारचे शत्रु घालवून देण्याविशीं इलाज होत नाहीं हें तुम्हांस ठाऊक आहे काय? ही स्थिति कधीं लयास जाईल बरें?

आम्हांस या पत्राची जुळणी जितकी गोड वाटते तितका मजकुरावर भरंवसा ठेववत नाहीं.

---

आम्हांस असें समजलें आहे कीं, श्री॰ रा॰ रा॰ बाबुराव दाभाडे तळेगांवकर हे मृत होऊन समारें ५ वर्षें झालीं असावीं त्यांची बायको श्री॰ आनंदीबाई या आहेत, यांस पुणे, नगर, ठाणें, आणि सचीद इलाख्यांत मिळून सरदेशमुखी, देशमुखी, देसाई व पाटीलकीचें व इनामगाव व तळेगांव इंदुरी मिळून सर्व उत्पन्न सालीना २०००० रुपयांचें आहे त्याविषयीं अलीकडेस एक फत्तेसिंग म्हणून दासीपुत्र आहे, त्याणें पुण्याचे अदालतींत मृत निंबकराव बापुसाहेब (मृत बाबुराव यांचा बाप) यांचा मुलगा आहे म्हणून वारसाचें सरटिफिकिट मिळावें म्हणून अर्ज केला आहे. त्याजबद्दल बाबुराव दाभाडे यांची श्री आनंदीबाई साहेब यांणीं सरकारास हा आमचा नातलग नव्हे याविषयीं तकरार दिली आहे, सदरहु फत्तेसिंग वारसाचा अर्ज करणार हा हालीं कोठें आहे. हा औरस निंबकराव यांचा पुत्र किंवा काय याविषयीं अदालतींत शास्त्री यांजकडून चौकशी चालली आहे.

## नेमणुका.

अज्जम सदाशिव गोपाळ भडोच जिल्ह्यांतील अंकलेश्वरचे यांस अमदाबाद जिल्ह्यांत धंदुका एथें ३ऱ्या प्रतीचे मामलेदार नेमिलें. आणि अज्जम आपाजी साकरलाल धंदुक्याचे यांस अंकलेश्वरास तिसऱ्या प्रतीचे मामलेदार नेमिलें.— कप्तान एफ्. स्लेउर आक्टिंग पोलिटिकाल एजंट दक्षिणमहाराष्ट्र प्रांतांतील यांस प्रांतात फिरण्याविषयीं परवानगी मिळाली आहे.— लेफ्टेनंट जे. क्यु. डेविस ४थे रेफलचे यांस नाशिक एथें काळी पोलिस कोरचे कामावर आडुजुटंट नेमिलें आहे.— मिस्तर हरिसन् कोंकणचे जड्ज्य व सेसनजड्ज्य यांस ता. ४ आगस्ट पासून विलायतेस आजारीपणाचे सरटिफिकिटावरून जाण्याकरितां १९ महिन्यांची रजा मिळाली आहे.— मिस्तर डी. सी. आर. लेटण आक्टिंग कलेकटर रत्नागिरी यांणीं कामाचा चार्ज ता. २६ जुलैस घेतला.— मिस्तर राबर्टसन टाण्याचे कंप्रीत ३रे आसिस्टंट कलेकटर यांस ३ महिन्यांची रजा मिळाली आहे.— मिस्तर राबर्टसन डिपुटी कमिशनर कस्टम मिठागार वगैरे यास दक्षिणेंत येण्याकरितां ३ मास रजा मिळाली आहे.— मिस्तर. जे. ए. जी. डफ खेडा सेकंड असिस्टंट कलेकटर यांणीं परत आपले कामाचा चार्ज ता. २८ जुलैस घेतला.— नेकनामदार गवरनर इन्कोन्सल यांणीं मेहेरबानी करून मिस्तर नारायण भाई डिपुटी एज्युकेशनल इन्स्पेकटर अहमदनगरचे सबडिविजनचे यांस "रावसाहेब" हा किताब दिला आहे.— अज्जम आबाजी बळवंत व अज्जम विश्वनाथ नारायण यांस कोंकण जिल्ह्यांत आक्टिंग मुनसफ नेमिलें आहे.

**लष्करीखातें.**— नेकनामदार कोर्ट आफ डिरेक्टर्स यांहीं हिंदुस्थान सरकारास लिहून पाठविलें आहे कीं, रायल् आर्टिलरी (राजकीय तोफखाना) चे सोजर मजला करीत असतील तितका ईचे जागीं असतील त्यांतून दर एक सोजरास दररोज एक पेन्स म्हणजे सुमारें पाऊण आणा मद्यप्राशनार्थ देत जावा. हा रोजमुरा ते इलाख्याचे मुख्य राजधानीपासून १०० कोसांवर असतील तेव्हां द्यावा.

१६वे काळे पायदळचा एन्सैन् फ्रान्सिस आथिन् सांत्र् याणें खुषीनें २५वे काळे पायदळांत त्याच हुद्यावर बदली करून घेतली. एन्सैन् जार्ज ब्रूरासिपन् यांस २५वे काळे पायदळचा; एन्सैन् चार्लस् हेन्री ब्रूर यांस ११वे काळे पायदळचा; एन्सैन् विलियम होलांड यांस २४वे काळे पायदळचा; आणि एन्सैन् जार्ज जान बोगल यांस २६वे काळे पायदळचा. या सर्वांस २रे एन्सैन् नेमिलें आहे.. ५वे काळे लैट पायदळचा कप्तान . आर. डब्ल्यू म्याकेचनी, यांस नगरास लैन आज्युटंट नेमिलें आहे. ६वे काळे पायदळचा लेफटेनंट कारटर मास्तरचे जाग्यावर आक्टिंग लेफटेनंट ग्रांट यांस नेमिलें आहे.

---

**मृत्यु.**— अमरावतीच्या घोडेस्वार रिसाल्याचे रा. रा. हरी विश्वनाथ सहस्रबुद्धे हे रिसालदार होते, हे मरण पावले. हे गृहस्थ ज्यांस माहीत असतील त्यांस दुःख जाल्याशिवाय राहाणार नाहीं. हे स्वभावानें भले व दिलदार होते. यांस प्रेटणपास त्यांचे बंधु नारायणराव फौजदार भडोचचे हे गेले आहेत. त्यांचे जाग्यावर आक्टिंग अंकलेश्वरचे फौजदार बापूभाई मदिदास नेमिले आहेत. त्याचे जागेवर मीर आफीसल नेमिले असें समजण्यांत आलें आहे.

**अहमदनगर,** तारीख ५ जुलै. ता॰ १८वी चे रात्रीस येथील तुरुंगांतून एक कैदी पळून गेला तो जातीचा भिल्ल आहे. तो कच्चा कैदी म्हणून बेअखेरीज होता त्यानें रात्रीचे वेळेस कउयानरउभारहून तुरुंगाची भिंत ९ फूट उंचीचि होती तिजवर तेथून उड्डाण करून भिंतीवरून खालीं उडी टाकून पळून गेला त्यास धरून देईल त्यास इनाम मिळेल अशी दवंडीही पिटली आहे. तेथें एक कमिशनर कोर्ट भरलें होतें, त्यांत नेवासे तालुक्यांत हिवरे गांवीं ज्या लोकांनीं दरवडा घातला होता त्यांत कैदी एकंदर २९ होते. त्यांपैकीं एके जणास हिवरे गांवीं फांशी दिला व बाकीच्यांस काळे पाण्याच्या व कांहींकांस कितीएक वर्षे अशा टेपा मिळाल्या आहेत.

---

पुणें अदालतीचे जज्जाची जागा मुकरर राबर्ट कीज साहेब यांची आहे, ते हाल्लीं विलायतेस रजेवर गेले आहेत. त्यांची तमाम रजा भरण्यास आणखी ८ महिने पाहिजेत. आतां मेहेरबान हारीसन साहेब हेथें आक्टिंग जज्ज होते त्यांस १५ महिन्यांची रजा विलायतेस जाण्याची मिळाली आहे. येथील जज्ज आणि एजंट चे जागावर आक्टिंग नेमणूक बहुत करून सालोपूरचे जज्ज मेहेरबान लाफनन साहेब यांची होऊन सोलापुरास रत्नागिरीचे मेहेरबान डाईड साहेब यांस नेतील असें आमच्या समजण्यात आलें आहे. ठाण्याचे जज्ज मेहेरबान आर्स्किन साहेब हे जर पुण्याची जागा नाकबूल करतील तर सदरहू प्रमाणें नेमणुका होतील असें आम्हास वाटतें.

---

**पुणें अदालत.** येथील आसिस्टंट जज्ज व सेशन जज्ज यांचे अमानत शिरस्तेदार रा॰ रा॰ गणेश वासुदेव जोशी यांस येथील जज्ज साहेबांनीं बडतर्फीं दोषाविषयी आपले अभिप्रायास हरिपोर्ट केला होता तो सदर अदालतीचे जज्जांहीं बहाल केला आहे हें ऐकून आम्हास फार वाईट वाटतें. कारण गणेश वासुदेव हे या अदालतींतले मोठे हुशार कारकुनांपैकीं एक आहेत. असा लौकिक आहे. येथील श्री॰ रा॰ रा॰ विश्वास खंडेराव ऊर्फ दाजी साहेब रास्ते यांनीं आपलें कुटुंब व चिरंजीव यांस घराबाहेर काढून दिल्यावर त्यांनीं निर्वाहार्थ इनामदार व पेनशनी यांचें उत्पन्नांतून कांही अंश मिळावा म्हणून येथील एजंट साहेबांकडे अर्ज केल्यावरून त्यांनीं चौकशी करून दाजी साहेबांचे कुटुंब व चिरंजीव यांचे निर्वहार्थ १०० रुपये दरमाहा पेनशनापैकीं द्यावे असा ठराव केला तो बहाल केला असें ऐकण्यांत आलें आहे.

---

**पंजाब**— ह्या प्रांतांत देरा ग्याझिखान येथून १९ साव्या जुलैचें बंबे ग्याझेटचे कर्त्यास पत्र आलें आहे, त्यांत मजकूर कीं, सिंधू नदीस तेथें धरण बांधलें आहे, तें तेथून आठ कोश पावेतों आहे. सन १८५६ साली त्याठिकाणीं महाप्रलय झाला होता तसा होऊन कोसचे कोस जलमय प्रदेश होईल अशी दहशत पडली आहे. तेथें उष्णता फारच जाणवत आहे.

---

**चतुरपूर**— येथें कांहीं लोक नोकरास ठेवून त्यांजवर कफतान ग्रीफीन् नेमिला आहे त्यांनी चौलतारानामें घांटानजीकचे बंड वाल्यांस हाकून लावावे असा हुकूम फरमाविला आहे.

---

**गुजराथ**— गुजराथेतील नरयाद येथ एक नवीन पोस्ट आफिस स्थापिलें आहे; तें ठिकाण खेड्यापासून ७ कोशांवर आहे.

---

**झांसी किल्ला**— एथून २७ जुलैची खबर हेस पत्रांत लिहिली आहे कीं, एथून फ्रांसरोजी २४ वे काळे पायदळचे ३०० मुंबई ३रे लैटस्वारांचे ५० व दोन तोफा याकडां एथून समारें १५-१६ कोसांवर म्हो म्हणून ठिकाण आहे. तेथें रवानगी जाली. तेथें वदंता अशी आहे कीं, तेथील राणीनें इंग्रेजी सत्तेच्या विरुद्ध वागण्याची इच्छा दाखविली आहे. या वरील फौजेबरोबर कांहीं गोरी फौज रवाना जाली नाहीं. परंतु ते त्या रस्त्यावरच असावेत. एथून ३रे मुंबईचे गोरे पलटणीची कंपनी २२ वे जुलेस एथून ५ कोसांवर दउासागर एथें रवाना जाली आहे, तेथून कांहीं एक अद्याप समजलें नाहीं.

वदंता अशी आहे कीं, एथून २५ व काल्पीपासून १५ कोसांवर कुंच शहर आहे तेथें समारें दोन हजार बंडवाले आहेत. तेथून त्यांस हांकून लावण्याकरितां फौज रवाना होईल अशी अपेक्षा आहे. १७ वे जुलेपासून एथें यासांतील खजीना कोणीं चोरला त्या लोकांविषयीं चौकशी कोर्ट भरून चालली आहे. तेथें काळे फौजेस शहरांत राहाण्याकरितां तजवीज जाली आहे.

---

**राजकृपा,**— वर्तमानसंग्रहावरून कळतें कीं, कोल्हापूरचे श्रीमन्छत्रपति महाराज यांस पुत्रलाभ जाला. त्या उत्साहार्थ तेथील तुरुंगांतील ज्यांस तुरुंगांतून सुटून पुनः आपल्या मुलांमाणसांस किंवा लोकांस भेटून प्रपंचाचें सौख्य भोगवेयाची आशा नाहीं अशा कैद्यांपैकीं १० असामी सोडून दिले. ही चाल राजवंशांत परंपरा चालत आली आहे. त्याप्रमाणें या प्रसंगीं कोल्हापूरचे राजास पुत्र जाला म्हणून कित्येक कैद्यांचा बंदखुला जाला एणें करून संतोष वाटण्याची गोष्ट आहे. मागें विलायतेमध्ये राणीस पुत्ररत्नलाभ जाला तेव्हां सरजेमशेट जिजीभाई यांणीं साठ हजार रुपये देऊन दिवाणी कैदी मुंबईंत सोडविले. असे कोल्हापूरचे राज्यांत जे शेट साहुकार अथवा गर्भश्रीमंत अथवा सरदार वगैरे थोर लोक असतील त्यांणीं कांहीं दिवाणी कैदी सोडविले असतां त्यांचा कीर्ति व आपल्या छत्रपतीचे वंशविस्ताराचा वास्तविक आनंद पाविशीं कळून येईल.

या प्रसंगीं दुसरें लिहिण्याचें योग्य दिसतें कीं, निजामसरकारचे गादीस वारस जाल्याचें वर्तमान कोठें ऐकण्यांत व वाचण्यांत आलें नाहीं. या अशा मोठ्या नवाबानें कैदी या प्रसंगीं सोडले असतां देवावरावर जैगळ्यांत नांगर व भिडया वगैरे बांधून निर्लज्ज होऊन बापकापोरांकडां रस्तोरस्त्यांनीं बंदखुला करा म्हणून दीनस्वरानें तिकडील कैदी ओरडत फिरतात, ते खुशी होतील, परंतु ही गोष्ट त्यांच्या कानावर जाण्यास मुश्किल आहे. वनी त्यांच्या दिलांत येण्यास जनानखान्यांतून फुरसद मिळण्याचें कठीण. असें ऐकतों. तत्रापि त्यांना वजीर शाहणा असा लौकिक आहे तर त्यांच्या दिलांत कांहीं सत्पुरुषानें ही गोष्ट आणून दिली असतां तो कांहीं तरी इलाज करील अशी एक आशा आहे.

---

आलाहाबादेचे सरकारी ग्याझिटांत प्रसिद्ध केलें आहे कीं, बडोद्याचे दरबारांत इंग्रेजसरकारचे वतीनें भंडारीचे हुद्यावर नारायणराव साहेब मुजुमदार होते त्यांची गैरवर्तणुक सरकारचे नजरेस आल्यावरून त्यांस त्या कामावरून दूर केलें आहे.

हे पत्र ज्ञानप्रकाश छाप· कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांणीं छाप

ज्ञानप्रकाश

गुरुवार तारिख १२ माहे आगस्ट सन्न १८५८ इसवी.

ज्ञानप्रकाश ता. १२ आगस्ट सं. १८५८ इ.

सरह्यू रोज यांच्या हाताखालील सेंत्रल इंडिया फील्ड फोर्सनें झांशी घेतली त्या वेळेस सोन्याचें, हिऱ्यांचे, मोत्यांचे, व माणिकांचे दागिने वगैरे मिळून सुमारें पस्तीस लक्षांचा विषय तेथें इंग्रेजांच्या हातीं लागला होता. तो सर्व चोरीस गेल्याची बातमी कालच्या टेलिग्राफवरून समजण्यांत येत आहे. या विषयाचें लिलांव केलें असतां निदान वीस लक्ष रुपये तरी उत्पन्न व्हावें. असें होतें. हा पैका सेंत्रल इंडिया फील्ड फोर्समधील लोकांस त्यांस संप्रतच्या लढाईंत जालेल्या श्रमांबद्दल इनाम म्हणून वाटून देण्याचा बेत जाला होता. हा सर्व विषय ज्या जामदारखान्यांत होता त्या जामदारखान्यावर युरोपियन लष्करी लोकांचा पाहारा होता. असें असतां हा विषय चोरून नेणाऱ्यांनीं त्या जामदारखान्याचीं दारें त्यांच्या खिळीवरून काढून दरवाजे उघडून आंतील सर्व विषय नेला. या चोरांकडेस पाहाऱ्यावरील युरोपियन लोकांनीं कानाडोळा केला असा संशय आला आहे. या चोरीस गेलेल्या विषयाचा आठवा हिस्सा एवढा सरह्यू रोज यांचा भाग होता. या मुळें त्याजला जे सुमारें अडीच लक्ष रुपये मिळावयाचे होते ते आतां नाहींसे जाले.

---

पुणें;— आमच्या समजण्यांत आलें आहे कीं, सदरदिवाणी अदालतीचे सरकिलरावरून आजवर ज्या कज्जांचा पाईट निघाल्यावर पक्षकार बिनदरखास्ती खेरीज आज कोर्टास पुरावा देत असत, त्याबद्दलचें सरकिलर सदर अदालतीनें रद्द करून निरनिराळे साक्षीदार अगर कागद हजर करण्याबद्दल दरखास्त द्यावी, असा हुकूम केला आहे.

सर्पदंश,— एथील छावणींत एका बंगल्याचें काम चाललें आहे, तेथें गबाजी यानांवाचा एका कुणब्यास सर्पदंश होऊन तो तीन दिवसांनीं मरण पावला. हा पावळ तालुक्यांतील थामरी गांवचा होता. असें समजतें.

एथें श्री रा. रा. भाऊसाहेब तांबे याची बायको व रांड यांमध्यें वैमनस्य पडून हल्लीं या प्रकरणाचा कज्जा फार माजला आहे. त्या दोघींकडील माणसांमध्यें या आठवड्यांत इतकी मारामारी जाली कीं, पोलिसास जाऊन तो कज्जा तोडावा लागला. हल्लीं या कज्जाची चौकशी पोलिसाकडे सुरू आहे, तो बहुतकरून मेहेरबान डिपुटी माजिस्त्रेट यांजकडे चौकशीकरितां जाईल. आम्हांस असें समजतें कीं, भाऊसाहेब तांबे मथुरेहून हरिद्वारास यात्रेस गेले. त्यांचा परत पुण्यास येण्याचा बेत नाहीं. त्यांच्या मित्रमुखें समजतें कीं, ते अक्षेत्र काशी येथें वास करणार.

एथें तुकाराम शिंपी याचें दुकान रात्रौ फोडून २॥ रुपयांचा माल आपाजी त्र्यंबक भिडे वय १७ चें व गणेश हरि राजवाडे वय १६ वर्षें. या दोघांनीं माल नेल्याची शाबिती होऊन त्यां प्रत्येकास एकेक महिन्याची शिक्षा मि. हांगसाहेब असि. माजिस्त्रेट यांणीं दिली.

## मुक्काम लष्कर नजीक ग्वालेर

मिती आषाड वद्य ५ रोज शुक्रवार.

१ अमरचंद बाठिया ज्यास पकडल्याबद्दल ज्येष्ठ वद्य १०चे पत्रांत लिहिलें होतें त्याची तपास होऊन त्याजला फांशीची शिक्षा ठरली त्याप्रमाणें सराफ्यांत लिंबाचे झाडास सदरहू इसमास फांशी दिला. त्याचें प्रेत दोन दिवस टांगलेलेंच होतें. पुढें नेऊन मातींत मिळविलें.

१ याच प्रमाणें आणखी ही एक नेटीव मेजर अनंतसिंग यानांवाचा खासगी वाले शिंदे सरकार यांचे गोलांताल होता त्याचें गैर वर्तणुकेबद्दल त्याजला धरून आणून सरकारवाड्यापुढें टांगून दिला.

१ येथील कोतवाल दामोदरभाऊ, आमचे चोंबडे व लुच्चे गंगाधर आपाचे जांवई, तसेच खासगीवाले यांचे कारकून चिमणराव, पुरुषोत्तम बावा म्हणून एक प्रस्त आहे त्यास वगैरे पांच सात आसामीस कैदेंत ठेविलें आहे. त्यांची चौकशी अद्याप जाली नाहीं.

१ बागीलोकांबरोबर येथील शहरगुंडे उलाढाल करून पळून गेले होते त्यापैकीं पांच आसामीस नरवर इलाख्यांत धरून आणिले आहे. त्यांत गंगाजळीतील कारकून वगैरे आसामी सांपडलेआहेत असें म्हणतात.

१ राजकारणीक लोकांस धरण्याचें व सोडण्याचें काम येथें भट भिक्षुक यांजकडे सोंपविल्यामुळें कांहीं अनीति चालण्याचा आरोप जनमुखें ऐकण्यांत येतो, आणि हें ही खरें दिसतें कीं, या घावीरामांत भट भिक्षुक यांचे उदरांतील आगीस पूर्ण आहुति मिळून देकरयेपर्यंत ते धांतील. आह्मी असें ऐकतों कीं किस्येक लोकांस वहिम्यावरून धरलें होतें व तेजसीत होते, त्यांचा हजरजामीन किंवा मुचलका घेऊन त्यांस मुक्त करावें असा दिवाणसाहेब यांचा साफ हुकूम जाला असून तो हुकूम पंचवीस पंचवीस दिवसपर्यंत देखील अमलांत येत नाहीं ही एक नवल वाटण्यासारखी गोष्ट नव्हे काय? वरीं जसी राहिली अगर कोणास ठेविलें असतां त्या इसमास दुःख किती होत असेल हें अनुभविक व नीतिमान पुरुषांचे लक्षांत सहज येईल, तेव्हां या गोष्टीचा विचार आमचे ++ मित्रांचे रघुनाथभटजी वझे यांणीं पूर्णपणीं केल्यास राजकर्त्यास लोक दूषण देणार नाहींत. पैसा मिळविण्यास अशी फसंधि येणार नाहीं म्हणून हुकूम जालेले लोकांस पूजा नैवेद्य केल्याबिना सोडीत नाहींत असें असेल तर नीच आहे, परंतु त्यांनी ही सारासार विचार पाहिला पाहिजे. आम्हांस व बहुतेक सज्जनांस असें वाटतें कीं, बहुत वर्षापासून दुखत आलेली वझे भटजी यांची दीर्घ दाढ, या धालमेलींत लागेल तितकें औषध मिळाल्यास नीट होईल व भटजींस पुनः औषध मागण्याकरितां कोणाकडे जाण्याची जरूरही राहणार नाहीं.

१ हामिल्टन साहेब बाहादूर यांची स्वारी सात आठ दिवसांपूर्वी एथून निघून इंदुराकडे गेली. त्यांचे जामात मिस्तर मेकसीयरस साहेब काहीं निकडीचे कामामुळें येथें राहिले आहेत.

१ पावसानें बराच झपाटा चालविला आहे व हवाही राहून राहून शीत पडती.

१ कच्छवाईघार इलाख्यांत कोठें कोठें लूटमार होत असल्याचें वर्तमान ऐकण्यांत येतें.

१ ह्यांनी येथें स्वस्थता आहे. अन्याचा दर [illegible] आहे. [illegible] रुपयास [illegible] शेर मिळतें.

१ येथील धराधरीचे कामांत साळु म्हणून ल- फ रली यदस्पोट केलेली आहे तिची शिफार- स पोंचली असतां रघुनाथ भटजी कैदीस सो- डितात, अशी जी बातमी शहरांत प्रसिद्ध आ- हे ती खरी असेल असें अधिकारी लोकांस वाटेल काय? नवनवीन वार्ता उठविण्यांत- ही लोकांची शर्त जाली. व भटजींनींही परा- काष्ठा केली

१ बावा वेहेरे जो मदरचें तेल घेऊन गेले त्या- लीं मुरारछावणींत तात्या टोपे आल्यावेळीं गोंध- ळ घालीत होता, व रुमाल्या नारायण बावा जो सात आठ वेळ कानपुरास व काल्पीस जाऊन पत्रव्यवहार पोंचवीत होता. ते कलिपुरुष कां प्रतिबंधांत नसावे? शिव! शिव! शिव!

आपला मित्र वाईट बरें पाहणारा.

---

गेल्या जून महिन्याच्या ९ वे तारिखेस मिरत एथील छावणींत १९ वे बंगाल काळे पायदळ पलटणीचे बाजा वाजविणारे, जोझेप टरन- र, फेफ मेझर, टामस टरनर, आणि जार्ज टरनर, हे आसामी बरेली एथील छावणींत सन १८५७ चे मेच्या ३१ वे तारिखेस बंडखो रांस जाऊन मिळाले, आणि ते बंड नमवि- ण्याविषयीं यत्न करण्यास झटले नाहींत. हा आरोप तेथील जनरल कोर्ट मार्शलांत त्यांवर शाबीत होऊन त्या सर्वांस फांशीं द्या- वें अशी शिक्षा ठरली; परंतु कम्यांडरइनची- फ साहेबांनीं सदरील गुन्हेगार मनुष्यांपैकीं पाहिल्या दोघांस ४ वर्षें आणि दुसऱ्यांस २ वर्षें सक्त मजूरीची शिक्षा त्या ऐवजीं कायम केली हिंदुस्थानचे बंडवाले लोकांच्या मनांत सरकार, १९ वे काळे पायदळ बंडवाल्यांपैकीं ख्रिस्ती किंवा इतर धर्मातील लोकांविषयीं भेदा- भेद चित्तांत आणीत नाहीं. असें उदाहरण हें साक्षात् दाखविण्याकरितां या गुन्हेगार लोकांस फांशीची शिक्षा ठरावयाची होती असें आम- च्या मतें वाटतें, कारण याच पलटणीपैकीं का- ळे लोकांची चौकशी होऊन त्यांस ठार मारण्या- च्या शिक्षा कायम झाल्या. आणि या पलटणींतील बंडखोरांनीं बरेली मुकामीं पुष्कळ मडमा आ- णि मुलें व दुसरे गोरे लोक यांची कत्तल केली आणि त्यांचीं प्रेतें कोल्ह्या कुत्र्यांकडून खावविलीं त्या प्रसंगीं हे अपराधी मदतीस होते, हें ध्या- नांत आणिलें पाहिजे. आणखी आम्हांस असें वाटतें कीं, त्या कोर्ट मार्शलांतील अंमलदारांनीं सदरहू गुन्हेगारांस माफी करावी, याबाबे शिफा- रस बिलकुल केली नाहीं याचें कारण कीं, हा मोकद्दमा फार वाईट आहे.

आवश्य.

---

## पुणें कोर्ट नंबर ३–

एथील मुनसफां- स श्री॰ रा॰ रा॰ गणपतराव बल्लाळ ऊर्फ रावसाहेब नातू यांणीं साक्ष देते समयीं कोर्ट मजकूरची बे- अदबी केल्याबद्दल हाजरमजलशीची याद मेहेरबान जड्ज्य साहेब यांजकडे लिहून गेल्यावर त्यांणीं लिहून कळविलें कीं, कोर्टा- ची बेअदबी केली, तेव्हां सदरहू इसमाची का- यद्याअन्वयें तजवीज करून कोर्टाचा अ- म्मल पुरा बजाविण्यांत कोर्टानें कसूर केली हें बरवर नाहीं. असें आम्हीं ऐकतों. जर ही गोष्ट सत्य आहे तर आम्हीं पूर्वींच कोर्ट- मजकूरांस कसूर केल्याबद्दल चें आमचे पत्रांत आणविलें होतें. त्याप्रमाणेंच सर- कारानें ही सूचविलें आहे, असो., सर्व अंमल- दार लोकांनीं ह्याप्रमाणेंच थोर असतांत त्यांस

कायदा लागू करूं नये. आणि जो सदाचरणी ग- रीब याजवर कायद्यानें झडप घालावी आणि त्याचा नाश करावा अशी बुद्धि ठेवूं नये. अशी आमची त्यांस विनंती आहे. आम्ही हे लोक आज्ञा प्रमाणें वर्तन करितात, असा दोष त्यांस लावीत नाहीं. परंतु प्रसंगोपात अशी बुद्धि होऊं नये या करितां त्यांस सूचना आहे. काय- दे सर्वांस सारखे लागू आहेत असें सर्वांनीं ध्यानांत ठेवावें.

---

"लाहोर क्रानिकल" कर्त्यास काबुलाहून गे- ल्या महिन्याचे तेरावे तारखे पर्यंतचीं पत्रें आलीं आहेत. बातमीचीं मुख्य कलमें अशीं आहेत कीं, दोस्त महंमदास कंदहारावरून अशी बातमी ये- ऊन पोंचली आहे कीं, हिरातचे आसपासच्या देशा लुटारू तुरकोमन लोकांच्या टोळ्यांनीं आच्छा- दिला आहे. तेणेंकरून शहरचे दरवाजाबाहेर जाण्यास रहिवास्यांस असुरक्षित वाटतें. कित्ये क तुरकोमन सरदारांनीं सुलतान अहंमदजा- नाबरोबर असा संकेत केला आहे कीं, ब्रिटि- श अथवा परशियन लोकांस कांहीं एक नपु- सतां, आपले नांवें नाणें पाडावें, या करारावर सर्व येणारांविरुद्ध त्याचा स्वतंत्रपणा रक्षिण्या- स महारनिल्हे सरदार आश्वासन देतात. सुलतान अहंमदजानानें या गोष्टीचा निर्णय करण्यास दोन महिन्यांची मुदत देण्यास विनंती केली आहे. शीर अल्लीखान ज्याप्रमाणें दोस्त म- हंमदानें करण्याचा हुकूम केला, त्याप्रमाणें कंदहारास जाण्यास नाखुष आहे असें दिसलें. हें विश्वास ठेवण्यायोगें नव्हे असें नाहीं कीं, थोड्याच दिवसांत काबुलांत भयंकर बंडें उ- त्पन्न होतील. दोस्तानें गुलाम हैदरखानाचें प्रेत तुर्कस्थानास पाठविण्याचा आपला बेत रद्द केला आहे. आणि तें काबुलांतच गाडविलें आहे.

हिं. हि.

---

टेलिग्राफ पत्रांत खासगी पत्र प्रसिद्ध झालें आ- हे कीं, धारवाडचे अदालतीचा नाझर, मयत नरगुं- दकर संस्थानी याचे प्रकरणांत सामील होता. हा गुन्हा सदरहू आदालतीचे नाझर यांजवर शाबी- त होऊन त्या अपराधाबद्दल त्यास आजन्म का- ळे पाण्याची शिक्षा ठरली. त्या मनुष्यानें असा कावा केला होता कीं, तेथील हुजूर तुरुंग एक- दम खुला करून द्यावा. परंतु हा त्याचा दुष्ट उ- द्योग संपूर्णपणें सिद्धीस गेला नाहीं. हल्लीं त्या जागेवर सरकारानें ख्रिस्तियन नाझर नेमिला आहे.

---

आम्हांस कलकत्यांतील ता. ३१ जुलईचें का- गदावरून समजतें कीं, बंडेवाल्यांचें मोठें सै- न्य १२००० बारा हजार शागंजीचे समागमास आहे. आणि त्यांतील पुष्कळ लोक दक्षिणेचे बाजूनें नदी उतरले. असा भरंवसा आहे कीं, महंमद हुसेन वगैरे येथील कांहीं राहि- लेले लोकांवरील आणि नसिराबादचे बंडवा- ले या मध्यें लढाई होईल असें दिसतें.

आव.

---

ता. ३१ जुलेस आग्रा येथें अशी वर्तमानपत्र पुराहून पत्रें आलीं त्याजवरून होती कीं, बुं- दीचा राजा हा आपला जीव घेऊन पळाला आणि त्यानीं सर्व मालमत्ता बंडवाल्यांनीं लु- टली. परंतु शहर कायम ठेविलें.

पासिफिक सागरांत कालीफार्नियाजवळील वांकु- वर बेटांत पुष्कळ सोनें सांपडलें असें वर्तमान आ- लें आहे.

---

हें पत्र पुणें ज्ञानप्रकाश छापखान्यांत कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांनीं छा

# ज्ञानप्रकाश

सोमवार तारिख १६ माहे आगस्ट सन्न १८५८ इसवी.

पत्रांची किंमत.

१० दरसाल रुपये. ९। आगाऊ दिल्यास रुप.

## ज्ञानप्रकाश ता॰ १६ आगस्ट सन्न १८५८

ग्वालेरीहून आलीकडेस बातमी आली, तींतील हकीकत कीं; तेथें सर्व गोष्टी नीटरीतीनें चालल्या आहेत. बादशाही १४ वी लैट ड्रागुन यांतील हुद्देदार व स्वार यांपैकीं १०० लोक खेरीज करून बाकीचे अद्यापपर्यंत तबूंत न राहात होते यामुळें ताप व अतिसार हे रोग जडले होते सरह्यू रोझ यांचीं पत्रें सरकारास गेलीं तीं प्रसिद्ध करण्यास दिरंग लागला तेणेंकरून सर्वप्रकारचे शिपाई लोक नाखुष आहेत. कुंच, काल्पी आणि ग्वालेर या तीन जागचे जयाविषयीं सरह्यू रोज यांचें काय म्हणणें आहे हें अद्याप आम्हांस समजलें नाहीं.

आव.

---

सर राबर्ट हामिल्टन साहेब यांणीं लार्ड एल्फिन्स्टन साहेब यांस ता॰ १२ आगस्टची बातमी तारायंत्रांतून जनरल राबर्ट यांणीं ग्वालेरचे बंडवाल्यांविषयींची सगनीयर नदीच्या काठीं लढाई करून त्यांची दाणादाण केल्याची पाठविली ती.

मेजर जनरल राबर्ट सर रजपुताना वरील फौजेचे कम्यांडिंग यांजकडून मुकाम सगनीयर एथून ता॰ १० आगस्टची इंदुरा वरून दापोलीस तारायंत्र द्वारें बातमी आली ती येणेंप्रमाणें.

मी १० मैल चालून गेल्यानंतर बंडवाल्यांजवळ काल अस्तमानीं भिडलों. ते कोतारी नदीच्या पैल तीरीं फराधरून होते. त्यांजवर तोफांचा भडमार चालवून तो फरा मोडून टाकला. आणि आम्ही त्यांचे उजवे बाजूस नदी उतरलों. नंतर ते दक्षिणेकडेस आपल्या स्वारांच्या आश्रयानें परत निघून गेले. आमच्या स्वारांनीं त्या स्वारांवर खूब मार केला. नंतर अस्तमान जाला. आमची पायदळ फौज थकलेली होती. सबब त्यांची पाठलाग करण्यास अशक्य जालें. बंडवाले मुख्यत्वें घोड्यावरील आहेत. आमच्या बराबर ८३ वी बादशाही पलटण ५०० शिपाई १२ व्या काळे पायदळ पलटणीचे २०० व गुजराथी रिसाल्याचे ६० स्वार ६ तोफा येणेंप्रमाणें आहे. आमच्या बरोबरचे लोक जरी दमलेले होते तरी त्यांणीं आपलें काम संतोषानें बजावलें. बंडवाले हे गुसला एथें उदेपूरच्या रस्त्यावर आहेत.

आव.

---

आम्हांस असें समजलें आहे कीं, सातारचे कमिशनर मेहेरबान रोज साहेब यांची स्वारी खासगी कामाकरितां पुण्यास येऊन परत गेली. याविषयीं वर्तमान अशी आहे कीं, पंजाबचे कमीशनर साहेब विलायतेस जाणार आहेत त्यांचे जाग्यावर सिंदचे कमीशनर होऊन सातारचे सिंदेस कमीशनर होणार अशी बोलवा आहे.

---

## नेमणुका.

सुरतेचे कलेकटर त्या त्यांतील जेटालाल हरीभाई सरभोजीचे यांस बंगवारा येथें आणि खुशालदास करसनदास बगवारचे यांस सरभोनी येथें असे मामलेदाराचे वर्ग परस्पर जाले आहेत. — रावबहादूर विठ्ठलराव नारायण धारवाडचे डिस्ट्रिक्ट डिपुटी कलेकटर आणि माजिस्त्रेट यांस व मिस्तर मेलविल ३ असिस्टंट कलेकटर व माजिस्त्रेट यांस सन्न १८५८ चा आक्ट ११ वरहुकूम बारीर दंड करण्याचे शिक्षेचा अधिकार दिला आहे — अमदाबादचे जज्युड्य मिस्तर बार्डन यांणीं रवेड्याचे तिमाही सेशनाचें काम संपऊन परत आपले कामावर ता. २४ जुलैस रुजू जाले — मिस्तर कामटन ठाण्याचे अकूटिंग जाईंट जज्ज यांणीं कामाचा चार्ज ता. ३० जुलैस घेतला. — सन्न १८५८ चा आक्ट २५ वरहुकुम मुंबईस म्युनिसिपल कमीशनर लेफ्टेनंट करनल क्राफर्ड इंजनियर कोरचे यांस लेफटेनंट पीम यांणीं अपर शिंदेंतील अकूटिंग एक्झिक्युटीव इंजनीयरचे कामाचा चार्ज ता. २७ जुलईस घेतला. — धर्मसंबंधी खातें, रेवरेंड डिकीसन यांस धारवाडास रेवरेंड नडसन यांस सेकंड चापलेन बेळगावास नेमिलें.

मुंबैस्थाइम्सचे कर्त्यास कधीं कधीं पत्रव्यवहार करणारा यानें पत्र आलें आहे. त्यांतील मजकूर आखेरवर आधारें लिहितो. ग्वालेरपासून कांहीं कोसांवर कोल्हारसची छावणी कालेशिंदनरीच्या काठीं आहे. तेथून अदमासें ३-४ कोसांवर मियापूर म्हणून एक डोंगरदी गांव आहे. तेथें बंडवाल्यांची एक टोळी होती तिनें आसपासचे गांव लुटून आमचे सामानाची रसद त्या गांवावरून जाण्यास अटकाव करण्याचा पेच चालविला होता. त्यांस तेथून हाकून देऊन थोडेंसे रस्ता चालू करावा म्हणून ब्रिगेडियर जनरल नेपीयरसाहेब यांणीं झांशीहून फौज रवाना केली ती तेथें जाऊन दाखल जाली तों बंडवाले तेथून पूर्वींचेच रात्रीं निघून गेले असें त्यांस कळलें. ब्रिगेडियर स्मिथची टोळी म्हणजे रजपुतान्यांतील जंगी फौजेची तिसरी टोळी सिप्रीहून पुण्यास जाणार होती तीस वाटेनें पुष्कळ पाऊस पडून थोरल्या रस्त्यावरून तोफा नेण्यास अडचण जाल्यामुळें ती गेली नाहीं. बादशाही ९५ वी पलटण ग्वालेरीहून निघाली ती ता. १८ जुलैस सिप्री येथें सात दिवसांनीं जाऊन पोंचली.

सदरहू पत्र लिहिण्यापूर्वीं आलीकडची बातमी कळविली आहे कीं, ता. १ आगस्टरोजीं सिप्रीकडून तोफांचा मोठा भडिमार होतसा ऐकूं येत होता. नंतर अशी खबर लागली कीं, मानसिंग १००० लोकांसह तेथें होता व त्याचा चुलता अजीतसिंग हा मागें शिंदेसरकारकडून ग्वालेरीस प्रतिबंधांत होता, त्यास तात्याटोपे यांणीं बंदीतून नेला होता. त्याणें सिंद्याचे त्यास पाहाऱ्यावर ठेवलेले ४०० लोक व कवायती पायदळचें एक पलटण बराबर घेऊन आपले पुतण्यास मदत करण्याकरितां गेला. नंतर उभयतांनीं पौरीनांवाचा किल्ला सिपरीहून १० कोसांवर आहे. त्यावर हल्ला करून तो हस्तगत केला. तेव्हां ठाण्याचे लोकांनीं मानसिंग याजकडेस निघून फत्तेबद्दल सलामीच्या तोफा सोडल्या. या बंडवाल्यांवर हल्ला करण्याकरितां ब्रिगेडियर स्मिथसाहेब सिप्रीहून साहा कोसांवर घिरीनामें गांव आहे तेथें गेले आहेत. त्यांबराबर ८ वे हुजार रिसाल्याची एक तुकडी व बेंकसाहेबाचा तोफखान्यापैकीं व ९५ वें सगळें येक पलटण व कालेपायदळचें १० वें पलटण इतकी फौज होती. बंडवाले फक्त धीर धरून राहातील, तर पौरीचा किल्ला मजबूद आहे असी नदंता आहे तरी ही फौज थोडेच दिवसांत त्यांचा बंदोबस्त करील यांत संशय नाहीं.

देवालयांत निरनिराळे थवे बसवून सर्वांनी द र्शनें सुखानें घ्यावीं. असा क्रम चालून दररोज मु मारें चौदा पंधरा हजार लोकांची दर्शनें होत अ सत. यसेंच क्षेत्रांतही चोर भामटे वगैरे यांचा उपद्रव न होई अशी तजवीज ठेवली होती. आम्ही थोडी वर्षें झालीं पाहातों परंतु असा बंदोबस्त व व्यवस्थेचा प्रकार लोकांचे हिताव ह असा पाघूर्वी आमचे पाहाण्यांत आला ना हीं. मी अशी आशा करितों कीं, देवाजवळ दा टी न होतां बहुतांचीं दर्शनें करविण्यास ज्या अडचणी आहेत त्याजबद्दल येथील मामले दार सातार इलाख्याचे कमीशनरास जाहीर करून लोकरच तजवीज करितील, बरें असो. गोपाळपुरचे काल्याचे दिवशीं गोपाळपुरचे पु लावर पेकापेकी मनुष्यांची अतिशय दाटी होऊन त्यांत कित्येकांचे प्राणच जावे असा समय आला परंतु ( वेळ होती परंतु काळ आला नव्हता ) या म्हणी प्रमाणें होऊन पोलि सचे माणसांनीं मोठी त्वरा करून झालेली दा टी सर्व मोडून टाकिली तेणेंकरून सुरक्षित पणें रस्ता चालू झाला. नंतर काला करून कि त्येक लोक परभारें आपापले घरीं निघून गे ले, व जे बाकी राहिले ते बहुतेक प्रक्षाल पू जा झाल्यावर निघून गेले. सालमजकुरीं या त्रेंत माहामारीचा वगैरे अगदीं उपद्रव नसून धान्यवगैरे जिनसाची माहागाई मात्र फार झाली होती. परंतु सर्व यात्रा येथून निघून जाईपर्यंत फारसा पाऊस पडला नाहीं, हें फारच चांगलें झालें. सारांश सालमजकुरीं सर्वांस सुखावह यात्रा झाली, परंतु विठोबा चे पुजारी जे बडवे त्यांचा मात्र बराच तोटा झाला, परंतु त्यांणीं यावेळेस आपला तोटा झाला असें समजूनये, कारण सर्वांचे फायद्या चीजी गो ाली त्यांत आपलाही नफाच झाला अ ाजलें पाहिजे.

आम्हांस असें समजलें आहे कीं, नगर जिल्ह्यां- तील चांदवडचे अवल कारकून रा. रा. पांडुरंग गो पाळ मिठुरे यांस दुसरे तालुक्यांत आक्टिंग माम- लेदार नेमिलें — व नगर जिल्ह्यांतील कोर्टकडे ए- थील मुनसफ रा. रा. पांडुरंग नीलकंठ यांस सिं नरास मुनसफ नेमिलें. — खानदेश जिल्ह्यांतील थाळनेर तालुक्याचे रा. रा. व्यंकटेश बळवंत मा- मलेदार यांस पिंपळनेर तालुक्यांत तिसरे प्रती- चे मामलेदार आक्टिंग नेमिलें आहे.

डेराइस्मायलखान एथून अशी खबर आली आहे कीं, तेथच्या १० पंजाबी पायदळ पलटणीनें फिरंगी लोकांची कत्तल करण्याचा कट केला होता, तो उघडीस आला आहे. त्या पलटणच्या एका जमादारानें आपल्या पलटणींतील एका दोघांस मारून तो आपल्या बरोबर चार बदमाश सोब- त्यांसहां पळाला. त्यांपैकीं तो जमादार खेरीज करून बाकीचे तेथील अंमलदारांचे हस्तगत झाले आहेत. तेथें पेशावराहून गोरी पलटण रवाना होईल असें वाटतें. बनूमुक्कामीं याच जा- तीचे सीक, व मापळे आहेत. दिल्ली ग्याझेटचा कर्ता म्हणतो कीं, या खेरीज दुसरीं कांहीं विनारची- नीं कळलीं आहेत, परंतु तूर्त आम्हीं तीं प्रसिद्ध करीत नाहीं.

मद्रास इलाख्याची पुनः पाहाणी करून जमिनीवरील कर पालटून नवे करण्याविषयीं कोर्टआवडरेक्टर्स यां- ता हुकूम जाला आहे. असें म्हणतात.

विलायत,— एथील ता० ... वे जुलैपर्यंतची आली ती मुंबईस तारिख ... आगस्ट रोजीं येऊन पोंचली. त्यांतील व... कीं, हिंदुस्थानचे भावी राज्यकारभाराचा केलेला मसुदा पार्लमेंटसभेंतील हौस आफ् लार्डस (वडे लोकांची मंडळी) यांत वाचून ३२ कलमापर्यंत मंजूर जाला आहे. कंपनी सरकारानें हौस आफ् लार्डस यांजकडे हिंदुस्थानचे भावी राज्यकारभाराविषींच्या मसुद्यावर जे दोष दिले आहेत त्यांची सुनावणी जें या विचाराकरितां कौन्सल म्हणजे मंडळी नेमिली आहे, तिला व्हावी म्हणून एक अर्ज केला आहे. लखनौचे मयत सरहेन्री लारेन्स साहेब यांचे वडील पुत्रास बारोनेटचा (वडे ...च्या पतींपैकीं शेवटील प्रतीचा) किताब दिला आहे. सरजेम्स औटराम साहेब यांस लेफ्टेनंट जनरालाचे पदवीप्रत चढवून त्यास दाहा हजार १०००० रुपये सालीना पेनशन देण्याचें मागें ठरलें आहे; परंतु हें पेनशन दोन पुस्त म्हणजे पुढें त्याच्या चिरंजिवासही चालावें असा ठराव जालेला आहे. दिल्ली व लखनौ एथील लढाईचे कामांत जें सैन्य होतें त्यास चांद व दुसऱ्या विजयी मुद्रा या तबडतोब देण्याकरितां रवाना होणार आहेत. आगस्ट महिन्याचे आरंभीं फराशिसाचे बादशाहास चेरबर्ग एथें भेटावयाकरितां विलायतेची राणी जाणार आहे. तिजबरोबर जो सेनाभाग जाणार आहे त्यावर लार्ड क्लैयन्स हे अधिपत्य करण्याकरितां नेमले आहेत. राणीला या भेटीकरितां फराशिसाचे बादशाहाकडून आमंत्रण आलें तें विलायतेचे राणीनें कबूल केलें आहे. आरबस्थानांतील जड्डा एथें जो दंगा होऊन जी कत्तल जाली त्याबद्दल इंग्रेज व फराशिस हे एकत्र होऊन ते जालेल्या कर्मांची उगवणी करतील. टेम्स नदीचें पाणी नासलें त्याची दुरुस्ती करण्याकरितां खर्चाची एक याद तयार सरकारांत जाली आहे. अमेरिकेंतील स्वतंत्रसंस्थानांत गुलामांचा व्यापार करूं नये म्हणून विलायत सरकार व अमेरिकन सरकार यांचे मध्यें तह जाला आहे. त्यांत कांहीं फेरफार होऊन अमेरिकन सरकारानें गुलामांचा व्यापार करण्याचे बाबतींत मोकळीक कांहीं मिळविली असें दिसतें. स्पेन देशाचे सरकारानें त्यास विलायत सरकारानें तेथील गुलामांचे व्यापाराबाबद कांहीं पत्र लिहिलें होतें. त्यावर तें सरकार व त्याचे प्रधानमंडळीनें या गुलामांचे व्यापाराबाबद पत्र लिहिलें आहे. त्याचा मतलब काय तो विलायत सरकारास विचारावा असा ठराव केला आहे. या अजगबोटींतून एडन बंदराहून ५७चे बारवाही पलटणींतील सर्व १६ माणसें आली आहेत.

ग्रेट इंडियन पेनिनशुला रेलवे,— आगगाडी खंडाळ्याहून पुण्यास येतांना दरम्यान वडगांव लागतें तेथें गाडी थांबवून उतारकरू लोक घेत असतात. हें ऐकून बहुतेकांस संतोष होईल. परंतु त्या उतारकरू लोकांपासून उतार घेतात त्याचा विचार आपण केला असतां आश्चर्य वाटेल. असें कीं, पुण्याहून वडगांव २७ मैल लांब आहे. त्याचा आकार मैलास पावआण्याप्रमाणें तिसऱ्या प्रतीच्या गाडीचा ।७॥ पावणेसात आणे होतो आणि सदरहू कंपनी ।।५ सवानऊ आणे हल्लीं घेते असें आम्हांस एका गृहस्थानें कळविलें आहे. ही बहुधा रेलवेखात्यांतील कामगारांची चूक आहे. परंतु ही चूक लोकांच्या नुकसानीची आहे तेव्हां जरूर त्यांनीं दुरुस्त करावी अशी त्यांस आमची सूचना आहे.

आम्हांस आमच्या मित्रानें पंढरपुराहून तारिख ६ मिनहुचे मितिचें पत्र पाठविलें आहे त्याचे आम्ही आभारी आहों तें येणे प्रमाणें. विनति विशेष सालमजकुरीं आषाढीची यात्रा सुमारें अडीच लक्ष आली होती, लोक म्हणतात कीं, अशी यात्रा पंचवीस तीस वर्षांत कधींच मरली नवती शहरांतील घरांतून लोक मावेनात तेव्हां माळवदावरून कितीएक पाले देऊन राहिले जागातर इतकी माहगली होती कीं, एक खणास दीढ रुपया भाडें. सालमजकुरां इतकी यात्रा येईल असें लोकांस बिलकुल वाटले नवतें, सबब उद्मी लोकांनीं जुजबी माल तयार केला होता, पुढें मालाची कमताई आल्यामुळें रुपयास अकरा शेर कणिक, व दोन शेर तूप, व दाहा रुपये खंडी लांकडें, गोवऱ्या पेंडे शिवराई खुर्दा, असा विकला. व हरजिन्नस हीं फार महाग विकले. सालमजकुरीं आमचे मामलेदार राजमान्य राजश्रि सदाशिव रघुनाथ ऊर्फ आबा जोशी यांणीं देवळांतील श्री विठोबाचे दर्शनाचा बंदोबस्त स्वतः राखिला होता, तेणेंकरून बडवे लोकांचें कांहीं चाललें नाहीं. व ह्या स्तुत्य अमलदारानें दर्शनाचा चांगला बंदोबस्त ठेऊन आंतील संकोच्याचे जागेंत दाटी न होऊं देतां गरीब गुरीब वृद्ध लोकांस दर्शनें करविलीं. जर अशा प्रचंड यात्रेंत सरकारांतून बंदोबस्त झाला नसता तर मागील वहिवाटी प्रमाणें ह्या गर्दीत कितीएक प्राणास धक्का पोचता. असा देऊळचा चांगला बंदोबस्त राखिला होता. परंतु दुष्टलोकांचा व्यापार चालला नाहीं, तेणेंकरून मामलेदार साहेब यांजवर नानाप्रकारच्या सुमारें पंचवीस अर्ज्या त्या लोकांनीं निनाव्या सारख्या केल्या, त्यांचे चौकशीकरितां सातारचे माजिस्त्रेट साहेब बहादूर यांणीं राजमान्य राजश्री बाळाजीपंत दादा भाटे डि. डि. यांस पाठविलें, त्यांस येऊन सुमारें साहा दिवस झाले, परंतु मुद्यांतच कांहीं नाहीं तेव्हां ते एक दोन दिवशीं साताऱ्यास परत जाणार आहेत. सालमजकुरीं यात्रेंत रोगराई वगैरे कांहीं एक नहोतां यात्रा सुरक्षित गेली, येथील मुनसफसाहेब राजमान्य राजश्री हरी कोन्हेर यांची बदली होणार म्हणून बातमी उठली आहे

---

पंढरपुरचा मजकूर तारिख ८ मिनहू पर्यंतचा दुसरा बातमी दारानें पाठविला आहे येणें प्रमाणें

पंढरपूर सालमजकुरीं आषाढी करितां आलेले बहुतकरून लोकांचा समुदाय सुमारें सवादोन लक्षाहून जास्त जमला होता. तेणेकरून दरखणास निदान एक रुपयापासून दोन रुपये पर्यंत राहाण्यासाठीं घराचें भाडें पडत असे. असेंही असून सर्वांस क्षेत्रांत जागा मिळेना सबब कित्येक तर क्षेत्रा बाहेर राबट्या वगैरे देऊन राहिले. तथापि क्षेत्रामधून एकच दाटी होऊन माहाद्वारापासून देवाचे दक्षिणद्वारापर्यंत तर अतिशयितच गर्दी झाली होती. लोक सांगतात कीं, सुमारें चाळीस वर्षा आलीकडे अशी यात्रा आलिच नाहीं. एवढा मोठा यात्रेचा समुदाय जमला असून येथील पोलिस अमलदार रा॰ रा॰ सदाशिव रघुनाथ जोशी यांणीं गुदस्तापेक्षांही बंदोबस्त चांगला ठेविला होता. तो असा कीं, सरकारी व देवस्थानाकडील कारकून व शिपायी आणि जमिदार तर्फेचे तालुके कचेरींतील कारकून यांस पाहारे नेमून देऊन दर्शनें करविण्याचें काम चालविलें, व अमलदारही स्वतः दररोज प्रहर माहा प्रतिका सदरहू काम पाहात असत. व पुरुष व स्त्रिया तसेच व्याधिग्रस्त पंगु इत्यादिकांचे

**विद्याखातें,**— या खात्यांत या मुंबई इलाख्याच्या तीन तुकड्या मुख्य करून त्यांवर तीन इन्स्पेक्टर करणार आहेत. हालींचे दक्षिण तुकडीचे इन्स्पेक्टर कप्तान लेस्टर साहेब यांस करनाटक व दक्षिण कोंकण यांवरील इन्स्पेक्टर करणार. गुजराथ, उत्तर कोंकण आणि खानदेश, यांवर गुजराथचे इन्स्पेकटर मिस्तर होप साहेब यांस इन्स्पेक्टर करणार. आणि पुणें, न[illegible]र, व सातारा, आणि सोलापूर, मराठी भाग यांजवर कोंकणचे इन्स्पेक्टर डाक्तर हैन्स यांस इन्स्पेक्टर करणार. अशाच सब तुकड्या होऊन डिपुटी इन्स्पेक्टर यांची योजना होणार आहे असें ऐकतों. उत्तर कोंकणचे डिपुटी इन्स्पेक्टरीचे जागेवर कप्तान लेस्टर साहेब यांचे हाताखालील इंग्रेजी कारकून [illegible]नीलकंठ महादेव यांस नेमणार अशी वदंता आहे. सरकारी भरपगाराच्या १५ व ६ रुपये [illegible]मतीच्या काहीं शाळा नवीन स्थापण्याचा विचार विद्याखात्याचें अधिकारी मंडळ करीत आहे. एथील पाठशाळेकडील सरकारी शिलायंत्राचे छापखाने होते ते सरकारानें बंद केले आहेत. याचें कारण असें ऐकतों कीं, त्या छापखान्यांत जीं पुस्तकें छापून तयार होतात, त्यांपेक्षां सवंग व सुंदर असून कमी किमतीनें साहुकारी छापखान्यांतून मिळतात. तेव्हां हा खर्च सरकारानें तोडला आहे. एथें सरकारी बुकें विकरीचें दुकान मात्र काढलें आहे. अशींच जिल्ह्यानिहाय दुकानें होणार आहेत, अशी वदंता आहे. एथील पुणें विद्यालयांत इंग्रेजी विद्याभ्यासांत दोन [illegible] गणलेल्या आहेत. त्यांपैकीं पहिल्या [illegible]तीचे भागास निराळी जागा घेऊन तेथें विद्याभ्यास चालवावा म्हणून विचार चालला आहे, असें ऐकतों. त्यावर एथें गप्प उठली आहे कीं, पुण्यांतून विद्यालय काढून नगरास सरकार नेणार आहे. या गप्पेस पाहातां आधार कांहीं नाहीं. आणखी विचारानें पाहातां हें शहर मोठें असून एथें विद्याभ्यासही बराच वाढला आहे. तेव्हां हें शहर टाकून नगरास विद्यालय नेण्याचा विचार सरकारचे दिलांत येईल असें वाटत नाहीं.

---

**प्रयाग,**— एथून प्रसिद्ध वर्तमानें आलीं आहेत कीं, जुलैच्या २८ वे तारखेस सर होप ग्रांट साहेब याचे ताब्यांतील लश्कर फैजाबादेपासून सात कोसांवर होतें, तें दुसरे दिवशीं फैजाबादेस पोंचलें. बंडवाल्यांची फौज शाहागंज येथें होती. तिजपैकीं मोठी फौज गोग्रा नदीच्या सव्य तीरास होती. त्या फौजेचे तीन भाग करून त्यांवर प्रत्येकीं तीन हिंदू मुख्य नेमिले आहेत. एक भाग फैजाबादेकडे गेला आहे. दुसरा ज्यास नसराबाद पांडे यांची फौज असें म्हणतात, तो गोमती नदीवरील सुलतानपूर याकडे गेला आहे. आणि तिसरा गोग्रा नदीवर टांडा म्हणून शहर आहे तिकडे गेला आहे. या भागावरचा अधिपति तोकरसिंग म्हणून आहे. महमद हुसेन हा गोग्रा नदी उतरून गेला अशी बातमी आहे. टांडा व सुलतानपूर इकडे गेलेले दर एक भागांत सुमारें तीन हजार जवान असून त्यांजवळ लहान मोठ्या तोफा आहेत, असा अजमास आहे. हे बंडखोर गोग्रा नदी उतरले त्यावर सरकारचा घोड्याचा तोफखाना आणि स्वार यांणीं चाल करून त्यांस त्या नदीच्या किनाऱ्यावर अयोध्या नगरीपर्यंत हांकून लावलें. आणि शत्रू तेथून परत जाऊं लागले. त्यांपैकीं सर[illegible] बोटचे नौकेवर या सरकारचे लोकांनी मारा केला.

सुलतानपूर हें बंडखोर आपलें मध्यभागचें ठाणें बहुत करून करणार आहेत, असें दिसतें. राजा मानसिंग हा फैजाबादेस ३० वे जुलैस इंग्रेजांचे छावणींत येऊन मिळाला आहे. तिकडील बंडखोर दक्षिणेकडे खूपराई म्हणून सुलतानपुराचे ईशान्येस तेरा मैलांवर शहर आहे तिकडेस व बरतीपूर म्हणून सुलतान पुरापासून त्याच दिशेस शहर आहे तिकडेस गेले असी बातमी लागत आहे. फैजाबादचे उद्मी व्यापारी यांनीं आपलीं दुकानें उघडलीं आहेत.

---

गेल्या आठवड्यांत अयोध्या व रोहिलखंड एथून जी बातमी आली आहे तिजवरून असें समजण्यांत येते कीं, फैजाबादच्या शेजारीं शाहागंज एथें मानसिंग याजला त्याच्या किल्लयांत सुमारें वीस हजार बंडवाल्यांनीं चोंहोंकडून वेढा घातला आहे, त्यास सोडविण्याच्या व फैजाबाद आपल्या हस्तगत करून घेण्याच्या अशा दोन उद्देशांनीं गेल्या महिन्याच्या १९व्या आणि २१व्या या दोन तारिखांस मिळून रायलहार्स आर्टिलरीचा एक त्रुप, १२ लैट तोफा, एक मोठ्या तोफांची ट्रेन, २ऱ्या ड्रगून ग्यार्डस पलटणाचे ३ त्रुप, ७ वी हुझार्स घोडेस्वार पलटण, हाडसनची घोडेस्वार पलटण, बंगालवाल्यांची १ली फुसिलियर पलटण, मद्रासी १ली फुसिलियर पलटण, ५ली पंजाबी काळीपायदळ पलटण, व फिरोझपुरची शीक पलटण. इतकें लश्कर तिकडे रवाना झालें. हें लश्कर पहिल्यानें मानसिंगाची मुक्तता करून व फैजाबाद घेऊन मग गोग्रा नदी उतरून अयोध्येचा त्या बाजूचा भाग शांत करील, परंतु मानसिंग याजला गोंडाच्या राजानें ठार मारल्याची जी बातमी नेटीव लोकांत उठलेली आहे ती जर खरी असली तर बहुधा लखनुराहून गेलेल्या या लश्करास परत लखनुरास येण्याविषयीं हुकूम होईल असें वाटतें. अयोध्ये मध्यें इंग्रेजांहीं लश्करी पोलिस खात्यांत नवे ९००० लोक ठेवले आहेत त्यांपैकीं बहुतेक शीक पंजाबी आहेत. व त्यांमध्यें दोन पलटणी जरी हलक्या जातीचे लोकांच्या आहेत या सर्व पलटणी आक्टोबरच्या सुमारास लढाईच्या उपयोगीं पडण्यासारख्या होतील असें आहे. आल्हाबादेहून ब्रिगेडियर बर्कली यांच्या हाताखालीं जी फौज अयोध्येमध्यें गेली आहे तिणें बंडवाल्यांपासून दोन किल्ले घेतले. त्यांपैकीं एका किल्लयापुढें बंडवाल्यांचा फार नाश जाला. अयोध्येमधील लोकांपैकीं सांपडतील तितके लोक बंडखोरांच्या पक्षापासून सुटके करून त्यांस आपल्या पक्षास मिळवून घेण्याकरितां इंग्रेजांनीं त्या लोकांशीं जी वर्तणूक चालविली आहे. तिचा उद्देश सिद्धीस जाऊं लागून पुष्कळ मोठाले तालुकदार इंग्रेजांस येऊन मिळत चालले आहेत. व जे अजून बंडवाल्यांस मिळून आहेत त्यांपैकीं ही पुष्कळ आसामी पावसाळा पुरा होऊन इंग्रेजी फौज पुढें बंडवाल्यांवर चाल करूं लागली, म्हणजे त्यांच्या बाजूस राहाणार नाहींत असें अयोध्येमधील इंग्रेजी अंमलदारांस वाटत आहे परंतु अजुनही जिकडे तिकडेस अयोध्येमध्यें बंडवाल्यांच्या मोठाल्या टोळ्या फिरत आहेत. बेनीमाधव सिंग हा पंधरा हजार लोक व वीस तोफा इतक्या लश्करानशीं पहिल्यानें उनाववर हल्ला करण्याचा आपला बेत बाहेरून दाखवीत होता. कानपुरावर हल्ला करण्याच्या बेतानें उनावच्या खालीं साहा कोसांवर एका ठिकाणीं नदी उतरून येत आहे. अशी बातमी लागल्यामुळें इंग्रेजांहीं एका आगबोटीवर कांहीं लोक

चढवून ती तिकडेस रवाना केली आहे. दिल्लीचा राजपुत्र फिरोझशाहा आणि लक्ष्मणशाहा हे बांगरमौ आणि संदीला एथें आहेत. त्यांणीं तिकडेस फार लुटालूट चालविली आहे. शाहाजहानपूर किंवा पोवेन या दोहोंपैकीं कोणत्यातरीं एका ठिकाणावर हल्ला करण्याचा बेगम इणें बेत करून सुमारें तीस चाळीस हजार लष्करास बरोबर ३० तोफा देऊन तिकडे जाण्याविशीं हुकूम केला आहे. या लष्कराचें आधिपत्य बेगम इणें शाहाजहानपुरास मागें बंडवाल्यांनीं नेमलेला नाजिमखान अल्लीखान यास देऊन खानबाहादूर खान, लखनूरच्या मयत मौलवीचा एक भाऊ व तसेच बंडवाल्यांपैकीं दुसरे कित्येक प्रसिद्ध याच्या हाताखालीं दिले आहेत. या बंडखोर लष्कराच्या मोठ्या भागानें शिकंदराबाद एथें व एका तुकडीनें गोकरनाथ एथें याप्रमाणें जमा व्हावें असा बेगमचा हुकूम जाला आहे. व त्याप्रमाणें रोया किल्ल्यांतून दोन बंडखोर पलटणी यापूर्वींच शिकंदराबादेस येऊन दाखल जाल्या होत्या. व पाठीमागून खैराबादचा बंडखोर चकलदार हरप्रसाद ज्यानें सुमारें पंधरा हजार लोक व बारा तोफा इतक्या लष्करानशीं संदीलाच्या आसपास हल्लीं पराकाष्ठेची लुटालूट चालविली आहे. तो बाकीच्या सरदारान त्याच्या फौजेनसीं बरोबर घेऊन लवकरच शिकंदराबादेस यावयाचा होता. लखनूरचा मयत मौलवी याच्या मिळकतीबाबद बेगम व त्यांचा आपसांत तंटा लागल्याची बातमी आली होती ती खराखुर नाहीं. ती सर्व मिळकत कांहीं एक दंगा फिसाद न होतां खान अल्लीखान व खान बाहादूर खान यांणीं बेगमकडेस पाठवून दिली. लखनूरची बेगम ही अयोध्येमधील सर्व जंगेरांच्या फौजेवर मुख्य आहे, असें दिसतें. तिनें चालत्या पावसाळ्यामध्येंच इंग्रेजांबरोबर युद्धप्रसंग चालू ठेवण्याचा बेत केला आहे. व आपल्या लष्कराच्या एका मोठ्या भागास वर लिहिल्याप्रमाणें शाहाजहानपुराकडे पाठवून दुसऱ्या एका मोठ्या फौजेस शाहाबाद व सोडापाली एथें जमा होण्याविषयीं हुकूम केला आहे. पावसाळ्यामध्यें इंग्रेज लोक आपआपल्या जागींच स्वस्थ बसून राहिले असतां बंडवाले याप्रमाणें आपली हुशारी प्रखरा दाखवूं लागल्यामुळें रोहिलखंडामध्यें नाखुष जालेल्या लोकांस पुनः उत्तेजन येत चाललें आहे असें म्हणतात. धु.के.

---

तारिख २४ वीचे दिल्लीग्याझेट पत्रावरून कळतें कीं, राणीमाधव आणि रघुनाथसिंग यांची छावणी नेझरखेरा एथें होती. त्यांणीं आपणाबरोबर १३५०० लोक आणि १७ तोफा घेऊन ता. १९ जुलैस कलीकंकर ठिकाणीं किंवा प्रतापगडाजवळ चाल केली आहे. कलीकंकर ठिकाण गंगानदीच्या कांठीं माणीकपूर या नांवें एक स्थळ आहे. त्याचे वायव्येस तीन मैलांवर आहे. इं.ग्या

---

टेलिग्राफ पत्रांत असें आहे कीं दक्षिण महाराष्ट्र देशांतील जमखिंडीस कप्तान एथरीज साहेब हे जमखिंडीकर प्रतिबंधांत आहेत व त्यांणीं आपणास मुक्त करण्याविषयींचा अर्ज सरकारास केला तो अर्ज पोलिटिकाल साहेब यांजकडेस रिपोर्ट करण्याकरितां आला आहे. त्याची चौकशी व्हावयाची आहे तेव्हां सदर्हू बद्दल साक्षीपुरावा असल्यास चौकशी करण्यास सदर्हू साहेब जमखिंडीस गेले आहेत असें समजतें.

हें पत्र पुणें ज्ञानप्रकाश छा. कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांनीं छा. प्र. के.

# ज्ञानप्रकाश

गुरुवार तारिख १९ आगस्ट सन्न १८५८ इसवी.

## ज्ञानप्रकाश ता. १९ आगस्ट सन्न १८५८

आम्हांस सुरतेच्या बातमीदारानें असें नजकूर कळविला आहे कीं, सुरतजिल्ह्यांत सरभाणचा मामलेदार अज्जम जेगलाल हरिभाई यांस मेहेरबान डेविससाहेब यांनीं सुमारें २३ महिनें कामावरून केलें होतें त्याची चौकशी सरकारानें करून त्याजवर बिलकुल शाबिदी मेहेरबान डेविस साहेब यांजकडून जाली नाहीं. सबब त्यास आपले कामावर नेण्याविषयीं सरकारानें हुकूम फर्माविला आहे. त्याप्रमाणें गेल्या सरकारी ग्याझिटांत यास बगवारा एथें नेमिल्याचें आम्हांस समजलें आहे. सदरहू मामलेदार यास विनाकारण ६९० दिवस अमानतपणा भोगावा लागला. त्याचा शीण सरकारानें त्यास जागा दिल्यामुळें गेला. आतां त्या मामलेदारास तेवीस महिन्यांचा पगार मिळावयाचा आहे त्याविषयीं सरकारानें विचार केला असेलच. परंतु तो आमचे समजण्यांत अरबस्ताठेवण्यासारखा आला नाहीं.

सुरतेहून ता. ११ आगस्टचें पत्र एका गृहस्थास आलें आहे. त्याजवरून कळलें कीं, सदरहू जिल्ह्यांतील अज्जम इजतअली मुनसफ यांणीं आपल्या नौकरीबद्दलचें आपणास पेनशान मिळण्याविषयीं सरकारास अर्ज केला आहे. भडोचचे अदालतींतील रा. रा. उत्तमराम म्हणून एक वकील होते ते मरण पावले. हे आपले कामांत काबील असत. आणि लोकहीतास फार चाहात होते. त्याचे मरणानें भडोचचे

पुष्कळ लोकांस वाईट वाटत आहे.

---

## जाहिरात.

खालीं सही करणार देतो जे आमचें घर खासगत वारसपनावरून शहर पुणें येथील पेंठ शुक्रवार येथें आहे. त्या घरांत आमचे मार्फतीनें राहाणार जमना कोम कान्होजी कामे गोंडी ही राहाते. तें घर ती मनीराम बिन कान्होजी मोरवाल यांस गाहाण लावून देणार असें आम्ही ऐकिल्यावरून घर गाहाण लावून घेणारास व देणारणीस या जाहिरातीनें कळवितों कीं, सदरहू घरावर बाईचा वारसा नसून ह्या घरांत तिला आम्ही धर्मादाय जागा राहाण्यास दिली असतां तिला हें घर गाहाण लावून देण्यास व विकण्यास अधिकार नाहीं असून कपटानें हें घर गाहाण लावून देणार म्हणून समजल्यावरून ही जाहिरात ज्ञानप्रकाश वर्तमानपत्र कर्त्याचे मार्फत पत्रांत दिली आहे तर या घराबद्दल तुझी काय मालकी असेल ती आठ दिवसांचे आंत या पत्रकर्त्याचे मार्फतीनें कळवावी. तसें तूं न केल्यास सदर घराबद्दल जो आम्हांस खर्च लागेल तो तुजपासून भरून घेतला जाईल. हें तुला कळविण्याकरितां ही जाहिरात दिली आहे.

तारि. १८ आगस्ट सन १८५८ इस. — सही रेवजी नाईक बिन मुरारजी वारवाल गोंडी निशाणी गज

---

पुणे पोलिसाकडून शहरांत असी ताकीद फिरली गेली आहे कीं, डोल्यांचे दिवसांत कोणीही काठी हातांत घेऊन रस्त्यांत फिरूं नये.

येथें शांनगारी नाटककार द्रौपदी स्वयंवर आख्यान करणार त्यांत मत्स्ययंत्रभेद चांगला करणार आहेत.

## ज्ञानप्रकाशकर्त्यांस

विनंती विशेष. हा आम्हीं पाठविलेला मजकूर आ-पले फर्द ज्ञानप्रकाशपत्रांत कृपा करून घ्यावा.

**मुक्काम उरुकर नजीक वालेर**—मिती आषाढ वद्य १४ रोज रविवार.

१ इकडील आसमंतात बदमाष लोकांनीं ठिकाणीं जागोजाग उचल केल्याचीं चिन्हें दिसून येऊं लागलीं आहेत. सांप्रत इलाख्यांत बहुतेक ठिकाणीं स्थलेवर बागी, (बंडवाले) लोक बहुत जुलूम जबरदस्ती करितात म्हणून गाऱ्हाणी ऐकण्यांत येत आहेत.

१ पोहरी म्हणून एक ठाणें सिंगोले देशमुख यांचें आहे येथें पाडोण वाला ठाकूर याणें दखल केल्याची बातमी येऊन पोंचली आहे. त्याचा बंदोबस्त करण्याची त्वरा येथें होत आहे.

१ श्रीमंत दिवाणसाहेब श्रीमंत दिनकरराव जी यांस दुखणेंसें आलें. असाच महाराजसाहेब जयाजीराव शिंदे बहादूर यांस थोड्याच दिवसांत होईल ही उमेद आम्ही सर्व लोक करून ईश्वराजवळ प्रार्थना करीत आहों.

१ आजूबाजूस थोडीबहुत गडबड झाली म्हणजे आमचे कुरकरी गुंडे उलाढाल करण्यास सिद्ध होतात ही अनादिसिद्ध येथील रीत आहे, त्याप्रमाणें आतांही पुनः त्यालुच्चे लोकांचीं घुरेंद्रिवें व वस्तादि खवळून गेले आहेत. ते रोज नवनव्या गप्पा बनावून लोकांस खरेखर भासण्याचे डोलानें चांडाळ चौकडीत बसून वल्गनाकरूं लागले आहेत. त्याचा परिणाम कसा होईल तो पुढें समजेल

१ आमचे रघुनाथ भटजी बक्षी यांचे एकदांदेखें पारडें उचललेलें अद्यापि तसेंच आहे. औषधोपचार आंग्रे यांचे गोविंद श्रीपतराव म्हणून एक गृहस्थ उजाडाचीं लाविला आहे त्याजकडची होतात.

१ येथून कांहीं फौज झांशी कडेस गेली म्हणोन लोक बहुत बोलतात.

आपला मित्र शुभचिंतक.

---

**नगर**, तारिख ६ आगस्ट—एथें तीन आठवड्यांत मेघवृष्टि झाली नाहीं. मागें कांहीं झाली यामुळें मूग, उडीद, बाजरी वगैरे धान्याचीं पिकें भरपूर आलीं आहेत.—गेल्या महिन्यांत एथें सातों अगर आठ शें गोरे लोक आले, ते पोक्त वयाचे नाहींत, ज्या बराकांत ते राहातात तेथून भिंगार हें गांव नजीक आहे. ते लोक गांवांतून लोकांच्या दरवाज्यांस धक्के मारतात, याचा आम्हांस फार खेद वाटतो.

भागोजी नांवाचा भिल्लांचा नाईक आकोलें तालुक्यांत पुनः उमगला आहे. त्यावर पोलिसचे स्वारांची तुकडी गेली आहे. व मेहेरबान कप्तान भार्थर साहेब सुपरिंटेंडेंट यांची स्वारी तिकडे गेली आहे.— कांहीं दिवसांमागें एथील नेटीव कम्यानडेंट आब्राहाम दावीद यांनीं कांहीं तालुक्यांतून बहिमी व बंडास सामील असणाऱ्या कमारें दीडशें लोकांस पकडून आणलें आहे. ते तुरुंगांत कैदेंत ठेविले आहेत. त्यांतील एक उगारपत्याचा दिन दयालीं जेरी हा तुरुंगांतून पळून गेला. तेथें पाहारा असून तो गेला हें मोठें नवल आहे. तुरुंगाचा बंदोबस्त लक्ष्यांत आणल्यास बंदिवान म्हणजे एथून निसटून जाईल असें कोणाचे स्वप्नीं देखील यावयाचें नाहीं. तुरुंगास भिंतीचे दोन तट आहेत व यांचे हीआंत बंदीवानांच्या कोठड्या आहेत. एथें बंदिवानांची रात्रीं घटका दोन घटिकांनीं वरचेवर हजरी घेत असतात. त्यांत दोन वाजतांची हजेरी झाली. त्या वेळेस तो असून नंतर त्यानें

एक वासाचे अन्तरांत बाला दिला. प्रथम कोठडीचे आढयाचे वरील भक्या मोडल्या. व अवाज होऊं न देतां आपले घोगडींत वरची शेंसवाशें कउलें उतरून त्यानें खालीं ठेवलीं. आणि घरावरून खालीं उतरला. नंतर पुढें पहिली भिंत जी समारें अडीच पुरुष उंच आहे. तीच डून तिजवरून दुसऱ्या भिंतीवर त्यानें अलात उडी मारली. व तित या उंचीवरून तुरुंगाबाहेरील जमिनीवर दुसरी उडी मारून तो तसाच पार निघून गेला. केवढें धारिष्ट हें ! एके तटावरून ज्या दुसरे तटावर उडी टाकली त्याजमध्यें अंतर समारें आठ नऊ हातांचें वशांत त्या भिंती उंच, जेथून खालीं पाहातां डोळे फिरावयाचे तेथें एकीवरून दुसरीवर उडी मारमारणें कसले मुष्किलिची गोष्ट ! व दोन पुरुष उंचीवरून खालीं उडी टाकणें केवढें जिवावरचें काम! याउपरांत शहरांत रस्त्यानें वरचेवर गस्त चाललीच आहे. असल्या कचाटयांतून सटून गेला. याचा सर्वांस अचंबा वाटतो. त्याचा तपास करण्याकरितां चहूंकडे स्वार व शिपाई गावडतोब पाठविले. परंतु पत्ता लागला नाहीं. कळावे ही विनंती.

तुमचा मित्र नगरकर.

---

प्रयाग,— एथून असें समजलें आहे कीं, ब्रिगेडियर बरक्लेसचे सैन्यानें डेहाम, ठरोल, आ॰, भीसपूर या गांवाचे तीन किल्ले बंडवाल्यांपासून हस्तगत केले. सदहू किल्ल्यांपैकीं दोन किल्ले मजबूर होते, सबब ते हस्तगत करून घेते वेळेस बंडवाल्यांचे पांचशें लोक मारले गेले. व आमच्यांपैकीं एक गोरा ठार मेला आणि दोन सूर्याचे किरण लागून मेले. लेफटेनंट व आडजुटंट ग्राहाम हाही त्यांत जखमी जाला. आणि दाहनेशिन घोड्यांवरून खालीं आले, सदरहू मजकूर आवझर वराधारें लिहिला आहे.

---

सरकारी बातमी,— नेकनामदार लार्ड एल्फिन्स्तन साहेब यांणीं मेहेरवानी करून खबर, जनरल राबर्टसन साहेब यांणीं ग्वालेर आणि कोट्याचे बंडवाल्यांबरोबर युद्ध केल्याविषयींची दिली ती येणें प्रमाणें.

इंदुरहून ता० १४ आगस्ट रोजीं दिवसास १० दाहा बाजतां सर राबर्ट हामिल्टन साहेब हे तारायंत्र द्वारें कळवितात कीं, जनरल राबर्टसन साहेब यांणीं ता० ११ मिनहूस बागूचे छावणींतून कळविलें कीं, बंडवाले पश्चिमदिशेस गेले, आणि त्याविषयीं असें म्हणतात कीं, त्यांचा बेत चतुर्भुज किंवा मारवाडांत उतरण्याचा आहे. परंतु आम्हांस असें वाटतें कीं, ठकुर लोक त्यांस कांहीं मिळतील असें दिसत नाहीं. करनल होम्स साहेब आम्हांस घेऊन निघाले आहेत.

---

राणी माहाराजांची ९१ वावी पलटण हिंदुस्थानांत त्वरित येत आहे. ती मुंबईस उतरून आगगाडीतून पुण्यास येऊन नंतर कामती छावणीकडेस रवाना होणार आहे. तेथें पावसाळाभर राहून नंतर मद्रास खात्यांत सदहू पलटण ठेवणार आहेत.

---

आवझ.

बंगाल खात्यांत गोरे स्वारांच्या एक टोळी भरणार म्हणून ऐकिलें होतें. परंतु हाली असें समजलें आहे कीं, स्वारांच्या दाहा पलटणी उभारणार आहेत.

---

किल्ला,— असे म्हणतात कीं, लखनौ एथें एक मोठा किल्ला बांधून त्यांत इंग्रेजी मोठी फौज ठेवणार आहेत. चं॰सा॰

**वाई,** — येथील कोर्टाचे मुनसफ रा॰ रा॰ [illegible] राव रामाजी आहेत त्यांजपुढें एका मोकद्दम्यांत ७ रुपयांचें खत आलें. त्यावर मराठी आणि मुसलमानी [illegible] साखें होती. यांतील मराठी खावरून पाहातां तें खत १२ वर्षांचे आंतील होतें. आणि आरबी खावरून तें १२ वर्षांचे बाहेरील होतें. असें सदरहू मुनसफांचे नजरेस आल्यावरून त्यांणीं सदरहू विषयीं बारकाईनें चौकशी केली. त्यांत अपराध घडले-ला असावा असा वहीम आल्यावरून सदरहू मोकद्दम्यांतील वकील शंकर आबाजी यांस व खत लिहिणारे वगैरे लोकांस कमिट करून [illegible] जुडिशियाल कमिशनर यांजकडेस [illegible] रवाना केला. तेथें सदरहू वकिलास [illegible] वर्षांची शिक्षा जाल्याचें ऐकतों. याविषयीं आ[illegible] [illegible] बेसार मजकूर कळल्यावर मागाहू[illegible] लिहूं.

---

"**आहाबकेश्वर,** — ता॰ १० आगस्ट ए-थें एकंदर पर्जन्य १८४ इंच पडला. असें पर्जन्यमापक यंत्रावरून कळून आलें आहे. या ठिकाणीं प्रतिवर्षीं अदमासें २५० इंच सर्व पावसाळ्यांत पाऊस पडतो. असा रजिष्टरावरून अदमास आहे. या वर्षी इतक्यांतच किती पडला हें सदरील वरून ध्यानांत येईल. या वर्षी व्याघ्राचा उपद्रव कांहींसा जास्त जाला आहे. बाजारांत देखील रात्रीं पारधीस येऊन व्याघ्रानें म्हशी कुत्रीं वगैरे जनावरें नेलीं. असा बोभाट ऐकण्यांत आला आहे, पण मनुष्यास इजा जाल्याचें वर्तमान आमच्या ऐकण्यांत आलें नाहीं."

---

**पुणें,** — येथील पोलिसांतील दोन शिपायांनीं सोनो नारायण गुजराथी यास जबर मारिलें. याविषयीं चौकशी होऊन असिस्टंट माजिस्ट्रेट साहेब यांणीं प्रत्येकास चार महिन्याच्या शिक्षा ता॰ १२ मिनहू सं ठरवून सदरहू शिक्षा मंजूर होण्याकरितां मुख्य माजिस्ट्रेट साहेब यांजकडेस कागदपत्र रवाना केले असें समजलें आहे.

---

**तांब्याचें नाणें,** — विलायतेहून सदरहू नाणें एके रुपयांत ६४ वें आलेलें आहे, हें प्रसिद्धच आहे. व त्याचे तिपदीनें, ज्यास पया म्हणतात. हें ही व्यवहारांत सुरू आहे. हालीं नवीन जसा अधेला आहे, या मानाचें म्हणजे एके पावआण्यांत दोन असें आलें आहे. त्यास नांव काय व्यवहारांत पडलें आहे हें अजून समजलें नाहीं परंतु सदरहू तांब्याचें नाणें विलायतेहून मुंबईस येऊन दाखल जालें आहे. व तें सर्व ठिकाणीं लवकरच प्रसिद्ध होईल या किरकोळ नाण्याची गरज हिशेबांत वारंवार पडते ती दूर होईल.

---

**फ्रेंड आफ् इंडिया,** — ता॰ ५ आगस्टचे पत्रावरून कळतें आहे कीं, गवरनर जनरल साहेबांनीं अशी परवानगी दिली आहे कीं, मडमांनीं कानपुरापर्यंत जावें, कारण तिकडेस स्वस्थता जाली आहे.

---

टेलिग्राफाचे समजण्यांत असें आलें आहे कीं, आल्हाबादेहून कानपूरापर्यंत आगीचे गाडी चा रस्ता पुढील महिन्यांत तयार व्हावयाचा निश्चय जाला आहे.

---

**दिल्ली,** — एथें अशी अवाई उठली आहे कीं, मौलवीची गरदन कापणारा जोधपोआरीचा राजा याचें शहर बंडवाल्यांनीं आपल्या हस्तगत केलें आहे. व॰ सा॰

---

हें पत्र ज्ञानप्रकाशकर्ता॰ कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांणीं छा[illegible]

वाई,— एथील कोर्टाचे मुनसफ रा. रा. ... चंद्रराव रामाजी आहेत त्यांजवळ एका ... द्म्यांत ७ रुपयांचें खत आलें. त्यावर मराठी आणि मुसलमानी अशीं सालें होतीं. त्यांतील मराठी सालावरून पाहातां तें खत १२ रुपयांचें आंतील होतें. आणि आरबी सालावरून तें १२ वर्षांचें बाहेरील होतें. असें सदरहू मुनसफांचे नजरेस आल्यावरून त्यांणीं सदरहू विषयीं बारकाईनें चौकशी केली. त्यांत अपराध घडलेला असावा असा वहीम आल्यावरून सदरहू मो... तील वकील शंकर आबाजी यांस व ... लिहिणार वगैरे लोकांस कमिट करून ... ज्युडिशियाल कमिशनर यांजकडेस ... रवाना केला. तेथें सदरहू वकिलास ... शिक्षा जाल्याचें ऐकतों. याविषयीं आम्हांस ... मजकूर कळल्यावर मागाहून ... लिहूं.

---

... ळेश्वर,— ता. १० आगस्ट एथें एकसरें पर्जन्य १०४ इंच पडला. असें पर्जन्यमापक यंत्रावरून कळून आलें आहे. या ठिकाणीं प्रतिवर्षी अदमासें २५० इंच सर्व पावसाळ्यांत पाऊस पडतो. असा रजिष्टरावरून अदमास आहे. या वर्षी इतक्यांतच किती पडला हें सदरील वरून ध्यानांत येईल. या वर्षी वाघाचा उपद्रव कांहीं सा जास्त जाला आहे. बाजारांत देखील रात्रीं पारधीस येऊन व्याघ्रानें म्हशी कुत्रीं वगैरे जनावरें नेलीं असा बोभाट ऐकण्यांत आला आहे, पण मनुष्यास इजा जाल्याचें वर्तमान आमच्या ऐकण्यांत आलें नाहीं."

---

पुणें,— एथील पोलिसांतील दोन शिपायांनीं सोनो नारायण गुजराथी यास जबर मारिलें. याविषयीं चौकशी होऊन असिस्टंट माजिस्त्रेट साहेब यांणीं प्रत्येकास चार महिन्याच्या शिक्षा ता. १२ मिनहू संठरवून सदरहू शिक्षा मंजूर होण्याकरितां मुख्य माजिस्त्रेट साहेब यांजकडेस कागदपत्र रवाना केले असें समजलें आहे.

---

तांब्याचें नाणें,— विलायतेहून सदरहू नाणें एके रुपयांत ६४ वें आलेलें आहे, हें प्रसिद्ध व आहे. व त्याचे तिपटीचें ज्यास पया म्हणतात. हें ही व्यवहारांत सुरू आहे, हाल्लीं नवीन जसा अधेला आहे, या मानाचें म्हणजे एके पावआण्यांत दोन असें आलें आहे. त्यास नांव काय व्यवहारांत पडलें आहे हें अजून समजलें नाहीं परंतु सदरहू तांब्याचें नाणें विलायतेहून मुंबईस येऊन दाखल जालें आहे. व तें सर्व ठिकाणीं लवकरच प्रसिद्ध होईल या किरकोळ नाण्याची गरज हिंदोवांत वारंवार पडते ती दूर होईल.

---

फ्रेंड आफ् इंडिया,— ता. ५ आगस्टचे पत्रांवरून कळतें आहे कीं, गवरनरजनरल साहेबांनीं अशी परवानगी दिली आहे कीं, मडमांनीं कानपुरापर्यंत जावें, कारण तिकडेस स्वस्थता जाली आहे.

---

टेलिग्राफाचे समजण्यांत असें आलें आहे कीं, आलाहाबादेहून कानपूरापर्यंत आगीचे गाडीचा रस्ता पुढील महिन्यांत तयार व्हावयाचा निश्चय जाला आहे.

---

दिल्ली,— एथें अशी अवाई उठली आहे कीं, मौलवीची गरदन कापणार जो प्रो आणी त्रा राजा यानें शहर वडवाल्यांनीं आपल्या हस्तगत केलें आहे. द. सा.

हें पत्र ज्ञानप्रकाश छा॰ कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांणीं छा॰

# ज्ञानप्रकाश

सोमवार तारिख २३ आगस्ट सन्न १८५८ इसवी

## पत्राचीकिंमत

१० दरसाल रुपये १॥ आगाऊ दिल्यास.

## वसूलरुपये

१० आज्जम रामचंद्र बल्लाळ मामलेदार ता० पावळ.

१० पांडुरंग गोपाळ अकूर्डि मामलेदार तालुके चांदवड.

## ज्ञानप्रकाश ता० २३ आगस्ट १८५८ इ०

**कुंच**,— एथचा इंग्रेजसरकारचा दोस्त संस्थानी याचा पराभव बंडवाल्यांनीं करून त्याच्या दोन तोफा घेतल्या. आणि तें शहर बंडवाल्यांचे हस्तगत जालें. कित्येक असें म्हणतात कीं, या बंडवाल्यांमध्यें ५०० स्वार व शिपाईलोक आहेत. हा पराभव कोणत्या रोजीं जाला याची तारिख दिली नाहीं. तरी जुलैच्या अखेरीस हें कृत्य घडलें असावें असें दिसून येतें. कारण कीं, चालत्या महिन्याच्या १ ल्या तारिखेस गोऱ्या २ आणि काळ्या मद्रासी ७ कंपन्या व २ तोफा अशी फौज काल्पीहून आलम मुकामीं जाण्याकरितां निघाली. आणि ती फौज तेथें जाण्याचा मतलब हाच कीं, ते बंडवाले स्वार व शिपाई आणि इतर त्या बरोबरचे आडमाड लोक यांचा बेत त्या ठाण्यावर हल्ला करण्याचा होता. सदरहू मजकूर पुणें आबझरवराधारें समजतो.

---

**मोहोरम**,— महिन्याच्या १० वे तारिखेचा यासाली गोंधळ पडला होता. कोठें शनिवारची १० वी ता० असें मुंबई व पुणें एथील काजीमौलवी याचे मतानें ठरलें. असा मतभेद पडण्याचें कारण हेंच कीं, हिंदु व मुसलमान यांचें चांद्रमान आहे. चांद्रमानानें हा घोंटाळा पडतो. सौरमानानें हा मतभेद राहावयाचा नाहीं. या इमामजयंतीमध्यें कांहीं कमजास्ती सांगण्यासारिखें घडलें नाहीं. व गुदस्तांपेक्षां सालमजकुरीं ही जयंती थंडपणें शेवटास गेली. गेल्या १८ वे तारिस रात्रौ एक सबदागिराचा घोडा डोल्यांच्या टामटुमीनें बुजून ठाण्यावरचा सुटला. तो रस्त्यानें उधळत चालला. तेणेंकरून कित्येक लोकांस पळापळीच्यायोगें पडून लहान साहानशा जखमा जाल्या. परंतु एथें एका ब्राम्हणाच्या १० वर्षाच्या मुलास या घोड्याची टाप कानसुला जवळ लागली, त्यामुळें तो आसन्नमरण जालेला आहे. या इमामजयंतींत सालगुदस्ताप्रमाणें हत्यारें काठी तमासगीर लोकांनी घेऊन फिरण्याची मनाई होती. १० वे तारिखेस डोले मिरवत जाऊन थंड जाले. त्यांची संख्या १७० होती. लष्करांतील ताबूद सालाबादप्रमाणें शहरांतून नजातां परस्परें गेले. मुसलमानांचे डोल्यांपेक्षां हिंदूंचेच पुष्कळ होते. पर्जन्य पडला नाहीं यामुळें मोहोरम सुका गेला. मुंबईस डोले नेण्याच्या दिवशीं समुद्रांत गलबतांतून पलटणी लोक ठेवून बंदोबस्त चांगला केला होता. व पुण्यासही पोलिसानें चांगला बंदोबस्त ठेविला होता. डोले जाण्याच्या दिवशीं कांहीं साहेबलोक व मडमा शनवारचे वाड्यांत येऊन बसल्या होत्या.

---

मुंबई— एथील राज्यसंबंधी व्यवस्था या इलाख्यांतील राजव्यवस्थेहून कांहीं भिन्न आहे हें पुष्कळांस माहित आहे. याचें कारण कीं, तेथें विलायतेचे राणीसरकारचा पूर्ण अंमल आहे आणि इलाख्यांत कंपनीसरकारचा अंमल आहे. तेथें शहरांतील संभावित, ज्यांचें उत्पन्न संभावितरीतीनें राहाण्यासारखें, आणि ज्यांची इंग्रेजी आदिकरून भाषेंत व विद्येंत अभिज्ञता, अशा प्रकारचे माहाजन लोकांस शहर संबंधी व कित्येक राजकीय संबंधांत योजितात. तेथें जुऱ्या म्हणजे आपल्यांत सरकारांतर्फे पंचाइती नेमण्याची मामूल वहिवाट होती त्या आधारेच्या नेमण्याची चाल मुंबई पर्यंत आहे. तेथें ग्रांटजुरी, पेटीजुरी, जस्टिस आफ् धिपीस वगैरे नांवाच्या पंचायती आहेत. या पंचायतींत एतद्देशीय हिंदू, पारशी, यवन, खिस्ती, आदिकरून जातीचे व युरोपियन लोक असतात. गेल्या गुरुवारीं जस्टिस आफ् धीपीसची सभा तेथील शहरदुरुस्तीचे कामावर पंच नेमण्याकरितां भरली होती त्या समयीं त्या सभेचे कित्येक सभासद परस्थळीं राहातात ते कोठें गेले होते. साहेब लोक गेल्याचें ऐकतोंच व एतद्देशीय कांहीं बाहेर असल्यास गेले असतील. या सभेची रीति विलायतेच्या सभेप्रमाणें असावी, तरी झाली नाहीं. असें त्या सभेच्या क्रमावरून दिसून येतें. एतद्देशीय लोकांस सभेच्या कामांत जरी तरफदारी वगैरे केव्हां केव्हां होते तसाच प्रकार या सभेचा बनून आला असें लोक त्या सभेच्या कामकाजावरून लोक म्हणूं लागले. आणि तसें म्हणण्यासारिखें कारण ही दिसून येतें. हल्लीं मुंबईचे शहरदुरुस्तीकरितां करयेण्याची वगैरे व्यवस्था केली आहे. याविषयीं सालमजकूरचा २५ वा आक्ट वाचून पाहिला असतां समजेल. त्यामुळें उत्पन्न जास्ती वाढेल यांत अंदेशा नाहीं. तेव्हां पंचास पगार देण्याचें ठरलें आहे. पगाराविषयीं असा ठराव केला आहे कीं, ज्या पंचांस सरकारी पगार असेल, त्यांस या शहरदुरुस्तीचे कामामीत्यर्थ सालीना बारहजार रुपये; व ज्यांस
५०००
सरकारी पगार नसेल, त्यांला सालीना दाहाहजार १०००० रुपये वेतन द्यावें. आतां पंच नेमणें ते सदर्हू सभेच्या बहुमतानें जो निवडेल तो करावा. असा ठराव आहे. याप्रमाणें तेथें बहुमतानें डाक्तर विंचेस्टर जो पूर्वी महाबळेश्वरचा कलेक्टर होता आणि हल्लीं सरकारी वैद्यकीय खात्याचे भांडाररक्षक आहेत त्यांस, व डाक्टर ब्यूस जे पूर्वी बंबे टैम्स पत्राचे कर्ते होते आणि हाल्लीं बंबे स्टांडर्ड पत्राचे कर्ते आहेत यांस पंच नेमण्याचें ठरलें. या लोकांस या जागा कशा मिळाल्या व त्या जाग्यांस हे कितपत योग्य आहेत आणि त्यांस काम किती आहे याविषयीं पुरी माहिती मुंबईचे बाकबगारांस असेलच; परंतु आम्हांस असें दिसतें कीं, या जागा फक्त पैन्शनी शाश्वत आहेत असें त्या जाग्यांच्या स्वरूपावरून व त्या जाग्यांवर युरोपियन लोकांच्या उड्या व तजविजी पाहूनच अनुमान करतां येतें. मुंबई शहरांत या जागेस पुरे लायक आहेत त्यां नेटिवांपैकीं एकद्यास मिळावी ती न मिळतां उद्योगी साहेब लोकांनीं मिळविल्या याचें आश्चर्य वाटतें. आणखी सभेच्या सभासदांनीं कोणाएकास नेमण्याविषयीं रुकारांचीं किंवा नाकाराचीं मतें दिलीं आहेत तीं प्रसिद्धीस आणलीं हें सभेच्या थोरवीस हें मोठें लांछन आलें याचें आम्हांस फार वाईट वाटतें. विलायतेस अशा प्रकाराची फजीती झाली असती.


**लखनूर** ता. ७ आगष्ट,— आम्हीं पुनः लखनौ घेतल्यापासून आम्हांकडे वेणीमाधव, व उमरावसिंग माहाल आहेत. बाबासाहेब अथवा त्यांचा पुतण्या हे बैरेश एथें आज तारिखेस आहेत, फैजाबाद आणि गोरखपूर यांमध्यें पत्रव्यवहार करडीव चालला आहे. राजा मानसिंग याचे इस्पितळांतील जखमी लोकांस दवा देण्याकरितां डाक्तर लोक नेमिले आहेत. आमच्या आसमंतात् स्वस्थता होत चालली आहे. जुने कानपूर आणि मोहनट ह्या रस्त्यावरून बंदोबस्ताकरितां पोलिसाचे स्वार व पायदळचे लोक ४०० ठेवणार त्या लोकांची भरती होत आहे. त्या कामाकडे ७ लष्करी व १ दिवाणी अमलदार नेमिले आहेत. मेसोरी तिवारी या नांवाचा एक पलटणचा शिपाई याणें बंडाचे समयीं मिस्तर डंकन याचे कुटुंबाचें संरक्षण मोठ्या हिमतीनें व चतुराईनें केलें, आणि त्यास कांहीं दिवसांनीं स्वस्थता जाल्यावर छावणींत नेऊन ठेवलें, त्यांणीं त्या इमानी शिपायाचे मोठे उपकार मानिले. मग त्यास कामगार लोक भरवशाचीं कामें सांगूं लागले. तीं हीं कीं, त्यास शत्रुकडील बातमी आणण्याचें काम १४ जुलई १८५७ पासून हेरपणाचे कामावर नेमिलें. त्याणें जिवावरचें काम असें केलें कीं, एके दिवशीं सदरहू मेसोरी तिवारी शिपाई हा आंगावर चिंध्या घेऊन भिकाऱ्याचे रूपानें शत्रुच्या लष्करांत गेला, तों तेथील त्याचे पलटणींतले लोकांनीं त्यास ओळखिलें. आणि हा कपटानें आला आहे असें समजून त्यास कैदेंत ठेविलें. त्याणें खरें कारण सांगावें म्हणून त्यास डागही दिला. परंतु त्यानें तसें न करितां त्यांचे पाहाऱ्यांतून पळून आम्हांकडेस आला. शत्रु कोठें आहे व कोठें कूच करणार आहे अशा प्रकारचीं कामें वरचेवर साहेब लोकांनीं सांगितलीं तितकीं त्यानें मोठ्या भरंवशाचीं केलीं. कित्येक वेळां तो झाडावरच बसून राहून आपला मतलब साधून आम्हांस बातमी आणून देई. या प्रमाणें त्या शिपायानें आमचीं कामें मोठीं स्तुत्य केलीं. व हाली त्यास लखनूचे शहरांतील पोलिसांचा जमादारीचें काम सांगितलें आहे. आणि त्यास पुढें सरदार बाहादर हा पहिल्या प्रतीचा किताब मिळावा याबाबे तेथील कमिशनरानें सरकारास लिहिलें आहे. यावरून पाहा कीं, हा सरकारचा मोठे योग्यतेचा मनुष्य शिपायांत होता. कारण पडल्यावर त्यानें आपला इमानीपणा, धीटपणा, हा अर्पण करून इतरांस दाखविण्याचीं योग्य कामें केलीं, तीं आम्हीं प्रसिद्ध केलीं आहेत. बं. ग्या.

---

## चंद्रग्रहण.

शके १७८० कालयुक्त नामसंवत्सरे श्रावण शुद्ध १५ भौमवासरे. ता. २४ माहे आगष्ट सन्न १८५८ इ.

| | स. का. | मध्यका. | मो. का. | पर्वका. | ग्रास |
|---|---|---|---|---|---|
| घ. प. | २९ ५२ | ३२ ५४ | ३६ २१ | ६ २२ | ४ ५८ |
| क. मि. | ५ ५५ | ६ ५६ | ८ २७ | २ ३३ | . |




---

वर्तमानसारावरून कळतें कीं, सुरत येथील नाझर यानें एका गृहस्थाचे मिळकतीवर हुकुमाखेरीज टांच लाविली म्हणून त्याजवर आरोप आला आहे.

---

अयोध्येच्या माजी नवाबाच्या मुलानें आणि त्याच्या वकिलानें नेपाळच्या माहाराजाला आणि जंग बाहादुराला कांहीं पत्रें पाठविलीं त्यांत असें लिहिलें होतें कीं, "या इंग्लिशांनी मुसलमान आणि हिंदू यांचे धर्म बुडवून सर्वांस बाटविण्याकरितां पहिल्यापासून आजपर्यंत फार जुलुम केले, आणि एतद्देशीय राजे रजवाड्यांशीं दगाबाजीची वर्तणूक केली. आणि आणखीही पुष्कळ वाईट गोष्टी केल्या म्हणून आपल्या धर्माच्या संरक्षणार्थ त्यांसीं युद्ध करून त्यांचा निःपात करावा हें हिंदू मुसलमानांचें कर्तव्य आहे. तुमच्या आणि आमच्या वडिलांचा फार घरोबा होता, सबब जें आम्हांस मिळेल तें तुम्हांस आणि जें तुम्हांस तें आम्हांस मिळेल व आपण आम्हांस या सत्कृत्यांत मदत द्याल अशी आशा धरून लिहिलें आहे." इ॰ यास माहाराज जंगबाहादूर यांनी येणें प्रमाणें उत्तर दिलें "ब्रिटिश सरकारचें राज्य या भरतखंडांत चालू होऊन आज शंभराहून अधिक वर्षें जालीं, पण अद्यापि इंग्लिश लोकांनीं आमच्या धर्मांत हात घातला असें कोणीं हिंदूनें किंवा मुसलमानानें म्हटलें नाहीं. हिंदू व मुसलमान ज्या पेक्षां निमक हरामीपणाचे आणि विश्वासघातकीपणाचे दोषी जाले आहेत. त्या पेक्षां नेपाळ सरकार यानें व माझ्यानें त्यांचा पक्ष स्वीकारवत नाहीं. ब्रिटिश लोकांची बुद्धि व शाहाणपणा, विश्वासूपणा, व प्रामाणिकपणा, बोलण्यांत व करण्यांत निष्कपटीपणा, हीं सर्व पृथ्वीमध्यें सूर्यासारखीं प्रकाशतात, यास्तव या श्रेष्ठ ब्रिटिश सरकाराशीं आमचें सरकार कधीं तुटून पडणार नाहीं व कोणाच्या नादीं लागून त्यांशीं वैर करणार नाहीं, व कोणी राजा अभाळाइतका जरी उंच असला तरी त्याला सामील होऊन इंग्रेजांशीं कधीं लढणार नाहीं, हें तुम्हीं पक्कें समजा. हिंदुस्थानांतील हिंदू आणि मुसलमान यांनीं आम्हीं कोणत्या आधारावरून संबंध ठेवावा? आणखी हें पाहा कीं, हिंदू आणि मुसलमान यांशीं सख्य करावें असें माझ्या मनांत असतें तर म्या लखनौस जातां जातां त्यांतून पांच साहा हजारांची कत्तल कां केली असती? आणि आतां ज्यापेक्षां तुम्हीं मला मित्रत्वाच्या नात्यानें लिहिलें आहे, त्या पेक्षां मी तुम्हांस सांगतों कीं, ज्यानें साहेब लोकांचीं बायका पोरें मारलीं नसतील, असा कोणी हिंदू किंवा मुसलमान, मुख्य कमिशनर मांटगमरी साहेब यांजकडे जाऊन आपलीं सर्व हत्यारें त्यांच्या हवालीं करून त्यांच्या स्वाधीन होईल, त्याच्या अपराधांची क्षमा होऊन त्याला मनिश्चितपणें राहण्याची मोकळीक मिळेल. इंग्लिशांशीं लढावें असें अझून तुमच्या मनांत असलेंच तर या पृथ्वींतील कोणीही राजा तुम्हांला सामील होणार नाहीं, यावरून बोध घ्या." इ॰ शा॰ द॰

---

**रत्नागिरी**,—राजापूर एथील मुनसफ यांणीं आपण आजारी आहों येथें औषधांचा उपचार चांगला होत नाहीं. यास्तव रत्नागिरीस औषध घेण्याकरितां येण्यासाठीं रजा द्यावी म्हणून रिपोर्ट केला आहे.—पर्जन्य चांगला पडत आहे. नागली व कांहीं हरीक यांशिवाय इतर शेतकी चांगली आहे.—मालवण ता॰ कणकवली गांवीं तांबडा पाऊस पडल्याची बातमी कोणीं कोल्हापुरास लिहून पाठविली. व येथेंही लोक बोलतात, परंतु त्याविशीं सरकारी रिपोर्ट जाला नसून आम्हांस ही खऱ्या प्रकारें समजली नाहीं. ज॰ मि॰

---

**अयोध्या.**— जुलै महिन्याच्या ३१ वे तारखेच्या दिल्ली गाझेट पत्रांत बंडाप्रकरणीं जें वर्तमान लिहिलें आहे त्याचा सारांश. तुळशीपूर एथें बंडवाल्यांची एक मोठी संख्या जमा जाली आहे. एथें लखनूरची बेगम, चौकाघाट एथून येऊन पोंचली. सफेराझ अली सरकारचा विश्वासू चाकर ज्यास डेप्युटी कलेक्टरचा अधिकार देऊन हैदरगड एथें पाठविला होता. त्यास वाटेंत बंडवाल्यांनीं नागवलें.— वनीमाहादू आपणाबरोबर ७००० फौज व ९ तोफा घेऊन हैदरगडपासून १८ मैलांवर ठाणें देऊन हा लखनुरावर येणार येणार होता. परंतु यास रघुनाथसिंगानें अडविलें असें म्हणतात. रघुनाथसिंग आणि त्याचा पुत्र विसनाथसिंग हे आपल्या खजूरगांव परगण्यांत १५०० लोक घेऊन आहेत. रामबक्स हा २००० लोक व ५ तोफांसहित गंगानदी उतरून रूराजपूर वगैरे प्रांत लुटीत चालला आहे. वसंतसिंग हा समनपाहा एथें आहे. याची इच्छा इंग्रेज सरकारास मिळण्याची होती परंतु रघुनाथसिंगानें जबरदस्तीनें यास आपल्या मिलाफास घेतलें. याजपाशीं १५०० लोक आहेत. विरापूर एथील जमीदार लोक बंडवाल्यांस मिळाले आहेत. यांजपाशीं १२०० लोक ४ तोफा आहेत. काळाबदमाश यास जमीदार लोक येऊन मिळाले आहेत. हत्तीसिंग आणि बथनचा चंदीसिंग याजपाशीं बदरकाचा जमीदार दौलतसिंग हा आहे. काळाबदमाश याजपाशीं १२०० लोक व २ लेढगोन्न म्हणजे तोफा आहेत. माहादुसिंगाचा मुलगा नरपतसिंग हा १००० लोक २१ तोफांसहित रुइया एथें आहे. व यास पाहिजे त्या वेळेस ६००० फौज मिळण्याचें संधान आहे. नरपतसिंग आणि भोपाळसिंग जमासिंगाचा बंधू यास जोतीप्रसाद येऊन मिळाला आहे. हे सर्व फत्तेपूर चौऱ्यायशी एथें १२०० शें लोक बाळगून आहेत. बरवा एथील गुलाबसिंग आणि गंगाबक्स हे हतरा एथें २००० लोक बाळगून आहेत. बरिली एथील बंडवाला सोभ्यासिंग हा कुटुंबकबिला वनीच्या जंगलांत आहे. याजपाशीं फरकाबादेचा नबाब व दुसरे पुष्कळ बंडवाले आहेत मनसबअली आणि दिल्लीचा फिराझशा या उभयतांनीं अयोध्येमधील माहू आणि करारा एथील ठाण्यावर हल्ला करून मोहनचा ठाणेदार मनीराम यास पकडून प्रथम त्याचे हात छाटून मग गाढवावर बसवून शेवटीं मारला. मनसबअली यास पुष्कळ ठाणेदार मिळाले आहेत.

इंग्लिशम्यानपत्रकर्ता म्हणतो कीं, गायकवाड आपलें ठिकाण सोडून संरक्षणाकरितां रसिदंदापाशीं जाऊन राहिले होते. आणि कांहीं लोक जमा करून नंतर पुनरपि गादीवर आले. ८ वे मुंबई काळे पायदळ पलटणीचा लेफ्टेनंट आशा याजबरोबर कांहीं नजराणा देऊन गायकवाडाकडे पाठविला होता.

ब. दी.

---

इलाख्याचा माजी गवर्नर लार्ड फाकलांड यांची बायको गेल्या जुलै महिन्याच्या २ऱ्या तारिखेस मरण पावल्याची बातमी गेल्या टपेच्या डांकेंतून आली आहे. ही इंग्लंडचा एक मरहूम राजा चवथा विल्यम याची कन्या होती. तिच्या मरणसमयीं तिचें वय ५५ वर्षांचें होतें.

स. राबर्टस हामिल्टन हा या महिन्याचे ५ वे तारखेस इंदुरास येऊन पोंचल्याची बातमी आली आहे.

ध. दे.

---

## ज्ञानप्रकाशकर्त्यांस.

याप्रमाणें आम्ही फिरत असतां तारीख ४ मा॰ हे मजकुरीं कसबे राहुरी एथें प्रातःकाळीं मुक्कामास आलों. तेथें संध्याकाळीं तेथील सरकारी मराठी शाळेंत संभावित गृहस्थांची सभा भरली आहे असें समजल्यावरून त्या सभेंत जाण्याची उत्कंठा मनांत उत्पन्न जाली. त्याप्रमाणें बरोबरच्या गृहस्थासह त्या शाळेंत गेलों. जातांच तेथें गर्दीनें परंतु तजविजीनें पुष्कळ मंडळी बसून मधून मधून ग्रामस्थ व उदेकामगार लोक बसले होते. असल्यांचा थाट व डौल पाहून अंतःकरण एकदम आनंदमय जालें. या समाज्यांत मंडळी पाहाण्यांत आली. त्यांत खालीं लिहिलेले गृहस्थही होते.

१ वेदशास्त्रसंपन्न रा॰ रा॰ अमृतशास्त्री बिनमहिपत शास्त्री सभेचे अध्यक्ष.

१ वेदशा॰ संपन्न रा॰ रा॰ गोविंद बल्लाळ शास्त्री उपाध्य॰

१ राजश्री मोहोनीराज त्र्यंबक स्कुलमास्तर—चिटणीस.

१ राज॰ बाबुराव चिमणाजी खजानीस व सभासद.

१ रा॰ रा॰ नारायण बाबाजी मुनसफ कोर्ट राहुरी.

१ रा॰ रा॰ बापूजी नरसिंह फौजदार तालुके राहुरी.

१ रा॰ रा॰ गोपाळ रामचंद्र मामलेदार तालुके राहुरी.

१ रा॰ गंगाराम रघुनाथ नाईक राहुरीकर.

१ रा॰ अंबादास हणमंत वकील.—१ रा॰ रामचंद्र खेमचंद वकील.— १ रा॰ शिवजी सदाराम [illegible] १ रा॰ रामराव नारायण वकील. वगैरे सर्व मिळून बरासरी शंभरसवाशें मंडळी होती.

या सभेचें नांव "नीतिनिर्णयसभा" असून [illegible] विवाद फक्त नीतीपरच [illegible] असतो. व आमच्या समक्ष ही सर्व भाषण नीतिशिवाय दुसरे विषयांवर जालें नाहीं. अशा प्रकारचा संवाद केल्यानें आपण दुराचरणाचा त्याग करण्यास सहज प्रवर्तक होऊं. व सर्व करून आपला कृपाळु निर्माणकर्ता जो जगदीश त्याचे भजनीं रत होऊन शांततेनें, समाधानानें, व आनंदानें आपण आपला अंतकाळ घालविण्यास शक्तिमान होऊं. त्यास केवळ आशेनें नव्हे. परंतु या दुर्मिळ लाभाचा कळस चोंहोंकडे पसरून सर्वत्रांस प्राप्त व्हावा. या उदारबुद्धीनें व हेतूनें सभेंतील प्रत्येकजण मोठ्या उत्कंठेनें साफ व मोकळे मनानें आणि मोठ्या खुशीनें व प्रीतीनें संवाद करितो, असें स्पष्ट दिसून आलें. या संवादांत ज्या शंका निघाल्या होत्या त्या सर्व प्रौढ व कुशल प्रकारच्या होत्या. व त्यांचें समाधानही तसे प्रकारचेंच जालें. आणि जसजशी सभेची वेळ भरत गेली तसतसा संवादही अधिक अधिक उत्कंठेनें व निकरानें होऊं लागून तसतसा त्यास माधुर्य, व मनोरंजकपणाही उत्पन्न जाला. दोघटी सभेचा नियमित वेळ गुजरून गेल्यामुळें सभा विसर्जन जाली.

सांप्रतकाळचा विचार करून पाहूं लागलों असतां आपले सहज नजरेस येतें कीं, अशा प्रकारच्या सभा भरण्याचा प्रघात बहुतकरून हल्लीचे तरुण गृहस्थांतच आहे; व असे प्रकारचे सभेंत जाण्यास शास्त्री वगैरे विद्वज्जनमंडळी निराळाच आनंद मानितात, इतकेंच नाहीं. परंतु उलटे त्यांचा तिरस्कार करून कधीं कधीं त्या मोडकळीस येतील अशा तऱ्हेची तजवीज करण्यास अनमान करीत नाहींत. परंतु सदरील यादींत ज्यांचें नांव आहे ते स्वतः शास्त्री असून या सभेचा अध्यक्षपणा त्यांनीं स्वतः खुषीनें स्वीकारिला आहे. आणि इतरांनीं काढलेले शंकेचें समाधान दिलापासून संतोषानें सौम्यरीतीनें शांतपणानें व लोकांचे मनांत ठसावें म्हणून सुलभ भाषणानें करण्यास प्रीतिपूर्वक झटतात; हें पाहून आम्हांस आनंद जाला एवढेंच नाहीं. तर हे गृहस्थ पुष्कळ स्तुतीस पात्र आहेत.

असें मनांत वाटल्यावरून आपणास मोठे खुषी नें कळविलें आहे. तसेंच, राजश्री मोहोनीराजश्री बक राहुरीचे सरकारी मराठी शाळेवरील पंतोजी, जे त्या सभेचे चिटणीस आहेत तेही स्तुत्य आहेत, असें दिसून आलें, आणि वास्तविक त्यांचे बोलण्याचे व शंका काढण्याचे धाटीवरून त्यांची हुशारी कबूल करण्यास आम्ही उद्युक्त झालों. ही सभा उत्पन्न होण्यास मुख्यतें करून हेच गृहस्थ कारणभूत होत. आणि गांवांतील सर्व लोकांचे मनांत सभेंत जाण्यापासून होणारे अमोलिक नाना प्रकारचे लाभ चांगलेपणानें बिंबवून त्यांस सभेस येण्यास उद्युक्त करण्यास प्रयत्न करण्याचा मान या गृहस्थास व राजमान्य राजश्री नारायणबाळाजी मुनसफ या उभयतांस च उक्त होय.— रा·रा· नारायणबाळाजी मुनसफ, रा·रा· गोपाळ रामचंद्र मामलेदार, आणि रा· बापूजी नरसिंह फौजदार वगैरे सभेंतील सर्व सभ्य गृहस्थ या अशा महत् सत्कृत्य कृत्यास मनःपूर्वक साहाय देऊन आपल्या बांधवांच्या कल्याणार्थ उदारबुद्धीनें झटतात. याबद्दल त्यांची शिफारस केल्याशिवाय आमच्यानें राहावत नाहीं. शेवटीं ह्या सर्व गृहस्थांनीं ज्या हेतूनें हें कृत्य आरंभिलें आहे, तो हेतु सिद्धीस न्यावा अशी दयाळु परमेश्वराचे चरणारविंदीं प्रीतिपूर्वक विनंती आहे.

मुक्काम अहमदनगर }
ता·११ आगष्ट सं·१८५८ }

एक प्रवासी.

---

**ज्ञानप्रकाश** कर्ते महाराज हा आम्ही पाठविलेला मजकूर छापून प्रसिद्ध करावा.

**सोलापूर—**, एथील मेहेरबान क्यांपटण साहेब जडज हे येथून ठाण्यास गेले. माझ्याचे मुनसफ रा·रा· परशरामपंत दामले यांस डोळ्यांनीं कमी दिसतें म्हणून ते कामास नालायक असें क्यांपटण साहेब यांणीं समजून त्यास कामावरून दूर केलें. आणि त्या कामावर सोलापूर अदालतीचे नाझर रा· रामाप्पा यांस नेमिलें. नाझरचे कामावर तेथील अदालतीचे शिरस्तेदार रा· नरहर जनार्दन यांस नेमून शिरस्तेदारीवर रा· राघवेंद्रराव अदालतींतील कारकून यांस नेमिलें आहे.—सदरहू माड्याचे मुनसफ व शिरस्तेदार ज्यास हल्लीं नाझर नेमिलें त्यांणीं, हें केलेलें बरोबर नाहीं याबद्दल सदर अदालतीस अर्ज केले आहेत.

तुमचा मित्र सोलापूरकर

---

## सरकारी वातमी.

**इंदूर,**— ता·१८ आगस्त रोज बुधवार, एथून मुंबईस गव्हर्नर पाठविलें मेजर जनरल राबर्टस रजपुतान्यावरील फील्ड फोर्सचे कम्यांडिंग यांणीं लार्ड एल्फिन्स्तन साहेब यांस पाठविलेली वातमी.

मी आज बंडवाल्यांचे सैन्याबरोबर सुमारें नऊ वाजतां कोठ्यारिया जाग्यास येऊन पोंचलों. हें ठिकाण नाथद्वारापासून उत्तरेस १० मैलांवर आहे. बंडवाल्यांचा अगदीं पराभव करून त्यांच्या चार पितळी तोफा व दारूगोळा वगैरे सामान आम्हीं हस्तगत करून घेतलें आहे. शत्रूकडील पुष्कळ माणसें मारले गेले. आमच्या कडील मृत्यूची संख्या थोडी जाली. शत्रु चहूं दिशेस पांगले गेले. आमचे पाहाण्यांत आलें आहे कीं, पुष्कळ लोक उत्तरदिशेस जात आहेत. त्यांचा पाठलाग करण्याकरितां घोडेस्वार व तोफखाना रवाना जाला आहे. सदरहू मजकूर मुंबई गव्हर्नरचे एक्स्ट्रावरून घेतला आहे.

---

**काश्मीर.**— लाहोरकानिकल पत्रावरून कळून येतें कीं, श्रीनगर एथें एक पलटण नेहमी ठाणेदार करून ठेविली होती. तीस जिलघिट एथें जाण्याचा हुकूम जाला असतां त्यांनीं नाखुषीपणा दाखवून जाण्याचें नाकारलें. या पलटणीच्या लोकांचें ह्मणणें असें होतें कीं, दिल्लीहून जे स्वार परत आले, आणि त्यांस माहाराजानें जो रोजमुरा दिला, तितका आह्मांस द्यावा. यावरून त्या शिपायांची समजूत घालून जंबू एथें घेऊन गेले. त्या ठिकाणीं ...न पोंचल्यावर सर्व शिपायांस कवायतीच्या जागीं तयार होऊन येण्याचा हुकूम जाला. त्याप्रमाणें सर्व सिद्ध होऊन आले. या प्रसंगीं एथें एक पा... व ...क्याघलरी अशा दोन पलटणीही कवायतीच्या जागीं आणल्या होत्या. पुढें ज्या शिपायांनीं निरिच्छपणा दर्शविला होता त्यांस आपलीं शस्त्रें जमिनीवर ठेवण्याचा हुकूम केला. त्याप्रमाणें त्यांनीं न बोलतां सर्वांनीं आपापलीं हत्यारें जमिनीवर ठेविलीं. नंतर शिपायांनीं निरिच्छपणा दाखविल्याबद्दल चौकशी जाली. त्यामध्यें बंड करण्यास प्रवृत्त जालेल्या २७ असामींस त्यांचा इनसाफ करून, ठेवून ...ऊन तुरुंगांत घातलें. आणि बाकीच्या शिपायांचीं शस्त्रें त्यांनीं त्यांस परत दिलीं.

—देव-दी.

**पिसाळलेला कुत्रा.**—नी फ्रेझमिनर ता. २८ जुलै. ची खबर इंग्लिशांत आहे ती ही कीं, मद्रास इलाख्यांत ... नांवें गांव आहे. तेथें एक कुत्रा पिसाळला आणि तो आपली कृति दुसऱ्यास डसण्याची करूं लागला. प्रथम तो एका घोड्यास डसला. तेव्हां तो घोडा कुत्र्याप्रमाणें भुंकूं लागला. नंतर घोडा दुसरे जनावरांस डसला. तें जनावरही विलक्षण भुंकूं लागलें. आणि लोकांस डसावयास धांऊं लागलें. प्रथम पिसाळलेला कुत्रा मेला. नंतर घोडा वगैरे जनावरें लोकांस उपद्रव देत होतीं. त्यांस कोतवालानें गोळी घालून मारलें. बरें जालें. कारण कीं, त्या जनावरानें मास खाऊन आपले गिऱ्हाइकास देता, आणि तें जर खावें तर तेंही तसेंच भुंकून पिसाळून जातें.

---

मद्रास इलाख्याचा गवरनर लार्ड हारिस हा निलगिरीस उटाकामंड एथें गेला आहे. तो तेथें एकाएकीं आजारी पडून त्याचें शरीर लडकें पडल्याची व तोंड वांकडें जाल्याची बातमी मद्रासेहून एथें आली आहे. लार्ड हारिस यास बरा करण्याकरितां डाक्तर सांडरसन हा मद्रासेहून उटाकामंड एथें गेला आहे.

धू.दे.

---

**कोल्हापूर.**—ता. १० आगस्त.—काल रोजीं श्रीमन्महाराज छत्रपति साहेब यांस पुत्र जाला, त्याबद्दल साहेब लोकांचा दरबार जाला, त्यांत मेहेरबान राबर्टसन साहेब पो. ए., व लष्करी साहेब लोक आले होते. कांहीं वेळ कलावंतीचा नाच होऊन, नंतर पानसुपारी, अत्तरगुलाब, हारगजरे सर्वांस देऊन कचेरी बरखास्त जाली, साहेबांच्या मडमा राणीसाहेबांचे मुलाकतीस गेल्या होत्या.— एथें एक नवीन रिसाला भरण्याचा हुकूम जाल्यावरून घोडे व उमेदवार यांची भरती करण्याकरितां लेफ्टेनंट केर साहेब एथें आले आहेत. त्यांस पोलिटिकाल सुपरिंटेंट यांणीं लाल उठल्याचे रिसाल्यांतील स्वारांस त्यांत जाण्याची तजवीज केली आहे. असें ऐकण्यांत आलें आहे.

व. सं.

बंबेटैम्स पत्रांत काबुलचा मीर दोस्तमहंमद याचा गादीचा वारसपुत्र सरदार गुलाम हैदरखान जुलैच्या १ ल्या तारिखेस मरण पावला; त्याच्या दुसरे दिवशीं तो मीर, त्याची बायको, मयत सरदाराची आई, बंधु व दुसरे स्नेहसंबंधी व मुल्ला हे लोक त्याच्या खासगी बागेंत शोकग्रस्त बसले होते. तेथें परक्यांपैकीं कोणाचा प्रवेश होण्याची मनाई असे. त्या मयत सरदाराचें प्रेत कबरेंत नेऊन पुरण्याकरितां पेटींत घालून ती पेटी हत्तीवर चढवून रस्त्यानें समारंभानें नेली. तेव्हां बरोबर ७००० सात हजार रुपयांचें रुप्याचें व तांब्याचें नाणें खैरात करण्याकरितां घेतलें होतें. तें गोरगरीबास रस्त्यानें वांटल्यावर शिल्लक राहिली ती सर्व सय्यद व मुल्ला या लोकांस वांटली. नंतर परत आल्यावर मिरास भेटण्याकरितां व समाधान करण्याकरितां समाज मिळाला होता, त्याच्या मुलाकती होऊन त्यांस खाना दिला.

---

**घंटा**— व्हानाऊग शहरात एक घांट होती तिची उंची १२ फूट व व्यास ७॥ फूट होता. तिची जाडी समारें ७ इंच होती. या घांटेचें सर्व मिळून ५१००० रत्तल वजन म्हणजे ६२ खंडी १० शेर होतें. पेकिन शहरांत मोठाल्या ५ घंटा आहेत. आणि त्या दर एकीचें वजन १२०००० रत्तल आहे. या घंटांचा अवाज चांगला होत नाहीं. कारण, कीं यांची आंतली लोळी लांकडाची केली आहे.

मास्को शहरांत एक घांट आहे तिचें वजन रत्तल ४२७९३६ आहे. या घंटेचा व्यास ४०३॥ फूट व जाडी १६॥ इंच आहे. याच शहरांत दुसरी एक घांट आहे तिचें वजन २४०००० रत्तल आहे.

क्रेम्लिनांत एक अतिशय मोठी घांट आहे तिच्याप्रमाणें पृथ्वींतील कोणत्याही भागांत असी मोठी घांट पाहाण्यांत आली नाहीं. या घांटेचें वजन ४४३१०० रत्तल आहे. परदेशास्थ लोक ही घांट पाहून इनी फार तारिफ करितात. ज्ञा. द.

---

**लाहारक्रानिकल**,— आम्हांस वाटतें, काश्मीरसरकारानें जे बंडवाले रणभीरसिंगाचे मुलखांतून पळून गेले होते त्या सर्वांस इंग्रेजसरकारचे हस्तगत करून दिले. आणि असा हुकूम आपले कामगारांस फर्माविला आहे कीं, जो हिंदुस्थानी मेळेल त्यास धरून चौकशी करण्यास पाठवीत जावा.

---

**करवीर**. गेल्या गुरुवारीं रात्रीस एक शिंप्याचा मुलगा अजमासें १६ वर्षांचा याणें एथील काशीतीर्थांत जीव दिला.— हें अघोर कर्म करण्याचें कारण काय तें समलें नाहीं.— रविवार पेठेंत चावडीनजीक एका भुसाऱ्याच्या दुकानांत चोरी होऊन ९१० रुपयांचा ऐवज चोरीस गेला. या चोरीचा वहीम चावडींतील एका शिपायावर आल्यावरून त्यास धरून कैद केल्याचें आमच्या बातमीदाराकडून समजत आहे. ब. स.

---

**डांकेचीं टिकिटें विकणारें यंत्र**.

वेकफील्डचा मिस्तर एस्डरहान याणें डांकेचे छाप विकत घेण्यारांस मात्र विकण्याकरितां एक यंत्र तयार केलें आहे तेणेंकरून छाप विकण्याकरितां पोष्ट हपिसांत कारकून किंवा शिपाई यांस राहावें लागत नाहीं.

वरील आंगास छिद्र आहे त्यांत एक पेनी (आठ

पे किमतीचें इंग्रेजी नाणें) टाकिलें ह्मणजे यंत्रां-
तील कांहीं भाग उघडून एकावर एक अशीं दोन
तारणीं बसविलेलीं आहेत, त्यांमधून एक छाप
बाहेर येतो. तो गिऱ्हाइकानें फाडून घ्यावा. एक
वेळ एक पेनी टाकिली असतां एकच छाप बा-
हेर येतो. एकाहून अधिक छाप पाहिजे अस-
ल्यास तितके वेळां एकेक पेनी यंत्रांत [illegible].
अर्धी पेनी किंवा त्याहून दुसरें लहान नाणें यं-
त्रांत टाकून उपयोग नाहीं. पेनीच टाकिली
तर छाप बाहेर येतो. ज. मि.

---

आगमन,—सातारसंस्थानचे [illegible] लेक
श्रीमंत राजमान्य राजश्री अंताजी नारायण ऊर्फ
दादासाहेब जाहागीरदार यांची स्वारी कऱ्हाडा-
हून एथें कामानिमित्त आली आहे असें ऐकतों.
श्री. रा. रा. नारायणराव त्र्यंबक राजमाचीक-
र ठाणे जिल्ह्यांतील उरणचे मुनसफ यांची स्वा-
री खासगी कामाकरितां एथें एका आठवड्या-
ची रजा घेऊन आली होती. ते आज रोजीं एथू-
न परत आपले कामावर रुजू होण्याकरितां जा-
णार आहेत.

---

लेफूटेनंट करनल रैस १४ वे बंगालवाल्या-
चे पलटणीवरील यांस बराकपूर एथें ४४ गोरे
लोकांची पायदळ पलटण नवीन होणार आहे
तिजवर नेमिलें आहे. टैम्स.

---

## नेमणुका

मिस्तर जे. डब्ल्यू. एस. उबी यांस काठेवाडास
फनी २ रा असिस्टंट पोलिटिकल एजंट अकुटिं
ग नेमिला आहे.— रावबाहादूर मोरो कान्हो
बा [illegible] प्रिन्सिपल सदर अमीन यांस आ-
जारीपणाचे सरटिफिकिटावरून १४ दिवसांची र-
जा मिळाली आहे.— लेफूटेनंट गर्टसन बेळगा-
वचे असिस्टंट सुपरिंटेंडेंट यांणीं कामाचा चार्ज
ता. ६ मिनहूस घेतला.— मिस्तर थामस पोलि-
सचे थर्ड माजिस्त्रेट यांस विलायतेची रजा आ-
जारीपणाचे कारणानें १२ महिन्यांची मिळाली आ-
हे.— मिस्तर ए. डब्ल्यू. इलीआट, कस्टम विभा-
गर वगैरे वरील कमिशानर यांची रजा नामदार
कोर्ट आफ डिरेकटर्स यांणीं ६ महिने वाढविली आहे.

खालीं लिहिल्याप्रमाणें फस्ट्रन्युमररी थर्ड अ-
सिस्टंट कलेक्टर व माजिस्त्रेट नेमिले आहेत.

मिस्तर बी. जे. एम्. मेड ------ पुणें.
मिस्तर जे. जी. मुर -------- ठाणें
मिस्तर डब्ल्यू. जी. पेडर ------ भडोच.
मिस्तर एच्. बरा --------- सोलापूर.
मिस्तर एच्. ई. जेकब. ------- नगर.
मिस्तर जे. ए. हार्की ------- रत्नागिरी.

---

आह्मी खालीं लिहिलेला मजकूर मफ्युसिलेट
पत्रांतील घेतला आहे. आबखरबर.

"अलाहाबाद (प्रयाग) तारीख ७ आगस्ट
हा पुढील मजकूर लखनुराहून आला आहे.— फै-
जाबाद येथें २ आगस्टास सर्व यथास्थित होतें. न-
सराबादेचे फौजेतील दोन बंडवाल्यांच्या पलटणी
चपरोळी ठिकाण सोडून गोमती नदी उतरून हसे-
नपुरास गेल्या. ही जागा नैर्ऋत्य दिशेकडेस क-
लतानपुरापासून ७ मैलांवर आहे. बरीपूरचे ब-
डवाल्यांचे सैन्यानें गोमती नदी उतरावयास आ-
रंभ ता. ३१ जुलैस केला, आणि तें सैन्य सर्व उ-
तरून गेलें आहे, आणि तें सर्व कलतानपुरा-
कडेस जात आहे. सदरील मजकूर समजल्या-
वर दुसरी आतांच अशी खबर ता. ५ आगस्ट

...र्नी आली आहे कीं, बंडवाल्यांनें सैन्य सुलतानपुराजवळ शिपाई २७००, एरेग्युलरलेवी - १००, स्वार १५०० व तोफा ११ इतकें जमलें आहे. त्याचा बेत असा झाला आहे कीं, ते सर्व प्रतापगडाकडेस जाण्याच वळणार आहेत."

"फस्ट मद्रास फ्युझिलीयर, पंजाब रैफल न र घोडेस्वारांचा थुप आणि गोरे व काळे नेटिव हें आमच्या कडील सैन्य फैजाबादेहून सुलतानपुरास जाण्याकरितां रवाना होणार होतें.

फैजाबाद आणि गोरखपूर याच्या दरम्यान पत्रव्यवहार होण्याचें स्थापन जालें आहे.

मोहून आणि जुनेकानपुरावरील रस्त्यावर तारिख ७ रोजीं पोलिसचें प्यायदळ आणि घोडे स्वार ५०० असें रवाना जालें. फैजाबादेचा कमिशनर अशी खबर देतो कीं, जमेदार लोकाचे दिल बंड मोडण्याकडेस आहेत, असा प्रकार ते दाखवित आहेत.

---

मुलेंचोरी.— पुण्यानजी निगडी येथें कोल्हाटी लोकांनीं नगरजिल्ह्यांतील मुलगी १ वय वर्षे १० व दुसरी सदरहू जिल्ह्यांतील... मुली रानांत असतां त्यास धरून आणून निगडी येथें चोरून ठेविल्याची खबर गुप्त पोलिसाकडून खानसाहेब... नसरवानजी फौजदार यांस लागतां... व त्यांणीं त्या कोल्हाट्यांस व मुलींस येथें आणून त्या मुलींच्या आणवून त्यांची मूल अशी खातरी जाल्यावर त्या दोघी मुलींपैकीं एकीचा खटला मेहेरबान नानाभोय रोजी डिपुटीमाजिस्त्रेट यांजकडेस पाठविला. त्यांणी तो खटला इतका बारीकपणानें तपासिला कीं, निगडीचे पाटील व कोल्हाटी यांणी अशी साक्ष दिली कीं, ज्या दिवशीं आमच्या गांवीं कोल्हा त्याचे दुसऱ्या दिवशींच पोलिसानें येऊन पकडून आणिल्या. असें लिहून दिलें होतें, परंतु ती कुणब्याची मुलगी हुशार होती. तिणें ... यांस असें सांगितलें कीं, मला दोन ... ही कोल्हाटीण व कोल्हाटी याणें आपले ...डियांत कोंडून ठेवीलें व मी कोणाजवळ ही गोष्ट ... सांगेन म्हणून प्रथमच दहशत अशी केली ..., माझे गालास मोठा डाग दिला ते दिसतच ... व शिवाय नानातऱ्हेचे जुलूम करित. व मी कुणब्याची असें ओळखीस नयावें म्हणून त्यांनी माझे कपाळा... कोल्हाटी लोकांप्रमाणें गोंदलें याप्रमाणें त्या मुलीनें सांगितलें. तेव्हां मेहेरबान ना... रोजी ...गीं नानातऱ्हेचे प्रश्न करून तिणें त्या गांवची माहिती पूर्णपणें सांगितली. त्याच्या पडताळ्याच्या साक्षी घेऊन मजकूर पुराना पाहून व हें कोल्हाटी एकसारखे निगडी येथें मुलगी होती असें लिहून देतात हें बिलकुल खोटें आहे. कारण ही माहिती त्या गांवांतील राहाणाऱ्या प्रमाणें सांगून सरकारची खात्री ही क... ते तेव्हां हा खटला भारी शिक्षेचा सबब त्यांणें ... सेशनकोडताकडे रवाना केला. तेथें ही मेहेरबान स्युवर्ट साहेब सेशन जड्ज यांणीं त्या खटल्याची पुनः चौकशीकरून त्यांत पहिल्या नंबरचा कैदी विमणा कोल्हाटी यास ५०० रुपये दंड व न दिल्यास तीन व... केप. व दुसऱ्या नंबरचा कैदी छोटी कोल्हाटी ...हिला २५० रुपये दंड. व दंड न दिल्यास दीड ... कैद असा शिक्षेचा ठराव साहेब महमूफयांनी ...ा.— मुलीचे आईची भेट पुनरपि व्हावयाची नव्हती, परंतु खानसाहेब फौजदार यांनीं मेहेनत करून हे काम मोठें स्तुत्य केलें.

---

धारवाडास ता. ११ - १२ । नहूस पाऊस पडून हवा ... झाली आहे. ...

---

[illegible] — [illegible] इंग्रज सरकारचें इमानी [illegible] आहे. [illegible] आम्हांस संतोष होत [illegible] खबरांवरून [illegible] अंतःकरणांत इंग्रजी राज्याचें [illegible] आहे, त्याविषयीं कांहीं [illegible] आम्हांस [illegible] त्याचें [illegible] वेड [illegible] असो. पण या [illegible] लाय तेस फायदा होतो असें [illegible] या दंग्याचें जें दमन जालें [illegible] पडून येईल. हें त्या [illegible] समजावें [illegible] आहे कीं, पंजाबांतील [illegible] येथें जुलैच्या १९ वे तारिखे- [illegible] १० वे पंजाब पलटणीनें बंडावून कां- [illegible] करण्याचा मनसुबा केला होता, परंतु [illegible] तो [illegible] त्यापूर्वीं समजुतीस आला, म्हणून मोठी गोष्ट जाली. त्या दुष्ट कटाचा अंत काढण्याकरितां चौकशीचें कोर्ट तेथें बसलें आहे. हा दुष्ट कट किती जागीं प्रवेश करून का- य रवरावी होती याचा अदमास एव्हां जाला कळत नाहीं. १० वी पंजाब पलटण [illegible] सर्व आफीसरांस मारून तेथचा [illegible] होणार होती. आणि १९ वी [illegible] पलटण [illegible] आणि [illegible] सामग्री मिळणार होती [illegible] येऊन [illegible] होती. कारण कीं, तेथली [illegible] याची यांस आशा होती. किंवा [illegible] लोक रुजू होऊन मुलतानांत कूच दरकूच करून जावयाची होती. आणि येथून दोने पलटणी सायुध करून त्या सर्वांनीं लाहोरावर हल्ला करावा असा बेत जाला होता. ६ वी पोलिस पलटण व पंजाबी तोफखाना हे ही त्या कटांस सामील असावे असा लोकांत अंदेशा आहे. बनू एथील ३ री सीक पलटण ही त्यास सामील व्हावयाची होती. या कटाचें मूळ या पलटणीपासून उद्भवलें. असो हा सर्व कट मुळारंभीं १६ वे पलेपायदळचा मेजर गार्डिनर यांच्या समजुतीस आला. हा सर्व कट ६ अवरापर्यंत उघाडीस आला नाहीं. आणि हा मावळ्यांतले सुमारें १५० सीक लोक आले ते या पलटणांत नौकरीस राहून ते त्यांचे मेरक जाले. असो पतंगाप्रमाणें या लोकांस मोह जाला आहे. दीपावर उडी घातल्यापासून पतंगाची दशा काय होते याची माहिती सर्वांस आहे व. तशी अवस्था त्यांणीं, व कोणी ही जाणून बुजून करून न घेऊं नये.

---

**ग्वालेर.** — एथून पळून गेलेले लोक उदेपुराकडेस अद्यापपर्यंत पळत च आहेत. जनरल राबर्ट सर साहेब हे अजून ही मुकाम करूनच आहेत. ज्ञं०

---

**रेलवे.** — इच्या गाडीतील ३ ऱ्या वर्गाचा दर हाल्लीं आहे त्यापेक्षां कमी करावा म्हणून सरकारानें विचार करण्याचें मनावर घेतलें आहे. असें समजतें. आम्ही ही असें ऐकतों कीं, रेलवे कंपनी तिसऱ्या प्रतीच्या गाडीस सीट म्ह० बसावयाची जागा तयार करणार आहे. हें ऐकून आम्हांस संतोष जाला आहे.

हें पत्र ज्ञानप्रकाशाच्छा० कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांनीं छा

# ज्ञानप्रकाश

## गुरुवार तारिख २ सप्तंबर सन्न १८५८ इ०


## जाहिरात.

आम्ही नाटककार सर्वांस अतिनम्रतेनें विनय पूर्वक असें कळवितों कीं, येत्या शनवारीं म्हणजे तारि॰ ४ सपटंबर रोजीं रात्रौ उषाअख्यान पूर्व-भाग व उत्तरभागक्रूं करणार असून त्यांत उषा आणि चित्ररेखा यांचे संभाषण, व बाणासुरानें गर्व-हरण, व श्रीशिव, व श्रीकृष्ण यांचें युद्ध असा चम-त्कारिक व मनो[illegible]क होईल. यास्तव सद्गृहस्थ आपला मोठे उत्कंठतेनें उदार आश्रय देतील असा आम्हांस पूर्ण भरंवसा आहे. ता॰ २ सप्तंबर सं॰ १८५८

सही गोविंदभट्ट गोखले निसबत नाटकमुंब

## ज्ञानप्रकाश ता॰ २ सप्तंबर सं॰ १८५८

**दरबार**— ता॰ ३१ आगष्ट (गोकुळअष्ट-मीचे दिवशीं) नेकनामदार गवरनर साहेब यांणीं बडे लोक व संस्थानी लोकांचे वकील व कामगार लोकांच्या मेहेरबान स्युटन साहेब यांचे मार्फत मुलाकती घेतल्या. तेव्हां लार्ड साहेब यांणीं संभाषण केलें, तें ऐकून लोकांचे अंतःकरणास संतोष जाला. या दरबाराचा साद्यंत लिहिण्यास आजच्या पत्रीं जागा नसल्यामुळें पुढील येत्या पत्रापर्यंत ठेवणें भाग पडलें आहे.

---

गेल्या सोमवारचे पत्रांत नेकनामदार गवरनर साहेब यांची स्वारी कालचे बुधवारीं शहरांत येऊन विश्रामबागवाड्याची व्यवस्था पाहाणार म्हणून लिहिलें होतें परंतु या दिवशीं ना बेत राहून होऊन आजरोजीं दोन प्रहरांनंतर स्वारी येणार आहे असें समजतें.

---

दिल्ली ग्याझिटावरून कळतें कीं, बंडवाल्यांचें सैन्य ता॰ ११ रोजीं लावा एथें होतें. त्यांणीं ता॰ १२ वीस मारवाडास उतरण्याकरितां चतुर्भुज घाटाकडे कुच केला. त्यांजवर [illegible] जनरल लारेन्स इरीनपूर पलटण [illegible] व आणि ८०० [illegible] घोडे असे घाटाचे पाय[illegible]थ्याशीं रवाना केले. बंडवाले घाटांत तोफा जा[illegible]ाची मुश्कील पाहून प[illegible] २० मैलांवर खडकाचे देवां[illegible] कोटाच्या जवळ नाथद्वार येथील डोंगरावर [illegible]ले. जनरल राबर्ट्स हा द्वारकेजवळ ६ मै[illegible]वर उत्तरेच्या बाजूस जाऊन, त्याचे सैन्यानें बंडवाल्यांच्या चार ४ तोफा अंदर पिनळी हिसकावून घेऊन, व त्यांचे दारू गोळ्यांची सामग्री घेऊन त्यांची चोहींकडे दाणादाण केली. अंत शत्रूचे ७०० पडले. आमच्याकडी नुकसानी थोडीच आहे. तीही कीं, सर्व पलटणीचे मिळून २० लोक जाया जाले. शेवटीं शत्रूस पळवून लावून त्यांचे हत्ती घेण्याकरितां घोडेस्वार पाठलाग करीत आहेत.

आम्हांस असें समजतें कीं, कलकत्यांतील लोक सरजेम्स आउटराम साहेब यांस मानपत्र देण्याकरितां तयार होऊन याबद्दल एक फंड जमा करीत आहेत.

---

हडपसर येथील नाकेदारानें सरकारचे गाड्यांस अटकाव केल्याबद्दल त्यावर गुन्हा आलाआहे, व या निश्चयीं मेहेरबान माजिस्त्रेट साहेब चौकशी करीत आहेत.

---

**पुणेकलेकटरखातें.**— पेटाअवसरीचे माहालकरी राज. रा. दाजीआबाजी यांस अमानत केलें होतें, त्यांस परत कामावर नेमिलें. तेथील रा. रा. धिनायकराव काशी यांस शिवनेरास अवलकारकून नेमिले. तेथील रा. रा. रावजी परशराम यांस इंदापुरास माहालकरी नेमिलें. तेथील माहालकरी यांस जागा नसल्यामुळें तूर्त ते खालीं राहिले आहेत. रा. रा. भास्करराव वैशंपायन कुरकुंभ पेट्याचे माहालकरी यांस एकमहिन्याची रजा मिळाली आहे.

---

दिनापुराहून आलेल्या या महिन्याच्या ४थ्या तारखेच्या एका पत्रावरून असें समजण्यांत येत आहे, कीं, आगस्टच्या ३ तिसऱ्या तारखेस आरा एथील इंग्रेजांचे लष्करी लोक बंडवाल्यांच्या पाठीमागें त्या शहरापासून पुढें कांहीं कोशांवर गेले असतां त्यासमयीं सुमारें चारशें बंडवाल्यांहीं आऱ्यांत शिरून कांहीं लोकांस लुटलें, व तेथील तुरुंग फोडून आंतील सर्व कैदी लोकांची मुक्तता केली. आऱ्याच्या लोकांनीं पाभरांगीं बंडवाल्यांस मोर उभे राहून त्यांपैकीं कांहीं आसामींस ठार मारून टाकलें. आऱ्यावर हल्ला करणारे हे बदमाश लोक सुमारें एक तासपर्यंत शहरांत राहून मग लागलेच तेथून निघून गेले रेलवेच्या खात्यांतले मिस्तर विकूदर या नांवाचा एक गृहस्थ या प्रसंगीं मोठ्या शौर्यानें निभावला. तो आऱ्यासच दुसऱ्या एका शहराहून जात होता, परंतु वाटेंत तेथूनदीड कोशावर कोएलवड कडे चाललेला असा इंग्रेजांच्या पक्षाचा एक जमीनदार त्यास भेटला त्यानें शहरांत चाललेला सर्व रंग्याचा प्रकार मिस्तर विकूदरास कळवून त्यास दिनापुरास परत जावें सांगिलें. तेव्हां तो तेथून परत निघून गेला. हे बंडवाले आतां उत्तरोत्तर अधिक अधिक धीट होत चालले आहेत. व सांप्रतच्या पावसाळ्यामुळेंही त्यांस उन्हाळ्या प्रमाणेंच पाहिजे तितक्या त्वरेनें फिरण्यास कांहीं प्रतिबंध नाहीं. या बंडवाल्यांहीं शाहाबाद मध्यें फार लुटालूट चालविली आहे. धू. के.

---

दिल्लीच्या कमिशानरानें बंडवाल्यांचे ७०० लोक कैद करून त्यांतील कितीएक, व शाहा वर्षाच्या बचाकीच्यांस जीर मानपर्यंत काळे पाण्याच्या शिक्षा देऊन सदरहू कैदी आग्र्यास रवाना जाले.

---

अमदाबाद एथून सोळावे तारखेचें आलेलें जें वर्तमान मंगळवारच्या स्टयांडर्ड पत्रांत छापलें आहे, त्यावरून कळून येतें कीं, निमचेचे उत्तरेस सानागीर ठिकाणीं बंडवाल्यांची आणि जनरल राबर्टस याची एक चकमकी ९ व्या तारखेस झडली. बंडवाल्यांच्या सैन्यापैकीं स्वारलरी लोक दक्षिणे कडे गेले आहेत. व हे उदेपूरच्या लगत गेले असावे, असें अनुमान होतें. डिसा एथून नशिराबादेस सरकारी तिजोरी रवाना जाली होती, ती रस्त्यामध्यें लुटली गेली. या तिजोरींत ३००००० तीन लक्ष रुपये होते.

**नेरळ**, एथून आमच्या एका मित्रानें असें वर्तमान लिहून पाठविलें कीं, गेल्या महिन्याच्या १७ व्या तारिखेस गांवाजजीक उल्हास नामें नदी आहे, तींतून एक नावाडी चार मनुष्यें होडींत बसवून नदी पलीकडे नेत असतां मध्यभागीं होडी गेल्यानंतर एका एकीं पालथी पडून मनुष्यांपैकीं एक सोनार व एक मुसलमानाची स्त्री अशीं बुडून मरण पावलीं, तिघे जिवंत

किनाऱ्यावर जाऊन पोंचली. बुडालेल्या दो न मनुष्यांचे मुरदे अद्याप सांपडले नाहींत.

टीपि.

हिंदुस्थानांतील पलटणी रखाल्याच्या खर्चा-चा हिशेब विलायतच्या पत्रांत सन्‌ १८५५ सालचा प्रसिद्ध झाला आहे तो खर्च बितपशील.

| | |
|---|---|
| बंगालखातें | ६०३८५३०० |
| मद्रासखातें | ८०१००८० |
| मुंबईखातें | २१२४६७४० |
| राणीचे सैन्याकडे | ७४४६२८० |
| तोफखान्याकडे | ५८६६३५० |
| नेटीवस्वार | १३६३२४८० |
| नेटीवपायदळ | ३७४५८५७० |
| पेन्‌शनर | १२४८७९० |
| दवाखाना | १५७०६२० |
| दारुखाना वगैरे | १९१८२१० |
| मोदीखाना | १७२५५०६० |
| स्टाफ | १८९९१५९० |
| | १९५०६००६० |

नळदुर्ग येथून ५८ कैदी ठाण्यास जाण्याकरितां रवाना झाले. ते बहुतकरून आंदमानना-मे बेटांत ठेवण्याकरितां रवाना केले असावे असें टेलिग्राफपत्रांत एके बातमीदारानें खबर दिल्यावरून कळत आहे.

नेकनामदार गवरनर जनरल साहेब यांणीं कप्तान केंबाल ३रे गोरे पलटणीवरील यांस मोरार एथील छावणीचे माजिस्त्रेट नेमिलें.

**पुणे पोलिस,**— पुणेपोस्तऑफीसांतील रामाबिन लक्ष्मण कांबळे रजिस्टर लखोट्यांचें काम करणारा रैटर याजवर डिपुटीपोस्तमास्तर पुणें यांणें फिर्याद केली आहे कीं, सदरहू रामानें परगांवचे लखोटे रजिस्टरचे फोडून आं-तील नोटा चोरल्या. त्याची चौकशी सुरू आहे. त्यांत सदरहू कैदीचे घरास झाडा घेतला, त्यां-त रजिस्टरचे लखोटे ७ मिळून, शिवाय सरकारी किरकोळ सामान सांपडलें आहे, याविषयीं चौकशी सुरू आहे. त्यांत एक लखोटा महूचे छावणींतून पुण्यास मिस्तर ग्रांट कानडीसामान बनाविणारा, यास रजिस्टर करून ज्यासीबाब-कस साहेब यांणीं १०० रुपयांची नोट मिळवून पाठविली होती, त्या रजिस्टर लखोट्याच्या पा-वतीवर ग्रांट या नांवाचीं अक्षरें सहीच्या जागीं आहेत, परंतु तीं मालकाचे हातचीं नव्हेत, असें मिस्तर ग्रांट व फिर्यादी लिहून देत आहे. व सदरहू बद्दल कैदी असें म्हणतो कीं, ही चूक माझी नव्हे. कारण कीं, चालीप्रमाणें लखोटे शिपायाजवळ पोंचविण्यास देतों त्याप्रमाणें हाही दि-ला. आतां जर शिपायानें सदरहू लखोटा ग्रांट यास न देतां, तिऱ्हाईताकडून त्याचे नांवची स-ही करून आणली असेल तर तो दोष मजकडे नाहीं. यावर शिपाई असें म्हणतो कीं, रजिस्टर बुकावर पावती शिपायापासून पावल्याची घे-ण्याची वहिवाट आहे त्याप्रमाणें मीही सह्या क-रून लखोटे घेतों. परंतु हाल्लींची जी सही मला दाखविली ती माझे हातची नव्हे. असा अनेक त-ऱ्हेचा घोंटाळा असून येविषयीं पोलिस बार-काईनें सदर नोटीचा तपास करीत आहे. आ-म्हांस या पोष्टाच्या कामांत अव्यवस्था असल्या मुळें गुन्हे घडतात, अशीं उदाहरणें वारंवार आढळतात त्यास याविषयीं सर्वांनीं असें स-मजलें पाहिजे कीं, पोस्ताचें काम हें इतर कामापेक्षां मोठे जबाबदारीचें आहे. तेव्हां सदरहू

खात्याचे अमलदार यांणीं यांजवर नजर पुरवून कांहींतरी बंदोबस्त असा ठेवावा कीं, जेणेंकरून असे अपराधाचीं कामें कमी होतील. सदरहू मोकदमा तमाम पुरा जाल्यावर याविषयीं सविस्तर लिहूं.

---

आरा,— एथून खबर आली आहे कीं, बंडवाले हे मोठे धीट होत चालले आहेत. कारण कीं ६०० शिपाई आणि १००० इतर लोक मिळून आजीमगडाहून पूर्वेच्या बाजूनें शाहाबादेच्या प्रांतांत गेले.— सारन प्रांतांत स्वस्थता ... ... बं० ग्या.

---

बेळगांव, तारीख २९ आगस्ट— मांझे एकण्यांत असें आलें आहे कीं, ता० २४ आगस्ट रोजीं श्रीमंत आपासाहेब जमखिंडीकर यांस येथील हवा मानत नाहीं म्हणून वेंगुरल्यास नेलें असें गांवांतील लोक बोलतात.

बेळगांव कलेक्टर कचेरींतील अव्वल कारकून आणि नायब दसरदार यांजवर लांचाप्रकरणीं खटला घेऊन लोकवखदला धारवाडचे सेशनजडज्याकडे कमिट होऊन गेला आहे.

---

पंजाब—येथील इंडस नामें नदीस ता० १० आगस्ट रोजीं पाणी वाढूं लागलें. तिचें मुळीं पाणी ५ फूट उंच होतें, तें एके तासांत १२ फूट चढलें, पुढें तें पाणी चढतां चढतां शेवटीं २४ तासांत इतकें चढलें कीं, त्याची उंची ५० फूट जाली. तेव्हां आसमंतात् त्या महापुरानें फार नाश झाला. त्यांत जिवांचा फारसा नाश जाला असें नाहीं, परंतु मालाचा नाश फार जाला. २५ नर होड्या, व कितीएक लांकडें वाहून गेलीं, व नवशारा एथील पोसाचीं ठिकाणें नाहींशीं जालीं, असें म्हणतात. याप्रमाणें महापुरानें नाश जाल्याची खबर आली आहे. बं० ग्या.

---

मुंबईस सरकारी पदार्थालय आहे त्यांत या देशांतील कारागीर लोकांचीं चित्रें केलेलीं ५०० रुपये किंमतीचीं जगन्नाथ शंकरशेट इस्कोयर यांणीं सदरहू पदार्थालयास बक्षीस दिलीं.

इंडियन एम्पेर पत्रांतील मजकूर पुणेआबखबर पत्रांत घेतला आहे, त्यावरून असें कळतें कीं, बाहार प्रांतांतील अवस्था परगण्यांतून कितीएक नेटीव लोक आले ते सांगतात कीं, त्या भागांतील नेटीव लोकांचा ग्रह असा आहे कीं, कुवरसिंग अद्यापि जिवंत आहे, आणि तो मजला करीन असून बंडवाल्यांचीं कामें चालवीत आहे. त्याजवळ पुष्कळ लोक आहेत. आणि त्याचा एक हात मात्र गेला आहे. तो हेर व जाणारे येणारे यांजकडून तजवीज ठेवून आपला बचाव करीत आहे.

---

मुंबईत एक काली खान आली खान या नांवाचा मुसलमान शंभर वर्षांचे वयाचा होता, तो हक्क जाला. हा शरीरानें बळकट असे. पास नातू व पंतू वगैरे घरचीं माणसें ५० आहेत. बं० ग्या.

---

चीन—एथील वर्तमान आलें आहे कीं, चीन सरकार व इंग्रेज सरकार या उभयतांमध्यें गेल्या जून महिन्याच्या २६ वे तारखेस तहनामा जाला त्याचा सारांश कीं, या उपर उभय सरकारांनीं आपापले वकील पाहिजे असल्यास परस्परांच्या राजधानीस ठेवावे. बु० री.

हें पत्र ज्ञानप्रकाश छा० कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांचे छापखान्यांत छापिलें.

ज्ञानप्रकाश

सोमवार तारिख ६ सप्तंबर सन्न १८५८ इसवी

## पत्राची किमत

१० दरसाल रुपये. ९॥ आगाऊ दिल्यास.

## वसूल रुपये.

९॥ आगाऊ कृष्णाजी लक्ष्मण आयानित पुसेसावळी सन्न १८५९ चे आगष्ट अखेर.

## जाहिरात

नाटककार आम्ही सर्व उदार गृहस्थांस विनंती करितों कीं, ता-१८ मिनहू रोजीं येथील नाटकगृहांत चार अवतार म्हणजे मच्छापासून नरसिंह पर्यंत करूं कूर्म अवतारीं समुद्रमंथनांन रत्नें काढण्याचा चमत्कार कांहीं दाखवूं, आणि नरसिंह अवतारांत नरसिंहाचें व हिरण्यकशिपूचें युद्ध होऊन मांडीवर दैत्याचा वध जाल्यावर सर्व देव नरसिंहाची स्तुति करीत असतां कोप शांत होन नाहीं हें पाहून, मग शंकराची स्तुति केल्यावर शंकर, नऊ देवतांसह शरभाचा अवतार धारण करून, हिरण्यकशिपु मांडीवर असतां नरसिंहास चंचूंत धरून उडवितील. हा शरभाचा खेळ याठिकाणीं कधीं जाला नसेल, वहा अवश्य पाहाण्या सारिखा आहे. याची स्तुति आम्ही समुखें काय करावी? अवलोकनांत आल्यानंतर समजेल. ता-४ सप्तंबर सन्न १८५८ इसवी

सही गोविंद भट मोरस्ले निसबत नाटक मुंबई.

## ज्ञानप्रकाश ता-६ सप्तंबर सन १८५८

मदरासचे गवरनर साहेब बाहादुर यांची तबियत फार बिघडली होती म्हणून ते स्वदेशीं जाणार अशी बातमी होती, परंतु हालीं तबियत चांगली आहे, याबद्दल तो बेत महकूप जाला असें कळतें.

गाझीपूर— एथून ता-१९ आहे आगस्टचें पत्र आलें आहे त्यावरून कळतें कीं, सरकारचें १०० वीक आणि २७ वें मद्रास स्वार यांणीं रसोरा येथें २५०० बंडवाले बदमाश लोक आहेत, त्यांस वेढा घालून त्यांवर ता-१८ वीस रात्रीं भडिमार चालू केला होता. सील कोटी एथील जुन्या बराकींच्या भिंतीनें काम उलरीत होते त्यांतील एका भिंतींत दारू होती. त्यामुळें तीस आग लागून मजूर लोक मेले. असें सिलकोटीचें पत्रावरून कळत आहे.

---

इंग्लिशम्यान वरून टेलिग्राफ पत्रांत असा मजकूर आहे कीं, करनल ब्रु फ्रेजर सी-बी- हे आम्पास बंड जाल्यापासून कमीशनर होते. यांची उमर ५० वर्षांची होती. त्यांणीं ३१ वर्षें सरकारची नोकरी केली, आणि ते हृयगय जाल्यामुळें मरण पावले. वगैरे मजकूर आहे.

---

मेजर जनरल वाडिंगटन मुख्य इंजनियर व लेफ्टेनंट पी- ए- एलफिन्स्तन अहमदाबादचे असिस्टंट पैमापखात्यांतील यांस विलायतेस जाण्या करितां १५ महिन्याच्या रजा मिळाल्या. राणीच्या ४४ पलटणीचा असिस्टंट सरजन जानसन यास दारू पिण्याबद्दल कोर्टमार्शल होऊन चाकरांतून बरतर्फ करण्याचा ठराव केला आहे. टे-प्र-

---

## दिवाणी कामदारांच्या नेमणुका.

नामदार गवरनर इन्कौन्सल यांहीं सय्यद अहमद वलुद सय्यद हबीबुल्ला यांस धारवाडच्या अदालतींत मौलवी नेमला आहे.— मिस्तर ए. ए. सि. जरवाइस याजला पुढें हुकूम होई पर्यंत तूर्त पुण्याचा कलेक्टर आणि माजिस्त्रेट याचा असिस्टंटचें काम चालवायास नेमिला आहे.— रत्नागिरीच्या कलेक्टराचा तिसरा असिस्टंट मिस्तर जे. ए. हानकी यास त्या जिल्ह्यांत सुवर्णदुर्ग तालुक्याच्या कामावर नेमला आहे.— भडोंचचा पहिला असिस्टंट माजिस्त्रेट मिस्तर जे. आर. आरथर यास १८५१ च्या ४ थ्या कायद्याचे ४ थ्या कलमा बरहुकूम अपराध्यांचा पुनः तपास करण्याचा खेरीज करून बाकी माजिस्त्रेटाचे सर्व अखत्यार दिले आहेत.— अहमदनगरचा दुसरा असिस्टंट माजिस्त्रेट मिस्तर जि. एफ. शेपर्ड याजला १८५१ च्या ४ थ्या कायद्या बरहुकूम अपराध्यांचा पुनः तपास करणें व त्यांस फटके मारणें हें खेरीज करून बाकी माजिस्त्रेटाचे सर्व अखत्यार दिले आहेत.— १८५८ च्या ११ व्या कायद्या बरहुकूम अपराध्यास शिक्षा करण्या करितां मेसर्स गार्डन, ग्रे, आणि गेलविल या तीन आसामींस अनुक्रमेंकरून धारवाडास पहिला, दुसरा, आणि तिसरा असे असिस्टंट माजिस्त्रेट नेमिले आहेत.

---

**करवीर**, ता॰ ३१ आगस्ट.— धारवाड येथील कांहीं कैदी गण्यासपोंचविण्याकरितां येथें आले ताजबुद्रेर्बरच्या येथील काके पाण्याचें शिक्षेचे देऊन रवाना केले. याइलाख्यांतील जाहागीरदारांचे कारकुनांची परीक्षा दरबारांत होत आहे.— कुरुंदवाडकर येथील बातमीदार असें कळवितो कीं, पोलिटिकाल एजंटसाहेब यांणीं त्रिवर्ग कुरुंदवाडकर यांस सरकारांतून आलेलीं पत्रें दरबार करून प्रविष्ट केलीं. त्यांतील इशील.

आरावसाहेब यांजकडून सर्व प्रकारें सरकारास मदत करण्यास व हरएकतऱ्हेनें सरकारी कामगिरी बजाविण्यास आम्ही सिद्ध आहों. म्हणून वगैरे मजकुराचीं पत्रें स्पेशाल कमिशानर यांचे मार्फत आलीं.— ऐशीयांस आरावसाहेबांकडून असे दोस्तीचें व वफादारीचें लिहिणें पाहून लार्डसाहेब यांस बिसियार खुषवुदि हासल जाली; व हल्लीं मरांगी मुल्खापासून आरावसाहेबांनीं एक निशाण स्वैरस्वामी ज्यारी ठेविली ती इज्यानिचाचें दिलांत पूर्ण बागत आहे. या विषयीं आरावसाहेबांनीं स्वांतरीं ठेवावी" या प्रमाणेंच सांगलीकर आणि मिरजकर यांस ही सरकारांतून पत्रें आलीं आहेत. असें समजतें, व॰ सं॰.

---

**मुशाफरी**— सन १८४६ पासून १८५६ पर्यंत ग्रेटब्रिटन व ऐर्लंड एथील २८,०००० लोक दुसऱ्या देशांवर गेले होते. असें गणतीवरून समजलें आहे. कोणी सांगतात कीं, आज तीनशें वर्षें जालीं कोणत्याही देशांतील इतके लोक दुसऱ्या गांवीं गेले नाहींत. शा॰ कृ॰

---

वंबे ग्याझिट पत्रांत लखनौ एथील एके पत्र लिहिणारानें असें कळविलें आहे कीं, बंडवाल्यांनीं कांकडी तोफा तयार केल्या आहेत

---

आग्र्याचे पश्चिमेस बिबीगंज म्हणून एक शहर आहे तेथें शाहाबादेचे बंडवाल्यांचा ता. १४ आगस्ट रोजीं दुसऱ्यानें पराभव जाला. या समयीं धुमरोवाच्या राजानें ४०० लोक सरकारचे कुमकेस दिले. यावरून त्याचा इंग्रेज सरकाराशीं इमानीपणा दिसून येतो. हा राजा उमरसिंगाशीं मोठ्या द्वेषानें वागतो. त्याचें डोकें मारण्याबद्दल उमरसिंगानें मोठें बक्षीस लाविलें आहे. आणि धुमरोवा लुटून फस्त करण्याकरितां त्यानें आपले स्वार रवाना केले आहेत.

या उमरसिंगास ५०० तीरकमठेवाले लोकांचा मेळा येऊन मिळणार आहे. त्याकरितां तो जगदीशपूर येथें बराकी बांधवीत आहे. ही बातमी नेटिव लोकांच्या सांगण्यावरून कळते, परंतु याची खात्री होण्यासारिखा आधाराचा लेख अद्यापि प्रकट नाहीं.

लखनौ येथें मागील महिन्याचे पहिले पंधरवड्यांत पाऊस पुष्कळ पडला. तेणेंकरून सरकारचे अंमलदार व लोक यांच्या प्रकृतीस विशेष विकृति जाली नाहीं. हे बहुतेक लोक तंबूंत राहिले आहेत. विजेच्या योगानें ४ शिपाई मरण पावले.— माळव्यांतील बंडखोरांविषयीं जनरल राबर्ट यांणीं जी अखेरीची फत्ते केली, त्यापासून सामान्य खबर समजून येते. ते बंडखोर एके ठिकाणांहून दुसरेकडेस चाल करीत जातात आणि त्यांचे पाठीमागें ब्रिगेडियर पार्क हा चाल करून आहे. १८ वे आगस्टरोजीं तें बंडखोर जाटाचे जंगलांत होते, आणि ते रामपुराकडेस जाणार असें समजलें. त्या रोजीं ब्रिगेडियर पार्क हे चितुर मुक्कामीं होते. ते तेथें दररोज २० मैलांप्रमाणें मजला चार दिवस करून बंडवाल्यांचा पाठलाग करीत होता. त्यावेळीं ७२ वे पायगरी पलटणचे सुमारें १०० लोक डोंगरावर चढविले होते. बंडवाल्यांचा बेत बात अगदीं बिघडून गेला आहे. मोठमोठे प्रवास केल्याच्या योगानें त्यांचे घोडे अगदीं खंगून त्या घोड्यांचे अस्थिचर्म मात्र राहिले आहेत. त्यांच्या मुदाईमापैकीं एके जणास जखम लागली असें ऐकण्यांत आलें आहे. आणि त्याला खांद्यावर घालून बंडवाल्यांनीं नेलें. या बंडवाल्यांजवळ अजून हत्ती आहेत. व खजीनाही आहे.

---

जनरल विंडीकर यांस कोल्हापुराहून काढून दक्षिण कोंकणांत रत्नागिरीचे कांठीं रायरी, ज्यास यशवंत गड असें म्हणतात, तेथें नेऊन ठेविलें आहे. असे टेलिग्राफावरून कळतें.

---

**आलाहाबाद**— एथून प्रसिद्ध बातमी निघाली आहे कीं, लखनौ येथें अशी वदंता आहे कीं, १६ वे आगस्ट रोजीं वेणीमाधव हा आमेतीचे राजास जाऊन मिळण्यास निघाला आहे. या राजानें बेसवारा यांतील सर्व तालुकदारांस सरकारचा सुलतानपूर येथील फौजेस (कालमा) स प्रतिबंध करण्याकरितां सूचना पाठविली होती. २२ वे आगस्ट रोजीं काशीचा कमीशनर अशी बातमी देतो कीं, रुसराब येथें एनसेन क्रीम्यान यास वेढा पडला होता, त्यास ब्रिगेडियर डुग्लास याणें कुमक केली. आणि बंडवाल्यांचा पाठलाग चालविला. ते बंडवाले गोघ्राकडेस ईशान्य दिशेनें पळून गेले. असें दिसतें कीं, हे आपला रस्ता सोडल्यावांचून धोपट दिखली घाटानें चपरा परगण्यांत उतरतील.

वं बेग्याझिट कर्यास पवरी येथील ब्रिगेडियर नेपीयर याचे फोजेंतून २२वे आगस्टचे मिती-चें वर्तमान कोणी एकानें जलद पाठविलें आहे त्यावरून समजतें कीं, मानसिंग व आजतसिंग यांचे हाताखालील बंडखोर लोक, २४ वास पावेतों येकसारखा सरकारचे फोजेनें भडमार शहर आणि किल्ला यांवर केल्याचे योगानें दुसरे दिवशीं सकाळीं ते सोडून चालते जाले. आमचा तोफखाना कोटाला चादर पाडण्यास तयार जाला होताच. शहराची गीर्द व किल्ला यांचा नाश करावयाचा आहे. ब्रिगेडियर स्मिथ याचा कालम, ८ वे हर्पोर्स, १ले लानसर्सचा एक स्काद्रन, कर्नल बुकच्या ४ तोफा बादशाही ९५ वावी पलटण, आणि १० वी काळीपायदळपलटण, व दोन आठरा रतली तोफा इतकें सैन्य शाहाबादेच्या दक्षिणचे जंगलांतून पाठलाग करण्यास जाणार होतें. या प्रसंगीं सरकारचें नुकसान फारसें जालें नाहीं. मात्र पांच जखमी जाले. आणि ९५वे पलटणचा लेफ्टेनंट चार्लस फिशार यास जबर जखम जाली आहे. जनरल नेपीयर हे किल्ला व शहर यांची तटबंदी पाडण्यासाठीं पोरीयेथें राहाणार आहेत. इंजनेर लोक या इमारती विषयीं असें म्हणतात कीं, ही बांधणी जरी जुनी आहे तरी ती फार मजबूद आहे.

---

नानासाहेब अयोध्येच्या बंडखोर बेगमेच्या लष्कराबरोबर आहे. असें वर्तमान आहे.

विलायतेंत एक फार विशाळ व चमत्कारिक झुंबर केलें आहे, त्यांत उत्कृष्ट प्रतीच्या बिलोराचे फळस व कांचमणी व लोलक १,२०,००० आहेत. आणि त्यास (धुरा) चे ७०० दिवे लागतात. त्याची उंची १८ फूट म्हणजे १२ हात आणि व्यास १४ फूट म्हण· ९⅓ हात आहे. यांत एकंदर ३ टन बिलोर आहे. हें झुंबर करण्याकरितां म्हणजे सर्व फळस व लोलक वगैरे ओंवून जडाजडी करण्याकरितां ५० मनुष्यें रात्रं दिवस तीन वार काम करीत होतीं. इतकें मोठें झुंबर आजवर जालें नव्हतें.

युरोप खंडांत एकंदर ४८,००,००० तरणेउमेदवार लोक फौजेंत चाकरी आहेत त्यांस पगार व युद्धसामग्री देण्यास सालीना ८०,००,००,००० ऐंशी कोटी रुपयांचा खर्च आहे. याशिवाय किल्ले, तटबंदी, युद्धसाहित्य तयार करण्याचीं आणि सांठविण्याचीं ठिकाणें, लष्करी दवाखाने, वगैरे इमारतींची व त्यांस जी जमीन गुंतली आहे तिची किंमत सुमारें ७६०,००००००० सात अब्ज साठ कोटी रु· आहे, आणि या रकमेचें दरसाल दर सेंकडा ४ रु· व्याजाप्रमाणें ३०,००,००,००० तीस कोटी रुपयांहून अधिक आकार होतो. आणखी इतकीं मनुष्यें जर कांहीं उदीम धंद्यांत लागलीं असतीं तर त्यांच्या मेहनतीपासून सरासरी ३१,२०,००,००० एकतीस कोटी वीस लक्ष रुपयांचें उत्पन्न जालें असतें. या सर्वांचा एकंदर आकार सुमारें १,५०,००,००,००० दीड अब्ज होतो. आणि हा खर्च युरोपखंडांतील उद्यमी व्यापारी आणि शेतकरी हे युद्धप्रीत्यर्थ देतात, असें समजावें.

लार्ड कालिंग्टन नामें एका गृहस्थानें अशी खबर दिली आहे कीं, मनुष्यांस उडतां यावें असें एक यंत्र त्या केलें आहे. आणि तें थोड्याच दिवसांनीं बेलफास्ट एथें त्याचा चमत्कार लोकांस दाखविणार आहे. ज्ञा· द·

---

# पुरवणा तारिख ६ सप्तंबर सन १८५८ इ०

**आगमन;**— लार्ड एल्फिन्स्तन साहेब यांची स्वारी ता० २ मिनहूस पुना कालेजांत गेली होती. त्यांणीं वाडाविश्रामबाग हा मुलांनीं आमचे संतोषार्थ कितीएक ठिकाणीं फुलांच्या रूतशोभित महिरापी लावल्या होत्या. व एके तक्त्यावर रांगोळीचा रंगीत वेलबुट्टीदार वेले काढले होते. ते पाहून लार्डसाहेब खुषी जाले. नंतर मुलांस मेहेरबान हावर्ड साहेब यांणीं कांहीं प्रश्न केले, त्यांचीं उत्तरें त्यांणीं दिलीं. नंतर पानसुपारी होऊन तेथून मराठी शाळा नंबर १ यांत येऊन तेथें ही रावसाहेब माहादेवशास्त्री यांणीं मुलांस प्रश्न केले. नंतर तेथून स्वारी पुणे लेब्ररींत गेली आणि तेथील सक्रेटरि मिस्तर बापूरावजी यांणीं पुस्तकगृहाचे व्यवस्थेविषयीं थोडासा मजकूर विदित केला. तो ऐकून येऊन लार्डसाहेब यांणीं जागा व पुस्तकें व वर्तमानपत्रें वगैरे यांचा उपयोग लोक करितात, हें पाहून संतोषी होऊन लार्डसाहेबांची स्वारी निघून गेली.

---

लार्ड एल्फिन्स्तन साहेब यांणीं ता० ३ मिनहूस साहेब लोकांकरितां एक बाल केला होता, तो पाहाण्याकरितां मेहेरबान न्युवन साहेब यांचे मार्फतीनें रावसाहेब बापूसाहेब विंचूरकर, रावसाहेब गणपतराव वळाळनात्, आणि रावसाहेब मोरो रघुनाथ दंढेरे व कैलासवासी आबासाहेब दंढेरे यांचे चिरंजिव, व शिंदे अलिजाबाहादर यांचे वकील राजश्री बापूसाहेब पराजपे असे पांच गृहस्थांस निमंत्रण होऊन ते गेले होते. त्या वेळे ही लार्ड साहेबांनीं सदरीं लिहिलेले गृहस्थांबरोबर थोडेसें भाषण केलें. सदरहू बाल गेल्या शुक्रवारीं जाला. त्या समयीं लष्करी व दिवाणी खात्यांतील साहेब लोक आणि मडमा अशा अजमासें १५० आले होते. जागा ही सुशोभित नेहेमींचीच आहे. तींत थोडावी रोशनाई आणि सुंदर बाजा वाजत होता.

---

**हवारिपोर्ट,** दक्षिणभाग ता० १५ आगस्त पर्यंतचा

**पुणें,** मावळ तालुक्यांत पर्जन्य बराच पडला आहे.— शिवनेर, खेड, हवेली, पावळ, आणि पुरंदर या ठिकाणीं थोडाच पाऊस आहे. इंदापूर व भीमथडी आणि सुपे पेटा येथें पाऊस नाहीं. इंदापूर तालुक्यांत कांहीं ठिकाणचे शेतांचे मोड जळून चालले आहेत. व कांहीं शेतें बरींच आहेत, अशी खातमी आहे.

**अहमदनगर,** या जिल्ह्यांत थोडा अगर बहुत पाऊस पडला, परंतु आणखी पुष्कळच पाऊस पाहिजे असें रिपोर्टावरून दिसतें.

**सोलापूर;**— ३९४ गांवीं थोडाबहुत पाऊस पडला. त्यांतून ४९९ गांवापैकीं मनगोळी तालुक्यांत बिलकुल पडला नाहीं. हिपर्गा तालुक्यांत पेरण्याचीं कामें चाललीं आहेत. मनगोळी व मुदेबिहाळ तालुक्यांत रोगराई कांहीं नाहीं.

**रत्नागिरी;**— या तालुक्यांत पुरा पाऊस पडला.

---

झीड वेटांत कांहीं महिन्यां मागें जो भूमिकंप जाला, त्याचा परिणाम असा जाला कीं, तेथील पाण्याचे झरे दरोबस्त आटून गेले. ज्ञा० द०

---

लखनौहून एक पत्र ता. २० आगस्टचें बंबे ग्याझिटांत आहे त्यांतील मजकूर.

" बेणीमाधवशिंग हा आमचे सर्व शत्रूंत मोठा हूषा आहे. त्याजविषयीं पुढें लिहितों.— बेणीमाधवशिंग याचे हक्काविषयीं विचार केला तर, तो अमेठी म्हणजे कलतानपूरचे पश्चिमेस १५ कोसांवर व लखनौपासून दक्षिणेस ४१ कोसांवर मोठा गांव आहे, तेथील हा राजा आहे. लखनौचे दक्षिणेस जे जबरदस्त तालुकदार आहेत त्यांपैकींच हा एक आहे.

हिंदुस्थानांत बंड उत्पन्न जालें त्या वेळेस त्यानें करनल गोल्डन याची मडम, मुलें, व ब्लाकसाहेब यांचीं मुलें व मडम, व स्टोयानसाहेब याची मडम यांचे जीव रक्षण करून त्यांचे बरोबर पाहारा देऊन त्यांस प्रयाग पर्यंत पोंचतें केलें. तेव्हां हिंदुस्थानांतील बंड किती दूर पर्यंत पसरलें होतें, व वायव्य प्रांतांत किती दूर पर्यंत पसरलें हें त्यास पुरतेपणें माहीत नव्हतें, आणि बिलीगारद येथील आमचे थोडेसे फौजेस वेढा पडून दिजवर पुष्कळ फौजेचा दबाव पडून त्यांपासून सुटका होण्याची आशा राहिली नाहीं, तेथपर्यंत तो बंडवाले यांजकडेस मिळाला नाहीं. परंतु जेव्हां मानसिंग हा बंडवाल्यांस मिळून आमची बेलीगारद येथील फौज गारद करण्यास उद्युक्त जाला, तेव्हां हा बेणीमाधवसिंग बंडवाल्यांस सामील जाला.

पुढें तो कोणत्या रीतीनें वागला हें मला लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. कारण, त्याजविषयीं रसेलसाहेब यांचे पत्रांत मजकूर लिहून समजलाच आहे.

लखनौ आमचे हस्तगत जाल्यावर राजा बेणीमाधवशिंग हा कांहीं दिवस स्वस्थसा दिसला. एखादे वेळेस तो आपले पदरचे बदललेले लोकांस अशी जरब देई कीं, मी लवकरच इंग्रेज लोकांकडे मिळेन.

आम्हीं त्यास किती एक पत्रें पाठविलीं कीं, बेणीमाधव, आतां तुम्ही आम्हांस येऊन मिळत नाहीं कीं काय? आम्हीं तुम्हांस शिक्षा करणार नाहीं हें तुम्हीं समजत नाहीं कीं काय? मागें झालेले गोष्टीस सोडून देण्यास आम्ही तयार आहों.

तुम्हीं ख्रिस्तियन लोकांचे खून केले नाहींत याजकरितां आम्हांकडेस येऊन आमचें म्हणणें मान्य करावें. नंतर आपले राज्यावर परत जावें म्हणजे सर्व गोष्टी सोडून देऊन तुम्हांस माफी मिळेल.

इतकें ही आम्हीं केलें, तत्रापि बेणीमाधवशिंग यानें कांहीं ऐकिलें नाहीं; त्यानें एकवेळां बंडाचा पक्ष स्वीकारला तो स्वीकारला,— हाली त्याचे जवळ २५००० पंचवीस हजार फौज व आठरा तोफा आहेत, त्या सालोन, पुर्न, हराहा, शंकरपूर, आणि लोहा, या ठिकाणांतून वांटून दिलेल्या आहेत. या प्रमाणें त्याची तयारी आहे तथापि त्यास आमचे फौजेशीं लढण्याची इच्छा नाहीं; व तो सीमरी म्हणजे त्याचें प्राचीन ठिकाण येथें आम्हांशीं लढाई करील, परंतु तेथून आम्ही परत जाऊन नंतर तो सलामीच्या तोफा सोडील अशी गोष्ट घडणें नाहीं.

तथापि मला वाटतें कीं, शेवटीं तो आम्हांस शरण येऊन राज्यसन्मान देईल, व तो आम्ही स्वीकारूं.

संदीला येथील भले मनुष्य फिरोषा, लकरण, व गुलाबसिंग हे आणखी पुढें पश्चिमेकडेस निघून गेले, त्यांणीं संदीला येथें आमचे फौजेबरोबर लढाई केली, तीन दोन सारे बंडलोका

चा आत्मभरंवसा समजून आला तो कळविणें योग्य आहे.

शाहाबाद परगण्यांत सध्या कलेमान नामें नगर आहे, तेथें खानअल्लीखान नाजीम अल्ला फेड गडचे पूर्वेस १५ कोसांवर आहे. त्याजवळ १८००० हजार लोक आणि १५ तोफा आहेत. त्यांचा बेत सोंडी नामक गांवावरून आदमपुरास जाऊन हल्ला करण्याचा आहे. तेथें हरदेव बक्ष म्हणून राजा आहे, तो आम्हांकडेस आहे. परंतु त्याजवळ २०० अगर २५० लोक आहेत तेव्हां तो येवढ्या लोकांनिवीं नाझीम अल्ला सारिख्या सरदारा बरोबर लढाई करील हें अशक्य दिसतें. तेव्हां तो त्याचे आटोक्या बाहेर निघून जाईल असें वाटतें.

खानअल्ली हा बोंडी म्हणजे जेथें बेगमची मुख्य छावणी आहे तिकडेस उत्तरोत्तर वळत चालला आहे, परंतु आमची ठाणीं मोहनसंदीला व लिहिमाबाद या ठिकाणीं आहेत, तिकडेस तो जाण्याची त्वरा दाखवीत नाहीं. यामांतर चोहींकडे स्वारी चालली आहे अशी ध्वनि नियत आहे. त्यांची सर्व व्यवस्था गुप्तरीतीनें चालली आहे, ती प्रयाग येथील कांहीं लोकांस मात्र माहित आहे.

नरपतसिंग म्हणजे राहिल्यांचा राजा यानें आपले किल्ल्यांत पांच हजार लोक आणि ७ तोफा ठेविल्या आहेत. तो आलिकडे आपले लोक एकत्र जमवीत आहे. त्यानें राहीयाचे जंगलांत तीन हजार लोक व चार तोफा जमाकरून ठेविल्या आहेत.

असें म्हणतात कीं, त्यानें राहीयाचे किल्ल्यापासून चार हजार लोक सरकारचे फौजेवर हल्ला करण्यास अगर फौजेस रोखण्याकरितां आपले भाऊबंदांस व मित्र मंडळीस बोलाविलें आहे.

रसूलाबाद येथील मुसाहेब अल्ली व फिरोषा, यांचे कांहीं दाईज यांणीं बारी ठाणें येथून १७ वे तारिखेस सुमारें हजार लोक व १ तोफ बरोबर घेऊन कूच केला, ते नरपतसिंगास जाऊन मिळाले. फिरोषा हा हल्लीं बागरमहू येथें आहे. त्याची फौज अगदीं कमी होऊन त्याजवळ फक्त ६०० लोक व २ तोफा मात्र आहेत. त्यानें ही नरपतसिंग याजकडेस जाण्याचा बेत केला आहे. याप्रमाणें राहिया येथील बळवण्याचे सर्व लोक तेथें चालले आहेत.

नरपतसिंग हा आपले मनांत समजत आहे कीं, आमचे फौजेस जय राहीयाचे किल्ल्यापुढें पूर्णपणें आला नाहीं. त्याप्रमाणेंच पुढें ही येणार नाहीं, व आतां त्यास लवकरच समजून येईल कीं, उमरावसिंग व कालिकासिंग यांज बरोबर साहा हजार फौज आणि ३ तोफा आहेत, या लोकांसुद्धां तो आपलीं पूर्वीचीं ठिकाणें सिल्लाबरपूर व अकबरपूर येथें गेला आहे. त्यांणीं बातमी करतां स्वार पाठविले आहेत. लफेपूर येथें गंगासिंग सुभेदार याचे हाताखालीं ९०० लोक आहेत. व बाशीरखान याजवळ ४०० स्वार आणि ७०० नजीब म्हणजे शिपाई व एक तोफ आहे. व ही फौज लुटालूट करीत आहे. व त्याचा हालीं हा धंदाच चालला आहे.

बेगम ही बोंडी येथें पारलियामेंटचें काम चालवीत आहे. परंतु आमची फौज घागरा नदी उतरून गेल्याची बातमी ऐकिल्यावर ती तेवढ्यांत पळून जाईल. नानासाहेब, बाळासाहेब हे कोठें आहेत ही बातमी बरोबर नाहीं;

परंतु ते बहिराईच येथें आहेत. त्यांजबरोबर फरकाबादचा नबाबही आहे, त्याचे बरोबर सात हजार फौज आहे, व बारा तोफा आहेत. त्याचे सरदारांजवळ दारूगोळ्यांची कमताई आहे. त्यांचे मुख्यांनीं कांहीं तयारी केली आहे, तींत नी खराब आहे.

---

दरबार.— नेकनामदार लार्ड एल्फिन्स्टन साहेब गवरनर यांणीं दापोडीस ता० ३१ आगष्ट रोजीं दरबार करून मेहेरबान न्युटन साहेब यांचे मार्फत येथील सरदार मुत्सद्दी वकील कामगार लोकांच्या अनुक्रमानें मुलाकती घेतल्या. या दरबारांत ११० लोक अदमासें होते. लार्ड साहेब यांस मेहेरबान न्युटन साहेब यांणीं प्रत्येकाची हकीकत सांगितली. ती ऐकून घेऊन नेकनामदार गवरनर साहेब यांची तबियत खुष होऊन कांहीं संभाषण केलें तें. आज तीन वर्षांत या सरदार वगैरे लोकांची आणि माझी भेट जाली नवती ती हालीं जाली. हा मोठा संतोष जाला आहे. व आपणाबरोबर बोलण्यास आनंद होतो कीं, सांप्रत हिंदुस्थानांत दंगा चालला आहे, त्या प्रकरणांत इकडील मोठे लोकांनीं आपलें मोठें इमान व शौर्य दाखविलें आहे. आणि माझे इलाख्यांत फंद किंवा फितूर याविषयीं वार्ता देखील नाहीं. येणेंकरून मला फार खुषी जाली आहे. सर्व लोकांस ठाऊक आहे कीं, पेशवे यांचा दत्तक मुलगा याणें अघोर कृत्य करून आतां आपला प्राण बचावीत फिरत आहे. जे जे लोक त्यास सामील होतात, त्या लोकांची आताहून सरकार कोणते प्रकारची करीत आहे ? थोडेच दिवसांत तिकडील सर्व बंडखोरांचा नाश होऊन सर्व रयतेस सुख होईल. इकडील लोक सरकाराशीं इमानीपणानें वागून आपली आबरू संरक्षण करितात. व करतील हें मी खचीत समजत आहे. याप्रमाणें लार्ड साहेबांनीं संभाषण सर्वांपुढें केलें. त्याचा मराठी तरजुमा मेहेरबान न्युटन साहेब यांणीं सर्वांस कळविला. त्या समयीं एका गृहस्थानें मोठीच शंका घेतली. ती उदाहरणानें लिहितों. एक मित्र गांवाहून आला, त्याणें आपल्या शेजाऱ्यास असें सांगितलें कीं, मी काल गोधुळीं आलों हें ऐकून घेऊन शेजाऱ्यानें त्यास विचारिलें कीं, तेव्हां किती [illegible] आला होता. याप्रमाणें परस्परें उत्तरें [illegible]. नंतर लार्ड साहेबांनीं सर्वांस त्यांचे मराततबाप्रमाणें विडे देववून वकील लोक यांस [illegible] आपले मालकांस सलाम कळविण्याविषयीं सांगितलें. तेव्हां वकील यांस संतोष होऊन त्यांणीं वगैरे कांहीं गृहस्थांनीं अर्ज दिले. नंतर [illegible] कचेरी बरखास्त जाली.

---

नेपाळचा सरजंग बाहादुर सेनापति याजविषयीं पुनः असें वर्तमान आलें आहे कीं, तो इंग्रेज सरकाराबरोबर इमानी आहे, असें तो गवरनर जनरल यांस पत्र पाठवीत आहे. असें बंबेग्याझिटच्या समजण्यांत आलें आहे.

---

एका पंतोजीनें आपल्या शाळेंतील पारशाच्या एका मुलास लात मारली म्हणून त्यास पांच रुपये दंड जाला. ज्ञा० र०

---

सरकारी कालिगलवतांतून ता० [illegible] सिडनीहून पोंड आले. बाकीचे १२ पौंड जलमार्गांतच मेले. [illegible]

---

**अधर्म**;—खालीं लिहिलेले हकीकतीचे पत्रास आपले सुंदर ज्ञानप्रकाशांत कृपा करून जागा द्यावी.

मोहोरम महिन्यांत मुंबई, पुणें, सोलापूर, बेळगांव, धारवाड वगैरे जागीं पाहाण्यांत आलें या महिन्यांत मुसलमान लोकांपेक्षां हिंदू लोक, मोहोरम येतो म्हणून फार खुषी असतात, व घर वगैरे सारवून तयार करितात. मोहोरम आला म्हणजे मुसलमानांप्रमाणें फकीर होऊन भीक वगैरे मागत असतात. त्या लोकांस विचारल्यास, आमचे पिढीजादी पासून चालत आलेलें आहे, म्हणून सांगून मुसलमाना पेक्षां जास्ती दीन दीन व या हुसेन व हुसेन वगैरे उच्चार करून आपले देहावरील स्मृति सोडून तोंडास बुका वगैरे लावून, व कांहीं लोक आंगास [illegible] काळें लावून, व कांहीं लोक आंगास राख लावून, व कांहीं लोक बाय होऊन जसें मनास येईल तसें खेळतात व नाचूं लागतात. व लहान मूलें अज्ञान असून त्यांचे बापांबरोबर खेळत असतात. व कोणी म्हणतात कीं, देवास मागून घेतले आहे. हे हिंदू लोक येलवा, बिरदेव, खंडोबा, सांब, विष्णु, इत्यादि देवांस यथाभावें करून भजल्यास आपली इच्छा पूर्ण होणार नाहीं कीं काय? याप्रमाणें धारवाड, बेळगांव, जिल्ह्यांतले शिवचारी म्हणजे ब्राम्हणास देखील शिऊन घेण्यास अनमान करितात, असें लोक देखील सदरहू मुसलमानांबरोबर सदरहू प्रमाणें वेष धारण करून खेळत असतात. व सदरहू देवाच्या नांवानें कंदुरी म्हणजे बकरा कापून इतर जातीचे लोकांकडून देवास करवितात. येणें करून त्या प्राण्याचा जीवहिंसा केल्याचा दोष जाईल कीं काय? असो.

आणखी एक मोठा चमत्कार पाहिला. तो असा कीं, धारवाड बेळगांव जिल्ह्यांतील कांहीं गांवचे ब्राम्हण, कुळकरणी लोक व त्यांचे आश्रित ब्राम्हण देखील मुसलमानांचे देवास भजून फकीर होतात, हा तरी मोठाच अधर्म आहे. ज्या इतर जातीचे लोकांस ज्ञान नसून पिढीजादी चाली प्रमाणें चालतों म्हणून ते सांगतात त्याप्रमाणें हे ब्राम्हण मूर्ख नाहींत? यांस ज्ञान असून हे ही फकीर होतात. यांस विचारल्यास, आमचे वतनदारीची चाल आहे म्हणून सांगतात. कोणती ही वतनदारीची चाल! आपले जातधर्मास विरुद्ध होऊन, फकीर होऊन मुसलमान देवास भजणें! व फकीर झाल्या वेळीं ते संध्या देखील करीत नाहींत म्हणून ऐकतों. हे ब्राम्हण तरी कसले! व पुन्हा जातीत तरी येतील कसे! याचा विचार थोर थोर ज्ञानवंत पंडित यांणीं करावा.

परंतु मोहोरमच्या १०,११ तारखेस एके गांवात मौज झालेली, सगळे जमावांत एक पट मुसलमान व दोन पट हिंदू व त्यांत देसायांचा म्हणून ताबूद निघाला होता, देसाई म्हणजे हिंदू शिवचारी लिंगायत असून त्यांणीं मुसलमानापेक्षां जास्ती खर्च करून ताबूद बांधिला, त्याच्या भोंवतीं हिंदू लोक पुरुष व बायका मिळून पांचसाहाशें जमले होते. त्यांत एक देखील मुसलमान दृष्टीस पडला नाहीं. असे लिंगायत असून मुसलमान देवास भजतात हें काय? मोठमोठे जागीं मुसलमान लोकांत जे शास्त्रज्ञ व ज्ञानवंत आहेत, ते देखील मुसलमान देवास भजत नाहींत. व ते देव देखील पाहात नाहींत. असें असून हिंदू जातींत काय हो हा अनर्थ!

सारांश. पिढीजादी चाल आहे म्हणून त्यावर

विन्नास जे देवितां, आपले स्वजीय देवास वि श्वासानें भजल्यास आपले काम पूर्णता होईल यांत संशय नाहीं. हें पत्र घेणारे, या गोष्टीस आश्रय देऊन हिंदू लोकांस उपदेश करून, हा दुष्ट मार्ग सोडून, सन्मार्गास आणतील अशी इच्छा मी करितों.

ता॰ २४ आगस्ट सन्न १८५८ सही हिंदु हितेच्छु.

---

**विद्यावृद्धीची अखेर,**— नेकनामदार कोर्ट आफ् डिरेक्टर्स यांणीं हिंदुस्थानचे सरकारास २२ जूनचें ८६ नंबरचें पत्र रवाना केलें आहे, त्यांतील ३८ वें कलम कलकत्त्याचे १४ वे आगस्टचे सरकारी ग्याझिटांत नेकनामदार गवरनर जनराल साहेब बाहादूर यांचे आज्ञेवरून प्रसिद्ध जालें आहे. तें कलम हेंकीं हल्लींच्या काळीं आमच्या अमलांतील जमाबंदीमध्यें काय मोठ्या अडचणी आल्या आहेत, हें आपण आपल्या मनांत आणलें पाहिजे. आणि या साठीं आपण हिंदुस्थानांतील विद्येच्या संबंधानें हरएक खर्च वाढविण्याचें मना करावें, आणि जर वाढविण्याचें जालें न, तर पूर्वीं आमची परवानगी घेतल्यावांचून कोणतें ही या विद्याखात्याकडे सांकशान करूं नये, अशी आमची आपणास फर्मास आहे.

या सदरील कलमावरूनच या आपल्या हिंदुस्थानांतील विद्यावृद्धीस खुटवा तूर्त निदान ५ वर्षें जाला असें आपण समजावें. विलायतेंत सरकाराचा अंमल होऊन पार्लमेंट सभा या आपल्या देशाच्या विद्यावृद्धीकडे लक्ष पोंचवतां सन्न १८६३ इसवीपर्यंत मूळ सहज जाईल, यांत संशय नाहीं: ही कालमर्यादा खिरारचे फ्रेंड आफ् इंडिया नामें पत्रांत त्यांच्या हुशार कर्त्यानें दाखविली आहे, परंतु आम्हांस वाटतें कीं, या मर्यादेच्या दुपटीहून ही कालगणना अधिक होईल. तेव्हां या आपल्या देशाच्या विद्याखात्याला वाढ लागेल. सदरहू पत्रकर्ता म्हणतो कीं, जमाबंदींत पूर्ववत् सुधारणा होण्यास सन्न १८६३ पावेतों काल लागेल. तोंपर्यंत कोर्टआफ् डिरेक्टर्स आपला हात मोकळ करणार नाहीं, तेव्हां त्यांस या विद्येसंबंधी खर्चाचे बाबदींत विचारिलें असतां ते अमलांत येण्यास त्यांच्या वहिवाटीप्रमाणें दोन वर्षें सहज लागतील; हें वास्तविक आहे कीं, वर्तमान कालीं काटकसर कंपनी सरकार करितें म्हणून त्यावर पांडित्य करणें बराबर नव्हे. तथापि, या सरकारचा बाणा पडला आहे कीं, खर्च वगैरे तोडण्याच्या कामांत या आपल्या विद्याखात्यावरच हल्ला करावा. आग्रा इलाखा खेरीज करून निवळ बंगाल इलाख्यांत विद्याखात्याकडे एकंदर खर्च होतो तो येणेंप्रमाणें.

| | रु॰ | आ॰ | पै॰ |
|---|---|---|---|
| पगाराकडे | ७५९२४ | ११ | ८ |
| पगारी विद्यार्थी | ४१६५२ | ८ | ९ |
| इमारतीकडे | २३७१ | ९ | ४ |
| सादिलवार पुस्तकें भांडेंमिळून | ९६९३० | १५ | १० |
| शाळांस आश्रय | ४३९३६ | ४ | ३ |
| एकूण. | १५७२२५ | [illegible] | १० |

आग्रा इलाख्यांकडे विद्याखात्यासंबंधी थोडाच खर्च होतो. आणि सर्व हिंदुस्थानांतील विद्येच्या कामाकडे सर्व खर्च २५०,०००, पंचवीस लक्ष रुपये सालाना होतो. असें म्हटलें, तर ही रकम खऱ्या खर्चाचे रकमेपेक्षां जास्त आहे असें समजावें. या सर्व रकमेचा

सात दशांश फक्त पगाराकडे खर्च होतो आणि तो मर्यादेच्या पलिकडे निरुपयोगी होतो. हा पगाराचा खर्च जेव्हां सर्व हिंदुस्थानभर विद्याप्रसार होईल; तेव्हां त्यावर देखरेख करणारे अधिकारी यांचा जाली आहे असें नाहीं, परंतु मेंढरापेक्षां धनगरांचीच संख्या फार. याप्रमाणें या विद्याखात्याची व्याप्ति असले कारणानें त्यांचा खर्च जबर होऊन या विद्याखात्या पासून जे लाभ व्हावयाचे, ते तूर्त या लोकांस प्राप्त जाले आहेत खरे. बंगाल इलाख्यांत शाळांस सरकाराकडून मदत ४३ हजार रुपयांची सालीना मिळते; आणि त्यावर देखरेख करणारे यांचें ४५ हजार रुपये वेतन आहे. या प्रमाणेंच सर्व व्यवस्था आहे. या स्थितीवरून या दुनियेंतील साधारण लोक देखील या आपल्या पैशाचा विनियोग विद्येसंबंधी मोठ्या चतुराईनें होतो. अशी त्यांची खात्री होईल, आतां जरी हा जाहिरनामा रद्द जाला आहे; आणि जरी त्यावर आपण मोठें दुःखप्रद भाषण केलें, तरी पार्लमेंट सभाच या विशीं खरोखर दार लावील तर लावील. या विद्याखात्यांत बंगालसरकार म्हणजे हिंदुस्थानसरकार फेरफार करून एक व्यवस्था चांगली करील. अशी आमची आशा आहे. "विद्याविहीनः पशुः" या न्यायाप्रमाणें आपल्या हिंदुस्थान सरकारानें चित्तांत आणून आपली अज्ञानी हिंदुप्रजा आहे तीस तिच्या उपयोगाचें ज्ञान विलायतचे प्रजेप्रमाणें देण्याविशीं तजवीज करावी यांत ह्या आपल्या सरकारास, व आपल्या देशाचे लोकांस फायदा खचीत आहे. विद्या वृद्धि झाल्यावांचून कोणतीही कल्याणदायक कृत्यें सरकारनें केलीं तीं विशोभित दिसतात. यांचें कारण हेंच कीं, उपयुक्त त्या कृत्यांपासून सौख्यें व लाभ देशास वास्तविक काय आहेत हें समजण्याची त्यांची योग्यता नसते. वास्तव सर्व सरकारनें इतर यत्न या देशाचे हितार्थ चालले आहेत, त्यांत जे मुख्य मुख्य आहेत असें सरकारास वाटतें. त्यांतीलच हा मुख्य सरकारानें समजून याची चांगली व्यवस्था केली असतां सरकारचे मनोदयानुरूप हा देश होईल. यांत संशय नाहीं.

---

रत्नागिरी— हरचिरी येथील राहाणारा एक मुसलमान यानें तेथीलच राहाणार पांच सा हा वृद्ध मुसलमानांवर बंड करण्यासाठीं निघून जात आहेत अशा वगैरे मजकुराची फिर्याद केली त्याविशीं चौकशी जाली. तेव्हां थोडीं हत्यारें मात्र त्या असामीकडे सांपडलीं. त्यावाचून त्यांस दंड जाला आणि बंड करण्यास जाण्याचा प्रकार बाबीत नझाल्यामुळें खोटे शपथेचा खटला फिर्यादीवर करू जाला आहे. त्याची दर्याफ्त अदालतीमध्यें होऊन ठरावामुळें बुढ्यांवर खोटी फिर्याद केली असें ठरलें सबब त्यास ४ वर्षें सक्तमजूरीची ठेप, व शिवाय २५० रु० दंड तो न दिल्यास आणखी एक वर्ष कैद अशी शिक्षा जाली. ज० मि०

---

कित्येक अधर्मिक युरोपियन लोकांत अशी क्रूर चाल आहे कीं, आपले आणि कोणाचें वांकडे आलें म्हणजे त्यांस द्वंद्वयुद्ध करायास बोलवावें. मग उभयतां आपआपले हातीं गोळ्या भरलेले पिस्तोल घेऊन एकमेकांकडे बार करितात. तेणें करून एकादे वेळेस दोघेही मरतात. कधीं एक मरतो व एक वांचतो. आणि कधीं कधी वांचतात. पण बहुतकरून वांचण्याचा भरंवसा नसतो म्हणून असल्या.

द्वंद्वयुद्धाला उभे राहाणारे फार क्रूर असें म्हटलें पाहिजे. अशा मनुष्यांस या पुढील गोष्टी वरून चांगला बोध होईल. एकदां एका अमेरिकन इंडियनाला एका मनुष्यानें द्वंद्वयुद्धाला बोलाविलें. तेव्हां तो इंडियन म्हणाला. "तुझ्या शरीराचा जो भाग दुरबळा असतां मरणाचें मरणाचें कांहीं भय नाहीं. त्यांत देखील गोष्टी मारल्यानें मला काय लाभ होणार? ससा किंवा कोंबडा मारून त्याचा उपयोग जो करतां येईल तो उपयोग तूं मेला असतां मला करतां येणार नाहीं." ज्ञा. द.

---

मृत्यु,— पुण्यांत गोसावी पुर्‍यांत मरपतगीर गुरु किसनगीर बावा गोसावी यांस सालीना ८००० हजार रुपयांचें उत्पन्न आहे. त्यांची प्रकृति आज तीन महिने आजारी होती. त्यांणीं आपले द्रव्याचा सद्व्यय आणि त्यापासून मनुष्यास व जनावरांस उपयोग होण्यासारखीं कामें विहिरींचीं कांहीं कांहीं ठिकाणीं केलीं, परंतु त्यांत एथील रास्ते यांचे पेठेंत हऊद बाधून त्यांत सरकारचे नळाचें पाणी नेऊन सोडलें आहे. याप्रमाणें एकंदर पन्नास हजार रुपये परोपकारार्थ खर्च केले. हें सरकारास मेहेरबान डंकन डेविडसन साहेब पुणे कलेकटर यांणीं कळविल्यावरून सरकारानें त्यांस एक सोन्याचें कडें, त्यावर सुंदर अक्षरें (आपण हें काम परोपकारानें सत्य केलें.) अशीं घालून सदरहू सोन्याचें कडें ता. २५ आगस्ट रोजीं मेहेरबान नाना मोरोजी डिपुटी कलेकटर यांचे मारफत दिलें. तें यांणीं अतिनम्रतेनें स्वीकारिलें. नंतर ता. २ सप्तंबर रोजीं कैलास वासी वय ५४ वर्षांचें होतें. त्यांचे मरणानें येथील बहुत लोकांस दुःख जालें आहे.

---

पुणे पोलिस,— येथें पुरुषोत्तमनारायण भट यांणीं रा. विठ्ठल माहादेव बर्वे यांजवर फिर्याद केली आहे कीं, आमचा पैसा बर्वे यांजकडे येणें आहे, त्याजबद्दल आम्ही बर्वे यांस खनाची पावती रुपये १०२८ रोजी तुमच्या कडे येणें नाहीं म्हणून चिठ्ठी लिहून दिली, तिचा आंकडा निताळ करून बर्वे यांणीं आमचे नांवची चिठ्ठी खोटी केली त्याबद्दल पोलिसानें बर्वे यांना पुरावा घेऊन सदरहू खटला मेहेरबान डेपुटी साहेब माजिस्त्रेट यांजकडे रवाना केला आहे.

---

पुणे जिल्ह्याचे रावबहादुर इनामदार यांचे मुलानें नाटककार यांतील एका जणानें मला मारिलें अशी फिर्याद केली. त्यांत साक्षी पुरावा याची चौकशी हवेलीचे पोलिस यांणीं करून नाटकांतील मनुष्यास चार रुपये दंड केला. अशा गृहस्थांचीं मुलें विद्याभ्यास टाकून अशीं रस्तोरस्तीं फिरतात. तर त्यांचा वेळ व्यर्थ न जाऊं देण्याबद्दल व सुशिक्षा होण्याबद्दल अधिक लक्ष द्यावें असें आम्ही रावबाहादूर यांस मुख्यत्वें करून सुचवीत आहों.

---

पुणें येथें द्वारकी कसबीण इचे घरीं एक माणुस तिच्या यजमानाचा म्हणून येऊन राहिला आणि दिवसास चोरी करून डागिने नेले तो चोर हल्लीं डागिन्यासह मिळाला त्यांस ९ महिन्यांची शिक्षा मिळाली.

---

पुणें ज्ञानप्रकाश छापखाना. कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांचा.

# ज्ञानप्रकाश

वर्ष १०

सोमवार तारिख १३ सप्तंबर सन्न १८५८ इसवी.


पत्राची किंमत.

१० दरसाल रुपये. ९॥ आगाऊ दिल्यास.


जाहिरात.

नाटककार आम्हीं सर्व उदार गृहस्थांस विनंती करितों कीं, ता. १८ सप्तंबर रोजीं येथील नाटकगृहांत चार अवतार म्हणजे मच्छापासून नृसिंहपर्यंत करूं. कूर्म अवतारीं समुद्रमंथनांत रत्नें काढण्याचा चमत्कार कांहीं दाखवूं. आणि नरसिंहावतारांत नरसिंहाचें प्र हिरण्यकशिपूनें युद्ध होऊन मांडीवर दैत्याचा वध जाल्यावर सर्व देव नरसिंहाची स्तुति करीत असतां नरसिंहाचा कोप शांत होत नाहीं. मग शंकरांची स्तुति केल्यावर, शंकर नऊ देवतांसह शरभाचा अवतार धारण करून हिरण्यकशिपु मांडीवर असतां नृसिंहास चंचून धरून उडवितील. हा शरभाचा या ठिकाणीं कधींही जाला नसेल. हा अवश्य पाहण्यासारखा आहे. याची स्तुति आम्हीं स्वमुखें काय करावी? अवलोकनांत आल्यानंतर समजेल. ता. ९ सप्तंबर सन्न १८५८ इसवी.

सही गोविंदभट्ट गोखले निसबत नाटक मुंबई.


## ज्ञानप्रकाश ता. १३ सप्तंबर सन १८५८

**विलायत,**— एथील डांक १७ वे आगस्ट पर्यंतची, सप्तंबर ९ मिनहूस दाखल झाली, या डांकेंतून राजकीय तोफखान्याचे गैरसनदी कामगार व गोलंदाज मिळून १०० लोक आले आहेत. ता. ४ आगस्ट रोजीं विलायतेची राणी, तिचा पति प्रिन्स आल्बर्ट, ज्येष्ठपुत्र प्रिन्स आफ्वेल्स, कांहीं एथल्या उमराव (पाहिजेपणीचा मोठा लोक) या सर्वांनी हे पोर्टस्माथ बंदरांतून निघून त्याच दिवशीं फ्रान्स देशांतील चेरबर्ग एथें दाखल जाले. तेव्हां फरासिसांचे बादशाहानें गलबतांतून उतरण्याचे ठिकाणीं जाऊन राणीस सन्मानानें भेट दिली. ५ वे आगस्ट रोजीं मोठी मेजवानी आगबोटीवर जाली, त्या समयीं फरासिसांचे बादशाहानें विलायतेचे राणीबरावर भाषण करितांना असें म्हटलें कीं, आपल्या उभय राज्यांत मित्रत्व राहावें, यांत परस्परांस चांगलें आहे. कधीं या मित्रत्वांत विघ्न आणण्याकरितां उपाय ठिकाणी जाली होती. त्याचें फार वाईट वाटतें. असो, परस्पर राज्यांमध्यें मित्रत्व राहावें म्हणजे मोठे आनंदाची गोष्ट आहे. अशा प्रकारचें बोलून दाखविलें, हें भाषण ऐकून राणी खुश होऊन तिणेंही दर्शविलें कीं, या आपल्या परस्पर राज्यांत मित्रभाव ठेवण्याविषयीं उभय राज्यांनीं जितकी तजवीज करवेल तितकी राखिली असतां मित्रत्वांत वैपरीत्य यावयाचें नाहींच. असो. नंतर राणी साहेब आगस्टास तेथून निघून साहावे मिनहूस तीग्राविसेंड बंदरीं पुनरपि गलबतावर चढून जर्मनी देशांतील आनपर्व शहरीं जाण्याकरितां निघाली. ती ११ वे मिनहूस पोटस्थाम एथें आपली कन्या प्रशिया देशाच्या फ्रेडरिक नामें शाहाजाद्याची राणी जालेली आहे. तिला भेटावयासाठीं उतरली.

साफिडरी कचेरी आणि सरहेन्री रालिन्सन

यांस हिंदुस्थानचे राज्य कारभार चालविण्या साठीं नेमलेलें नवीन कौन्सल त्यांत विलायत सरकारानें कौन्सलदार नेमिले आहेत. त्या कौन्सलांत मिस्तर जे० पी० विलबी, व मिस्तर जान स्त्यूअर्ट मिल या दोघांस जागा पतकरण्या विषीं बहुत वेळा विचारिलें, पैकीं खालच्यानें जागा नको म्हणून सांगितलें आहे.

नेकनामदार कोर्ट आफ् डिरेक्टर्स यांणीं सरजान लारेन्स पंजाबचा कमिशानर यांस सालीना २०००० वीस हजार रुपये पोंचविण्याचा ठराव केला आहे. व त्यांस बारोनेटची पदवी दिली.

किलकेनी एथें दंगा माजला आहे, तेणें करून कृषिकर्मास कांहीं धोका पोंचला आहे. परी येथील ड्रगूनचे दोन त्रुपूस हजर जाले आहेत, तेणें करून पुढील अव्यवस्था होण्याचें तें मना जालें आहे.

युरोप खंडांतील इतर राजकीय वर्तमानांतील तुर्कस्थान (रूमशाम) चे लोकांवर मोंटेनग्रो एथील लोकांचें वर्चस्व चाललें आहेच. आणि तेणें करून त्या देशाचे मुसलमान लोकांचा पिशाफ होऊन त्यांचा ख्रिस्ती लोकांविषीं द्वेषभाव वाढत चालला आहे.

आट्लांटिक सागरांत तारायंत्राचे कारखान्याचें काम चाललें आहे.— सरकालीन क्यांबेल साहेब हिंदुस्थानचे कम्यांडर इन्चीफ यांस 'पीरेज्य' अशी पदवी सरकारांतून मिळाली. बेलजमचें सरकार आपले देशांतील किल्ले विस्तीर्ण करण्याचे विचारांत होतें. तो बेत रहित जाला.— पार्लमेंटांत हिंदुस्थानचे राज्यकारभाराविषयींचा नवीन फेरफार असावा याविषयीं जो मसूदा जाला आहे तो राणीसरकारानें मान्य केला, आणि पहिल्या सप्टंबरांत अमलांत येणार होता.— सरकारास व्याजानें ऐवज ८०००००० आठ कोट रुपये पाहिजे त्यापैकीं ता० १७ आगस्ट संनमजकुरीं विलायतेस ३०००००० तीन कोट घेण्याबद्दलचें कबूल केलें.

---

श्रीक्षेत्रवाई येथील कोर्टांतील वकील रा० रा० शंकरबाबजी गोरे यांस सात रुपयांखोटा रोखा चालविल्यावरून सातारचे असिस्टंट जुडिशियाल कमीशानर यांणीं ५ वर्षांची शिक्षा दिली. याविषयीं आम्हीं आपले ता० १९ आगस्ट सन्नमजकूरचें पत्रांत क्षेत्रवाई वासदरांत लिहिला आहे. त्या खटल्याप्रकरणीं गोरे यांणीं सातारचे कमीशानर याजकडेस अपील केलें त्यांत चौकशी होऊन सदरहू वकील हा सात रुपयांचा रोखा चालवील असें नजरेस न आल्याकारणानें कमीशानर यांणीं अपील बहाल करून शिक्षेचा ठराव रद्द करून कैदीची मुक्तता जाली असें आतांच समजलें आहे. परंतु या खटल्यांतील इतर कैदींविषयीं काय व्यवस्था जाली हें अद्यापि समजलें नाहीं. त्यास जर कोणी आम्हांस कळवील तर आम्ही त्याची मेहेरबानी समजूं.

---

सरजमसेटजिजीभाई नैट यांस बारोनेटचा किताब राणीसरकारानें दिला आहे तो गेल्या सरकारी ग्याझिटांत प्रसिद्ध जाला आहे. हा किताब त्यांचे वंशपरंपरे चालावयाचा आहे. व हा चिरकाळ योग्यतेनें राहावा म्हणून या उदार दीर्घदृष्टीच्या पुरुषानें अशी योजना केली आहे कीं, सरकारांत पंचवीस लक्ष रुपये ठेविले आहेत. त्या रकमेस शेंकडा सालीना रु० ४ व्याज देण्याचें सरकारानें कबूल केलें आहे. हें व्याज व किताब त्याच्या दरपिढीच्या एका पुरुषाकडे चालेल.

## हवारिपोर्ट.

दक्षिणभाग ता. १५ आगस्टपर्यंतचा.

**बेळगांव**, या जिल्ह्यांतील परसगड, बागलकोट, बदामी, आणि आथणी या तालुक्यांत अगदीं पाऊस नाहीं. बाकीच्या ठिकाणीं पाहिजे. परंतु संपगांव एथें भाताचे शेतकीस व हुनगुंद एथें हरभरे वगैरे यांचे पेरणीस अधिक पाहिजे. चिकोडी व तासगांव येथील शेतें टवटवीत आहेत. परंतु तांबडमातीच्या शेतांचा पाऊस नसल्यामुळें धुराळा उडत चालला आहे.

**धारवाड**, या जिल्ह्यांत पर्जन्य पडला म्हणून पडला असाच आहे. भाताचीं पिकें धारवाड व हुबळी तालुक्यांतील चांगलीं आहेत. हुबळी येथें पाऊस पाहिजे. बंकापूर, हागल, आणि राणी बिनूर या तालुक्यांत पाऊस बरा आहे. बंकापूर, व कोडी एथील खरिपाचीं पिकें बरीं आहेत. नवलगुंद तालुक्यांत कांहीं गांवचीं शेतें फारच सुकत चाललीं आहेत. धंबळ एथील ज्वारीचीं पिकें चांगलीं येतील असें दिसत नाहीं. धारवाड येथील येथील शेतांस रोग पडला आहे. बंकापूर, धंबळ, आणि राणी बिनूर येथील उसाचे फड चांगले आहेत. बंकापूर तालुक्यांत कापसाचीं पिकें बरीं आहेत.

**सातारा**, जिल्ह्यांत पुष्कळ ठिकाणीं पुरता पाऊस पडला. पूर्व बाजूकडील भागांत पुष्कळ पाऊस अजून पाहिजे. वाळवे तालुक्यांतील कितीएक गांवीं ओल नसल्यामुळें शेतें सुकत चाललीं आहेत.

स्वतंत्रसंस्थानी. पंतसचिव यांचे मुलखांतील मध्यभागीं आणि पश्चिम बाजूकडेस पर्जन्य चांगला पडला. आणि पूर्वेकडेस नाहीं. पंतसचिव यांचे गांवीं पाऊस पडला आणि शेतें बरीं आहेत.

---

**रत्नागिरी**; थर्ड असिस्टंट कलेक्टर मिस्तर ... साहेब गुरुवारीं स्वारीस निघून गेले. राजश्री बाहादरजी पंत भोगले कर जे रत्नागिरी येथें बरेच वर्षें वकील होते. त्यांस आजसुमारें दोन वर्षें वेड लागलें होतें, त्यांतच त्यांचा परिणाम झाला.— वेंगुर्ल्यास तारायंत्र सुरू जालें. मुंबईहून प्रश्न लिहून येऊन इंग्रेजी शाळेची वार्षिक परीक्षा झाली.— पर्जन्य फार चांगला पडत आहे.— मिस्तर लाइड साहेब कोल्हापुरास जाण्याकरितां आज येथून गलबतांतून निघून जाणार आहेत.— येथें मिस्तर क्यामरीन साहेब यांचेपाचे ते ता. २० वीचे सुमारास ठाण्याहून निघतील असें बातमीवरून कळतें. त्यांची स्वारी येईतोंपर्यंत अदालतीचें कामाचा चार्ज सदरअमीनसाहेबांकडे राहील.

---

लाखेची मोहोर असल्याबद्दल पोस्टमास्तर जनरल यांणीं अशी सूचना केली आहे कीं, ज्या कोणास बांकनोटी टपालांतून पाठविणें असतील त्यांणीं यांचे दोन भाग करून त्यांतील एक भाग लखोट्यांत पाठवावा. व तो लखोटा डिकानें चिकटविलेला सहज उघडतां येतो. सबब मजबुरीकरितां अशा लखोट्यावर लाखेची मोहोर आपली करून लखोटा पाठवीत जावा. याप्रमाणेंच चेक व हुंड्या वगैरे फार कारणीक कागद हे सदरीं लिहिल्याप्रमाणें पाठवीत जावे. अशी सूचना केली आहे. ती आम्ही आपले वाचणारांकरितां संतोषानें कळविली आहे.

---

जरी बंड उत्तरहिंदुस्थानांतलें बहुतेक मोडून चाललें आहे. असें आपण त्या बंडाच्या वर्तमानांवरून खरोखर पाहातों, तथापि अवशिष्ट बंडखोर अंतकाळीं यथाशक्त्यनुसार आपला दुर्वृत्तीचा बाणा सोडीत नाहींत असें दिसून येतें. पाहा बंडखोरांचे ताब्यांत सालगुदस्तां लखनौ, काल्पी, दिल्ली, वगैरे जीं मोठमोठीं आणि मजबूद ठाणीं होतीं. तीं त्यांचीं गेलीं. तोफा, व दुसरें युद्धोपयोगीं सामान ही सरकारचे हातगत कांहीं जालें. कांहींची दाणादाण होऊन गेली. बंडखोरांपैकीं, बहुतेक संग्रामीं अन्नपाण्याचे मोताद्दीमुळें, व दुसरे रोगराई जिवविशेष कष्ट काढणें वगैरे कारणांहीं त्यांची संख्या बरीच नष्ट झाली. असें असतां ते लोक आपला पुढील परिणाम काय व्हावयाचा हें धडधडीत पाहात असतां ते लोक अद्यापि आपल्या वर्तनीच्या अभ्यास भुलून नाना तऱ्हेच्या चेष्टा करायास चुकत नाहींत. यावरून ते लोक आपल्यास पूर्ण राजद्रोही, व प्रजाद्रोही म्हणवून घेण्याचा निश्चय करतात असें त्यांच्या क्षुल्लक तजविजी चालविण्यावरून स्पष्ट दिसून येतें. मागें पलटणी दैववशात् बंडावल्या, परंतु अशाच निरंतर सर्व पलटणी बंडावतील अशी अपेक्षा मूर्खावांचून इतर करील असें नाहीं. अशा अपेक्षा अद्यापि बंडखोरांस आहेतच. नुकतीच सरकारी एक विलक्षण खबर प्रसिद्धीस आली कीं, नानासाहेब यांचा परवाना गेल्या मे महिन्यांतले मितीचा, एक पंडित घेऊन मुंबईखातीचे २५वे काळे पायदळांतील चार शिपायांस सदरहू सर्व पलटण आपले सरकारावर बदलून नानास जाऊन मिळण्याविशींची तजवीज करण्यास सांगण्याचे उद्योगांत होता. सदरहू गोष्ट ग्वालेर मुकामीं चालली, परंतु दैव बलवत्तर म्हणून ती गोष्ट एका शिपायाच्या द्वारें परिस्फुट होऊन तो पंडित व दुसरे त्या कटांतील शिपाई सरकारअंमलदारांनीं तावडतोब कैद केले. आतां त्यांची चौकशी यथान्याय होणें ती होईलच. परंतु आश्चर्य पाहा कीं, या बंडखोर लोकांनीं सरकारचें सामर्थ्य मनांत न आणतां अविचारानें वर्ततात. आणि दुसरे जे अलिप्त आहेत, त्यांसही आपल्या प्रमाणेंच फेऱ्यांत आणून त्यांच्याही नाशास प्रवृत्त होण्याचे यत्नांत आहेतच. असो त्यांचे यःकश्चित् यत्न व कुयुक्त्या पाहीं लवकरच लयास जातील. हें ही अनुमान करतां येतें.

---

## मुलतानांतील बंड

लार्ड एल्फिन्स्तन साहेब यांणीं मुलतान येथें बंड जाल्याविषयींची बातमी आम्हांस ता. ९ सप्तंबर रोजीं मेहेरबानी करून दिली.

मुलतान येथें ता. ३१ आगस्ट रोजीं ६२ व ६९ या दोन काळ्या पलटणी आहेत त्यांचीं हत्यारें सरकारानें घेतलीं आहेत. त्या पलटणींनीं १ बंगाल फ्युझिलीयर आणि राणीचे तोफखान्यांतील गोरे लोकांवर हल्ला करून त्यांचीं हत्यारें घेण्याचा यत्न केला तो त्यांचा अगदीं सिद्धीस गेला नाहीं. आणि त्यांत त्यांचा मोठाच नाश जाला. परंतु कांहींकांचे अमोलिक जीव या कामांत नाहींसे जाले. कप्तान मलसर फर्स्ट फ्युझिलीयर पलटणीवरील आणि चार तोफखान्यांतील हे मारले गेले. बंडवाल्यांचे किती लोक मेले हें समजलें नाहीं.

---

गुजराथप्रांतांत नेरीयाद व डिंडी या ठिकाणीं नवीन पोस्ट आफिसें जालीं आहेत.

आग्रा,— एथून ता· १४ आगस्टचें वर्तमान आलेलें बंबे टैम्स ता· ४ सप्तंबरचे पत्रांत जनरल रावर्टसनसाहेब यांणीं पत्र लिहून लाविलेलें ग्वालेरचे बंडवाल्यांविषयीं आहे तें येणेंप्रमाणें.

निमच येथील फौज बंडवाल्यांवर चाल करून गेली तेव्हां ते मैलसदिशेकडून निघून चालते झाले. निमच येथील लोक दोन दिवसांत १५ मैल चालून गेले तेव्हां बंडवाल्यांचे लोक असाध्यरीतीनें जात होते. परंतु त्यांचा जमाव हजारों लोकांचा आहे. त्यांच्याजवळील खजीना हत्तींवर अजून आहे, व हत्तींवर तोफा आहेत. व त्यांच्यांतील मुख्य मुख्य लोक कायम आहेत. त्यांपैकीं एका जणास मात्र जखम लागली आहे. त्यास खाटेवर घालून नेतात. ते खेडेगांवचे लोकांस आपले कामाकरितां बिगारीस धरितात.

इंग्लिशांचे हातीं तिकडील एक मनुष्य सांपडला आहे. तो असें सांगतो कीं, बंडवाल्यांचे पुढारी पंडित रावसाहेब व बाईली, तात्या टोपे, बरेलीचा आणि बांदाचा नबाब असे आहेत. त्यांचा बुंदेलखंडांत जाण्याचा बेत आहे. अम्नेपीच्या रस्त्यानें जाऊन दक्षिण दिशेस वळून बनेडसरा करून मध्यहिंदुस्थानांत जाणार. जनरल रावर्टसरसाहेब ता· १६ आगस्त रोजीं गाईलना ठिकाणीं असून त्यांची फौज बनसनदीच्या पूर्वबाजूनें जात आहे.

---

“मांडवी व द्वारकेहून आलेलें पत्रावरून असें दिसतें कीं, द्वारकेपासून १४ मैलांवरील एक लहानसें बेट (यांतील राहिवाश्यांची संख्या १०,००० मनुष्यांची आहे.) ज्या दिवशीं ताबुतें शिळवलीं, त्यादिवशीं मुसलमान लुटीचा देखावा होतें. त्या बेटाचे मुसलमानांची अशी चाल पडून गेली होती कीं, त्यावेळीं घोड्याची स्वारी बाहेर काढतात (मुंबईंत ही चाल थोडके वर्षांवर मोडून टाकली, तेव्हां घोड्यावर जी छत्री धरतात, ती मारकिटांत व पांच मंदिरां (देवालयां) जवळ बंद करतात. चार मंदिरांजवळ छत्री खालीं उतरून बंद केली. परंतु ५ वे मंदिरीं नेहमींची चाल प्रचारांत आणली नाहीं. यावरून त्या देवालयाचे ब्राह्मणांनीं तक्रार केली. मुसलमान लोक, जे तयार झाले होतेच, ते मोठ्या उत्सुकतेनें कज्ज्यांत शिरले. नंतर तंटा सुरू झाला. त्या देवालयाचे रक्षकांपैकीं ५ किंवा ६ असामींस खालीं पाडलें. आणि भयंकर रीतीनें घायाळ केलें. ते जबरीनें देवळांत शिरले. त्यांतील पवित्र मूर्तींपैकीं एकीचे तुकडे तुकडे केले, आणि जवाहीर, मूर्तींचे सोन्याचे व रुप्याचे दागिने, व मोलवान भांडीं मिळून सर्व सुमारें ८०,००० रुपयांचा माल लुटला. दंगा करणारे स्थानीय अधिकाऱ्यांची पर्वा नकरितां, उघडपणें लुटलेला माल आपले आंगावर शोभवितात. या प्रकरणांतील पुढारी मेक्रानी शिपाई आहेत. असें भय पडलें आहे कीं, मुसलमान लोक सर्व बेट लुटतील. तें गायकवाड सरकारचें आहे. रहिवाश्यांचे स्थितीची बातमी द्वारकेचे नेटिव माजिस्त्रेटास पाठविली. आणि जरीं १० तासांत जबाब येऊं शकतो, तरीं तो योग्य अधिकारी ३ दिवसपर्यंत स्तब्ध राहिला आहे.” हिं· हि·

---

धरणीकंप,— कलकत्यांत ता· २४ आगष्ट रोजीं धरणी थराकून कितीएक लोकांस धक्का बसला. असाच धक्का सन्न १८४२ सालीं बसला होता. या धरणीकंपानें नाश झाला नाहीं. बं· स्था·

---

## लष्कर ग्वालेर प्रकरणीं उत्तर.

ज्ञानप्रकाशकर्त्तेयांस.

विनंतीविशेष. ईश्वरानें जेवढे पशुपक्षी आदिकरून प्राणी जन्मास घातले आहेत. ते सर्व आपआपले जातीविषयीं अंतःकरणपूर्वक अगत्य किती बाळगतात, हें आबालवृद्धांचे लक्षांत आहेच. त्यांत मनुष्यजन्मास प्राणी आल्यावर आपले ज्ञातबांधवांचें किंवा आप्तजनाचें ज्यांत कल्याण होईल असेंच आचरण करावें अशी नीति आहे.

कोणी कोणास पुरुषाची निंदा केली, अगर त्याचे कीर्तिरूप चंद्रमास कलंक लागण्याजोगें कर्म केलें तर स्वज्ञास हें उचित आहे कीं, तो डाग त्या पुरुषाचा पुसून टाकून त्यास निष्कलंक करावें ही चाल परंपरा चालत आली आहे त्याप्रमाणें आम्ही आपले स्वज्ञातसंबंधी याजवरील दोषारोपण उपटून टाकण्यास थोडासा झटतों.

श्रीमंत विंग्रजी म्हणजे इंग्रेज, यांचा अंमल झाल्यापासून नवीन नवीन छापखाने झाले. त्यांत पाहिजे त्यानें पाहिजे त्याची निंदा करावी, असा सांप्रदाय पडून गेला आहे. हाली एक चमत्कार पाहिला कीं, आमचे तात्या वझे यांजबद्दल खोटा मजकूर आपले पत्रांत कोणी दुष्टानें छापवून प्रसिद्ध केला. तो येथील दिवाणजीराव साहेब यांणीं वाचून तात्यांकडे पाहाण्यास पाठविला, परंतु तात्यांस त्यांतील मजकुराची ओळख देखील नसल्यामुळें त्यांचे हृदयाचा एक लेशही वांकडा जाला नाहीं. तो मजकूर आम्ही तेथें होतों, म्हणून आमचे कानीं पडला. तेव्हां बहुत राग आला, परंतु लिहिणाराचा सामना तुमचे शिवाय होणार नाहीं हें समजून त्याचे मजकुराचें खंडनपत्र तुम्हाकडे पाठविलें आहे, हें कृपा करून प्रसिद्ध करून पहिलें पत्र लिहिणारास खटें करावें.

"खरें वाईट पाहाणारा" याचे पत्राच्या खोंचा आम्हीं तीन धरिल्या त्या येणेंप्रमाणें.

१ वझेयांनी दाढ २ साळी. ३ पैसा. आतां पहिले खोंचे विशीं आमचें म्हणणें आहे कीं, "रघुनाथ भटजींची बहुत दिवसांपासून दुखत आलेली दीर्घ दाढ" म्हणून लिहिलें आहे. त्यास ही गोष्ट अगदीं खोटी. आपले तात्यांची दाढ कांहीं अशी विशाळ नाहीं. साधारण मानवाचे दाढेसारखीच आहे. व ती बहुत दिवसांपासूनही दुखत नाहीं. कधीं मधीं मनाधाराचे अगोधर आठचार दिवस दुखती. तीस तंबाखू वगैरे उपाय केला म्हणजे नीट होती. दुसरें औषध लागत नाहीं.

२ दुसरे खोंचीबद्दल, साळीचा घटस्फोट जाला म्हणून त्या पत्रांत मजकूर आहे. त्यास ही गोष्ट अगदीं लबाड. शपथपूर्वक खोटी आहे. साळी ही + + केळकराची कन्या. तिला तिचे बापानें नवऱ्यानें वगैरे वर्तणुकेवरून घरांतून बाहेर घालवून दिलें. तेव्हांपासून १६-१७ वर्षें वेगळें बिऱ्हाड करून राहिली असून तिची चालचलणुक साधारण गृहस्थासारखीच आहे. काशीकर ब्राम्हण तिचें हातचें पाणी पितात, व येकादे वेळेस तिचे हातचें अन्न देखील खातात. तेव्हां या सर्व गोष्टी, घटस्फोट जाला नाहीं म्हणून होतात ना?

साळीची हिमायत ऐकून तात्यासाहेब केदीस सोडितात, म्हणून पत्रांत लेख. त्यास अशी गोष्ट तात्यांनीं कधींच केली नाहीं. गणु म्हणतो कीं, "आपले तात्यांवर लोक उगीच तुफान घेतात. त्यांनीं कधीं एकदांच वासुदेव पंत करंदीकर

यांचे बद्दल मात्र खाली फाळूची भीड ऐकली होती, पण ही गोष्ट जनकगंज व विंचूरकर यांचा गोट इतक्यांचे मध्यें जालेली मुंबई इलाखाभर पसरली गेली, हा बरें वाईट पाहाणाराचा शाहाणपणा काय? ही गोष्ट रास्त आहे कीं, अशा गोष्टी वर्तमानपत्रांत पाहाण्यांत येतात हें अगदीं गैर आहे.

३ पैशा बद्दल, तात्यासाहेब कधींही पैसा खात नाहींत. त्यांचे दांतास शूळ आहे तेव्हां एवढी कठीण धातु त्यांस कशी खातां येईल बरें? तात्यांची पैसा मिळविण्याची शैली बरीच अगम्य आहे. त्यांचा पुतण्या माहादेव म्हणतो कीं, मागें दीड महिन्यामागें बंड जालें वेळीं बंडवाले यांचे भीतीनें आमचे तात्या घरांतून पळून वाघोबाचे बिळांत शिरले. पण तशा वेळेस देखील बाहेर पडतांना वाघिणीचे दाढेंतून आमिषाचा कवळ घेऊन बाहेर आले. त्याजबद्दल ती अजून कोकलत आहेच.

सारांश, याप्रमाणें "बरें वाईट पाहाणारा" याचे पत्राचा उलट जबाब आम्हीं दिला आहे, तो पूर्णपणीं वाचून पाहिला असतां, तात्यांवर विनाकारण दुष्टानें अपवाद लिहिला आहे, असें सहज सुज्ञांच्या लक्षांत येईल. या उपरही आणखी कांहीं दुष्टास तात्यावर लिहिण्याचें असेल तें सुखें लिहावें. आम्हांकडून कांहीं हरकत नाहीं. काचः काचमणिर्मणिः। हे विनंती

आपला मित्र जनकगंजांतील रहिवासी

---

कोचीन चैना, एथील वर्तमान गेल्या आगष्ट महिन्याच्या ३१ वे तारखेचा "न्युइरा आणि प्रेस" या नांवाच्या पत्रांत जें लिहिलें आहे. त्यावरून कळून येतें कीं, "कोचीन चैना" च्या उत्तरेस जे ख्रिस्ती धर्माचे लोक वास्तव्य करीत असतात, त्यांस छळण्याचा क्रम मोठ्यासपाट्यानें चालला आहे. (छळ करणारे लोक चिनी असावे.) ते लोक आपले जीव वांचविण्याकरितां जिकडे वाट फुटेल, तिकडे जाऊन राहातात. या बिचाऱ्या लोकांचीं साधीं देवालयें धर्मशाळा वगैरे यांचा विध्वंस करून टाकला. राहण्याचीं घरें जाळून फस्त केलीं. ज्या ज्या ठिकाणीं ख्रिस्ती लोक आढळतात, तेथें त्यांचें चंदन होतें. आतां चीनमध्यें सल्ला जाला आहे. त्यापेक्षां या ठिकाणींही स्वस्थता होईल, असा अदमास दिसतो.

सिंदकोसीद पत्रावरून कळून येतें कीं, गेल्या महिन्याच्या सोळावे तारिखेस द्वारकामुकामीं वाघ्री लोकांनीं एक मोठा दंगा केला, गायकवाड सरकारानें दंग्याचा बंदोबस्त करण्याकरितां कच्छ एथील पोलिटिकाल एजेंट यांजकडे बंदुकीच्या दारवेनें मागणें केलें आहे. व. दी.

---

मुद्रेचा फेर.— जयपूरचे महाराजानें गवरनर जनरल साहेब बाहादुर यांची परवानगी घेऊन त्याचे राज्यांतील नाण्यावर दिल्लीचे बादशाहाची प्रतिमा असे ती बदलून हल्लीं नवीन नाणें केलें आहे. द्यन

---

कलकत्त्यांतील तारायंत्रावरील सुपरिंटेंडेंट याणें असें कळविलें आहे कीं, कलकत्यापासून मद्रासपावेतों तार आहे, परंतु त्या कामावर देखरेख करणारे कारकून कमी आहेत. व कामही बिनधोक चालत नाहीं. त्यास साहेब लोकांनीं जें काम सदरहूमध्यें पाठवावयाचें तें थोडें असून सुवाच्य अक्षरांनीं पाठवावें. असें कळविलें आहे. बं. ग्या.

---

## बंड अद्याप मोडलें नाहीं.

पुढील मजकूर "इंग्लिशमन" पत्रावरून घेतला आहे.

"आम्हीं 'दिल्ली ग्याझेट' पत्रांतून कांहीं उतारे छापतों, ते बंडानी धमक किती कशी झाली आहे, दर्शवितात, आणि तें बंड मोडून टाकण्यास व बंडखोरांचा नाश करण्यास आपले प्रयत्न किती अशक्त व मंद आहेत. एका पत्रांत असें लिहिलें आहे कीं, अलवार गांव लुटलें आहे. राजाचे स्वार त्याविरुद्ध बंडावले आहेत, आणि त्यास आपले किल्ल्यांत कोंडून ठेवला आहे. अलवरचे राजानें हे स्वार, बंडाचे आरंभापासून हा वेळपर्यंत प्रमाणीक होते. जे निमच एथील बंडखोर गुदस्तां मुले महिन्यांत आग्र्यास जातांना ... राजाचे मुलखांतून गेले त्यांस त्यांनीं अडथळा केला, आणि त्यांजबरोबर लढण्यांत कांहीं तोटा सोसला. त्यांचें हालींचें बंड असें सिद्ध करितें कीं, बंडखोरांच्या आशा उंच आहेत, आणि ते आपले लष्करी कामास तुच्छ मानण्यास लागले आहेत. पुनः ग्वाल्हेरहून आलेले दुसरे पत्रांत असें लिहिलें आहे कीं, तें ठिकाण बंडखोरांनीं फुलत आहे. आणि ज्या स्वारांनीं नुकतेंच आपले राजास सोडलें, त्यांपैकीं सुमारें साहा अथवा ७,००० त्या ठिकाणासभोंवतीं घिरट्या घालीत आहेत. त्या पत्रांत असें लिहिलें आहे कीं, त्यांस पकडण्यास पुरती चपलता नाहीं. खरोखर नाहीं. गेल्या कांहीं काळांतील आपले कामानीं चपलतेचा दुःखकारक अभाव दर्शविला आहे. मिस्तर एडमनस्टनचा चालत्या महिन्याचे १७वे तारखेचा निरोप असें कळवितो कीं, जनरल राबर्टस्, जो बंडखोरांचा पाठलाग करीत आहे, तो १४ मैल चाल करणार होता, आणि बंडखोर २५ मैलांवर देवघरचे रस्त्यावर होते." हिं· हि·

---

इंग्लिशम्यान पत्रांत हिंदुस्थानाकरितां नवीन कौन्सल नेमणार त्यांत अमुक लोक नेमले जातील त्यांचीं नांवें लिहिलीं आहेत. परंतु तीं फक्त कल्पनेचीं दाखल केलीं आहेत, असें फ्रेंडआफ इंडिया पत्रांत लिहिलें आहे.

---

आयोध्येंत एकास मूठमाती देण्याकरितां लष्करी लोक गेले तेव्हां वीज पडून दोन जण मरण पावले. आणि एकजण जखमी जाला आहे, त्याची अवस्था जशी गोळीलागून चेहरे दिसतात, तशी जाली होती.

---

आग्र्याहून ता·१४ चें पत्र आलें, त्यावरून समजतें कीं, अजमीरचे आसपास अतिशय पर्जन्य पडला त्यामुळें लष्करी खात्यास अडचण जाली आहे असें नाहीं, लोकांचाही नाश फार जाला आहे. ग्वालेरचे बंडवाले उत्तरेकडून पश्चिमबाजूस वळले आहेत. त्यांचा पाठलाग होऊन कांहीं लोक धरले आहेत. या कामांत कितीएक राजांनीं सरकारची नोकरी उत्तम पावेळेस केली आहे. बंडांतील बांद्याचा राजा यांस धीर जो कोणी सरकारास आणून देईल त्यास दाहा हजार रुपये मिळतील असा जाहिरनामा आहे. तथापि अद्याप तसें घडलें नाहीं. धान्याची महर्गता कमी होत चालली आहे. टे·ग्रा·

---

येथें सुमारें दोन आठवडे पर्जन्य पडला नाहीं. तेणेंकरून लोक त्याची मोठ्या उत्सुकतेनें मार्गप्रतीक्षा करीत आहेत.

# पुरवणी तारिख १३ सप्तंबर सन्न १८५८ इसवी

**आक्ट;—** सन्न १८५८चा आक्ट २८ वा ज्यारी झाला आहे. त्यांत मद्रासेच्या बंदरावर गलबतांतून माल जातो येतो, त्याचा बंदोबस्त राहावा यासाठीं पोलिसचे लोक अधिक रखवालीस ठेवण्याविशीं, व त्याकरितां दरएक गलबतास त्याचे मालकापासून तीन आणे पूर्वी पैसा जास्ती घेण्याविशीं मुखत्यें ठराव आहेत.

**आक्ट २९ वा,** ज्यारी झाला आहे, तो मागील बंड उठून उत्तरहिंदुस्थानाचे वायव्य प्रांतीं दिवाणी कोडतें महकूफ राहिलीं. या कारणावरून पक्षकार लोकांस दावे चालविण्यास किंवा अपिलें वगैरे करण्यास मुदतीचे आंत अवकाश सांपडला नाहीं. यास्तव तशा लोकांचे कज्जे फैलांत घेण्याचे बाबदींत ठरविलेला आहे.

---

**धरणीकंपाचे धक्के;—** कलकत्यांत ता० ९ आगस्ट रोजीं दिवसास ४ वाजून २० मिनिटांनीं पूर्वेकडून पश्चिमदिशेकडेस धरणीकंपाच्या धक्क्यांचा वेग गेला. त्याचा जोर इतका होता कीं, त्यायोगानें दरवाजे आणि खिडक्यांच्या फळ्या एकदांच खडखडल्या. या प्रमाणें सीरामपूर येथेंही त्याच क्षणीं सदरहू प्रमाणें पृथ्वी थरारून भिंतीवरील नकाशे आणि खिडक्यांच्या फळ्या हलून गेल्या. दोन आंचके बसले, त्यांत पहिल्यापेक्षां दुसरा कांहीं सेंकद अधिक राहिला. यामुळें भिंतीचे गिलावेही खालीं पडले. नदीचें पाणी ही होतें तसेंच होतें, त्यांत विशेष प्रकार जाला असें दिसलें नाहीं. सीरामपूर येथील धक्क्याची गति ईशान्येकडून वायव्येकडची होती. सन्न १८५२ससालांत सीरामपूर येथें धरणीकंपानें घरोघरीं घरें कंपायमान होऊन खालीं पडलीं होतीं.

आतां यावरून असें दिसतें कीं, जमिनीच्या आंतील भागांत जळणारे पदार्थ गंधकादिकांस घर्षणाचे योगानें अग्नि लागून त्यांची किंचित् वाफ बाहेर येते. समयीं हा विस्मयकारक चमत्कार जाला असावा, असें वाटतें. कितीएक धरणिकंपांचे चमत्कार पूर्वीं जालेले आहेत. असे कीं, रानांतून लांबलांबचीं गुरें भयभीत होऊन गांवांत आलेलीं आहेत. पाण्यास कांहीं आधण आल्यासारिखे प्रकार जाले आहेत. हालींच्या धरणीकंपासमयीं वाफ पृथ्वींतून मोठे जोरानें वर आली नाहीं. यामुळें नाश जाला नाहीं. हा जगदीशानें आपणावर मोठा उपकार केला आहे.

---

शाहागड आणि बानपूर येथील पदच्युत राजे ३ रे सप्तंबर रोजीं ग्वालेरीस दाखल जाले. त्यांचे बरोबर कप्तान हट यांस देऊन तेथून ५ वे मिनहूस आग्र्याकडे रवाना केले आहेत.

---

**पनाळा;—** येथें उंदरांचा उपद्रव फार जाला आहे. व त्यांच्या चावण्यापासून पुष्कळ मनुष्यांस इजा जाल्याचें एका मित्राकडून समजत आहे. हल्लीं तेथें पर्जन्यानें उघडदिली आहे. वसं-

---

नौकासमुदायावरील कम्यांडर इन् चीफ यांचे आफिसांत ३०० मेडल्स (चांद) मृत जालेले वगैरे लोकांचे होते ते चोरीस गेले. याविषयीं पोलिसाकडून सदरहू डाग अगर चोरयांचा अद्यापपर्यंत थांग लागल्याबद्दलचें समजत नाहीं. टे० प्रा०

---

# नामदार जानकंपनीचे शेवटले दिवस.

तारि॰ ३१ माहे आगस्ट सन्न १८५८ मंगळवार हा दिवस, जो सावकारी राजकीय मंडळीनीं या भरतखंडाबराबर दोन शतकांवर संबंध राखिला होता. व विशेषेंकरून या खंडाच्या लोकांच्या नशिबांची जी सूत्रें शंभर वर्षेपर्यंत मालाच होऊन बसली होती, अशी जी आमची जानकंपनी तिचे राज्याचा हा वरील शेवटला दिवस होय. जी मंडळी सन १६०० मध्यें उदीम करावयास उभी राहिली व सन्न १६५२ मध्यें राज्य करूं लागली, व तिजविषयीं म्हटलें. म्हणजे एक बखरच लिहिली पाहिजे. व जीची सुंदर फौज, दर्यावर्दी फौज, राज्य, व प्रजा, जी म्हणली म्हणजे युरोपखंडाचे [illegible] होईल. व वसूल जो म्हटला म्हणजे ब्रिटिश राजाचे नांवें जेवढा उत्पन्न होतो, त्याच्या खालोखाल व ग्रेटब्रिटन खेरीज करून बाकी सर्व राज्यांस माजी पाडणारें असें जीचें राज्य तें ता॰ १ ली माहे सप्तंबर सन्न १८५८ बुधवार, गोकुल अष्टमीच्या दिवशीं आपल्या नामदार राणी साहेबांच्या अमलांत जाणार. ही विना कशी म्हणाल तर इतिहासांत लिहून ठेवण्याजोगी, व फारच प्रख्यात म्हणून ध्यानांत धरण्याजोगती आहे. दुर्गुणेंकरून, अशक्तीकडून, अथवा वाईटकर्मेंकरून, किंवा एकाद्या राजकीय अपराधाबद्दल शिक्षा अशा प्रकारच्या समजुती वरून म्हणजे हें फळ प्राप्त होत आहे, अशी केवळ कृतज्ञतापूर्वक विना नाहीं. तर उदीम करावयास अशा योग्य मंडळीच्या हातीं जें राज्य आजकालपर्यंत स्वाधीन केलें होतें, त्या राज्याचा मोठा भारुडपणा — — व देवलोकपणा इत्यादि समजुतीवरून हें राज्य म्हणजे केवळ "लिडन-हाल-स्ट्रीट." सारिख्या राज्याच्या मालिकेंतलेंच आहे. अशा समजुतीनें ज्या घराणांतलें तें आहे, त्या घराण्यांत त्यास घुसविण्यासाठीं खबरदार मालकांपासून, त्यांच्या तरवारींतून काढलें जात आहे. पहिल्या शतकांत जरी या थोरल्या वृक्षाच्या मुळास जमिनींतून बरेंच खत खावयास मिळालें होतें. तरी पण दुसऱ्या शतकांत फ्रासीची लढाई करून बंगालप्रांत या लोकांच्या पायापाशीं गडबडत आला. व क्लैवसाहेबाच्या तरवारीनें ज्या मंडळीस एक कोटपर्यंत देखील जी सत्ता त्यांस प्राप्त झाली तिचा चांगल्या प्रकारें व मार्गे उपयोग करावयाचा विसर पडून गेला. अशा मंडळीच्या हातीं राज्याचें तक्त लागलें. या अशा बहादुरीच्या तरवारीमुळें त्या कालीं इतकेंच मात्र निष्पन्न झालें कीं, नवाबास नम्र करून कोर्टउयलीयम किल्याची फटका केली. आणि अशी आशा धरिली कीं, पूर्वींपेक्षां यापुढें "बांदानास" (रेशमीरुमाल) फार स्वस्थ होतील. आणखी कांहींच नाहीं. फ्रासीची लढाई झाल्या उपरांत पुष्कळ वेळपर्यंत व या शतकास आरंभ होण्यापर्यंत ज्या लोकांस हिंदुस्थानाची माहिती आहे. त्यापैकीं नामदार कोर्ट आफ् डायरेक्टर्स यांकडून हिंदुस्थानांत कोणा एकासही पाठविण्यांत आला नाहीं. सांप्रत आमच्या जानकंपनीस खालसा करण्याची इतकी कांहीं चट लागली होती कीं, जोती उजळल्या वांचून राहिल्याच नाहींत. नेटिव संस्थानिक लोकांनीं आपलीं मुळचीं संस्थानें धरधरून त्याच्या स्वाधीन केलीं. सन १७५९ सालीं बंगाल प्रांताचा नवाब मिरझाफरखानें कलकत्ता शहरांतील थोरले फरखानें काशीमूरा आर्जका शहर व ज्या तर्हेनें त्यास चौबीस परगणा असें म्हणतात, असेअसे थोरल्याले ग्रास

त्याणें यांस भरविले. सन्न १७६५ साली शाहाआलम नामक मोंगलानें बंगाल, बहार, व ओरिसा या तीन प्रांतांचा वसूल व सरकसा प्रांताच्या उत्तरभागाचा सर्व वसूल यांणीं यांचे गजवे भरले. अशा रीतीची यांची उत्तम स्थिति व भरभराट पाहून कांहीं दानयुक्त कृत्यें तेथील नेटीव लोकांसन आवडून त्यांणीं या सर्व हद्दावर ही सर्व आग पेटवून भटी उजळली व ज्या कंपनीस निर्भयपणें व शांतपणें राज्य भोगावयास व पाहिजे तसा मोठ्या कमाईचा व्यापार करावयास नशिबें करून घमंडी उठावयाची आजकाळपर्यंत सुधी सांपडली होती. त्या कंपनीस त्यांणीं त्या किनाऱ्यावर आपलें पुनः थोबाड दाखवूं नये. अशी तजवीज केली.

सात वर्षांवर जी राज्याची जोडणी जाली होती, ती नामदार राणी साहेबांच्या प्रधानजीचा कुविचार व शाहाणपणा यांहीं करून केवळ यथायोग्य जाली होती. इतकेंच कीं, पंजाबाविषयीं थोडी बहुत होतीच. आतां ही जी वर सांगितलेली जोडणी जाली ती म्हणजे केवळ वारस नाहींत अथवा नामदार कोर्ट आफ डायरेक्टर्स यांच्या मर्जी अन्वयें, किंवा कसें याविषयीं कांहींच तक्रार नाहीं. आफगाणीस्थानावरावर जी लढाई जाली, इराणदेशावरावर जी लढाई जाली, व सिंध देशांत जी स्वारी जाली, या इतक्यांस नामदार कोर्ट आफ डायरेक्टर्स या मंडळी पैकीं कोणाचें ही मत असें करण्याबद्दल नवतें, इतकेंच नाहीं, तर त्या इतक्या लढायां विरुद्ध ते होते, परंतु काय करतील. विदसाहेबाचा सन १७६४ सालचा खर्डा त्यांस आवडली आली. सन १८१३ पासून व्यापार संबंधी खटाटोपाचे तुकडे तुकडे पडायास लागले होते. व ते एथपर्यंत कीं, सन्न १८३४ चार्टर आक्टावर पाणी पडलें. पुढें त्यावेळापासून त्यांस सौख्य म्हणून इतकेंच होतें कीं, आश्रय व "परत ओटी व इतर जो कांहीं अधिकार त्यास प्राप्त जाला होता, तो केवळ नामदार बोर्ड आफ कंट्रोल" यांची कृपाच म्हणावी. सन्न १७७० पासून १८११ पर्यंत आमच्या जानकंपनीकरितां २०२, ६११ टनांचीं २२४ जहाजें फक्त इंग्लंड देशांत बांधलीं. व सुमारें ७० पूर्वेकडील देशांत बांधलीं. नंतर यापुढें इतका थोरला व्यापार चढत गेला कीं, १६०० पासून १२०० टनापर्यंतचीं जहाजें एथून इंग्लंड देशास रवाना होतां होतां १००००० टन सामान घेऊन जाऊं लागलीं. अशा वेळीं त्यांस समुद्रांत अपाय करून अथवा दुर्दैवें करून जे तोटे सहन करावे लागले, ते तर अगणीतच आहेत. ते असे कीं, ४२ वर्षांत पहिल्या प्रतींचीं वीस जहाजें चीन देशानजीकच्या सागरांत गडप जालीं, पुढें सन्न १८०७ व १८०९ सालांत सुमारें सात साडेसात क्रोड रुपये किमतीचीं जहाजें १४ विलायतेहून एथें येत असतां गडप जालीं. हीं जहाजें सुंदर व प्रल्हादय अशा आरमारें करून नटविलेलीं होतीं. हीं आरमारें पराभवांतच केवळ वाकबगार अशीं दिसत होतीं, इतकेंच नाहीं. पण शत्रूच्या कुल्यास पाहातांच घाम आणणारीं होतीं. असो. परंतु असे जे या नामदार कंपनीचे गौरयुक्त दिवस ते विसरून जाण्याची ही सांप्रतची वेळ आहे. व इंग्रेजांशिवाय कोणा एकासही इतक्या थोरल्या राज्याचा खटाटोप नास मान्य करावयाचा नाहीं, व येणारही नाहीं. व अशी थोरली घमंडी ही उडवितां येणार नाहीं. अशा ज्ञातीची जी आमची नामदार कंपनी,

तिची बरबर एकदां इतिहासांत पुरली असतां ही जरी तीपुनः जन्मली, तरी चिंता नाहीं. परंतु इतकेंच कीं, नामदार कंपनीचें उच्चाटण होण्यास सर्वप्रजामत आहे. व त्यांत आमचेंही आहे. व याउपर ब्रिटिश लोकांच्या नांवास कितीही महत्वास, व्यापारें करून अथवा कोणत्याही सद्गुणभूषणें करून एकाद्या थोरल्या उंच पदास चढविलें व असें कांहीं पुढें सुधारणुकेचें कळस उभारिले कीं, जेणेंकरून यांच्या प्रमाणें कोणी सद्गुणभूषणाचा विडा उचलणारा होणार नाहीं, तरी पण नकोरे बाबा नको.

आतां व्यापार करण्यामध्यें म्हटलें तर आज दिवसपर्यंत युरोपखंडांतील कोणत्याही प्रजेनें पूर्वेकडील देशीं केला नाहीं असा सर्वोत्कृष्ट व्यापार यांणीं केला ही गोष्ट वास्तविक रीत्या खरी आहे. व व्यापारामुळें यांस बहुतीं उत्तरनी कल्याही प्राप्त जाली. जर कदाचित् स्वहितार्थाचा लोभानें डायरेक्टर साहेब लोकांनीं आपल्या गिऱ्हाइकांस लुटण्याची बारंवार मोकळीक दिली असती तर त्यांचें शासक हें म्हणजे केवळ चोरटें, लुटारू असें ठरलें असतें. पण इत्यादिक वृत्तांत लिहिणाराच्या लेखावरून आपणास असें दिसून येतें कीं, आपली नामदार जान कंपनी म्हणजे अर्ध शतकपर्यंत व्यापारी मंडळी असतांना प्रजेच्या खजिन्यांतून, रावापासून तों रंकापर्यंत ज्यास जसें हवें तसें त्यानें "हूं" करून घेतलें. तरीपण प्रजेच्या जिवावर त्यांणीं व्यापारगिरी केली. अथवा प्रजेस कधीं वाडलें, किंवा जाणून बुजून त्यास कोणा इतरां जनाकडून नाडविलें. असा आमचा जान कंपनीवर कोणाचाच दावा नाहीं. यावरून हें उघड आहे कीं, अशा प्रकारची स्तुति आमच्या कोणाही नेटिव राजाला मिळाली नाहीं.

शेवटच्या शतकाच्या अखेरीस आमची जान कंपनी व्यापारसंबंधी खटाटोपींत फारच विस्तीर्ण जाली. व गेल्या तीस वर्षांत दर्यावर्दी कामाच्या योगानें जो आपला व्यापार ज्या रीतीनें वाढला आहे त्यावरून त्यांची व्यवस्था कोणत्या दुःखकारक स्थितीनें चालविली असेल हें उघडच आहे. ज्या देशीं जावयास साहा मास लागणार, आणि इतक्या दूरच्या ठिकाणीं जे २४ असामी राहाणार त्यांच्या हातून राज्यकारभार चालविणें ही गोष्ट म्हटली म्हणजे केवळ "नशंकेयः" अशा प्रकारची आहे तर मग यावरून हें ही उघडच आहे कीं, जर दोहोंपैकीं एकही काम व योग्य व उपयोगी व सावधगिरीची रीतीनें ज्यांच्या हातून होत नाहीं, त्यांच्या हातून दुसरें काम तरी चांगल्या रीतीनें कशावरून होईल, कारण एक होत नाहीं, तेथें दोन तरी कसीं होतील? नाहींच नाहीं.

(इत्तसारावरून पुढें चालेल)

---

दिल्ली या नांवाचे मुळाविषयीं बंबे टैम्स पत्राचा एक पत्र लिहिणारा असें लिहितो कीं, "तारीखे फेरीस्त" या नांवाचे एका पारसी ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, दिल्ली हें शहर हिजरी ३०७ या सालांत स्थापित जालें. त्यावेळीं तेथील जमीन इतकी मृदु होती कीं, तींत मेख मजबुदीनें मारतां येत नव्हती. म्हणून तीस मुसलमानी भाषेंत "धीली" म्हणत. नंतर जमिनीवरून शहराचें नांव "धीली" पडून पुढें या नांवाचा "दिल्ली" असा अपभ्रंश झाला असावा असें वाटतें. व सं.

---

बंगाल हरकारारूपत्राधारें आब खबरवरून कळतें कीं, लखनौ येथील चीफ कमिशनर यांचे अफिसांतील एक रैटर बिन्नाथाचीं पत्रें गवरनरजनरलसाहेब यांस पाठवून त्यांत अयोध्येंतील अंमलदारांवर खोटे खटले लिहित असे. तो रैटर हाल्लीं पकडला जाऊन त्यास दाहा हजार रुपयांचे हजर जामिनाबद्दल कैदेंत ठेविलें आहे. तो नांवाचा गोरा आहे. कारण जर खराच असता, तर त्यास स्प्रीमकोर्डाकडेस त्याचा खटला रवाना केला असता. असा मजकूर आहे.

---

हिंदुस्थानसरकारानें लालाजोती प्रसाद यास रावबाहादूर किताब देऊन प्रतिवर्षी २५००० रुपये वसूलाची जमीन दिली. राज्याचीं कामें मोठे भरंवशाचीं म्हणजे बंडाचे समयीं सरकारचा जामदारखाना रक्षण केला, आणि सरकारचे फौजेस सामानही पुरविलें आणि तशीच बातमीही सरकारास दिली. अशीं कामें रावबाहादूर जोतीप्रसाद यांणें केलीं, म्हणून सरकारानें त्यास त्याचे उपकारांचे बदला सदरहू किताब व जमीन दिली. याप्रमाणें ज्यांनीं बंडाचे कामांत अंतःकरणपूर्वक मदत दिली. त्यांस आपलें सरकार कसें जाणतें हें या उदाहरणावरून सर्वांचे अंतःकरणांत येईल

---

## प्रसिद्ध बातम्या.

आग्रा ता॰ २९ आगस्ट पावेतोंची बातमी ब्रिगेडियर शावर्स यांणीं पाठविली आहे कीं, बंडवाले लोक राहनरावरून मनोप्यास गेले, आणि त्यांणीं जाटगांव यांची लूट करून नंतर जाळून टाकिलें. त्यांचे जवळ हत्ती असून कांहीं उंटही आहेत. अटकनामें नदीस महापूर येऊन तेथील जाइजें ३० वाहून गेलीं होतीं तीं धरलीं, परंतु तीन गांव वाहून गेलेलीं मिळालीं नाहींत. परंतु तीं आणण्याचा यत्न चालला आहे.-

इंदूर ता॰ २७ आगस्ट, उज्जयिनीहून अशी बातमी आली आहे कीं, सिंद्याचे लोकांनीं थेसरी येथील बंडवाल्यांवर चाल करून जाऊन त्या लोकांपैकीं २१ जण मारले आणि कांहीं लोक कैदी करून नेले. त्यांत दोन कारकून ही धरले आहेत.

प्रयाग, येथील वर्तमान ता॰ २७ चें कीं, सुलतानपूर येथील टोळीनें ता॰ २४ आगस्ट रोजीं सकाळीं गोमती नदी उतरून जाण्यास आरंभ केला आहे. बंडवाले लोकांचा जमाव मोठा आहे. आणि तो जिवावर उदार झाला आहे. त्या लोकांस वेणीमाधवसिंग हा आपले लोक ८००० हजार घेऊन व शिवाय लोक मिळून १३००० हजार लोक, आणि ८ तोफा घेऊन जाऊन मिळाला आहे.— ता॰ ३० आगस्टची बातमी प्रयागची अशी आली आहे कीं, सर होप ग्रांटसाहेब याणें ता॰ २७ आगस्ट रोजीं १२०० पायदळ सैन्य आणि २ तोफा गोमती नदी उतरण्यास पाठविल्या. त्यांणीं त्याच दिवशीं तीन गांव आपले ताब्यांत घेतले. ते समयीं कोणाकडून बिलकुल हरकत झाली नाहीं.—ता॰ २३ आगस्ट रोजीं क्यापटन म्याकमोलन याणें गाजेपूर जिल्ह्यांतील रेवती नामें गांव आहे. त्यावर शीक लोक घेऊन जाऊन हल्ला केला, आणि बंडवाल्यांनी दाणादाण करून चहूं दिवस त्यांस लावलें. त्यासमयीं बंडवाल्यांचे मेले व जखमी झाले मिळून ६० व आमचेकडील १५ असामींची संख्या आहे. आमचें सैन्य सुखरूप आहे.—

पंजाबसिंग हा, दगा म्हणून पंजाबचे पैलतीरावर गांव आहे, तेथें कांहीं बंडवाले घेऊन

बसला होता. त्यावर प्रयागचे पोलिस जंकं न यांणीं त्या बंडवाल्यांचा पराभव केला त्यांत ४० मारले गेले, आणि ७ जखमी झाले.

---

उत्तर हिंदुस्थानांत बंडवाल्यांतील मुख्य कोण कोण आहेत. व त्यांजवळ सैन्य किती आहे, त्यांची याद बंबेग्याझिटचे द्वारां एका गृहस्थानें पाठविली आहे. तींत चाळेरचे लोक नाहींत सबब, ती याद सर्व बंडवाल्यांचे गणतीची आहे असें म्हणवत नाहीं. त्यापि जी याद त्या गृहस्थानें पाठविली आहे ती येणें प्रमाणे

१ बेगम, हिच्याजवळ ६५० स्वार, अकरा हजार ११००० पायदळ, आणि ९ तोफा आहेत.

२ बेणीमाधवसिंग याजवळ ३०० स्वार, नऊ हजार ९००० पायदळ, आणि ९ तोफा, व शिवाय सा... ...ांत १००० स्वार, ...० पायदळ आणि ... तोफा आहेत.

३ खांनअल्ली खान याजवळ २३० स्वार, १८००० अठराहजार पायदळ, आणि ७ तोफा आहेत.

४ रामबक्ष रणबीर सिंग याजवळ २५० स्वार, १०००० दाहा हजार पायदळ, आणि ५ तोफा आहेत.

५ हरप्रसाद व मौलवी महंमद यांजवळ नऊशेंपंन्नास ९५० स्वार, १९००० पायदळ, आणि ७ तोफा; व वेरवीराबाद येथें ५० मेळांगर आहेत.

६ फसलीज्यान हुसेन, गंगाधर शेंडा, आणि मुसफअल्ली यांजवळ एकंदर २५० स्वार, १२००० पायदळ आणि १० तोफा आहेत.

७ देवीसिंग याजवळ २५ स्वार, ...००० पायदळ आणि ४ तोफा आहेत.

८ नरपतसिंग रोहाजवळ २००० पायदळ व ९ तोफा आहेत.

९ मीरमहंमद हुसेन याजपाशीं २४५० पायदळ व २ तोफा आहेत.

१० गुलाबसिंग व लष्करशाहा ह्यांजवळ १५० स्वार, १००० पायदळ, आणि २ तोफा आहेत.

११ उमराव सिंग व कालिका प्रसाद यांजवळ २०० स्वार, ७००० पायदळ, आणि ५ तोफा आहेत.

१२ हणमंत सिंग यांजवळ ६००० पायदळ, आणि ८ तोफा आहेत.

१३ गोजरासिंग यांजवळ १२०० पायदळ, आणि ६ तोफा आहेत.

१४ रामबक्ष याजवळ १२०० पायदळ, आणि १ एक तोफ आहे.

१५ कोंडबक्ष व महमद अमीर यांचे ताब्यांत २५०० पायदळ, आणि २ तोफा आहेत.

१६ महमदअल्ली व वजीरअल्ली यांजवळ दोन हजार पायदळ आहे.

१७ मुसफअल्ली आणि मेंटजी हुसेन यांचे जवळ ५०० स्वार, ६००० पायदळ, व ४ तोफा आहेत.

१८ टाज्यनी हुल हुसेन, नाना राव, आणि बाळाराव ह्यांजवळ ३००० स्वार, ९००० पायदळ, आणि १८ तोफा आहेत.

१९ इसफखान व मौलवी महंमद यांजवळ १८०० स्वार, आणि ११००० पायदळ, व ४ तोफा आहेत.

२० किरकोळ ७०० स्वार, १३००० पायदळ, आणि १० तोफा आहेत.

---

मुंबईत अशी बातमी उठली आहे कीं, सदर अदालत माजगांवांतून गवळ्याच्या तळ्याजवळ जाणार. ...

---

## नेमणुका.

२६ आगस्टचे सरकारी ग्याझेटांत दिवाणी कामदारांच्या नेमणुका लिहिल्या आहेत. त्यांत मिस्तर टी. सी. लफनान व एम्. ए. फाफ्सन यांच्या नेमणुकांत लिहितांना चुका झाल्या आहेत. जेथें मिस्तर हारिसन गैरहजर आहेत असें आहे, तेथें मिस्तर आरकीझ गैरहजर आहेत असें पाहिजे. आणि जेथें मिस्तर लेफनान गैरहजीर आहे, तेथें मिस्तर ए. डब्ल्यू जोन्स गैरहजीर आहे असें पाहिजे.

रत्नागिरीचे डिस्ट्रिक्ट डिपुटी कलेकटर राव बाहादुर माधवराव रामचंद्र यांची परीक्षा पसंत होऊन ते सरकारी काम चालविण्याच्या पसंत ठरले आहेत.— मिस्तर एच्. डी. रे, गुजराथच्या पैमाषखात्याकडील असिस्टंट सुपरिंटेंडेंट यांस एक महिन्याची रजा दिली आहे.— मिस्तर जे. मोरिआर्टी भडोचेच्या दुसरा असिस्टंट कलेकटर यांच्या ताब्यांत अंकलेश्वर व हानसोट हे तालुके दिले आहेत. रावबाहादुर रनछोडभाई उमामहेश्वर भडोचेचे डिस्ट्रिक्ट डिपुटीकलेकटर यांचे ताब्यांत वागरा आणि धेज हे परगणे दिले आहेत.—गुजराथच्या पैमाषखात्याकडील मिस्तर आर्थर बेकर असिस्टंट सुपरिंटेंडेंट यांस दोन महिन्यांची रजा दिली आहे.

मिस्तर एफ्. राबिन्स् आणि एफ्. बी. पेंबर्टन् दुसरे कलासचे असिस्टंट इंजिनियरर्स यांणीं मिस्तर जे. डब्ल्यू. बारन्स् आणि लेफ्टेनंट जे. लीमेजरर, यांस आपल्या तूर्त जागा एक्झिक्युटीव इंजिनियरच्या मिळाल्या आहेत, तेव्हां पुढील हुकूम मिळेपर्यंत वरील कामगारांस पहिले कलासचे असिस्टंट इंजनीयरचे जाग्यांवर नेमले आहेत.— इंजिनियरकडील मेजर डब्ल्यू. डेल यांस पुणें खडकी एथील एक्झिक्युटीव इंजनियरचे कामावर अक्टिंग नेमिलें आहे. आणि क्याप्तान सी. स्काट् हा त्या जाग्यावर आहे त्याणें मुंबईचे गादींतले आपले इंजनियरचे कामावर जाण्याविशीं हुकूम दिला आहे.

**लष्करीखातें.**— सिंध इरेग्युलर घोडेस्वारांतील रिसालदार शेख महंमद, व शेख करीम यांणीं सिंध मुलखाचे वरील भागांत कट जाला त्यामधीं मोठी नेकीची चाकरी बजावली. याकरितां त्यांस पहिले प्रतीची सरकारतर्फे आब्रू दिली आहे.— नवें काळेपायदळचा कलर हवालदार शेख मोहिदीन यास सेलाहावरचे पायावर गेल्यामुळें त्याचे जाग्यावर जमादार १२ एप्रिल पासून केला आहे.— १ले बलोची पलटणचा हवालदार हसीखान यास, पीर महंमदखान बरतर्फी दिली सबब त्यांचे जागीं ५ वे आगष्ट पासून जमादारीवर नेमलें आहे. दक्षिण महाराष्ट्र इरेग्युलर घोडेस्वारांतील दफेदार गणपतराव देवकर याणें १८५७ जुलै १० मेनहून कोल्हापूर बाहरीं पलटणचे कांहीं लोक बंडावले त्या प्रसंगीं खूब मर्दुमी केली सबब त्यास तिसरे प्रतीचे आब्रूंत घातला आहे.

---

श्रीचिंचवडसंस्थानचे तूर्त वारस म्हणविणार लहानसे महाराज हे मोरेश्वरची यात्रा साला बादप्रमाणें करण्याकरितां या वाटेनें जात होते तों त्यांची प्रकृति एथें बेआरामजाली होती हाल्लीं मार्गानें त्यांची तबियत फार बिघडल्याची वर्दंता उठली आहे.

---

एथें कालदशनाचा वतुर्थचरणाच्या दोवटीं पाऊस चांगला पडला.

---

महू— येथून एक पत्र ता· ६ सप्तंबरचें आलेलें आलक्षरवरांत आहे. त्यावरून समजतें कीं, जुलवापाटणा नामें ठाणें बंडखोरांनीं आपल्या ताब्यांत घेतलें आहे. त्यांचा पराभव करण्याकरितां कांहीं लोक रवाना जाले आहेत. सदरहू ठाणे येथील मुख्य यास नरांडवाल्यांनीं मारून लाविलाच आहे. तो पचूरसरकारचे छावणींत आला. जनरल मिचल हे स्वतः तिकडेस जाणार आहेत. तेव्हां असी कल्पना होते कीं, तें काम कांहींसें भारी असें.

---

पालावना नजीक चोवाट नदीवर शिवापूर म्हणून ठाणें आहे, त्यामुकामीं ५ वे सप्तंबर रोजीं लेफ्टेनंट कर्नल राबर्ट्स यांहीं दोनशें स्वार आणि साडेतीनशें पायदळ इतक्या फौजेनशीं असतां त्याठिकाणीं तेथच्या बंडवाल्यांचा अगदीं पराभव केला. या ठिकाणचे बंडवाले जे होते ते ग्वालेर कंटिजेंटच्या १ले, २रे, ३रे, आणि ४थे, पलटणांचे शिपाई. आल्लीबादीवरची पलटण, कोटा कंटिजेंटीचे शिपाई, आणि ५५ वी व ५२ वी बंगाली काळ्यापायदळ पलटणांचे शिपाई होते. या सदरील बंडखोर लोकांची संख्या १७०० पायदळ आणि सिंदे महाराजांचे बाडीगार्ड ज्यांस बारेघाटी स्वार म्हणतात. ते १५, इतका जमाव होता. तथापि त्यांपैकीं या प्रसंगीं युद्धांत जे भूमिपतन जाले, त्यांची गणती केली तों चारशें पन्नास झाली. या प्रसंगीं सरकारचे मेले व जखमी जाले यांची याद आली आहे ती येणेंप्रमाणें. बादशाही ८ वे हजार्स स्वारांपैकीं प्रैवेट स्मिथ ठार जाला. कप्तान पूरी, लेफ्टनंट हावरी, चवथा ट्रूप, आणि ५ घोडे जखमी जाले. बादशाही ९५ वीचा लेफ्टेनंट फासेट, ठार मारला गेला. व तीन शिपाई जखमी जाले. शिंडचे स्वारांचा लेफ्टनंट स्टूअर्टपेज, २ ट्रूपर्स आणि १० घोडे जखमी जाले. व दोन घोडे चुकले. २५ वे मुंबई काळे पायदळचा एक शिपाई जखमी जाला. १० वे मुंबई काळे पायदळचे ३ शिपाई ठार मारले गेले. एक सुभेदार व ३ शिपाई जखमी जाले. हें सदरील वर्तमान लेफ्टनंट कर्नल राबर्टस यांणीं पुण्यास कप्तान मेयनी यांस पाठविलें तें तारायंत्रद्वारें पुण्यास येऊन दाखल जालें.

---

शाहाबादेपाशीं मानसिंगाचे छावणीवर कर्नल राबर्टसन् यांणें छापा केली, तेव्हां त्याचे लोक आपल्या चपात्या हिरव्याच्या हिरव्या टाकूनच पळाले. पारीलाल वकील आपले दोनशें लोक व उंट यानिशीं शाहाबादेस गेला होता. तो, मानसिंग आणि बाकीचे बंडवाले मालेरीरानचें जवळ रें म्हणून ठाणें आहे, तिकडेस गेले आहेत. त्या प्रांतीं तीन दिवस २रे सप्तंबरपासून पुष्कळ पर्जन्य पडला. तेणेंकरून रहदारी बंद पडली आहे.

---

पुणे छावणींतील ट्रूप आणि खडकीचे बकमवाले स्वारांकडून ता. ७ मिनहूस परेड जाली, तेव्हां लार्ड एल्फिन्स्टन साहेब यांची स्वारी गेली होती. तेसमयीं सर ह्यू रोज साहेब यांणीं स्वतः त्या लोकांची कम्यांड घेऊन त्यांची हुशारी लार्ड साहेब यांस स्वतः हुकूम देऊन दाखविली.

# ज्ञानप्रकाश

गुरुवार तारिख १६ सप्तंबर सन्न १८५८ इसवी.

## ज्ञानप्रकाश ता. १६ सप्तंबर सं. १८५८

कपट,— उत्तरहिंदुस्थानांत सालगुदस्तां बंड उद्भवल्याचे पूर्वी गव्हांच्या चपत्या वांटल्या गेल्या. तसें दक्षिणहिंदुस्थानांत निजामाचे राज्यांत लाडू वांटण्याचा प्रकार नूतनच चालू झाल्याची खबर पुणे आबझरवरून कळून येत आहे. निजाम सरकाराकडून इंग्रेजसरकारास जो नवीन मुलुख मिळाला आहे त्यांतील बुलठाना एथील डिपुटीकमिशनराकडे एक धेडी लाडवांनीं भरलेली टोपली घेऊन आला. त्या टोपलींत मोठाले सुमारें ५० लाडू होते. ती टोपली पाहून डिपुटीकमिशनरानें पृच्छा केली, तेव्हां त्या धेडयानें सांगितलें कीं, एथून एका कोशावर सागवान म्हणून गांव आहे तेथच्या पाटलानें ही टोपली मजपाशीं देऊन पाठविलें आहे. पुढें ते लाडू फोडले तों गुळ, कणिक, आणि थुष्वी म्हणून एक धान्य आहे, त्याचे बनाविले आहेत असें समजून आलें. आणि त्यांतून एकाचे आंत एक मराठी लिहिलेली चिठ्ठी सांपडली, तींत असें होतें कीं, हे लाडू मुंबईहून या जासुदाबरोबर पाठविले आहेत त्यांपैकीं पांच लाडू तुम्ही आपल्या तेथच्या कुत्र्यांस खावयास घालून पुनरपि ५ लाडू बनवून त्यांत द्यावे. कुत्र्यास लाडू घालावे याचा मतलब पुणे आबझरवरानें असा दाखविला आहे कीं, मागें हिंदुस्थानांत चपात्या वांटल्या तेव्हां ही कुत्र्यांस घालाव्या असेंच चाललें होतें. त्यांचा अर्थ इतकाच कीं, फिरंगी वगैरे नास्तिक लोक त्यांच्या संहारार्थ प्रवृत्त व्हावें. कसें ही असो, परंतु कांहीं तरी दंगा करावा. या हेतूनें ही लाडूबाजी चालली असावी, असें अनुमान होतें. नुकतीच हैदराबाद कांटिंजेंटीची फोज हिंदुस्थानांतून परत त्यामुलखांत आली आहे, तेव्हां त्या लोकांनीं विरुद्ध होऊन कांहीं गडबड करावी म्हणून हा लाडवांचा कपटप्रकार कित्येक दुष्ट लोकांनीं सुरू केला आहे, परंतु तो प्रकार लौकरच दैवयोगें उघडीस आला हें ठीकच जालें. यामुळें पुढील होणारे अनर्थाचें दमन जालें असें वाटतें. मुंबईहून हे लाडू आले हें त्याचिठ्ठींत लिहिलें तें खरें असेल असें वाटत नाहीं. नाशार्थ किंवा स्वरक्षणार्थ दुसऱ्याचें घर दाखवून आपण अलखचे अलख राहावें. म्हणून मुंबईच्या नांवाची योजना केलेली असावी, असें अनुमान होतें.

---

### जाहिरात खालीं सही करणार यांजकडून

सर्व लोकांस कळावें कीं, बापूजी बिन खंडोजी व हणमंतराव बिन विठोजी पाटील काळभर मोजे आकुर्डी तर्फ हवेली. यांणीं मौजे लोणी येथील वाडा व मळाव मोजे आकुर्डी येथील मळा आबराई सुद्धां व शेतें व मोजे चिंचोली येथील शेतें वगैरे इस्टेट आम्हांपाशीं गाहाण रुपये २८०० यांस ठेवून गाहाणखत शके १७६७ फाल्गुनशुद्ध ७ वें मितीचें छापील कागदावर सही साक्षनिशीं आमचे वडील बंधु गंगाधर नारायण जोशी यांचे नांवें रुपये १२०० लिहून दिलें. त्याप्रमाणें आम्हांकडे गाहाण असून त्या इस्टेटीवर राज. गोविंद रघुनाथ थत्ते यांणीं लिलावाची टांच लाविल्यावरून आमचे गाहाणाचे हक्कास कडू लिलाव व्हावयाचा असतां सदरप्रतिवादीपैकीं बापूजी मयत त्याची बायको व हणमंतराव याजपासून कोणी खरेदी गेरे हरएकप्रकारें घेईल तर त्याजला आमचा गाहाणाचा व्याज सुद्धां पैसा द्यावा लागेल हें समजावें. तारिख १५ सप्तंबर सन १८५८ इ॰

सही बाळकृष्ण नारायण जोशी दस्तु. खुद.

**कलेक्टरखातें,**— आम्हांस असें समजलें आहे कीं, मेहेरबान ईलिससाहेब यांणीं सरकारास असें कळविलें कीं, जुडिशियालकडून कलेकटराकडेस गांव व जमिनींचीं वाटें बजा दिण्याकरितां जातात, तीं काय त्याप्रमाणें बरोबर नसतात, त्यांतील हशील कीं, ज्याची जप्ती होऊन लागलेंच लिलांव होतें, तें ठीकच आहे. परंतु ज्या गांवावर अगर जमिनीवर वर्षांचीं वर्षें जप्ती असून त्याची अव्यवस्था होते आणि त्यामुळें कलेकटरास उतरते मानानें मामलेदार महालकरी इत्यादि कामगारांवर जुडिशियल खात्याचा अंमल बजाविला जातो हें वाजवी नाहीं. याविषयीं प्रकरण हाल्लीं चालू आहे.— अकौंटेंट जनरलकडून असा हुकूम आला आहे कीं, जुडिशियल अमलदार जे कलेकटरखात्यांत पैसा अमानत ठेवतील, त्यांचे हिशोबाचे जबाबदार ते आहेत. व जरूर्यांतें दरमहिन्यास आमचे दिवाणी खात्या संबंधी अमुक पैसा शिल्लक आहे असें आपलें एक सरटिफिकिट कलेकटरास पाठवीत जावें.

---

पुणें एथील कैदी आबा गुरव याणें आपली शिक्षा रद्द व्हावी म्हणून सदरअदालतींत फौजदारी अपील केलें होतें, तें नामंजूर जालें. याविषयीं सविस्तर मजकूर बहुतांस माहीत आहे, सबब पुनरावृत्ति केली नाहीं.

---

**वसाहत,**— विलायतेंत हालीं असें विचार चालला आहे कीं, विलायतेचे लोकांनीं हिंदुस्थानांत जाऊन वसाहात करावी. आणि ती कोणते ठिकाणचीं असावी या कामावर जी एक कमिटी नेमली आहे. तींत इकडील प्रांतांतील माहितगार साहेब लोकांपैकीं मुंबईचे फार्ट कोर्टांतील माजी जडूज्य, सरअरस्कीनपेरी, मामलतदार उलबी, व जान वार्डिन मुंबईचे माजी कौन्सलदार हे आहेत. वार्डिण साहेबांनीं आपलें मत असें दिलें आहे कीं, या देशांतील गोरे अंमलदार लोक हिंदुस्थानांत जातात, त्या लोकांस हिंदुस्थानच्या भाषा अवश्य आल्या पाहिजेत, अशी माझे अनुभवावरून खात्री जाली आहे. हें मत त्यांचें रास्त आहे, आणि त्याविषयीं सदरहू कमीटी विचार करील असें वाटतें.

---

**लखनौ,**— एथून ता· ३१ आगस्टपर्यंतचें वर्तमान सरकारी आलेलें कळतें कीं, २८ आगस्ट रोजीं सुलतानपुराजवळ सरकारची छावणी आहे तीवर बंडवाल्यांनीं चपळाई करून गोळे मारिले. ता· २९ मिनहूस तेथील छावणीस आड थळा न होतां सकाळीं छावणी त्यांणीं व्यापून टाकिली. नंतर बंडवाले हुसेनपुराकडेस गेले, तेथें ८ तोफानिशीं ७००० हजार लोक असून आणखीही जमावयाचे आहेत. सदरहू छावण्यांचा नाश जालेला आहे.

---

दिल्लीग्याझिटपत्रांत ता· १ सप्तंबरचे नैनीताल एथून आलेली बातमी अशी आहे कीं, फिलभीत मुकामीं एक लढाई जाली, त्या लढाईंत शत्रूची फौज सरकारचे फौजेपेक्षां जाजती होती. तथापि त्यांचे ३०० लोक ठार जाले. आणि सरकारचे फार थोडे जाले. आणि पंजाब दुसरे घोडेस्वार पलटणीचा मेजर सामू ब्रौन याचा डावा हात गेला. सरकारचे फौजेनें तीन तोफा हस्तगत केल्या. सरकारच्या फौजेजवळ या समयीं तोफा नवत्या. या प्रसंगीं सरकार-

त्या फौजेची व्यवस्था फार चांगली ठेवली होती. ता. १ मिनहूनें बरेलीमुकामचें एक पत्र आलें आहे, त्यांत लिहिलें आहे कीं, फिलीभीत येथें जी लढाई जाली त्यावेळीं सरकारची गोरी व काळी फौज सर्व मिळून ती छावणीपासून आठ मैलांवर दूर जाऊन तिनें शत्रूच्या गाण्यावर हल्ला केला. नंतर ५ तोफा, ३ हत्ती, छावणी, आणि युद्धोपयोगी सामग्री सर्व हस्तगत करून बंडवाल्यांचे २५० लोक मारले. सरकारचा नाश किती जाला हें कळलें नाहीं. परंतु सर्व आफीसर लोक जखमी जाले. १७ वे पंजाबपायदळचा लार्किनसर, पंजाबसापरमैनरचा चार्मर्स, पंजाब दुसरे घोडेस्वारांचा लेन्स, दिवाणी कामगार लोक. या सर्व अंमलदारांच्या पायांस व हातांस जखमा जाल्या आहेत. हा जय मोठ्या यत्नार्थीनें मिळाला आहे.

---

टेलिग्राफ आणि सरकारी तारायंत्र, यांवरून कळतें कीं, बेळगांवचे पोस्ट आफिसांतून कागद ज्याचे त्यास पोंचत नाहींत, वगैरे अव्यवस्थेविषयीं मजकूर लिहिला आहे. पोष्टआफिसाची व्यवस्था जेव्हां नवीन सुधारणा जाली तेव्हांपासूनच आम्हांस अव्यवस्था दिसत होती, ती अजूनही ज्यारी आहे. ती सरकारचे कानावर जाते किंवा नाहीं हें खास समजत नाहीं. तत्रापि पोष्टमास्तर जनरलचे कानावर हा अव्यवस्थेचा प्रकार जात नसेल असें आम्हांस वाटत नाहीं. परंतु हाल्लीं सरकारी रिवाजच पडून गेला आहे कीं, आपले खात्यांतील दोष आहेत ते दोष नव्हत गुणच होत असें स्थापन करण्याचा सर्वांचा बाणा पडून गेला आहे, त्यामुळें पोस्टाचाही प्रकार तसाच चालत आहे. बेळगांवचा असिस्टंट इनामकमिशनर मिस्तर हरण याणें एक लखोटा मुंबईहून जमखिंडी यांचे वकिलानें बेळगांवास आपले भावाचे नांवावर पाठविला तो पत्राचे मालकास बोलावून आणून समक्ष फोडून मोठ्यानें वाचविला. आतां ही गोष्ट जर खरी असेल, तर मिस्तर हरण यानें आपले अधिकाराचें व इंग्रेजी विद्याभ्यास जाली आहे त्याचें स्वरूप व महत्व त्यांणीं कमी करून टाकलें असें समजलें पाहिजे. मिस्तर हरण याजपाशीं लखोटा गेला कसा? आणि जरी त्यांणीं पत्ता पाहिला असेल आणि तो दुसऱ्याचा आहे असें समजल्यावर त्या पत्राचे मालकास बोलावून आणण्याचें कारण काय? आतां हाल्लींच्या दंग्याच्या प्रकरणावरून जर संशय वाटेल तर पोष्ट आफिसाचे अधिकारी माजिस्त्रेटमार्फत तजवीज करतील. हाल्लीं हरणसाहेबांनीं ही गोष्ट गैर केली असें दिसतें. यांचे हातीं सरकारानें जोखमीचें व इमानें इनाबारें करण्याचें काम दिलें आहे. जर सदरीं लिहिल्याप्रमाणेंच वर्तणूक हरणसाहेबांची घडली असेल तर त्यांचे खरेपणाविषयीं व भरंवशाविषयीं आणि न्याय विषयीं लोकांस व सरकारास अंदेशा येण्यासारखी गोष्ट आहे किंवा नाहीं

---

किताब— नेकनामदार गवरनर जनरल यांणीं मेहरबान होऊन जिपरकाशसिंग देव बाहारप्रांतांतील यांणीं बंडाचे समयीं योग्य मदत दिली, येणेंकरून सरकारास संतोष होऊन माहाराजा हा किताब व पोषाक देऊन त्याचा सन्मान केला.

रोहिलखंडांतील बरेळी येथून ता॰ २५ आगस्ट सन्न मजकूरचें पत्र आलें. त्यावरून समजतें कीं, रोहिलखंडांत स्वस्थता आहे. ब्रिगेडियर जनरल वालपोल हे नैनीताल पर्वतावर हवा बदलण्यास गेले आहेत. तें बरेळीपासून ८० मैलांवर आहे. लखनौ प्रांतांतील सुलतानपूर हें जनरल ग्रांटचे सैन्यानें बंडवाल्यांपासून घेतलें. तिकडील प्रांतांत टोळ्या फिरून बंडवाल्यांचा बंदोबस्त करीत आहेत. नाना यांस धरल्याची बातमी होती ती बरोबर नाहीं. बहुत करून नाना अयोध्येच्या आंसपास गोग्रानदीचे काठीं कांहीं हजार लोकांसहीत दडून बसले असावे.

---

बंगलोर — येथील ता॰ ३१ आगष्टचें पत्र टेलिग्राफांत आहे त्यांतील हकील कीं, महीसूरचा राजा श्रीकृष्णराजदेवर हा ६९ वर्षे वयाचा आहे व तो सरकाराबरोबर इमानीपणानें वागत आहे. तेथें हवा बदलून पाऊस पडूं लागला आहे.

---

काबुल, — येथील वर्तमान कळतें कीं, कंदहारचे गादीवर माजी अकबरखान याचा मुलगा फत्तेमहमदखान हा वारसा मागत आहे. याचें कारण कीं, हें कंदहारसंस्थान त्याचे बापानें तलवार मारून मिळविलें आहे. आणि महंमदखानाचाच वारसा राहावा अशी तेथील प्रजेचीही इच्छा आहे, आणि काबुलचा दोस्तमहंमद याचाही मानस याप्रमाणेंच आहे, असें समजतें. इंग्रेजसरकार दरमाहा दोस्तास ठरावाप्रमाणें नेमणुक देत होतें ती बंद केली, सबब दोस्तमहंमद नाखुष जाला आहे. अशी वदंता काबुलभर उडली आहे. आणि जर इंग्रेज सरकार पुनरपि दोस्ताची नेमणुक चालविणार नाहीं तर तो कंदहारास राज्यकारभाराचे कारणानें न जातां पेशावरास येईल अशी अफवा आहे. पेशावरास कशाकरितां येणार हे अद्याप खुलासेवार कळत नाहीं.

---

सुलतानपुरापाशीं गोमतीनदी उतरून १२०० पायदळ आणि २ तोफा सरहोपग्रांट यांणीं रवाना केलेले २५वे आगस्टरोजीं गोंहों चले. तेथें त्यांणीं जाऊन तीन खेडे गांव घेऊन दोनप्रहरांनंतर त्या गांवांपुढें सरसावले. यासमयीं कांहींसे अडथळे आले. २३वे आगस्टरोजीं गाजीपूर परगण्यांतील रेवोती नजीक एका गांवाजवळ बंडवाल्यांची क्याप्टन कम्युलर हा आपले थोडे लोकांनशीं जात असतां गांठ पडली. नंतर त्यांणीं शत्रूंपैकीं ६५ जखमी केले व मारले. आणि सरकारचे फौजेपैकीं १५ निरुपयोगी जाले. बंडखोर यांची नहूंकडे वाताहत जाली. हाल्लीं आमची फौज चांगल्या प्रकारची हुशारीनें आहे. कप्तान डेनी हा अलहाबाद येथील लष्करी पोलिसाची एक पार्टी घेऊन रेवाचा पंजाबसिंग याचे हाताखालील बंडवाल्यांचे टोळीवर चाल करून गेला तेव्हां बंडवाले यमुनानदीचे पैलतीरावर पाशाहरानजीक ते स्वतः छावणी करून राहिले तेव्हां कप्तान डेनी यांणें २८ वे तारिखेस त्या लोकांवर हल्ला करून पंजाबसिंग आणि त्याचे सुमारें २०० लोक ठार मारले. या पोलिसांपैकीं दोन मात्र मेले, आणि सात जखमी जाले. पोलिसानें या वेळेस फार चांगली वर्तणुक ठेवली होती. सदरहू मजकूर सरकारी बातमीवरून समजतात

---

हें पत्र ज्ञानप्रकाशाचा॰ कृष्णाजी त्र्यंबकरानडे यांचा प्र

वर्ष १०

# ज्ञानप्रकाश

सोमवार तारीख २० सप्तंबर सन्न १८५८ इसवी.

## वसूल सन्न १८५७ अखेर.

१० मेहरबान टरकांउलसाहेब रत्नागिरीचे कलेक्टर.
२० अज्जननगोरावकृष्ण मामलेदार विजापूर.
१० मिस्तर आत्माराम बापसाजी, नेकनामदार कमांड इनचीफसाहेब यांचे हेडरैटर.

## ज्ञानप्रकाश ता. २० सप्तंबर सं. १८५८

लार्ड एल्फिन्स्टन गवरनरसाहेब यांस सर राबर्ट हामिल्टन यांणीं तारायंत्रद्वारें १७ वे मिनहूस खबर लिहून पाठविली आहे कीं, १५ वे सप्तंबर रोजीं जनरालमिचल साहेब यांणीं हल्ला करून तात्या टोपे यांचा पराभव ब्यावरा म्हणून शहर उज्जनीपासून तीन मजलांवर आहे, तेथें अगदीं करून सोडिला. व त्यांच्या २५ तोफा हिरावून घेतल्या. सरकारचा नाश फार थोडा जाला आहे.

---

एथील छावणींतील चारशाही पलटनपाळी १७ वी स्वारांची व घोड्यावरील रायल तोफखाना यांस विलंब नकरितां महूचे छावणींत जाऊन हजर होण्याविशीं हुकूम जाला आहे. व छपरमेनरचे कांहीं लोकांस आर्बस्तानचे एडन बंदरीं जाण्याविशीं हुकूम जाला आहे.

---

टेम्सपत्रावरून तात्याटोपे यांणीं कोतारिया येथील लढाई केल्यानंतर त्यानें झालरापट्टणावर जाऊन लूट केली. इतक्यांत त्याचे पाठलाग करणारे हीं घोड्यांचे अंतरावर येऊन पोंचले. तेव्हां त्याजवळ १२००० फौज होती. तेथील राजा पीतिसिंग यांणीं एक दिवस पर्यंत लढाई केली, तीन लोकांच्या वदते करून १२०० ठार जाले. तात्याटोपे हा आपणास पेशवा असें धोतांडानें म्हणवीत आहे. त्याबरोबर कालाजरदिन कोट्याचा वजिनी राजा मराफखान, आणि बांद्याचा नबाब इतके मुख्य बंडखोर आहेत. पीतिसिंग यास वेढा पडला नंतर साहा लक्ष रुपये बंडवाल्यांस दिले असतां ते त्यास सोडून देतात असा ठराव होऊन सदर्हू रकम बंडवाल्यांस दिली असतां त्यांणीं समारें ८ दिवस तें शहर सोडलें नाहीं. नंतर जनाना लुटावा असा विचार जाला, परंतु प्रतापसिंगाचे जातीचा वजिनी राजा आहे. सबब त्यानें ती गोष्ट नाकबूल करून सांगितलें कीं, ही गोष्ट कराल तर मी आपले २००० लोकांनशीं त्या जनानाचे बचाव करितां लढेन. नंतर तात्यानें शहरांत जाऊन ज्या अफीणीच्या पेट्या लुटल्या होत्या त्या दर एक पेटीस हजार रुपये याभावानें वाण्यांस विकून बारा लक्ष रुपये जमा केले. हें कृत्य जाल्यानंतर तात्यानें तेथील सर्व लोकांस नम्रपणें सांगितलें कीं, मैर पेशव्याची गादी स्थापन जाल्याबरोबर जो सर्व पैका तुम्ही मेहेरबानी करून दिला आहे तो सर्व ज्याचा त्यास परत देऊं. नंतर तो कोट्यास जाण्याचे तयारींत होता. नंतर झालरापटण ६ मिनहूस बंडवाल्यांनीं सोडलें. तो इतक्यांत निमच, नशिराबाद, ग्वालेर, आणि सिप्री येथील फौजा तेथें येऊन पोंचल्या. तात्या वगैरेचे स्वार हे कांहीं काळ पेंढाऱ्याप्रमाणें चालत आहेत, अशांचा पाठलाग करणें हें उपयोगाचें नाहीं.

सिंदियननामें कराची येथील इंग्रेजी पत्रांत मुलतान येथें ६२ वी व ६९ वी या काळ्या पलटणी बंडावल्या, याविषयीं विस्तारें करून हकीकत लिहिली आहे. त्यावरून कळतें कीं, त्यामुकामीं अशी अफवा कांहीं दिवस उठली होती कीं, बिनहत्यारी केलेले शिपाईलोक दंगा करणार आहेत. बंड उठल्यानंतर पूर्वीं तीन दिवस हुकूम येऊन लागला होता कीं, ६९ राचे काळे पायदळ पलटणीचे लोकांपैकीं दररोज २० असामींचीं हत्यारें काढून घेत जावीं. या हुकमाअन्वयें पहिले सप्तंबरपासून तजवीज होऊं लागली. तेव्हां त्या लोकांनीं कांहीं तजवीज करण्याचें मनांत आणून ६ वे घोडे स्वारांची कुमक मिळण्याची वाट पाहात होते. त्या सप्तंबर रोजीं दिवसास दोन प्रहरीं तोफ जाली तों सर्व तोफखाना आणि ६२ वी पलटण यांणीं जमून तीन टोळ्या केल्या. एक टोळी रायल आर्टलरी (गोरा तोफखाना) यांचे बराकांवर, दुसरी, पहिले फ्युजालियर्स यांचे बराकीवर, आणि तिसरी, फ्युजीलियर्सचे इस्पितळावर व आफिसरांचे बंगल्यावर, या प्रमाणें चालून गेल्या. हें जाल्याचे पूर्वी तीन मिनिटें सरकारचे अधिकाऱ्यांनीं हुकूम फर्माविला कीं, सर्व आफिसर लोकांनीं या दंग्याचे समयीं तुटून पडावें. परंतु या वेळेस सर्व बंडावलेले लोक बंगल्यांनिहाय पसरले. हे बंडखोर लोक आगत्य सोंट्या कुहाड्यांनीं बाहेर पडले त्या वेळेस फ्युजीलियरचे सोजिरांस आपल्या बंदुका घेण्याची अवधी राहिली नाहीं. या बंडवाल्यांवर लेफ्टनंट म्युलस हा चालून गेला, परंतु त्याच्या भोंवतीं समारें ३०० लोक बंडाले मिळाले इनक्यांत त्याचा घोडाही पडला. तेणेंकरून त्याचे शरीराचे डावे कुशीस इजा होऊन त्याचे मेंदूस इजा पोंचली. मेजर वेयर्ड याणें एका बंडखोरास संगिनीनें भोंसकलें. परंतु मागें दुसरे बंडवाले होते त्यांणीं त्यास पाडलें. या प्रमाणेंच इस्पितळांतील आजारी लोक होते त्यांपैकीं ज्यांस हत्यारें धरवलीं त्यांणीं हे बंडखोरांची मोठी टोळी आली तेव्हां त्यांणीं आपले हत्यारांचा उपयोग केला. व त्यांत चार लोक पाडाव केले. असें समजतें कीं, ६ वे इरेग्युलर स्वारांनीं बंडखोरांवर हत्यार टाकिलें नाहीं, व एकही वार बंडखोरांवर केला नाहीं, उगीच मिरवत होते. ११ वे पंजाबीसीक स्वारांनीं बरीक बंडखोरांवर गोळ्या घातल्या, आणि त्यांच्या थैल्या लुटल्या. त्यांपैकीं कित्येक थैल्यांत १५० रुपये मिळाले. फ्युजिलियरचे आजारी लोकांनीं समारें ११ बंडवाले पाडाव केले. फ्युजीलियरपैकीं ६ सोजीर लोक फार जखमी जाले आहेत. व यारेरीज १६ असामीस लहान मोठ्या जखमा लागल्या आहेत. त्या रात्रीस जे बंडवाले पळून जाण्याचे यत्न करीत होते, त्यांवर संतत गोळ्या चालल्या होत्या. या मजकुरानंतर आणखी मजकूर असा कळतो कीं, तेथील बाजारांतील लोकांनीं ६९ वे पलटणीस असें सांगितलें कीं, या पलटणीचे २० मनुष्य जे बाहेर गेले, त्यांस ठार मारण्याचा सरकारचा इरादा आहे. या बातमीवरून त्यांणीं बंड केलें, आणि त्यांस ६२ वी पलटण जाऊन मिळाली. या दोन्ही पलटणींनीं तोफा घेण्याचा यत्न केला, परंतु त्या हस्तगत जाल्या नाहींत. नंतर ते छावणीवर इकडे तिकडे धांवले, गोळ्यांचा मारा चालला होता. फ्युजीलियरचे ७ लोक जखमी जाले. रायल आर्टलरीचे ४ ठार जाले. व ५ जखमी जाले. हे सर्व लोक समारें

१५००—१६०० होते. ते तेथून भटकले. त्यांपै कीं पुष्कळ मारले परंतु संख्या कळली नाहीं. अमृतसर येथें ३५ वी काळी पायदळ पलटण आहे तिच्यापैकीं २० जणांचीं हत्यारें काढून घेत आहेत. ते लोक खुषीच्यानें आपलीं हत्यारें सरकारास देतात.

---

कपिलाषष्ठी,— हाल्लीं ज्या संक्रांति वगैरे पंचांगांत लिहिल्या असतात त्यांचा काळ बरोबर नसतो. असें कितीएक ज्योतिषवेत्ते लोक स्पष्टपणें बोलूं लागल्यावरून, त्या गोष्टीविषयीं शहरांत विद्वान् लोकांत सांप्रत पुष्कळ गवगवा व वाद चालला आहे. त्यावरून पुढें भाद्रपद वद्य ६ स जी कपिलाषष्ठी पंचांगांत लिहिली आहे, तिचा काळ तरी बरोबर आहे किंवा नाहीं याविषयीं संशय येऊन आम्हीं शोध केला. तों असें समजलें कीं, वास्तविक पर्वकाळ सूर्योदयापासून १५-२ घटिकापर्यंत आहे. पंचांगांत २२ घटिका दिवसापुढें पुण्यकाळ आहे म्हणून जें सांगितलें आहे, तें बराबर नाहीं. आम्हीं ज्यांपाशीं हा शोध केला, ते गृहस्थ ज्योतिःशास्त्रांत फारच निष्णात आहेत. व त्यांणीं गणित पहिल्यापासून नवें करून आम्हांस हा निर्णय सांगितला आहे. हा पुण्यदिवस वारंवार येत नसतो. यासाठीं अशा दुर्मिळ पर्वर्णीस जीं धर्मकृत्यें व्हावयाचीं तीं वास्तविक पुण्यकाळीं झाल्यास त्यांपासून अत्यंत श्रेय असें समजून ही गोष्ट लिहिली आहे.

पंचांगांतील तिथिवगैरे

| भा-व-षष्ठी मंग. | रोहिणी. | सिद्धियोग. |
|---|---|---|
| ४२।३२. | ३४।११. | २२।४७. |

पुणेयेथें गणितावरून वास्तविक ज्या तिथिवगैरे येतात त्या.

| भाद्र-व-षष्ठी, मंगळ, | रोहिणी. | व्यतीपा. |
|---|---|---|
| ३९।५६, | १५।३३, | २९।४३, |

योदोन्हीही तिथिवगैरे सायन नव्हत, तर निरयन आहेत. व वास्तविक अयनांश वजा करून या खऱ्या तिथिवगैरे आणल्या आहेत.

---

## नेमणुका.

मिस्तर उली, काठेवाडचे पोलिटिकल एजेंटचे ३ रे असिस्टंट यांस आजारीपणाचे दाखल्यावरून एक महिन्याची रजा मिळाली आहे. क्याप्टन जी. एम्. बरन्स, २० वे काळे पायदळ पलटणीवरील यास बेळगांवचे असिस्टंट कलेक्टर आणि माजिस्त्रेट नेमिलें आहे.

सिंदचे बेसनदी असिस्टंट कमिशनर मिस्तर ईगल यांस ६ आठवड्यांची रजा मिळाली आहे.

ठाणे कलेक्टरीचा फस्ट असिस्टंट कलेक्टर मिस्तर बासवेल यांस ३ महिन्यांची रजा मलबारचे किनाऱ्यास जाण्याकरितां रजा मिळाली आहे.— मिस्तर बेल, सिविल सरवीस यांस मराठी अभ्यास करून परीक्षा देण्याकरितां मुंबईस जाण्याची रजा मिळाली आहे.

सबअसिस्टंट सर्जन अनंत चंद्रोबा यास मुंबईस देवी काढण्याचे कामावर नेमिलें.

---

## लुटीचा माल परत मिळाल्याबद्दल.

गेल्या आगष्टांत सिंदे यांचे राज्यांतील शाजनपूर आणि देवासें यांचे दरम्यान डांकेतून विलायत जात असतां लुटल्या गेल्या होत्या त्या हल्लीं मालासहित मिळाल्या आहेत. असें पोष्टमास्तर जनरल यांणीं कळविलें आहे.

---

**वायकीगप्प,—** यासदरांखालीं आगष्ट-च्या २६वीचे बंगाल हरकारू पत्रांत एक चमत्कारिक मजकूर लिहिलेला आहे कीं, कलकत्त्यांत कालच्या रोजीं अशी गप्प उडाली कीं, तेथें पलटणी छावणींत आहेत, त्यांतील कित्येक लोकांनीं तेआपल्या छावणींत पोंचतां पावेतों फिरंग्याचा संहार जितका होईल तितका करावा म्हणून तेथच्या कालीघाट देवीला नवस केला आहे. या देवालयांतील त्या रुधिरप्रियदेवतेचे ब्राह्मण भक्त यांणीं हा नवस त्यांस सूचविला असावा. कांहीं वर्षांपूर्वीं कोणी एकानें त्या तेथच्या ब्राह्मणापाशीं एक बकरा बळी देण्याकरितां आणला. त्याणें बकऱ्याची मुंडी तोडण्याचे ठिकाणीं बळी आणणारा जो त्याचेंच मुंडकें उडविलें, तेव्हां त्या अपराधी ब्राह्मणास कैद करून चौकशी केली, तेव्हां त्यानें सदरहू अपराध चुकून घडला असें सांगितलें; परंतु जड्ज्यानें हें कारण खरें नव्हे असें पाहून त्यास फांशीची शिक्षा ठरवून ती अमलांत आणवली, असो. एक बातमीदार असें सांगतो कीं, कांहीं सोजीर तेथें बंदोबस्ता करितां रवाना केले आहेत, आणि त्या देवळाचे आसपास एकदोन ठिकाणीं शिपायांची रखवाली ठेविली आहे. त्यावर कलकत्ता मार्निंग क्रानिकल पत्रांत लिहिलें आहे कीं, क्रिजताल एथें शंभर हत्यारबंद पोलिस चे लोक ठेविले आहेत. याचें कारण कीं, वरील प्रदेशांतून चंद्रग्रहणाचे स्नानाकरितां लोक तेथें जमणार. तेथें दंगा व बखेडा कदाचित् होईल. या लेखावरून व लोकांच्या गप्पेवरून तेथच्या ख्रिस्ती लोकांस दहशत पडली. तेव्हां समारें ३०० मोठमोठे साहेब लोक कालचे दिवशीं एका आगबोटीवर जाऊन बसले. जसें कोणी म्हणेल कीं, अरिष्ट मात्र आलें असतां पळून जाण्याची तजवीज त्यांणीं करून तयार जाले आहेत; परंतु या ग्रंथप्रमाणें कांहीं एक घडलें नाहीं तर खरें. आणि ही वायकी गप्प अशी खात्री जाली; परंतु अशा गप्पा ऐकून लोकांस भय वाटतें ही मात्र चुकी आहे. प्रायः अशा गप्पा हिंदु लोकांचे अनेक देवभोळेपणावरून व इंग्रेज लोकांची त्या तशा गप्पांवर सूक्ष्म दृष्टि होते. यामुळें गप्पा छाटणारे उगीच थोडासा त्यांची गप्प पसरण्या जोगता आधार पाहातात, आणि वायक्या व गपरी गप्पा छाटतात. यास्तव अशा गप्पांवर भरंवसा न ठेवून उगीच गोंधळांत पडणें हा वेडेपणा होय.

---

**रेलवे,—** एथून वडगांवचे स्टेशनपावेतों तिसऱ्या प्रतीचें भाडें आगगाडीचें दर माणसीं नऊ आणे रेलवे कंपनी घेत होती. ही चूक आम्ही आपले मागील पत्रांत दाखविली. त्यावर सरकारानें मंजर देऊन ती चूक दुरुस्त करावी म्हणून रेलवे कंपनीस हुकूम केल्यावरून तिनें तिसऱ्या प्रतीचे आकाराप्र[illegible]तें साहा आणे भाडें ठरवून जाहीर ज्यारी केली आहे. पुण्याचे स्टेशनापाशीं एक हमाल दोन गाड्यांचे मध्यें तारिख ३ मिनहूस सांपडून मेला गेला. पुण्यापासून सोलापूरच्या आगीचे गाडीचा रस्ता तयार होत आहे, त्यापैकीं समारें एथून ३२ कोस पावेतों आगगाडी चालण्यासारखा तयार जाला आहे, यास्तव थोडे दिवसांनीं ३३ कोस पर्यंत आगगाडी येथून सुरू होणार आहे, असें ऐकतों. मुंबईहून व पुण्याहून नित्य माल आगगाडींतून येतो जातो त्याची व्यवस्था अशाप बरोबर रेलवे कंपनी कडून होत नाहीं. असा गवगवा लोकांत फार जाला आहे.

---

## तारायंत्राचे आफिसाविषयीं.

तारि· १९ वे आगस्ट रोजीं पुण्यास तारायंत्राचें काम चालण्यास सुरुवात जाली; आणि करनुल एथून तारायंत्रांतून बातमी आल्यावरून समजतें कीं, सदरहू ठिकाणचें आफिस ता· १२ आगस्ट रोजीं बंद जालें. बं· ग्या·

---

मुंबईहून सिंदियन नामें आगबोट कराचीस जाण्याकरितां गेल्या शुक्रवारीं रवाना जाली होती तिचें यंत्र बिघडल्यामुळें ती परत मुंबईचे बंदरांत ता· १२ मिनहूस येऊन दाखल जाली

---

**कुमक,**— इंग्लिशम्यान पत्रावरून कळून येतें कीं, हिंदुस्थानांत विलायतेहून येयील फौजेच्या कुमके करितां तेथचे सरकारानें ठराव करून गलबतांवर फौज चढवून रवाना करण्याविशीं हुकूम केले आहेत. हाल्लीं तेथून ७७२० एकंदर शिपाई लोक २१ गलबतांत बसून तीं गलबतें तेथून इकडे येण्याकरितां निघालीं आहेत. आणि ३६१० शिपाई १२ गलबतांवर चढविण्याची तयारी चालली आहे. सदरील लोकांचे एकंदरीवरून पुढील हिंवाळ्यांत ११३३० शिपाई एथें येऊन दाखल होतील. या खेरीज आणखी १२ पलटणींतून शिपाई लोक एकंदर काढून (२४००) इकडे पाठविण्याविशीं हुकूम झाला आहे. आणि दुसऱ्या दोन पलटणीं पैकीं एक हजार (१०००) लोक रवाना होणार आहेत. यावरून एकंदर १४७३० गोरे शिपाई व अंमलदार आपल्या देशांत येतील. या खेरीज अमेरिकेकडून ४१ वी व ४९ वी या दोन गोऱ्या पलटणी यावयाच्या आहेत. त्यांत प्रत्येकीं ७०० शिपाई जवान आहेत. तेव्हां व पुढील हिमकाळांत सुमारें १६,००० गोरे शिपाई हिंदुस्थानांत येऊन दाखल होतील. या शीतकाळांत गोरे लोक या देशांत आले असतां त्यांस या देशाचे हवेपासून विकार होणार नाहीं. आणखी हिंदुस्थानांत पुढें फौजेची अडचण पडूं नये, याकरितां १७ नव्या स्वारांच्या पलटणी हिंदुस्थानांत राहाण्याकरितां तयार होत आहेत. आजपर्यंत विलायत सरकारानें आपले मुलखांतून सुमारें ५०००० पन्नास हजार फौज परमुलखीं पाठविली, तथापि त्या सरकाराजवळ अजून पुष्कळ शिपाई आहेत. व प्रसंग पडला तर बाहेरचे इंग्रेजी राज्यांत पुष्कळ पाठविण्यास तें विलायत सरकार समर्थ आहे.

---

**सिंगापूर,**— हें एक बेट हिंदुस्थानांतून चीन देशास जळमार्गानें जाण्याचे रस्त्यावर आहे. तें बेट इंग्रेज सरकारचे ताब्यांत आहे. हिंदुस्थान किंवा दुसरे इंग्रेजांचे मुलुख आहेत, त्यांतील काळेपाण्याची शिक्षा ज्या कैदीस होतात, त्यांस तेथें नेऊन ठेवतात. गेल्या वर्षी त्या बेटांत १६,००० कैदी रवाना जाले. आणि ५०० सुमारें कैदी शिक्षेपासून मुक्त होऊन आपआपले मुलखीं गेले. या कैदीं पैकीं २३५३ कैदी जन्मठेपेचे आहेत. तेथील कैदींमध्यें हिंदु आणि मुसलमान यांचा भरणा फार आहे. युरोपियन, चिनई, व पारशी कैदी आहेत, परंतु यांची संख्या फार थोडी आहे. या कैदींपासून सक्त मजूरी घेतात. व त्यांस मोकळें फिरण्याची परवानगी असते. त्यांच्या वर्तणुकेवरून त्यांस स्वतः धंदा करूं देतात, व बिड्यांवांचून ठेवितात. चिनई लोकांस मात्र फिरण्याची मोकळीक नाहीं. कारण, त्यांचे देशाचीं गलबतें व लोक तेथें येतात जातात.

---

मोहरी,— एथून पळालेले बंडखोर त्या शहराचे जवळील जंगलांत शिरले होते. त्यांचा पाठलाग कर्नल राबर्टसन् यांणीं १० दिवसपर्यंत त्या जंगलांत मोठमोठ्या मजला करून ५वे सप्तंबर रोजीं सकाळीं त्यांस गांठलें त्यावेळीं त्याचे हाताखालचे फौजेपैकीं ८६वे व ९५वे बादशाही पलटणींचे, आणि १०वे व २५वे मुंबईखात्याचे काळे पलटणींचे मिळून २५० पायदळ; आणि ८वे हजार्स व मीडसचे स्वार मिळून २०० स्वार, इतकी फौज त्यांचे बरोबर होती. उभय पक्षांची लढाई दोन तास पर्यंत चालली. तींत बंडवाल्यांचे ४५० लोक मृत्यु पावले. नंतर बाकीचे बंडखोर आपलीं घोडीं व नट्टें त्या जागीं टाकून पळून गेले. या बंडखोरांत ग्वालेरकांटिंजंट, कोटाकांटिंजेंट, सिंद्याच्या पलटणी, आणि ४९वे व ५२वे बंगालखात्याच्या काळ्या पायदळ पलटणींचे लोकांपैकीं बोंकडों लोक होते, आणि सिंद्याचे बाडिग्यार्ड म्हणजे ज्यांस बारेघाटी म्हणतात, ते या बंडखोरांचे स्वार होते, असें म्हणतात. बंडखोर जे तेथून पळाले ते तात्याटोप्यांस कुमक करण्यास जातील. अशीं भरगचीं मनुष्यें जाणें मुष्कील आहे. ही लढाई गुण्यापासून नैऋत्येस सात कोशांवर बिजापूर म्हणून गांव आहे तेथें जाली आहे. या लढाईंत कर्नल राबर्टसन् यांचे फौजेपैकीं ८वे हजार्स स्वारांतील कप्तान पूरी, लेफ्टनंट हान्वरी, एक सार्जंटमेजर, ३ स्वार, आणि ५ घोडे जखमी जाले आहेत; प्रैवेट स्मिथ ठार जाला. ९५वे बादशाही पलटणीचे ३ प्रैवेटस जखमी जाले. ओकीफ यास जखम जबर जाली. २५वे मुंबई काळेपायदळ वरील लेफ्टेनंट फासेट ठार मारले गेले. व १ शिपाई जखमी जाला. १०वे मुंबई काळेपायदळचा १ सुभेदार, आणि चार शिपाई जखमी जाले. त्यांपैकीं एकास फार जखम जाली आहे. व २ शिपायी ठार मारले गेले. मीडचे स्वारांतील लेफ्टेनंट स्टूअर्ट, सब आज्युटंट पेज, ३ स्वार, आणि १० घोडे जखमी जाले.

मानसिंग हा परत फिरून गेला. त्याचे बरोबर कांहीं बोंकडों लोक आहेत. आणि तो शाहाबादेच्या जंगलांत कोठें तरी आहे. दुसरे बंडखोर उत्तरेकडेस गेले गेले आहेत. आणि कांहीं टोळ्या शिंद्याचे अंमलदारांनीं अडकावल्या आहेत. ही सदरील बातमी कर्नल राबर्टसन् यांची या हाशारीची सरकारास ब्रिगेडियर सर आर० नेपियर यांणीं ६वे सप्तंबर रोजीं लिहून पाठविलेली आहे.

---

मुंबई,— बहुत दिवस ऐकतों आहों कीं, मुंबईस पाण्याची सोय पुण्याप्रमाणें होणार आहे. तलाव तयार होत आहे. नळ बिलायतेहून आले आहेत, ते जागजागीं पुरले आहेत. या बंदोबस्त्यासंबंधाच्या गोष्टी, तेथच्या वर्तमानपत्रकारें व येणारे मुशाफर यांच्या तोंडानें आजवर ऐकत होतों. परंतु गेल्या शुक्रवारचे बंबेग्याझिटांत तेथील नळाचें काम सुरू होऊन त्यावाटे पाणी येऊं लागलें आहे. आतां त्या पाण्याच्या योगानें ते नळ धुवूण साफ जाले पाहिजेत. याकरितां थोडे दिवस पाणी लोकांस मिळावयाचें नाहीं. असो, यावरून मुंबईचें पाण्याचें दुर्भिक्ष नष्ट होण्यास जाण्याचा योग लवकरच आला आहे. असें आतां निश्चयें करून भासं लागलें आहे.

झालरापाटण — यवनांचा गांव व किल्ला शिपरीपासून अदमासें १० कोसांवर आहे. तेथील राजावर बंडांतील पुढारी तात्यां टोपे हे चाल करून गेल्यामुळें त्या राजास फक्त चार माणसांनिशीं पळून जावें लागलें. तो राजा आतां निमच्या किल्ल्या कडेस जात आहे. त्याच्या जागीं बंडवाला तात्या टोपे हा आपणच राजा जाला आहे. त्याजवळ हाल्लीं ५० तोफा असून सर्वप्रकारचें सामान त्याचे स्वाधीन आहे. आम्हांस गाईट वाटतें कीं, बंडखोर तात्याचें नशीब केवढें उघडलें आणि त्यास जो जय प्राप्त जाला आहे, हा आतां लोक मोठा करून दाखवून, जे लोक अद्यापपर्यंत त्याला मिळण्यास अनमान करीत आहेत ते त्यास मिळून आमचे शत्रु होतील. राजाचे जामदारखान्यांत पांच लक्षांहून जास्त पैसा होता व शिवाय पुष्कळ घोडे, व तसेच उंटही होते. त्यांवर टोपी पडल्यांमुळें बंडवाल्यांचें महत्व वाढून त्यांची स्थिति मजबूद होईल. अशी बातमी आहे कीं, ते तेथूनही कूच करून कोट्या कडेस जाणार आहेत.

---

आम्हांस लिहिण्यास वाईट वाटतें कीं, करनल लोकहार्ट महूयेथील फिरत्या टोळी वरील कमांडर यांस स्वारीवरून परत निघून यावें लागलें. कारण, ते ज्या शत्रुंवर गेले होते, त्या शत्रुंची संख्या यांचे फौजेपेक्षां फारच भारी असून, तिनच्या फौजेचा मोड आपल्या थोडे फौजेनशीं करणें म्हटलें म्हणजे कठीणच. सबब त्यांणीं शाहाणपणा करून परत कूच केलें. असें टेलियाफ पत्रावरून समजतें.

---

सतलज नदीच्या कांठीं धवलपूरच्या नबाबाचा मुलुख आहे, त्यांत आलिकडेस दंगा जाला आहे. त्याविषयीं प्रथम खबर अशी समजली कीं, सामान्य शत्रूंनीं तेथील एक तहशीलदारी (मामलेदार कचेरी) वर हल्ला केला, परंतु मागून असें वर्तमान समजलें कीं, तो कज्जा त्या ठिकाणच्याच माणसांतील आहे. अंगईनामक गांवांतील रणधीर सिंग या नांवाचा मनुष्य आहे, त्याच्या भाऊ कांहीं कारणानें सदरील मामलेदार कचेरींत कैद जालेला होता. सबब त्या रणधीरसिंगानें मोठ्या संतापानें तहशीलदार याजवरावर कज्जा करून तलवारी उपसून, व बुका चालवून तहशीलदार व दुसरीं कित्येक मनुष्यें ठार मारलीं. नंतर त्यास धरण्याकरितां धवलपुराहून शीक लोकांची टोळी रवाना जाली तेव्हां तो पळून गेला.

---

वर्तमानदीपिकेवरून समजतें कीं, राजापूर प्रांतीं धूतपापेश्वर म्हणून एक शिवस्थान आहे. तेथें चौघडा असे. त्याचा खर्च जकातीचे उत्पन्नांतून चालत असे, परंतु ही बाब सरकारांतून बंद जाले कारणानें तो चौघडा बंद पडला होता. हालीं तो चौघडा पूर्ववत् चालवावा म्हणून रा० रा० बळवंतराव रावसाहेब ढवळे, यांणीं मनावर घेऊन तूर्त आपले पैशानें चौघडा चालविला आहे. या कामास बडोद्याचे प्रसिद्ध सावकार गोपाळराव मैराळ यांणीं २००० रु० व धार[illegible]सरकारचे निसबतींतील राघोनारायण गुणे यांणीं ५०० रु० व दलाल भगुमगनीराम यांणें ५०० रु० दिले आहेत. बआणखी चार हजार रुपये पाहिजेत. म्हणजे एकंदर रकमेच्या व्याजानें हा खर्च भागला जाईल. मुंबई आदिकरून मोठमोठे ठिकाणचे शेटसावकार यांणीं आपला आश्रय देऊन रकम पुरी केली तर सहजांत हें देवकार्य शेवटास जाईल.

---

उत्तर हिंदुस्थान येथें बंडवाले अद्यापि थोडथोडी धामधूम करिताहेत, असें दिसून येतें. या बंडखोर लोकांनीं बंड सनगुदस्तच्या मे महिन्यापासून करण्यास सुरवात केली. तेव्हांपासून पावसाळा, हिंवाळा, आणि उन्हाळा या तिन्ही काळांत ते अहोरात्र कष्ट करितात, व पळत आणि भटकत फिरतात. त्या लोकांचे पाठलाग इंग्रेज सरकारच्या फौजा करितात, लढाया मारतात व हल्ले करतात. तत्रापि बंडवाले यांचें भटकणें अशा पर्जन्यकाळांत उत्तर हिंदुस्थानांत चाललेंच आहे. व त्यांचे जेथें सरकारची फौज नाहीं, किंवा त्यांचा विशेष बंदोबस्त ज्या ठिकाणीं नाहीं, किंवा विशेष बंदोबस्त हिजे असें ठिकाण बंदोबस्तानें नाहीं, तेथें या बंडखोरांचा तूर्त उपद्रव चालतो, असें आलिकडे समजून येतें. तात्या टोपे यांचें नांव पत्यानिशीं आलिकडे कांहीं दिवस आपल्यास कळलें नव्हतें, परंतु हल्लीं त्या बाबाची खात्री, झालरापाटण, म्हणून एक गांव कोट्याचे जवळ आहे तेथें आहे. त्याणें २६ वे आगस्ट रोजीं त्या मुकामीं जाऊन वेढा घातला. नंतर तें ठिकाण हस्तगत करून तात्या बसले आहेत असें समजतें. जरी ते आपल्या मतें आपण निर्भयस्थानीं बसलों आहों असें मानीत असतील तरी तें त्यांचें मानणें व्यर्थ आहे, असें लवकरच आपल्यास विदित होईल. याचें कारण कीं, कर्नल लोक हार्ट हे आपल्या फौजेनिशीं आगर मुकामीं आहेत, ते तिकडेस जाऊन हल्ले करतील आणि ती लवकरच आपले समजण्यांत येईल. इकडे कलकत्याचे इंग्लिशम्यान पत्रांत सागरचें २० वे आगस्टचें एका बातमीदारानें पत्र आहे, त्यावरून समजतें कीं, मागें आपले शूर सरदार सर ह्यू रोज साहेब यांणीं बंडखोरांनीं ५२ वे काळे पायदळ पलटणचे शिपायांपासून गाराकोट नामें ठाणें हिसकावून घेतलें, तें पुनरपि बंडवाल्यांनीं घेतलें. आतां या बंडखोरांची चोहोंकडे चाल्हन जाली आहे. पाहिजे तिकडे भटक्या मारित फिरतात. त्यांस मुकामास विश्रांतीचें स्थळ म्हणून कोठें नाहीं. तेव्हां लहान सहानसें दोन दिवस आधारापुरतें ठाणें रिकामेंसें पाहून धरून बसतात. हल्लीं पर्जन्यकाळ आहे तेव्हां हीं ठाणीं धरून कांहीं अवशिष्टकाळक्रमण करावें म्हणून त्यांणीं हा उद्योग धरिला आहे, परंतु अशा पर्जन्यकाळांत सरकारच्या फौजा जिकडे तिकडे या लोकांचे मागोमाग फिरताहेत, व पराभव करिताहेत. तेव्हां यांचें हल्लींचें क्षणिकंचलनवलन लौकरच मोडेल, यांत संशय नाहीं.

या बंडवाल्यांचे आंगीं एक दुर्गुण दिसून येतो. तो हा कीं, आपण बंडास प्रवृत्त होऊन आपण आपल्यास, व इतर आपले देशाचे लोकांस निरर्थक फेऱ्यांत आणून आपले पतीस व ब्राह्मणपणास त्यांणीं बट्टा लाऊन घेतला. बरें आतां तरीं त्यांनीं आपले नशिबावर राहून असावें, तर तेंही नाहीं. आणखी नवनवे विचारे फेऱ्यांत आपणामागें आणायाच्या तजविजी व युक्ती करतात. ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. ग्वाल्हेर मुकामीं २५ वी काळी पायदळ पलटण मुंबई खात्याची आहे, तिला फितविण्याविषयीं नानाकडून त्यांचे सहीचा परवाना घेऊन चार बिठूरचे लोक आले, त्यांणीं यत्न आपणाकडून केला, परंतु आपली सदरहू शूर व इमानी पलटण त्यांच्या त्या अयोग्य विचारास प्रवृत्त झाली नाहीं. आतां हे लोक जाऊन काय करते तें आपणास नागें इतर लोकांच्या भावांनीं काय केलें यावरून च समजतें. परंतु त्यांणीं इमानी

# पुरवणी तारिख २७ सप्तंबर सन्‌ १८५८ इसवी.

लखनौचें ९वे मिनहूचें पत्र गेल्या शनवारचे पुणें आबझरवरांत प्रसिद्ध केलें आहे, त्यांतील हशील मजकूर कीं, गेल्या परवांचे रोजीं कानपुरानजीक नवाबगंज म्हणून शहर आहे, तेथें बंडवाल्यांचे तोफखान्यानें एकाएकीं आम्हांस अचंब्या प्रमाणें केलें. या प्रसंगीं आमचे लोकांनीं त्या लोकांचा बराच समाचार घेतला, आणि त्यांस ठोकून लावून दिलें, तरी आमचे लोकां पैकीं पुष्कळांस त्यांणीं तोडून टाकलें. आतां जनराल ग्रांट याचे हाताखालील फौजे विषयीं विचारलें असतां ती फारसा उद्योग करीत नाहीं, आणि तशांतही फौज पाहातां सर्वप्रकारें खातरजमेची आहे. २७वी फ्युझिलियर्स ही ३रे मिनहूस एथून कूच करून गेली, ती कानपूरचे रस्त्यानें नवाबगंजास गेली असावी, असें वाटतें. थोडे दिवस पावेतों आम्हांस सुलतानपुराकडील तोफा वगैरेच्या गोळ्यांचे अवाज ऐकूं येत होते. सुलतानपूर हें सरकारानें एका राजास दिलें आहे. तो लढाई तेथच्या बंडवाल्यांबरोबर करीत आहे. आणि त्याकरितां त्यास त्या बंडखोरांबरोबर लढाई करणें प्राप्त जालें आहे. या परस्परांची लढाई लावून देणें या सारिखी उत्तम तजवीज नाहीं. या ठिकाणी नेहमी उपद्रव चालला आहेच. त्या लोकांचा हेतु असा दिसतो कीं, एथील एक दगडही बदलून टाकायास सोडावयाचें नाहीं. हें एकाद्या जीर्ण शहराप्रमाणें दिसूं लागलें आहे. एथें मच्छीबाजार म्हणून एक मोठा किल्ला बांधविलेला आहे. त्याचा विस्तार इमामबाड्याचे सभोंवार पर्यंत आहे. ज्यानें त्या किल्ल्यांचा नकाशा मुद्दाम केला असेल त्याची तारिफ करणें रास्त आहे. कारण कीं, त्या किल्ल्याची रचना फारच भव्य दिसते. या किल्ल्यावरून दगडी पुलापर्यंत देखरेख ठेवितां येते. व दुसऱ्या एका लहानशा किल्ल्यावरून लोखंडी पुलावर टेहळी राखतां येते. या ठिकाणीं लष्करांत आजाराचा प्रादुर्भाव कांहींसा भयंकर आहे. दर एक पलटणीनें सरासरीनें २५० लोक दवाखान्यांत पडलेले असतात. व मृत्यूची संख्याही पुष्कळ असते. या ठिकाणीं पर्जन्य वृष्टि पुष्कळ जाली आहे. एथचें पोष्टहपीस पूर्वीं तारा कोठी (वधशाला) एथें होतें तें तेथून काढून मध्य भागीं नेलें आहे. प्रस्तुत कानपूरचा रस्ता साफ नाहीं तथापि या उजाड शहरीं मडमा पुष्कळ येताहेत.

---

मुफसिलैट पत्रांत १३वे मिनहूचें इटावा येथील पत्र छापलेलें आहे, त्यावरून तेथचे बंडवाल्यांवर फत्ते करून त्यांस सिंधाचे मुलखांत हांकून लाविलें आहे.

---

ज्यांस काळ्या पाण्याची शिक्षा झाली अशा ७०० बंडखोर कैद्यांस दिल्लीहून मुंबईकडे आगस्टच्या ९व्या तारखेस रवाना केलें.

**खाणींतील द्रव्य,—** सन्‌ १८५७ सालामध्यें ग्रेटब्रिटनाच्या जमिनींतून ज्या वस्तु खाणींतून काढिल्या, त्यांची किंमत सुमारें ३२,००००००० रुपये होती. आणि त्याच वस्तु विकण्याकरितां साफ केल्या तेव्हां त्यांची किंमत ४०००००००० रुपये झाले. ज्ञा॰ द॰

---

ग्वालेरीकडे बंडखोरांचा जमाव होत चालला आहे असें कळतें.

---

येथे सुरतेहून वडनगरनागर ब्राह्मण दशग्रंथ सांग सामवेदपाठी पारायणी आलेले आहेत. त्यांचें नांव केशवराम व त्यांचे चिरंजीव सूर्यशंकर उपनाम त्रिपाठी आहे, हे पंधरा सतरा पिढ्यांचे धुरंधर विद्वान् आहेत. काशी पासून रामेश्वरपर्यंत असे सामवेदपाठी काशी व सुरत या दोन ठिकाणीं कदाचित् बहुत थोडे असतील. आणि वेदाचें अर्थज्ञान व वेद म्हणण्याची शिक्षा समजण्यापुरतें शास्त्रींचे ठिकाणीं पठण केलें आहे. व सदरहू वैदिकबावा यांचे वडील शंभुशंकर व चुलते गिरिजाशंकर व यांचे आजे रूपनारायण त्रिपाठी हे श्रीमंतांचे कारकिर्दींत पुणें व सातारा वगैरे ठिकाणीं येऊन पारायणादि करून कीर्तिमान् पुरुष प्रसिद्ध जाले आहेत. त्या उपर असे ब्राह्मण पुण्यास आले नाहींत. व सांप्रतचे प्रजेनें असा सामवेद ऐकिला ही नसेल. गेल्या सोमवारपासून श्रीमंत राजमान्य राजश्री मोरो रघुनाथ ऊर्फ तात्यासाहेब दमदेरे यांचे घरीं पारायण करीत आहेत. त्यांचे बिऱ्हाड वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री मणीनंद गौरीनंद शास्त्री बवा अदालतीकडील यांचे घरीं आहे.

ऋग्वेद आणि यजुर्वेद हे वेद पठणकरणारे वैदिक ब्राह्मण या दक्षिणेंत बरेच आहेत. व त्यांचा वेद सर्वांस श्रुत आहे, परंतु सामवेद या प्रांतांत कोणी पठण करीत नाहींत. व त्या वेदाचे वैदिकही फार थोडे असून या प्रांतीं तर बिलकुल नाहींत. आणि यामुळें हा वेद इकडील लोकांचे ऐकण्यांत नाहीं. तो वेद गायनाप्रमाणें आहे; व तें गायन फार प्राचीनकाळचें आहे. त्यासेव नौवेद येथील वेदाधिकारी यांणीं अवश्य ऐकावा अशी आमची त्यांस शिफारस आहे.

---

## सोलापूर बातमीदाराकडून ज्ञानप्रकाशकर्त्यांस.

१ येथील प्रकूटिंग जड्ज्य मेहेरबान लमर्ट साहेब रत्नागिरीहून येथें येण्याकरितां ता० ७ रवानहूस जाले जाले. मुंबईहून सुमारें तेवीस किंवा चोवीस तारखेपर्यंत येऊन दाखल होतील.

२ येथील इंग्रेजी शाळेविषयीं मेहेरबान डायरेक्टरसाहेब यांणीं अखेर असा ठराव केला कीं, हल्लींचे स्कुलमास्तर या शाळेचे कामावर आहेत तोंपर्यंत त्यांजला हाल्लीं चालत आले वहिवाटीप्रमाणें दरमाहा पगार रुपये १०० मिळेल. परंतु थोडेच दिवसांत मशारनिल्हे मास्तर यांची नेमणुक बरोबरीचे पगारावर दुसरेकडे करून येथें दरमाहा ७५ रुपयांचा नवीन स्कुलमास्तर पाठविण्यांत येईल. त्याचे पगाराचे भरतीस सरकार तर्फेन दरमाहा पन्नास रुपये मिळतील आणि पंचवीस रुपये विद्यार्थ्यांचे फीचे उत्पन्नांतून भरती करीत जावी. याप्रमाणें ठराव जाल्यावरून येथील इंग्रेजी शाळा लयास जाण्याचें जें भय उत्पन्न जालें होतें, त्याचें निवारण होऊन विद्येच्छु लोकांस फार आनंद जाला आहे.

३. नाटकापासून अनर्थ—सावरचीं नाटकमंडळी सुमार एक महिन्यावर वैराग येथें असतां तेथील एक संभावित गृहस्थ केसकर आडनांवाचे यांणीं एकें शिवालयांत नाटक करविलें. तो खेळ रासक्रीडेचा होता, आणि सदरहू देवालय थोंगडे म्हणून तेथील एक श्रीमान् सावकार आहेत त्यांच्यांतील असून ते लिंगायत वाणी आहेत. शिवालयांत कृष्णाचें चरित्र तशांत शृंगार-

युक्त करणें त्यांस अयोग्य वाटल्यावरून त्यांणीं रेवच्छ बंद करण्याविषयीं तजवीज केली. तेव्हां बोलाचाली होऊन केसकर व पोंगडे या उभयतांचे मनुष्यांत हलकी मारामारी जाली त्याबद्दल केसकर यांजवर फिर्याद होऊन मेहेरबान थर्ड असिस्टंट माजिस्त्रेट साहेब यांचे समोर गुन्हा शाबीद जाल्यावरून केसकर यांचे खासे मंडळी पैकीं चार असामीस कोणास महिना व कोणास दोन महिने या प्रमाणें सक्त मजूरीची शिक्षा ठरली. व त्याशिवाय दंड व पुढील वर्तणुकीचे जामीन घेण्याविषयीं ठराव जाला. आणि तेथील महालकरी त्यावेळेस हजर नसून बरोबर बंदोबस्त केला नाहीं म्हणून त्यांजला कमी हुद्याचे जागेवर मेहेरबान माजिस्त्रेट साहेब यांणीं वर्ग केले. केसकर हे ब्राम्हण असून अब्रूदार सावकार आहेत. कितीएक लोक असें म्हणतात कीं, पोंगडे हे त्यांचे पेक्षां मोठे सावकार असून त्यांनें वजन केसकर आपलेपुढें पडूं देत नाहीं. यामुळें उभयतांचे दरम्यान अदावत आहे. त्यांणीं एकमेकांस चीत करण्यास पुष्कळ प्रयत्न केले. दोवेळीं पोंगडे यांचे प्रयत्न सफळ जाले.

४ मेहेरबान कारसाहेब बेळगांवचे पोलिटिकाल एजंट यांजकडून येथील कलेक्टर साहेब यांस पत्र आलें कीं, त्यांचे ताब्यांतील एके संस्थाना करितां कारभारी नेमणें आहे मामलेदार लोकांपैकीं जो लायक असेल त्यानें नांव व लायकी लिहून पाठवावी म्हणून आल्यावरून मेहेरबान कलेक्टर साहेब यांणीं राजमान्य रा० रामचंद्र सखाराम गुप्ते पूर्वी पुण्याचे कलेक्टर कडे चिटणीशीचे कामावर होते. ते हाल्लीं इंदी तालुक्याचे मामलेदार आहेत. त्यांजला नेमण्याविषयीं शिफारस केली आहे.

५ सुमारें आठ दिवसांपासून येथें व आसमंतात् भागीं पर्जन्यवृष्टि बरीच होऊन आबादानी झाली आहे.

६ खोटे बोलण्याचा परिणाम.— येथील शहर सुधारणुकीचे सकटतार यांहीं त्यांचे ताब्यांतील एक रस्त्यानें काम आरंभ जाला नसतांही तयार जालें म्हणून शहर सुधारणुकीचे मुख्य कमिशनर मेहेरबान कलेक्टर साहेब यांस सांगितलें. व पूर्वीही कितीएक वेळां असेंच प्रकार घडलेले साहेब महसूफ यांचे लक्षांत येऊन सबुरी केली होती. त्याकडां एकंदरावर नजर देऊन मशारनिल्हे सकटतार यांजला बरतर्फ केलें. हें गृहस्थ शांत व मनोरंजक स्वभावाचे असल्यामुळें त्यांची अशी अवस्था झालेली पाहून पुष्कळ लोकांस दुःख वाटतें. कळावें तारिख १८ माहे सप्तंबर सन १८५८

---

## नगरयेथील बातमीदाराकडून

इंग्रेजी स्कुलाची वार्षिक परीक्षा चालली आहे. त्यांत मेहेरबान ग्रासाहेब फर्स्ट असिस्टंट कलेक्टर हे प्रेसिडेंट आहेत. डाक्तर फ्रेझर साहेब व विठोबा धामणसकर मुनसिफ हे मेंबर आहेत. माहारांचें मूल शाळेंत घेतल्यामुळें ब्राम्हणांचीं जीं हजार मुलें होतीं तीं शाळेंतून निघून गेलीं आहेत. सबब परीक्षा चांगली होणार नाहीं.

कज्जे लवकर निघण्याविषयीं विठोबा धामणसकर यांणीं एक रीत अशी काढली आहे कीं, समान येऊन आलें म्हणजे तो कज्जा इनसाफास नेमावा. ते दर तारिखेस पांच कज्यांवर नेमीत जावे. नंतर जे कज्जे नोटिसा जाल्यामुळें तहकूब राहिले असतील ते नोटिशीची मुदत भरल्यावर

दून साफास लावण्याचे ते लाविले. कज्ज्याचे पुढें लावूं नये; तर त्याचे पाठीमागील कज्जा ज्या तारिखेस लागला असेल तो ज्या तारिखेस नोटिशीचा कज्जा नेमावयास लागला त्या तारिखेपासून सात दिवसांचे आंत नसेल तर त्याजवळच मध्यें सारावा म्हणजे अनुक्रमानें कज्जे ऐकण्यांत येतात इतकेंच नाहीं, परंतु बहुधा कज्जे लवकर निघून निकाल होतो, त्यांत न्यायाधीशांस थोडी मेहेनत इतकी पडते की, कधीं कधीं पाइंटाचे कज्जे दाहा दाहा होतात.

---

नेमणुका.— धारवाड जिल्ह्यांतील बंकापूरचे ३रे प्रतीचे मामलेदार व्यंकटराव माहादेव यांस बेळगांव जिल्ह्यांतील संपगांवचे ३रे प्रतीचे मामलेदारीचे जाग्यावर नेमिलें आहे. पहिले मिनहूस मिस्तर टी. सी. लफनन धारवाडचे जड्ज्य यांणीं तेथचे असिस्टंट जड्ज्यास आपले कामाचा चार्ज दिला आहे.— मिस्तर एम्. मेलविल् कोंकणचे आक्टिंग जड्ज्य यांणीं आपले कामाचा चार्ज ४थे मिनहूस घेतला. हैदराबादचे पोलिसावरील लेफ्टनंट गिलिस्पी व खानदेशाचा फर्स्ट असिस्टंट कलेक्टर मिस्तर आर. ग्रांट यांस एक महिन्याची रजा मिळाली आहे.— ठाणे जिल्ह्यांतील सेकंड असिस्टंट याच्या ताब्यांत पनवेल, मानसरापूर, आणि थर्ड असिस्टंटाच्या ताब्यांत वसई आणि माहिम हे तालुके दिले आहेत. भडोचेचा कमीत मिस्तर डब्ल्यू. जी. पेडर यांचे ताब्यांत २३ गुदस्त पासून भडोच प्रांत दिला आहे.— मिस्तर ए. बेकर खानदेशाचे पैमाषी कडील असिस्टंट सुपरिंटेंडेंट यांस एक महिन्याची रजा मिळाली आहे.— मिस्तर आर. स्पूनर कस्टम कलेक्टर यांणें २० वे मिनहूस पुनः आपले कामाचा चार्ज घेतला.— पुण्याचे दिवाणी इस्पितळावरील असिस्टंट सर्जन माकेंझि हा गेल्यावर त्याचें काम २६ वे फाके पायदळ कडील सर्जन बार्थो यांणें चालवावें म्हणून हुकूम केला आहे.— जमसेटजी जिजीभाईचे इस्पितळाकडील सब असिस्टंट सर्जन अनंता चंद्रोबा यांस प्रकृति साफ होण्याकरितां १२ मिनहूपासून एक महिना पुण्यास राहण्यासाठीं रजा दिली आहे.

---

मुंबईंतील कित्येक सुशिक्षित पारशी गृहस्थांनीं एका बागेंत एक मंडळी स्थापिली आहे. तिचा उद्देश असा कीं, स्त्रियांस पुरुषांच्या मंडळींत येण्याची सोय व्हावी. या मंडळीचा हा एक मुख्य नियम आहे कीं, प्रत्येक सभासदानें आपल्या समागमें आपली पत्नी आणावी. सायंकाळीं भोजनाची तयारी होण्यापूर्वीं सर्व पुरुष व स्त्रिया मिळून आनंदानें बागेंतून हवा खात फिरतात. अशा मंडळ्यांच्या योगानें आपल्या लोकांत स्त्रियांस आपल्यासमान योग्यतेच्या मानण्याचा प्रघात पडावा आणि त्यास आपल्याप्रमाणें स्वतंत्रता व सुखोपभोग प्राप्त व्हावे एवढाच या गृहस्थांचा हेतु असेल असें आम्हांस वाटतें. तरी लोकांत त्यांचा भलभलता अपवाद होईल असें भय आहे. तथापि त्यांनीं भिऊं नये. धैर्य धरून आपलें सुकृत्य काम चालवावें. पूर्वीपासून सुधारणुकीचीं कामें चालू करणाऱ्यांत पुष्कळ छळणुकी व दुःखें सोसावीं लागलीं हें त्यांस ठाऊक असेलच.

आगस्टच्या २६ वे तारिखेस मुंबईंत एक हिंदु मुसलमान झाला. त्याची वरात कशा कोटीची काढली हो…

---

वाहर पुणें येथें ज्ञानप्रकाश छापखान्यांत छा.

पणा ठेविला हे बरीक तारिफ करण्यासारखें काम केलें, यांत अंदेशा नाहीं. असो ते फितुरी लोक त्या पलटणीचे छावणीतले लैनींतच पकडले. त्यांजवळ नानाचें हुकूमपत्र होतें कीं, मुरारछावणीचा विध्वंस करून टाकावा. त्या फितुर करणारे गुन्हेगारांनीं कबूल होऊन असें सांगितलें कीं, ग्वालेर येथील ६००० लोक एकाक्षणाची सूचना होतांच नानास मिळण्यास तयार आहेत. असें जर आहे, तर सिंदे सरकार या दावाग्नीचें मूल उपटून कां टाकीत नाहीं? इंग्रेज सरकारानें सर्वकाळ या माहाराजांकरितां लढाईच करावी कीं काय? याचा बंदोबस्त त्यांणीं अवश्य ठेवावा. आतां त्या गुप्त बातमीदारांची नोकरी जनरालकोर्टमार्शलांत होऊन शिक्षा जालीती याचपत्रीं दुसरे कालमांत लिहिली आहे. या करण्यापासून इतरांस दहशत पडेल कीं, इंग्रेजांबरोबर लढाई केली असतां काय परिणाम होईल. ग्वालेर येथें १४वी लैट ड्रगून स्वारांची पलटण, व ८६वी गोरी रायल कौंटी पलटण या पलटणी आहेत. त्या हिंदुस्थानांत सोळा सत्रा वर्षे सरकारची नोकरी करीत आहेत. तेव्हां त्या पुढील जानेवारींत मुंबईस विलायतेस जाण्याकरितां परत येतील. त्या तेथच्या स्थळांतर काढल्या, तरी विलायतेची फौज येऊन पोंचेलच. तेव्हां त्या ठिकाणीं अधिक बंदोबस्त सरकार करील यांत संशय नाहीं.

---

२४वे आगस्टरोजीं ३रे मुंबई लैट घोडेस्वारांचा एक स्क्वाड्रन, बादशाही ९२वे गोरी पलटणीच्या चार कंपन्या, बंगाली घोडयावरील दोन तोफा, आणि मुंबई स्वारांची १९वे काळे पायदळ पलटणीच्या दोन कंपन्या, इतकी फौज उज्जनीकडे रवाना जाली आहे. याचें कारण कीं, त्या शहरानजीक सुमारें ५०० बंडवाले जमा झाले आहेत. त्या प्रांतीं सरराबर्ट हामिल्टन साहेब आहेतच ते हुशार व चपल आहेत, तेव्हां तेथें बंडवाले जमले आहेत, तरी त्यांचा बंदोबस्त ते स्वास करून टाकतील.

---

**दिवाणीखातें,**— हाल्लीं दिवाणीकडेस वादीप्रतिवादी यांस नोटिशी समानें वारंटे वगैरे पोंचविण्याकरितां दरकोसास दरएक कामगिरीस एक आणा या मानानें भत्ता घेण्याची वहिवाट आहे. ही वहिवाट बदलून दरएक कज्याचे आकाराप्रमाणें भत्त्या ऐवजीं छापील कागद घेऊन काम चालवावें. यांत रयतेचें आणि सरकारचें नुकसान नहोतां काम चांगले रीतीनें चालेल, किंवा कसें याविषयीं जिल्हाजडज्ज व मुनसफ वगैरे न्यायाधीशांस अभिप्राय देण्याकरितां वटहुकूम फिरविले आहेत, असें समजतें.

यावर प्रत्येक अंमलदार आपले अकलेप्रमाणें वविचारानुरूप अभिप्राय देतीलच, आणि त्यावरून विचार करणें तो सरकार करील. परंतु आमचा विचार या बद्दल आहे, हाही याप्रसंगींच दाखविणें योग्य आहे, तो जर पक्षकारांपासून भत्त्याऐवजीं छापील कागद अमुक किंमतीचा घेऊन त्यावर कोडतास अर्ज केला तर त्यांत कोडतास भत्याबाबद हिशेब वगैरे राखण्याचें कारण पडणार नाहीं. आणि समयानुसार पक्षकारांकडून भत्ता वेळेस मिळाला नाहीं, यामुळें कोडताचे कामास हरकत पडती अशीं जीं कारणें कोडत सांगून दुर्लक्ष करण्यास दिरिंग लावण्याचा रस्ता

आहे. तो उघड रीतीनें बोलून दाखविण्यास आ ग राहाणार नाहीं. या खेरीज कांहीं नफा आहे, असें आमच्या नजरेस येत नाहीं.

रयतेस यापासून नफा तर कांहीं होईल असें दिसण्यांत येत नाहीं, परंतु एक तोटा असें जालें असतां तूर्त आमचे नजरेस येतो आहे कीं, नक्शकारांस छापील कागदाचे दुकानावर बहुतेक स्वतः बसावें लागेल. व छापील कागद विकणाराचें प्रसंगीं आर्जवहीं करावें लागेल, याचा विचार सरकार व दिवाणी अंमलदार करतील असा आमचा आशय आहे.

---

**प्रयाग,**— येथें अयोध्येकडील सुलतानपूरची खबर २१ सेप्टेंबर रोजीं येऊन पोंचली. त्यावरून कळतें कीं, तेथचे बंडवाल्यांचा बेत आमितीवर उलट चाल करून जाण्याचा आहे. या बंडवाल्यांत राजालाल माधोसिंग याचे जवान लोक व कांहीं सुसफरनगर जें सुलतानपुरापासून ५ कोसांवर आहे. तेथचे आहेत.

---

**मृत्यु,**— विलायतेस स्कॉटलंडांतीं डाक्तर स्टिविन्सनसाहेब घोड्यावरून पडले, त्यायोगें मरण पावले. हे साहेब या मुंबई इलाख्यांत बहुत वर्षें असून पाद्रीचें काम करीत होते. हे इंग्रेजींत, संस्कृतांत, व मराठींत चांगले हुशार होते. त्यांणीं इंग्रेजी भाषेंत सामवेदाचें भाषांतर केलें आहे. मराठी आणि इंग्रेजी भाषेचें एक व्याकरण त्यांणीं केलें आहे. या खेरीज दुसरीही पुस्तकें त्यांणीं केलीं आहेत. काळे लोकांत यांचा परिचय फार असे. व हे विद्वान् असल्यामुळें त्यांचे माघारी त्यांचे नांव राहील असत. यामुळें यांच्या मरणापासून त्यांचे परिचित काळे व गोरे लोक यांस वाईट वाटल्यावांचून राहाणार नाहीं.

---

धरणीकंपाचे धक्क्यानें सीरामपूर येथील कालेजाचे इमारतीचा वरील भाग खालीं पडला. आणि इतर इमारतींस खालून वरपर्यंत भेगा पडल्या आहेत.

---

**शिक्षा,**— ग्वालेर कंटिंजेंटींतील सुभेदार मेजर मीर अमानत अली यास आग्र्यास जाण्याकरितां वरिष्ठ अंमलदारांनीं हुकूम फर्माविला असतां तो नजुमानून, आपण बंडांत जाऊन इतरासही जाण्याविषयीं प्रेरणा त्यानें केली. आणि तो आपणास मुरार छावणींत ब्रिगेडियर असें म्हणवूं लागला. त्यास आग्रा येथें फांशी दिली.

---

मध्यहिंदुस्थानांत बंडाचा जमाव अजून मोठा आहे. सबब सर ह्यू रोजसाहेब यांस एथून त्वरेनें तिकडेस जाणें भाग पडेल, असें वाटतें. तात्या टोपे यांची हिंमत आणि निश्चय अद्यापि कमी होत नाहीं. याजकरितां इतक्यांतच त्यांचा पाठलाग करण्याविषयीं मोठ्या निकरानें जर तजवीज केली तर गुदस्तां प्रमाणें सालमजकुरींही पुनः युद्धसंग्राम होईल. या तात्या टोप्याचा कजागपणा इतर बंडवाल्यांचे अंमलदारांहून अधिक आहे. त्याचे कुटुंबांतील माणसें धरून जरी कैद केलीं आहेत, तथापि याविषयीं त्याचे मनांत दहशत बसत नाहीं. टेंग्रा.

---

पदच्युत दिल्लीचा राजा आणि अयोध्येचा नबाब या उभयतांचे जवाहीर कलकत्त्यास लिलांव करण्याकरितां रवाना होणार आहे.

**पाटणा,**—एथून सरकारी अंमलदारानें बातमी प्रसिद्ध करण्यासाठीं दिली आहे कीं, चपरा परगण्यांत स्वस्थता आहे. डुरंगोदा यांणीं दोन बंडखोरांस पकडलें, त्यांपैकीं, एक ६१ वे पलटणीचा आहे. तो असें सांगतो कीं, गोरखपुरांत जे बंडखोर गेले आहेत, त्यांचा मुख्य भवानीसिंग हा आहे. त्या बंडखोरांस माफी मिळेल असा जाहिरनामा लागे पर्यंत ते गोरखपूर परगण्यांत त्या जंगलांत राहाणार आहेत. आणखी तो असें सांगतो कीं, ते बंडखोर शिपाई माफीचा जाहिरनामा लवकर लागावा अशी अपेक्षा करिताहेत.

---

**मद्रास,**—एथील आथेनियम पत्रकर्ता म्हणतो कीं, तेथच्या गवरनराची प्रकृति पुनरपि बिघडली आहे, आणि त्यानें करून त्यास कामकारभार बघवत नाहीं. आतां त्यास आपला हुद्दा सोडून विलायतेस गेलें पाहिजे.

---

मराठी इरेग्युलर स्वारांचा दोन पलटणी नव्या करून त्यांपैकीं एक ग्वालेरीस, आणि दुसरी झांशीस ठेवण्याविशीं सरकारानें हुकूम फर्माविला आहे, असें आग्र्याचे मुफसिलैट पत्रावरून कळत आहे.

---

**सदर फौजदारी अदालत,**—गेल्या ८ वे तारिखेस, रा० रा० पांडुरंग वासुदेव महालकरी पोलिस आफिसर, पेटानिमोन जिल्हा नगर यांणीं या अदालतीस जिल्ह्याचे माजिस्त्रेट यांणीं सरकार नौकरींतून दूर केलें त्याबावद इनसाफ मिळावा म्हणून आपील अर्ज केला, त्याची चौकशी मिस्तर हारिसन, व मिस्तर लार्किन जड्ज्य असतां झाली. त्या मोकद्दम्याचें हकीगत पाहातां मशार निल्हे महालकरी हे पोटेगी नरी होते. त्यांणीं गेल्या आक्टोंबरांत चिमणीराम गंगाराम याजपासून ५० रुपये, अणि जानेवारींत पन्नाराम खुशाल याजपासून २५०० लांच धमकी देऊन घेतले. ती धमकी अशी दिली कीं, जर तुम्हीं सदर्हू रकमा दिल्या नाहींत, तर तुम्ही बंडखोर भिल्ल यांस सामील आहां, अशा अपराधांत तुम्हांस गोवीन. या कज्जाची उघडीक एका बिननांवाची अर्जी फर्स्ट आसिस्टंट माजिस्त्रेट ल्यायम्यान यांजकडे आल्यावरून जाली. तो अर्जदार अद्यापि मिळाला नाहीं; परंतु या अपराधास आधाराचें एक मोठें कारण हें आहे कीं, चिमणीराम यास याणें भिल्लांस पोटगी दिली या शकावरून त्यास कैदेंत ठेविलें होतें. पुढें ५० रुपये दिल्यावर त्यास सोडून दिलें. असा त्यानिमाची अर्जींत मजकूर होता. त्यावरून चौकशी होतां चिमणीराम याचे घरीं जमाखर्चांत हा प्रकार ५० रुपयांचा लिहिलेला मिळाला. वगैरे चौकशी होऊन माजिस्त्रेटाचे मजरेस येऊन त्यांणीं सन्न १८२७चा कायदा १६ कलम ९ रकम २ याअन्वयें अपराध ठेऊन त्यांणीं सदरहू महालकऱ्यास सरकार नौकरींतून दूर केलें. त्यावर लार्किन साहेब यांणीं असा अभिप्राय दिला कीं, सदरहू माजिस्त्रेट यांणीं हा कज्जा अपराधाची खात्री होण्यासाठीं सेशनांत कमिट केला असता तर बरें होतें. आणि हा अमलदार असून रयतेस धमकी देतो व त्यापासून लांच खातो, ही भयंकर गोष्ट त्याणें केली, असा शक आला आहे, त्यापेक्षां नागराजेयांअशा अपराधाचे चौकशीकरितां कोरत उघडलें आहे, तेथें हा मोकद्दमा

रवाना करावयाचा होता, वगैरे मजकूर लिहून अर्जदार याचा अर्ज उभय जडज्यांनीं नामंजूर केला आहे.

---

**बुंदेलखंड**,— येथें मोहनी म्हणून गांव आहे, तेथील पत्र ता. ४ मिनहूचें आलें आहे कीं, सरकारचे फौजेनें बंडवाल्यांचे लष्करावर हल्ला करून शत्रुच्या २ तोफा घेतल्या आणि १०० लोक मारले, आणि किती एक बेलही पकडून आणिले आहेत. सरकारची फौज एकंदर ४०० होती. तिजबराबर भोपाळ कंटिंजंटच्या २ तोफा व २ गारनाळा ही होत्या. आमचे फौजेनें बंडवाल्यांचे लष्करास हांकून दिल्यावर शत्रुची फौज म्हो येथें तळ देऊन राहिली. हें गांव मोहनीपासून ११ कोसावर आहे. या लढाईंत आम्हांकडील म्हणून एकही जाया जाला नाहीं. परंतु उन्हाळ्याची अतिशय झळई लागल्यामुळें कांहीं लोक मात्र आजारी पडले. आमचे कुल्यांचा मारा बंडवाल्यांस सोसवला नाहीं, परंतु त्यांणीं पावला पावलीं लढाई केली, रस्ता इतका अरुंद कीं, दुसरी तोफ त्यामार्गानें येत नसे. यामुळें आमचे फौजेचें कुच दरेगेरे व नद्या यांतूनच होत असे.

---

**ग्वालेर**, तारीख १० सप्तंबर— ग्वालेरचे महाराज यांस शनवार ता. ४ मिनहूस तीन घटिका रात्रीं कन्या जाली, या उत्साहाबद्दल तोफांची सरबती जाली. महाराजांची नायको चिमणाराजे यांस एक पहिली मुलगी २ वर्षांची आहे. व हल्लीं ही मुलगीच जाली म्हणून बाईसाहेब दिलगीर आहेत.

ग्वालेरचे छावणींत कांहीं फितुर करण्याचे कामांत लोक पकडले होते त्यांची चौकशी होऊन त्यांस ता. ६ मिनहूस फुलबागेसमोर तोफेच्या तोंडीं दिलें. त्यांचीं नांवें, वामनभट, बाळकिसनबाबा, खानु, गोविंदराव. यावरून लोकांस समजेल कीं, मुंबईखात्याचीं पलटणें बेइमानी नव्हत.

---

**रजा**,— सरकारानें जडज्यास आपले ताब्यांतील कामगारांस एक दिवसाची मात्र रजा देण्याचा अधिकार दिला आहे.

---

आम्हांस अशी खबर लागली आहे कीं, बेळगांवचे डिस्त्रिक्ट डिपुटी कलेक्टर मिस्तर मुदलिकुमार यांस जमाबंदी प्रकरणांत वाकबगारी फार कमी आहे म्हणून त्यांस एखादा कमी पगाराच्या जाग्यावर नेमणार आहेत असें समजतें; आतां असें करण्याचें कारण केवळ सदरीलच असेल असें आमचे ध्यानांत येत नाहीं.

---

**पुणें पोलिस**,— यांजकडेस पर्वतीसंस्थानचे कारकून याणें अशी फिर्याद केली आहे कीं, कसब्यांतील एका ग्रामस्थानें मला व संस्थानचे पंचांस शिव्या देऊन पर्वती पंच हे गैरशिस्त कामें करितात वगैरे मजकुरानें भाषण केल्याबद्दलचा खटला आहे.

आतां या पर्वती पंचांस शिव्या देण्याचें कारण काय हें बरोबर समजत नाहीं, परंतु चौकशींत काय निष्पन्न होईल तें कळेल; कारण, या कामांत पंच मतरणा करितात असें श्रीमंत रावसाहेब नातु यांचे लेखावरून कळतें.

---

हें पत्र ज्ञानप्रकाश छापखान्यांत कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांनीं छापिलें.

# ज्ञान प्रकाश

गुरुवार तारिख २३ सतंबर सन्न १८५८ इसवी.

## ज्ञानप्रकाश ता. २३ सतंबर सं. १८५८

**कोटा,**—एथून ता. २रीचें पत्र आलें आहे कीं, येक कुंभार कासीद मांवाचा, याजवळ तात्या टोपे यानें मानसिंग राजा यास पत्र दिलेलें मिळालें तें स्वभाषेंत आहे, त्यास सरकारानें हावटी प्रांतांत भरून कोट्यास कैदी करून पाठविला. या प्रमाणें बंडवाल्यानें दोन बातमीदार कोट्याहून बंडवाल्यांचे छावणींतून आलेले, त्यांस सरकारानें शिक्षा केली. कोट्याचे बदमास लोक बंडाकडेस आहेत असें पाहाण्यांत आलें आहे. दुसरी अशी बातमी आहे कीं, राणाजालरापटण यानें जनरल लारेन्स यांस एक खलिता देण्याकरितां दोन माणसांबरोबर पाठविला. ते जासूद बंडवाल्यांनीं धरून तात्याटोपे यांचे हुकमानें त्या जासूदांचीं नाकें छेदून त्यांस सोडून दिलें. जालरापटण एथील शहरांत नास अद्याप जाला नाहीं. ३०००।४००० कोट्याचे लोक सदरहू गांवचे संरक्षणाकरितां जमले आहेत. बंडवाले हे किल्ला आणि शहर यांमधील रस्ता साफ करण्याकडेस लागले आहेत. इंग्रेज लोकांचे सैन्य जवळ यावें अशी इच्छा ते करीत आहेत. मानसिंगाजवळ ग्वालेरचे कोट्याचे बंडवाले आहेत.

**रेलवे,**—या कंपनीनें आगीचे गाडीचे दुसरे प्रतींत फेरफार करून साहा महिने पर्यंत पाहावा. याचें कारण, कीं हल्लीं पहिल्या प्रतीचा दर दरमैलास दीड आणा प्रमाणें आहे. व दुसऱ्या प्रतीस एक आणा प्रमाणें, व तिसऱ्या प्रतीस पाव आणा प्रमाणें, असे दर ठेविले आहेत. यामुळें उतारू लोक आगगाडीचे तिसऱ्या प्रतींतूनच फार जात येतात. याचें कारण उघडच आहे कीं दुसरी प्रत या कंपनीनें फार चढविलेली आहे, आणि याकरितां ती प्रत गैर उपयोगी प्रमाणें होऊन फायद्यापेक्षां नुकसान होऊं लागलें. हें कमिटीस समजून व सरकारानेंही आपलें लक्ष याकडेस पुरवून हल्लीं दरमैलास दुसरे प्रतीस अर्धा आणा या प्रमाणें दर एक उतारूपासून किंमत घ्यावी, हा ठराव पुढील महिन्यापासून अमलांत सदरहू कंपनी आणणार आहे, असें ऐकतों. मागें दुसऱ्या प्रतीचा दर कमी होता, परंतु कें जर दृष्टीनें हा दर वाढला गेला आहे. हा त्या रेलवे कंपनीनें दुरुस्त केला पाहिजे, हें जरूर आहे. दरमैलास अर्धा आणा या प्रमाणें दर चालू जाला म्हणजे पुण्यापासून मुंबई पर्यंत दुसऱ्या प्रतीस तीन रुपये नऊ आणे एका उतारूस द्यावे लागतील. येणें करून उतारूही जाजती त्या प्रतींतून जाऊं लागतील, आणि कंपनीस किफायतही होईल.

नेकनामदार गवरनर साहेब यांची स्वारी गले सोमवारीं मुंबईस गेली आहे, ती परत आजच दापोडीस यावयाची आहे.

**नाटककार,**—येत्या शुक्रवारीं म्ह॰ ता. रोजीं निवडक भाग करणार, त्यांत अहीमहीतील देवळाची शिनरी, भरत भेट, पारिजातक हे तीन भाग करून, पाहाण्यासारखा एक फार्स करणार आहे.

इनामकमिटी,— हाल्लीं या कमिटी बाबद विलायतेस कमिटी बसून तेथें चौकशी होत आहे. त्या कमेटींत जानबार्डिन साहेब, विलबी साहेब, सरअर्स्कीन पेरीसाहेब, व दुसरे मोठमोठे जुने या देशचे सरकारी कामगार साहेब लोक यांच्या साक्षी जाल्या आहेत. यांवरून दिसतें कीं, ही इनामकमिटी या मुलखाचे लोकांस मुळींच नसावी असें वाटतें. त्याप्रमाणेंच या देशाचे माहितगार, कामकाजांत वाकबगार अशा साहेबलोकांचे अभिप्राय आहेत. कित्येक साहेबलोकांच्या अशा साक्षी पडल्या आहेत कीं, सालगुदस्तां कर्नाटकप्रांतीं दंगे उठण्यास कारण इनामकमिटी होय. हा विचार कसा असेल तो असो. ते साहेब लोकच जाणत असतील, पण ही इनामकमिटी बहुतेक या देशचे लोकांस नावडती आहे. हें त्यांच्या रात्रंदिवस भाषणावरून व त्यांच्या इच्छेवरून पुष्कळांस कळून येत आहे. आतांही इनामकमिटी सरकारचे कित्येक चतुर व हितेच्छु कामगारांनीं इंग्रजसरकारास आवडती करून दाखविली आहे. पण या आवडीपासून सरकारची मोठी किफायत होईल असें वाटत नाहीं. उलटी रयतेची राज्यकर्त्यावरची प्रेमभक्ति, व पूर्णविश्वास हीं कमी होत जातात. थोर असतात ते थोड्याशा नफ्यानें पुष्कळांची अप्रीति होत आहे, तर ते थोड्या नफ्यावर पाणी सोडित असतात. परंतु या आपल्या कंपनीसरकारचे अमलांत अलिकडे लोभानें फार व्यापलें यामुळें तिनें आपला दीलदारीपणा, दयालुपणा यांस वर्जिलें. येणेंकरून तिचे रयतेस पूर्वीप्रमाणें संतोषानें या कंपनीचे राज्यकाराची तारिफ करण्याविशीं मिळेनाशी जाहिला नाहीं. अशी इंग्रेजी राजा आणि हिंदू प्रजा यांमध्यें अप्रीति उत्पन्न होण्याला कारणीभूत जी इनामकमिटी ती मोडून टाकण्याविशीं विलायतसरकाराकडून हुकूम या देशास येऊन लागला आहे तो लवकरच अमलांत येऊन ही इनामकमिटी बंद होईल असें भाकित पुणेंआबझरवरकर्त्यानें आपल्या गेल्या वर्तमानपत्राचे अंकांत केलें आहे. आम्हांस वाटतें कीं, त्रोण ज्यापेक्षां मृत्तिकेवर पडलें आहे. त्यापेक्षां कांहीं तरी मृत्तिका ग्रहण करीलच, तद्वत् या इनामकमिटीबाबद ज्यापेक्षां वादविवाद आतां सुरू जाले आहेत, त्यापेक्षां कांहीं तरी फेरफार या कमिटीचा होईल.

---

लखनौ,— एथून ता. ७ सप्तंबरचें पत्र बंबेग्याझिटांत आहे, त्यांतील मजकूर कीं, कानपुरापासून सात कोसांवर गंगेच्या पैलतीरावर कंथाचा ठाकुर उमरावसिंग, आणि पुर्व्यांचा ठाकुर कलहाप्रसाद हे उभयतां अद्यापपर्यंत शिकंदर म्हणून एक गांव आहे तेथें या दोन सरदारांची फौज तळ देऊन राहिली आहे. तिची संख्या १००० लोक आणि ४ तोफा आहेत. आणि उन्हाउची छावणी त्यांच्यापासून ५ कोसांवर आहे, तीवर हल्ला करणार अशी जरब त्या सरदारांनीं घातली आहे. आतां त्या छावणींत म्हणाल तर, १५० लोक आहेत, परंतु पहा, इतकी जरी थोडीशी फौज आमची आहे तथापि शत्रुकडील या मोठ्या फौजेचा आम्हांवर चाल करून येण्याचा मनसोबा मात्र नेहमीं [illegible] असतो.

बेगम ही जरी जातीनें उद्योग करीत नाहीं तथापि तिनें आपली फौज बाहेर रवाना केली आहे. त्या फौजेची स्थिति कोणत्या प्रकारची

आहे हें समजणें जरूर आहे. बौंडी म्हणून एक किल्ला घागरानदीचे उजवेकिनाऱ्यावर आहे त्या किल्ल्यापासून लखनौचे बाजूस येणें जालें तर त्या फौजेस "घागरा आणि चौका या दोन्ही नद्या उतरल्या पाहिजेत. कदाचित् असें घडलेंच तर या लोकांची छावणी लखनौपासून १७ कोसांवर ईशान्येकडेस होईल. येणेंकरून त्या बेगमचे लष्करावर छापा पाडावयाची मुष्कील होईल, आणि त्या लोकांस तेथून बाहेर जाण्यास अडथळे व्हावयाची संधी नाहीं. अशा जाग्यांत ते लष्कर राहील तर त्यास पाहिजे तिकडेस जाण्यास अटकाव व्हावयाचे नाहींत. अशी ती जागा आहे.

बेगमहिनें हरदत्तसिंग म्हणजे नबाबगंजचे लढाईंतील आमचा जवामर्द शत्रु, राजा गुरुबक्षसिंग रामनगरचा राजा, राजा जुटसिंग चांदाचा राजा; या सरदारांचे हुकमतींत ७००० लोक आणि ४ तोफा देऊन रवानगी केली आहे, आणि असा हुकूम दिला आहे कीं, जर या सरदारांस साधेल तर त्यांनीं ता० ३ ससंबर रोजीं सदरील लिहिलेल्या दोन नद्या उतरून जाऊन नबाबगंजबाराबंकी येथील आमचे छावणीवर हल्ला करण्याचे हेतानें त्या फौजेनें रूरतगंज येथें तर छावणी केली आहे. या सदरील फौजेवर हरदत्तसिंग यास मुख्य नेमावा तर तो एकवेळ लढाईंतून पळून गेला सबब त्याजकडेस हें काम मुख्यानें सोंपविणें बरोबर नाहीं, असें वाटून बेगमेनें राजागुरुबक्षसिंग यास अमीरूलउमराव नेमिलें आहे.

या लोकांची पार्लमेंटसभा भरत असते. तींत मर्जीस येईल त्याप्रमाणें ठराव होतात परंतु त्यांच्याजवळ जेव्हां पैसा नाहीं तेव्हां धान्याची वगैरे कमताईच, यामुळें त्यांच्या गोष्टी अशाच्या तशाच राहातात हें स्पष्ट आहे.

थोरले नाझिमखान अल्लीखान हे महमदीचे दक्षिणेस नवरंगाबाद म्हणून एक शहर आहे तेथें छावणी करून आहेत. त्यांजवळ फौज बरीच आहे. त्याविषयीं असें समजतें कीं, आठ हजार स्वार, ४००० शिपाई, ३००० नजीब (लखनौच्या नबाबाचे शिपाई) आणि १५ तोफा याप्रमाणें लष्कर असून त्या सर्वांवरचा मुख्य नायबखान बाहादूरखान म्हणजे बरेलीचा माजी नबाब, ज्याजवळ २००० घोडेस्वार, ३००० नजीब, आणि ११ तोफा इतकी फौज असून हा प्रमुख पिपरीनामक ठाण्यांत आहे. त्याचे अनुषंगानें रूनालिचा राजा आहे. त्याजवळ चार हजार ४००० लोक आणि २० तोफा येणेंप्रमाणें लोक व आपण मिटोली येथील किल्ल्यांत आहे. हा किल्ला महमदीपासून ९ कोसांवर आहे.

सदरीं लिहिलेल्या इतक्याही फौजा आहेत, परंतु आमची पूर्ण दक्षतेची नजर ज्यांजवर आम्हीं ठेवीत आहों त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें.

हरप्रसाद, मौलवी महंमद, गुलाबसिंग, नरपतसिंग, आणि फिरोजशाह.

या सदरील लोकांबरोबर त्यांजपेक्षां कमी पदवीचे लोक मदतगार आहेत, त्यांतील लष्करशाहाजो संदील छावणींत नुकताच होता, तो ही आहे. त्यावरही आमची नजर सदरील प्रमाणेंच आहे.

हे सर्व सरदार एकत्र असून आमचें ठाणें संदीला येथें आहे. त्यावर हल्ला करूं पाहातात, व ते उद्योगही मोगच करीत आहेत, परंतु जसा दीप मालवावयाचे समयीं एकदांच प्र-

फुल्लित होऊन मोठा उजेड पडून नंतर लागला-च मालवतो, त्याप्रमाणें ही स्थिति दिसत आहे.

रोहिल्यांचा राजा आणि गुलाबसिंग असे बरेवा किल्ल्यांत लढाई करण्याचे तयारींत आहेत. व ते असें म्हणतात कीं, आम्हांस इंग्रेजलोकांशीं लढाई करण्यास इतकीच [illegible] आहे कीं, सर्व किल्ल्यांतून फौज ठेवावी, इंग्रेजांबरोबर मैदानांत सामना करून जय मिळेल ही आशा नाहीं. या करितां किल्ल्यांतून फौजा ठेविल्यानें इंग्रेजांस हिवाळ्यांत तसदी देऊन उन्हाळ्या पर्यंत लढाई देतां येईल.

अहो! हें बोलणें जबाबाचे वेळेस ठीक होतें, परंतु राजे सरकालीन क्यांबेल साहेब हिंदुस्थानचे कमांडर इन् चीफ यांचे वेळेस हें सिद्धीस जावयाचें नाहीं.

अयोध्येच्या दक्षिणभागांत वेणीमाधवसिंग हे काय करीत आहेत याविषयीं फारसें समजुतींत आलें नाहीं; परंतु हें उघड आहे कीं, या भागांतील मुख्य फौज जगदीशपूर येथें महेदी हुसेन यांचे हाताखालीं आहे. वेणीमाधवसिंग यांणीं या सदरील सरदारांची मोकळीक करून तो आपल्या जुन्या छावणीकडेस गेला, आणि त्यानें आपले स्वकीय दोस्त यांस आपणास अनुकूल होण्याविषयीं विनंती करून; आपला किल्ला हा दोवटील आश्रयाची जागा असें समजत आहे. परंतु त्याचे मित्र या समयीं त्यास सोडून जात आहेत, इतर जमेदारलोक हे एकामागून एक असे आह्मांकडेस येत आहेत. आम्हांकडेस सुलतानपूर आहे. यांत संशय बिलकुल नाहीं, परंतु जवळचे कितीएक किल्ले, धुडिया खेर [illegible] व काकोकर, आणि मनापगड असे प्रयागचे बाजूस आहेत ते अद्यापपर्यंत आमच्या हातीं येणें आहेत.

नाना हे चरदाकिल्ल्यावर आहेत. त्यांजवळ १००० स्वार, ३००० पायाळ, आणि ५ तोफा याप्रमाणें आहे. त्यांचे बंधु बाळासाहेब हे मोहेगईं (बोंडीपासून कमारें अजमासें १० कोसांवर) येथें असून त्यांजवळ पुष्कळ फौज असून तोफा १० आहेत.

नानासाहेब, बाळासाहेब, व बेगम हे सर्व आपलें जवाहीर विकून पैसा करावा म्हणून यत्न करीत आहेत, परंतु सावकार लोक तें जवाहीर खरेदी करण्यास धजत नाहींत. कारण, जर करितां हें जवाहीर खरेदी केलें, तर आपणाजवळ पैसा आहे असें समजून आपण लुटले जाऊं अशी भीति सावकार लोक मनांत बाळगून ते जवाहीर खरिदी करीत नाहींत या प्रमाणें सदरील पत्रांत मजकूर लिहिला आहे.

---

आग्रा येथील बाजारांत अशी गप्प उठली होती कीं, नाना हे आपणाबरोबर ३०००० तीस हजार स्वार घेऊन ग्वालेरीहून येत आहे. परंतु ही गप्प मूर्खपणाची होय.

---

नानांचें जवाहीर जें सरकारास मिळालें आहे तें कलकत्याचे जामदारखान्यांत ठेवण्याकरितां लवकरच रवाना होणार आहे. बंम्या.

---

ग्वालेरचे महाराजांचे बेकवायती घोडेस्वारांचीं पलटणें हीं कांहीं ग्वालेरीस राहून बाकीचीं झांशीस जाण्याविषयीं सरकारचा हुकूम जाला आहे.

---

हें पत्र ज्ञानप्रकाशांत कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांणीं छा०

वर्ष १०

# ज्ञानप्रकाश

सोमवार तारिख २७ माहे सप्तंबर सन्न १८५८ इ०

## पत्राची किंमत.

१० दरसाल रुपये. ९॥ आगाऊ दिल्यास रु०

### वसूल रु०

९ अज्जम परशराम पांडुरंग मुनसफ कोर्ट विजापूर सन्न १८५८ आक्टोबर अखेर.

३।२।१० पुरुषोत्तम नारायण कारकून तालुके कोळगण सन्न १८५८ डिसेंबर अखेर.

१० अज्जम श्रीपत पांडुरंग मामलेदार तालुके सुलतानपूर सन्न १८५८ जुलई अखेर.

## ज्ञानप्रकाश. तारिख २७ सप्तंबर १८५८

**विलायत,**— एथील डांक २५ वे आगस्ट पर्यंतची मद्रास्रेस २३ वे मिनहूस पोंचली तेथून तारायंत्रांतून खबर २४ वे मिनहूस आली. त्यावरून कळतें कीं, चीनचे बादशाहाबरोबर तह जाल्याचें वर्तमान विलायतेस कळलें. हिंदुस्थानचे राज्यकारभाराकरितां विलायतेस काढलेले कौन्सलांत सर आर. विविआन यांस एक पंच नेमलें आहे. विलायतची राणी अद्यापि जर्मनदेशांतच आहे. आस्त्रिया देशाचे राणीला पुत्रलाभ जाला आहे. आटलांटिक महासागरांतून तारायंत्र बांधून आणण्याचें काम निर्वाध चाललें आहे. फ्रान्स देशाचे पारिस नामें राजधानींत असी बातमी पसरली आहे कीं, विलायत आणि फ्रान्स या दोन्ही देशांची चीन देशाबरोबर तहाची कलमबंदी जाली आहे, त्यापेक्षां रशियादेशानें आपली तहाची कलमबंदी अधिचांगली करून घेतली आहे रशिया देशाचे बादशाहानें चीन देशांतील आमूर नदीचे मुखाजवळ एक नामी व उपयोगीं बंदर देखील वसविलें.

---

जलंदर एथें ८७ वे रायल ऐरिश फ्युझिलियर्स पलटणींत पटकीची साथ उठून त्या रोगानें १८ गोरे शिपाई, १ मडम, आणि चार मुलें मरण पावलीं असें टेलिग्राफावरून समजतें.

---

पुणें,— एथें गेल्या आठवड्यांत पर्जन्य अ[illegible]डला नाहीं. अभ्रें वगैरे केव्हां केव्हां येता[illegible]गर्मी गेल्या दोन तीन दिवसांपासून होऊं लागली आहे, त्यापेक्षां हस्तनक्षत्र पडेल असें वाटतें. एथील सडकांची मरामत गुदस्तांप्रमाणेंच होत आहे. पर्जन्यही सडकेचीं कामें करणारे यांचे इच्छेनुरूप पडत नाहीं. यामुळें खडी कोठें कोठें पडलेली आहे तीच दबून बसत नाहीं. एथून कपिलाषष्ठीचें फळ साधण्याकरितां सर्व हिंदूजातीचे लोकांपैकीं पुष्कळ लोक वाई, नाशिक मुंबई, आळंदी, तुळापूर, खेड वगैरे क्षेत्रीं स्नानार्थ गेले आहेत.— एथचे सेशन जड्ज्यानें रामचंद्र बाबाजी खिस्ती फिर्यादी, व ३ मोजणीदार केदी, या मोकद्दम्याचा निकाल गेल्या शुक्रवारीं केला. फिर्यादी हा शपथ घेईना सबब सदर फौजदारी अदालतीचे एका निवडक मोकद्दम्यांत साफ लिहिलें आहे कीं, फिर्यादीनें मोकद्दमा चालविण्यापूर्वीं शपथ घेतली नाहीं तर तो कज्जा सोडून द्यावा. त्याप्रमाणें केदी मजकूर खुले झाले. हा मोकद्दमा हुजूर डिपुटीकडे फिर्यादीनें शपथ न घेतां चालून सेशन कमिट झाला.

---

चीन;— एथील आली कडील खबर आली आहे, तिजवरून कळतें कीं, तेथील बादशाहा आणि इंग्रेज सरकार यांच्या मध्यें तहनामा ५६ कलमांचा तयार जाला आहे. तो चीनचे बादशाहानें कबूल केला आहे. तो तहनामा वाचून पाहातां चीनच्या बादशाहानें आपल्यास फारच बांधून घेतें आहे. मागील तहनामा याच बादशाहाबरोबर याच सरकारचा झाला आहे. त्याशीं हल्लींच्या तहाशीं तुलना करून पाहातां चीन देशात इंग्रेजांचें वर्चस्व अधिक होऊन चीन देशाचें गौण्य इंग्रेजसरकारापुढें आतां फार सें राहील असें दिसत नाहीं. असो इंग्रेज सरकारची फत्ते ऐकून आम्हांस बहुत संतोष होत आहे.

---

कलकत्याचे सरकारी ग्याझेटांत सन्न १८५७–१८५८ इसवीचे सरकारी सालाचे अखेरीचा हिसाब सरकारानें पाहातां हिंदुस्थानांतील इंग्रेज सरकारचे सर्व खजान्यांतली ता. ३० माहे एप्रिल सन्न १८५८ इसवी अखेरीस शिल्लक एकंदर १३५५,८८,५६७ रुपये होती असें सिद्ध केलें आहे.

---

फैजाबाद एथील दिवाणी अंमलदारानें आलाहाबादेच्या कमिशनरास १३ वे सप्टेंबर चे रोजीं असा रिपोर्ट केला आहे कीं, राजा मानसिंग याणें आपले बरोबर १५०० लोक आणि २ तोफा घेऊन सुलतानपूरचे बंडवाले यांज्या कडेस जात आहेत, त्यांस अडथळा करण्यास जाण्याचें कबूल केलें आहे. बंडवाल्यांची फौज फत्तेपूर व बहिरामें घाट येथें अद्यापि आहे. आणि ते फैजाबादच्या रस्त्यावर धुमाळी करावयाचें अवसान दाखवितात.

---

फ्रान्स देशांतील तोफखान्यावरील एका सेनापतीनें एखाद्या ठिकाणीं बंदुकीची पुष्कळ दारू सांठविली असतां आग लागून तिचा भडका होऊं नये, अशी एक युक्ति काढली आहे ती येणें प्रमाणें.— खणीज कोळशाची भुकटी करून दारूशीं मिश्र करावी, म्हणजे तिला आग लागली असतां भडका होऊन उडून जात नाहीं, परंतु राळ किंवा डामर या प्रमाणें जळती; आणि जेव्हां उपयोगासाठीं लागेल तेव्हां चाळणीनें चाळलें म्हणजे दारू वेगळी होती. एका दारूखान्यांत या तजविजीनें दारू ठेवली होती त्याला एकदां आग लागली आणि दारू थोडेशी पेटून हळू हळू जळत आहे इतक्यांत शिपायांनीं विझवून टाकली.

नामदार राणीसाहेब यांची स्वारी गेल्या महिन्यांत फ्रान्स देशांत गेली होती तेव्हां तिला मान देण्याकरितां जी तोफांची सरबती झाली त्यासाठीं पन्नास हजार रुपयांची दारू खपली. इतकें द्रव्य एखाद्या स्तुत्य कामाकडे खर्चलें असतें तर किती चांगलें जालें असतें. ग्या. द.

---

सिंद प्रांतामध्यें रस्ते व तसींच दुसरीं कांहीं लोकोपयोगी कामें करण्याकरितां फंड जमा करण्यासाठीं तेथील लोकांवर कांहीं कर बसविण्याचा अखत्यार सिंदचा चीफ कमिशनर यास मिळण्याविशींचा एक कायदा तयार होत आहे.

---

कपिलाषष्ठी,—"हा एक योग ज्योतिष्यांनीं गणितें करून बसविला आहे. गणितविद्येंत अशा प्रकारचीं उदाहरणें मनोरंजक व नियमांची पुष्कळ आढळतात. आतां त्यांवर कोणी धर्मबुद्धीनें श्रद्धा ठेवितात असें नाहीं. याचें कारण उघडच आहे कीं, त्याविषयीं कोणीं प्राचीन ग्रंथकारानें धर्माचें फलमिश्रित लेख लिहून ठेविले नाहींत. कदाचित् ठेविले असल्यास ते लोकांचे ऐकण्यांत आले नसतील. आपल्या देशांतील हरएक विद्यांत व कलांत धर्माचें मिश्रण नाहीं अशी विद्या किंवा कला एकही सांपडावयाची नाहीं. धर्ममिश्रित केला असतां दानाधिकारी यांचें हित त्यापासून घडतें. ज्योतिषविद्येपैकीं गणितविद्या ही चोख, व पूर्ण आहे, परंतु त्या विद्येपासून एकादा विशेष नियम किंवा तत्संबंधी उदाहरण केलें असतां तें धर्मांत प्रविष्ट करणें हें दानाधिकारी लोकांचें कौशल्य असावें असें वाटतें. आतां ज्यापेक्षां लोकपरंपरा बहुत कालांपासून चालत आली आहे, व धर्मावर विचार केल्यावांचून लोकांची श्रद्धा बसलेली आहे त्यापेक्षां हा कपिलाषष्ठीचा योग एक अपूर्व धर्मांतला असें मानितील याचें आश्चर्य नाहीं.

आपले मागले ज्ञानप्रकाशांत गणितावरून हा योग १५ घटिकपर्यंत आहे. आणि पंचांगांत २२ घटिकांनंतर योग येत आहे, तर लोकांनीं पंचांगांतील पर्वकाळ खोटा आहे तो सोडून खरा गणितानें आलेला वरचा पर्वकाळ हा धारण करावा, तर लोक त्याविषयीं विचार करीत नाहींत. तर या खोट्या पर्वकाळावर भरंवसा अज्ञानपणानें लोक ठेवून दान सें करणार तें त्यांस काय श्रेयस्कर होणार आहे बरें? मझा उद्देश लिहिण्याचा हाच आहे कीं, या लोकांस विचार करण्याची इच्छा नाहीं बरें कित्येक ज्ञाते म्हणवितात, तर ते लोभ दर्शाच्या योगें विचार करण्यास प्रवृत्त होत नाहीं. तेव्हां जर धर्माचा परिपाठ लोकांचा आहे तर खरा धर्म लोक समजून त्या प्रमाणें वागत नाहींत असें म्हणण्यास काय चिंता आहे बरें? आणि अशा अज्ञानपणें धर्म घडला तर तो काय श्रेयस्कर होणार आहे बरें? यास्तव धर्माचे कामांत अंधपरंपरा सोडून विचार आपले लोकांनीं अवश्य केला पाहिजे. आमी लोकांनीं विचार करावा, ही गोष्ट तर खरी आहे, परंतु या सर्व लोकांतील ज्योतिःशास्त्रवेत्ते जे आहेत त्यांणीं या कपिला षष्ठीविषयीं अवश्य विचार करावा. तर तेच आपल्या डोळ्यावर कातडें ओढून स्वस्थ राहातात आणि आपल्या आळसानें इतर लोकांस मात्र बोल लावतात. पहा, या शहरांतील मोठमोठे संभावित गृहस्थ यांणीं या ज्योतिःशास्त्रवेत्त्यांस आणून त्यांकरवीं गणित करवून त्यांचे कुशी गोष्ट त्यांचे पदरांत घालावी, तें कांहींच न करितां त्यांच्या सांगण्यावर भरंवसा ठेवून स्वस्थ राहातात, तर ही मोठे आश्चर्याची गोष्ट आहे! ज्या ज्योतिषवेत्त्यानें प्रातःकाळापासून साडेपंधरा घटिकापर्यंतच कपिलाषष्ठीचा योग आहे असें वर्तविलें, तो या ज्योतिःशास्त्राविषयीं निपुण आहे, परंतु हे दुसरे प्रतिष्ठित ज्योतिषवेत्ते कांहींच त्याविषयीं विचार न करितां पंचांगाप्रमाणें पर्वकाळ खरा म्हणून सांगतात. आणि सर्व लोक त्यांच्या वचनावर भरंवसा ठेवतात, तस्मात् "गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः" ही गोष्ट खरी आहे."

एक विचारी दैवज्ञ.

**सातारा;—** एथील इनामकमिटीकडील कमारें ३० कारकून कमी केले आहेत. सातारचे माजी महाराज उभयबंधु गादीवर होते तेव्हां त्यांस इनामें, वर्षासनें, वगैरे देण्याचा अखत्यार आहे किंवा कसें या विषयीं थोडीं वर्षें इनामकमिटीकडील अधिकारी, व दुसरे सरकारचे अधिकारी, आणि वरिष्ठ सरकार यांचे मध्यें पत्रोपत्रं वादविवाद चालला होता. त्याचा अखेर निकाल नामदार कोर्ट आफ् डिरेकटर्स यांहीं केला कीं, सातारचे उभय महाराजांस इनामें, वर्षासनें, वगैरे देणग्या देण्याचा अधिकार मागील राजे रजवाडे यांचे प्रमाणें आहे, असें ऐकतों. जर ही गोष्ट खरी असेल तर सातारचे माजी महाराजांनीं ज्यांस, सदरील देणग्या दिल्या असतील त्या त्यांजकडे चालण्याची आशा उत्पन्न जाली आहे. हें वर्तमान ह्या लोकांस व इतर हिंदुजनांस आनंद करील याकरितां लिहिलें आहे. एथील इनामकमिटीचे अधिकारी यांस असा हुकूम येऊन लागलेला ऐकतों कीं, वरिष्ठ अंमलदारांचे हुकुमावांचून इतउत्तर कैफयती घेऊं नये. हाच सर्वत्र इनामकमिटीचे अंमलदारांस हुकूम आला असावा असें वाटतें.

---

**पोंच;—** आम्हांस कोल्हापूरचे कर्ते कडून कोल्हापूर संस्थानच्या नकाशाची एक प्रत येऊन पोंचली आहे. याबद्दल त्यांचे आम्ही फार आभारी आहों. हा नकाशा दोन हात लांब, व दीड हात रुंद समारें आहे. त्याची मत्तुसती घेणारास १ रुपया, कापड मागून लावलेली घेणारास दीड रुपये, आणि कागदाला लावून रंग दिलेली घेतल्यास दोन रुपये पडतात. या नकाशांत त्या संस्थानांतील पुष्कळ गांवांचीं नांवें घातलेलीं आहेत. नकाशा रूबक, वसवाच्य आहे. त्या नकाशाविषयीं मनापासून काढणारानें श्रम केले आहेत, यांत संशय नाहीं. हा नकाशा लोकांनीं घेण्यासारिखा आहे.

---

बेळगांवचे डिस्त्रिक्ट डिपुटीकमिशानर मुत्तुकुमार मुदलियार इस्कोयर यांची नेमणूक एकदम बेळगांवचे फौजदारीचे कामावरून जाली. त्याचें कारण इतकेंच कीं, बेळगांवास गेल्या वहिमी दंग्याचे कामांत त्यांणीं नौकरी चांगली बजावली, हा पुरुष ख्रिस्ती धर्मानुयायी झालेला आहे. व त्याची हुशारी त्या विशेष प्रसंगीं दिसून आली असें कित्येक इंग्रेजी वर्तमानपत्रांवरूनें कळलें. हाली तोच कामगार डिस्त्रिक्टडिपुटीचे जागेस लायक नाहीं. त्यास तिसरे प्रतीचे मामलेदारीची जागा द्यावी आणि ती जागा धारवाडचे डिस्त्रिक्टडिपुटी रावबाहादुर विठ्ठलराव नारायण यांस द्यावी. याचें कारण कीं, धारवाडचे मेहेरबान कलेकटर साहेब यांचा अभिप्राय कीं, या जिल्ह्यास डिस्त्रिक्ट डिपुटी पाहिजे असें नाहीं. ही सर्व व्यवस्था मेहेरबान रिविन्यु कमिशानर साहेब यांचे विचारें ठरली आहे. असें आमच्या ऐकण्यांत आलें आहे.

---

मेहेरबान लफनन साहेब जड्ज्य यांची स्वारी एथें येऊन त्यांणीं एथील जड्ज्याचें व एजंटीचें काम चालविण्याची शपथ अदालतींत गेल्या गुरुवारीं असिस्टंट व जाइंट जड्ज्य साहेब यांचे समक्ष घेतली आणि काम पाहूं लागले आहेत.

२७ वे सप्तेंबरच्या टेलिग्राफ पत्रांत अयोध्या प्रांतांतील राजकीय व्यवस्थेविषयीं मजकूर लिहिला आहे. त्यावरून तिकडील व्यवस्था चांगल्या प्रकारें आहे असें नाहीं. त्या प्रांतांत हत्यारबंद बंडखोरांच्या टोळ्यांच्या टोळ्या पसरल्या आहेत. आणि बंडखोरांचे नामांकित मुख्य पुढाऱ्यांपैकीं बहुतेक पुढारी रांडुगेपणानें त्या भूमिकेवर फिरतात. नानासाहेब आणि बाळाराव हे मनुष्यांची भरती करण्याचें आणि घोडे पैदा करण्याचे कामांत अगदीं गढून गेले आहेत. त्यांच्या फौजांची कवायत नित्य सकाळीं होत असते. आणि त्यांवर जातीनें नाना देखरेख ठेवितात. असें आहे तरी मर्जीनुरूप गोष्ट समजण्यांत येते कीं, या सदरील बंडखोरांबरोबर, तेथच्या बेगमच्या बेबनाव होण्याचीं चिन्हें होऊं लागलीं आहेत. असें जालें तर त्या कलहाचा परिणाम उघडपणें निकरावर येईल. असो. अयोध्या व त्याचे सन्निधप्रांतांत बंडवाल्यांची फौज आहे तिचा अजमास केला आहे तो येणेप्रमाणे.

| हुकूम करणारे | ठिकाण. | लोकसंख्या | तोफा. |
|---|---|---|---|
| नानासाहेबांची फौज. | चंद्रपत | १०,००० | समजल्या नाहींत. |
| बेगमची | बोनरिया | ८,००० | ७ |
| मनरूरवान | बेदौली | ७०० | ३ |
| रामसिंगकुलनीदार | बेरामघाट | समजली नाहीं. | समजल्या नाहींत. |
| नाजुपलहुसेन. | सदरहू | ४,००० | ४ |
| सुलतानहुसेन बहादूर | हैदरगड | ४,००० | ५ |
| महासाहेबअली | ——— | ७,००० | ६ |
| ——— | कुका | १,५०० | १ |
| आबिदखान | रूनगंग | २,००० | २ |
| युसफखान | मेहंदपूर | ४,००० | ६ |
| नूरकासिंग, | ——— | २,००० | ३ |
| मौलवी महंमद | ——— | २,००० | ——— |
| ——— | आसिमगड | ४,००० | ——— |
| महंमदहुसेन | बंगावान | १३,००० | १२ |
| गोंध्याचा राजा | लुमती | ६,००० | ७ |
| | | ६८,२०० | ५६ |

या सदरील यादीवरून आपणास समजून येत आहे कीं, फक्त अयोध्याप्रांतांत सरकारचे प्रतिपक्षी बंडखोर लोक ५६ तोफांनिशीं सत्तर हजार हत्यारबंद खास आहेत. यांखेरीज पुष्कळ पुढारी बंडखोर आपले ताब्यांतील लोकांनिशीं व तोफांनिशीं आहेत, परंतु त्यांच्या लोकांची संख्या अमुक अशी माहिती न मिळाल्या कारणानें त्यांची गांवनिशी या सदरील यादींत लिहिली नाहीं. आतां लार्ड क्लैव यांणीं जर लवकर लढाईची सुरवात करण्याची तजवीज केली नाहीं, तर हाली सन्न १८५८ इसवीमध्यें जो प्रकार आहे तोच प्रकार सन्न १८५९ इसवी पावेतों राहील. सरकारचीं जीं ठाणीं आहेत, त्यांपासून तोफेच्या एका गोळ्याचे टप्प्यांत नानासाहेब हे आपले सेन्याची कवायत घेतात, तर त्यांची इतकी दुर्बुद्धि कां याचें कारण कांहीं समजत नाहीं. आतां अशी आशा आहे कीं, लार्ड क्लैव यांणीं आजपर्यंत जी कायम तजवीज केली त्याहून जाजती वस्तादीची तरतूद जी कुमक येऊन पोंचल्यावर खेळावयास करणार नाहींत. त्यांणीं असें बरीक करूं नये कीं, जेणेंकरून अमर्याद यत्न करावयाचे पडणार नाहींत, कारण कीं, तेथची फौज बऱ्याच करण्याचे आगीं आहे. आणि तरांव फौजा जागा सोडून त्या चोहोंकडे पसरल्या

आहेत. आणखी सरकारचे फौजेची व्यवस्था साधारणपणें पाहातां पसंत आहे असें नाहीं.

---

**न्याय,**— आमचें सरकार [illegible] न्याय व्हावा म्हणून कितीएक तजविजी [illegible] शोधून काढीत आहे. त्यास उदाहरण [illegible] जिल्ह्यांत मेहेरबान डेविस साहेब [illegible] काळ पर्यंत कलेकटर होते. त्यांणीं [illegible] तील मामलेदार अज्जम जेठालाल यास [illegible] वरून अमानत केलें. त्याची चौकशी केली नाहीं. चौ-वटीं हें प्रकरण सरकारचे पुढें आल्यावर, त्याजवर दोष नाहीं आणि सदरहू मामलेदार यास एकंदर ६९० दिवस अमानत [illegible] झाले, हें पाहून त्यास आश्चर्य वाटून [illegible] मामलेदारास [illegible] बसवून ठेविलें हें गैरवाजवी आहे, असें ठरवून त्यास त्याचे जागेवर नेमण्यास उत्तरभाग रिविन्यु मारफत हुकूम केला, याविषयीं आम्हीं मागें लिहून कळविलें होतें. त्या मामलेदारास त्याची पहिली जागा [illegible] मिळाली नाहींच परंतु दुसरे जाग्यावर नेमणुक जाली आहे त्यांचे पगारापैकी १७०० रुपये मेहेरबान डेविस साहेब यांणीं सदरहू मामलेदारास देऊन त्यांची पावती सरकारास पाठवावी, असा ठराव करून साहेब [illegible] सूफ यांस हा ठराव कळविला आणि हें [illegible] दिवसांत जालें पाहिजे असें ही लिहून कळविलें परंतु तीही मुदत तमाम पुरी जाली असावी. अद्यापि ठरावाबरहुकूम पैसा मिळाला नाहीं. असें आम्हांस वाटतें.

वरिष्ठ सरकारी अधिकारी जर आपले वरिष्ठ सरकारचे अधिकाऱ्यांचा हुकूम वेळच्या वेळीं बजाविण्यास अनमान करितात, तर कनिष्ठ अंमलदार व रयत यांस कामगार लोकांचे निष्कपट अंतःकरणाविषयीं खात्री होऊन त्यांचे अंतःकरणांत कोणत्या प्रकारची सरकारी हुकुमाची बजनदारी राहावी बरें? सरकार हुकुमास वरिष्ठ अंमलदारांनीं वेळच्या वेळीं मान्य करून आपण हुकुमास फार अदबीनें मानतों, असा किंवा लौकिकरीतीनें तरी यालून दाखविला पाहिजे.

---

सर जमशेटजी जिजीभाई बारोनेट यांणीं उपयोगी कामाकडे आजवर आपले द्रव्याचा व्यय केला, त्यांत मुख्य विहिरी, तलाव, पूल, धर्मशाळा, शाळा, दवाखाने, पारशी ज्ञातींतील लोकांस अन्नवस्त्र सतत मिळावें याकरितां वगैरे कडे खर्च केला, येथील पारशी लोकांचे आग्यारीस ४५००० रुपये आणि नदीचे पाण्याचा नळ बांधून छावणींत आणिला त्याजकडेस १८०२७० खर्च केले. या सर्व कामाकडेस मिळून एकंदर खर्च रुपये २२१९८१० या परोपकारी पुरुषानें खर्च केले. याशिवाय निरंतरः खर्च करितात त्याची बेरीज या खर्चा बरोबरीज आहे. याबद्दल विलायतेस एक नूतनच इतिहास यांचा प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून समजत आहे. याशिवाय मोठी रकम बारोनेटसीचा किताब आपले कुटुंबांतील ज्यांजकडेस चालेल त्यास उत्पन्नाकरितां या गृहस्थांनीं पंचवीस लक्ष रुपये सरकारांत व्याजानें देऊन त्यांचें व्याज त्यास मिळावें अशी तजवीज करून ठेविली आहे.

---

येथील पुष्कळ लोक श्रीवाई, व श्रीक्षेत्र नाशिक येथें क[illegible]पष्ठी करितां गेले आहेत.

## रत्नागिरी.

बाणकोटे येथें लक्ष्मणबावणाजी, लांजे येथें दामोदर बापुजी, सांवर्डे येथें नारायण बल्लाळजी, गुहागर येथें वासुदेव लक्ष्मण, चिपळूण येथें विष्णु पांडुरंग, वाघोटण येथें विष्णु सखाराम, वेंगुर्ले येथें रावजी शिवाजी, यांस फौजदार नेमून त्याप्रमाणें आपआपल्या नवीन जाग्यांवर जाण्याविषयीं पोलिस सुपरिंटेंडेंट साहेबांचे हुकूम गेले. रत्नागिरी येथें रामचंद्र सदाशिव, व राजापूर येथें महादाजी मोरेश्वर यांस फौजदार नेमिलें आहे.

धारवाड जिल्ह्यांत कोंकणाप्रमाणें विहिरींतील पाणी वर काढावयाचे राहाट नाहींत, यास्तव तसे राहाट तेथें सुरू करण्यासाठीं नमुन्यादाखल एक राहाट तेथील अधिकारी साहेबांनीं इकडून मागितला होता, त्याप्रमाणें एथील तुरुंगांत असिस्टंट जड्ज्य साहेबांनीं करविला आहे. तो लवकरच वेंगुर्ल्याच्या मार्गें धारवाडास रवाना होईल.

कलेक्टर, असिस्टंट कलेक्टर, वगैरे यांस लोकोपयोगी कृत्याकरितां नियमित रकमा सरकारचे मंजुरीवांचून खर्च करण्याचा अधिकार पूर्वीं असून, अलिकडे तो अधिकार महकूब झाला होता. हल्लीं पूर्ववत् अधिकाराप्रमाणें प्रजेच्या कल्याणाकडे खर्च करीत जाण्याचा हुकूम सरकारानें फरमाविला आहे. ज. मि.

---

पंजाबांतील डेरा इस्मायलखान एथील पोलिसांवरील सुपरिंटेंडेंट कप्तान स्मिथ यांस एका शिपायानें ठार मारण्याकरितां आपली तरवार उपसली, परंतु दैवयोगें ती त्याच्या अंगावर पडण्याच्या पूर्वींच त्याच्या हातींस पडली, म्हणून त्याचा प्राण वांचला. सदर्हू शिपायानें तरवार उपसण्याचें कारण कीं, त्यास बडतर्फी मिळणार आणि त्याकरितां साहेबानें बोलाविलें. असें समजल्यावरून त्यानें आसाहेबांचे बंगल्यांत जाऊन साहेबांचे मागें उभा राहून खां... आपली तरवार त्यानें तुन उपसली. ती साहेबांनीं पाहिली. पुढें त्या शिपायास पकडून कैदी केला. नंतर त्यास फांशीं दिलें, असें दिल्लीग्याझेट पत्रावरून कळतें.

---

## मुक्काम लष्कर नजीक ग्वालेर ज्ञानप्रकाश कर्तेयांस.

१ येथें तीन दिवसांपूर्वीं श्रीमंत महाराज जयाजीराव यांची राणीसाहेब प्रसूत होऊन कन्यारत्न झालें. प्रहर दीड प्रहर पर्यंत बंदुकांचे अवाज होत होते. राणीसाहेब यांस यात्रसंगीं बहुतकरून पुत्ररत्न व्हावें असें वाटत होतें. कारण नऊ महिने पूर्ण होऊन गेले होते. व बाईजाबाई साहेब यांचाही हेतु दानधर्म करण्याचा होता. परंतु सर्व एकीकडेसच राहिलीं. महाराज साहेब यांस या आगोधरची ही एक कन्या आहे. तेव्हां अतां दोन कन्या झाल्या.

१ महाराज साहेब यांजकडेस तसेच बाईसाहेब यांजकडे महान् महान् ज्योतिषी विद्वान् आहेत, व ते असें म्हणतात कीं, आम्ही पाहिजेत सूर्यास खालीं उतरूं, व चंद्रास पौर्णिमेचे दिवशीं उदय होण्याचें मना करूं. अशा सामर्थ्याची वल्गना करणारे पंडितांनीं या वेळीं बाईसाहेब म्हणजे राणीसाहेब यांस पुत्र होईल यांत संशय नाहीं, म्हणून सिद्धांत लिहून दिल्हामुळें त्याप्रमाणें घडून आल्यास गांव जहागीर लावून देण्याकरितां तयारी झाली

होती. ज्योतिषांनी प्रसूतकाळ [illegible] जावा म्हणून वाड्यांत जवळ [illegible] तीन मणाचें ताब्याचें गंगाळ, [illegible] व पाहाण्यास ब्राम्हण याप्रमाणें [illegible] दिवस अगोधर घातला होता, [illegible] होणेंजाणें भगवंताचे हातीं राहिलें [illegible] हातीं गंगाळ, कोणास घटिकेचीवाटी, [illegible] आली. या ज्योतिषी मंडळीनें येवढा [illegible] म करून दिल्हा होता. त्यांस बाळ [illegible] जाहागीरदार यांचीतर सीमाच आहे. [illegible] कोणा पूर्वजानें कधीं कांहीं राजास [illegible] गांव मिळविला आहे. तेवढ्या आद्यते [illegible] आ- चरणास भास्कराचार्यांचा गुरु म्हणवितो. [illegible] आतां सर्व ज्योतिष्यांचीं तोंडें उत[illegible] आम्ही असें ऐकतों की, एक नामांकित जोशी [illegible] ला कीं, कन्या होईल म्हणून आम्ही [illegible] आपले दप्तरांत पूर्वींच ३० दिवस ठेविली होती मग तसेंच जालें ना ?

सारांश, सुख किंवा वैभव हीं आपले पुण्याईवर व ईश्वरीसूत्रावर प्राप्त होतात. ज्योतिष्यांचे पानाड्यावर होत नाहीं. हें सर्व लोकांनीं पूर्ण लक्ष्यांत ठेवावें.

आमचा गणु म्हणतोकीं, लष्करांतील द[illegible]रोबस्त जोतिषी मंडळी एकत्र करून एका दावणींत बांधून त्यांचे पाठीवर पोथ्यांच्या [illegible] घालून सारे लष्कर भर फिरवावी आणि [illegible] रो- वर एकानें असें सांगत जावें कीं, हे फल[illegible] जोशी यांजवळ इतकीं पुस्तकें आहेत. [illegible] आतलें कांहीं नाहीं ! ! धिक्कार असो अशा यो[illegible] तिष्यांस. ॥ साहित्य संगीत कलाविहीनः साक्षात् पशुः पुच्छविषाणहीनः ; तृणंनखा-दंनपि जीवमानः , तद्भागधेयं परमं पशूनां ॥

ज्ञानप्रकाशकर्ते महाराज, या आमचे लष्करी ज्योतिष्यांकरितां तुम्हांस लिहिण्याची थोडी मेहनत होईल. क्षमा असावी, ही विनंती. मिती भाद्रपद शुद्ध ५ रविवार.

आपला मित्र वाड्यांतीलतगसर्गार

---

तारायंत्रद्वारें इंदुराहून ता. १७ वी मिनहूची खबर सररावर्ट हामिल्टन साहेब यांणीं पाठविली आहे, तिजवरून समजतें कीं, ब्रिगेडियर म्याकडफ याणें बंडवाल्यांवर खूब मारा करून शेंदोनशें लोक मारले, आणि २१ असामी कैदी केले आहेत. अशी खबर ता. १८ सप्तंबरास आलेली ता. २२ चे आबझरवराधारें कळत आहे.

---

आक्ट, — सन्न १८५८ इसवीचा ३० वा आक्ट ज्यारी जालेला आहे, तो कर्नाटकचे मयत नबाबाचे इस्टेटीची व्यवस्था करण्याविषीं व त्याचें आपले कारकिर्दींत व त्याचे अज्ञानपणीं त्याचे मुखत्यारांनें जें कर्ज केलें असेल त्यापैकीं ज्या सावकाराचें देणें राहिलें असेल, त्यांणीं खरेपणानें येणें शाबीद केलें असतां त्यास दरसाल दरशेंकडा साडे रुपये व्याजाचे करारानें इस्तकबील रुपये कंपनी सरकार देईल याविषींचा आक्ट आहे. ही चौकशी व तजवीज मद्रास इलाख्यांतून होणार आहे.

आक्ट ३१ वा, बंगाल्यांतील कलकत्याचे जमीनदार यांणीं जमिनी बाबद सरकार धारा द्यावयाचा त्याबाबद अंदेशा येऊं नये म्हणून ज्यास्ती स्पष्टपणें समजण्याकरितां ज्यारी झालेला आहे.

आक्ट ३२ वा, तंजावर किंवा [illegible] चंदावर असें म्हणतात. तें संस्थान व तेथचा किल्ला खालसा केला आहे. त्यास तें संस्थान कंपनीसरकारानें राज्याशीं जोडून मद्रास इलाख्यांत ठेवून तेथील [illegible] व्यवस्था करणें कारें ठेवावी याविषीं ठरून तो ज्यारी जालेला आहे.

---

हें पत्र ज्ञानप्रकाश [illegible] कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांणीं छापून दे[illegible]

# ज्ञानप्रकाश

गुरुवार तारिख ३० माहे सप्तंबर सन्न १८५८ इ.


## ज्ञानप्रकाश तारिख ३० सप्तंबर सं. १८५८

फिनिक्सनामें वर्तमानपत्रांत लिहिलें आहे कीं, लाहोर एथील शिपायांनीं नुकताच मुलतानचे शिपायांनीं केलेला कित्ता उचलला आहे, व कित्येकांचे प्राणही या प्रकरणांत गेले आहेत. अशी खबर कलकत्यास येऊन पोंचली आहे.

---

१५ वे मिनहूस जनराल मिचल याची व बंडवाल्यांची राजगड येथें सकाळीं गांठ पडली, ते बावऱ्याकडे जात होते. हल्ल्याची सुरवात झाली, आणि कांहीं वेळ कच्चाकच्ची झाल्यावर बंडवाल्यांनीं प्रथमतः दोन तोफा सोडून दिल्या, पुढें ते लढतच होते तेव्हां त्यांच्या एकामागून एक तोफ हस्तगत जाली. आणि एक वाजल्याचे सुमारास ते सर्व धूम पळत सुटले. त्यांणीं आपलीं हत्यारें पात्यारें टाकून मोडक्या तोडक्या गाड्या व अस्ताव्यस्त झालेलें सामान घेऊन रस्त्यानें भटकत चालते जाले. बंडवाल्यांस पुष्कळ इजा पोंचून ते पराजित झाले. ते लोक उत्तरेच्या बाजूस पळाले. त्या वाटेवर कप्तान मेयनी याची गांठ पडेल, त्या बरोबर दोनशें तलवारबाहादर आहेत. तो त्यां लोकांमिशीं बावऱ्याचे उत्तरेस १५ कोशांवर अमरगड मुक्कामीं होता. जनराल मिचल सांजकडील नाश किंचित् झाला. [illegible] घोडे स्वारांनीं मर्दुमकी केली. लेफ्टेनंट शाभाने उन्हाचा झटका लागून इजा पावला आहे. जनराल मिचल यांणीं सोळावे ६ मिनहूस पोंचून मुकाम केला. त्या बंडखोरांनीं आग्र्याचा रस्ता टाकला नव्हता, बावराही लुटलें नव्हतें. नमचची फौज तेथें पोंचली नव्हती, स्वार नवते यामुळें त्यांस पळणें जरूर झालें.

---

**मृत्यु**;—गेल्या मंगळवारीं सकाळीं एथील शूद्रांच्या चार बायका, व एक मूल, एथील जमसेटजीचे धरणावरून नदी वाहात असतां, त्यावरून चालत गेल्यामुळें पाय घसरून धरणाचे खालीं पडल्या. पैकीं जलदी होऊन एक मुल व एक बाई मात्र जिवंत निघाली. या बाया गांवांतून कपिलाषष्ठी करितां नवलच्या वाटेनें आळंदीस जाण्याकरितां गेल्या होत्या असें कळतें.

---

इंग्लिशम्यान कर्त्याचे समजण्यात आलें आहे कीं, कलकत्याजवळच्या हुगळी एथील तुरुंगांतील कैदींनी बाहेर जाण्याकरितां तेथचा दरवाजा फोडीत असतां त्यांचा तो बेत समजुतीस येऊन त्या कैदींस तेथचे शिपाई व पोलिसचे बरकंदाज यांणीं अटकाव केला. या प्रसंगीं त्या कैदीं पैकीं आठ दाहा जबर जखमी झाले आहेत.

---

अनंतराव चंद्रोबा सब असिस्टंट सर्जन यांस सरकारानें मुंबई राजधानींतील देवी काढण्याचे सर्व कारखान्यावर सुपरिंटेंडेंट नेमिलें आहे. अशा विद्वान् नेटिव डाक्तराची योजना सरकारानें योग्यरीतीची केली, हें ऐकून आम्हांस संतोष होतो.

रेलवे,— एथील रेलवेच्या स्टेशनपाशीं दररोज जाणारे उतारू लोकांस टिकिटें घेण्याचे वेळीं इजा फारच होते. गरीब बिचारे हिंदू व त्यांच्या स्त्रियांस पैसा देऊन इजा भोगावी लागते. याचें वास्तविक कष्ट हिंदू व इतरजन यांस दुःख वाटल्या वांचून राहाणार नाहीं. युरोपियन व त्यांच्या स्त्रिया यांची संख्या प्रायः या गाडींतून जाणारी येणारी थोडकी असते. हिंदू वगैरे लोकांची संख्या फार असते, परंतु रेलवे कंपनीला पैशाचें अगत्य विशेष. तेवढें तिचें कसे प्रकारें तरी साधलें म्हणून थोरपणा, दया माणुसकी, तिनें धारण करणें नये असें कांहीं नाहीं. हिंदु लोकांसाठीं एक लहानसा दरवाजा ठेविला आहे. आणि तो गाडी सुटण्याचे पूर्वी सुमारें १५ मिनिटें खुला करितात. तेथें एक पोलिसचा कृष्णवेशी ठेवून तो आपले खुषीनें सोडितो. हालके नेटिवांस जी कांहीं सत्ता मिळते ती तो कोणत्या प्रकारें चालवितो याविशीं सांगायास नको. लोक समजतातच. असो ही अव्यवस्था जर दूर होईल, तर आह्मांवर व हिंदुजनांवर फार उपकार होतील. आतां एथून डिकसाळें म्हणून सोलापूर मार्गें गांव आहे, तेथपर्यंत आगीची गाडी उद्यांपासून सुरू होणार आहे. परंतु उतारू व माल घेण्यास नोवेंबरचे पहिले तारखेपासून होईल. तेव्हां गरीब बिचारे हिंदु उतारू हाल्लीं पेक्षां जाजती जमतील. आणि हाल्लीं त्यांची शुश्रूषा होत आहे अशीच वहिवाट चालेल. तर बिचारे हिंदु प्रायः पैसे देऊन लहानसहान जखमाही नित्य मिळवितील. याचें आह्मांस मोठें भय पडलें आहे. पैसा मिळेल. परंतु अब्रू मिळणें फार मुष्कील आहे. एकदां पत घालविणें हें नुकसानीस कारण होत असतें. यास्तव रेलवेकंपनी विचार करील तर फार बरें आहे.

---

एथचे कसब्यांतील श्रीगणपतीचे देवळांतील संगमरवरी गणपतीची मूर्ति, एका काळूराम नांवाच्यानें चोरून ती लष्करांत नेऊन विकीत होता. तेव्हां त्यास पकडून चौकशी होऊन त्या अधमा अपराध्यास साहा महिने सक्तमजुरीची शिक्षा एथील कनीव माजिस्त्रेट हागसाहेब यांणें दिली. गेल्या बुधवारीं एका तपेलीचे मालकीप्रकरणीं दोघे दावा सांगणारे इनसाफ मिळावा, म्हणून पोलिस कचेरींत गेले, तेथें फौजदार यांणीं साक्षी पुरावा उभयपक्षकारांस विचारतां एकानें पुरावा कांहीं नाहीं म्हणून सांगून, दुसऱ्यानेंही तपेली माझी असी ओळखणारा एक आंधळा साक्षीदार आहे, असें सांगितलें, त्यावरून त्या आंधळ्यास हजर करून त्याचे हातांत ती तपेली देतांच ती त्या मालकाची म्हणून सांगितलें. नंतर त्या तपेली सारख्या सात आठ तपेल्या आणवून त्यांत ती पहिली तपेली मिसळून देऊन त्यास उमगून काढण्यास सांगितलें. तेव्हां त्या आंधळ्यानें सर्व तपेल्या हातांत घेऊन तोलून, व त्यांवरून हात फिरवून पाहिलें व वाजवून पाहिलें. आणि ती या मालकाची तपेलीच काढून दिली. यावरून फौजदारानें त्या मालकास तपेली दिली. या दोन्ही कज्जांत पहिला हिंदु मनुष्य असून एथील कसब्यांतलें गणपतीचें मोठें स्थान असून तेथचे मूर्तीवर दरोडा घातला. तेव्हां त्या मनुष्याची धर्मावर श्रद्धा किती आहे, हें कळून येतें. याप्रमाणेंच येथें मागें देवळांतल्या घंटा वगैरे जिनसा चोरल्या

गेल्या, असे प्रकार गांवोगांव होतात, तेव्हां धर्मावर श्रद्धा ठेवणारे या देशांत पुष्कळ आहेत यांत संशय नाहीं. दुसरे कज्जावरून अंध किती ज्ञाणक्ष असतात आणि चक्षुरेंद्रिय गत जालें असतां इतर इंद्रियें अधिक जागृत व शक्तिमान् होतात हें आपणास कळून येतें.

---

आलाहाबादेपासून कानपुरापर्यंत आगीच्या गाडीचा रस्ता १० मिनहूपासून सुरू जाला आहे. १५वे मिनहूस मोठा समारंभ होऊन त्या प्रसंगीं लेडी क्यानिंग ही मुख्यस्थानीं असेल. या आगीच्या गाडीचा वेग दरतासास वीस कोसांचा ठेविला आहे. तेव्हां ५ अवरांत मधील स्टेशनावर थांबून गाडी मुकामाला जाऊन व येऊन पोंचते. या प्रमाणेंच आग्रा व कानपूर यांमध्यें बैलांची व घोड्यांची डांक सुरू झाली आहे. असें आग्रा मुफसिलैट पत्रावरून कळून येत आहे.

---

लष्करीखातें.— हिंदुस्थानचे सरकारचे हुकुमावरून नेकनामदार गवरनर इन्कोंसल असा हुकूम फर्मावितात कीं, गोरे सोजीर शिपायांस बिछान्याबद्दल दरसाल ४ रुपये देण्याचा कायदा होता तो बंद करून सोजीर व त्यांच्या बायका यांस प्रत्येकीं एक गादी चार शेर कापसाची, दोन सरपोस, एक सत्रंजी, आणि एक उत्तम बुरनूस या जिनसा मिळतील. एक मूल झाल्याबरोबर त्यास दरसाल १ गादी, १ सरपोस, दोन वर्षांनीं बुरनूस आणि २ वर्षांनीं सत्रंजी, या प्रमाणें बिछाना मिळत जाईल. १५ वे काळे पायदळांतील कलर हवालदार विष्णु पाध्ये कर्नाक मेल्यावरून ७ मिनहूपासून जमादार केला आहे.

काळे पलटणीचे शिपायांत नवीन भरतीचे शिपायांस पूर्वीं त्यांणीं आपले संख्याचा पोशाक सत्वर बनवावा म्हणून हुकूम होता, परंतु आतां सरकारानें दरएक पलटणींतील दरशिपायांस दरसाल जान्युआरीचे १ले तारखेस पोशाक मिळतील आणि ती गत मसला तो शिपाई पलटणींतून दूर झाला किंवा मरण पावला तरी ती त्याची असें समजावें.

---

कृत्यकृत्य.— ठाणें जिल्ह्यांतील सवनुकसी कुलाबा एथील उंदेरी तालुक्यांत एक आवास म्हणून गांव आहे, तेथें आवे ठणाचें तळें आहे, त्या तळ्याबद्दल प्रतबंदीवरून सदरहू गांवातील राहणारा दादो बापुजी म्हस्कर याणें सदरील तळ्याबद्दल मेहेरबान टावनर साहेब यांजकडे तें तळें मोडून मी त्यांत भातशेती जमीन पाडीन, व त्याबद्दल जो आकार सरकार ठरवील तो मी दरसाल देत जाईन असा अर्ज केला होता. त्यावरून त्यांणीं तें तळें मोजून ठेविलें होतें. पुढें ज्यावेळेस जमाबंदीकरितां सालमजकुरीं मेहेरबान कसान फान्सीस साहेब सुपरिंटेंडेंट रिविन्युसरवे यांची गेली होती त्यावेळेस सदरहू तळ्याबद्दल गांवकरी यांणीं तळें न मोडण्याविशीं अर्ज केल्यावरून साहेब मजकूर यांणीं चौकशी करून अर्जदार म्हस्कर यास तळें न देतां तसेंच गांवकऱ्यांकरितां ठेवण्याविशीं हुकूम केला. आतां आह्मांस लिहिण्यास मोठा संतोष वाटतो कीं, सदरहू तळें दोन गांवांचे मध्यें असून रस्त्यावर आहे, आणि तेथें दोन गांवचीं गुरें पाणी ही पितात. व त्यातल्या पाण्यानें खालील भातशेती जमीन पिकते. तें तळें दस्त्यास तें जमीन केवळ चारण्यांत

मरून जाण्यासारखी आहे. तर तें तळें ठेवल्याच्या योगानें खालील जमिनीचा बचाव होऊन गुरांस व मनुष्यांस पाण्याचा मोठा उपयोग होत आहे. कदाचित् तळें मोडल्याच्या योगानें सरकारास कांहीं नफा झाला असता, परंतु त्याखालील जमीन मरून सरकारचें त्या नफ्यापेक्षां मोठें नुकसान झालें असतें, त्यास तळें काईम ठेवल्यामुळें सरकारचें नुकसान न होऊन, लोकांस मोठा उपयोग होईल. असें आसाहेबांनीं ध्यानांत आणून तें तळें काईम ठेविलें, हें त्यांनीं स्तुत्य केलें आहे. असें आम्हांस कळत आहे.

---

बेळगांवचे दक्षिणी इरेग्युलर स्वारांस तेथून निजामाचे राज्याचे हद्दीवर रवाना केलें आहे. याचें कारण असें बकतात कीं, तात्या टोपे त्यांत उतरले असतां त्यांस प्रतिबंध यांणीं करावा. हा मजकूर टेलिग्राफवरून कळला; परंतु त्याविशींची कांहीं बातमी तेथें उठली. यांत संशय नाहीं.

---

फिनिक्स नामें कलकत्याचे इंग्रेजी पत्रावरून सर्व पत्रकारांनीं उतारा घेतला आहे कीं, कंपनी सरकारचा अंमल हिंदुस्थानचा जाणार आहे, आणि राणीसरकारच्या अमलाची सुरवात होणार आहे. या थोडक्यांत राणीसरकाराकडून उत्तरहिंदुस्थानचे सर्व बंडखोरांस माफी मिळून त्यांस पूर्ववत् स्वगृहीं राहाण्याची राजाज्ञा होईल. आणि अयोध्येचा मुलुख पुनरपि त्याचे नवाबास मिळेल. या खबरीस आधार काय असेल तो कांहीं दाखविला नाहीं. विचारानें वाटतें कीं, सदरील वर्तमानांत दोन गोष्टी पैकीं पहिली लिहिलेली गोष्ट कदाचित् नूतन सरकाराकडून घडून येईल; परंतु खालची गोष्ट घडून येण्याचा संभव कमी असें अनुमानावरून दृष्टोत्पत्तीस येतें.

---

कलकत्यास दारूकाम उत्तम करणारे यांचे मदत्याचे दरदाम सरकार विचारीत आहे, त्यावरून तेथचे पत्रकर्ते म्हणतात कीं, कंपनीचें राज्य जाऊन राणीचे अमलांत आलें, त्या प्रीत्यर्थ दारू सोडायाचा बेत असेलसें वाटतें. तेथील फुईकोटाचे तटावरून १०० मिन्युटें तोफा सुटतील, व शिपाई लोकांची कवाईत होईल, असें दिसतें. राणीसरकारचा अंमल झाल्याबद्दल त्याचा दांडोरा करण्याविशीं हुकूम येऊन लागला आहे, परंतु तो ज्यारी करण्याचा अधिकार गवरनर जनरालचे हातांत ठेविला आहे.

हिंदुस्थानांतून सिलोन म्हणजे लंकाद्वीप, तेथें कोळी गेल्या आठ महिन्यांत ऐशीं हजार गेले व तेथून अडतीस हजार परत आले. हल्लीं बेचाळीस हजार कोळी तेथें धंद्याकरितां झाले आहेत.

कलकत्याचे सरकारी गाझिटांत हिंदुस्थानसरकारानें एक हुकूम मेहेरबान होऊन फर्माविला आहे कीं, कंपनीसरकारच्या पलटणींतून ज्या पलटणी पर्शिया म्हणजे इराण एथें स्वारी लढाईच्या वेळीं गेल्या होत्या, त्यांणीं आपल्या पट्ट्यावर "पर्शिया" हा शब्द लिहावा, आणि त्यांपैकीं ज्या पलटणी रिशेर व खुसाब एथच्या लढाईवर गेल्या होत्या त्यांणीं वरील शब्दांपुढें सदरहू शब्द जोडून लिहावे.

इंग्लिशम्याननामें कलकत्याचे पत्रावरून कळतें कीं, तेथें विलायतेहून कमारें पांच कोटीचें रुप्याचें व दोन लक्षांचें ताम्याचें अशीं नाणीं येऊन दाखल झालीं. त्यावरून पुढें खजीन्यांत तंगाई पडायाची नाहींसें दिसतें.

---

हें पत्र ज्ञानप्रकाशाकरितां कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांचे छापखान्यांत छापिलें.

# ज्ञानप्रकाश

सोमवार तारीख ४ आकटोबर सन्न १८५८ इसवी.

पत्राची किंमत.

१० दरसाल रुपये. १॥ आगाऊ दिल्यास.


## ज्ञानप्रकाश ता. ४ आकटोबर सं. १८५८

गेल्या परवांचे आबझरवरांत बातमी लिहिली
आहे कीं, बाला येथील वरगोमसिंग यानें ७००० लोक
आणि ४ तोफा इतकी तयारी करून तो यमुनेच्या
पैलतीरीं प्रदेशांत दंगा करूं लागला आहे. व जाल-
न वगैरे शहरांवर हल्ला करीत आहे. त्यानें कित्ये-
क गांव जाळले आहेत, असें नेटिव लोकांचे सांग-
ण्यावरून समजतें. सुमारें १००० हजार बदमा-
शी एक टोळी जींत २०० शिपाई, जमीदार व
दुसरे बागीलोक असून ज्यांस घोडे आहेत ना-
हींत! हत्यारें सोडगीं, तलवारी, भाले, व दुसरीं
सर्व प्रकारचीं शस्त्रें आहेत. ती टोळी काल्पीपा-
सून चुरकी म्हणून साहासात कोशांवर ठाणें धा-
हे तेथें आहे. प्रयत झांशीचे राणीचा कारभारी का-
शीनाथ म्हणून आहे, त्याजपाशीं कांहीं लोक अ-
सून तो सिरकारी राजाचा भाऊ देसपठ यांचे स-
मागमें आहे. ह्यानें या राजाचे विरुद्ध बंड केलें हो-
तें. त्याचे जवळ १२०० लोक आहेत. शिप्रकोटा-
चे नारायणराव आणि माधवराव, यांचे विरुद्ध
करिंधा याणें बंड केलें, तो आतां इंग्रेजसरकार-
ास गलिम झाला आहे, त्याजपाशीं सुमारें ७०००
लोक आहेत, परंतु तोफा नाहींत. नानासाहेबाचा
आश्रित लालगोसाले, याजपाशीं सुमारें ८०० लो-
क असून तो बांधाचे आणि बहाराचे दरम्यानचे
मुलखांत बंडावी करीत आहे, त्याला रूपसिंग
बहाऱ्याचा राजा प्रसिद्ध बदमाश आहे तो मिळाला
आहे. याप्रमाणें यमुनेचे पैलतीरीं या बंडखोरां-
नीं लुटालूट चालविली आहे, आणि पाहिजे तसा
उपद्रव करून तो प्रदेश अव्यवस्थित त्यांणीं करू-
न टाकिला आहे. नरपर येथील राजा भीवर ला
बंडवाल्यांची त्या प्रांतांत शिकारी साठीं तजवीज रा-
खीत आहे.

---

१२वे सप्टेंबरची खबर लखनौकडील इंग्लिशम्यानप-
त्रावरून कळते कीं, बंडवाल्यांची एक मोठी टोळी गो-
ग्रा नदीचे डावे किनाऱ्यास फैजाबादेचे उजवे बाजू-
स सरकारचे फौजनें अडवून धरली आहे. ति-
ला ती नदी ओलांडूं देत नाहीं. व त्या नदीचे बाहेर
आझिमगडचे फौजेस फिरूं देत नाहीं.

कानपुराकडील १४वे गुदस्तची खबर कीं, आ-
रा, बक्सर, व त्या प्रांतीं इंग्रेजी फौज सुमारें ४०००
हुशार असून तिणें अद्यापि कांहीं करून दाखविलें
नाहीं. उगीच सामान्य युद्ध करून शिण व काळाचा
खर्च ते करितात. गवरनर जनराल हे कानपुरास
आगगाडींतून अमुक रोजीं येणार हें समजत
नाहीं. त्या ठिकाणीं उष्णता फार झाली आहे.

हरकारूपत्रावरून कळतें कीं, महानदीचे कां-
ठीं संबळपूरपरगण्यांतील कित्येक गांवांत दंगा
उठला आहे. त्याचा पुढारी मोहनसिंग नामें एक
जमीदार आहे. त्याजपाशीं २०० हत्यारबंद
लोक असून कांहीं बदमाशी आहेत. तो गांव लुटीत
आहे. त्यावर फौज पाठविली आहे. कर्नल फास्टर
कमिशनर हा संबळपुराहून कलकत्त्यास गेला
आहे.

---

नक्त नेमणुका आदा करण्याविषयीं जे नियम तारिख १९ माहे डिसेंबर सन्न १८५७ इसवीं रोजीं रले होते त्यांत फेरफार करणें अवश्य दिसल्यावरून अंदिगान अल्लीनबाब मुस्ततात हजरत रैट आनराबल गवरनर साहेब बाहादुर दरजुलास कौन्सल यांणीं हिशेबाचे खात्याकडील व हिशेब तपासण्याचे खात्याकडील अंमलदारांनीं व आदा करणारे अंमलदारांनीं, व नक्त नेमणुकी ज्यांस पावत असतील त्यांनीं कसें चालावें, हें त्यांस समजावें, म्हणून खालीं लिहिलेले सुधारलेले नियम प्रसिद्ध केले आहेत.

## कलम १

लोकांच्या किंवा देवस्थानांच्या धर्मादाय नेमणुका, व वंशपरंपरा किंवा ताहांहयात चालवयाचीं सालीना पेनुशनें व इतर सर्व प्रकारच्या नक्त नेमणुका तारि. ३० माहे एप्रील रोजीं संपणारे नगदी सालाबद्दल आदा व्हावयाच्या त्यांची मुदत पुढले मे महिन्याचे पहिले तारिखेस भरते असें समजावें, आणि त्या तारिखेपासून पुढील एप्रील महिन्याचे तिसावे तारिखेपर्यंत त्या चालू सालाचीं देणीं आहेत असें समजावें.

## उदाहरण,

सन्न १८५७।५८ साल भरल्यानंतर ज्या नेमणुकीची मुदत भरते ती सन्न १८५८ चे मे महिन्याचे पहिले तारिखेस आदा करण्याची होती सबब सन्न १८५८।५९ सालांत ती आदा करण्याची असते, आणि सन्न १८५८।५९ साल संपल्यापूर्वी ती मागितल्यास चालते, सालाचे नेमणुके प्रमाणेंच आदा करावी.

## कलम २.

नेमणुकेचा चढलेला ऐवज चालते सालचे ऐवजाखेरीज आणखी एक वर्षाचा भरपूर मिळेल.

## उदाहरण.

सन्न १८५७।५८ सालांत नेमणुकेचा ऐवज आदा व्हावयाचा असून सन्न १८५८।५९ सालापर्यंत तो मागितला नसेल, तर सन्न १८५८।५९ साल संपण्यापूर्वीं तो मागितला असतां भरपूर मिळेल, आणि सन्न १८५९ चे मे महिन्याचे पहिले तारिखेस नेमणुकेचा ऐवज आदा व्हावयाचा तोही मिळेल.

## कलम ३.

नेमणुकेचा ऐवज एका वर्षाहून अधिक मुदतीचा चढलेला असेल तो खालीं लिहिल्याप्रमाणें आदा होईल.

चालते सालचा ऐवज भरपूर.

| | | |
|---|---|---|
| पहिले सालचा चढलेला ऐवज | शेंकडा | १० टक्के काढून |
| तिसरे, | किता | २० किता |
| चौथें, | किता | ३० किता |
| पांचवें, | किता | ४० किता |

एकंदर ६ सालें.

## उदाहरणें.

सन्न १८५२।५३ सालापासून नेमणुकेचा ऐवज चढला असून तो सन्न १८५७।५८ सालीं मागितला असतां खालीं लिहिल्याप्रमाणें आदा होईल.

चालतें साल सन्न १८५७।५८ चा भरपूर.

| | | |
|---|---|---|
| मागील सालें | १८५६।५७ चा | भरपूर. |
| | १८५५।५६ चा | शेंकडा १० टक्के काढून. |
| | १८५४।५५ चा | शेंकडा २० टक्के काढून. |
| | १८५३।५४ चा | ३० किता. |
| | १८५२।५३ चा | ४० किता. |

## कलम ४.

दाहा वर्षांहून अधिक मुदतीपर्यंत नेमणुकीचा ऐवज चढला ती नेमणूक हिशेबांतून काढून टाकून चढलेला सर्व ऐवज सरकार दाखल करावा.

परंतु असें ठरविलें आहे कीं, योग्य अधिकाऱ्यांनीं वंशपरंपरेनें किंवा निरंतर चालण्याचे प्रमाणे

वरून नेमणुक चालत आली असेल आणि वटी ऐवज मिळाले तारिखेपासून १२ वर्षांचे आंत वीविषयीं दावा केला तर चढलेला ऐवज न देतां साहा वर्षांनंतर ती नेमणुक हिशेबांत पुनः दाखल करावी.

कलम ५,

वतनाखेरीज पगार किंवा चाकरीबद्दल ऐवज मिळत असेल तो चालते सालचा व मागील एक सालचा चढलेला मिळेल. दुसरें वर्ष भरून गेल्यानंतर चढलेला सर्व ऐवज हिशेबांतून काढून टाकून सरकारदाखल करावा.

कलम ६,

मळवे रा॥ म्हणजे गरीब वाटसरू लोकांचे पोटगी खर्चाकरितां ऐवज देण्यांत येतो. साल चेसा त्यांत न घेतल्याच आज तागाईत सरकारांत जसा दाखल होत आहे तसा दाखल होत जाईल.

कलम ७.

दिवाणी कोर्टांत किंवा सरकारी अंमलदारांपुढें काम चालल्यामुळें ज्या नेमणुका आदा व्हावयाचा तहकूब असतील त्यांस हे नियम लागू नाहींत, परंतु नेमणुकदारांनीं अर्जनकेल्यामुळें किंवा इतर हयगईमुळें ज्या नेमणुकांचा ऐवज चढला असेल, त्यासमात्र लागू आहेत, असें स्पष्ट समजावें

कलम ८.

चढलेला ऐवज मिळण्याविषयीं कोणते तारिखेस अर्ज केला, ती तारिख चढलेले ऐवजाचे हिशावर ऐवज आदा करणाऱ्या अंमलदारांनीं दाखल केली पाहिजे.

ता० २५ जून सन १८५८ इ० मुकाम जजिरे मुंबई.

बंदिगान अल्लीनबाबमुस्तताब हजरत रैट आनरेबल गवरनर साहेब बहादुर दरइनूलासकौसल यांचे आज्ञेवरून, हेनरी ऱ्यासाहेब बाहादुर चीफ सक्रेटरी सरकार यांची सही.

सातारा,— भाद्रपद वद्य ६— येथील व आसपासची मिळून कपिलाषष्ठीचे पर्वणीस माहुलीस यात्रा सुमारें पंनास हजार जमली होती. माहुली हें क्षेत्र संगमावर वसलेलें आहे. या यात्रेंत फलटणकर निंबाळकर, मृत अपासाहेब छत्रपति यांच्या राण्या, व तसेच आसपासचे मराठे सरदार असून ही यात्रा ६० कोसांवरून आली होती. बहुसमाजानें आपआपले शक्त्यनुसार दानधर्म केला. त्यांत कितीएक गुप्तदानें ही केलीं. त्यांचा अदमास माहुलीकर यांचे सांगण्यावरून वीस हजार रुपयांचा जाला. यात्रेचा बंदोबस्त कोरेगांवच्या आणि सातारच्या मामलेदारांनीं चांगला ठेविला होता, परंतु सातारच्या मामलेदाराकडून हिंदु लोकांखेरीज इतर ज्ञातीचे लोकांस देवळांत नजाण्याविषीं बंदोबस्त नव्हता; यामुळें मुसलमान लोक व ख्रिस्तियन लोक देवळांतून जात येतांना मी पाहिले.— मेहेरबान पिन्हीसाहेब जड्ज्य यांची स्वारी वाव्यांतील कोडतांचें काम तपासण्यास हालीं वाईस गेली आहे. सदई कोडतांत कामाची शिलक फार असल्यामुळें तेथें अज्जम कृष्णाजीविष्णु लिमये, व फडके असे जाइंट मुनसफ नेमिले आहेत. सातारचे इनाम कमिटींतील हंगामी कारकून कमी केले. मेहेरबान कांडफोर्ड साहेब यांनी स्वारी कदमाचे सापयेथें गेली आहे. सब असिस्टंट रिविन्यु सर्वें मेहेरबान गुलउर साहेब यांच्या फिरकींतील कांहीं कारकून व साहेब लोक हे नळदुर्गास वर्ग जाल्यामुळें जाणार आहेत. इकडील इनामी गांवांत ही वहिवाट सरकारचे कायद्याप्रमाणेंच व्हावी परंतु तशी होत नाहीं. असें माझे पाहण्यांत आलें आहे. या बद्दलचें लिहीन. कपिलाषष्ठीचा योग २९ वर्षांमागें आला होता, तेव्हां माहारजांस माहुलींतील ब्राह्मणांनीं सांगितलें कीं आपण बाळसाहेब चिटनिसांस वेदोक्त अग्निहोत्र देऊं नये, त्यावरून ब्राह्मणांस त्यांणीं कैदेंत ठेविलें होते. सबब यात्रा येथें जमली नव्हती.

सोलापूरकर मित्राकडून ज्ञानप्रकाशास[illegible] प्रसंवर

मेहेरबान लाइटसाहेब रत्नागिरीहून ता. ७ सप्तंबररोजीं गलबतांत बसून मुंबईस जाण्याकरितां निघाले, परंतु वारा तोंडचा लागल्यामुळें पुढें गलबत नजातां ता. ११ मिनहूस परत रत्नागिरीस येऊन ता. १२ रोजीं पायमार्गें निघाले ते साताऱ्यावरून ता. २३ रोजीं येथें येऊन दाखल झाले. त्याच दिवशीं चार्ज घेऊन दुसरे दिवशीं प्रतिज्ञा घेऊन काम सुरू केलें.

सिंध इरेग्युलर रिसाल्यापैकीं लेफ्टनंट मोरसाहेब यांचे हाताखालीं १०० स्वार हिपरगी येथें होते, त्यांजला तावडतोब तुळजापूर येथें जाण्याचा हुकूम जाल्यावरून निघून गेले. पुढें कोणते ठिकाणीं जाण्याचें याविषयीं तुळजापूर येथें जाऊन दाखल जाल्यावर हुकूम होणार आहे. लोकवदंता अशी आहे कीं, निजामाचे मुलखांत रोहिले लोकांनीं लूटफार चालविली आहे, त्यांजवर हे लोक पाठविले आहेत.— येथील प्रख्यात डाक्तर राजमान्य राजश्री आत्माराम दादा यांजवर एक हलकेमनुष्यानें ज्याजला आलिकडे च सरकारी नोकरी मजुरीची मिळाली आहे, त्यांणीं अशी फिर्याद केली कीं, मी सरकारी नोकर असून आजारी असतां मशारनिल्हे डाक्तर यांणीं मजकडून पंधरा रुपये घेऊन सरकारी हासपितळांतील औषध मजला दिलें. याविशीं प्रथम मेहेरबान माजिस्त्रेटसाहेब यांणीं चोकशी करून फिर्याद बिनआधारी आहे म्हणून मेहेरबान सिविलसरजन यांस लिहिलें, नंतर शिविलसरजन यांणीं आणखी कांहीं तपास करून त्याचप्रमाणें आपला अभिप्राय सूपरिंटेंडेंट सरजन यांस लिहून पाठविला असें ऐकण्यांत येतें.

---

गेल्या महिन्याचे २१ तारिखेस नाशिकाय मिस्तर रेव, सिविल इंजनियर, याचें लहानमूल एक दाई तेथच्या रस्त्यांमुना हातांवर घेऊन हवेवर फिरत होती. तों एक वेडा व दुष्ट फकीर तेथें होता, त्यानें तें पाहून त्यावर धावून त्यास हिसकतो आहे तों ९२ वे पागरी पलटणचे सोजीर तेथून जात होते, त्यांणीं पाहून त्या फकिरास एकीकडे नेऊन अर्धमेला केला, आणि तें बिचारें अज्ञान अर्भक मृत्यूपासून सोडविलें. तो दुष्ट फकीर तेथच्या इस्पितळांत टाकला आहे. असें मुंबैच्याक्षिटपत्रावरून समजत आहे.

---

एथून सापरमेनरचे कांहीं लोक व सुरतेहून ११ वे रायल तोफखान्याकडील दुसरी कंपनी मुंबईस जाऊन त्या आरबस्थानांतील एडन नामें बंदरीं जाण्याकरितां गेल्या मंगळवारीं आगबोटीवर चढल्या. आणि सापरमेनरची पहिली कंपनी व मुंबईचे १ले तोफखान्याची री कंपनी या एडन एथें आहेत, त्या परत हिंदुस्थानांत येऊन १ली कंपनी पुण्यास राहील आणि तोफखान्याकडील वेंगुर्ल्याकडून बेळगांवास जाईल असें पुणेआबझरवरावरून कळतें.

---

गेल्या हिंदुस्थानच्या बंडाव्यांत छापिल कागद व डांकेची टिकिटें खालीं लिहिलेल्या ठिकाणांहून चोरीस गेलीं आहेत, यांचा आंकडा येणेंप्रमाणें.

| | रुपये. |
|---|---|
| मुझफरनगराहून | २५३८२ |
| सागरपरगण्यांतून | ८६५५१ |
| अलीगडएथून | ६१६६७ |
| एकूण | १७३६०१ |

---

आतां आपल्या हिंदुस्थान देशावर राणी सरकारानें आपली पाखर घातली आहे खरी, परंतु आपल्या देशाची शुश्रुषा सदोदित ठेवणें तें काम न्युइंडियाकौन्सल म्हणजे हिंदुस्थानावरील नवीन कौन्सल करून त्यांच्या हातांत त्या बाईसाहेबांनीं दिलें आहे. आतां यजमानांपेक्षां कारभाऱ्यांशीं आपल्या देशाचा संबंध अधिक झालेला आहे. तेव्हां आतां लोकांनीं कंपनीसरकार, कोर्टआफ्‌डिरेक्टर्स, बोर्डआफ्‌कंट्रोल, वगैरे जीं अगडूभ नामाभिधानें राज्यकारभाराचे संबंधानें माहितींत ठेवावयाचीं होतीं, तें सोडून सदरील न्युइंडियाकौन्सल, हरम्याजेस्टी, कीन्‌विक्टोरिया वगैरे यांचें ठेवावीं. आणखी या नव्या कौन्सलांत कौन्सलदार नेमले आहेत त्यांचीं नांवें अवश्य लोकांनीं केशव नारायण याप्रमाणें पाठांत ठेवलीं पाहिजेत, कारण आतां या लोकांचे शाहाणपणावर व इच्छेवर आपल्या देशाचें हिताहित होणार त्यापेक्षां त्यांनीं नामावलि अवश्य स्मरणांत ठेविली पाहिजे.

विलायतेचे राणीनें नेमलेले.

सर फ्रेड्रिक करी. — सर हेन्री रालिन्सन्. — मिस्तर जे. पी. विलबी. — सर. आर. जे. विडिअन्. — सर. जे. लारेन्स. बारोनेट, जी. सी. बी. — सर. एच्. मांटगोमरी, बारोनेट. — मिस्तर. डब्ल्यू. आर्बथ्‌नाट् पूर्वीचा मद्रासे कडील.

कोर्टआफ्‌डिरेक्टर्स यांणीं नेमलेले.

कप्तान शेफर्ड. — सर जेम्स वेरहाग्. — मिस्तर रास्डानेलि म्यांग्लस् — मिस्तर एच्. टी. प्रिन्सेप्. — मिस्तर एलियट् म्याक्‌नाटन्. — मिस्तर चार्लस मिल्स् — मिस्तर. डब्ल्यू. जे ईस्टविक्.

मदहू गृहस्थांची सभा दरचेवर अगर निदान भरून आपल्या देशाचा राज्यकारभार विलायतेस बसून तेपाहातील. हल्लींचा नवीन फेरफार झाला तो कार मूर्त इतकाच सांगण्यासारिखा आहे. या फेरफार वरून आमचे लोकांस कांहीं जास्ती वाटणार नाहीं. कारणकीं, पहिले कोर्टआफ्‌डिरेक्टर्स व बोर्डआफ्‌कंट्रोल काढून त्या ठिकाणीं नवीन हें बोर्ड केलें आहे. असो. गोरीचा गोरेपणा पुढें करून आल्यावांचून बोलणें उपयोगाचें नाहीं. आपली जान बनियन कंपनी म्हणजे माजी होणार कंपनीसरकार हें पुनः आपली व्यापाराची पथारी घालणार ; दिसतें. या बनियन कंपनीनें १२०००००० बारा कोटींचे भांडवल काढून हिंदुस्थानांत आगीचे गाड्यांचा रस्ता वगैरे बांधावा वगैरे विचारास लागली आहे. असो, असा कांहीं पोटाचा धंदा ती काढील तर फार बरें आहे.

---

काशी मध्यें ज्यावेळेस प्रथमच बंड जालें त्यावेळेस २७ वे पलटणीचे कांहीं शिपाई फार चांगले समजून त्यांस तेथील पोलिसखात्यांत ठेवलें, परंतु आतां असें समजण्यांत आलें आहे कीं, ते गुलाम जाऊन बंडवाल्यांस मिळाले. हृ. सा.

---

**पुणें,** — हस्तनक्षत्र अद्यापि पडलें नाहीं. पडेल अशीं चिन्हें होताहेत. बाजार मंदींत आहे. कपिलाषष्ठीकरितां गेलेली यात्रा येऊं लागली आहे. पेमाषीकडील ११ कारकून कमी केले आहेत. धूमकेतु म्हणजे शेंडें नक्षत्र गेले गुरुवारापासून वायव्येस दिसूं लागलें आहे. गवरनरसाहेबांची स्वारी एथेंच आहे. आगगाडीचे दुसरे कलासचा दर निमे म्हणजे अर्धा आणा दर मैलास १ ले मितहू पासून झाला आहे.

वडगांव कोरेगांवचे जाइंटमुनसफ यांस जुन्नर कोडताचे मदतीस पाठविणार आहेत. व त्यांची परीक्षा सदरेस होईल असें समजतें.

आम्हांस मालेगांवचे बातमीदाराकडून बातमी आली आहे ती जागेच्या संकोच्यामुळें आकुंचित करून येतों. तो वरचेवर लोकोपयोगी बातम्या पाठविण्याविषयीं विनंती करीत आहे. "आमचे माजिस्त्रेट् यांणीं बारीक लक्ष पुरवून गरीब बिचारे हातारवालचे नाकरलोकांच्या बदल्या करण्याचें मनांत आणिलें. आणि त्यांच्या बदल्या होतात तों फस्ट असिस्टंट यांचे शिरस्तेदार सखारामपगणेश यांची बदली झाल्याचें दुःखकर वर्तमान घडून आलें. हे फार योग्य आहेत हें वर्तमान ऐकल्यावरून येथील यवनकोतवाल यांणीं शिरस्तेदारांस रोखलीवातर खान्याची व नाचाची मेजवानी केली, या समारंभास इतर ब्राम्हण, फौजदार, कोर्टाचे वकील, हेडकारकून, गांवचे प्रमुख देशपांडे आदिकरून होते. हिंदू, तशांत ब्राम्हण, तितक्यांत चातुर्मास्य, असें असून यवनगृहीं खाण्याचा विचार झाला. तेव्हां हिंदू धर्माचें विरुद्ध किती आचरण झालें बरें? याच गुरुहोसी मंडळीपैकीं कित्येक परान्नास हिंदू स्वज्ञातींतही जात नाहींत. ते तेथें गेले. असो, ही एक गोष्ट झाली तों दुसरी आत्याचाराची गोष्ट झाली, एथें मैत्रायण्यांस ब्राम्हणांची वस्ती बरीच आहे. स्वज्ञातींत कोणा मयताच्या बाराव्या दिवसास जाण्याचा परिपाठ एथें नाहीं, असें आम्हीं पाहातों, परंतु त्याच द्विजांपैकीं एथें छावणींत अतिशूद्रा एक बाई मरण पावली, तिच्या बाराव्या दिवशीं ५०–६० मंडळी प्रत्यक्ष जेवण्यास न जातां त्या अतिशूद्राच्या गृहीं बर्फी खावयास दोन दोन चार चार रुपये दक्षिणा मिळण्याचे शोभानें गेली. लोकांनीं हें अतिशूद्राचें पर एथें तुम्ही ब्राम्हणांनीं पाय देखील ठेवूं नये असें सांगितलें, परंतु कांहीं ऐकलें नाहीं. हें झाल्यावर लोकांत गवगवा झाला. तेव्हां राजेबाहादर यांचे वाड्यांत सभा होऊन त्यांपैकीं सखाराम गुजीशास्त्री खेरीज करून बाकीच्यांनीं एक मा[illegible]पत्य करावें, असा भिक्षुकी हिताचा शास्त्रार्थ तेथच्या दुसऱ्या पोटार्थी शास्त्र्यांनीं दिला. सखारामशास्त्री गुजरी त्यांस अधिक दंड ठरविण्याचा मानस, परंतु बर्फी खाणारे सर्व एकच तेव्हां गावरच कोण्या लोकांची अवकृपा हें कळत नाहीं. या ब्राम्हणांची अप्रतिष्ठा व तीर्थी मुंडन होईल तर बरें आहे. आपण या कलिविजयी गुरुपांचा व त्यांच्या या अनीती व अधर्म कर्माचा भोकिक करावा. या मंडळींत एक दोन असाम्या पन्नास हजारांची जड बाळगून ही आहेत. हें अनुचित कर्म घडल्यावर श्रीमन्महाराज श्रीशंकराचार्य यांजकडून सदाशिवशास्त्री कामिशनर होऊन या करितां आले आहेत. त्यांचा काय प्रकाश पडतो तो लिहून कळवीन. ता. २० सप्तंबर"

---

**कपिलाषष्ठी.**— आमचे २० वे सप्तंबरच्या ज्ञानप्रकाशांत कपिलाषष्ठीचें पर्वकाळाचें मत पंचांगांत चुकलें आहे, याविषयीं लिहिलें आहे. त्यावर कऱ्हाड येथील एक देशकल्याणेच्छु यांचें २३ वे सप्तंबरचें पत्र आलें आहे, तें उशिरां पोंचलें सबब त्यावर जबाब कपिलाषष्ठीचे पूर्वी देण्यास व त्या देशकल्याणेच्छुस कळविण्यास सोय राहिली नाहीं. असो. आमचा विषय गणितांतील चूक पडली आहे याविषयीं आहे. धर्मसंबंधी चुकीविषयीं आमचा लेख

नाहीं. देशकल्याणेच्छु म्हणतात कीं, तेथील ज्योतिषी मोरजोशी अण्णा यांनीं ग्रहलाघव ग्रंथांतील सूर्यसिद्धांत सदृश गणित करून पाहिलें तों पंचांगांतील कालमानाप्रमाणेंच पर्वकाळ येतो. तेव्हां आमचा १५ ½ घटिकापर्यंत पर्वकाळ आला तो कशावरून? हें कळावें. त्यास आम्हीं याविशीं लिहिलें असतां विस्तार बहुत होईल, परंतु ज्यापेक्षां ते जोशी आहेत, त्यापेक्षां त्यांस आम्ही थोड्यांत कळवितों कीं, ग्रहलाघवांत अयनांश १८ असावे तेथें २२ अयनांश पडले आहेत. ही चूक आहे. आतां ही चूक कशी पडली असेल तें असो. परंतु बाकी सोडून दिल्याचे योगें बहुत काळ झाल्यामुळें ही चूक पडली असावी. असें एक अनुमान होतें. असो. ही चूक कशावरून आहे ह्याविशीं खात्री करून घेणें फार सोपें आहे. रेवती नक्षत्र ५५ घटिका आहे, अशी कल्पना करून दिनमान ३० धरलें आणि त्या रात्रीं मध्यान्हीस चंद्र पाहिला तर, रेवती नक्षत्र आणि चंद्र यांमध्यें चार अंशांचें अंतर दिसून येतें. हें कोणी ज्योतिषी वेध घेऊन पाहील अगर नुसत्या डोळ्यांनीं पाहील, तरी त्याच्या दृष्टोत्पत्तीस ही चूक येईल. तेव्हां ही चूक वजा करून या पर्वकाळाचें कालमान शुद्ध रीतीनें काढलें आहे. या चुकीविशीं एथें गणितवेत्ते ज्योतिषी विचार करिताहेत. व त्यांतून कित्येकांच्या अनुभवास ही चूक आहे असें येऊंही लागलें आहे. आतां धर्माविशीं पुसलें, तर कपिलाषष्ठीविशीं चारी श्रुती, व उपनिषदें, स्मृती, आणि प्राचीन पुराणादि पुस्तकें यांत कोठें उल्लेख नाहीं. व्रतार्क, धर्मसिंधु आदिकरून अर्वाचीन पौरुष ग्रंथ आहेत, त्यांत कपिलाषष्ठीविशीं मात्र वचनें आहेत. कपिलाषष्ठी हा शब्द संस्कृत कोणत्याही कोशांत नाहीं. याचा अर्थ कपिला गाय यादिवशीं दान करावी. असा कपिलाषष्ठी शब्दाचा अर्थ करितात. अशीं व्रतें या पौरुष ग्रंथांत प्रविष्ट आहेत कीं त्यांविशीं श्रुति, स्मृति, यांत नामोच्चारण देखील नाहीं. आतां याचा प्रचार लोकांत कसा झाला असेल त्याविशीं लोभदृष्टीनें अज्ञानजनांची श्रद्धा ज्ञात्यांनीं बसविली असावी. असें आमचें अनुमान होतें.

---

**मृत्यु**,—डिसा येथें एका तळ्यांत एक बाई धूत असतां तिची चटई हातांतून निसटून गेली. तेव्हां एक मुलगा ती काढण्याकरितां आंत गेला. तो वर आला नाहीं म्हणून त्याचा बाप आंत शिरला. तो न येई हें पाहून त्याचा दुसरा मुलगा आंत गेला, त्या सर्वांस मदत करण्यास आणखी दोघे गेले. पैकीं एक निघून बाकीचे चार असामी बुडाले.

---

**ज्ञानप्रकाशकर्त्यांस.** ता. २० सप्टंबर सन १८५८

विनंती विशेष तालुके दिंडोरी येथें आम्ही फिरत फिरत आलों असतां तेथें जमीदार लोकांचे कारकून आहेत, त्यांणीं येऊन आम्हांस समजाविलें कीं, आम्हांस जो आनंद झाला आहे तो तुम्हीं प्रसिद्ध कराल, साजवरून मामलेदार साहेब, तो मजकूर, आमचें गरिबांचें कुटुंबपोषण व्हावें याकरितां मेहेरबान कलेक्टर साहेब बाहादूर जिल्हे नगर यास रिपोर्ट

करून चार महिन्यांचा रुसकाच्या ऐवजा पैकीं आम्हांस देविला ते असामी येणें प्रमाणें.

१ त्र्यंबक गोविंद मुदगल कारकून.—१ भाउराव गोविंद कारकून.—१ लक्ष्मण दामोदर विटोबेकर बागजी विठ्ठल पारखी.—१ यादव रघुपत देशपांडये. १नरहर नथो दाटसां खळ. १ सखाराम मल्हार देशपांडये १ गणेश रामकृष्ण देशपांडे. १ नारो नीलकंठ चिटणीस. १ जगन्नाथ वामनाजी देशपांडे. १ दामोदर खंडेराव सराफ दिंडोरीकर. १ श्रीधर खंडेराव सराफ दिंडोरीकर. १ वामनाजी रामचंद्र शास्त्री आनंदराव आबाजी बाळवेकर १ अमृत राजाराम वकील. १ दामोदर शंकर कुळकरणी. १ त्र्यंबक सखाराम पिंपळजकर:— सदरीं लिहिलेले कारकुनांखेरीज पेटा वणी येथें कारकून असामी १७ यांचे कुटुंबांतील दरएक असामीचीं माणसें ५।६।७ यांजला आजपर्यंत पगार बराबर पावत नव्हता, परंतु मामलेदार यांनीं जमीदार यांचे रुसुमाचे हक्क बंदी अन्वयें पगार ठेवून यांजला पगार मिळून नंतर आम्हांस हिशेब करून देत. त्याजपैकीं कांहीं बाकी ठेवीत, तीही आम्हांस कधीं मिळत नसे. तीही मामलेदार यांणीं आमची सर्व मागील रुजू देविली. अशा परोपकारासारखी दृष्टि दिली ती आम्ही किती वर्णावी. याजकरितां आपले सुंदर पत्रांत जागा मागावी आणि हें वर्तमान प्रसिद्ध करावें. अशी इच्छा धरून आम्हांस सांगितलें. त्यास आपण सज्जन आहां, याजकरितां आपणास विज्ञाप्ति लिहिली आहे, तरि पत्रद्वारें मामलेदार यांचे आभार जाल्याचें प्रसिद्ध करण्यांत यावें. या मामलेदारांचे गुणानुवादांवर एका पुराणिकानें श्लोक केला आहे तो

॥ चित्ते कस्त्व वर्णितो द्विजजनैर्न्यायेन कां पाल्यसे,
॥ त्वद्गेहे वहनं किमस्ति सुभगं धर्मे मतिः कात्र च; दुष्टानां हनने त्रियं किमु भवेत् पूजाविधौ कुत्र स्थितिः, मत्प्रश्नोत्तरमध्यमाक्षरपदं भूयात्तवाशीर्वचः॥१॥ तर या श्लोकाचा अर्थ आपण कृपा करून सांगावा कळावें.

आपला परममित्र सदोदित फिरस्ता.

*** सदरील श्लोक बहिर्लापिकेचा आहे. त्याचा अर्थ. तुझे चित्तांचे ठायीं ब्राम्हणांनीं वर्णिलेला असा कोण आहे? न्यायें करून तूं कोणाचें पालन करतोस? तुझ्या घरीं सुंदर वाहन काय आहे? तुझी बुद्धि धर्माचे ठायीं कशी आहे? तुझ्या हाताचे ठायीं दुष्टांचें हनन करण्याविषयीं काय आहे? पूजाविधीविषयीं तुझी स्थिति कोठें आहे? या प्रश्नांचे उत्तरांतील मधलें अक्षर, तीं एकत्र करून जें वाक्य होईल तो तुला आशीर्वाद असो.— या प्रश्नां बहिर्लापिका अनेक उत्तरी असतात. गणितांत दुटकसमी करणें आहेत, तद्वत् काव्यांतील हें कुट होय. आणि कवीचा इष्टार्थ अमुकच हें सांगणें कठिण आहे, परंतु आम्हीं जे अर्थ बसविले आहेत, ते लिहितों त्यांत जर इष्टार्थ कवीनें आलें असेल तर ठीकच आहे.

| (१) | (२) | (३) |
| --- | --- | --- |
| वासुदेवः | केशवः | सश्रीकः |
| सच्चिंता | नतभीः | अवनिः |
| तुरंगः | श्यामाश्वः | तुरगः |
| कठिनता | अनंता | निष्पापः |
| त्वधनं | राजीवं | भयास्त्वं |
| आसने | भवने | कैलाशे |

सदरील श्लोक संस्कृत भाषेंत रचिलेला आहे खरा, परंतु या श्लोकाची वजनदारी मोठमोठे संस्कृतज्ञ, यांच्या लक्षांत येणार नाहीं. आणखी न्यायेन कां पाल्यसे॥ येथें व्याकरण रीत्या अशुद्ध आहे. पाल्यसे हें क्रियापद मध्यम म्हणजे द्वितीय पुरुषीं होतें, परंतु तें जर लावण्याचा हेतु सदरहू कवीचा असेल तर का अथवा कां म्हणजे कोण असें सर्वनाम लावून वाक्य प्रशस्त होत नाहीं.

॥ शहर पुणें येथें ज्ञानप्रकाश छापखान्यांत छा.

**विलायत,**— एील डांक ता. २ सप्तेंबरपर्यंतची २८वे सप्तेंबर रोजीं दाखल जाली तिजवरून कळतें कीं, नामदार कंपनीसरकारची सभा पूर्वीचे वहिवाटीप्रमाणें भरली होती. तिचे भागीदार अधिकारी यांणीं सरजान लारेन्स पंजाबचे कमिशानर जे नुकतेच विलायतेस गेले. त्यांस सालीना २०,००० वीस हजार रुपये पेनूशान देण्याचा ठराव केला आहे. ही देणगी त्या कंपनीची राज्यकारभाराची अखेरीची असें समजावें. नवीन हिंदुस्थानचे राज्यकारभार चालविणारे मंडळींत, बंगालखात्याचे तोफखान्याकडील कर्नल सरप्राबी काटली, के. सी. बी; मद्रास इलाख्यांतील दिवाणीखात्यांतील सरहेन्रीकानिंगहाम मांटगोमरी, बारोनेट; मिस्तर विलियम आर्बथ्नाट्; आणि सरजान लारेन्स; यांच्या नेमणुकी करून त्या सर्व मंडळीची भरती केली. ह्या नवीन मंडळीची सभा ३रे सप्तेंबर रोजीं भरावयाची होती. लार्ड स्टानूली हे मुख्यस्थानीं बसण्याकरितां लंडनास १ले सप्तेंबरास येऊन दाखल झाले होते. विलायतेचे राणीची स्वारी जर्मनीहून परत स्वदेशास येऊन पोंचली आहे. नेपल्सचे राज्याशीं पुनरपि तहाची कलमबंदी व्हावयाची आहे, अशी वदंता आहे. विलायतेंतील सर्व परगण्यांतून हंगाम चांगला आहे, अशीं वर्तमानें कळतात. राणीसरकारानें लखनौच्या वेढ्याचे समयीं ज्या सैन्यानें कुमक केली होती त्यांस चांद द्यावे म्हणून हुकूम मागें फर्माविला आहे, त्यावर हल्ली सन १८५८ इसवीचे मार्च महिन्याचे २रे तारिखेपासून १६वे तारिखेपर्यंत त्यांचे शहरापुढें लढाईचें काम जें करीत होते त्यांसही चांद देण्याविषयीं खुशीनें आज्ञा केली आहे. ६७वी आणि ९९वी या पलटणी विलायतेस आहेत, त्यांस व ३री, २८वी. आणि ४८वी, यांचे पहिले भाग हल्लीं भूमध्यसमुद्रांत आले आहेत, त्यांस हिंदुस्थानांत जाण्याविशीं हुकूम झाला आहे. विलायतेचा प्रधान लार्ड पालमरस्तन् हा फ्रान्स देशांतील पारिस राजधानींत गेला आहे. तेथें फराशिसांचे बादशाहाशीं त्याची भेट झाली. असें दिसतें कीं, रशियाचा आणि आस्त्रियाचा हे बादशाहा पोलंडांत परस्परें भेटणार आहेत. विलायतेस व्यापाराचे जिनसांपैकीं, चांमड्यांस चांगला भाव आहे. सण, आंबाडी, यांशी बराब खप आहे. जवसांचा खप तेजीने चालला आहे. कारण, जवस मुंबईहून व मिश्रदेशांतील अलेकसांद्रियाहून पुष्कळ गेले आहेत. याखेरीज इतर तेलयुक्त पदार्थांस चागला भाव आहे.

कापसाच्या दरांत चढउतर चिनेमध्यें तह झाल्यामुळें झाला आहे. कापड चोपड वगैरे मालाचाही विक्रा कमजाजती भावानें होत आहे.

---

कलकत्याचे हरकारू नामें पत्रांत लिहिलें आहे कीं, अयोध्येच्या नबाबास तेथून ब्रह्मदेशांतील रंगून नामें शहरांत नेऊन ठेवण्याचा ठराव सरकारानें केला होता असा शहरांत गवगवा झाला होता, परंतु पुढें ती व्यवस्था त्या पस्तुत राजाचे मनास आली नाहीं असें म्हणतात.

---

कलकत्याचे जवळ चंद्रनगर म्हणून एक शहर फ्रेंचसरकारचें आहे, तें शहर फ्रेंचांकडून इंग्रेजसरकारचे ताब्यांत लवकर येणार आहे, असें हरकारू म्हणतो.

---

लैफ्टेनंट कर्नल फार्कर याचे हुकमतींतली १ली बलोचो पलटण १७ सप्तेंबर रोजीं कानपुरास गेली. आवश.

---

तात्या टोपे हा एक आपले देशाच्या राज्य व्य-
वस्थेंत सराट्याप्रमाणें झालेला आहे, असें दि-
सतें. त्यास विश्रांतीनें आणि कष्टानें सोडलें अ-
हे कीं काय? हें कळत नाहीं. किंवा त्याचें शरीर
लोहाचें किंवा कठिण तत्वांचें बनविलें आहे का-
य? ह्याविशीं कळत नाहीं. हा गेल्या बंडांत उद-
यास आल्यापासून याचा पाय धरणीवर एके
ठिकाणीं लागत नाहीं. हा पकपट्या, धाडशी, सा-
हसी, लुटारू, आणि फितुर करणारा आहे. यास
एक नियमित मार्ग म्हणून कांहीं दिसत नाहीं.
आणि यास दंगा करणें, एकदम कोठें जाऊन
पडणें, यांचा मोठा उत्साह वाटतो. ह्याचें ह्या
अशा वृत्तीपासून त्यास किंवा त्याच्या अनुयायी
लोकांस काय नफा होणार तें स्पष्ट करून घेत-
च आहे. हा जिकडे तिकडे पाठीमागें मोठें शेपू-
ट बाळगून भयानक पशूप्रमाणें पलायन व पारध क-
रीत फिरतो. यापासून रयतेस आणि सरकार-
चे शिपायांस दोन दिवस त्रास बरीक आहे.
याच्या या अशा करण्यापासून हालीं ह्या राज्य
व्यवस्थेस थोडासा गुंतामात्र आला, एवढेंच
त्यानें स्वतः सहित करून घेतलें आहे, परंतु
इतरांचा अहितकर्ता मात्र हा झाला आहे, अ-
सें समजणारे ने सनजत आहेत. हा एक वि-
लक्षण पशु या देशांत निपजला आहे. या-
चे शिकारीस व्याध पुष्कळ आणि चांगले आ-
हेत, यांत संशय नाहीं. याणें आपल्या भोंवतीं
सिहोरी एथून व मानसिंगाकडील आलेले
ल्या सुद्धां पन्नास हजार पशूंचा कळप गो-
ळा केलेला आहे. बोंच्याच्या आसमंतात्‌भा-
गें शहाबाराकोशांत कांहीं आश्रम केल्याचा
आव घातला आहे. डांकेस निघेंसें आणलीं आ-
हेत. आग्र्याचा रस्ता रोखला आहे. जवळ

चाळीस पन्नास तोफा बाळगल्या आहेत. द-
क्षिणेंत येण्याचें टोंकावितो असें वाटतें, परंतु
आजपर्यंत केलेल्याचें त्यानें मनांत आणावें,
आणि हे रंगढंग सोडावे हेंच यास योग्य आहे.
हें त्याणें खूब समजावें.

---

नेमणुका. — मिस्तर आपाथिकारी दर्ने यानें
खानदेशांतील भिल्लाचे पलटणीकडील इस्त-
खान्याचा चार्ज असिस्टंट सर्जेन जान्सन् याज-
पासून १५ वे सप्टेंबरला घेतला. — मेजर टी. आर.
स्तुअर्ट शिकारपूरचा कलेक्टर यानें २ महिन्यां-
ची रजा १९ जुलैपासून कराचीस जाण्याकरिता
घेतली आहे. — भडोचचा हुजूर डिपुटी कलेक्टर
आणि माजिस्त्रेट, मिस्तर आर. ए. थाम्सन् यानें
१ महिन्याची रजा घेतली आहे. — नेकनामदार
गवरनर इन् कौन्सल यांणीं २ रे जुलैपासून र-
जपूत संस्थानांतील पोलिटिकल कामावर राणीचे
८ वे हजार्स पलटणीवरील ब्रिगेडियर स्मिथ या-
स कायम केला आहे.

---

इंग्लिशम्यान पत्रकर्त्याच्या ऐकण्यांत आलें आ-
हे कीं, सरकार कमारें ऐशीं लक्ष रुपये आगरा
बहार प्रांतांत आगिणीची वरवरसेची लागवड हो-
ण्याकरितां आणि एकतीस लक्ष रुपये काशी प्रांता-
कडे याच कामाकरितां देणार आहे.

---

शाहाबादेचे बंडवाल्यांवर ९ वे गुदस्त रोजीं
हल्ला कर्नेल वाल्टर यानें आग्र्याचे आग्नेयीस ६ को-
सांवर रामपूर पोवार आहे तेथें करून त्यांस
बेजार केलें. त्यांचे ६० किंवा ७० ठार मारले
प्रायः हजार जखमी केले.

---

येत्या शनवारीं म्हणजे ता. ९ आक्टोबर रोजीं नाटका-
र नाटक करणार आहेत.

---

आम्हांस वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री चौंडभट्टबिन जीवनभट्ट जोशी कसबे रत्नागिरी इलाखा सातारा यांचें पत्र आलेलें पावलें. तें पत्र पाहून आम्हांस संतोष झाला. आमचे आजचे पत्रांत कपिलाषष्ठीचे चुकीविषयीं थोडेसें लिहिलें आहे. या कालमानांच्या चुकीविषयीं हल्लीं येथें विचार चालला आहे. अद्यापि पुस्तक नवीन रचलें गेलें नाहीं. आपण ह्या कालमानांत अंतर पडतें हें वास्तविक रीतीनें लिहिलें. त्या योगें आपली शोधकबुद्धि आहे असें स्पष्ट करून येतें.

२८ वे सप्तेंबरचे कोल्हापूरचे वर्तमानसंग्रहांत एक क्षेत्रवासी यासही लिहिणारास आजच्या पत्रावरून कळून येईल.

---

मार्गे मार्क्विस आफ् हेस्टिंग्स ज्यांस हिंदुस्तानचे इतिहासाचे व मराठ्यांच्या बखरीचे पुस्तकांत लार्ड हेस्टिंग हिंदुस्तानचे गवरनरजनराल हें नामाभिधान लिहिलेलें आढळेल, ह्या गवरनरजनरालची राज्यकारभार चालविण्याची रीति त्याचे स्वदेशीयांस व इंग्रेजसरकारची सत्ता या आपल्या हिंदुस्तानांत वाढण्यास व ती कायम होण्यास मोठी हितावह झाली आहे. तीच रीति अद्यापि या देशाचे संस्थानी व जाहागीरदार यांच्या विशीं आपलें इंग्रेजसरकार ठेवीत आहे. या नामदार हेस्टिंगसाहेबांनीं या संस्थानिकांच्या बाबदींत लिहून ठेविलेलें आहे, त्याचा उतारा २८ वे सप्तेंबराचे टेलिग्राफ पत्रांत येतलेला आहे, त्याचें भाषांतर आमचे वाचणारांकरितां उतरून येतों. त्याजवरून बडे बडे इंग्रेज लोक राज्यरीतींत किती कुशल व ज्ञानी असतात, व ते लोक राज्यकारभार मोठमोठाले करित असून त्यांत संबंध कादून आपले लोकांस ज्ञाहाणे व बाकबगार आणि उद्योगी करण्याविशीं आपलें अनुभविक ज्ञान प्रसिद्ध करण्यांस आळस करीत नाहींत. ह्या गोष्टी कळून चेतील. आगखी उद्योग करणें तो लोकहितावह ही असावा असेंही आपले थोर, व सरकारी कामें करणारे यांस समजून येईल. तो लेख असा कीं,

"ज्या वेळीं आपण (इंग्रेजसरकार) हिंदुस्तानांतील संस्थानी व राजेरजवाडे यांच्याशीं तह करितों, त्या वेळीं ते स्वतंत्र राजे आहेत असें त्यांस दर्शवितों. नंतर आपण त्यांचे दरबारांत एक रेसिडेंट पाठवितों, तो तेथें वकिलाचे पेशानें राहावा तो न राहतां तेथील राज्यकारभारांत अधिकारानें हात घालतो, त्यांच्या सर्व खासगी प्रकरणांत तो प्रवेश करितो, त्यांच्या विरुद्ध जीं प्रकरणें होतात, त्यांस तो आश्रय देतो, आणि तो आपल्या सत्तेनें बर्चस्व दाखवूं लागतो. असा त्या रेसिडेंटाचे पेशा राहाण्यास आपले (इंग्रेज) सरकारची मदत त्यास मिळते. याचें कारण तो सरकारास त्या अमुक एक बाबदींत सरकारानें पडावेंच अशा गोरवानें समजावून उत्तेजित करितो. आणि त्यामुळें आपलें कौन्सल त्याविशीं झटून लक्ष पुरवितें. आणि मग सरकार त्या स्वतः सा रेसिडेंटाबरोबर एकाच बाबदींत नाहीं, परंतु सर्व बाबदींत विचार त्याच्या प्रमाणें करितें. तथापि आपण त्या संस्थानिकांचें मन त्यांच्या गादीचा वारस ठरविण्याचे, किंवा ती गादी चालविण्याचे बाबदींत जो आपला हक्क व विचार असला पाहिजे त्याचा निर्णय करण्याचे कामावांचून किमपि दुखवीत नाहीं. आपण मुसलमानांच्या वारसाचे बाबदींत त्या कायद्याचें नेहमी विरुद्ध असतो. कारण, मुसलमान संस्थानिकांनीं आपले मुलां-

पैकीं जो वारस वाटेल तो करण्याची वहिवट आहे. ज्येष्ठपुत्र जो असेल तो गादीचा वारस केल्यानें आपल्यास हितावह आहे, तेव्हां ती रीति चालू ठेवावी असें वाटतें. मला वाटतें त्यासरिखी नामी तोड दुसरी नाहीं. तो वारस जों पर्यंत आपला त्यास आश्रय आहे, तोंपर्यंत नेहमीं आपली कृतज्ञता जाणून ती सर्वांस श्रुत करील, परंतु त्याची एकदां त्याच्या गादीवर स्थापना झाली कीं, त्याची कालानुरूप व्यवस्था ठेवण्याचा निर्बंध आपण केला पाहिजे. आणखी त्याच्या अज्ञानपणांत असीं आपण त्याची व त्याच्या संस्थानाची व्यवस्था ठेवली पाहिजे, तशीच त्याची गादीवर स्थापना केल्यावर त्याचे सर्व कामकाजांत आपला हात असला पाहिजे, असें त्यास वाटूं लागेल. या खालच्या विचारावरून पाहातां कंपनी सरकारचें हित वास्तविक या गोष्टींत नेहमीं आहे. आतां तुमचें हित आहे यावर विचार करून उपयोग नाहीं. विचार करणें तो असा केला पाहिजे कीं अमुक गोष्टींत महत्व, व ती गोष्ट केल्यापासून येतें कीं काय? ”

---

ब्यावरा एथील बंडखोर उत्तर व पश्चिम या दिशांस पळून गेले. त्यांच्या मागून इरेग्युलरस्वारांचे दोन ट्रुप्स, २०० मद्रासी स्वार, व २०० पायदळ आणि २ तोफा इतकी फौज पाठलाग करीत आहे.

बांद्याचे परगण्यांतील बंडखोरांवर ब्रिगेडियर कार्पेंटरचे हाताखालचे फौजेनें तेथील सर्व त्यांनीं धरलेलीं ठाणीं मोकळीं करून द्यावीं म्हणून मारा चालविला आहे. या बंडखोरांचा पुढारी दीनमतसिंग हा जखमी झाला आहे. आणि नारायणराव व माधवराव यांचा मुख्य गुरुमंत्री राधागोविंद यास पकडण्याची आज्ञा दिऊं लागली आहे.

येत्या आक्टोबरांत बक्सर एथून फौज बाहेर लढायांवर रवाना होईल. कारण, तूर्त हवा फिरण्यामाफक नाहीं. उष्णता फार तिकडे झालेली आहे. असें दिसतें कीं, तिकडील बंडवाले धीट झाले आहेत, ते सरकारच्या छावणीपासून थोडक्या मैलांचे अंतरावर वरचेवर येतात, आणि पाहातात कीं, स्वार नदीचे पार जाऊं देत नाहींत. तेव्हां ते परत जातात. टेग्रा.

---

गोरखपूर येथील मद्रास शिपायांचे टोळीची तेथचे बंडवाल्यांशी गांठ पडून तिनें त्यांस तिराईचे जंगलांत पाठलाग करून लावून दिलें. ते बांसीकडे चालते जाले. तेथें सुमारें २५० शिपाई होते त्यांवर ३ रे गुदस्तरोजीं १००० शिपायांनीं हल्ला करून त्यांचा मोड केला, परंतु दारूगोळा संपून त्या लोकांस लवकर कुमक मिळाली नसती तर नाश त्या शिपायांचा व्हावयाचा. त्या लोकांस कुमक रवाना झाली आहे.

---

बडवाल्याचा पराभव जाला, तथापि ते नर्मदा उतरून खालीं दक्षिणेंत शिरले आहेत. त्यांची संख्या १००० वर ऐकण्यांत नाहीं. त्याजकरितां जालन्याहून १ले स्वारांची पल्टण आणि ५०० पायदळ महूस कुमकेसाठीं रवाना झाली आहे. असें बंबे ग्याडियन पत्रावरून कळतें.

---

देलियाफपत्रावरून कळतें कीं, गेल्या हिंदुस्थानचे दंग्यांत ज्या एतद्देशीय लोकांनीं सरकारास पैशाची वगैरे कुमक केली, त्यांस आपलें इंग्रज सरकार त्यांच्या चांगुलपणावरून त्यांस त्यांच्या आभारीं सर्टिफिकिटें देऊं लागलें आहे.

---

हें पत्र ज्ञानप्रकाशाचा छापखान्यांत वदरानजेयांनीं छा.

# ज्ञानप्रकाश

गुरुवार तारिख ७ आकुटोबर सन्न १८५८ इ०


जाहिरात, सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं, रायपूरचे फोजे करितां ता॰ ११ आक्टोबर सन १८५८ पासून खालीं लिहिलें लुटीचें सामान प्रसिडेंटाचे हुकमाव रून लिंगसूर छावणींत विकलें जाईल. तें यणें प्रमा॰ १ सोन्याचे वरुप्याचे जिन्नस. १ पितळेचें सामान. १ जुनें लोखंड. १ कापडाचीं गांठीं. १ तऱ्हतऱ्हेचीं वस्त्रें. १ किरकोळ सामान. — विकरीचा ऐवज सरकारचे नोकरांपासून आक्टोबराचे पगारांतून, व बाकीच्यापासून रोख घेतला जाईल ता॰ २४ सप्टंबर सं॰ १८५८

सही॰ ए॰ वर्डेम केप्रसिडेंट.

सदरील जाहिरात रायपूर येथील गेल्या दंग्यांत सरकारचे फोजेस माल मिळाला त्याची विक्री करण्याचे कमेटीचे मुख्य पंच यांकडून कानडी भाषेंत आली तिचा तर्जुमा करून सर्व व्यापारी, उद्मी, व कामगार यांस समजण्याकरितां येतला आहे. ही जाहिरात आम्हांस पाठविली त्याबद्दल त्या कमेटीचे आम्ही बहुत आभार मानतों.

## ज्ञानप्रकाश ता॰ ७ आकुटोबर स॰ १८५८

अशी वातमी उठली आहे कीं, चंबळ आणि ग्वालेर यांचे दरम्यानचा रहदारीचा रस्ता बंडखोरांनीं व्यापून टाकिला आहे. हें ग्वालेरीहून भिंड व दूरगर इकडे एक फोज रवाना केल्याचे योगें झालें असावें. तिकडे फोज पाठविण्याचें कारण कीं तिकडील लोक अशा प्रसंगीं उठून वरचेवर त्रास देतात. १० वे गुदस्त मितीपावेतों ग्वालेरीकडील तारायंत्रास इजा पोंचली नाहीं.

समजतें कीं, भुदेरी ठाकुरांनीं बहुत दिवस सिरोंज आणि त्याच्या खालचे गांव हस्तगत करून घेतले आहेत. आणि त्यांणीं व दुसरे बंडखोर मराठ्यांनीं नानासाहेबाचा झेंडा लावला आहे. त्यांचे अमलामुळें सर्व गरीब आणि श्रीमंत रयतेस इजा पोंचत आहे. आतां यावेळीं सिरोंज येथें किंवा त्याचे आसपास सरकारची फोज गेली असेल, तेव्हां आतां त्यांचें तें राज्य लवकरच लयास जाईल.

एकानें मोठे श्रम घेऊन बंगाल इलाख्यांत फोज किती आहे, याचा अजमास ३रे मिनहूस काढलेला आहे. तो येणेंप्रमा॰ गोरे शिपाई ६२०००, काळे रेग्युलर व इरेग्युलर, पंजाबी वेगेरे शिपाई ७८००० पोलिस कांटिंजेंट आणि वगेरे शिपाई ५३००० मिळून एकंदर १९३०००. आणि हल्लीं ६२वी, व ६९वी, यापलटणी खेरीज करून बाकीचे १८००० शिपाई बिनहत्यारी आहेत. यांखेरीज विलायतेहून येत्या हिंवाळ्यांत १६००० गोरी फोज येईल.

पुणेंआब्झरवरपत्रकर्त्यांस सीरपूर येथून पत्र आलें त्याजवरून कळतें कीं, तिकडे भिल्ल पुनः अधिक अधिक धीट होत चालले आहेत. त्यांणीं महूकडील डांक बंद पाडली. व सरकारी बैलांच्या टपालाचे बैल, आणि सिंद्वा व महू यांचे दरम्यान टपालचे घोडे चोरून नेले. तारायंत्र सीरपूर आणि पुणें यांचे दरम्यानचें तोडून टाकलें. व तीन गांव लुटले व जाळून टाकले. गेल्या ४थे तारिखेस २३ मुंबईची लैट काळी पायदळ या दुष्ट लोकांचा पाठलाग करण्याकरितां सीरपुराहून जावयाची होती, परंतु त्यांस जाण्याकरितां गाड्या वगेरे मिळाल्या नाहींत. याचें कारण, तिथचे गांववाले यांणीं सरकारास मदत केली असतां भिल्ल आम्हांस पीडा देतील, म्हणून त्यांणीं दहशत घेतली आहे. यामुळें शिपायांस जाण्याची गेरसोय झाली.

नाटककार, हैत्याजनवारीं कृष्णजन्म, विराटपर्व, नलाख्याम, व रूलोचनाख्यान. हे चार भाग करस करणार आहेत.

इंग्लिशम्यान पत्रकर्त्यानें बंडवाले आणि बंडखोर शिपाई यांचा परस्परांवर विश्वास आहे त्याविषयीं लेख लिहिला आहे तो पुणेंओबझरवरांत पाहून, त्याचा उतारा आम्हीं आमचे वाचणारांकरितां घेतों. हिंदुस्थानांतील सांप्रतचे बंडांत एक विलक्षण गोष्ट दिसून येते कीं, बंडावलेले एतद्देशीय शिपाई व इतर लोक यांचा परस्परांवर विश्वास एकसारिखा बहुत काळ राहिला आहे. असें या एशियाखंडांतील इतिहासांत पाहूं गेलें असतां कोठें मिळावयाचें नाहीं एशियाखंडांतील सर्वलोकांचे तोंडचें कारस्थान मोठें, आणि त्यांचा दगाबाजी करण्याचा तर हातखंडा आहे. आणि इकडील अतिरथी महारथी राज्यकर्ते या दगाबाजीचे आणि कापट्याचे योगेंच प्रबळ जाले आहेत. बंगाल्यांत ओ*मीचंदाचेच दगाबाजीनें आपली (इंग्रेजसरकारची) सत्ता बसली, आणि लॉर्ड *क्लैव साहेबाचे दुप्पट दगाबाजीचे योगानें तो मोठा समर्थ ओमीचंद याचुक असें ठरलें. परंतु या बंडांत अशीं कांहीं उदाहरणें झालीं नाहींत. जरीं लढाया होऊन त्या शिपायांचे पराभव होऊन ते हिंदुस्थानभर भटक्या मारताहेत, तरी त्या बंडखोरांपैकीं हत्यारबंद शिपाई धरून देईल त्या दरएकाचे ५० रुपये आणि बिन हत्यारी धरून आणला असतां त्या दरएकाचे ३० रुपये त्याचे धरून देणारास मिळतील. अशीं अशीं योग्य बक्षिसें उत्तेजनार्थ लाविलीं असतां अद्यापि त्या लोकांनीं कोणीं धरून दिला नाहीं. जेव्हां आपले सरकारचे जनराल (सेनापति) हे मजला करून जात, तेव्हां त्यांस अगदीं खबर मिळूंच नये, मिळालीच तर खरी नसावी, यामुळें कित्येक आपल्या सरकारी लोकांच्या लढाया झाल्या त्यांचा अर्थ दाटतो आहे. बंडवाल्यांचे मुख्य पुढारी यांस पकडून देण्याविषयीं अतिशय मोठीं बक्षिसें लाविलीं, परंतु एकही कोणी त्यांतून हजर केला नाहीं. त्याचें कारण एक असें निघतें कीं, कांहीं महिन्यांचे पूर्वीं आपल्या इंग्रेज सरकारची सत्ता या देशांत राहत नाहीं. असें लोकांस वाटून त्यांनीं हा आगंतुक विश्वास धारण करून ते बंडवाल्यांस प्रतिकूळ होण्यास त्यासमयीं भिऊं लागले; परंतु त्या लोकांची आपले इंग्रेजसरकारचे सत्तेविषयीं खात्री झाली, आणि त्यांणीं असेंच करावें. तेव्हां आतां ते लोक खात्रीनें भविष्याप्रमाणें बोलतात. लढायांवर लढाया झाल्या शेवटीं आपले इंग्रेज सरकारचेच जय झाले. आपल्या इंग्रेज सरकारच्या फौजा दक्षिणेकडून चोहोंबाजूनीं शत्रूचा पराभव करीत, व त्यांचे मजबूद किल्ल्यांवर चाल करून बळात्कारानें त्यांचे पासून घेत, नंतर एकत्र फौज मिळून लखनौ शहर घेतलें, आणि रोहिलखंड हें आपले सरकारचे विजयी फौजेनें काबीज केलें, परंतु त्यासमयीं त्या बंडखोरांत दगाबाजी झाली नाहीं. ही अशी अपूर्व विश्वासाची ऐक्यता किंवा एकी या एशियाखंडांतील लोकांचे स्वभावांत किती काळापासून परकी आहे बरें? परंतु आतां असें म्हणायास चिंता नाहीं कीं, ही कांहीं एक वेळपावेतों लावण्यामध्यें स्वस्थ राहिली होती. असो पण पुनरपि तो जुना बहुकाळचा बाणा आपल्या कामांत लागण्याचा आरंभ झाला आहे.

* ओमीचंद हा बंगालचे नबाबाचें राज्य इंग्रेजसरकारचे हस्तगत झालें त्यासमयीं त्या नबाबाचा कारभारी किंवा दिवाण होता.

* बंगाला, लॉर्ड क्लैव साहेब यानें सन्न १७५६ इसवीत मिळविला, व तो गवरनरजनराल ही झाला होता.

आणि तो जितका लवकर पूर्णतेनें संचार करील तितका पाहाण्याची आपली इच्छा आहे. तो आरंभ कोणता कीं, ग्वालेरीस एका ब्राम्हणानें अयोध्येचे ४ हिंदू शिपायांपाशीं २५ वी मुंबईच्या पायदळ पलटणींतील नानास जाऊन मिळावें म्हणून खलबत चालविलें होतें. त्या शिपायांनीं दगाबाजीचें काम करून त्या दुष्ट कटास आम्हीं मिळतों असें ढोंग करून ते कटवाले पकडून व सर्व जरूरीची बातमी काढून त्या शिपायांनीं समयास आपले सरकारचे आफिसरांचे (सरदारांचे) त्यांस हवालीं केले. ही गोष्ट बंड झाल्यादिवसापासून पहिलीच झाली. यापासून एतद्देशीय लोकांचे मनांवर मोठा अंमल बसेल. एकदां का दगाबाजीची करणी झाली कीं, परस्परांस परस्परांचा विश्वास बिलकुल राहाणार नाहीं. आणि तेथून मग कज्जे होऊं लागतील. आणि एकबंडखोर आपले शेजारचे बंडखोरास खबर पोंचवून क्षमा मागण्यास सांगेल. जसे पाठीचे कण्याचे मणी निरनिराळे झाले तद्वत् बंडवाल्यांची अवस्था झाली आहे. त्याप्रमाणेंच त्यांची आशामानही मोडून गेली असें आपणास म्हणण्यास कांहीं चिंता नाहीं.

---

अशी वदंता उठली आहे कीं, मोहमदीचा राजा लोनीसिंग हा भयं क्षमा मागण्याचे पंथांत आहे. हें सत्य असेल, तर एका मोठ्या दुष्टावर सरकारानें क्षमा केली असें होईल. त्यानेंच लखनौचे बेगमला कप्तान पी. ओर, सर एम. एस. ज्याक्सन, लेफ्टनंट बर्नस, सार्जंट मेजर मार्टन मिसेस, ओर, तिचें मूल, मिस जाक्सन व माजी मिस्तर क्रिस्तियन एक दिवाणी कामगार याची मुलगी हांस ८००० रुपयांना विकलें. त्या बेगमेनें त्या लोकांचे हाल हाल करून सोडले त्या सर्व साहेबलोकांचा संहार करवून सर्व मडमांस व त्यांच्या मुलांस ५ महिने बंदिखान्यांत ठेवलें. त्या प्रसंगीं ख्रिस्तियनची मुलगी तर मरण पावली. पहिली गोष्ट ही कीं, जेव्हां साहेब लोक बचावार्थ त्या लोनीसिंगानें त्यांचे पायांत बिड्या ठोकल्या ते साहेब जाक्सन् आणि बर्नस् हे होत. त्यांच्या त्या वेळीं तर फक्त त्रिगेल्या. याही पेक्षां दुसरी वाईट गोष्ट ही कीं, कप्तान ओर याचें व लोनीसिंगाचें परम मित्रत्व होतें. तें इतकें कीं, अयोध्येच्या मागील राज्याचे वेळीं लोनीसिंगाचे ऐवजाबीस्तर्थ तेथचे राजास कप्तान ओर हा एक लाख रुपयांस जामीन झालेला होता. तो आपला उपकारकर्ता त्या सिंगापाशीं येऊन त्यानें मागील कृतज्ञता स्मरावी, आणि बचाव करावा, म्हणून त्याचे पायां पडला, परंतु कांहीं झालें नाहीं. तो लोनीसिंग हिंसा करण्याचे फंदास लागलेला होता. तेव्हां त्यासमयांत त्यास कांहीं भय नव्हतें. अशा त्या मनुष्यास क्षमा करावयाची!! हें असें करणें दयेस कलंक लावणारें होय. या करितां सर्वांनीं आपले विचारें अशा महद्पराध्यावर दया होई असा प्रतिबंध करावा असें इंग्लिशम्यानचा कर्ता म्हणतो. यावर आमचे आबझरवर कर्त्याचें कांहीं मत नाहीं. याचें आम्हांस वाईट वाटतें, परंतु ही सदरील वदंता व त्यावरील लेखी मजकूर अक्षरशः खरा असेल, तर त्या मनुष्यास यमसदनच योग्य आहे. असें आमचे मतास येतें.

---

गेल्या महिन्याचे २९ वे तारिखेस कर्मनाशानदीच्या टप्प्यावरील बंडखोरांवर कर्नल वाल्टर्स

याणें हल्ला करून त्या परगण्यांतील लोकांस चां-
गली माहिती राहील असा प्रकार दाखवून दिला
आहे. सदरहू कर्नलानें सदरहू बंडखोरांचा रा
मपुर परवारा म्हणून आध्याचे वायव्येस ६ कोसां-
वर शहर आहे तेथें पराभव केला. नंतर हजारा
स ८०० शिपाई त्यांत ८० पासून ४० स्वार अशी
त्यांची गणना सरकारचे लोकांशीं दिली. पु
ढें त्यांणीं बंडखोरांवर मोठा मारा चालवून त्यां-
चा पुष्कळ संहार केला. त्यांचे ५० पासून ६० पा-
वेतों ठार आणि १०० तरी जखमी झाले. अशी ग-
णना केली आहे. नेटिव लोकांच्या सांगण्याव-
रून त्यांचे २५० लोक निरुपयोगीं झाले. आतांया
नुकसानीशीं सरकारची नुकसानी लावून पाउ-
ली असतां फार थोडी झाली आहे.

बातमी आली आहे कीं, लखनौ एथील एक
दिवाणी कामगार फौजेनिशीं २२ वे सप्टेंबर रोजीं
सालिमपूर एथचे बंडखोरांवर हल्ला करण्यासा-
ठीं निघाला. त्या हल्ल्यांत त्यानें सदरील शहर घे
ऊन बंडखोरांचे ५०० लोक मारले. व तोफा घेतल्या.

गेल्या महिन्याचे १८ वे तारिखेस अयोध्या प्रांतां-
तील दरियाबाद येथें तेथच्या दिवाणी कामदा-
रानें गोग्रा नदींत त्या एका बेटांत बंडवाले राहि-
ले होते त्यांज बरोबर लढाई मारून फत्ते मिळ
विली, अशी सरकारी बातमी छापली आहे. या प्र-
संगीं कपुरतळ्याचे कांटिंजंटीचे व २ कंपन्या गो-
ऱ्यांच्या आणि कांहीं हडसनचे स्वार इतके ल-
ष्कर होतें. त्यांणीं ३००० बंडवाल्यांस त्या बेटांतू-
न त्यांणीं कडाकोटीचा बंदोबस्त केला असतां
हांकून लाविलें. कपुरतळ्याचे राजाच्या तोफखा-
ना त्या बंडखोर पळणारांवर चालला तेणें करून
सामानाच्या नावा बुडाल्या आणखी सुमारे १००
बंडवाले ठार झाले असा तर्क होतो. त्यांचे मुख्य २
बंडखोर यास पाण्यांत मारल्याची बातमी आहे.
सरकारचा नाश या वेळीं फारसा झाला नाहीं.

बर्द्दाना कडे सारन येथून कप्तान मोस पुनः
दुसरे पोलिस पलटणी करण्यासाठीं भरती आ-
णण्यास गेला आहे. ब्रिगेडियर डुग्लास याणें
त्या ठिकाणीं हद्दीवर रक्षणार्थ ठाणीं करावीं अ-
शी आज्ञा केली आहे. परंतु तेथें फौज कमी आहे.
तेव्हां दुसरा हल्ला येई पर्यंत ठाणीं करून उपयोग
नाहीं. एथें आणि गोरखपूर प्रांतांत स्वार असल्या-
वांचून लढाई करून परिणाम नाहीं. तें तर पा-
हिजेत तेव्हां काय तो मोड होईल. येथें हत्तीवर-
चे गोरे स्वार करण्याची तजवीज चालविली
आहे. परंतु हत्तीवरील कावेस्वार आणि गोरे
पायदळ झाल्यास शत्रूंस जिंकतां येईल.

दार्जीलिंगचें १८ वे सप्टेंबरचें पत्र हरकारू पत्रां-
तील आबझरावरून कळतें कीं, मी दुःखकारक
वर्तमान लिहितों तें जर खोटीं झालीं तर त्याबद्दल मला
कोणी दोषलावणार नाहींत. एथें दोन दिवसांपासून पुकार
झाला आहे कीं, जंगबाहादुर हा १२ किंवा १८ हजार लोकांनिशीं
त्या ठिकाणीं चाल करून येत आहे आणि ही बातमी खरी अ
सावीसें दिसतें. कारण, सर्व युद्धसामग्री तयार होऊन छावणींत
रवाना झाली आहे. आणखी अशी बातमी लागते कीं, रोजसाहेब
लोकांच्या बायकामुलें सरासरी निजपुराकडे एथून रवाना होतांत
५०० नेटिव लोकांचे खबरांवरून दिनाजपूर, पूरनिया, आणि जल्पी ...
एथील सुलाशी तोफांनिशीं या मार्गें येताहेत असें वाटतें. — जंगबाहा-
दुर हा आतां आपला शत्रु झाला आहे. कदाचित् तुम्हांस वाटेल कीं,
पंखाबारी, करीन किंवा पंचम एथें एकही शिपाई नाहीं, असें नव्हे.
परंतु ही वार्ता खरी असेल, तर माझे हे शब्द लक्षांत ठेवा कीं, कानपु-
राप्रमाणें पुनः पुनः येईल समजून येईल. एक अशी बातमी लागते कीं,
पंचमपासून दाहा पंधरा कोसांवर एल्डन येथें नेपाळचे लष्क-
राचे दारू वगैरे सामान येऊन दाखल झालें आहे.

---

हें पत्र ज्ञानप्रकाश छा० कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांणीं छा० प्र० के०

# ज्ञानप्रकाश

वर्ष १०

सोमवार तारिख ११ माहे आक्टोबर सन्न १८५८ इसवी.

पत्राची किंमत,

१० दरसाल रुपये. ९॥ आगाऊ दिल्यास.


## ज्ञानप्रकाश. ता. ११ आक्टोबर सं. १८५८

तात्याटोपे याचे ताब्यांतील बंडवाले यांणीं जनराल मिचल आणि जनराल स्मिथ यांचे हाताखालचे फौजेच्या शहांतून सुटावें, याकरितां सिरोंज सोडलें. आणि चंदेरीकडे परत गेले. आणखी यांविशीं असें ऐकण्यांत येत आहे कीं, त्यांची १५००० पंधरा हजारांपर्यंत जास्त संख्या झाली आहे तेथच्या खजिन्याभोंवतीं एक सगळ्या पलटणीचा पाहारा ठेवलेला आहे. या बंडखोरांबरोबर चार मात्र तोफा आहेत. चंदेरी ही सांप्रत सिंदे सरकारचे फौजेच्या ताब्यांत आहे.

---

विलायतेकडून गोरी फौज येणार येणार म्हणून जो पुकारा झाला होता, ती फौज आतां हिंदुस्थानचे किनाऱ्यावर येऊन उतरूं लागली. गेल्या मंगळवारीं बादशाही ४६ वे पलटणीचे २३ अंमलदार आणि ७५१ लोक मुंबईस येऊन दाखल झाले. हे लोक गलबतांतून नउतरतां हुकमावरून कराचीकडे रवाना झाले. नंतर बुधवारीं बादशाही ९१ वे पलटणीचे ४४३ लोक आणि १७ हुद्देदार मुंबईस येऊन गेल्या शनवारीं आगगाडींतून सायंकाळीं एथें दाखल झाले. आतां येथून ते नागपुराकडे कामठीचे छावणीस जाणार असें समजतें. त्याच दिवशीं गोरे रिक्रूट म्हणजे पलटणीचे भरतीकरितां ३१८ लोक व ६ हुद्देदार मुंबईस येऊन पोंचले.

---

**आक्ट.**— सन्न १८५८ इसवीचा आक्ट २२ पसार झाला आहे तो सन्न १८५४ चा आक्ट ११ वा याच्यावर फेरफार केल्याचे बाबदींत आहे.

---

**पुणें.**— गेल्या सोमवारीं व मंगळवारीं सायंकाळीं हस्तनक्षत्राचा पाऊस कांहीं पडला. सोमवारीं तिसरे प्रहरीं एका बाजूनें ऊन पडलें असे, आणि एका बाजूस पर्जन्य पडत असे. आणि वर आकाशांत एका बाजूनें मेघगर्जना लष्कराच्या तोफा व बंदुका सुटतात, त्याप्रमाणें कांहीं काळ होत असे. ही सर्व रचना पाहून मनास अत्यानंद होई, आणि या दृष्टीस हस्तनक्षत्र हा शब्द योग्य दिला आहे, असें वाटे. गेल्या शनवारीं रात्रौ चित्राची वृष्टि थोडी झाली. अद्यापि ऊष्मा होत आहे मेघमंडळ क्रमण करीत आहे, तेव्हां आणखी वृष्टि होईल हें अनुमान आमचें अझून आहेच. सडकांवर खडी पडून बहुतेक सडका होस आफ् करेक्शान या तुरुंगांप्रमाणें लोकांस जाणविताहेत. गेल्या गुरुवारीं एथें कच्छी घोड्यांचे सवदागर सुमारें असामी २० यांचा अपसांत मोठा तंटा होऊन एकमेकांनीं काठ्यांनीं युद्ध केलें. त्यांस बहुतेक लहानमोठ्या जखमा झाल्या आहेत. पोलिसांत आणल्यावर त्यांस विचारतां ते त्या गुन्ह्याबद्दल परस्परांवर दावा करीत नाहींत हें एक आश्चर्य आहे.

तात्याटोपे याची हालचाल कमी व्हावी, अशा संकटांत तो पडला आहे असें दिसून येतें. आजपर्यंत तात्या जिकडे भडके तिकडे त्याच्या मागोमाग सरकारची फौज जाऊन त्यास अडथळा घाली, पराभव करून घालवून देई, किंवा तो आपलें अवसान, व तालमान पाहून तें स्थळ सोडून देई, यामुळें एक जागींच त्याजपासून त्या लोकांस, इजा होत नसे किंवा जाजती नुकसान होण्याचें बंद होई. या अशा घणघोळांत तात्या व तात्याचे अनुयायींचा मोठा समुदाय यांचे हाल व संहार होत असत. सरकारास त्याच्या मानानें पाहातां हीं दोन्हीं प्रकारचीं नुकसानें सोसावयाचीं भाग पडत, परंतु तीं थोडीं असें आपण धडधडीत मजकूर लेख वाचून पाहातों, असें जरी आहे तरी तात्यानें आपला जो धोपट मार्ग मुळापासून धरला आहे तो तो सोडीत नाहीं. यास्तव त्याचा तो सोडविण्यास एक मोठीच तजवीज चालविली आहे. ती जर स्फूर्त झाली, आणि मनोनिग्रहाचे योगें ती होईल अशी आमची खात्री आहे, तर त्या तात्यानें चलनवलन अगदींच मोडून तो एक अत्यंत दीन व हीन प्राण्याप्रमाणें होऊन जाईल, हा खुदारी नाहींसा झाला म्हणजे सर्व बंडखोर शरणागत होऊन बंडाचें नांव सुद्धां निघणार नाहीं. गेल्या ४थे मिनहूचे बंबे ग्याझिटांत लिहिल्यावरून कळतें कीं, हल्लीं १ले ग्रिनेडियरचा लेफ्टनंट प्रेंडरगास्ट वाल्श याणें आपण खुषीनें लेफ्टनंट करयाच्या हाताखालचे थोडे स्वारांवर नौकरीस राहून महूपासून तात्याटोपे आहे तिकडे फक्त त्यास धरून आणावयाकरितां निघाला आहे. महूपासूनी तात्याचे फौजेस अडथळा करावा म्हणून फौज जमा झाली आहे, तीस मिळण्याकरितां हे स्वार निघाले आहेत. आतां ही तजवीज रास्त आहे, परंतु किती साहसाची व दुर्घट आहे, हें पाहिल्यावर लेफ्टनंट वाल्श याची छाती केवढी आहे कीं, आपणही गोष्ट ऐकूनच त्याची वाहावा करावी असें वाटतें. या साहेबानें किती एक वेळां आपले पलटणचे वरिष्ठ अंमलदाराजें या कामाकरितां परवानगी द्यावी म्हणून विनंतीचे अर्ज केले, परंतु या अशा गोष्टीस त्याच्यानें साश्र देववली नाहीं. आणि उघड आहे कीं, सामान्य दयावान् पुरुष असेल तोही अशा गोष्टींत आपली संमती एकाएकीं देणार नाहीं. परंतु त्या साहेबानें रजा घेऊन हें काम पतकरिलें आहे. यावरून पाहातां साहेब लोकांत मनोनिग्रहाचे लोक कसे तारिफ करण्यासारखे आहेत, हें प्रसंगीं दिसून येतें. त्या बिचाऱ्याचे मनोनिग्रहाचे बरें फल देवो, परंतु तात्या हा अधिक संकटांत पडला, यांत संशय नाहीं. अशा संकटांतून पार पडणें परम कठीण असें आपणांस दिसून येतें. हा तात्या व्याघ्र सांपडला असतां त्याचीं मागून उड्या मारणारीं बिचारीं साळजें सहज निमूट बसतील, आणि लोकांचा तूर्त उपद्रव कमी होऊन, हिंदुस्थान स्वस्थ व शांत होईल.

जगदीशपूर— येथील बंडवाले आणि आरा येथील सरकारी फौज यांजमध्यें लढाई आऱ्याचे नजीक नांदीजवळ मुहे गुदस्तचे १०वे मिनहूस झाली. त्या बंडवाल्यांचा मोठा नाश झाला (१००लोकांचा) आणि नेहमींच्याच रीतीप्रमाणें इंग्रेजी फौजेपैकीं एकही खराब झाला नाहीं. शाहाबाद येथील लढाऊ

फौजेवरील ब्रिगेडियर डुग्लास याणें दिनापूर येथें १०वे गोरे पायदळच्या राहिलेल्या कंपन्या मागितल्या आहेत. त्याचा मनसोबा जगदीशपुरावर मोठा हल्ला करायाचा आहे आणि तो लवकरच होणार आहे. अशी बातमी आहे कीं, जगदीशपुरास १५००० बंडवाले जवान असून त्यांणीं त्याठिकाणीं मोठा बंदोबस्त केला आहे. ही लढाई झाल्यास मोठी भयंकर गोष्ट प्रायः आपले ऐकण्यांत येईल असें फिनिक्स कर्त्ता ह्मणतो.

---

नवाबगंज येथील पत्र देलियाफांत लिहिलें आहे, त्यावरून समजतें कीं, कानपूरचे रस्त्यावर २२वे गुदस्त महिन्याचे दिवशीं बंडवाल्यांचीं सरकारचे फौजेचा सामना होतांच शत्रूंनीं सरकारच्या छावणीचा विध्वंस करून टाकण्याचे उद्देशानें तेथच्या फौजेस हांकून काढण्याविशीं यत्न केला, परंतु ते लोक तयार होतेच. त्यांणीं आपल्यापैकीं स्वार व तोफखाना यांची मोहिम करून त्यांस अतोनात ठोक दिला. सरकारी गाड्या, डांका, रिकाम्या बंग्या, सिग्राम हीं लखनौकडे [illegible]त होती त्यांवर चाल करून जाण्याकरितां त्यांणीं धांव घेतली होती. या प्रसंगीं सुमारें ५०० बंडखोर निर्मूळ केले.

---

इंग्लिशम्यान पत्रांत लिहिलें आहे कीं, शिपायांचें बंड झालें तेव्हां इंग्रेज व त्यांच्या स्त्रिया यांजवर जुलूम व पीडा झाल्या इतकेंच नाहीं. तर त्या बंडखोर लोकांनीं आपल्या देशाचे लोकांवरही तसाच प्रकार केलेला समजण्यांत येतो. एका फकिरानें सायंकाळीं धुलिया येथें पत्र पोंचवून देण्याचे कबूल करून तें पत्र त्यानें एका पोथींत घालून चालला तों त्यास वाटेनें बंडखोरांनीं पकडला. आणि सकाळीं तो परत आला तंव त्याचा उजवा हात कोंपरापावेतों तोडलेला, डाव्या हाताचीं बोटें तोडलेलीं, नासिका छेदन. इतका विरूप आणि तीन ठिकाणीं खेरीज जखमी झालेला, असा दिसला. हें पाहून त्या फकिरास लेफटनंट कीम्यान याणें सिराई अथवा धर्मशाळा येथें नेऊन एका काळे वैद्याचे हवालीं केलें, परंतु तो पुढें मरण पावला. ही गोष्ट कीम्यान यानें बासोप्याहून रिपोर्टांत लिहून पाठविली आहे. ही जर गोष्ट खरी आहे, तर तिजवरून या बंडखोरांची देशबांधवांवर प्रीति असावी तशी नाहीं, असें दिसून येतें. भूतदया तर त्यांची गेलीच आहे. पण देशावरची दयाही उडाली, असें या गोष्टीवरून समजून येतें.

---

सिंदियन पत्रावरून कळून येतें कीं, कराचीहून ६ कच्छी जाहाजांतून श्रावणमासीं यात्रा द्वारकेस गेली, त्यायात्रेस समुद्रांत वाघेरलोकांनीं गलबतांत जाऊन लुटलें नंतर ही खबर गाईकवाडाचे तेथचे अधिकाऱ्यांस जाहीर होतांच त्यांणीं त्या वाघेरांस हटविण्याकरितां कांहीं हत्यारबंद लोक पाठविले, परंतु ते जाऊन पोंचल्याचे पूर्वींच ते वाघेर बेटापाशीं आपले मजबूद ठिकाणीं पळून गेले. आणखी जमिनीकडून जे लोक गेले त्यांस ही लुटलें अशी खबर लागते.

---

सातारचे खासगी पत्रावरून कळतें कीं, तेथील इनाम कमिटींतील आणखी कारकून कांहीं कमी होणार अशी वार्ता तेथें उठली आहे.

बंबेग्याझिटपत्रांत लखनो येथील २१ सप्टेंबरची कोणा एका बातमीदारानें पाठविलेली खबर लिहिली आहे त्यावरून कळतें कीं, तेथें त्या सुमारास पर्जन्य पुष्कळ पडला. पिकें चांगलीं झालीं आहेत. तेथची हवा खराब झाल्याकारणानें हिंदु व युरोपियन यांस रोगांचा संचार चालू आहे. नित्य गोरे व काळे यमसदनाप्रत कांहीं जातात. पुष्कळ सोजीर ताप, अतिसार यांचे पीडेनें तेथच्या इस्पितळांत पडलेले आहेत. बंडवाले यांचा उपद्रव म्हणून जवळ चाललेला असतो. ते जवळजवळचे गांवांत एथचे आपले तोफांचे अवाज ऐकत असतांही लूट जुलूम करिताहेत. अयोध्या हस्तगत करण्यास दुसरी जाजती फौज आल्यावांचून कांहीं उपयोग नाहीं. बंडवाल्यांची मजबुदी व हुशारी आंतून चाललीच आहे. एथून ५ कोशांवर दक्षिणेस बिजनूर गांव आहे, तें बंडखोरांनीं लुटून तेथील मोठमोठे हिंदुश्रीमान् यांस त्या लोकांनीं नेलें आहे. इतक्याच कोशांवर सिसांदीला म्हणून शहर आहे, तें बंडखोरांनीं तेथच्या राजापासून घेतलें आहे. तो राजा सरकारचे पक्षाचा आहे. त्यावर तेथून जवळ नौरंगाबाद शहर आहे तेथें बंडखोर हरप्रसाद, दिल्लीचा राजपुत्र व नकरशाहा यांसह वर्तमान असून त्याजवळ मोठी फौज व तोफा आहेत. औनिदा येथें उमरावसिंग हा आठ हजार फौज व तोफा यांनिशीं आहे. याखेरीज सर्व बंडखोर पुढारी आपल्या फौजांनिशीं असून त्या सर्वांचा मनसोबा एकदम मिळून सिसांदीवर हल्ला करावा असा आहे. लहानसहान जमीदार जे सरकारचे विचारानें आहेत, त्यांवर या लोकांचा त्रास वडोळा आहे. त्यांणीं आपले बचावाचा बंदोबस्त बराच केला आहे. बाराबंकी एथची व्यवस्था सिसांदीला प्रमाणेंच आहे. बंडखोर कानपूरचे रस्त्यावरील पांथस्थांवर हल्ले करितात. सरकारचे एके ठाणेदारानें त्यांपैकीं कांहीं पकडून कैद केले आहेत. अयोध्येची बेगम ही बनोरीस आहे. ती आपल्या लहान पुत्रास क्षत्रियविद्या शिकवीत आहे. तिचा मुसूमेलबी आहेच. दरिबादे पावीं गोग्रामदींत रामसिंग याचे हातांखालचे बंडवाले यांशीं आणि सरकारचे फौजेची गांठ पडली, त्याप्रसंगीं सरकारचे लोक ८०० आणि बंडखोर ५००० चार तोफांनिशीं होते, या लढाईंत बंडखोरांचा पुष्कळ नाश झाला; आणि सरकारचे फौजेपैकीं तीन गोरे एकंदर मेले, व जखमी झाले. त्यांत ७८ वे पागरे पलटणचा लेफ्टनंट म्याकफेनर ह्यास तरवारीचा मोठा झटका बसून ठार झाला.

---

कप्तान फ्रेंच हा सोननदी २० वे गुदस्त रोजीं उतरून आगबोटीचे साहाय्यानें सबर येथील नावांचा विध्वंस करून, दुसरे दिवशीं ते राहीस येथील नावांचा विध्वंस करावयास जागार होते. कर्नल वाल्टर हा बक्सरचे घा..र का— साथपर्यंत मजल करणार आहे. कारण, तेथें बंडवाल्यांची एक मोठी टोळी चालली आहे.

---

सर जेम्स औटराम यांस नेकनामदार कोर्ट आफ डिरेक्टर्स यांणीं जें वार्षिक पेनशन देण्याचें ठरविलें, परंतु तें पेनशन् त्याचे ज्येष्ठपुत्राचे हयात देण्याचा आणखी ठराव केला आहे.

# प्रख्यात हिंदु बंडखाराचा चेहरापट्टा.

| | नांव | जात. | वय | वर्ण | बांधाव मेरे | तोंडवळा. | नाकाची ठेवण. | डोकें व शरीरावयवाची ठेवण | विशेष कृत्रिमी खुणा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | धोंडोपंत ऊर्फ नाना साहेब. | दक्षिणी ब्राम्हण | ३२ | गोरा | पोट मोठें उंचीमध्यम | वाटोळा. | सरळ | शेंडी मोठी त्याचे पायाचे आंगठ्यावर डाक्तरचे ल्यानसेटची खूण आहे. | नवीन दाढी वाढविली आहे. यवनामध्यें दिसतो. हा बाजीरावाचा दत्त पुत्र आहे. |
| २ | गंगाधरराव ऊर्फ बाबासाहेब | सदर्हू | २८ | काळा | कृश परंतु उंच | लांवट. | लांब, वक्र | शेंडी मोठी तोंडावर वण. डुडये कांहीं फिरलेले. | धोंडोपंताचा बंधु व त्यांचे अमलांतील कम्यांडर इनचीफ (सेनापति) |
| ३ | नारोपंत ऊर्फ बाबा भट्ट | सदर्हू | ५५ | तांबूस | उंच | दीर्घवर्तुळाकृति. | लांब व रुंद | लहान शेंडी कर्डे केश. | धोंडोपंताचा आप्त नव्हे पण बाजीरावानें त्याचे बापास दत्तक घेतल्यामुळें संबंधी होय. |
| ४ | पांडुरंग ऊर्फ रावसाहेब. | सदर्हू | २० | गोरा. | पातळ व उंच | लांबट | लांब व रुंद मोठें. | मोठी शेंडी तोंडावर वण कुष्ट किंचित, व कपाळ उंच. | नानानें जप्त केलेल्या मामलतेची देखरेख करण्याचे कामावर नेमला आहे. |
| ५ | सदाशिवपंत ऊर्फ दगर | सदर्हू | ५५ | काळा | रुंद ठेंगणा. | पसरट | सदर्हू परंतु वाटोळा | तोंडावर थोडे वण. व बावळा आहे. | नानाचे अधिकाराखालीं एक सेनापति. |
| ६ | आबा धर्माधिकारी | सदर्हू | ६० | गोरा | लठ्ठ ठेंगणा | पसरट | चपटें, रुंद लहानें | कांहीं कर्डे केश. | नानाचे अधिकाराखालीं सेनापति |
| ७ | नारायण मराठे ऊर्फ ब्रह्मसेनापति | सदर्हू | ४२ | सदर्हू | ठेंगणा. | वाटोळा | सरळ, तांबूस व मोठें. | मोठी शेंडी. उजवे डोळ्यावर तरवारीचा घाव. | तात्याटोपे यानी जे हमी सही करी. व बाजीरायाचे सैन्याचा कप्तान. |
| ८ | तात्या टोपे. | सदर्हू | ३२ | काळा | बळकट उंचीमध्यम. | जाडा. | चपटें व मोठें. | तोंडावर थोडे वण. | याची बहीण बाळासाहेबास दिली आहे. |
| ९ | गंगाधर तात्या. | सदर्हू | २३ | गोरा. | सदर्हू | सदर्हू | चोंचीप्रमाणें तांबूस. | मोठी शेंडी. | बाबाभट्टाचा पुत्र बंडांत त्यास सहाय करी. |
| १० | रामचंद्र तात्या. | सदर्हू | २५ | तांबडा | कृश उंची मध्यम. | सदर्हू | लांब व काळें | सदर्हू | नानाचे ताब्यांतील बंडवाल्यांचे स्वाधीन प्रांत होते त्यांपैकीं कांहीं वरील अधिकारी केला होता. |
| ११ | जोला प्रसाद | कनोज्या | ४० | काळा. | कृश व उंच. | लांबट | लांब व सुंदर | तोंडावर वण डोक्यावर केश. व ठेंगणा. | नानाचे हुकमतींतला सैन्याचा पगार वांटणारा |
| १२ | गोपाळ सार | याची माहिती नाहीं. | | | | | | | |

सदरील चेहरेपट्टी कानपुरचे असिस्टंट कमिशनर लेफ्टनंट जे. पार्किस यांणीं केली आहे ती ग्याझिटावरून घेतली. आतां यावरून यांस कोणी पकडूं लागला असतां ओळखण्यास ही चेहरेपट्टी उपयोगी आहे. असें आम्हांस वाटतें.

# बाहेरील प्रश्नांचीं उत्तरें.

आम्ही आपल्या तारिख २० माहे सप्टेंबरच्या पत्रांत कपिलाषष्ठीविषयीं मजकूर लिहिला होता, त्यांत त्या पर्वाचा काळ आमचे मतें जो आला तो पंचांगांतील काळापेक्षां भिन्न होता. तेव्हां बाहेरगांवचे कित्येक ज्योतिष्यांनीं ग्रहलाघव वगैरे ग्रंथांवरून गणित करून पाहातां आंकडे त्याशीं मिळेना, म्हणून संशयांत पडून आम्हांस पत्रें लिहिलीं. त्यांतील हशील मजकूर हा कीं, आम्हीं जो पर्वकाळ आणिला हा कोणते ग्रंथावरून आणिला? सर्व ज्योतिष्यांस हें ठाऊक आहे कीं, ग्रहलाघव वगैरे ग्रंथांवरून जें गणित येतें तें प्रत्यक्ष दर्शनांत कधीं कधीं चुकतें, परंतु तें इतकें चुकून अमेळ असें त्यांस कधीं वाटलें नव्हतें. कपिलाषष्ठीचें पर्व आमचे मतें सकाळीं दोन प्रहरपर्यंत, आणि त्यांच्या मतीं संध्याकाळीं एक प्रहरपर्यंत. असा जेव्हां भेद आला तेव्हां त्यांस मोठा संशय उत्पन्न झाला. यांत नवल नाहीं. आतां कित्येक ज्योतिष्यांनीं आम्हीं हें गणित कोणते ग्रंथावरून केलें, व मराठी ग्रंथांत जो फेर पडतो, तो कोणकोणते ठिकाणीं किती किती पडतो वगैरे सर्व माहिती आम्हांस विचारली आहे; तर याचें उत्तर त्यांस देण्यास आम्ही फार खुषी आहों, परंतु त्या सर्व प्रश्नांचें सविस्तर उत्तर या ठिकाणीं आमच्यानें देववेल असें नाहीं. कारण, हा विषय मोठा गहन आहे, हा वर्तमानपत्रद्वारें पूर्णपणें समजाविता येईल असा सोपा नाहीं, तथापि, असल्या विषयास जितकी जागा आमच्या पत्रांत देववते, तिच्या मानानें हा विषय होईल तितका स्पष्ट करतों.

१ आमचे ज्योतिषाचे संस्कृत ग्रंथ जुने झाले, त्यामुळें त्यांत कांहीं अंतर पडूं लागलें असेल यांत संशय नाहीं. तसेंच आमचे वेधाचीं साधनें म्हणजे नलिकायंत्र इत्यादि, व कालमापनाचीं साधनें म्हणजे पाण्याची घटिका वगैरे इत्यादि यांणीं सूक्ष्म वेध करतां येतील असें नाहीं, तेव्हां अर्थात त्यांचे योगानें जे ग्रह व त्यांच्या गतींचें साधन केलें असेल तें बिनकसर असेल असें नाहीं.

२ आलिकडे युरपखंडांतील ज्योतिष्यांनी महान् महान् राजांच्या आश्रयाखालीं सूक्ष्म सूक्ष्म वेध, दुर्बिण, सूक्ष्मदर्शक, आणि घड्याळ यांचे योगानें उत्तम प्रकारचे ग्रहनक्षत्रांचे केले आहेत. त्यामुळें तेथील कोष्टकें फार सूक्ष्म व शुद्ध असीं झालीं आहेत, तेव्हां तीं कोष्टकें आणि आमचीं हिंदी कोष्टकें तपासून पाहिलीं म्हणजे लागलाच भेद लक्षांत येतो.

३ या कोष्टकांचें मराठी भाषांतर करून आमचे एक मित्र मुंबईस छापवीत आहेत, तें छापून तयार झालें म्हणजे त्यांस पाहिजे त्यांस त्यांचे योगानें आपआपले ग्रंथांचें अंतर काढतां येईल.

आतां आमचे वाचणारांकरितां व विशेषेंकरून ज्योतिषकारांकरितां मागील कपिलाषष्ठींत कसा फेर पडला तो संक्षेपानें आम्हीं खालीं लिहितों, त्याजवर लक्ष द्यावें.

पंचांगांत जे ग्रह लिहिले असतात ते निरयन असतात, ते सर्व सुमारें चारचार अंश चुकले आहेत. याचीं प्रमाणें.

१ रेवतीनक्षत्राचे योगतारेचे अंश सर्व संस्कृत ग्रंथांत शून्य शून्य असे दिले आहेत, आणि तो हल्लीं संपातापासून अयनांशाचे अंतरानें आहे असें म्हणतात. रेवती नक्षत्राचे ताऱ्याचा हल्लीं वेध केला म्हणजे संपातापासून १७ अंश ५४ कळा आहे असें अनुभवास येतें. आणि ग्रहलाघवादि ग्रंथाप्रमाणें अयनांश २२ अं. १६ कला आहेत, तेव्हां या दोहोंमध्यें अंतर येतें ती

अयनांशांची चूक. अंतर ४ अंश २२ कला आहे.

२ सूर्य ज्यावेळीं तूळ संपातीं जातो म्हणजे त्याची क्रांति जेव्हां शून्य होते, त्या वेळीं तो आणि रेवतीचा योगतारा, यांत अंतर मोजलें तर १९८ सुमारें येतें. हिंदी गणिताने त्या दिवशीं तें अंतर २०२ सुमारें असावें. तेव्हां अर्थात गणिताची ४ अंश चूक.

३ रेवती, मघा, वगैरे जे योगतारे क्रांतिवृत्तांत आहेत, त्या ताऱ्यांपासून प्रत्यक्ष चंद्राचें अंतर मोजलें, आणि गणितागत चंद्राचें अंतर किती असावें हें आणलें तर प्रत्यक्ष दर्शन आणि गणित ह्यांत ४ अंशांचें अंतर नजरेस येतें.

४ त्याचप्रमाणें गुरु वगैरे दुसरे ग्रह प्रत्यक्ष आणि गणिताचे असे तपासून पाहिले तर त्यांत अंतर येतें.

यावरून असें सिद्ध झालें कीं, रवि व चंद्र हे जे गणितावरून करावे, ते ४ अंश चुकले आहेत, तेव्हां त्यांपासून तिथि, नक्षत्र, योग, वगैरे साधण्यास प्रत्येकांतून पहिल्यानें सुमारें चार चार अंश वजा केले पाहिजेत.

याप्रमाणें फेर केला म्हणजे हें उघड आहे कीं, हल्लीं जें पंचांगांत गणित दिलें असतें त्यांत

सूर्य संक्रांतींत ४ दिवसांचा फेर येतो.

तिथींत फार पडावयाचा नाहीं, परंतु

नक्षत्रांत १५ किंवा २० घटिकांचा येईल.

आणि योगांत ३० किंवा ४० घटिकांचा येईल.

आतां आम्हांस इतकेंच कळवावयाचें राहिलें कीं, ज्या गृहस्थांनीं आम्हांस कपिलाषष्ठीचें गणित दिलें, त्यांणीं हें गणित इंग्रेजी पंचांगाचे आधारानें केलें, त्यांत सर्व ग्रह सायन दिले असतात, म्हणून गणित करण्यापूर्वीं प्रत्येक ग्रहांतून रेवतीचे योगताऱ्याचे सायन भाग १७ अंश ५४ कला वजा करून बाकी राहते निरयन झाले, त्यांपासून तिथि, नक्षत्र, व योग, हे साधले आहेत.

यावरील उपपादनावरून पंचांगांतील तिथि वगैरे चुकण्याचें कारण वाचणारांचे मनांत येईल अशी आशा आहे.

---

**शाळाखातें.**— डाक्टर हेन्स इन्स्पेक्टर हे या शाळांतील नोकरीचा राजिनामा देणार; याचें कारण असें ऐकतो कीं, इन्स्पेक्टरांपैकीं गुजराथचा इन्स्पेक्टर होप यास ७०० रुपये आणि हेन्स, व कप्तान लेस्टर यांस प्रत्येकीं १००० रुपये दरमाहा होता, तेव्हां यांचे प्रत्येकीं २०० रुपये कमी करून ते रुपये होपसाहेबांस वाढवले. तेणेंकरून प्रत्येक इन्स्पेक्टरास ९०० रुपये दरमहा आणि १५ रुपये भत्ता सारखा झाला, येणेंकरून हेन्ससाहेबांची त्या जागेवर राहण्याची खुषी नाहीं, असें दिसतें. असें घडेल तर कप्तान लेस्टर हे पुणे, सातारा, नगर, व सोलापूर या जिल्ह्यांचे शाळांवरच इन्स्पेक्टर राहतील असें वाटतें.

---

बंडवाल्यांची हलकी सालकी जिंदगी असेल तिचा लिलाव करावा, आणि मोठी मोलवान जिंदगी असेल, ती सरकारचे ताब्यांत ठेवून विकावयाचा विचार त्यांचे विचारावर ठेवावा, म्हणून ठराव सरकारचा झालेला आहे. असें कलकत्त्याचे इंग्लिशमान पत्रावरून कळतें. व त्यांत पत्रावरून समजतें कीं, सरकारानें वायव्य प्रांतांतील अधिकाऱ्यांस जेव्हां बंडें त्या प्रांतांत चाललीं होतीं तेव्हां लढायांच्या जागा वगैरेचे नकाशे व माहिती गोळा

करून उदेंत्या वेंडावलेल्या गांवांत व्यवस्था करणें आवश्यक आहे त्याकरितां पाठविण्याविशीं हुकूम केला आहे.

**चीन,**— एथील डाक आली आहे, त्यावरून कळतें कीं, चीनचे बादशाहाचा रशिया, फ्रेंच, व इंग्रेज यांचे बादशाहाबरोबर तह झाले आहेत. त्यांत रशियाचे बादशाहानें आपल्यास ७२,२५० चौरस कोश चीनचे बादशाहाकडून क्षेत्रफळाचा प्रदेश मिळाला आहे इतकें कळून येतें. सिंगापूर आसकाकें पाणी असें म्हणतात. त्या बेटांत केदी लोकांची भरती नवीन गेली आहे. आणि तेथें केदींनीं दंगा केला होता तो मिटला आहे.

---

आजचे पत्रीं कपिलाषष्ठीचे पर्वकाळाचे चुकीविशीं विस्तारपूर्वक लिहिलें आहे त्यावरून शेवगांवकर निश्चय करून येईल, सबब त्याचा मजकूर लिहिण्याचें कारण नाहीं. कपटाचे लग्नाचा मजकूर मागें येतला आहे.

आम्हांस पुणे विद्यालयाचे प्रोफेसर केरो लक्ष्मण छत्रे यांणीं धूमकेतू विषयीं पत्र लिहून पाठविलें आहे, त्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी झालों आहों, आजचे पत्रीं जागेचा संकोच असल्यामुळें तें छापण्यांत आलें नाहीं. गुरुवारचे पत्रीं तें आम्हीं अवश्य घेऊं.

---

## रत्नागिरी,

विजयदुर्ग तालुक्यांतील आडिवरे गांवापैकीं रुंडावाडयांत नदीपासून कांहीं अंतरावर समारें २०० हात लांब व कोठें तीन हात व कोठें दोन हात रुंद अशी एक मोठी भेग जमिनीस पडली आहे. तिची उंची किती आहे हें कळत नाहीं; परंतु एक दोन पुरुषांहून अधिक असेल असें वाटतें. ही भेग जिजें पडली असावी असें म्हणतात.

कपिलाषष्ठीच्या पर्वावर समुद्रस्नान करण्याकरितां बहुत यात्रा जमली होती. स्नानकाळीं एक मुलगा बुडून मरण पावला.

"बाळपांखरें" म्हणून लहान प्राणी माशांसारखे आहेत, ते बहुधा भातांत सांपडतात; डाकतर लोकांस पलीस्तराचे कामास त्या माशा उपयोगी पडतात, यास्तव त्या माशा जे आणून देतील, त्यास दर शेंकडा दोन आणे बक्षीस देत जावें. व हें काम दीड महिनापर्यंत चालवावें, असा सरकारचा हुकूम येथें आला आहे. त्याप्रमाणें मक्षिकावध सुरू आहे. पांच सात रोजांत ५० रु॰ गरीब कुणब्यांस मिळाले.

**क्षेत्र वाईयेथून**— येथें कपिलाषष्ठीनें स्नानाकरतां आसपासची २५-३० कोशांवरची यात्रा जमली होती ती समारें ३०००० होती असा अजमास होतो येथें पर्वकाळ २१ घटकांपर्यंत होता. आबालवृद्ध कृष्णाबाईचे स्नानार्थ सर्वजातीचे लोक तीरीं जमले होते तेणें करून किनारे व घाट गच्च होऊन अनेक रंगांही रूपांहीं व वर्णांही चित्रविचित्र फुलले होते. गडबड ओरडयांची तर सीमाच झाली होती. जिन्नसास मोठी किंमत आलेली होती. दानधर्म एक लक्षांवर झाला असें वाटतें. नदीचें पाणी लोकांचे बुड्या मारण्यानें गढूळ होऊन गेलें होतें. पोहण्याचे कामांत अडाणी अशांपैकीं, बुडून यमपथास जाण्याचे बेतास कित्येक लागले होते, परंतु अट्टल पोहणारांच्या योगानें वांचले. नंतर गेल्या गुरुवारीं कोणी एक जुन्नरकर देशस्थ ब्राह्मण साहुकाराचा नातु १९ वर्षे उमरीचा नगंगातीरीं स्नानास गेला तो बुडून मरण पावला. यात्रा हळू हळू येथून पाय काढूं लागली आहे. ता॰ १६ आक्टोबर

## मुकाम लश्करनजीक ग्वालेर, येथून ज्ञानप्रकाशास. मिती भाद्रपद वद्य ३ मंदवार

१ तीन चार दिवसांपूर्वी म्हणजे इंग्रेजी ता॰ २७ सप्टेंबर रोजीं श्रीमंत राजमान्य राजश्री दिवाणसाहेब यांचे वाड्यांत रात्रीं साहेब लोकांस मेजवानी झाली. या समारंभास येथील पोलिटिकाल एजंट, हामिल्टन साहेब यांचे जामात, कप्तान मिड साहेब, तसेंच आणखीही दोन तीन पलटणी साहेब लोक आले होते. श्रीमंत अलिजा बाहादुर त्यांचीही स्वारी त्याठिकाणीं आली होती. एक दोन घटिका नाच तमाशा होऊन शेवटीं अत्तर, हार, तुरे, गजरे, पानसुपारी, दिली. नंतर दारूची बरवात झाली.

१ चार पांच दिवसांपासून मोगलशापाचा पाऊस नें चालविला आहे. परंतु आमचे येथील नदीस पाणी दुसरे दिवशीं नवतें हें एक आश्चर्य आहे.

१ नरवार इलाख्यांत कोठें कोठें लूट मार झाल्याचें ऐकण्यांत येतें, जमीपाळ म्हणून एक ठाकुर आहे त्याणें अजमासें २०००।३००० पिंड जमवून तिकडे म्हणजे दुंडेरी इलाख्यांत मार हाण करण्याचे इराद्यांत तो आहे.

१ यक्षप्रश्नांत, यक्षानें धर्मराजास आश्चर्य कोणतें? म्हणून ९५ वा प्रश्न केला; त्याचें उत्तर, धर्मानें दिलें कीं, प्रतिदिवशीं मनुष्यें मरण पावतात हें आपण प्रत्यक्ष पाहून पुनः आपण अमर आहों असें जन मानितें, हें आश्चर्य. याच प्रमाणें राज्यकारणांत अगर फंदफितूरांत पडल्यानें परिणाम काय होतो हें आपले लष्करी कुटकधडधडीत पाहून पुनःही त्याच कामांत प्रवृत्त होत आहेत. हें पाहून दुःख वाटतें.

१ आलीकडील येक ज्ञानप्रकाशांत रघुनाथ भटजी वझे यांजवरील दोषारोपण उपटून टाकण्याकरितां म्हणून एक पत्र छापून आलें तें वाचून वझे यांची तबियत थोडी बहुत बरी झाली, परंतु त्यांचे दाढेचे व्यथेमुळें त्यांस बिलकुल चैन पडत नाहीं. औषधोपचार करितां सारा दिवस व कधीं कधीं रात्रीं देखील औषधाचे शोधांत घरोघर रखडत फिरतात, परंतु काय करावें समर्पक औषध अद्यापि मिळत नाहीं. व याबद्दल तात्यांनींही फिकिरींत पडूं नये. कारण, जितका भोग भोगणें या देहास आहे तेवढा भोगला पाहिजेच.

१ येथून कांहीं शिपाई बाडिगार्डचे काढून देण्याविशीं हुकूम झाला आहे.

१ दोन दिवसांपूर्वी सुमारें अडीच प्रहर दिवसास शुक्राचें नक्षत्र ढळढळीत दिसत होतें.

१ तात्या टोपे यांजकडून खबर घेण्यास म्हणून दोन शिपाई येथें आले होते, त्यांस धरून कैद केलें आहे.

आपला मित्र गोमागणेश.

---

हिंदुस्थानांत स्वारांची संख्या अधिक करावी, असा विलायत सरकारचा ठराव झालेला आहे. गोरे स्वार एकंदर विलायत आणि हिंदुस्थान ह्या दोन्ही देशांतील मिळून ३१००० असावे. व त्यांपैकीं १७,००० विलायतेस आणि १५,००० हिंदुस्थानांत असावे. याखेरीज हिंदुस्थानांत रेग्युलर स्वार व इरेग्युलर स्वार १४५०० असावे असा एक तक्ता तयार झाला आहे. गोरे स्वार हिंदुस्थानांत ठेविल्याचे योगें दरवर्षास ५००० सुमारे गोरे रिक्रूट रिसाल्यासाठीं लागतील.

---

**दक्षिणाकमेटी,-** इची सभा गेल्या सोमवारीं सायंकाळीं एथील अदालतींत भरली होती, तेथें मिस्तर हावर्ड विद्याखात्याचे डिरेक्टर गेले होते, त्यांणीं दक्षिणेकडे

सालीना ३०,००० रुपये सरकारची नेमणूक आहे. त्यापैकीं दक्षिणा देऊन जसजशी शिलक राहील, तसतसी दक्षिणा प्रैज कमेटीस देत जावी, आणि तिनें त्या पैशांत मराठी भाषेंत पुस्तकें बक्षिसें देऊन करवावीं. व छापावीं असा ठराव सरकारानें करून त्याप्रमाणें काम आजपर्यंत चाललेंच आहे. आतां हावार्ड साहेबांनीं सरकारास लिहून त्यांच्या मनाप्रमाणें सरकारानें त्यांस अनुकूल अभिप्राय दिला आहे. तो असा कीं, मुंबईस सरकारानें युनिवर्सिटी म्हणजे विद्यालयसमूह स्थापन केलें आहे. त्यांत विद्यार्थी पगारी करणार आहेत. त्यांच्या प्रती दोन पैकी एक प्रत दरमहा ५० रुपये, व दुसरी प्रत १०० रुपये दरमहा करणार आहेत. त्या विद्यार्थ्यांनीं स्वतः विद्याभ्यास करून व कांहीं वेळ इतर विद्यार्थ्यांस व्याख्यानें द्यावीं. आणि प्रतिवर्षीं प्रत्येक विद्यार्थ्यानें आपल्या देशभाषेंत एक पुस्तक करावें, असा ठराव केला आहे. पर त्या विद्यार्थ्यांस पगार त्या दक्षिणेच्या पैशांतून द्यावा. आतां दक्षिणेचा शिलक पैसा साल मजकूर पासून दक्षिणाकमिटीकडे न देतां अमानत ठेवावा. यावर विचार होऊन एथील यजंट साहेबांनें सांगितलें कीं, सरकारचा हुकूम एजेंटास आल्या वांचून ही व्यवस्था होणार नाहीं. आणि येथील संस्कृत पाठशाळेकडील शास्त्र्यांच्या परीक्षा घेण्याकरितां वे· शा· सं· रा· रा· नारायण शास्त्री थत्ते, नृसिंहाचार्य, आणि जनार्दनाचार्य वळे हे पंच होते. त्या कामाप्रीत्यर्थ त्यां प्रत्येकास १०० रुपये दक्षिणा मिळत असे. आतां त्यांचें कारण नाहीं सबब त्यांची दक्षिणा बंद होणार आहे. हल्लीं दक्षिणाकमेटीच्या पुस्तकाचें काम शिलक फार आहे. याकरितां दरमहा १०० रुपये पगाराचा आणखी एक रिपोर्टर म्हणजे पुस्तकें छापण्यास तयार करण्याकरितां नेमावा असा विचार झाला आहे.

असो ही व्यवस्था आम्हांस पसंद आहे; कारण कोणत्याही रीतीनें आपल्या देशभाषेंत पुस्तकसंग्रह होणें तो होईल. दक्षिणा ही ब्राम्हणसमूची सेनापति दाभाडे यांनीं चालविली. पुढें त्यांचा मोड पेशव्यांनीं केल्यावर लोकांत गवगवा झाल्यावर पेशव्यांनीं ती चालविली. पुढें पेशव्यांची अखेर झाल्यावर कंपनी सरकारानें सालीना ५०,००० पन्नास हजार रुपये या दक्षिणेप्रीत्यर्थ नेमणूक केली. नंतर चापूलेनचे कारकिर्दींत २०,००० रुपये त्यापैकीं काढून पुण्यास संस्कृत पाठशाळा स्थापन झाली. त्याचें आतां पुणें विद्यालय झालें. आणि बाकीचे ३०,००० तीस हजारांपैकीं एक तृतीयांश सुमारें वैदिक शास्त्री यांस पोंचत आहे. बाकीच्या तृतीयांशांत मराठी भाषेंत पुस्तकें होऊन, एथील मुलींच्या शाळा व अतिशूद्रांच्या शाळा यांजकडेस खर्च होत आहे, परंतु पुढें दोन तृतीयांश युनिवर्सिटीकडे जाऊं लागेल. असो या सर्व गोष्टीवरून तळेगांवचे सेनापति दाभाडे यांस आपण विद्येचें मूळ आश्रयदाते असें समजून त्या घराण्याचे उपकार आपले देशावर आहेत असें स्मरलें पाहिजे.

---

तात्या टोपे ग्वाल्हेराहून पराङ्मुख होतांना मार्गानें सिरोज यावर हल्ला करून तें शहर त्यानें लुटलें व जाळून टाकिलें. असें टेलिग्राफावरून कळतें.

**विलायत,**— गेल्या सेप्तेंबर ६वे तारिखेपर्यंतची विलायतची खबर मुंबईस आलेली बंबेच्या ग्याझिटांत छापली आहे त्यावरून समजतें कीं, विलायतेहून फौज हिंदुस्थानांत येण्याकरितां गलबत खबर वदून सिद्ध होत आहे. गेल्या जून महिन्यांत व तेथपासून आजवर समारें ५००० गोरें लष्कर हिंदुस्थानांत येण्याकरितां विलायतेहून रवाना झालें आहे, समारें ९०० रिक्रूट्स म्हणजे भरतीकरितां गोरे लोक रवाना झाले आहेत. त्यांपैकीं २०० गोरे बंगाल इलाख्यांसाठीं आणि १५० मत्येकीं मुंबई व मद्रास या इलाख्यांसाठीं वांटून दिले आहेत. तुर्कस्थान एशिया खंडांतील आणि ग्रीस देश यांचे दरम्यान भूमध्यसमुद्रांत द्वीपसमूह आहे, त्यांतील स्काशियो किंवा काश्च एथील फरासिस, आस्त्रिया, स्वतंत्रसंस्थाने, व ग्रीस एथील अंमलदार यांचा खून तेथचे लोकांनीं केला आहे. इंग्रेजांचा अंमलदार त्या प्रसंगीं खिडकींतून उडी टाकून बसल्यामुळें बांचला आहे. ह्या बेटांत मुसलमान व ग्रीक लोकांची वस्ती आहे. त्या बेटाची लांबी ११ कोस व रुंदी ३ कोस आहे. पूर्वीं तेथें २०,००० वस्ती होती पण आतां ४०,०० चार हजार स्थाने समारी आहे. हा दंगा होण्याचें कारण काय तें अद्यापि समजलें नाहीं. आट्लंटिक महासागरांतून विलायतेहून तारायंत्र अमेरिका खंडांत नेणार होते, तें काम त्यावरचे कमेटीनें अडचणीमुळें बंद पाडलें आहे. विलायतेस जंगबाहादुर जाणार आहे, अशी एक खुसकी बात उठाली आहे. हा नेपाळचा राजपुत्र कूर्गचे राजाचे एका कन्येशीं विवाहित आहे. त्या राजाची एक मुलगी हल्लीं विलायतें राणीची धर्मकन्या होऊन तिच्या आश्रयानें विद्याभ्यास करीत आहे. या जंगबाहादुराचें मनांत विलायतेंच्या एका श्रीमंत व बडे लोकांच्या कन्येनें विवाह लावावा अशी इच्छा धरून तिनें त्याबद्दल जंगबाहादुराशीं बोलणें लावलें. पुढें

सातारचे माजी महाराजांस इनामें, वर्षासनें, वगैरे देणग्या हयात किंवा वंशपरंपरा देण्याचा अधिकार होता असें कंपनी सरकारानें ठराविलें आहे. आतां पुढें त्या सातारचे महाराजांनीं दिलेल्या देणग्यांची चौकशी आवल्या पेशवाई देणग्यांची चौकशी होते आहे, अशीच केवळ होईल असें वाटत नाहीं, परंतु मागें ज्या चौकशी इनाम कमिशनराकडून सातारचे माजी महाराजांनीं दिलेल्या देणग्यांच्या झाल्या आहेत, त्या आतां बहुतेक फिरवण्यासारख्या असतीलच. तेव्हां त्यांणीं अपिलें कोणीकडे करावीं, याविशीं कांहीं कळत नाहीं, तथापि ज्यांचीं नुकसानें झालीं असतील त्यांणीं अपिलें इनाम कमिशनर यांचे पासून पायरी पायरीनें करून आपलें नुकसान काढून घ्यावें. ही मजल त्यांणीं सरकारापर्यंत केली असतां त्यांचा नफा होईल हें आम्ही समजतों. याकरितां ते यत्नास कमी करणार नाहीं. अशी आम्ही आशा करून आहों.

---

**सीलकोट,**— एथील १८वे गुरदसचे खबरेवरून कळतें कीं, १ सुभेदार, २ हवालदार, आणि १ नाईक यांस तोफेच्या तोंडीं दिलें आणि १५ शिपायांस फांशीं दिलें. हे सर्व लोक ४६वे कांळे पायदळचे होते. एक शिपाई आंदमान बेटांत काळे पाण्यावर पाठविला आहे.

---

कराची व मुंबई यांमध्यें तारायंत्र चालत्या महिन्याचे आरंभापासून चालू झालें आहे.

---

आम्हांस वांईचा राहणार भोंपळाभट्ट व्यंबक याचें पत्र पावलें. त्यापत्रास आमच्या पत्रीं जागा देणें योग्य वाटत नाहीं.

मागें मकेजवळील जद्दा बंदरीं आरब लोकानीं दंगा करून इंग्लिश व फ्रेंच यांस मारिलें, म्हणून तिकडे लढाऊ जाहाजें जाऊन त्या बंदरावर गोळ्याचा भडिमार चालला आहे. पण आरब लोकानीं दंगा केला होता सबब त्यांशिवाय दुसरे कोणाची नुकसानी होऊं नये म्हणून बाकीच्या मालावर निशाण्या केल्या होत्या. आरब लोकांचा जो माल किनाऱ्यावर होता वजी गलबतें समुद्रांत होतीं त्यांचा अगदीं नाश झाला. ज्ञानोदय.

---

सरकारानें नव्या २ काळ्या मायदळ पलटणी ३० वी आणि ३१ वी अशा केल्या आहेत. जुन्या पलटणींतीलच एकेक दोन दोन कंपन्या काढून त्यांची भरती केली आहे आणि त्याऐवजीं जुन्यांत उमेदवारांची भरती करणार आहेत. त्या नव्या पलटणी पैकीं ३१ वे सनदी वगैरे सनदी अंमलदार व शिपायी यांस हा लोक बरोबर एक गोरा अंमलदार देऊन मुंबईहून जळमार्गें कराचीस ताचडबोंबर रवाना केले आहेत.

---

## नेमणुका.

गुजराथ येथील घोग्याचा प्रोबेशनरी मामलेदार अज्जम रजाभाई आमृतलाल यांस त्याजाग्यावर मुकरार केलें असें — ३० वे काळे मायदळचा लेफटेनेंट एच. एच. एलियट यांस अण्याचा आकटिंग पोलिस सुपरिंटेंडेंट नेमिलें आहे. — मिस्तर आर. हेट याणें २७ वे मुदत रोजीं सदर अदालतीचे रजिस्टराचे कामाचा चार्ज घेतला. — नगरजिल्ह्यांतील आसिस्टंट कलेक्टर मिस्तर जे. एच. ग्रांट यांचे तालुक्यांत सनमनेर, मिस्तर एन. ई. जाकोंब यांच्यांत जामखेड तालुका, आणि राव बाहादूर जगन्नाथ गिरधरलाल आकटिंग डिस्त्रिक्ट डीपुटी यांचे वाट्यांत कोर्गी हे तालुके दिले आहेत. — कर्नल एच. बेटस यांस नेकनामदार गव्हरनर यांचा प्रायव्हेट सेक्रेटार नेमिलें आहे. — साहेब लोक परीक्षेत उतरले आहेत ते. मिस्तर सी. डब्ल्यू. बेल मराठींत, मिस्तर सी. ए. मिडल्टन मराठींत, मिस्तर एन. एम. डब्ल्यू. डानियल हिंदुस्थानींत, मिस्तर जे. हंटर हिंदुस्थानींत, खानदेशचे इंजिनीअरचे आफिसांतील आसिस्टंट ओव्हरसीअर बापू गणपत यांस नवेंबर अखेर पर्यंत तीन महिन्यांची रजा दिली आहे. छपर मायुनरचा सर्जंट हार्डी यांस आसिस्टंट ओव्हरसीअर नेमिले आहेत. येणे प्रमाणें सनदी आसिस्टंट ओव्हरसीअर नेमिले आहेत ते. दामोदर हरी, लक्ष्मण माहादेव, गणेश गोपाळ, दिनशा दादाभाई आणि शिवप्रसाद आंबिलाल.

---

गेल्या शनवारीं हिंदु नाटक ठरावा प्रमाणे पर्जन्य पडूं लागला या कारणानें झालें नाहीं. नाटककारांनी लोकांचा पैसा परत दिला ही गोष्ट चांगली केली. आतां ते येता बुधवारीं रात्रौ खेळ करणार आहेत, आणि शरभाचा चमत्कार बरोबर मागें न झाला सबब पुनरपि ते करून दाखविणार आहेत असें जाहिरातीवरून कळतें.

---

नेकनामदार गव्हरनर साहेब यांची स्वारी गेल्या शुक्रवारीं सर्व लोकांनिशीं येथून मुंबईस गेली.

हें पत्र ज्ञानप्रकाश छा. कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांनी छापिलें.

# ज्ञानप्रकाश.

गुरुवार तारिख १४ आक्टोबर सन्न १८५८ इसवी.

## जाहिरात.

सर्वांस कळविण्यांत येते कीं, आम्ही गोविंद जगन्नाथ गोखले, आम्हांस मनूबाई भ्रतार गणेश आनंदराव क्षीरसागर यांणीं करारनामा शके १७७१ भाद्रपद शुद्ध ९ स छापकागदावर लिहून दिला तो आनंदराव बापूजी क्षीरसागर यांणीं पाहाण्यास मागितल्यावरून दिला, तो विष्णु आनंदराव क्षीरसागर वस्ती पेठ कसबा शहर पुणें तुम्हांपाशीं आहे तो आमचा आम्हांस चार दिवसांत देऊन पावती घ्यावी. न दिल्यास त्याबद्दल आमचें सर्व नुकसान तुम्हांवर पडेल. तारिख १३ आक्टोबर स० १८५८ सही गोविंद जगन्नाथ गोखले द० खुद

## ज्ञानप्रकाश ता० १४ आक्टोबर स० १८५८

सरकारानें जे हे खबर करून प्रसिद्ध करण्यास बातम्या तारायंत्राच्या तीन दिल्या. त्यांवरून कळतें कीं, तात्याटोपे यांणीं ता० ८ आक्टोबर रोजीं इसागडावर हल्ला करून तो हस्तगत केला. त्यावर क्याप्टन मेयनी साहेब हे त्या ठिकाणीं ता० ६ मिनहूस जाऊन त्यांणीं असा रिपोर्ट करून कळविलें आहे कीं, रावसाहेब यांजबरोबर मोगजामदारखाना व पुष्कळ तोफा आहेत. त्यांणीं इसागड सोडून देऊन चांदेरीकडेस ता० ५ मिनहूस निघून गेले. तात्याटोपे व बाकीचें सैन्य ता० ८ आक्टोबर रोजीं प्रातःकाळीं रवाना झालें, ते त्याच दिवशीं रात्रीं चांदेरीस जाऊन पोंचलें असेल. या चांदेरीचे बंडवाल्यांस वेढा घालण्यास जाण्याकरितां महू व गुणा येथील टोळ्या, व ब्रिगेडियर स्मिथसाहेब याचे हाताखालची टोळी अशा तीन टोळ्या तयार होत आहेत.— त्यानंतर ता० ११ मिनहूची खबर तारायंत्रांतून सर राबर्ट हामिल्टन साहेब यांणीं इंदुराहून अशी पाठविली आहे कीं, तात्याटोपे यांणीं व त्यांचे सैन्यानें चांदेरी सोडून झांशीजवळ पचोरी म्हणून एक ठिकाण आहे त्यावर झडप घातली — करनल मिरामोर आपणावर चालून येत आहे असें ऐकून तात्याटोपे यांणीं उलटून बिटवा नदीचे कांठीं सिरस घाटावर म्हणजे झांशी व ललितपूर यांजकडेस रस्ता जात आहे त्यावर त्याकडे कूच केला. सिरस घाटापासून ४ कोसांवर दक्षिणेस कोट्याजवळ एक घाट आहे, तेथें त्याच्या जाण्याचा बेत असल्याचा दिसतो.— तेहेरी येथून ता० ५ मिनहू रोजीं अशी बातमी आली आहे कीं, ललितपूरचे डिपुटी कमिशानर साहेब हे तेहेरीहून कांहीं फौज घेऊन बानपुरास जात असतां ते बिटवा नदी उतरून गेल्यावर कल्याणपूर गांवाजवळ गेले तेव्हां त्यांजवर रामा कुभा या नांवाच्या बंडखोरानें आपले फौजेनशीं हल्ला केला, परंतु त्याचा मोड होऊन बंडवाल्यांच्या १७ असाम्या मारल्या जाऊन, त्यांणीं आपल्या तोफा गमावल्या. नंतर डिपुटीसाहेब हे बानपुरास दाखल जाले. पुढें कप्तान किली यांजबरोबर बंडवाल्यांची एके ठिकाणीं गोळागोळी जाली, त्यांत निमान व सारुआ येथील दंग्याचे आदिकारण सीताराम या नांवाचा मनुष्य मारला गेला.

आमचे ऐकण्यांत असें आलें आहे कीं, पुण्यानजीक हडपसराचे पलीकडेस फुरसंगी म्हणून एक गांव आहे तेथील लोकांत पदस्थापनेचे मानापानाबद्दल आपापसांत मोठी मारामारी जाली, त्याबद्दल त्याची चौकशी करण्यास पोलिस सुपरिंटेंडेंट यांची स्वारी काल पुण्याहून तेथें कचेरीस गेली आहे.

नाटककार येत्या रात्रीं उत्तररामचरित्रांतील लवकुश कथा रव्यात करणार आहेत

## धूमकेतु (शेंडेनक्षत्र)

धूमकेतूविषयीं पुढील मजकूर आम्हांस राजमान्य राजश्री केरोलक्ष्मणछत्रे पुणें विद्यालयांतील गणित, रसायन, व शिल्पशास्त्र यांचे प्रोफेसर (गुरु) यांजकडून मिळाला, तो लोकांनही सादर व्हावा, म्हणून आम्ही आमचे पत्रांत छापला आहे.

"हल्लीं दिवस मावळल्यावर पश्चिमेकडे आकाशांत जें शेंडेनक्षत्र दिसतें तें पूर्वीं विलायतेंत व अमेरिकेंत माहे मे आणि जून या महिन्यांत दिसत होतें. हें त्या वेळेस सूर्योदयापूर्वीं दिसत होतें, आणि त्यास शेंडी नव्हती, यामुळें साधारण लोकांचे ध्यानांत आलें नसावें; परंतु त्या वेळेस त्यावर जे वेध केले, त्यांवरून विलायतेंतील एका ज्योतिष्यानें त्याची कक्षा, गति, वगैरे काढून सप्तंबर अखेरीस हें पश्चिम आकाशांत दिसूं लागावें, म्हणून छापलें, तें पत्र आगष्ट महिन्यांत विलायतेंतील एका वर्तमानपत्रांत आहे. हें पत्र जेव्हां यादेशांत सप्तंबर अखेरीस आलें, तेव्हां कित्येक लोक आकाशांत पाहूं लागले तों खरेंच एक शेंडेनक्षत्र त्यांचे नजरेस आलें. या शेंडेनक्षत्रास विलायतेंत डोनाटीचा धूमकेतु असें म्हणतात. कारण, याचे गतीविषयीं नियम महिन्यापूर्वीं या साहेबानें काढून तेथील लोकांस प्रसिद्ध केले.

हें नक्षत्र पहिल्यानें जेव्हां दिसूं लागलें, तेव्हां वायव्य दिशेस स्वाती आणि सप्तऋषी यांचे मध्यें दिसत होतें. आतां तें हळू हळू पश्चिमेकडे येऊं लागलें आहे; पुढें नैरृत्येकडे जाऊन वारीक अंधुक होत होत सुमारें नोवेंबर महिन्याचे अखेरीस नाहींसें होईल.

ज्ञानसत्रावर आम्हीं पुणें मुक्कामीं जे वेध केले त्यांवरून हल्लींचे शेंडेनक्षत्राची जी स्थिति आम्हांस कळली, ती खालीं लिहिली आहे. ज्यांस जोतिःशास्त्रांतील पारिभाषिक शब्दांची माहिती असेल, त्यांस ही स्थिति समजेल.

| | विषुवांश अंश | मिनिट | क्रांति |
|---|---|---|---|
| ता० ३० सप्तंबर | १२ | १० | २७ उत्तर. |
| ता० १ आक्टोबर | १३ | १५ | २७ |
| ता० २ | १३ | २८ | २७ |
| ता० ३ पासून ६ पर्यंत आकाश अभ्रांनीं भरून गेलें होतें; यामुळें वेध करण्यास सांपडलें नाहीं. | | | |
| ता० ७ आक्टोबर | १४ | २६ | अंश २४ उत्तर |
| ता० ८ | १४ | ३४ | १७ |

यावरून असा सुमार होतो कीं, नोवेंबर महिन्याचे अखेरीस विषुवांश १८ आणि दक्षिणक्रांति ५० अंश या सुमारास शेंडेनक्षत्र नाहींसें व्हावें.

आपला मित्र केरोलक्ष्मणछत्रे.

खस्थ पदार्थ जे आपणास वारंवार दृष्टीस पडतात, त्यांस शेंडेनक्षत्रें फारच चमत्कारिक व दुर्मिळ आहेत; त्यांस बहुधा मागें शेंडी असते म्हणून त्यांस शेंडेनक्षत्रें असें म्हणतात.

शेंडेनक्षत्राचे तीन अवयव. एक, नक्षत्र किंवा डोकें, म्हणजे ज्या ठिकाणीं शेंडी एकत्र होऊन घनेजबिंदूसारखें दिसतें तें. दुसरें त्याचें वेष्टन, म्हणजे या तेजोमय बिंदूसभोंवतीं धुरासारखें वेष्टन दिसतें तें, आणि तिसरी शेंडी ही तर सर्वांस ठाऊकच आहे. त्याची

### आकृति.

कधीं कधीं या नक्षत्रांस शेंडी नसते व धूमासारखें वेष्टनही नसतें; याप्रमाणें एक नक्षत्र १६८२ मध्यें दिसत होतें, म्हणून एक क्यासिनी साहेब या नांवाचा विलायतेंतील जोतिषी म्हणतो.

कधीं कधीं मध्ये तारा व सभोंवतीं धुरासारखें

देऊन इतकेंच मात्र, परंतु शेंडी नाहीं. अशीं नक्षत्रें दृष्टीस पडतात. याप्रमाणें सन १५८५ आणि १७६३ या वर्षांत शेंडे नसतें आम्हीं होतीं.

परंतु बहुधा या नक्षत्रास शेंडी असते. कधीं कधीं दोन, चार, पांच अशाही शेंड्या असतात. सन १८२३ सांत जो धूमकेतु दिसत होता, त्यास दोन शेंड्या होत्या, असें म्हणतात. सन्न १७४४ सांत जो दिसत होता, त्यास सहा शेंड्या होत्या.

धूमकेतूची शेंडी, तो सूर्याचे जवळ असता म्हणजे बहुतकरून मोठी असते, परंतु तो जसजसा दूर जाऊं लागतो, तसतशी ती लहान आणि अंधुक होऊं लागते, आणि शेंवटीं नक्षत्र नाहींसें होण्यापूर्वींच नाहिंशी होते.

धूमकेतु हा काय पदार्थ असावा याजविषयीं अजून कांहींच बरोबर कळत नाहीं. काय जें समजतें तें हेंकीं, तें फार पातळ व धूम्रवत् पदार्थ असावे. कारण, त्याचा जो फार सतेज भाग त्यांतूनही इतर नक्षत्रें आरपार दिसतात. तसेंच त्यांच्यावर इतर ग्रहांचें आकर्षण लागू होऊन त्यांचे गतींत फार फेरफार होतात, परंतु यांचे सान्निध्यानें ग्रहांचे गतींत कांहींच विकार होत नाहीं. हीं नक्षत्रें इतकीं हलकीं असावींकीं, त्यांचे सर्व अंशसदा एके ठिकाणीं जमवून त्यांचा घट्ट पदार्थ केला, तर तो खंडी दोन खंडींवर वजनांत भरावयाचा नाहीं.

धूमकेतूंच्या कक्षा अविदीर्घ वर्तुळाकृति आहेत. किंबहुना कित्येकांचा तर परावलाकृति असाव्या असें वाटतें. हे पदार्थ तेज नाहींत, यांस तेज सूर्यापासून मिळतें. कारण, ते जसजसे सूर्यापासून लांब लांब जातात, तसतसे अंधूक होतात.

---

जनरल ग्रांट याची फौज सुलतानपुरास अद्याप आहे, आणि त्याचे कीं तेथून वरचेवर आसपासचे बंडवाल्यांवर जात असते.

फैजाबाद येथील फौज चांगल्या स्थितींत आहे, आणि सुलतानपुरापासून रस्ता खुला झाला आहे. या नवाबी मुलखांत जागोजागीं बंडवाल्यांचे समूह आहेत, असें समजतें. बांदा येथें बेगमचे पांच हजार लोक आहेत, आणि गोग्रा नदीचे पलिकडे तिची नऊ तोफांनिशीं अठराशें फौज आहे.

संडरपूर येथें बेनीमाधव याचे जवळ दाहा हजार लोक आहेत. सुलतानपुरानजीक मुजफरखानमुकामीं मेहंदी हुसेन हा सोळा हजार लोकांनिशीं आहे, असें म्हणतात.

या सर्व लोकांमध्यें रिक्रूट म्हणजे नवीन भरतीचे लोकच बहुतकरून आहेत. याचें कारण, शिपायांचे पलटणींतील लोकांची संख्या कमी झाली असावी.

---

**पैमाषखातें,**— एथें गेल्या आठवड्यांत पैमाषखात्याकडे परीक्षा देण्यास उमेदवार जमले यांच्या परीक्षा रिव्हिन्यु सरवे साहेब घ्यावयास लागले आहेत. सुमारें १०० उमेदवार परीक्षेस उतरतपर्यंत परीक्षा चालू राहणार आहे असें ऐकतों.

---

**रोहीलखंड,**— येथें बंडवाल्यांची फौज जमली आहे तिची संख्या पत्रानी येथील जमेदार लोकांचे पत्रावरून जी समजली आहे तिची याद दिल्ली ग्याझिट पत्रधारें टेलिग्राफ पत्रांत घेतली आहे तिजवरून समजतें, ती येणें प्रमाणें.

१ माजी मौलवी याच्या जाग्यावरील हल्लींचा मौलवी याजवळ ८ तोफा, स्वार व पायदळ मिळून १५०० यांसहित नरबर मुकामीं आहे.

२ खान अल्ली खान याजवळ १० तोफा, आणि स्वार व पायदळ मिळून १०००० मादरवाड येथें आहे.

३ शाहाबादचा इनायत अह्मा याजवळ १० तोफा २००० दोन हजार लोकांसह धसगान येथें आहे.

४ रघवरसिंग हा ४०० लोकांनिशीं मदरगडचे पूर्वेकडेस दळ देऊन आहे.

५ खान बाहादुर खाहा हा आपल्या फौजेस कुद्ध नहमदीचे प्रांतांत गुला येथें तळ देऊन पडला आहे असें म्हणतात.

यांखेरीज बंडवाले लोक पुष्कळ आहेत. तो गुल्यापासून २ कोसांवर जागेजाग दळ देऊन राहिले आहेत. ते ज्याकडेस एक रुपया जमिनीचा आकार येणें त्याजकडे पावणे दोन रुपये मागतात. दुर्दैवी रयत त्यांस दीड रुपया देण्यास कबूल आहे तथापी ते पावणेदोन रुपयेच घेऊं असें म्हणतात.

---

नबाबगंजाजवळ एक लढाई झाली, ती अशी कीं, आमचे पलटणी ५० लोक व दुसरे दगुनचा एक अमलदार असे ता. २८ सप्तंबर रोजीं नबाबगंजचे छावणीचे आसपास गस्त करीत असतां अजमासें एका कोसावर शत्रूचे स्वारांचीं दोन पलटणें होतीं, त्यांणीं आमचे लोकांवर खूब मार केला, परंतु आमचे लोकांनीं त्यांजबरोबर लढाई केली, तींत आमचीं चार माणसें मरण पावलीं व एक जखमी झाला. या चौघांपैकीं दोघांचीं डोकीं, मेल्यानंतर त्या निर्दय लोकांनीं कापून टाकलीं.

दिल्ली ग्याझिट पत्रांत झांशीजवळून आलेलें पत्र सामील जालें आहे, त्याजवरून समजतें कीं, एके दिवशीं बंडवाल्यांबरोबर लहानशी लढाई सुरू झाली होती, परंतु पाऊस पुष्कळ लागून चिखल झाल्यामुळें तोफा नेतां आल्या नाहींत. तथापि आमचे ५० स्वार, व १०० पायदळ यांणीं बंडवाल्यांकडील समारें १५०० लोकांस चोपून आपणाकडील मनुष्यास बिलकुल धक्का न लागूं देतां त्यांच्या तोफा हिरावून घेतल्या. दे. ग्या.

---

तारायंत्रांतून बातमी आलेली सरकारानें दिली, त्या आधारें कळतें कीं, ता. १० आक्टोबर रोजीं मिस्तरच्या नसफील्ड साहेब यांणीं सरकारास कळविलें कीं, मेजर किटीण साहेब यांजकडून कळलें आहे कीं, साहेब नहसूफ हे कांहीं स्वार घेऊन भिलांच्या बंदोबस्ताकरितां गेले होते, त्यांणीं सितारास हा त्यांचा पुढारी जंगला बाहेर सामान नेण्याकरितां आला होता त्याचा पाठलाग करून त्याबरोबर लहानशी लढाई होऊन त्यास किल्ल्यानजीक पकडला, त्यासमयीं १० अगर १५ असामी ठार मारले गेले. १६ कैदी केले, आणि त्यांचे घोडे वगैरे सामान हिसकावून घेतलें आहे.

दुसरी खबर ता. २ आक्टोबरची सदरील द्वारें आली कीं, सिरोज म्हणून जिल्हा भोपाळपासून समारें ७० कोसांवर पूर्वेस आहे तेथें बंडवाले, व ४ लहान तोफा, व वायकामुळें मिळून १००० व पुष्कळ जखमी यांसह आहेत. त्यांजवर आमचे ७०० ता. १० रोजीं सुरखल होऊन त्यांजकडे जनरल मिचन साहेब हे त्याच बाजूकडेस गेले, व ब्रिगेडियर स्मिथ हे गुण्यास गेले, व ब्रिगेडियर पार्क हे आग्र्याहून बडईस जाण्याच्या रस्त्यावर सारंगपूर व पचोर यांचे दर्म्यान आहेत. कप्तान बकलसाहेब उज्जनीत आहेत. कर्नल बेचर हे ८ वे मिनहूस सिहुरीचे छावणींत असावे. — भिल्लशीक, सिधवा घाटांत म्हणजे खिरपूर व नर्मदा यांचे दर्म्यानचे प्रांतांत सितारामाचे हाताखालीं जमा जाले होते, त्यांची दाणादाण होत चालली असें म्हणतात. कप्तान किंकेड साहेब ता. ७ मिनहूस सिधवा येथें दाखल होतील.

हें पत्र ज्ञानप्रकाश छा० कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांचे छा०

# ज्ञानप्रकाश.

वर्ष १०

सोमवार तारिख १८ आक्टोबर सन्न १८५८ इसवी.


**पत्राची किंमत.**

१० दरसाल रुपये. ९॥ आगाऊ दिल्यास.

**वसूल रुपये.**

१० रावसाहेब महादेव गोविंद शास्त्री इन्स्पेक्टर यां- जकडून सन १८५७ अखेर

२६ रा॰ परशुराम बल्लाळ स्कूलमास्तर पेठ राजा- पूर यांजकडून सन १८५८ अखेर.

## ज्ञानप्रकाश. ता॰ १८ आक्टोबर स॰ १८५८

कोठें ही अन्नाचा वास आला किंवा प्रयो- जनाची चाहूल लागली कीं, आगंतुक, किंवा भणंगभिकारी यांचे त्या ठिकाणीं थवेचे थवे दा- राबाहेर तिष्ठत उभे राहातात. कृभाकृभाचा वि- चार त्यांस कांहींच नसतो. त्यांस भोजनो- त्साहापेक्षां प्रिय कांहीं मोठें दुसरें नसतें. त- सें कोठें कांहीं बंड, दंगा, वगैरे उपस्थित झालें ही वार्ता श्रुत झाली कीं, ह्या आपल्या देशांती- ल उपद्रवी लोक हे तयार होऊन लूट, फूट, जाळ पोळ, हाणमार वगैरे करावयास लाग- तात. ह्या लोकांच्या नामांकित टोळ्यांच्या टो- ळ्या या देशांत जागजागीं आहेत. गुजराथें- त गिराशी, कोळी, वाघेर; सिंधेंत बलोची, महा- राष्ट्रांत भिल्ल, मावळे, मांग, रामोशी; कर्नाटकां- त पाळेगार, पेंढारी; मल्याळांत माफळे; तेलं- गणांत बेरड; निजामाचे मुलखांत रोहिले, आरब, असे आहेत. ह्या लोकांचें राहणें प्रा- यिकरून जंगलांत, खोऱ्यांत, असतें. यांचें उप- जीवन पराकाष्ठेचें नीच व दयाधर्मास वि- रुद्ध असें आहे. परंतु हे लोक अज्ञानी व निर्दय फार या कारणानें त्यांस कोणाचा ही कशाही प्रकारें ना- श करण्याविशीं कांहीं पर्वा नसते. यांस मरणें व मारणें यांचें कांहींच वाटत नाहीं. असो ह्या लोकांतून भिल्ल उठले आहेत, तसेच वाघेर व कोळी, गुजराथेंतले उठले आहेत, व ते त्याप्र- माणेंच पीडा प्रजेस करूं लागले आहेत. असें बंबे स्टांडर्ड पत्रावरून कळतें. या लोकांचा बंदो- बस्त सरकारास करण्यास फारसें अवघड नाहीं, आणि तो बंदोबस्त लवकरच होईल; परंतु ह्या जातीं आपल्या लोकांस ऐकून माहित असल्या पाहिजेत.

---

ब्रिगेडियर म्याकडफ याणें ५ वे गुदस्तरो- जीं झांशीचे परगण्यांतील बंडखोरांवर हल्ला केला, बंडखोर ३०० शिपाई व २००० बंदुकवाले होते, त्यांवर १००० स्वार व पायदळ मिळून फौ- ज जाऊन हल्ला केला. या फौजेंत ही झांशीचे पो- लिस पायदळ व स्वार होतेच. या लढाईंत बं- डवाले सुमारें २०० मारले, असा साहेब महसूफ यांणीं तर्क केला आहे. या लढाईंत लेफ्टनंट डिक ४ ठिकाणीं जखमी झाला, तरी त्यानें पांच माणसें तोडून मरण पावला अशी खबर लिहिली आहे.

माथेरान येथें आलीकडेस वस्ती विशेष होऊं लागली म्हणून तेथें पाट आणि पोलिस अ- शीं अफीसें झालीं आहेत. व हल्लीं नामदार गवरनर साहेब यांची स्वारी तेथेंच आहे असें समजतें.

## अयोध्याप्रांतांतील बंडखोर मुख्य सरदार व त्यांचा फौज फाटा.

हे लोक आम्हांस पुढील स्वारींत अटकाव करून अडथळे करणार आहेत, त्यांची कांहीं संख्या जागा वगैरे.

| नंबर | सरदारांचीं नांवें | तोफा | स्वार | पायदळ | छावणीची जागा |
|---|---|---|---|---|---|
| १ | बेगम. | | | | |
| २ | मनुखान. | १० | १००० | ८८०० | बौंडी |
| ३ | बरजीसकदर | | | | |
| ४ | बेणीमाधव | ६ | ४०० | ११००० | मसारपूर |
| | मशारनिल्हे. | ६ | १०० | ५००० | सालुन |
| | मशारनिल्हे. | १ | ० | ९०० | मौउराव. |
| ५ | जुगराजसिंग बेणीमाधवयाचा भाऊ | ५ | १५० | ५५०० | शंकरपूर किल्ला |
| ६ | नरपतसिंग बेणीमाधवाचा दुसरा भाऊ. | | | | |
| ७ | नांव समजत नाहीं | — | — | — | — |
| ८ | युसफखान | ४ | ३२० | ५२०० | फत्तेपूर |
| ९ | खुदाबक्ष | | | | |
| १० | सुलतानहुसेन | २ | ० | ३००० | हैदरगड |
| ११ | खानअल्लीखान | ९ | ६०० | ८००० | परुसरूम महमदी |
| १२ | जहुरअल्ली. | २ | ० | २२०० | नदिवा. |
| १३ | हरमशाह | | | | |
| १४ | फिरोजशाहा | ७ | ३५० | ६५०० | खैराबाद |
| १५ | लकरशाहा | | | | |
| १६ | गुलाबसिंग | ११ | १०० | २५०० | बिरवाकिल्ला. |
| १७ | नानाराव | | | | |
| १८ | बाळाराव | २५ | १८०० | १२००० | बहिराइच |
| १९ | खुदाबक्ष | २ | ० | ३००० | बिसनपूर |
| २० | उमरावसिंग | | | | |
| २१ | कालिकाप्रसाद | ४ | ३९० | ५००० | भोराज्यमली. |
| २२ | बाबूरामबक्ष | ७ | १८० | २५०० | धोडिखे किल्ला |
| २३ | हिदायतअल्ली | | | | |
| २४ | आमंदी | २ | ० | १८०० | भीरानके |
| २५ | बाहादुरसिंग | | | | |
| २६ | खानबाहादुर | ७ | ३५० | ५००० | हैदराबाद |
| २७ | नरपतसिंग | ८ | १५० | ६००० | रोहियाकिल्ला. |
| २८ | मेहरीहुसेन | १४ | ५५० | १५००० | कदुकानला |
| २९ | महमदहुसेन | ४ | १५० | २५०० | जगदीशपूर |
| ३० | साहाय | | | | |
| ३१ | बलदेवसिंग | १ | ० | ५००० | निगोहा. |
| ३२ | कीरतसिंग | २ | ० | ७८०० | बइराईकिल्ला |
| ३३ | दिग्विजयसिंग | ८ | ० | २५०० | रिश्रुत्याकिल्ला |
| ३४ | गुरुबक्षसिंग | | | | |
| ३५ | मनुसिंग मुलगा | ११ | २८० | ६५०० | भटोलीकिल्ला. |
| ३६ | राजासहिरराम | ३ | ० | ५८०० | रायणीकिल्ला. |
| ३७ | इयतउल्लाखान | | | | |
| ३८ | कासीफअल्ली | २ | ८०० | १२०० | संदीकिल्ला |
| ३९ | मजरअल्ली | | | | |
| ४० | हस्मीया | १ | ० | १००० | बलागराम किल्ला |
| ४१ | गजराजसिंग | ५ | ० | ४०० | तुर्शीपूरकिल्ला. |
| ४२ | फिदाहुसेन | १ | ० | १८००० | तिनापूर |
| ४३ | महमदअल्ली. | ३ | ८० | २८०० | मलापूरकिल्ला |
| ४४ | महबुबशाहा | | | | |
| ४५ | अबदुलबल्ली. | ३ | ६०० | ३००० | टिकापूर |
| ४६ | जनरलअशारखान | ३ | २५० | ७५०० | महमदपूर |
| ४७ | गजफरअल्ली | १ | ० | ३८०० | बइनाई. |
| ४८ | वल्लीबेग | १ | ० | १५०० | गोपामहू |
| ४९ | अजोध्यापरसाद | ३ | २५० | १२०० | लासंदी. |
| ५० | हणमंतसिंग | ५ | ३०० | ४८०० | कालाकंकर किल्ला. |
| ५१ | महमदअमीन | ३ | ० | १२०० | किताईकिल्ला |
| ५२ | वजीरअल्ली. | २ | ० | ११०० | बासाशालपूर |
| ५३ | दालसिंग | ८ | ० | ५०० | कजराकिल्ला |
| ५४ | आगाजान | ८ | ० | १००० | नरसिंगपूर किल्ला. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५५ | सफदोर — — | ६ | ० | ५०० | पीपरोसाकिल्ला. |
| ५६ | कनायसिंग — — | १० | ७५० | ६५०० | मटवलीकिल्ला. |
| ५७ | दारासान — — | २ | ० | २३०० | माहादेव |
| ५८ | रामसिंग — — — | ० | ० | १२०० | ठाकुरा |
| ५९ | गुलामहुसेन — } | ५ | १८० | ३८०० | तांडा. |
| ६० | करवासिंग — } | | | | |
| ६१ | देबीबस — — | ११ | ३५० | ७००० | लमती. |
| ६२ | तजमलहुसेन — | ४ | ० | ३००० | गरगाडाकिल्ला. |
| ६३ | अबेदअली. — — | २ | ० | १८०० | माहादेव. |
| ६४ | मुबारकअली. — | ० | ० | १००० | रामपूर |
| ६५ | अहमदरेजा — — | १ | ० | ११५० | सज्यवली. |
| ६६ | करज्यवली. — — | ३ | १२० | ५००० | करतगंज |
| ६७ | ज्यवसिंग — — — | २ | ० | १८०० | इकरेलिया |
| ६८ | जयलालसी. — — | ४ | २५० | ६२०० | फत्तेपूर |
| ६९ | खादनहुसेन — } | २ | ३०० | १००० | देवलीगदरा |
| ७० | गंगाधर — — — } | | | | |
| ७१ | आबेदखान — } | २ | २०० | २००० | बहिरामघाव |
| ७२ | भानखान — — } | | | | |
| ७३ | विलायतअहमद — | २ | ० | १८०० | सफीपूर |
| ७४ | बाळकराम. — — | ० | १०० | २५०० | बइनाई |
| ७५ | गंगासिंग — — — | १ | १५० | ३२०० | बागरमहूकिल्ला |
| ७६ | फजलहक — — — | ५ | ० | ११५० | पीयानी. |
| ७७ | मौलवी महंमद — | ० | ० | २००० | फत्तेपूर. |
| ७८ | मुसाहेबअली — | २ | ० | १२०० | उसमानपूरकिल्ला. |
| ७९ | दुर्गासिंग. — — — | ० | ० | १००० | बराहो. |
| | | ६४ | [illegible] | २४२१० | |

सदरहू बंडवाल्यांचे सरदार लोक हे लखनौच्या आसपास ९ कोसांचे पलिकडेस आहेत, असें बंबे म्याक्षिटावरून समजत आहे.

बंडखोरांच्या फौजांच्या यादी वरचेवर येतात, त्या आमचे पत्रांत, वेळोवेळी आम्ही आमचे वाचणारांकरितां देतच गेलों आहों. आतां त्या यादी सर्व तपासून पाहातां बंडखोर सरदार यांची संख्या पुष्कळ आहे. व ते बहुतकरून अयोध्याप्रांतांतच जागजागीं आहेत, असें दिसून येतें. या सदरील यादींत तात्याटोपे वगैरे आणखी पुढारी बंडखोर यांचीं नांवें नाहींत. तथापि या हिंदुस्थानांतील त्या बंडखोरांची फौज एकंदर तीन लक्षांहून जास्ती असेल, असें म्हणवत नाहीं. आणि त्यांत तयार शिपाई यांची संख्या फारच थोडी असून बाजारबुणगे व तरवारधाहार यांचाच भरणा बहुत आहे असें वर्तमानावरून समजून येतें. ग्याझेटांतील सदरील याद देणारा बातमीदार म्हणतो कीं, सरकारची फौज हुशार व कवायत शिकलेली त्या अयोध्या प्रांतींचे बंडखोरांवर लढून विजयप्राप्ति करून घेण्याकरितां लखनौमध्यें जमणार आहे. आतां नोवेंबर महिन्यांत लढाई त्या प्रांतीं मोठी होईल, आणि पुढें लढाया असेरपावेतों चालतील, असें वाटतें. सदरील बंडखोरांचा मनसोबा लखनौजवळील आलंबाग शहरावर हल्ला करण्याचा आहे, असें तो म्हणतो.

कोणत्याही देशाचे अगर तेथील लोकांचें वजन, वैभव, आणि ज्ञान हीं त्या लोकांच्या कृतीवरून कळून येतात, व त्यांपासून त्या देशाचें सौख्य दुर्दशेची तुलना ही करतां येते. हिंदुस्थान देश ज्या वेळीं उत्तरेकडून मुसलमान येऊन त्यांणीं हिंदूंपासून देश घेऊन ते राज्याधिकारी झाले. तेव्हां मुसलमान हिंदूंपेक्षां राजकीय व क्षात्रिय विद्यांत श्रेष्ठ होते. आणि म्हणूनच ते प्रजापालक जाले, व हिंदू त्यांची प्रजा झाली. असेंच एक देश दुसऱ्या देशास व्यापारांत, विद्येंत, राजकीय, धर्मसंबंधी इत्यादि कोणता-

ही विषयांत वर्चस्व दाखविते, तो देश त्या देशाहून श्रेष्ठ आणि दुसरा कनिष्ठ असें सहज समजून येतें. आणि त्या वरूनच त्यांच्या सौख्याचा न्यूनाधिक भाव विदित होतो. आम्ही बहुत वेळां लिहिलें कीं, युरोपखंडांतील प्रत्येक देश एशियाखंडांतील प्रत्येक देशाहून बहुतेक विषयांत श्रेष्ठ आहे. यास्तव त्या खंडाचें वर्चस्व व सौख्य या एशियाखंडांतील देशाहून अधिक आहे, यांत संशय नाहीं. त्या खंडांतील प्रत्येक देशाची सौख्याभिवृद्धी विषयीं परस्परैक्यता किती आहे हें समजून यावें या करितां आम्ही येथें आमचे वाचणारां करितां वर्तमान घेतों. युरोपखंडांतून एशियाखंडाशीं संबंध होणें तो जलमार्गांतून होतो, हें तर सर्वांस माहित आहे. विलायत, फ्रान्स, रूमशाम, रशिया, पुर्तकाल, व लंदेज वगैरे युरोपांतील देशाचे लोकांचे आपल्या एशियाखंडांत येणेंजाणें समुद्र व सागरांतून होतें, परंतु आर्बस्थान व मिश्र या दोन देशांचे मध्यंतरीं सुएज नामें संयोगीभूमि आहे, ती आपल्या देशापासून पश्चिम आणि वायव्य यांचे मध्यंतरीं असून सुमारें १२०० कोश दूर आहे. तिची लांबी सुमारें २५ कोश आहे, ती सर्व रेतीनीं भरलेली आहे. त्या योगें गलबतें व आगबोटी वगैरे जाण्यायेण्यास जवळचा रस्ता असून अडचणी बहुत येतात. तेणें करून व्यापाराचा माल नेण्या आणणाऱ्या व्यापारी लोकांस मोठें लांबचलांब जलपर्यटन करावें लागतें, तर ही नड काढून टाकावी, याकरितां कित्येक वर्षें त्या खंडस्थ लोकांचा विचार चालला आहे. हल्लीं तेथील विद्वान् इंजनियर वगैरे त्या कामांतील निपुण यांणीं शोध व खर्चाचा अजमास करून ती संयोगी भूमि तोडून आरबी आखात व भूमध्यसमुद्र हीं दोन्हीं एकत्र होऊन त्यांतून जाहाजें यावीं जावीं असा पाट बांधावा या करितां एक सावकार लोकांची मंडळी स्थापन झाली आहे. तिची सभा फ्रान्स देशांतील पारिस नामें नगरींत पुढील महिन्यांत भरणार आहे. या मंडळीचें भांडवल एकंदर ८,००००००० आठ कोटी रुपयांचें आहे. हें भांडवल देण्याचा ठराव झालेला आहे. तो मिश्रदेशाचे बादशाहानें १,२८००००० ; तुर्कस्थान, मिश्रदेश, आणि सिरिया या देशांहीं मिळून ८५,००००० ; फ्रान्स देशानें १,६०००००० ; आस्त्रिया, वेनिस, लांबर्ड, यांणीं ८०,००००० ; रशियानें, ४८,००००० ; जर्मनी, डेन्मार्क, आणि स्वीडन यांणीं ६०,००००० ; प्रशिया, स्वित्सर्लंड, हालंड, आणि बेल्जियम यांणीं ४०,००००० ; स्पेन, पोर्तुगाल, इटली, आणि ग्रीस यांणीं ४०,००००० ; अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानें यांणीं ४०,००००० आणि ग्रेटब्रिटन (विलायत) यांणीं १,६०००००० रुपये या प्रमाणें देण्याच्या वांटण्या केल्या आहेत. हें भांडवल जमा होण्याकरितां ४,००००० भाग करून दर एक भाग २०० रुपयांचा ठेविला आहे. हें कार्य सिद्धीस गेलें असतां युरोपखंडांतील लोकांचा व्यापार वगैरे संबंध बरोबर या एशियाखंडाशीं होऊन, त्यांच्या हरएक कृत्यास बळकटी व त्यांत समृद्धि झाल्यावांचून राहणार नाहीं, आणि हें कृत्य ते लोक करतील याविषयीं आगगाडी वगैरे त्या लोकांचीं कृत्यें पाहून आतां पूर्वीप्रमाणें खोटे अंदेशे लोक घेतील असेंही आम्हांस वाटत नाहीं.

---

दक्षिण आणि उत्तर भागचे रेविन्यु कमिशनर यांच्या स्वाऱ्या आपल्या दफ्तरांसह प्रांतांत फिरण्याकरितां एथून लवकरच निघणार आहेत.

# पुरवणी ज्ञानप्रकाश तारिख १८ आकुटोबर सन्न १८५८

## मुक्काम लष्कर नजीक ग्वालेर येथून

ज्ञानप्रकाशास मिती आश्विन वद्य १ गुरुवार.

१ घटस्थापना कोणते दिवशीं करावी, याजबद्दल बाईसाहेब यांजकडील व महाराजसाहेब यांजकडील शास्त्री मंडळींत पांचसाहा दिवसांपासून सभेवर सभा होत आहेत. एक म्हणतो गुरुवारीं, दुसरा म्हणतो शुक्रवारीं, या प्रमाणें तकार करून आपआपले पांडित्याचा विनियोग करून शहरांतील कसबवस्तूस या पंडित मंडळीनें त्रास आणून दिला आहे. पुण्याकडील एक नवीन उंटावरील शास्त्री रामाचार्य यांतील तेही आले आहेत त्यांचा तर तृतीय पंथच असो. भवति नभवति करून या + + + + मिळांचे शास्त्री पंडितांनीं इतर सभासदांचीं कर्णेंद्रियें बधिर करून टाकलीं, तथापि तकार आहे तशीच आहे. — सात आठ दिवसांपासून मेघराजानें तोंड अगदीं चुकविल्यामुळें थोडीशी उष्णता होत असते. — बंडवाले यांणीं इसागड म्हणून एक कसब्याची जागा आहे, तेथें हल्ला करून तेथील कसब्यास धरल्याची बातमी येऊन पोंचल्याचें ऐकतों. तिकडेस कांहीं फौज मुरारचे छावणींतून रवाना होण्याचा विचार ही लोक बोलतात. — चंदेरी ललतपुराकडे ही पुनः गडबड झाल्याचें वर्तमान आलें आहे, त्याजवरून समजतें कीं, बाणपूरचा राजा यास इंग्रेज लोकांनीं आम्यास पाठवून दिला, त्याचे भाऊबंदांनीं बाणपूरचे आजूबाजूस बखेडा करून एक दोन गोरे साहेबलोकांस धरून घेऊन गेले आहेत, परंतु या वर्तमानाचा खरेपणा अद्याप निश्चयात्मक सांगतां येत नाहीं. — तात्या टोपे यांणीं पुनः मोठी फौज बाजारबुणग्याची जमा केली म्हणून दाट बातमी आहे. त्याणें नवीन एक जाहिरनामा इंग्रेज लोकांचा नाश करण्याविषयीं व बंडास मदत करण्याविषयीं प्रवृत्त व्हावें या मतलबाचा लाविल्याचें येथें ऐकण्यांत येतें, परंतु त्यापासून तात्यास फायदा आहे असें स्वप्नांत देखील येत नाहीं. — येथें बागी लोकांस धरण्याचा कारखाना मोठ्या झपाट्यानें चालला आहे. रोज सुमारें ५०—६० तरी धरले जातातच. एकंदर बेरीज गेले आठवड्यांत २५०।३०० होईल. व पुढें तीन आठवड्यांत १००० किंवा चांगली कसरत केल्यास संख्या २००० वर जाईल. आतां यांत खरे बागी कोण व लोकांची आब्रू घेण्याकरितां अगर पूजा नैवेद्य वगैरे मिषानें किती आसामी अडकले आहेत, यांचा मात्र निर्णय करणें आहे. तो होणें तेव्हां होईल. इनसाफ करणारे अधिकारी चांगला इनसाफ करतील तर अनागोंदीचे जमाखर्चाप्रमाणें या बागींचाही होईल असें वाटतें. — हामिल्टन साहेबांचे जागात येथून लौकरच जाणार किंवा गेले असें लोक बोलतात. हे साहेब एक दोन महिन्यांत परत येतील असें वाटतें.

आपला मित्र मुशाफर.

---

महूचे लष्करानें हा दुसरा बंडवाल्यांबरोबर जय मिळविला याविषयीं खबर इंदुराहून लार्ड एल्फिन्स्तन साहेब यांस ता० ९ आकुटोबरची आली आहे कीं, मजबूर बंडवाले चार अगर पांच हजार लोक बांधाचे नवाबाजवळ असून अंगरोली येथें त्यांचा आमचे सैन्यानें केवळ पराभव करून आमच्याकडील विशेष नाश न होतां आम्ही बाबून्याच्या ६ तोफा घेतल्या, व १५० लोक मारले.

जनरल मिचल असें कळवितो कीं, १७वे वलंवाले त्यांपैकीं मझ्याजवळ ८० मात्र होते. बाकीचे ब्रिगेडियर स्मिथचे नैनातीस चंदेरीजवळ होते. हे सगळे माजजवळ असते तर बंडवाल्यांचा नाश अगदीं झाला असता. हे बंडवाले अंगरोली येथून चंदेरीकडेस पळून गेले. ही खबर ता० १३ वीस टंकाहून आली आहे.

दक्षिण महाराष्ट्र देशांत इरेग्युलर स्वारांच्या दोन पलटणी करून त्या पलटणींचे पगार, रोजमुरा वगैरेविशीं नेकनामदार गवरनरसाहेबांनीं मेहेरबान होऊन ठराव केले आहेत ते येणेंप्रमाणें.

| हुद्देदारलोकसंख्या | हुद्दा | दरमहापगार रुपये | आणे | पै. |
|---|---|---|---|---|
| | गोरेलोक. | | | |
| १ | कम्यांडेट दोहों पलटणींवर | १५०० | ० | ० |
| १ | दुसरा कम्यांडेट १ले पलटणीवर | ७५० | ० | ० |
| १ | किंवा २रे पलटणीवर | ७५० | ० | ० |
| १ | आज्युटंट १ले पलटणीवर | ४५६ | १० | ० |
| १ | किंवा २रे पलटणीवर | ४५६ | १० | ० |
| १ | असिस्टंट सर्जन १ले पलटणीवर | ५३० | ४ | ० |
| १ | किंवा दुसरे पलटणीवर | ५३० | ४ | ० |
| | | ४९७३ | १२ | |
| | काळेलोक दर एक पलटणींतील. | | | |
| ४ | रिसालदार | १५० | ० | ० |
| ४ | रसाईदार. | ८० | ० | ० |
| ८ | नायब रिसालदार. | ५० | ० | ० |
| ८ | जमादार | ४५ | ० | ० |
| ८ | कोटदफेदार. | ३५ | ० | ० |
| ६४ | दफेदार. | २० | ० | ० |
| ८ | निशानबारदार | २० | ० | ० |
| ८ | बाजेवाले. | २५ | ० | ० |
| ७५० | स्वार. | २५ | ० | ० |
| | | २२[illegible] | ० | ० |
| | शिवायकामगार. | | | |
| १ | वर्दीमेजर. | १०५ | ० | ० |
| १ | नेटीवरैटर. | ३० | ० | ० |
| १ | १ला असिस्टंट हास्पितल | १५ | ० | ० |
| १ | २रा किंवा. | १० | ० | ० |
| १ | नकीब. | २५ | ० | ० |
| १ | नवभरी. | १५ | ० | ० |
| १ | मुत्सद्दी | [illegible] | ० | ० |
| २ | तंबुवाले | ६ | ० | ० |
| २ | निशाणवाले. | ६ | ० | ० |
| ८ | भिस्ती. | ६ | ० | ० |
| १ | बिगुलवाला. | ५ | ० | ० |
| ८ | पेदफेदार | ६ | ० | ० |
| | बद्दल मुशाहिरा | २५९८ | ० | ० |
| | ७५० स्वारांस कवाइतीसाठीं | ० | १ | ६ |
| | मेसाकरितां. | ६० | ० | ० |
| | कागद वगैरेकडे | २० | ० | ० |
| | सादिलवार. | ११५ | ० | ० |
| | | २९५१ | ५ | १ |
| | एकंदर नेमणुक दरमहा दोन पलटणी मिळून | [illegible] | ८ | ० |

सदरील पलटणींत १ले क्लासचा असिस्टंट सर्जन नेमला असतां त्यास दरमहा पगार ६६५ रुपये आणि ५ आणे मिळेल. या पलटणींतील पगार वाढणें तो नोकरीच्या वर्षाप्रमाणें वाढेल. आणि या पलटणी जशा इतर रेग्युलर सरकारच्या पलटणी आहेत, त्यांप्रमाणें मानून त्यांस पेनूशनें वगैरे लष्करी रवाल्याचे कायद्यान्वयें मिळतील.

---

**अपमृत्यु.**— ता० ७ मिनहूरो जीं सांकाळीं एथील तांबडेजोगेश्वरीचे बोळांतील राहाणारा साळव्या शिंपी हा रविवारांतून परत घरीं येत असतां तरवारू आळींत त्यास ठेंच लागून पडला तो तत्काळ त्यायोगें मरण पावला. हा मनुष्य तरुण होता.

---

**नगर.**— येथील मित्राकडून ज्ञानप्रकाशास, मेहेरबान जड्ज्यसाहेब बाहादुर जिल्हा अहमदनगर, मांहीं ऑगस्ट महिन्यांत येऊन कामाचा सर्व निकाल केला आहे. ता० १ आक्टोबर रोजीं गांवें ९७ अपिलें शिल्लक होतीं. आतां आपिलें चुकविण्यास

सयार नाहीं. सदरील जिल्ह्यांत राहुरी, येवलें, व पिंपळगांव या ठिकाणचे दर एक कोडतास हजारांवर दावे शिल्लक असून बाकीचे कोडतांतील पांचशांचेआंत बहुधा शिल्लक नाहीं. याकरितां एक ज्यास्ती मुनसिफ नेमण्याविषयीं मेहेरबान जड्ज्यसाहेब लिहितील असें संभवतें. ता॰ भा॰ मजकूर ११

फ्रेंचाचें मारिशियस नामें एक बेट आफ्रिकाखंडाचे पश्चिमेस आट्लांटिक महासागरांत आहे. तेथें युरोपचे लोकांनीं वसाहत करून व उसाची लागवड करून साकर पिकविण्याचा मोठा कारखाना चालविला आहे. तेथें मजूर लोकांची भरती वरचेवर हिंदुस्थानांतून होतगेल्या महिन्याचे पहिले पंधरवड्यांत सुमारें ३५०० लोक त्या ठिकाणीं गेले. हिंदुस्थानांतून सिंगापूर, सिलोन (लंका) व मारिशियस, इत्यादि द्वीपांत आपल्या हिंदुप्रजेपैकीं मजूर लोक हमेशा व्यापारार्थी जातात. हिंदुधर्माचें मत आहे कीं, हिंदू जर हिंदुस्थान देशाचें सीमोल्लंघन करून गेला, तर तो हिंदुधर्मबाह्य होतो, परंतु आतां तें मत हिंदू मानिनासे झाले आहेत; असें दिसतें. हिंदू आरबस्थानांत, इराणांत, काबुलांत, चीन देशांत, ब्रम्हदेशांत, विलायत फ्रान्स वगैरे देशांत गेले आले आहेत. तेव्हां आतां हा प्रतिबंध कोणी हिंदू उत्तरोत्तर मानितील असें वाटत नाहीं. कारण कीं, हा प्रतिबंध जेस्ती हिंदू आहेत, ज्यांचें उदर पोषण या देशांत कशाही प्रकारें होतें, किंवा जे आळशी, भ्याड, व हाल काढणारे आहेत, ते या नियमानें वागतात असें दिसतें; परंतु ज्यांच्या विपत्तीस पारावार नाहीं, किंवा ज्या लोकांस विपत्ती प्राप्त होतात, अशा लोकांस हा प्रतिबंध उद्येन करण्याविशीं कांहीं वाटत नाहीं. ते त्यास मोडून टाकितात. आपल्या देशांत विलायतेच कांत सांपडलेले फार. श्रीमंत थोर अव इत्येव वर्तमानकाळच्या त्यांच्या रीतिभाती वरून सांपडतात. तेव्हां त्यांचे हातून आतांचे सृष्टीक्रमावरून परदेशीं जाण्याचा निर्बंध ठेवतो असें नाहीं. विलायतेस रंगोबापूजी गेला होता, गुजराथेंतील नरियादचा देसाई गेला होता. त्यांस जातीनें बहिष्कृत न करितां संतोषानें घेतलें. असेंच आरबस्थानांत किती एक ब्राम्हण सरवेयर जाऊन आलेले आहेत; आणि हमेष जात येत आहेत; ते सर्व ब्राम्हणजातींत पावन आहेत, असें आम्ही पाहात आहों. आतां अशा प्रतिबंधास लोक जुमानीत नाहींत यांचा आम्हांस संतोष मानला पाहिजे.

**प्रसिद्ध बातमी,**—आग्रयेथून ता॰ २७ सप्तंबरची बातमी आली आहे कीं, मेजर म्याकफरसन हे ग्वालेरीहून असें कळवितात कीं, मुंबईच्या जुन्या रस्त्यावर जे बंडवाले लोक जमा जाले होते ते नैऋत्य दिशेस आपला सरदार गंगासिंग याचे हाताखालीं कूच करीत आहेत. ही बातमी धवलपूरचे बातमीवरून कायम झाली.

हे बंडवाले तिकडेस निघून गेल्यानें ग्वालेरचा रस्ता मोकळा होऊन तारायंत्र कांहीं काळ पर्यंत बंद झालें होतें, तें पुनः चालू झालें.

ग्वालेरीहून ता॰ २ आक्टोबरचें पत्र आलें आहे, त्याजवरून असें समजण्यांत येतें कीं, शाहागडचा राजा हा ब्रिगेडियर स्टुअर्ट साहेब यांस आपले आपण येऊन भेटला असतां, त्यास साहेब मजकूर यांणीं तेथील किल्ल्यांतच कैद करून ठेविला आहे. या राजाविषयीं अशी आठवण धरावी कीं, जे गोरे लोक आपले हातास लागतील, त्यांस तळून टाकण्याविषयीं ज्यानें नियम केला होता तो हाच होय.

**पुणें**—येथील नदींत एक माहादेव धोंडपर हा सुमारें २२ वर्षांचा गेले शुक्रवारीं पोहत असतां थकून बुडून मरण पावला.— पोस्ट आफीसांतील रानरेटर याणें लोकांचें रजिस्टर केलेलें खोका फोडलेला वगैरे त्याच्या घरीं सांपडला त्याची शाबिदी होऊन डांकेच्या कायद्याचा आक्ट १८५४ चा १७ दरहुकूम त्यास २ वर्षें सक्त मजूरीची शिक्षा मिहेरबान टामस चारलेस रलफन्स साहेब सेशनजड्ज्य यांणीं दिली. जड्ज कोडतांत रामचंद्र धोंडदेव पटवर्धन वकील यांणीं एका पक्षकाराचे वतीनें असा अर्ज केला कीं, अस्सल दस्तऐवज माझे रिणकोचा फौजदारींत गुंतला तो माजी जड्ज्यांनीं परत न दिल्यामुळें दिवाणींत फिर्याद रिणकोवर करण्यास अडचण येऊन नुकसान होत आहे यास्तव तो प्रस्त ऐवज कोर्टांनीं आणवून परत देवावा, अथवा त्याची नक्कल आणवून त्याजवरून फिर्याद फैल करण्याविषयीं हुकूम मिळावा वगैरे मजकुराचा केल्यावरून ती सबब जड्ज्यास योग्य वाटून जरी वाहिवाट असल दस्तऐवजाखेरीज फिर्याद फैल करावयाची नाहीं तत्रापी अर्जदार याणें जें कारण समजाविलें ते बरोबर आहे, यास्तव नकलेवरून फिर्याद फैल करावी म्हणून हुकूम दिला.— एथील ब्रजलाल दुर्लभदास हुंडीवाला याचा वहिवाटदार विष्णुदास गुजराथी याजवर पोलिसाकडे हुंडीचे रुपये १०३ ज्यास द्यावयाचे त्यास न देतां दुसऱ्यास दिले. याबद्दल फिर्याद होऊन चोकशी चालत आहे. आतां या कामाची फिर्याद सरकारांत येऊं देणें हें सावकाराचे रीतीस बरोबर नाहीं— येथील बाजारांत सोन्याचा भाव चढला आहे धान्याचा भाव मंदीचा आहे कापूस एक रुपयाचा पाऊणशेर विकत आहे, याचें कारण कीं, डाक्टर गीबसनसाहेब यांणीं अरण्य रक्षण केल्यामुळें रेवेरांचीं झाडें तोडण्याची मनाई झाली, असें लोक सांगतात. हा पदार्थ जरी दिसण्यांत अल्प आहे तरी गरीबापासून श्रीमंतापावेतों जरूरीचा आहे.— एथील हवेली पोलिसचे हद्दींत चतुःश्रृंगीचे देवळांत एका बाईचे गळ्यांतून सोन्याची सरी चोरट्यानें काढून नेली. आतां सदरहू जागीं थानेच्या दिवशीं हवेली फौजदार यांजकडून बंदोबस्त कसा होता हें समजलें नाहीं.— येथें या आठवड्यांत पर्जन्य वरचेवर पुष्कळ पडत आहे, व उष्णताही बरीच जाणवत आहे यामुळें दृष्टी आणखी होईल असें वाटतें.— एथील सदर अमीन कोडतांतून एका पक्षकाराचें गणेशपेठेंतील घर लिलावांत भारी किंमतीचें असून, एकंदर किंमतीचे चतुर्थांशास कपटानें विकलें गेलें. याबद्दल फिर्याद जाल्यावरून रावसाहेब सदर अमीन यांणीं स्वतः जाऊन सदरहू घर पाहिलें, त्यावरून हें घर कपटानें विकलें अशी त्यांची खात्री होऊन हल्लीं याविषयीं खटला सुरू आहे. यांत खटपट कोणाची मुख्य तें असावी हें चौकशीअंतीं समजेल.

**नेमणुका,**—धारवाडचे मिस्तर टी. आंगल्वी, खानदेशाचे मिस्तर. एस्. म्यान्सिफल्डु, आणि सातारचे मिस्तर. जे. एन्. रास यामुख्य कलेक्टरांस त्यांच्या जिल्ह्यांत फिरावयास जाण्याची परवानगी जाली आहे. पेमास्तरखात्याचे कमीन मिस्तर. डब्ल्यू. जी. हारिसन यांस या महिन्याचे अखेरपावेतों १० मिनहूपासून रजा मिळाली आहे.

सरह्यू रोज साहेब यांची स्वारी येथून साताऱ्यास जाऊन तेथील लष्कराची पाहाणी करून माहाबळेश्वरास गेली. आबझर.

पुणें येथें शुक्रवारीं घटस्थापना होऊन रविवारीं दसरा झाला.

जंगबाहादुराविशीं अनेक कल्पना लोकांच्या चालल्या आहेत. तेव्हां खरी कोणती याचा अद्यापि निश्चय करवत नाहीं. आली कडे असा एक बूट निघाला आहे कीं, रशियाची मदत आंतून नेपाळचे राजास आहे. आणि ते बंड वाल्यांचा भार घेण्यास राजी झाले आहेत. नेपाळची आंतून बंडवाल्यांस मदत व फूस आहे, असा शक घेतात. असेंच काबुलचे राज्याविशीं संशय कोणी कोणी काढतात; परंतु इतका पल्ला या बंडखोर लोकांचा होऊन हे संस्थानी त्यांस आश्रय भूत होतील असा संभव दिसत नाहीं.

पंजाबांतील डेरा इस्मायलखान एथें रायल तोफखान्याच्या ५ कंपन्या, ७वी रायल स्युझिलियर्स अर्धी, घोड्याच्या तोफखान्याचा एक भाग, आणि २१ पंजाब पायदळ अर्धी मिळून ७०० दोंहुशार लोक २१ वे गुरुवारोजीं रवाना झाले, ते रामनगर आणि शाहापूरचे रस्त्यानें जाणार ती क्रमानें २० दिवसांनीं तेथें पोंचेल, डेरा इस्मायल खानाकडील विशेष खबरा मिळाल्या नाहींत. तेथें एके काळें पलटणींत कांहीं गडबड झाली आहे. दिराजतचे पंजाबी फौजेनें लक्षांत आणावें कीं, सरकारचे तेथचे आसपासचे मजबूत किल्ले व फौजा यांची तयारी कशी आहे.

आडाणी लोकांच्या युक्त्याही आडाण्या असतात. कोणतेंही काम ते करूं लागले, तर तें त्यांचें काय विलक्षणच व हसें येण्यासारिखें असतें. आणि तें त्यांनें दुष्ट प्रवृत्ती कडे असलें तर वरीक तें लक्ष लावून पाहाणें भाग आहे. आपल्या देशांत उत्तरभागीं बंड चालें त्यावर्षी त्या लोकांनीं चपात्या, डहाळ्या, बांग्यांचीं फुलें वांटलीं. कोठें कोठें नारळ, लाडू, व दुसऱ्या अशाच कांहीं जिनसा विलक्षण रीतींनीं फिरल्या. आतां सिंध प्रांतीं थर आणि पारकर या परगण्यांत एक याणेखडा कुत्रा फिरल्याचें वर्तमान सिंदियन पत्रांत त्यांचे हैदराबाद एथील बातमीदारानें लिहून कळविलें आहे. आतां हा कुत्रा कसा काय फिरला याची कल्पना आमचे दिलांत चांगली शी येत नाहीं, परंतु तो बातमीदार म्हणतो कीं, हा कुत्रा फिरला त्याविशीं लोक अनेक तर्क काढतात. कोणी म्हणतात कीं, ज्या तुरकस्थान मुलनाच्या बिघडून गेलेल्या पलटणच्या लोकांनीं आपल्यास येऊन मिळावें अगर त्यांणीं उठावें, या करितां हें त्यांचें कृत्य असावें. कोणी असें बोलतात कीं, सिंध प्रांताचे हद्दीवरील खुशाल सिंग लुटारू हा दंगा करीत आहे. त्याणें आपण आलों असतां खंडण्या द्याव्या म्हणून इशारत करण्यासाठीं हें कपट केलें असावें. कोणाचा तर्क हा कीं, नाना साहेबांनीं हा कुत्रा फिरविण्याचें कृत्रिम चालविलें आहे. कसेंही असो, पण हा प्रकार खरा असेल तर तो अनर्थापातास कारण होईल. तथापी सरकार जागृत आणि हुशार आहे. आणि जोधपूर, जसलमीर, कच्छ, व भावलपूर हीं शेजारचीं संस्थानें जोंपर्यंत सरकाराशीं इमानानें वर्तताहेत, तोंपर्यंत त्या सिंधप्रांताला कांहीं एक धोका नाहीं.

सातारचें बोधामृतपत्र तेथील माजिस्त्रेट साहेबांनीं बंद केलें होतें, त्याविषयीं कारखान्याचे मालकानें मेहेरबान रोज साहेब यांस अर्ज केल्यावरून त्यांस परवानगी मिळाली आहे.

आम्ही आमचे ४थे मिनहूचे ज्ञानप्रकाशांत मालेगांवचे बातमीदाराकडून आलेलें ब्राम्हणांचें खानेप्रकरण थोडक्यांत छापलें. त्यावर तेथील एक पत्र अनाथाचे दुःखहरणार्थ झटणारा खेड्यांतील विद्यार्थी याचें ८ वे मिनहूचें आलें, त्यास जागा आमचे पत्रीं आज देण्यास राहिली नाहीं. त्या पत्राचें हशील पाहातां कित्येक थोर गृहस्थ कांहीं तेथचे गोरगरिबांवर छापविण्याचा आळ घालून फिर्याद करणार असें लिहिलें आहे. थोर आहेत, ते या अशा पंथाला धारण करणारच नाहींत. ब्राम्हणांच्या खरेपणाविशीं कोडतानें इनसाफ केल्यानें खरेपणा येतो असें नाहीं. प्रवशाचे गृहीं भोजन ब्राम्हणाचें न झालें, आणि त्यानें शेजारीं पाजारीं शिधा वगैरे देऊन करविलें, तरीं धर्माचरण घडलें म्हणून कोणी हिंदु खरा शास्त्री संमति देईल, असें नाहीं. यास्तव आम्ही आतां अशा मजकुरावर लक्ष ठेवून विस्तार करण्यास खुषी नाहीं. जर फिर्याद वगैरे जरूर गोष्टी झाल्या तर मात्र आमचे बातमीदारानें थोडक्यांत कळवावें. याखेरीज लोकोपयुक्त बातम्या, ज्ञानपर, रंजनपरविषय, लिहिण्यापासून वाचणारांस लाभ अधिक होईल. यास्तव अशा विषयावर आम्हीं आपलें लक्ष पोंचवावें असें वर्तमानकाळीं आम्हांस प्रशस्त दिसत नाहीं. आणखी ब्रम्हद्वंदादि याविशीं सक्रोध होणार नाहींत अशी आमची आशा आहे.

---

बडोदें— ता. ७ आक्टोबर— एथें ता. २७ सपटंबर रोजीं शेंडेनक्षत्र पश्चिमेकडेस दिसत आहे. या विषयीं स्वदेशीय लोक असें म्हणतात कीं, हें नक्षत्र उगवूं लागल्यामुळें एखादे राज्यावर मोठी आफत गुदरेल, व ती युरोपखंडांत होईल. असें अनुमान करतात. आतां तें काळक्रमेकरून समजून येईल. आतां त्यांचे भाकिताप्रमाणें म्हटलें तर प्रथमतः फिरंगस्थानांतील मुसलमानी राज्य नष्ट होईल. हें भविष्य पाहून एथील बडोद्याचा किल्लेदार रघुनाथराव धायबर यांचा मुलगा भाऊसाहेब याणें आपले कुटुंबास टिका करून सांगितलें कीं, एखादें राज्य लयास जाईल, अगर कोणी मोठा मनुष्य मृत्यु पावेल, इतक्यांतच थोडे वेळानें तो आपणच स्वतः मरण पावला. काय हो! ईश्वराची अगाधकरणी पाहा, हा मनुष्य पूर्ववयांत असून राजसंपत्तीचे उपभोगांत असतां मृत्यु पावला. हा मुलगा बडोदेकर महाराज खंडेराव आपासाहेब यांचा पुतण्या होता, असें म्हणतात. याचे मरणानें तेथील लोकांस दुःख वाटत आहे. व हा लोकांस आवडत होता. सदरहू मजकूर टेलिग्राफावरून घेतला आहे.

---

तात्याटोपे याणें पुनरागमन अयोध्येच्या बाजूस केलें असें त्याच्या मुक्कामावरून कळून येतें. तात्या आतां काल्पीच्या बाजूकडे वळला असें त्याच्या रस्त्याचे धोरणावरून दिसून येतें. सर कालीन क्यांबेल कम्यांडर इन्चीफ हे स्वस्थ बसले आहेत, असा अंदेशा आम्हांस होता, परंतु फ्रेंडआफइंडियाचे लिहिण्यावरून तो अंदेशा आतां दूर झाला आहे. साहेब मशहूर हे जरी आपल्या मसलती सर्वांस प्रसिद्ध करीत नाहींत, तरीं ते त्या अयोध्याप्रांतांतील बंडखोरांचें एकदम दमन व्हावें, अशा विषयींची तयारी, व योजना करिताहेत. आतां अशा शूर पुरुषानें असेच विचार केले पाहिजेत, परंतु ते लवकर अमलांत आणावे, अशी इच्छा आहे. आणि तें येत्या हिवाळ्यांत अनुभवास व दृष्टोत्पत्तीस येईल असें वाटतें

बंगाल सरकारानें असा नियम केला आहे कीं, दिल्लीचा पदच्युत राजा यास दिल्लीहून कलकत्त्यास आणावा, आणि त्याची स्वारी येऊन पोंचल्यावर त्यास ठेवण्याचे ठिकाणाचा विचार होणार आहे. असें कलकत्याकडील पत्रावरून बंबेग्याझिटांत लिहिले आहे.

---

तुर्कस्थानची राजधानी इस्तंबोल येथून ता. ११ समंबरचें एके पत्रांत असा मजकूर आहे कीं, जुडा शहरावर भडिमार करून पेरिम या नांवाचे बेटांत इंग्रेजलोकांनीं फौज ठेविली याचें कारण काय हें फोदपाशा म्हणून शहरांत दाखल झाल्यानंतर इंग्रेजसरकारास फोदपाशा विचारणार अशी तेथें अफवा होती यावरून इंग्रेज व तुर्क यालोकांमध्यें वांकडें येण्याविषयीं अंदेशा भास जाला आहे; परंतु तो निरर्थक आहे असे आम्हांस वाटतें. बंबेग्या.

---

आम्हांस इंडियन एम्पयरचे पत्रावरून टेलिग्राफ आधारें भरंवसा ठेवण्याजोगे ठिकाणाहून बातमी लागली आहे कीं, नेपाळचे दरबाराबरोबर आमची दोस्ती आजवर होती, परंतु अलीकडेस तींत फरक येऊन त्या सरकाराबरोबर लढाई बहुतकरून होईल असें वाटतें.

---

**मृत्यु,** बंबेटैम्सवरून वृत्तसारआधारें असें समजतें कीं, हैदराबादचे नबाब यांस आलिकडेस मुलगा जाला होता तो ता. २७ सपटंबर रोजी मरण पावला, येणें करून हैदराबादचे नबाबास आणि त्या शहरचे लोकांस दुःख जालें आहे.

---

मुंबई इलाख्यांत लष्करी खात्यांत २९ काळ्या पायदळ पलटणी आहेत, आतां आणखी नव्या ३०वी, आणि ३१वी, या दोन काळ्या पलटणी सरकारानें केल्या आहेत, त्यांकरितां जुन्या पलटणींतील अंमलदार काळे लोक त्यांची बदली करून या नव्या पलटणींत वरच्या अमलदारीवर चढविले आहेत त्यांची नवनिशी येणें प्रमाणें.

३०वी काळी पायदळ.

| नंबर | कितवी पलटण | नांव आणि हुद्दा | चढविले ला हुद्दा |
|---|---|---|---|
| १ | ३री काळी पायदळ | माधादीन, जमादार. | सुभेदार |
| २ | ५वी ३ट किल्ला | संवरसिंग, जमादार | सुभेदार |
| ३ | ६वी —— | लछन, जमादार | सुभेदार |
| ४ | १८वी, —— | नारायण सिंग, जमादार | सुभेदार |
| ५ | २०वी, —— | सभा, जमादार. | सुभेदार |
| ६ | ४थी, रैफल —— | मद्दारी, कलरहवालदार | जमादार |
| ७ | ९वी, —— | देवी सिंग, कलरहवालदार | जमादार |
| ८ | १९वी, —— | शेख अबदुल करीम कलर हवालदार | जमादार |
| ९ | २२वी, —— | गोविंदराव शिंदे हवालदार मेजर | जमादार |
| १० | २७वी, —— | शंकर फाटक हवालदार | जमादार |
| ११ | २६वी, —— | हुसकिलजी इस्मायल हवालदार | जमादार |
| | | ३१वी काळी पायदळ. | |
| १ | ८वी, काळी पायदळ | रामदीन चौबे, जमादार | सुभेदार |
| २ | १४वी, | बापु भिल्लारा, जमादार | सुभेदार |
| ३ | १७वी, | गणेशसिंग, जमादार. | सुभेदार |
| ४ | २४वी, | अमृतजी खर्वा, जमादार. | सुभेदार |
| ५।६ | २५वी, | चितासिंग व राघुजी पवार जमादार | सुभेदार |
| ७ | १३वी, | मातादीन, तेवारी, कलरहवालदार | जमादार |
| ८ | १४वी, | गुरुदयाल उपाध्या, कलरहवालदार | जमादार |
| ९ | २४वी, | बावन खान, कलरहवालदार | जमादार |
| १०।११ | २५वी, | गणू पवार कलरहवा० व रमजान खान हवालदार | जमादार |

---

गुजराथेंत मही नदींत एक बोट लोकांनीं भरून जात असतां ती वाऱ्याच्या सपाट्यानें उलथी होऊन ५० मनुष्यें बुडालीं अशी खबर आली आहे.

लखनौ एथील सिलिमपूरचे बंडवाल्यांवर २५० पोलिसस्वार व ४०० पोलिस पायदळ, व दोन तोफा इतक्या सरंजामानशीं मेजर बल्वार ह्यानें त्या ठाण्यास वेढा घातला. बंडवाल्यांनीं तेथें फार बंदोबस्त केला होता. लढाई होऊन बंडवाल्यांचे ६०० । ७०० लोक मारले गेले. ४ तोफा, हत्यारें, व २ हत्ती हीं घेतलीं. ही गोष्ट ७ सप्तंबर रोजीं घडली. यांत ७ मुख्य बंडखोर मारले गेले. गोरे २ मेले, लेफ्टनंट बूर जखमी झाला. पोलिसांतील ५ मेले व १ घोडा जखमी झाला. यावरून पाहातां आपले सरकारचें काळें पोलिस किती हुशार आहे हें कळून फार संतोष होतो.

---

बंगालगिझिटांत प्रयागाहून ता. ५ मिनहूची खबर कप्तान मेनसाहेब यांजकडून आलेली प्रसिद्ध झाली आहे, त्यावरून समजतें कीं, साहेब महसूफ यांणीं ता. ३० स. रोजीं ४०० स्वारानिशीं सिरोंज (सागराचे आलिकडेस सुमारे ३० कोसांवर एक किल्ला करिमखा पेंढारी याचा असें म्हणतात आहे) एथून कूच करून पश्चिमेकडेस गेले. तात्या टोपे, बांधाचा नबाब, रावसाहेब, रहीम अली, व आदील महमद खान, हे १४००० बंडवाले ५ तोफांसहीत मोगलसराईकडेस ता. २८ सपटंबर रोजीं पळून गेले. ते मार्गांत असें बोलत कीं, आम्ही ईशानगरास जात आहों. यांजबरोबर ४० जखमी व पुष्कळ बायका यामुळें ही आहेत. कप्तान मेनसाहेब ता. १ आक्टोबर रोजीं पचोर येथें दाखल झाले, तों शत्रूची दोन्ही अदले दिवशीं संध्याकाळीं पचोराहून निघून ६ कोसांवर सारिंगपूर येथें जाऊन राहिली होती. कप्तान मेनसाहेब यांणीं गुण्यास जाण्याचा रस्ता खुला करून तेथें पत्रव्यवहार सुरू केला आहे. व त्याचे मनांत दंगेवाल्यांचे दुमाल्यावर राहावयाचें आहे.

---

आलिकडेस जंगबहादुर नेपाळाहून १८००० फौजेनशीं निघून दार्जीलिंगचे छावणीवर येऊन हल्ला करणार अशी जी वदंता उठली होती, तिजविषयीं हल्लीं बातमी समजली ती खालीं लिहितो: दार्जीलिंग येथील सुपरिंटेंडेंट डाक्तर क्यांबेल यांणीं नेपाळास बातमी करितां कोणी पाठविले होते, त्यांणीं तेथील रेसिडेंटाचें पत्र आणिलें त्यांत अशी बातमी कीं, नेपाळचे राज्याची सर्व स्वस्थता आहे. व लढाईप्रकरणीं कांहीं चिन्हें दिसून येत नाहींत. जी भीति दार्जीलिंग येथें इंग्रेजलोकांमध्यें उगीच पसरली होती ती आतां नाहींशी होऊन लोकांचीं मनें शांत झालीं आहेत; याविषयीं फार लिहिणें नको, प्रत्यक्ष जंगबहादुर याचा पुतण्या हल्लीं डाक्तर क्यांबेलसाहेब सुपरिंटेंडेंट यांजबरोबर आहे.

---

हिंदुस्थानांतून विलायतेस प्रतिवर्षीं लोकर जास्त जाऊं लागली आहे. सन १८५२ सालीं ७८०००० आणि सन १८५७ सालीं १९३७००० रत्तल रवाना झाली, यामुळें तिकडून आलिकडेस लोकरीचीं वस्त्रें बहून स्वस्थ दरानें येऊं लागलीं आहेत असें दिसतें.

---

विलायतेस लंडन नामें राजधानींत एका दलालानें आपली मुलगी मारून पुरून ठेविली होती ती सांपडून चौकशी सुरू आहे.

आरबस्थानांतील एदन एथें महामारीचा उपद्रव फार पडला आहे.

हें पत्र ज्ञानप्रकाश छा० कृष्णाजी त्र्यंबक रानडे यां० छा०

# ज्ञानप्रकाश.

गुरुवार तारीख २१ आक्टोबर सन १८५८ इ.

## जाहिरात.

सर्वांस कळवितों कीं, गोविंद जगन्नाथ गोखले आम्हांस गणेश पांडुरंग शालिग्राम यांणीं चिंतो कृष्ण किवे यांजकडे पैसा येणें विशीं कागद दिले. पुढें शके १७७१ कार्तिक शुद्ध १ रोजीं वेचन लिहून दिलें त्यांत कोणतेही कारणानें फिर्यादीस किंवा पैशास हरकत आली तरी रुपये ४०० ऐन व व्याज एकोत्रा देऊं म्हणून आहे. हाल्लीं वेचनावरून दावा होत नाहीं. किवे मयत सबब बाळंभट बिन गणेशभट्ट शालिग्राम वस्ती पेठ कसबा तुम्हांस कळवितों कीं, वेचनाविशीं आमचा दस्तऐवज नाहींच, परंतु तुम्हांस दिकत असल्यास आठ दिवसांत आम्हांस नोटिशीनें अमुक प्रकारचा दस्तऐवज आहे असें कळवावें; व पैसा द्यावा न दिल्यास व न कळविल्यास आणि पुढें बनाऊ काढल्यास उपयोग नाहीं. या फिर्यादीचा खर्च व ऐन रुपये व व्याज व नुकसान हें सर्व तुम्हांस द्यावें लागेल. ता. १९ आक्टोबर सन १८५८

सही गोविंद जगन्नाथ गोखले.

---

ज्ञानप्रकाश ता. २१ आक्टोबर सं. १८५८

आम्हांस असें समजलें आहे कीं, पुणे हवेलीचे कांहीं दिवसांमागील मामलेदार रा. रा. बळवंतराव आबाजी पेंडसे यांस निरखांत चूक पडले कारणानें सरकारानें एकदम तीन टप्पे कमी करून जागा दिली होती, ती त्यांणीं शिरसावंद्य करून आपली हकीकत सरकारास अर्ज करून श्रुत केली. तेव्हां सरकारानें नोकरी दुतर्फा पाहून असा ठराव केला कीं, या कामांत सरकारचें लक्ष बरोबर न पुरतां या अर्जदाराचें नुकसान भारी झालें. सबब दक्षिण भागचे रेविन्यु कमीशनर यांस याबाबे असा हुकूम केला आहे कीं, या मामलेदारास आपले विचारास येईल त्याप्रमाणें जागा द्यावी. हें वर्तमान ऐकून सरकारची नेकनजर आपले कामगारावर किती फाऊजीची आहे, हें या उदाहरणावरून ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं. आमचे पत्रांत एक "ईश्वराची अवकृपा" या मजकुराचें पत्र सदर्हू मामलेदाराचे हकीकतीविषयीं प्रसिद्ध झालें होतें. तें वाचून ज्या लोकांस वाईट वाटलें होतें, त्यांस हल्लींचा मजकूर ऐकून संतोष होईल. आतां यांस रेविन्यु कमिशनर कोणती जागा देतात हें मात्र समजणें आहे. त्यांस येथें पहिल्या प्रतीची जागा होती. तेव्हां रेविन्यु कमिशनर याबाबे विचार करून या ईश्वरी कृपेच्या गृहस्थास जागा दिल्याचें आम्हीं लवकरच ऐकूं अशी उमेद हल्लीं आहे.

आम्हांस समजतें कीं, अज्जम बाळकृष्ण मल्हार सावधाने मामलेदार, आणि अजम रामचंद्र सखाराम गुप्ते इंदीचे मामलेदार या उभयतांस बेळगांव संस्थानच्या कारभाऱ्याच्या जागा देण्याचा सरकारांतून ठराव झाला.

जाहिरात नाटककार आम्ही येत्या शनवारीं म्हणजे ता. २३ आक्टोबर रोजीं नाटकगृहांत कंसवध व महिषासुरवध हा खेळ करणार आहों. यांत दैत्याचें शिर व धड निराळें दाखवूंन आंतून राक्षसरूप दृष्टीस पडेल. देवीचा चमत्कार उत्कृष्ट केला जाईल. या खेळास संपूर्ण गृहस्थांनीं उदार आश्रय द्यावा अशी आमची पूर्ण आशा आहे.

सही गोविंद भट्ट गोरे नि।। नाटक.

लखनौ येथून ता· ६ आक्टोबर पर्यंतची खबर बंगेश्याशिट पत्रांत प्रसिद्ध केली आहे, ती येणेंप्रमाणें:—हरप्रसाद, मौलवी महमद हे संदेलाचे ठाण्यावर येऊन पडणार असें आम्हांस पुष्कळ दिवसांपूर्वी समजलें, परंतु ही बातमी वारंवार उडून त्याप्रमाणें घडून आलें नाहीं. म्हणून ते बंडवाले तसें करतील असें आम्हांस वाटलें नाहीं. परंतु चीफ कमिशनर जी सावधगिरी ठेवावयाची तींत कमी नकरितां ज्यागोष्टी करावयाचा प्रसंग पडे तसतसे करीतच गेले. शेवटीं ता· २ मिनहूस तीन वाजतां दिवसास बंडवाले हे हटिया घाट येथें ७००० फौज व १० तोफांनिशीं गोमती नदी उतरले, आणि जमेदार जे अशा लोकांस मिळण्यास तयार असतात ते ४००० लोक व ४ तोफा घेऊन त्यांस येऊन मिळाले.

बीरव्याचा जमेदार गुंलाबसिंग याणें लागलीच हरप्रसादाची भेट घेतली, आणि असा ठराव केला कीं, उभयतांनीं एकमेकाचे अनुसंगनें वागावें. त्या वेळेस संदेल्याचे ठाण्यांत कप्तान डासन हे होते, त्यांस परत निघून जावें किंवा त्या ठाण्याचे सभोंवता तट कमिशनर साहेब यांणीं बांधविला त्याचे एका भागांत जाऊन आपले १४०० स्वारांनशीं आपला बचाव करावा हें ठीक दिसेल. या दोन तजविजींपैकीं, त्याणें कोटांत ९०० लोकांनिशीं राहाण्याची तजवीज करून बाकीचे ५०० स्वार परत मलियाबादेस पाठविले. ता· ४ रोजीं हरप्रसाद व मौलवी महमद यांणीं संदेल्याचे गांवांत पश्चिम बाजूकडून शिरून एकदम अंमल केला. नंतर साहेबाचे ठाण्यास वेढा घातला, आणि उभयपक्षांकडून गोळागोळीची सुरवात झाली. ता· ५ रोजीं ८८ वे पलटणीच्या २ कंपन्या २ नाइनपोंड दारूच्या तोफा, व २ गुबाऱ्याच्या तोफा, २०० पोलिसचे स्वार, व ६०० पोलिसचें पायदळ येणेंप्रमाणें ब्रिगेडियर बारकर साहेब हे डासन साहेबाचे साहायाकरितां घेऊन आले. नंतर त्यांणीं बंडवाल्यांबरोबर खूप लढाई करून हरप्रसाद व मौलवी महंमद यांस गांवाबाहेर हाकून लावून डासनसाहेब यांची मोकळीक केली. असें करण्यास मोठीच लढाई करावी लागली.

या लढाईंत शत्रूकडील १०० लोक मारले जाऊन आम्हीं एक तोफ हिरावून घेतली. आम्हांकडील नुकसान म्हटलें तर फारच थोडें, २।३ मनुष्यें मारलीं गेलीं, व कांहीं जखमी झालीं. हल्लीं संदेला गांव आमचे ताब्यांत आहे. बंडवाले लोक तेथून पळाले ते उत्तरेस खेड्यांतून शिरले, तेथून ते आमच्या छावण्याचे लोकांस उपद्रव करीत असतात.

असें वाटतें कीं, आमची फौज त्या ठाण्यांतच राहील.—दरयाबादेहून कांहीं गरीब व काळे लोकांची फौज व कपूरथला राज्याचे कंठिनजेंट येणेंप्रमाणें निघून त्यांणीं बंडवाल्यांचें ठाणें दरयाबादेच्या आग्नेयीकोपऱ्यांत कितुरगांवांत होतें, त्याजवर दौड करून जाऊन त्यांस हाकून लाविलें. त्या ठाण्यांत बंडवाल्यांची ७००० फौज ३ तोफा होत्या, त्यांतील एक तोफ घेतली, आणि दारूगोळी जाळून टाकून १ हत्ती व ११ उंट हिरावून घेतले, आणि ५०० लोक मारिले. आमचें नुकसान फार थोडें झालें. जितके लवकर अशा लुटारू व खुनी वगैरे लोकांपासून मुलुख मोकळा होईल तितका स्वस्थता व मनुष्यधर्मास अधिक उपयोग पडेल.

बेगमही बौंडीस आहे. ती जागा सांपडण्याचे दिवस समीप येत आहेत. सबब ती नेहमीं

पेक्षां अधिक उद्योग करीत आहे. ती असें समजत आहे कीं, आपला प्राण गेल्यावेरीज माझें कांहीं कमी होणार नाहीं. आली कडेस ती आपले आसपासचे बंडवाले लोकांस विनंती करून नजप्रमाणेंच तुह्मीही देशाबद्दल अभिमान धरावा, असें म्हणत आहे. आपलें कल्याण इच्छिणारे लोक काय करीत आहेत हें तिला समजत नाहीं. व इंग्रेज लोकांसारिखे मोठे लोकांशीं लढाई करणें व्यर्थ आहे. व लढाई केली असतां तींत तिचा जीव जाईल, परंतु तिला अद्याप आपला हेतु पूर्ण करण्याची आशा [illegible]त आहे. पूर्वी मी कळविल्याप्रमाणें बौंडीचा राजा हरदत्तसिंग हा तेथून निघून स्वारीस गेला होता, तो बहिराइच गांवाकडेस २०००लोक व २ तोफानिशीं वळला, त्यास बेगम इणें नानासाहेब व बाळासाहेब यांजला आपल्या मालकिणीस मदत करण्याकरितां त्या इलाख्यांतून निघून घागरानदीचे पार इंग्रेज लोकांबरोबर लढाई करावी म्हणून तिनें ती करण्यास पाठविलें आहे.—यापासून काय परिणाम जाला हें समजलें नाहीं, परंतु मला [illegible] कीं, अयोध्येचे सर्व रूप्यांत लोकांमध्यें अशी समजूत पडून गेली आहे कीं, [illegible]ग्यांतून मदत येत आहे व याप्रमाणेंच लखनौचे बाजारांत रस्तोरस्तीं हीच बातमी लोक बोलून त्या लढाऊ बंडवाल्यांस धैर्य चढत आहे. ही वदंता राजकीय कारणाकरितां उठविली आहे, किंवा खचीत आहे, हें कळत नाहीं, परंतु यापासून कांहीं जोखम होईल. जंगबाहादुर आह्मांबरोबर लढाई करण्याचा उद्योग करीत आहे अगर नाहीं. हें अनुमान करणें मजकडेस नाहीं, परंतु मी इतकें जाणत आहें कीं, बेगम हिचा वकील व दुसरे लोक बेगमेकडून नेपाळास गेले होते, त्यांची खातरजमा करून त्यांस परत पाठविलें. आतां हे लोक टाळाटाळी करून परत पाठविले किंवा लढाईची तयारी करण्यास पाठविलें हें अद्याप समजलें नाहीं.

जंगबाहादुर हा आमचा फौजफाटा व लढाईचें सामान पोक्त आहे असें समजतो, म्हणून म्हणतात, परंतु मला तसें कांहीं वाटत नाहीं. तो तसेंच समजो, म्हणजे आमचे राज्याचा प्रसार सर्व हिमालयभर होईल. नानासाहेब हा [illegible] चे किल्ल्यांत आपल्या फौजेसह आहे, व भागवत श्रवण करून काळक्रमण करीत आहे, त्याप्रमाणेंच तो वेळ आपला घालवो, परंतु त्यास दुसरेंच पुराण श्रवण करणें प्राप्त होईल, बाळाराव ही तेथेंच आहे. व त्याचे फौजेपैकीं मोठा भाग बहिराइच येथील छावणींत आहे. या उभयतांचे फौजेची संख्या ३०००स्वार व २३००० हजार पायदळ आणि २८ तोफा याप्रमाणें आहे. या फौजेपैकीं तिसरा हिस्सा कंपनीचे जुने फौजेंतील लोक आहेत. त्यांचा इतर ठिकाणीं मोड जाला म्हणजे ते त्याजवळ येऊन राहातात. त्याजवळ हल्लीं फरकाबादचा नबाब ५०० लोक येऊन आहे. त्यांचा पगार देण्यास त्यास अनुकूलता नाहीं. याशिवाय वरेलीचा नबाब आहे, त्याबरोबर २०० स्वार आणि १००० पायदळ आहे. आणखी नाना त्याचा कल्याणखान याजबरोबर १००० मनुष्यें व २ तोफा आहेत, व जोतीसिंग ११००० फौज व ३ तोफांनशीं आहे; व लायतमहमद यानें अनसवन येथें मोर्चेबंदी केली आहे. मोहम्याच आनंदीसिंग व हैदतअल्ली हे उभयतां

बचराई येथून निघून सोलुन गांवाई वेणीमाधवसिंगाचे फौजेंत मिळण्यास गेले आहेत. यावृद्धीनें वेणीमाधवसिंग हा अधिक भयंकर होईल. खखासिंग नशिराबाद, ब्रिगेडचा जनरल हा, दर्याबाद प्रांतांत जगदीशपुराजवळ ४००० लोक ५ तोफानिशीं फंदुकानला येथें छावणी देऊन पडला आहे. मेदीहुसेन व महंमदहुसेन हे २०००० वीस हजार लोक व पंधरा तोफानिशीं खखासिंगाचे नजीक तळ देऊन पडले आहेत. थोडके दिवसांपूर्वी २००० लोक इलियापूर प्रांतांत गोमती नदी उतरून गेले, त्यांजवळ आम्ही जाणार सबब ते हबकाउदिल झालेसें दिसतें. त्यांस सोडून शेंकडों लोक जात आहेत; परंतु बाकीचे लोकांस लुटणें व माणसें मारणें यास त्यामुळें कांहीं हरकत होत नाहीं. हैदरगड व गुसेनगंज यांचे दरम्यानचीं गांवें उजाड होत चाललीं आहेत. विरव्याचा गुलाबसिंग हा सूड उगवून आह्मांकडेस जे जमीनदार लोक आहेत, त्यांजवर चवकीदारीचा कर बसवीत आहे. वलायत महंमद याणें संडेल्याचे दक्षिणेस १२ कोसांवर मीयागंज आहे, त्यावर १००० लोक आणि २ तोफानिशीं हल्ला केला, परंतु तेथें आमचा चौधरी अशमत अल्ली म्हणून होता, तो त्याचा सत्कार करण्यास उभा होता, त्याजबराबर लढाई झाल्यानंतर वलायत महंमद यास परत जाणें भाग पडलें, परंतु त्यास कांहीं कुमक मिळाल्यानंतर तो पुनः हल्ला करण्यास आला, परंतु पुनः ही हांकून लाविला. दरम्यान ब्रिगेडियर एवलेक हा ४ तोफा वा १५० स्वार २०० पायदळ इतक्यानिशीं कानपूरचे रस्त्यावरील जवावगंज आहून निघून मीयागंज येथें ५ आगटोबर रोजीं असतांनीं शत्रूशीं भिडला, त्यांत त्याणें दोन तोफा घेऊन शत्रूचीं २०० मनुष्यें मारलीं, व आमचा तोटा ३ मेले व ५ जखमी जाले.

नरपतसिंग हा रोहियाचे किल्ल्यांत नेहमीप्रमाणें स्वस्थ बसला आहे. तो जीवावर उदार होऊन लढाई करण्याचे तजविजींत आहे, परंतु जीवावर किती उदार व्हावें लागेल हें त्यास समजत नाहीं काय? जर त्यानें आपले किल्ल्याचा नद पाडून आह्मांस शरण आला, तर त्यास पुनः माफी होईल.—सदरहू मजकूर लखनौचे बातमीदारानें बंबेग्याझिटचे पत्रांत कळला आहे.

---

काशी येथील तुरुंगांतील कैदी लोकांनीं ता. २९ सपटंबर रोजीं रात्रौ तुरुंगांतून फुटून पळून जाण्याचा यत्न केला होता, परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. असें फिनिक्सचे पत्रावरून समजतें.

इंग्लिशम्यान पत्रावरून समजतें कीं, "विलायतेच्या राणीसाहेबांकडून जाहीरनामा कंपनीचा अंमल रद्द करून बादशाही अंमल झाल्याबद्दलचा आला आहे. त्याबद्दल लार्ड एल्फिन्स्तन मुंबईचे गवरनर हे ता. २० सप्टेंबरीं पुण्याहून निघून मुंबईस गेले. ता. २२ रोजीं दरबार भरलें. त्यावरून असें अनुमान होतें कीं, तो जाहीरनामा कांहीं दिवस पर्यंत सरकारीचे आफिसांत होता, त्यानें प्रसिद्धीकरण तिन्हीखात्यांत एकदम होईल असें वाटतें.
धं.न्या.

---

कोल्हापूर येथें ता. १२ मिनहूस फोर्टमार्शल भरून त्यांत माजी पलटण २७ वाली पैकीं नेटीव आफिसर यांची चौकशी होऊन त्यांवर बंडाच्या अपराधाचा गुन्हा शाबीत होऊन त्यांस सदरहू ठिकाणीं फांशीं दिलें. आ.वद्य.

हें पत्र ज्ञानप्रकाश छा० कृष्णाजी त्र्यंबक रानडे यांनीं छा०

वर्ष १८ ज्ञानप्रकाश.

सोमवार तारिख २५ माहे आक्टोबर सन्न १८५८ इ०

## वसूल रु०

१६८०८९ मेहेरबान हपसनसाहेब असिस्टंट रेविन्युसरवे सन्न १८५८ चे जूनअखेर.

१३०६०१ खानबाहादुर बरजोजी भिकाजी मिनूसिपाल सदरअमीन नगर सं० १८५८ अखेर.

१० मिस्तर खरसदजी नसरवानजी फौजदार नगर यांजकडून

## जाहिरात.

बाबाजी रघुनाथ देशमुख देशपांडे वस्ती राजापूर यांस. मी म्हणजे नारायण पांडुरंग कुळकरणी हल्ली वस्ती पुणें. तुम्हांस कळवितों कीं, तुमचा दस्तऐवज आमच्याजवळ १०५१ रुपयांचा शके १७७८ आश्विन वद्य ११ मितीचा आहे. आणि तुम्ही सदरहू पैशाचा उलगडा अद्याप केला नाहीं त्यास आज मिती पासून पंधरा दिवसांचे आंत पैशाचा उलगडा करावा, तसें आपणाकडून न घडल्यास सदरहू रकमेस व्याज दरशेंकडा रुपये १॥ दीड प्रमाणें पडेल, व शिवाय फिर्यादीचा खर्च पडेल. ही नोटीस आपणास रजिस्टर करून टपाल मार्गे पाठविली जाईल ता. २४ आक्टोबर सं० १८५८

सही नारायण पांडुरंग कुळकरणी मु० पुणें दस्तुरखुद्द



हवा,— गेल्या आठवड्यांत परजन्य अगदीं पडला नाहीं, आणि आतां पुढें पडेल असें दिसत नाहीं, कारण थंडी पडूं लागली आहे. आकाश रात्रौ व दिवा निरभ्र असतें. धूमकेतु नक्षत्र बरेंच वायव्य सोडून पश्चिमेस दिसूं लागलें आहे. गेल्या बुधवार पासून येथील लोकांस दोन प्रहरानंतर शुक्र दिसतो, त्यावरून लोकांस मोठें आश्चर्य व खेद होऊं लागले आहेत, परंतु यांत आश्चर्य व खेद कांहीं नाहींत. शुक्र उच्च कळेस आला असतां दिवसास दिसतो. याविषयीं आपले ज्योतिष्यांस हें ठाऊक आहे. आलिकडेस चंडाचे कारणावरून लोकांचे डोळे आकाशांत कांहीं अद्भुत होतें तें पाहाण्याकडे लागले आहेत, परंतु याचर विलक्षण तर्क बांधून मनेच्छेप्रमाणें तर्क बाधितात, हें एक मोठें अज्ञान होय. हवा पालट त्यामुळें ज्वर कफ आदि करून रोग होऊं लागले आहेत.

गेल्या शनवारीं मयत नरपतगीर बावा गोसावी यांचे चेल्यानें एथील एजंट, कलेक्टर, पैमाष खात्याचे सुपरिंटेंडेंट, जाईंट जड्ज्य, डिपुटी माजिस्त्रेट, व गांवांतील बडे लोक, सावकार यांस मेजवानी केली, त्यांत रावसाहेब महादेव गोविंदशास्त्री यांनी नरपतगीर बावा यांणीं लोकोपयोगी कृत्यें केलीं, त्यांजविषयीं सरकारांतून कई अंतकाळीं आलें याबद्दल संभाषण केलें. चालीप्रमाणें पानसुपारी होऊन मंडळी मार्गस्थ जाली.

नाटककार, येत्या बुधवारीं लवकुशाख्यान व मनोरंजन एक फार्स करणार आहेत

इंग्लिशम्यान पत्रावरून कळतें कीं, प्रयागचे माजिस्त्रेट साहेब हे एका बंडवाल्याची चौकशी करीत असतां, तो कैदी उन्मत्तपणानें माजिस्त्रेटाचे तोंडावर थुंकला. तेव्हां माजिस्त्रेटानें तत्काळ पिस्तुल काढून गोळीनें कैदीस ठार मारलें. अशी शिक्षा देण्याची ही वेळच आहे. आणि सर्व इंग्रेज माजिस्त्रेट या हुशार माजिस्त्रेटासारिखे वर्ततील वगैरे मजकूर लिहून त्या माजिस्त्रेटास शाबास कीं टेलिग्राफ पत्रकर्त्यानें दिली आहे, परंतु आम्ही अशा कैदीस सदरील गुन्हा जो लिहिला आहे तोच केवळ असल्यास या माजिस्त्रेटानीं गैरशिस्तीचें काम करून उतावळी केली, असें न्यायनीतीप्रमाणें म्हणत आहों.

---

आम्हांस समजलें आहे कीं, नामदार कन्याउर इन्चीफ साहेब हे जनरल स्टाफ व खासगी स्टाफ असे बरोबर घेऊन पुण्याहून दक्षिण महाराष्ट्र प्रांत, बेळगांव, आणि धारवाड सुद्धां पाहाण्याकरितां पुढील महिन्याचे सोळावे तारिखेस निघणार आहेत. आबझरवर.

---

**लखनौ,**— येथून आलेली खबर संडल्याजवळ लढाई झाल्याबद्दलची आली आहे कीं, संदेल्याजवळ पासुनांवाच्या एक गांव ४ मैलांवर आहे तें आमच्या फौजेनें घेऊन शत्रूचा मोड करून ९ कोस पावेतों त्यांचा पाठलाग केला, त्यांत आम्हांकडील मेले २ आणि ७ शिपाई जखमी जाले, व पोलिसांपैकीं ५ मेले, व ४४ जखमी जाले, व तसेच हजूरचे घोडेस्वार ५ मेले आणि २० जखमी झाली, शत्रूचा नाश १००० मनुष्यें मेलीं आणि ३ तोफा हस्तगत झाल्या. सर राबर्ट हामिल्टन साहेब यांणीं नेहरीहून ता. ९ आक्टोबर पावेतोंची खबर अशी पाठविली आहे कीं, ललतपूरचा डिपुटी कमिशनर हे नेहरी येथील स्वार घेऊन बाणपुरास जात असतां, त्यांस वाटेनें चंदेरीहून ठाकुरानें (बंडवाले) बलदावास ठिकाणीं हल्ला केला. त्यांत बंडवाल्याचे १७ असामी जिवास मुकले, आणि बाकीचे जीव घेऊन पळाले. झांशीहून कांहीं फौज तेहरीमुकामीं येऊन दाखल झाली आहे, ती बाणपुरास जाणार आहे.

**अलाहाबाद**— येथील कमिशनरानें ता. ९ आक्टोबर पर्यंतची बातमी पाठविली, तींत तात्या टोपे हे ता. ८ मिनहूस आपल्या फौजेनशीं सरसघाट येथें होते. व त्यांचा रंग तेहरी अगर झांशीकडेस जाण्याचा होता. कदाचित् शत्रु तेहरीवर गेलाच तर त्यास तेथून पिटून लावण्याकरितां आमचें सैन्य बहुत जमलें आहे.

**रोहिलखंडचा** कमीशनर कळवितो कीं, ता. ८ मिनहू रोजीं बंडवाल्यांचा पवानी नामक ठिकाणावर हल्ला करून ती जागा हस्तगत करण्याचा विचार होता, परंतु आमचे सैन्यानें त्यांची एक तोफ घेऊन त्यांस हांकून लावलें. त्यांत शत्रूचे ४ मेले, आणि १९ जखमी जाले. आमच्याकडील ८ जखमी झाले.

न्यूकालंबियामध्यें सोन्याच्या पुष्कळ खाणी सांपडल्या. त्यावरून तिकडे वस्ती करून राहण्याकरितां आट्लंटिक महासागराच्या कांठच्या देशांहून पुष्कळ लोक तिकडे चालले आहेत. इ. र.

**सासवड.**— येथें गेले आठवड्यांत चोऱ्या झाल्या आहेत, त्या ता. ५ मिनहूस संभु हवालदार याचे बऊ दाहा रुपये पेटींतून चोरीस गेले. याप्रमाणेंच ६ मिनहूस तुकाराम चापकर याचे पंधरा सत्रा रुपये गेले. १० मिनहूस संतुशा बव्या वाणी याचे कोठ्यांतून तुपाचा भरलेला बुधला व दोन गुळाच्या ढेंपा चोरीस गेल्या. या सर्व चोऱ्यांचा ठिकाण कांहींएक लागला नाहीं. कळावें ता. १७ माहे आक्टोबर सन १८५८ इसवी.

---

**इनामकमिटी.**— हाल्लीं कंपनीसरकारचा अमल या आपल्या हिंदुस्थानांतून जाऊन विलायतेचे राणीसरकारचा अमल झाल्याप्रमाणेंच आहे, आणि विलायतेस हिंदुस्थानचे राज्यस्थितींत व्यवस्था व अव्यवस्था कशीकाय आहे, याविशीं विलायतेचे राज्याधिकारी मंडळी बसून करूं लागली आहे. त्यांत प्रथमतः हिंदुस्थानचे प्रजेचें ज्या ज्या गोष्टींवर मुख्यत्वें लक्ष आहे, त्यांतील पहिले नंबरची इनामकमिशन अथवा इनामकमिटी ही गोष्ट होय. या इनामकमिशनबाबद विलायतेस पुसतापुसत करून विचार होऊं लागला आहे. व मेहेरबान वार्डिनसाहेब यांची साक्ष या बाबदींत होऊन ती बहुतेक अंशीं खरी पडली असे पाहून येथील इनामदार, जाहागीरदार, व दुसरे वतनदार देशाधिकारी यांचीं मनें पुनरपि टवटवीत होऊं लागलीं आहेत. व त्या लोकांची दाद यथान्याय व लवकर लागावी म्हणून ते व इतर प्रजा हीं फार उत्कंठ झालीं आहेत. या अशा समयीं या आपल्या देशांतील इंग्रेजी वगैरे वर्तमानपत्रांनीं आपआपलीं मतें दिलीं आहेत, व देतही आहेत. तेव्हां या अशा समयीं रयतेचें व जमीनदार आदिकरून देशाधिकारी यांचें या इनामकमिशनाचे बाबदींत विचार, व त्यांचें नुकसान, आणि त्यावरून या एलिनेशन (देणगी) खात्याविशीं त्यांची इच्छा हीं कशीं काय आहेत, तीं सरकारास कळावीं, आणि सरकारचें या खात्याविशीं लक्ष व विचार कसे काय आहेत, व सरकारानें या खात्याची व्यवस्था कशी ठेविली आहे, व या खात्यांत प्रकार कसा काय चालला आहे, हें सर्व मुळापासून तो हा वेळ पर्यंत रयतेस कळावें, याजकरितां आम्ही आपल्या यथामति शोध करून लिहिण्यास धैर्य करून आरंभ केला आहे. यांत कोणाला उद्देशून कांहीं न लिहितां साधारणपणें या इनामकमिशनाबाबद लिहिलें आहे. आम्हांस वाटतें कीं, हा आमचा सोद्देश यत्न अकालीन नाहीं असें समजलें पाहिजे.

---

लार्ड एल्फिन्स्तन साहेब यांणीं मेहेरबानी करून इंदुरची खबर तात्याटोपे याचा दुसऱ्यानें पराभव झाल्याची दिली ती पुनाआबझरवर आगरें येतों.— सरराबर्ट हामिल्टन साहेब यांणीं इंदुराहून ता. २१ मिनहूची खबर पाठविली आहे कीं, जनरल मिचल याणें बंडवाले तात्या टोपे याचे हाताखालील लोकांनीं सिंद्वा आग्यावर हल्ला केला होता त्याचा आमचे फोजेनें मारा करून पराभव केला, आणि त्यांच्या चार तोफा घेतल्या. अशी हकीकत येऊन दाखल झाली आहे.

---

दिवाणी— येथील नेटिव कोडतांच्या हद्दी माहे मजकुरापासून मोडल्या आहेत, व दिवाणी दररवास्ती बजाविण्याचें काम पूर्ववत्‌ याशहरांतील सर्व कोडतांचे मात्र अदालतीचे नाझराकडेस जाण्याविशीं ठराव होऊन हुकूम मेहेरबान जडूज्य साहेब यांजकडेस लागू त्यानें केले. आतां ही व्यवस्था झाली असतां कोर्टाचे फैसले करण्यास जास्ती वेळ सापडून फैसले जास्ती फडशास लागतील आणि हलक्या नोकर लोकांचे हातांत ही जोरवमीची कामें दिल्यापासून जेजे प्रकार कायद्याविरुद्ध, अंतःकरणानें धर्माविरुद्ध होत असतील ते नाहींसे होतील. पेंठा वांटून दिल्यापासून रयतेपैकीं कित्येकांस हे प्रसंगोपात बराबर नाटून वरिष्ठ कोडतास तसदी पोंचत असे ती कमी होईल असें आतां नवीन जडूज्य साहेब आले आहेत, तेव्हां कांहीं तरी नवीन फेरफार झाले पाहिजेत, अशी वहिवाट प्रायः एप आहे. त्याप्रमाणें कांहीं तरी होतीलच, परंतु होण्यासारखी एक गोष्ट आमच्या नजरेस येते, ती आम्ही लिहिल्यानें कोणी दोष आम्हांस विचार केल्यावांचून देऊं नये. हल्लीं या जिल्ह्यांतील कोर्टानिहाय सनदी वकील आहेत, त्यांत कित्येकांनीं सन्‌ १८१३त सनदी मिळविलेल्या असें म्हणण्यास कांहीं चिंता नाहीं; परंतु त्यांपैकीं कित्येकांस त्यांच्या नेत्रकर्णादि मुख्य इंद्रियांनीं व हस्तपादाद्यवयवांनीं कंटाळून बहुतेक अंशीं सोडलें आहे. असें असतां त्यास हयात वकिलीची जाहागीर सरकारानें करून दिली आहे असें वाटतें; परंतु या अशा कामगारांनीं दिवाणींत लढाया मारून विजयप्राप्ति करून घ्यावी, व वादी प्रतिवादी जे त्यांचे यजमान यांचें हित होईशी तजवीज करावी, असें सामर्थ्य त्यांस राहिलें नाहीं. हें कोर्टाचे व अधिकाऱ्यांचे लक्षांत येत नसेल असें वाटत नाहीं. तथापि भूतदया जाणून कोर्ट लक्ष पुरवीत नसेल, तर न पोंचवो, परंतु त्यापेक्षां पुष्कळ लोकांवर भूतदया होईल असा मार्ग आम्हीं धारण केला पाहिजे, त्यावरून आम्ही मेहेरबान जडूज साहेब यांस सूचवीत आहों कीं, या हयातीकडे व वकरीसाठीं इनामकमेटी प्रमाणें कमिशनर नेमून न चौकशी केली असतां वादीप्रतिवादी यांची किफायत होईल असें आमचे नजरेस येतें.

---

माळवे प्रांतांत विशेषेंकरून पिकत असते व त्या प्रांतीं सर्वप्रकारें स्वस्थता नाहीं, यामुळें तिकडील प्रांतांत वर्षाप्रमाणें अफूची शेतांची लावणी होऊन अफू पिकली नाहीं; यामुळें सरकार या वर्षी अफूचा दर जास्त ठेवणार आहे असें समजतें.

---

इराणी फौजेस कवाईत शिकविण्याकरितां फ्रान्स देशाहून १६ मनुष्य तेहराणास पाठविले. त्यांत तोफखान्याचे ३ हपीसर, व ३ शिपाई, पायदळाचे २ हपीसर, व २ शिपाई, ३ सारजेन, २ ब्यांडमास्तर आणि १ इंजनियर असे आहेत.

खानदेशाच्या सरहद्दीवर पुनः सुमारें १००० भिल्लांचा जमाव झाला आहे. त्यांनीं डांक बंद केली त्यांतून कांहीं लोक प्रभिमकडे सिंद्धाघाटाकडे विजागडयेथें हल्ला करणार आहेत. सातपुड्याच्या उत्तरेकडील तोडीं त्यांचें भय फार आहे. व्यापार च वाटा बंद करतील, परंतु तिकडे लष्कर जाऊन लवकरच त्यांचा बंदोबस्त होईलसें वाटतें.

ज्ञा-द-

**रत्नागिरी**,— रा. रा. विनायकराव गोविंदजी राजापूरचे मुनसफ हे रत्नागिरीस सा[illegible]यांस भेटून परत गेले. साहामाही कोर्ट ता. ११ नवंबराचे क्रमाराने भरेल.— येथील रेजर्स खात्यांतील रा. रा. जोगणभु देसा[illegible] मेझरस्कभेद्दार हे पेनशन घेणार आहेत. [illegible]णकोट व वेळास एथें एक वाघ पिसाळला आहे. त्या भीतीनें लहानसाहान रस्तेही बंद झाले आहेत. तो वाघ बहुधा प्रतिदिवशीं एक-दोन तरी गुरें मारतो. जं. म्मित्र.

---

**कोल्हापूर**,— कादकोळ येथें पर्जन्य न [illegible]ल्यामुळें पिकें वाळून गेलीं आहेत. मुधोळ संस्थानांत कारभारी यांणीं आपल्या गांवीं एक सरकारी शाळा स्करू केली आहे. त्या प्रांतांत हत्याराबद्दलचा जाहीरनामा लागला असतां ज्या लोकांनीं हत्यारें रानांत टाकून दिलीं होतीं, तीं हल्लीं मिळत आहेत, असें ऐकतों. कुरुंदवाड येथील पेटा शेरोळें येथें ता. ४ आक्टोबर रोजीं एके शेळील दोन करडूं झालीं, त्यांतील एकाचें तोंड कोंबड्या सारिखें होतें, तें जन्मतांच मेलें.

करवीर येथें मागील पंधरवड्यांत अतिश[illegible] पर्जन्य पडून जिकडे तिकडे जलमय होऊन ओढयांस उतारही नाहींसे झाले. असा दाह[illegible]र्षांत पाऊस पडला नाहीं असें म्हणतात. श्रीमहालक्ष्मीचे आंगावरील एक दागिना चोरीस गेला, त्याची चोकशी चालली आहे. श्रीमन्महाराज छत्रपति यांची स्वारी रविवारीं सोमाउळंपमास गेली होती. व. संग.

---

आम्हांस मोठा आनंद झाला आहे कीं, आमचे पुण्याचे मुनसफ अज्जम अरदेसर शेटखरसदजी यांचे चिरंजीव मिस्तर बेननजी अरदेसर यांस नळदुर्ग तालुक्यांत पहिले प्रतीचे मामलेदारीचे जाग्यावर कमिशनर यांणीं नेमणूक केली असें आम्हांस समजलें आहे. त्या जाग्यास तिकडेस तहशील दार असें म्हणतात

---

कलकत्यांत एक पायदळ पलटण ईस्ट इंडियन या नांवाची नवीन नोकरीस ठेवणार आहेत याकरितां मुंबईतील मिस्तर फोरजेट पोलिसचे डिपुटी कमिशनर यांस लोक भरण्याविषयीं सरकारचा हुकूम झाला आहे. या लोकांचा ठराव गोरे लोकांप्रमाणेंच आहे असें बंबेग्याझिटपत्रावरून कळतें.

---

दिल्लीचा माजी राजा यास दिल्लीहून कलकत्यास नेण्याकरितां ता. ७ मिनहूस तेथून त्याची रवानगी झाली. त्याजबरोबर त्याचा मुलगा व बेगम अशीं आहेत. यांस बंदोबस्तानें नेण्याकरितां सरकारचे स्वार व पायदळ यांची एक लहानशी टोळी आहे, असें समजतें. टेग्रा.

---

लाहोरक्रानिकलपत्रावरून आबझर आधारें कळत आहे कीं, काबुलाचे सरदाराकडून तीन हजार ३००० रुपये सय्यद यास मिळाले आहेत. त्याचें पहिलें काम आहे कीं, फिरंगीयांजबरोबर धर्माकरितां लढाई करणें हें आहे.— कारवानलोक आपले घोडे व्यापाराकरितां पंजाब व हिंदुस्थान येथें घेऊन जात असतां त्यांस लुटण्याची फरशात त्या सैयदानें केली आहे. तो हल्लीं रेवबर घाटाचे आसपास आहे असें म्हणतात. यावरून दिसतें कीं, आमच्या सरहद्दीवर कांहीं अस्वस्थता असावी.

---

## इनामकमिशनखात्याची उत्पत्ति व विस्तार.

इनाम कमिशन खातें प्रतबंदीचे उदरीं निपजलें, म्हणून प्रतबंदीखातें या खात्याची माता होय. व उत्पन्न कर्त्ता मेहेरबान गोल्डस्मिड साहेब होता म्हणून तो या खात्याचा पिता होय. सुमारें १६ वर्षांचे मागें म्हणजे सन्न १८४२ इसवीचे सुमारास करनाटकांत धारवाडजिल्ह्यांत प्रतबंदी सुरू होती, व तीवरील मुख्य अधिकारी म्हणजे सुपरिंटेंडेंट मेहेरबान मयत गोल्डस्मिड साहेब हे होते. साहेब महसूफ यांचे नजरेस असें आलें कीं, या प्रांतीं दुमाला वगैरे फार असून बहुतेक बिनआधारी चालत आहे. जे दुमाले चालताहेत ते गांवकऱ्यांच्या दुर्लक्षतेनें चालत आहेत; कोणास सनदपत्रवगैरे कांहींएक नाहीं. दुमालदार लोकांनीं जिकडून साधेल तिकडून आपआपलीं उत्पन्नें साधलीं आहेत. साहेबबाहादुर यांचा मनाचा ग्रह असा झाल्यावर, त्यांणीं सरकारास लिहून अशा पोकळ दुमाल्याची चौकशीं करण्याविषयीं हुकूम आणविला. सरकार हुकुमाअन्वयें चौकशी सुरू करून मेहेरबान रावबाहादुर मोरोपंत तात्या प्रिन्सिपाल सदर अमीन यांसही मदतीस पुण्याहून नेलें. कांहीं गांवांची चौकशी होऊन दोन चार गांव अगदीं गफलतीनें लोक खात होते, ते खालसा करण्याचा ठराव केला. पुनरपि सरकारास असें लिहिलें कीं, या करनाटकप्रांतीं दुमाल्याची बेरीज फार दिसते, सबब यांची चौकशी चांगलेरीतीनें झाल्यास सरकारास नफा होईल. ही सूचना सरकारास पसंद पडली, आणि मोरोपंत तात्या व गोल्डस्मिड साहेब यांचे मदतीस मेहेरबान हर्टसाहेब यांस नेमून, त्रिवर्गांची कमिटी दुमाल्याचे चौकशीकरितां स्थापली. त्या वेळेपासून या खात्यास इनाम कमिटी हें नांव जालें. ती कमिटी फार दिवस चालली नाहीं. मेहेरबान गोल्डस्मिड साहेब निघून गेले, व मोरोपंत तात्याही कांहींएक कारणानें पुण्यास परत आले. सन्न १८४४ पासून कमिटीचें काम मेहेरबान हर्ट साहेब एकटेच करीत होते. पुढें त्यांचे मदतीस कप्तान गार्डन साहेब, सुमारें सन्न १८४७ सालीं दिले. व पुढें दिवसें दिवस या खात्यांत असिस्टांची संख्या वाढत गेली. हें खातें करनाटकांतच मूळ उत्पन्न होण्यास कारणें झालीं, त्यांपैकीं येथें कांहीं लिहिणें जरूर आहे. ज्या वेळेस प्रथम करनाटकांत इंग्रजांचा अंमल बसला, त्यावेळेस इंग्रेजांनीं कोणी चांगले मुत्सद्दी तिकडे होते; पैकीं एकानें असें मत लिहून ठेविलें आहे कीं, या प्रांतीं दुमाल्याची तर अतिशय वृद्धि झालीशी दिसते. तूर्त सरासरी चौकशी करून सर्व दुमाले चालविले आहेत, परंतु देशांत स्वस्थता व अंमल चांगले रीतीनें बसल्यावर सदरहू दुमाल्याची निक्षूण चौकशी करावी, हें एक कारण आहे. करनाटकप्रांतांत टिपुसुलतानाचे बापापासून दंग्यास वगैरे आरंभ झाला, तो इंग्रेजांचा अंमल होईतोंपर्यंत कायमच होता. या मुळें प्रांतांत स्वस्थता बहुत दिवस नव्हती त्या योगानें येत्यानें यावें, व जात्यानें जावें, अशी मुलखाची स्थिति होती; यामुळें जमीदार वगैरे लोक हवे तसे वागत असत; जशी ज्यास संधी फावली, तसें त्यानें आपलें हित करून घेतलें. यामुळें दुमाल्याची बेरीज करनाटकांत फार झाली, हें दुसरें कारण आहे. तिसरें कारण

असें आहे कीं, सांमतचे राज्याधिकारी गाजी राज्य प्रमाणें भोळे गृहींत, आपले नफानुकसानास फार दक्ष आहेत, व यांणीं व्यापार करूनहें राज्य संपादन केलें आहे.

सन्न १८५०।५१ इसवी पर्यंत मेहेरबान हर्टसाहेब व त्यांचे हाताखालील मदत करणारे लोक दुमाल्याची चौकशी करनाटकामांतीं करीत होते, ते वेळेस कायदा कानू वगैरे कांहीं नवता. ते समयीं कामाची पद्धत अशी होती कीं, प्रत्येक दुमाल्याची चौकशी साहेब महसूफ यांणीं करून आपल्या अभिप्रायासह सरकारास लिहावें, नंतर हुकूम आणून पक्का ठराव करावा. मेहेरबान गोल्ड स्मिड साहेब सरकारचे सकरटार होते, म्हणून सरकारास असलीं बिकट कामें समजण्यास व त्यांचा उलगडा होण्यास कांहीं जिकीर पडत नसे. सरकारास लोभ उत्पन्न होऊन असें वाटूं लागलें कीं, या विशीं एकादा कायदा करून सर्व मुंबई इलाख्यांत चौकशी करू करावी; व असें केल्यानें या कामास हाल्लीं जो चोरटेपणा आहे त्याचा लोप होऊन, न्यायाचें स्वरूप येईल. या इराद्यानें मेहेरबान हर्टसाहेब यांस एक कायद्याचा मसूदा करण्यास फर्माविलें. त्यांनीं मसूदा करून पाठविला, त्यांत मुंबईसरकारानें कमजास्त करून कलकत्यास पाठविला. तिकडून मसूदा बाहाल होऊन कायद्यांचा मसूदा म्हणून सरकारी पत्रांत चालीप्रमाणें इंग्रेजींत प्रथम छापला. ज्या विषयावर तो मसूदा झाला, तो विषय फार थोडे लोकांस समजण्यासारखा होता. म्हणजे ज्यांची त्या कामाशीं फार सलग्नता असे त्यासच समजला. पण त्या उदार लोकांनीं ती संधी न जाऊं देतां सर्व लोकांस तो विषय कळण्याविशीं भगीरथ प्रयत्न केला, अशा उदार लोकांचे उपकार या लोकांवर आले आहेत, म्हणून लोकांनीं त्यांचा आभार मानावा हें योग्य होय.

पुण्यांत या मसुद्याबद्दल बराच गवगवा झाला. संभावित लोकांनीं कायद्यांत कांहीं फेरफार करण्याविशीं सरकारास अर्ज केला. त्याचा जबाब कांहीं एक विचार न होतां सरासरी पानावर पान ठेवून रयतेस जबाब दिला. सरकारास असें वाटलें कीं, या कामांत लोकांनीं उचल केली, व कायद्याचा अद्याप मसूदाच आहे, व इतर मसुद्याप्रमाणें या कायद्याच्या छापण्याच्या दोन तीन आवृत्ति करूं म्हटलें, तर विलंब बहुत होईल, म्हणून लागलाच एकदम कायदा म्हणून छापलें. या विलक्षण वर्तणुके बद्दल इंग्रेजी वर्तमान पत्रांत वादविवाद चालला असता, पण ज्या प्रकरणांत कायदा झाला, त्याचें ज्ञान वर्तमानपत्रकर्ते यांस मुळींच नवतें; म्हणून त्यांणीं आपले लेखणीस व अकलेस तसदी दिली नाहीं.

(पुढें चालेल.)

---

स्टांडर्डचे समजण्यांत आलें आहे कीं, क्वीन विकटोरिया राणी माहाराज यांचें च राज्य या हिंदुस्थानांत आहे या बाबे जो जाहीरनामा ईस्टइंडियाकंपनी सरकाराकडून आला आहे, तो बहुत करून ता० ४ नोवेंबर म्हणजे नरकचतुर्दशीचे दिवशीं तो प्रसिद्ध होऊन जयजयकाराबद्दल उत्साह होणार असें सदरहू पत्रावरून कळतें.

---

बेळगांवचे बातमीदाराकडून ज्ञानप्रकाश कर्त्यांस ता० १४ आक्टोबर सन् १८५८ इ०

१ मेहेरबान पोलिटिकाल एजंटसाहेब यांची स्वारी येथें आहे. धारवाड येथील वकील तनासर, वगैरे लोकांस बंडाचे आरोपावरून कैदेंत आजपुष्कळ दिवस ठेविले आहेत, त्यांचा इनसाफ सदरसाहेबांपुढें लौकरच होणार व ते वेळेस धारवाडचे असिस्टंट कलेकटर हेही असणार अशी वदंता आहे.

२ शाहापूर येथील एका प्रख्यात सावकाराचे घरांतून ५० हजार रुपये गेले. या गोष्टीस आज दोन महिने झाले, अद्याप त्याचा पत्ता लागला नाहीं. याची चौकशी आतां पोलिटिकल साहेबांकडे चालली आहे. सदरसावकार हे आतां बेळगांवांत असतात.

१ आपल्या मागील पत्रीं "सातारचे इनामकमेटीकडील कांहीं लोक काढले" असें लिहिलें होतें त्याप्रमाणें येथीलही २५।३० कारकून या महिन्यांत कमी केले. यावरून इनामकमेटीचें आयुष्य भरत आलें असें वाटतें.

१ येथील कलेकटर कचेरींतील अवलकारकून व नायब दफ्तरदार यांजवर लांचाचा सवला येऊन ते धारवाडास गेले, याविशीं मागें ज्ञानप्रकाशपत्रांत लिहिलें होतें. या लोकांस १ वर्षाची कैद नंतर १००० रुपये दंड, दंड न दिल्यास आणखी १ वर्ष कैद याप्रमाणें शिक्षा झाली.

१ पारध- येथील प्रख्यात पारधी मिस्तर बेनन यांणीं आज पुष्कळ दिवस येथें जाळें मांडलें आहे, व कांहीं सावजें ही आजपर्यंत त्यांस सांपडलीं, परंतु आलिकडेस कांहीं दिवस त्यास एकही सावज सांपडलें नाहीं तेणेंकरून हे पारधी फार दुःखी होते, इतक्यांत गेले रविवारी महार जातीचीं दोन मनुष्यें (दादला बायको) त्या जाळ्यांत जाऊन मिळालीं. यांचा ज्ञानदीक्षा येथील मिस्त्री शाळेंत झाली. या प्रसंगी या प्रसंगावर व्याख्यान बाबा पदमनजी यांणीं दिलें, आणि सदरमनुष्यांनीं आज पुष्कळ दिवस ख्रिस्ती शास्त्राचा अभ्यास केला, तस्मात् यांस धर्माची चांगली माहिती आहे असें समजून यांस बापतिस्मा दिला. व धर्मसंबंधी कांहीं प्रश्नही केले. ते येणें प्रमाणें.

प्र० प्रथम सर्व मनुष्यें कशीं होतीं? म्हणजे पापी कीं पुण्यवान्? उ० पुण्यवान् होतीं मग पापी झालीं.

प्र० मग ईश्वरानें काय केलें? उ० आपला पु[त्र पाठविला.]

प्र० भाई, त्याचें नांव काय? उ० येशू. हीं उत्तरें ऐकून तेथील ख्रिस्ती लोकांस बहुत आनंद झाला.

१ हस्तनक्षत्राचा पर्जन्य फारच चांगला लागला तेणेंकरून सर्व पिकें आबाद झालीं आहेत.

---

पुणें येथें घोडाविन कावली निसबत कमिस्टेंडंट रिविन्युसर्वे, याणें जबरीनें गाडी धरून सामान नेलें, म्हणून गाडीवालायाणें पोलिसाकडे फिर्याद केल्यावरून त्याची चौकशी मेहेरबान डिपुटी माजिस्त्रेट यांणीं चौकशी केली, तीत साहेबाचा हुकूम जबरदस्तीनें गाडी धरण्याचा मुळींच नसून त्यानें हें काम केलें असें शाबीद जाल्यावरून त्यास कायदा १२ कलम १७ रकम २ बरहुकूम ५ रुपये दंड केला.— येथील नदींत एके बटीकाचा मुलगा हवेली पोलिसचे हद्दींत बुडून मेला.

दगाबाजी, त्रिंबक कोनवाले यानांवाच्या कुणब्यानें एका ब्राम्हणास दागिने पाहाण्याकरितां म्हणून त्याचे घरींच हातांत घेऊन सोबत्यास देऊन तो सोबती पळून गेला अशी फिर्याद पोलिसाकडेस आली आहे.

विजापूर, तारीख १९ आक्टोबर— येथें हस्त नक्षत्राचा पाऊस पडल्यामुळें शेतकीचे कामाचा आतां धोका दूर झाला आहे.

येथील मामलेदार नागो रामकृष्ण यांणीं येथें आल्यापासून या विजापुरांत बाजार मोठ्या युक्तीनें वसवून उदमी व्यापाऱ्यांचा नफा होऊन गरीबगुरीब रयतेस मोठा फायदा जाला आहे. या मामलेदारांनीं शहर दुरुस्तीचीं कामें वगैरे रयतेकडून व माजी कमीशनर मेहेरबान क्रिफर साहेब यांस विनंती करून मोठे उपयोगाचीं केलीं. व त्याच कृपाळू साहेबांनीं यांस विजापुरास मामलतीचे कामावर नेमलें. येथें या मामलेदारसाहेबांचे येण्याचे मागें असें असे कीं, येथें पाठस्थळ असून लोक हक्कदारांचे भीतीनें भाजीपाला व फळफळावळ वगैरे पिकवीत नसत. ती भीति यांणीं दूर करवून रयतेनें खुशाल माल पिकवून बाजारांत आणून विकावा, त्या योगें उदम्यांस हरएक प्रकारें सुख झालें. याविषयीं लोक या मामलेदारांची कीर्ति गाताहेत, हें माझे जातीनें ऐकण्यांत आलें आहे. शिवाय या गृहस्थांनीं पेठ भरविण्याकरितां उदम्यांच्या समजुती घालून त्यांजकडून दुकानें घालविलीं. मागील कालीं हें विजापूर शहर मोठें प्रख्यात होतें, परंतु आलिकडेस यांणीं या शहराची कांहीं दुरुस्ती सदरीं लिहिल्याप्रमाणें केल्यामुळें लोक या मामलेदारांचे मोठे उपकारी झाले आहेत. हें सर्व काम करणारांचे हातोटीवर आहे. पहा, ताजवळ येखादा कुणबी गेला तर त्याचें सरकार संबंधी काम असेलें तें उलगडल्यावर त्यास त्याचे शेताभाताची हवाल विचारून अमुक जिन्नस पिकवावा त्याचा दर चांगला येतो असें त्यांस सांगून त्याची समजूत करून देतात. या मामलेदारांचा मोठा शोध, व रयतेचे हिताची मोठी आवड, व सरकारचा हेतु कोणत्या प्रकारचा आहे हें चांगलें समजतें. हे आपला सर्व वेळ उपयोगी कामाकडे लावित असतात. येथें एक वर्षापासून सरकारचें लष्कर स्वार व पायदळ राहात आहे. त्याची त्यांणीं वर्दास्त वक्तशीर उत्तम प्रकारची केली आहे. यामुळें त्यावरील अंमलदार लोकांस या मामलेदाराचें काम बिनबोभाट चालून यांच्या पैल्यांत यांची दक्षता खूब आहे, यामुळें लष्करचे साहेब लोकांनीं या हुशार मामलेदारास येथून बदलूं नये म्हणून शिफारस कमीशनरसाहेबांकडेस पाठविली आहे. हे मामलेदार एथें निदान वर्षदोन वर्षे राहिल्यानें आमच्या शहरचा चांगला बंदोबस्त राहून लोक आनंदामत पावतील."

---

**नेमणुका.**— पुणे विद्यालयाचे प्रोफेसर डब्ल्यू ड्रेनर यांस बिनपगारी १ वर्षाची रजा १९ नोवेंबर स. १८५९ पासून मिळाली आहे. मुंबई कौन्सलचे सेक्रेटार मिस्तर डब्ल्यू हार्ट यांस ५ मिनहूपासून ३ महिन्यांची रजा मिळाली.

नेकनामदार गवरनर इन्कौंसल यांणीं माहे मजकूरपासून विद्याखात्याकडील नेमणुका केल्या आहेत.— मिस्तर टी. सी. होप, उत्तर तुकडीचे इन्स्पेक्टर यांचे ताब्यांत गुजराथ, उत्तर कोंकण, आणि खानदेश पेठसंस्थानासुद्धां दिले आहेत. डाक्तर आर. हेन्स मध्य भागचे इन्स्पेक्टर यांचे ताब्यांत पुणें, अहमदनगर हे जिल्हे, व सातारा आणि सो-

लापूर याजिल्ह्यांचे मराठी भाग हे दिले आहेत. कप्तान जे. एफ्. लेस्टर, दक्षिणभागचे इन्स्पेक्टर, यांचे ताब्यांत रत्नागिरी, बेळगांव धारवाड, हे जिल्हे, व सातारा व सोलापूर या जिल्ह्यांचे कानडी भाग दिले आहेत.

ठाणेजिल्ह्यांतील अज्जम भास्कर मोरेश्वर प्रोबेशनरी मामलेदार तालुके तळोजा यांस त्याच जाग्यावर मुक्रर नेमिलें.

खानदेशजिल्ह्यांतील अज्जम विनायक गोपाळ ३ऱ्या प्रतीचे भडगांवतालुक्याचे मामलेदार यांस धुळ्यास वर्ग केला.— अज्जम मोरोगोविंद मालेगांवचे दुसरे प्रतीचे मामलेदार यांस नंदुरबारास वर्ग केला.— अज्जम वामनराम चंद्र नंदुरबारचे दुसरे प्रतीचे मामलेदार यांस मालेगांवास वर्ग केला.

अज्जम मार्तंड बापूजी ३रे प्रतीचे मामलेदार तालुके बागलाण यांचा वर्ग यावल तालुक्यांत झाला.— अज्जम सदाशिव विठ्ठल यावल तालुक्याचे मामलेदार यांस बागलाण येथें वर्ग केला.

मिस्तर डेविडसन्न पुण्याचे कलेकटर आणि माजिस्त्रेट यांस मुंबईस मेडिकल कमिटीपुढें हजर होऊन विलायतेस रजेवर जाण्याचे कारणानें रजा मिळाली आहे.

मिस्तर एच्. बी. केयर सिंदचे कमीशनर यांस १ महिन्याची रजा मिळाली आहे.— कप्तान शार्ट काठेवाडचे पोलिटिकल एजंटचे से. आसिस्टंट यांस १ महिन्याची रजा मिळाली आहे.— मिस्तर क्यांबल अमदाबादचे असिस्टंट सुपरिंटेंडेंट पोलिस यांस १ महिन्याची रजा मिळाली आहे.— मिस्तर क्यामरन आ. . सिनी. आ. जडज्य रत्नागिरी यांणीं तेथील अदालतीचे कामाचा चार्ज मिस्तर किंग पासून ता. २७ सप्टंबर रोजीं घेतला.— सन्न १८५९ चा आक्ट १४ वरहुकूम लेफ्टेनंट बुलीआट ठाण्याचे असिस्टंट सु० पोलिस यांस त्याच जिल्ह्यांतील असिस्टंट माजिस्त्रेट नेमिलें आहे.

मिस्तर आर्थर भडोचचे फर्स्टअसिस्टंट कलेकटर यांस १ महिन्याची रजा मिळाली आहे.— मिस्तर ग्रांट खानदेशाचे फर्स्टअसिस्टंट कलेकटर आणि माजिस्त्रेट यांस गेल्या महिन्याचे १६ वे तारिखेस रजा मिळाली होती, तीच आणखी २ महिने वाढविली आहे.

---

नामदार कोर्ट आफ् डिरेकटर्स यांणीं हिंदुस्तानसरकारास नंबर ५१ ता. ७ जुलई सन्न १८५८ रोजी असा हुकूम फरमाविला आहे कीं, कोणीही नोकर कांहीं कारणानें त्याची नोकरीची जरूरी नसल्यामुळें त्यास बिननोकरीनें राहावें लागल्यास त्याची बिननोकरीची मुदत वजा जाऊन मागील नोकरीचीं वर्षें पुढें नोकर केव्हांही सरकारांत राहिल्यास तीं वर्षें पेनशिनीस लागू होतात असा ठराव केला आहे तो आम्हीं आपले वाचणारांकरितां सरकारग्याझिटावरून घेतला आहे.

---

रत्नागिरी जिल्ह्यांतील हल्लीं पाहातां निकोप पर्जन्य चांगला पडला. नामदार लिजेदसाहेब हे कलकत्त्यांत हिंदुस्थानच्या कायदे करणारे मंडळींतील पंच आहेत, सर्व जुने कायदे मोडून नवीन एक कायदा करावा म्हणून विचार चालला आहे, याकरितां आसाहेबांनीं रत्नागिरीचे सदरअमीन मिस्तर विंगसाहेब यांस मदतीस घेण्याविषयीं पत्र लिहिलें आहे.

त्यांणीं मोठा पगार दिल्यास तेथें जाण्यास खुषी आहों, असा जबाब दिला आहे. ही योजना झाली व तर ते म्युनूसिपल सदर अमीनीचे जागेवर लवकर चढतील, आणि त्यांची जागा पुरुषोत्तम सिद्धेश्वर विनीवाले मालवणचे मुनसफ यांस द्यावी, म्हणून जगन्मित्रकर्त्ता शिफारस करितो, परंतु जे जुने त्या खात्यांत नोकर आहेत, त्यांस अजी सोडून देणें बरोबर नाहीं. त्याजिल्ह्यांतील १५ मुख्य ठिकाणीं १५ पर्जन्य मापण्याचीं यंत्रें ठेवण्याकरितां सरकारांतून आलीं आहेत, याखबरा जगन्मित्रावरून कळतात.

---

नगर,—येथील बातमीदाराकडून ज्ञानप्रकाशास ता. २१ आकुटोबर सं. १८५८ इ.

मेहेरबान धनजीभाई अकुटिंग फौजदार यांणीं हल्लीं कितीएक लोकांनीं नारांत हत्यारें घरांत पुष्कळ ठेविलीं होतीं, तीं काढून त्यांवर खटले केले. त्यांजला आकुटाप्रमाणें नशियती मिळाल्या; व एक चोरी नऊ महिन्यांचे पूर्वी झाली होती, तिचा शोध काढून कैदी पकडले, त्यांजला कालच रोजीं मेहेरबान माजिस्त्रेट् साहेब यांणीं एकास नऊमहिने, एकास तीन महिने अशा सजा दिल्या. त्याचप्रमाणें लष्कर हद्दींत येक ख्रियेस एके शिपायानें खून केला, तो सांपडावयाचा कठीण असतां या फौजदारांनीं तोही शोधून काढला, अशीं अशीं कृत्यें सरकारकामाचीं चांगलीं केलीं. हें पाहून येथील उदार मेहेरबान टेटलर साहेब कलेक्टर यांणीं यांजला नाशिक येथें अकुटिंग मामलेदार नेमण्याविषयीं रिपोर्ट केला आहे. तो रिपोर्ट बाहाल होऊन आल्यावर हे थोडेच दिवशीं नाशिक येथें जातील. या फौजदारांचे हुशारी वरून यांजला ३०० रुपये दरमाहाची जागा कराचीस मिळत असतां, यांणीं लांब जाण्यास पडतें म्हणून नाकबूल केली, हें येथील पोलिस सुपरिंटेंडेंट साहेब बाहादुर व कलेक्टर साहेब बाहादूर यांणीं मनांत आणून त्यांजला अकुटिंग मामलेदारीची जागा दिली. अशी हुशारी असली म्हणजे अशा जागा मिळतात. सबब सर्वांनीं हुशार असावें. येथील सुपरिंटेंडेंट साहेब यांचे शिरस्तेदार बळवंतराव म्हणून आहेत, हेही फार चागले हुशार असून सरकारी कामास इतके झटतात कीं, कारण पडतें तेव्हां एक दिवसास साठ साठ कोस जर्मान घोड्यावरून खाण्यापिण्याशिवाय जात असतात, ही त्यांची सरकारकामाची उत्सुकता. त्यांचें कल्याण केल्याशिवाय कधीं राहणार नाहीं, असें वाटतें. वरकड अधिकोत्तर नाहीं.

---

## सरकारानें दिलेली बातमी,

तारिख ७ मिनहूस शाहाजहानपूर येथून सैन्य कुच करून निघालें तें भिकानर येथें रुकुदा नावें नदीजवळ जाऊन पोंचलें. तेथें बंडवाल्या बरोबर गोळागोळी होऊन त्यांचे २०० लोक मारले, आणि ३ तोफा होत्या, पैकीं दोन तोफा आमच्या सैन्यानें घेतल्या. आमच्याकडील नाश म्हटला तर ५० मारले व जखमी झाले आहेत.

---

बंड,— हल्लीं हिंदुस्थानांत हळूहळू स्वस्थता होत चालली आहे. अंमल वगैरे बसण्याचीं कामें हळूहळू चालली आहेत. तिकडचा

पर्जन्यकाळ ही सरला आहे आणि लढाईची मोठी तयारी झाली आहे. आतां त्या प्रांतीं दररोज १० मैलांचे अंतरावर थोडीशी फौज जय मिळविण्यास बस आहे. आणि तिचा दररोजचा खर्च गाडयांकरितां फक्त एक लक्ष रुपयांचा असला म्हणजे झालें. बादशाही ३५वी, ७वी पंजाबी पायदळ आणि जाटांचे स्वार मिळून २५०० फौजेचा एक गट करून तो अजीमगडावर मोहीम करण्याचा निश्चयें ठराव झाला आहे. या फौजेस आणखी एक अगर दोन बादशाही पलटणी आणि सरहोपग्रांट हे मिळून ती सर्व फौज गोंडायावर हल्ला करून व तिथले बंडवाले नाहींसे करून गोरखपूर परगण्यांतून झाडणी करील, आणि अखेरीस फैजाबादेचे बंडखोरांचीं मजबूद ठाणीं आहेत त्यांवर जाऊन त्यांचा अगदीं मोड करील. याप्रमाणेंच दुसरा एक फौजेचा गट उत्तरेकडून खालीं उतरेल, आणि बहुधा त्यावर ब्रिगेडियर ट्रीप हे सेनाधिपति होतील. ही फौज महोमदी आणि बरीच यांवर हल्ला करून तेथच्या बंडवाल्यांचा पराभव करणार आहे; आणि बाकी जे बंडखोर राहतील त्यांस लखनौकडे हांकून लावणार आहे. लखनौ येथून कमांडर इन्चीफ साहेब हे स्वतः कानपूर येथें एक विलक्ष मोठी फौज जमून ती पाहिजे तिकडे मोहीम करण्यास तयार होऊन राहीपर्यंत सर्व युद्धप्रकरणीं कामकाज पाहातील. अयोध्याप्रांताच्या पश्चिम, दक्षिण आणि नैर्ऋत्य या तीन दिशांकडील बहुतेक हद्दी आपल्या सरकारच्या हातीं आहेत आणि आतां या सर्व युद्धाच्या योजना पासून बाकीचा प्रांत पुनरपि हस्तगत होऊन तो हस्तगत प्रदेशास जोडला जाईल, असें जरी आहे, तरी फौजच्या मोठमोठ्या टोळ्या महिन्यांचे महिने किंबहुना कांहीं वर्षे सितापूर, लखनौ, फैजाबाद येथें छावण्या देऊन राहाव्या लागतील, आणि जुनी पडत आलेली चूक ही कीं, लढाऊ प्रांत आहेत, ते गोरी फौजे वांचून ठेवायाची रीति पडली होती तसें आतां पुनः होणार नाहीं.

हिंदुस्थानाच्या मध्यप्रदेशांत पुनः स्वस्थता होऊन अमल चालावा याविषयींचा बंदोबस्ताचे प्रकार अद्यापि उलमलीत आहेत असें दिसतें. सरह्युरोझ हे रवडीच्या सैन्यावर हुकूमत चालवणार नाहीत, व याविशीं कांहीं व्यवस्थाही नाहीं. लेफ्टनंट कर्नल स्कुडामोर यांस १४वे ड्रगून स्वारांची आणि ८०वे पायदळच्या गोऱ्या टोळ्या व ५०० शीख लोक या फौजेस समागमें देऊन सिंदे महाराजांचा वसूल करण्याकरितां पाठविला आहे. त्या कामांत त्यांची त्यांसन गैर वाकबगारी करून आली आहे. सिंदाचे मुलखाची स्थिति या अव्यवस्थेवरूनच कळून येते. बुंदेलखंडांत अद्यापि बंडवाल्यांचा मोठा समुदाय इटोसकीस येत आहे. आणि त्या प्रांतीं गप्पा अशा उठल्या आहेत कीं, सरकार तहाची बोलणीं करणार आहे. ते लोक आपल्या जिवावर उदार होतील, परंतु त्यांपासून तो प्रांत घेतला जाईल. आणखी पश्चिमेकडे तात्या टोपे यांचे मोड होतात, तथापि त्याचा अजी तोड होत नाहीं. फ्रेंड.

हें पत्र ज्ञानप्रकाश छा० कृष्णाजी त्र्यंबक रानडे यां० छा०

# ज्ञानप्रकाश.

सोमवार तारिख १ नोवेंबर सन्न १८५८ इस०


## वसूलरुपयें.

१० अज्जम आपाजी रावजी मामलेदार तालुके शेवगांव सन्न १८५८ जून अखेर.

## जाहिरात.

दाजी नारायण पेंडसे राहाणार कलबे वाडे हाल्लीं मुक्काम पुणें यांसीं विष्णु केशव साठे वस्ती शहर पुणें तुम्हांस कळवितों कीं, तुमचेकडे आमचें येणें खात्यावरून ऐन मुद्दल रुपये ५२५।१६६ कंपनी, व व्याज दरमाहा दरशेंकडा ८६ आणे कराराप्रमाणें आश्विन वद्य ३० शके १७८० पर्यंत व्याजाचा आकार रुपये २११९।३ दिल्यादिवसापासून एकंदर रुपये ५४६।१०।९ पांचशें शेचाळीस रुपये दाहा आणे नऊपै. आतां सदरहू रुपये थोडे व्याजानें ठेवण्यास आम्हांस सबड नाहीं; सबब ही नोटीस दिले तारिखेपासून पंधरा दिवसांचे आंत सदरहू रुपयांचा भरणा रा. बाराम मनाजी फुलवडेकर यांजकडे करावा. म्हणजे ते आमचे रुपयांची पावती आमचे सहीची देतील. मुदतीप्रमाणें भरणा न जाल्यास दरमाहा दरशेंकडा व्याज रु० २ प्रमाणें तुम्हांस द्यावे लागतील व घेतले जातील. या नोटिशीचा खर्च व सखाराम मनाजीचे नोटिशीचा खर्च तुमचे नांवें लिहिला आहे तो तुम्हांस सदरहू व्याजाप्रमाणें द्यावा लागेल. ता० ३० आक्टोबर सन्न १८५८

सही विष्णु केशव साठे दुसकर खुद.

**सूचना.**— तारि० ४ नोवेंबर रोजीं गुरुवार आलो आहे. आणि त्याच दिवशीं नर्कचतुर्दशीचा दिवस सणाचा आहे, सबब मागें प्रसिद्ध केल्याप्रमाणें ज्ञानप्रकाशपत्र तयार होणार नाहीं असें आम्ही आपले वाचणारांस कळवीत आहों.

## ज्ञानप्रकाश ता० १ नोवेंबर सं० १८५८ इ०

नामदार कम्यांडर इन्चीफ साहेब यांची स्वारी येथून मुंबईस हरमेजस्टीसमोस्ट ग्रेशस क्वीन विक्टोरिया राणी साहेब बाहादुर यांचा विलायतेहून जो जाहिरनामा आला त्याची व्यवस्ला करण्याकरितां मेल्या शनवारीं गेली आहे.

**आग.**— भवानी पेंठेंतील सरकारी मिस्त्री तयार करण्याची शाळा ज्या जाग्यांत आहे त्या जाग्याला आग लागून तेथील सामान दोन अगर तीन हजारांचें जळालें. इमारत फारशी जळाली नाही. ही आग लागण्याचें कारण असें ऐकतों कीं, तेथें लोहारकाम होत असतां ठिणगी सामानांत जाऊन कांहीं वेळानें एकदम होम उसळला.

रेलवेरस्त्यांत पुण्याहून मुंबईपावेतों १३०॥ मैल रस्ता चालू आहे, त्यावरील एके आठवड्यांतील उत्पन्नाचा आकार रुपये खाली लिहिल्याप्रमाणें.

उतारकरूंबद्दल.— १९९४८८८

ओझ्याबद्दल.— १२७२३६९

एकंदर रु० ३२६७१।१३

आतां याच मागील वर्षाचे आक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यांत रस्ता ८२॥ मैल फक्त होता त्याचा आकार १२११०।१२ रुपये आला होता.

तारीख १५ आक्टोबरचें छावणी दगोरा एथून आलेले पत्रांतील मजकूर पुणेआ-बझरधरांत येतला आहे कीं, कर्नल ग्रीडल याचे हाताखालची लढाऊ फौज तेहरी ये-थील राणीचे शहरापासून ५ कोसांचे आंत आहे. या छावणींत १४ वे मिनहूस २ रे गोरे पलटणीचे ५६ लोक, पंजाबी आणि शीख यांचे पायदळ व स्वार मिळून सुमारें ८०० यांखेरीज साल्तीसचा मोठा भरणा बार-शाही १४ वे लेट द्रगुनचा अर्धा भाग इतकी फौज सदरहू छावणींत मिळाली आहे. आणि ही फौज येथें बंडवाल्यांचे एकंदर ५००० लोक असून, त्यांत मुख्यत्वें स्वार आ-हेत, अशी दाट बातमी आहे. त्यास प्रसं-ग पडला असतां त्या बंडखोरांचें पारिपत्य करण्यापुरती जाली आहे. या बंडवाल्यां-वर मुख्य सुभेदार अधिकारी आहे. आ-णि ते बानपूर किंवा त्याचे आसपासचे जंगलांत आहेत, अशी वदंता आहे. क-प्तान पींकनी एथचा कलेक्टर हा स्वतः आ-पले बराबर शीक स्वारांची एक पटी घेऊन सकाळीं बंडवाल्यांचा पत्ता लावण्याकरि-तां शोधार्थ निघाला आहे. जर त्या कले-क्टरास बंडखोर अमुक ठिकाणीं आहेत, असें कळलें तर ही फौज बानपूर किंवा तेहरी एथें जाईल असें खात्रीनें सांगवत नाहीं; परंतु या दोन ठिकाणीं जाण्याचें का-रण असें कळतें कीं, तेहरीच्या राणीनें फौ-ज वियरून गेली आहे, परंतु ही गोष्ट खोटी होवो, अशी अपेक्षा आहे.

---

पुणे हद्देंतील पेठी मौजे शिरवळी येथें नाथा-जी बिन मामाजी माने यानीं हत्यारें कांहीं पु-रलेलीं आणि कोठीं उघड अशीं २८ सुमारें किंमत १५०० यांची खानसाहेब कामजी नसर वानजी पुण्याचे फौजदार यांस गुप्त बातमी ला-गल्यावरून त्यांणीं गेल्या शुक्रवारीं एथें आणि-लीं आहेत. या हत्यारांत दोन मोठ्या बंदुका हत्ती अगर उंटावरून सोडण्याच्या आहेत. त्यांची लांबी ४ फुटांची आहे. तशाच तरवारीही फार मोलवान आहेत. व दोन रैफलच्या दु-बारी बंदुका ही उत्तम आहेत, असें समजतें. आतां हें काम खानसाहेब यांणीं आपल्या ह-द्दींतील नसून सरकारनें गुप्त दडवलें आहे.

---

विलायतची डांक आली, त्यांतील (होमन्यूजप-त्रावरून कळतें कीं, लंडन शहरांत एका गरी-ब कारागिराच्या बायकोस एका खेपेस तीन मुलें झालीं. एक विधवा स्त्री (मृत उलियम स-दरलांड याची बायको) ही इतक्या उमरीस जाऊन पोंचली आहे कीं, तिची हाली उमर १०४ वर्षांची आहे.

---

**सासवड**,— ता॰ २७ आक्टोबर— येथील ए-क मांगिणीची मुलगी जेजुरीहून सासवडास आ-ली आणि लागलीच मेली. तिचा पंचनामा होऊन आल्यामुळें मेली असा झाला.— एका वा-ण्याची पेटी दिवसास एका पोरानें फोडली, अ-शी फिर्याद आली, परंतु पुरावा नसल्यामुळें रद्द झाली.— सुपरिंटेंडेंट पोलिस पुणें यांची स्वारी एथें येऊन त्यांणीं कुंजमानें घर आणि मामलेदार यांची कचेरी पाहिली. नंतर त्यांची स्वारी जेजुरीस गेली.

---

वरच्या पृष्ठीं सूचना दिली आहे तिजकडे स वाचणारांनीं लक्ष द्यावें.

विलायत.— येथील डांक आक्टोबर २ पर्यंतची आली आहे तींतील वर्तमानें येणें प्रमाणें.— चीन देशाबरोबर तह झाला तो पाहून विलायतेचे प्रजेस संतोष झाला. आणि त्या तहाचे कलमाचा सारांश तेथील सरकारानें प्रसिद्ध केला; रूमशीमचे राज्यांत जमाबंदीचे कामांत सुधारणूक मोठ्या सपाट्यानें चालली आहे, रूम शहरांत फराशिसाची फौज आहे, तिला आणखी दुमाला मिळणार आहे; नवीन इंडिया कौन्सलची सभा भरून मुख्य लार्ड स्टांउली यांणीं हिंदुस्थानचें राज्यकारभार चालविण्याचे कामांत ज्या अडचणी होत्या, त्या भाषणांत कळविल्या, मिस्तर राबर्ट मांटगोमरी यास इंडिया कौन्सलचा प्रोवीज्यनल (भावी) मेंबर नेमिला आहे; रशियाचा बादशाहा, प्रसियाचा राज्यपुत्र, आणि फ्रान्सचा बादशाहा यांची मुलाकत वारसा येथें झाली, तेथें मोठी कवायत झाली. आटलांटिक महासागरांतून तारायंत्राचें काम बंद पडलें तें चालेल, असें दिसत नाहीं. सन्न मजकुरीं विलायतेहून २५००० फौज हिंदुस्थानाकरितां रवाना झाली, व आणखी पाठविण्याविषयीं हुकूम झाला आहे. एकंदर हिंदुस्थानांत राणीची एक लाख फौज करावी असा संकल्प आहे, नेपल्स एथील राजानें इंग्लंड व फ्रान्स यांच्याशीं सलुख्यानें न वागण्याविषयीं हेतु सरकारी नात्यानें प्रकट केला आहे,— रूसचे राज्यांत काकेसस नामें एक मोठा पर्वत आहे, तेथें शामेल म्हणून एक सरदार आहे, त्यानें आलिकडेस बंड माजविलें होतें, सबब त्याच्या बंदोबस्ता करितां रशियाचे कांहीं लोक जाऊन त्यांणीं त्या बंडवाल्यास मागें हटविलें तरी त्यानें पुनः चढाई करून, तो पुढें सरसावला, तेव्हां त्यावर रूसचा एक सेनापति मिर्शांके नांवाचा याणें कांहीं लोक आपल्या बरोबर घेऊन जाऊन त्याबरोबर गोळागोळ करून त्या बंडवाल्यांचा अगदीं पराभव करून टाकला. त्यांत ३७० लोक मारले गेले, ८४ घोडे घेतले, व शिवाय २८० तलवारी, आणि ४५५ पिस्तुलें, आणि १४ तंबू इतकें सामान मिळालें. रशियाकडील १५ लोक मारले गेले, आणि १६ घायाळ जाले. विलायतची डांक निघाली त्याच दिवशीं तेथें इतर बेटांतून सोनें ६३१०००० त्रेसष्ट लक्ष रुपयांचें पोंचलें होतें.

---

मागें लाडूबाजीविषयीं जो प्रकार लिहिला होता त्याजबद्दल असें समजण्यांत आलें कीं, त्याच्या शोधार्थ अहमदनगरचे पोलिस सुपरिंटेंडेंट मेजर आर्थर साहेब आणि धनजीभाई कावसजी फौजदार हे गेले होते, चौकशी अंतीं असें समजून आलें कीं, गंडापूर तालुक्यांतील एका गांवचा एक मारवाडी न्हावी दुखण्यास पडला होता, तेव्हां त्यानें असा नवस केला कीं जर मी बरा झालों तर कुतऱ्यांस चारण्यासाठीं गांवोगांवीं गोळे पाठवीन, त्या प्रमाणें त्यानें हें केलें. हे गोळे कणकीचे करून आंत गूळ व सांजा घातला होता.

ज्ञा. द.

---

आम्हांस असें समजलें आहे कीं, पुण्याचे तुरुंगांत ७ कैदी बंडाचे वहिमावरून ठेविले आहेत. त्यांची सरकारांत चौकशी होऊन त्यांपासून बऱ्या वर्तणुकीचे जामीन घेऊन त्यांस सोडून देण्याचा हुकूम झाला आहे.

आपण आज पासून राणी सरकारची रयत होणार. आपला आणि कंपनीसरकारचा आतां कोणताही संबंध राहिला नाहीं. आणखी कंपनी सरकार हें सरकार म्हणून कांहीं खूण राहिली नाहीं. या कंपनी सरकारचा या आपल्या देशांत अंमल झाल्यापासून आजपर्यंत त्या सरकारचे इच्छेनें व सहायानें जे कांहीं लाभ व सौख्य हीं झालीं असतील, त्यांबद्दल आपण त्यांचे वास्तविक आभार मानिले पाहिजेत. हें सरकार परस्थ असून त्याचा आपला मनुष्य संबंधावांचून दुसरा कोणताही संबंध नाहीं. असें असतां स्वकीय म्हणजे ज्यांचे देश, धर्म, जाति इत्यादिक गोष्टींशीं संबंध असून जे आपल्यावर राज्य करीत होते. त्यांच्या हातून ही ज्या गोष्टी घडल्या नाहींत त्या त्या गोष्टी घडल्या आहेत. या कंपनी सरकारचे अमलांत विद्येचा विस्तार, व्यापाराचा फैलाव, व इतर अलौकिक आणि उपयुक्त कृत्यें यांखेरीज राज्यव्यवस्था व दुसऱ्या कांहीं मनुष्यमात्रास सखाव ह्या संतोषकारक गोष्टी, हीं झालीं आहेत. या सर्व गोष्टी मनांत आणून कंपनीसरकारास साधारणपणें दोष द्यावा असें आपणांस वाटत नाहीं. आतां जरी या सरकाराकडून व्हावें तसें कितीएक कामांत झालें नाहीं सबब विचारी, व उत्सुक यांची बुद्धि या कंपनीसरकारास दूषण देण्यास प्रवृत्त असे, तरी त्यांणीं मागील परस्थ, आणि स्वकीय राजांच्या कारकीर्दी मनांत आणल्या आणि त्यांच्या कारकिर्दीशीं कंपनी सरकारच्या कारकिर्दीची तुलना करून पाहिली असतां या सरकारास दोष लावावा असें त्यांच्या दिलांत येणार नाहीं,

कंपनीसरकारचा अंमल एकाएकीं आपला वरून नाहींसा झाला. तो कांहीं हिंदुस्थानचे प्रजेच्या इच्छेनें नाहींसा झाला नाहीं. विलायतेंतील प्रजेनें आपली इच्छा तेथील सरकारास गेल्या सालीं कंपनी सरकारचे विरुद्ध जाहीर केली. त्या योगें तेथील सरकारचे मनांत आलें कीं, हिंदुस्थान देश आपले अमलाखालीं आणावा. तो आणला असतां विलायतेची प्रजा खुषी होईल, आणि मनुष्यमात्रास फेरफार वरचेवर व्हावेत अशी स्वाभाविक इच्छा आहे त्यामुळें हिंदुस्थानची रयत ही कंपनीसरकारचा अंमल गेल्यापासून दुःखी न होतां राणी सरकारचा अमलास खुषी होईल. असे विचार मनांत आणून हा नवीन अंमल जारी झाला असावा. आतां साल गुदस्तां हिंदुस्थानांत बंड उद्भवलें तेव्हांपासून विलायतेच्या लोकांस कंपनीसरकारचे विरुद्ध गवगवा करण्यास चांगली संधी मिळाली. तेणेंकरून राणीला हिंदुस्थान आपले अमलाखालीं आणावयाची तजवीज लवकर करावी लागली. हें खरें आहे, परंतु विलायतेचे पुष्कळ लोकांस हिंदुस्थान देश कंपनी सरकारचे ताब्यांतून निघून राणीसरकारचे अमलांत यावा, अशी इच्छा बहुत होती, आणि त्यांचा प्रसंगोपात एतद्विषयीं उद्योग ही चालला असे.

आतां राणीसरकारचा अंमल झाला आहे, तर त्यापासून या आपल्या देशास अधिक हित होईल किंवा कसें याविषयीं शहाणे, व मूर्ख हिंदुस्थानचे सर्व लोक यांचे मध्यें आपसांत मभ चालले आहेत.

---

कर्नल जेकब साहेब कोल्हापूरचे पोलिटिकल एजंट हे गोव्यास माजी बंडाची चौकशी करण्यास जाणार आहेत, असें ऐकतों.

## ज्ञानप्रकाशकर्तेयांस.

"विनंती विशेष. महाराज, हा खालीं लिहिलेला मजकूर आपल्या पत्रांत मेहेरबानी करून छापण्यासाठीं आपण जागा द्यावी.

आपणांकडे चोहोंकडच्या आखबारी, व वर्तमानपत्रें येत असतील, त्यांत इंदूरची माळवा आखबारही आपणांकडेस येत असेलच. तेव्हां त्या पत्राची लिहिण्याची शैली, व त्यांतील वर्तमान, आणि त्याची योग्यता, हीं आपणांस माहीत होत असतीलच. आमच्या पाहाण्यांत ता० १२ आक्टोबरचा माळवा आखबारचा कागद आला, त्यांत सीताराम बदमाश याची खबर लिहिली आहे. ती खबर पाहून असें समजण्यांत येतें कीं, सीताराम बंडखोर हा खुमानसिंग बक्षी याचे मदतीनें मारला गेला, परंतु ही गोष्ट अगदीं खोटी आहे. खचीतच तें पत्र वाला आपल्या सरदाराची तरफदारी करितो आहे, परंतु पत्रकर्त्यास आपल्या माणसाची तारिफ करणें जरी खचीत आहे तरी त्यासत्या बाबद खोटें लिहिणें हें लायख नाहीं. आतां वास्तविक वर्तमान असें आहे कीं, सीताराम, व बळवंतराव नाना बक्षी, व जानबा हवालदार, वगैरे बदमाशांनीं होळकर सरकारचे खरगोन परगण्यांतील कैक गांव लुटले, तेव्हां खरगोनच्या कमावीसदारापाशीं तीनशें ३०० जमात हजर होती, आणि बदमाशी लोकांपाशीं सगळे दीडशें हत्यारबंद लोकां पेक्षां जाजती नव्हते. एके दिवशीं सीताराम बंडवाला ४५ बंडखोरांनिशीं खरगोन परगण्यांतून जाऊन बिजागड एथें गेला. तथापि त्या कमावीसदाराची २०० लोक असून त्या बंडखोरांवर चाल करून जाण्याची हिमत झाली नाहीं. कमावीसदार रोजचे रोज सर्व शिबंदी लोकांस सांगत असे कीं, आज सर्वांनीं तयार राहावें, भिल्लांवर दौड करूं. या नमुन्यें बोलून स्नानसंध्या, पूजा, व भोजन यांमध्यें नित्य चार वाजतपर्यंत वेळ घालवीत असे. पुनः संध्याकाळीं सर्व शिबंदीस बोलावून विचारी कीं, सर्वांजवळ सामान दुरुस्त आहे की नाहीं? त्यावर ते जबाब देत कीं, आमचे जवळ दारूगोळी नाहीं. अशा भानगडींत कित्येक दिवस गुजरले, आणि बदमाशी लोक जास्ती जास्ती इजा द्यावयास लागले. महाराज साहेबांनीं हें चरित्र ऐकून दोनशें २०० स्वार, २०० पायदळ, व दोन तोफांनिशीं दलशेर खां कुमेदान कमानीर यांस रवाना केलें. हे लोकही खरगोन परगण्यांत गुपचूप जाऊन बसले. कप्तान कीटन साहेब बाहादूर नेमाडचे पोलिटिकल एजंट मंडलेश्वराहून आपल्या इलाख्यांत बदमाशी लोक इतके दूर येऊन पोंचणार नाहींत, अशा अंदेशांत होते, सबब ते कसराबंद म्हणून नर्मदेच्या दक्षिण बाजूस तीन कोशांवर खेडें आहे. तेथें पोलिसचे स्वार व पायदळ यासुद्धां गेले. दोन तीन दिवसांनीं इंदुराहून हुकूम आला कीं, तुम्हांस सिंद्याच्या रस्त्यावरील होळकराचे गांवाचा अखत्यार दिला आहे, तर तुम्ही तेथचे बंडखोरांचा मुखत्यारीनें बंदोबस्त करावा. हा हुकूम पोंचल्यावर साहेब महसूफ जुलवाना एथें परत गेले. व इंदुराहून महाराजांनीं खुमानसिंग बक्षी यांसमेत थोडी फौज देऊन त्यांस खरगोन एथें पाठविलें. कीटनसाहेब बाहादूर हे जुल्वान्यास थोडे दिवस राहून

तालबाडीस गेले. तेथून बिज्यागडचे पाहाडाखालीं पोंचले. तेथें एका पानबाडी गांवांत खबर लागली कीं, सीताराम वगैरे लोक बरूड लुटण्यासाठीं पाहाडाखालीं उतरले आहेत. त्याच वेळेस आसाहेबांनीं कूच करून त्यावर दौड केली. रस्त्यांत भडवाली या नांवाचे गांवांत १० मनुष्यें बसलीं होतीं. त्यांस दहशत देऊन पुसलें कीं, सीताराम कोठें आहे? तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, आम्ही त्यांतीलच आहों, व सीताराम पुढें चालला आहे. त्याच क्षणीं त्या १० लोकांस कैद करून पुढें चाल केली, तों पुढें सीताराम साठसत्तर मनुष्यांनिशीं एका ओढ्यांत मक्याचीं कणसें भाजून खात होता. व कितीएक लोक इकडे तिकडे गेले होते, इतक्यांत दौड करून २५ लोक मारले, व सीतारामाचें शिर तोडलें. १६ मनुष्यें कैद केलीं. दुसऱ्या रोजीं पाहाडावर गेले, तों सर्व लोक सामान टाकून पळून गेले होते. व रघुनाथसिंग मंडलोई हा हत्यार ठेवून चालत आला. नानावसी पाहाडावर पकडला गेला. या रीतीनें सर्व फैसला केला. खरगोन लाख रुपयांचा परगणा आहे, तथापि हजार
१००००० १०००
रुपये रसदी करितां मिळाले नाहींत. अखेर मंडळेश्वराहून कमावीसदार सेठ याइलाखा नेमाड यांस एक हजार रुपये बराबर घेऊन पोटगीचे बंदोबस्ताकरितां खरगोन येथें बोलाविलें. आतां खरगोनच्या कमावीसदाराच्या बंदोबस्ताची तारिफ लिहिण्यात फार वेळ सांपडला पाहिजे, परंतु जेव्हां त्याचे इलाख्याचा बंदोबस्त याच्यानें झाला नाहीं. तेव्हां सरकारांनीं त्याचे इलाख्याचा लाचार होऊन बंदोबस्त केला नाहीं. त्याच्या इलाख्यांत हात घालण्याची कांहीं गरज नव्हती. कप्तान कीटन साहेब हे तेच साहेब होत कीं, जे धार व मंदोसर येथील लढाईत याद देऊन जाऊन मिळाले होते. आणि चंदेरीस फत्ते करते वेळीं, त्यांस तीन गोळ्या लागून जखमा झाल्या होत्या ते; सीताराम वगैरे बदमाशांवर तलवार चालली त्या वेळीं शिकांचे २६ स्वार, व पोलिसाचे १८ स्वार, हजर होते. व फरजअली रिसालदार, व जोनसिंग जमादार रिसालासीक; व रोसनखा जमादार पोलिस, यांणीं चांगली मदत केली, व बाकीची फौज पाठीमागून येऊन पोंचली. आणि खुमानसिंग दुसरे रोजीं खरगोनाहून भडवाली मुकामावर साहेबाजवळ गेले. कळावें ही हकीकत. ता. १९ आकटोबर सं. १८५८ इ."

"ताजा कलम,— कीटन साहेबानें आपल्या हातानें सीताराम यास तमंच्यानें मारला, व दलशेरखां या लढाईत आला होता. मुकाम छावणी मंडळेश्वर"

*** सदरील पत्र आम्हांस आमचे एका थोर मित्राकडून आलें आहे. तो मित्र आमचे खात्रीचा आहे. हें पत्र हिंदुस्थानी भाषेंत होतें, सबब आम्ही त्याचा तर्जुमा करून तो छापविला आहे. इंदुरास माळवा आखबार नामें एक वर्तमानपत्र हिंदुस्थानी भाषेंत होळकरशाईत निघतें; आणि होळकर महाराजांचे पदरचा सरदार खुमानसिंग आहे, तेव्हां त्याची तारिफ त्या पत्रकर्त्यानें कार्याकारण विचारावांचून केली, हें आश्चर्य नाहीं. 'गुळाचा गणपति त्यास गुळाचाच नैवेद्य' आणि ही रीति सर्वत्र मराठीशाईत आहेच, परंतु आतां या मजकुराची सदरहू आखबारवाला

दुरुस्ती आपले पत्रांत करील अशी आम्हांस उमेद आहे. ज्ञानप्रकाशकर्त्ता.

**नेमणुका**— क्याप्टन वारनेस २०काचे पलटणीवरील यांस बेळगांवकलेक्टरीकडेस शेटसबुडीलेबीवरील कमांड घेण्याकरितां लेफ्टनंट गेल्यानंतर नेमिला आहे.— लेफ्टनंट शार्ट सोलापूरचे सुपरिंटेंडेंट पोलिस यांस ता० ५ नोवेंबरपावेतों रजा मिळाली आहे.— कोंकणचाअक्टिंग सेशनजड्ज्य याणीं रत्नागिरीस सर्कीट जाण्याकरितां ता० २० मिनहूस आपलें सदरस्टेशन सोडिलें.— मिस्तर पारकीनसन यांस गुजराथेंत प्रोबेशनरी सुपरन्युमररी असिस्टंटसुपरिंटेंडेंट पैमाषखात्यावरील नेमिलें.— मिस्तर सामनकोत्री कलेकटरीचे डिपुटीकलेकटर यांस विलायतेस जाण्यास १५ महिन्यांची रजा मिळाली.

खेडा आणि भडोचचे कलेकटरांस प्रांतांत फिरण्याविषयीं परवानगी मिळाली.

मिस्तर टरकांड रत्नागिरीचे कलेकटर यांस गेल्या महिन्याचे ता० ७ जून रोजीं रजा मिळाली होती तीच आणखी एक महिना वाढविली आहे.— खानदेशजिल्ह्यांतील असिस्टंटाकडेस तालुक्यांची वांटणी पुन्हा झाली आहे ती.

मिस्तर ग्रांट फस्ट असिस्टंट कडेस, चोपडा, यावल आणि सोदा.

मिस्तर वीडींग सेकंड असिस्टंट कलेकटराकडेस, मालेगांव, चाळीसगाव, व बरगाम.

मिस्तर रामसे अक्टिंग ३रा असिस्टंट कलेकटराकडेस, नसिराबाद, जामनेर, आणि एरंडोल.— मिस्तर रा० बी० असिस्टंट कलेकटराकडेस आंबळनेर, आणि थाळनेर.

रावबहादुर बाळकृष्ण हरी डिस्त्रिक्ट डिपुटी कलेकटराकडेस धुळें आणि पिंपळनेर.— मिस्तर वाबल नगरचे डि० डिपुटी कलेकटर यांस १५ दिवसांची रजा खासगी काम करितां मुंबईस जाण्याची मिळाली.

**खेड्यास**— मिस्तर व्हईट यांस २ आ० कलेक्टर, व मिस्तर म्यानसन यांस अने असिस्टंट नेमिले आहेत.— **भडोचेस**— मिस्तर पेडर ३रा असि० कलेकटर नेमिला आहे.

**ठाण्यास**— मिस्तर वाडिंगटन यांस मराठी अभ्यास वाढण्याकरितां नेमून शिवाय मिस्तर मूर आक्टिंग ३ असिस्टंट, व मिस्तर सी० इब्ल्यू० वेल आणि मिस्तर मीडलटन असे असिस्टंट कलेकटराकडेस ठेविले आहेत.

**पुण्यास**— मिस्तर एन्० एम्० डब्ल्यू० डानील आणि जेहंटर यांस सिविलसरवीस यांस मराठीचा अभ्यास करण्याकरितां ठेविले.

**साताऱ्यास**— मिस्तर जे० म्याकफारलान सुपरन्युमररी थर्ड असिस्टंट कलेकटर नेमिलं आहे

मिस्तर सीटीणकार बेळगांवचे कलेकटर यांस ता० १ नोवेंबरपासून प्रांतांत फिरण्याकरितां परवानगी मिळाली.— मिस्तर लारपेंट सिविलसरवीस हे विलायतेहून परत मुंबईस ता० २७ मिनहूस येऊन दाखल झाले.

लेफ्टेनंट ग्लासफर्ड आणि मिस्तर गिलडर यांस पैमाषखात्याचे एक्स्ट्रा असिस्टंट आणि एक्स्ट्रा सब असिस्टंट दक्षिण महाराष्ट्र प्रांतांत नेमिले आहेत.— लेफ्टनंट वाडिंगटन यांस पैमाष खात्यांतील असिस्टंट सुपरिंटेंडेंट दक्षिण महाराष्ट्र प्रां-

तांत नेमिले आहे. — मिस्तर मडूल पुणें आ-णि ठाणें यांवरील सबअसिस्टंट पैमाषीचे यांचा दक्षिण महाराष्ट्रांतांत वर्ग केला आहे.

---

रत्नागिरि. — अदालतीचे शिरस्तेदार रा. रा. नारायण जगन्नाथ भिडे यांस दापूर येथें मुनसफ नेमून ते आजन्म [illegible] जातील रा. आपाजी जगन्नाथ दाबके मो. [illegible] आणि राजापूरचे रा. रामचंद्र बाजीराव चो-कर असे उभयतां सभ्यांतील अ[illegible]कार-कून या परस्परांत वर्ग झाला आहे. मालव-णाचे मुनसफ बिनीवाले हे आजारीने सल्या-मुळें देशांत जाण्याकरितां २ महिन्यांची र-जा मिळाली — खोतीच्या हक्काविषयीं चौ-कशी करण्याकरितां कप्तान कोपर साहेब यांची स्वारी एथें लवकरच येणार व पूर्व-वत् पैमाषखात्याचें काम चालणार असें वाटतें. ज. मि.

---

मुंबईत एक श्रीमंत रा. रा. लक्ष्मण हरि-श्चंद्रजी, ऊर्फ भाऊरसूल प्रभु होते, ते गे-ल्या मंगळवारीं मरण पावले. यांचे वय ६९ वर्षांचें होतें. हे मुंबईत प्रख्यात होते. त्यास मुलगा आहे. रसूल हें यांचें आ-डनांव पडण्याचें कारण लोक असें सांग-तात कीं, यांचे तीर्थरूप, कोणी रसूल नांवा-चा साहेब मुंबईस असे, त्याचे कृपेकरून त्यामु-ळें हे उदयास आले, म्हणून त्यास रसूल असें बहुत दिवसांपासून लोक म्हणूं लागले.

---

पुणें अदालतीत येथील मो[illegible] [illegible]कारकून आहेत ते रावसाहेब [illegible] आलें, आणि प्रतिवादी विश्वासखंडेराव रास्ते याजवर सदरहू वादिनें दावा परमाल साडेसाहा हजार रुपयांस गाहाण आहे, याबाबे अर्ज केला आहे त्या कामांत दगा-बाजीचा लेख आहे असें लिहून आल्या-वरून मेहेरबान लाफतन साहेब यांणीं ही त्या कामांतील मुख्य चौकशी पाहून, सदरहू गुन्ह्याची चौकशी होण्याकरितां सुपरिंटेंडेंट पोलिसांकडेस खटला पाठ-विला आहे. आतां आम्ही वाचणारांस पुसतें कीं, माजिस्त्रेट साहेबांकडेस हा खटला पाठवावयाचा तो त्यांणीं सुपरिंटेंडेंटाक-डेस पाठविला कां? तर त्याचें कारण ब-हुत करून असें असावें कीं, हा गुन्हा भर-ण्याचें काम सुपरिंटेंडेंपोलिसाचें आहे स-बब त्यांजकडेसच एकदम पाठविला. आ-तां याच्या चौकशीस आरंभ होणार आहे.

---

नामदार मेहेरबान फिलिफ उलियम लिजिट साहेब बाहादुर कलकत्यांतील कायदे करणारे मंडळींतील मुंबईसत्याचे अध्यक्ष यांची स्वारी पुढील वर्षाचे जानेवारी महि-न्यांत इकडेस रजा घेऊन आपले मित्र मं-डळीस भेटण्याकरितां येणार आहे असें आम्हांस आधारावरून कळलें आहे.

---

मद्रास खात्याचे सेनापति यांची स्वारी म-द्रासेहून मुंबईस येणार आहे असें ग्या झि-टावरून समजतें.

---

राणीसरकारचा अंमल हिंदुस्थानावर झाला याचे उत्साहार्थ २०००० रुपये खर्च करण्याबद्दल हिंदुस्था-न सरकारानें मंजूर केलें आहे.

---

ज्ञानप्रकाश छापखान्यांत छा०

हिंदुस्थानांतील बंडाप्रकरणीं सरकारानें प्रसिद्ध बातम्या दिल्या आहेत त्याप्रमाणे मनात

ता. १० व ११ आक्टोबर रोजीं शाहाबाद येथें नदीच्या किनाऱ्यापाशीं मिस्तर ग्रोबिन हा २० शिखलोकांनिशीं बनारस नांवाचे आगबोटींत बसून गेला, त्या आगबोटीवर कप्तान ब्रोन होता, त्या ठिकाणीं पांचा ३५७ शिपाई व शंभर स्वार यांच्याशीं सामना होऊन मोठी चकमक झाली; या प्रसंगीं ४ मोठ्या बोटींचा नाश झाला, व शंभर शत्रु मारले गेले, असें असतां सरकारच्या पक्षाचा बिलकुल नाश झाला नाहीं. मिस्तर ग्रोबिन हे कप्तान ब्रोन यांच्या शौर्याविषयीं मोठी तारिफ करितात, परंतु ही पहिलीच तारिफ साहेबमहस्रूफ यांची आहे असें नाहीं. कप्तान पिंकी यांणीं नेमाडी येथील कर्नल मिडल यांचे छावणींतून तेहरीस गेले आहेत. कर्नल मिडल यांचा कूच १७ वे आक्टोबरास तात्याटोपे यांचे फौजेवर होऊन त्यास त्याच्या लोकांनिशीं तालबिहत यांकडे परत काविलें. या बंडखोरांचा बेतवा येथें नदी उतरून सिरस घाट येथें जाण्याचा होता. कर्नल लिडल हे तालबिहतकडे कूच करून जात होते. तीं लेफ्टनंट टकर हे गोरे होर लोकांचे तुकडीनशीं आसिरगडास जाऊन आसिंगाबाद जिल्ह्या इकडे कूच करीत होता. मेजर लीयर मौथ यांची तुकडी महू येथें बिनरोगी जाऊन पोंचली.

१९ वे आक्टोबर रोजीं सिंद्रा येथें सुमारें बाहा हजार बंडखोर होते; त्यास जनराल मिचल यांचे हाताखालीं महू येथील व स्वारांची फौज यांणीं गोठें चकित केलें. बंडखोर यांचा अगदीं पराभव झाला. व त्यांचे चार किंवा पांचशें ठार मारून त्यांच्या बान्ही तोफा घेतल्या. या मारलेल्या लोकांत शिपाई न फार होते. मरूरी कडे पूर्व बाजूस ते होते. या बंडखोरांपैकीं तालबिहत आणि बानपूर या बाजूनें उत्तरे कडे पळाले. त्यांणीं लढाई वरीच मारली. सरकारचा नाश थोडाच झाला. सरदार सरकारचा कोणी एक मारला गेला नाहीं.

---

## जाहीरनामा.

हिंदुस्थानचे राजे रजवाडे, संस्थानी, आणि सर्व रयत यांस राणी सरकारचे सरकारी जाहीरनाम्यावरून हा जाहीरनामा प्रकट करण्यांत येतो कीं, ता. १ माहे नोवेंबर सन १८५८ सोमवार या रोजीं संध्याकाळचे पांच वाजतां पुण्याचे छावणींतील परेडच्या जागीं राणी सरकारांनीं हिंदुस्थानचे इंग्रेजी राज्याचा अंमल आपण घेतला, याबाबदचा जाहिरनामा वाचून दाखविला जाईल.

याकरितां सर्व राणीच्या प्रजेनें या समप्रसंगीं हजर व्हावें असें फरमाविलें आहे.

पुणें तारीख ३० आक्टोबर १८५८ — डंकन डेविडसन कलेक्टर आणि माजिस्त्रेट्

---

* * * सदरील जाहीरनामा मेहेरबान कलेक्टर साहेब पुणें यांणीं पाठविला आहे तो पाहून त्या जाहीरनाम्याप्रमाणें लोकांनीं पलटणाची कवायत होईल असते त्याठिकाणीं अवश्य यावें, अशी आमची येथील लोकांस शिफारस आहे. ज्ञानप्रकाशकर्ता

---

(मागील विषय पुढें चालू)

सन्न १८५२ इसवी मध्यें इनाम चौकशी बद्दल कायदा ११ ठरला. नंतर मेहेरबान हार्ट साहेब यांस इनाम कमिशनर मुखत्यारीनें सरकारानें नेमलें. हाताखालीं मदत करणारे साहेब लोक क्रमानें पांच असामी नेमले. हे सर्व इनाम चौकसनीस प्रथमतः बेळगांवास होते. नंतर जिल्ह्यानिहाय त्यांच्या नेमणुका थोडेच दिवसांत जाल्या. सोलापूर, पुणें, नगर, व सातारा या जिल्ह्यांत जिल्ह्यांचे नांवांचे अनुक्रमानें चौकशीची जाळी लावली. जेथें जाळें बसण्यास कांहीं हरकती झाल्या त्या दूर केल्या. याप्रमाणें मेहेरबान हार्ट साहेब यांणीं कामाचा फैलाव जिल्ह्यांतून केला. व काम चालविण्यास हरकत येणार नाहीं, व मदत करणारे लोकही कोणचेही कामांत कसूर करणार नाहींत, याचा पक्का भरंवसा साहेब महसूफ यांस आला, आणि ते रजा घेऊन विलायतेस गेले. त्यांचे मागें मदत करणारांपैकीं पहिले नंबरचे मेहेरबान मयत ग्यानसन साहेब यांस सरकारानें हार्ट साहेब यांचे जाग्यावर मुख्य इनाम कमिशनर नेमलें.

हार्ट साहेब यांचे कारकिर्दीत ज्या मुख्य मुख्य गोष्टी झाल्या, त्या थोडक्यांत लिहून, या खात्यांत त्यांणीं जी अक्कल खर्च केली, तितक्यापुरतें श्रेय त्यांस देणें योग्य आहे. साहेब बहादुर यांणीं आदीकरून अक्कल खर्च करून कायद्याचा मुसदा केला. बेळगांव व धारवाड हे दोन जिल्हे खेरीज करून पुणें, नगर, सोलापूर वगैरे जिल्ह्यांत दुमाल्याचे चौकशीची सुरुवात केली. साहेब महसूफ यांणीं मेहेरबान एलिस साहेबासारखे उदार नजरेनें कांहीं चमत्कारिक ठराव अगर फैसले केले, असें कांहीं आढळत नाहीं. सरकारनें त्यांवर विशेष करून चांगली नजर साहेबांची चालत असे. खात्यांतील नौकर लोकांपैकीं हिंदुस्थान लोकांवर विशेषेंकरून प्रीति व विश्वास होता, इतर जातीवर खरेपणाचा संशय होता, यामुळें फक्त हिंदुस्थान लोकांचेंच कल्याण झालें. मेहेरबान ग्यानसन साहेब इनाम कमिशनचे आसनावर बसल्या दिवसापासून काम फार झपाट्यानें चालतां चाली अन्वयें चालत होतें, परंतु आसन त्यांस फार थोडे दिवस पचलें, म्हणून त्यांचे कारकिर्दीचा कांहीं लिहिण्यासारिखा चमत्कार ऐकण्यांत आला नाहीं. हार्ट साहेब यांचे हाताखालचे मदत करणारे लोकांत कप्तान कोपर साहेब (हल्लींचे दुमाला डिविजन कमिशनर) या नांवाचे एक असिस्टंट होते. कप्तान कोपर साहेब या खात्यांत शिरल्या वेळेपासून ते आपले लेखणीचे जोरानें चोहीं कडे गाजूं लागले, व केवळ आपले जातीचे दुबारावर हल्लींचे पदवीस आले. हार्ट साहेब हे इनाम कमिशनर असतां हे साहेब त्यांचे हाताखालील एक मदत करणारे होते, तेव्हांच त्यांणीं पुण्याचे एजंटाचे खात्यास हात टाकून ठेविला होता. त्यास हिकमती प्रसंगानुसार जसजसे बसत गेले तसतसें या खात्यास तेज चढूं लागलें. साहेब महसूफ यांची योग्यता व अक्कल हीं सरकारपर्यंत बहुत रीतीनें मशहूर झाली. तो फांस सरदार लोकांचे एजंटाचे हातून निघण्याची आशा फार थोडी

भाटे कंगीवाले यांचे महाराज. वेदशास्त्र संपन्न गोपाळ दास यांची स्वारी येथें आली होती ती येथून गेल्या शुक्रवारीं निघून गेली. या महाराजांचा बेत आधीं पंढरपुरास जाऊन, मग हैद्राबादेस जाण्याचा आहे. या महाराजांबरोबर मुंबईचे मोठ मोठे श्रीमान् सावकार ही आले होते.

---

मुलींकरितां रुण्यांचें किंवा रांगोळीचें दुसरें मराठी पुस्तक त्याचा कर्त्ता रा॰रा॰ काशी गंगाधर क्षत्री यांजकडून पोंचलें. त्या बद्दल आम्ही त्यांचे बहुत आभारी आहों. सदरहू ग्रंथ दुपत्री असून त्याचीं पृष्ठें ५० आहेत व किंमत दाहा आहे. हा ग्रंथ मुलींकरितां मुख्यत्वें केलेला आहे. आपल्या देशांत रांगोळी घालण्याचे प्रकार किती आहेत, व ते शिकणे झाल्यास त्यांस फार उपयोगीं पडेल. या ग्रंथाचें पहिलें व दुसरें पुस्तक यांत रांगोळी कशी काढावी, याची रीति मुळारंभापासून नकाशा सहित दाखविली आहे. या गुणांचे शोकी असतील त्यांणीं हा ग्रंथ संग्रह करावा अशी आमची त्यांस शिफारस आहे.

---

छावणीमहू,— येथील मित्राकडून ज्ञानप्रकाश कर्ते यास.— ता॰ २२ माहे आक्टोवर.— येथें थंडी फार यामुळें बेजारी चालली आहे. ३ गोरे स्वार, १९ वी काळीपायदळ याची मंडळी, व ४थी काळी रैफलचे लोक हे सर्व एकत्र छावणींत राहिले आहेत. ४थी रैफल ही ता॰ २ सप्तेंबर रोजीं एथून टोंडी वर गेली होती, तिला व बंडवाल्यांला सामना होऊन बंडवाल्यांच्या २९ तोफा त्या पलटणीनें मागमें महू येथें आल्या. ही ४थी काळी पलटण सिंद्या येथेंच आहे. पुढें ग्वालेरीस जावयाची वदंता आहे. आणखी १९ वे काळी पलटणची मंडळी झांशीस जावयाची कांहीं बोलवा आहे. इकडील धान्याचा भाव तांदूळ शेर १२, आटा शेर १६, डाळी शेर १८, मीठ शेर ८, तूप शेर २, गुळ शेर ४॥, आणि साकर शेर २. याप्रमाणें वजनी दर रुपयास आहेत. हे व दुसरे बाजार भाव यथापूर्व आहेत कळावें.

---

नाणें,— मागील आगस्ट महिन्यांत तिन्ही खात्यांतील टंकसाळींतून रुपये पडले त्याचा आकार खालीं लिहिल्या प्रमाणें.

| | |
|---|---|
| बंगालखात्यांत | ३६८३९९६ |
| मद्रासखात्यांत | १००६००० |
| मुंबईखात्यांत | २५१८००० |
| एकंदर रु॰ | ७१८७९९६ |

सदरील रकमेचें नाणें सदरहू खात्यांत एक एक महिन्यांत पडलें गेलें.

---

सायखेडें, तालुके नाशिक येथून ज्ञानप्रकाशास;— ता॰ १७ माहे आक्टोबर— येथील पोलिस पाटील रा॰ बाळकृष्ण नाईक याजवर फौजदारी खटला कांहीं उत्पन्न झाला होता, त्यांत एथचे स्कुलमास्तर रा॰रा॰ विष्णु विठ्ठल हे होते. या खटल्यांत तालुके निफाड एथील मामलेदार, व मेहरबान फस्ट साहेब यांजवळ जबान्या होऊन पाटील मजकूर याजवर साक्षीवरून शाबिती न होतां फक्त वहिमावरून साहा महिने कैद व ५०|

रुपये दंडही शिक्षा ठरवून फैसल झाला [illegible] व केदी ही शिक्षा [illegible] त्यास रचना केला. व सदरील स्कुलमास्तर [illegible] शिरूर येथील मामलेदाराचे कचेरीत [illegible] त्यानें कारण कीं, या साक्षीदारा [illegible] केदी पाटील यांणीं शिकविलें असावें, [illegible] त्या मनुष्यास इच्छेनुरूप जबानी द्यावी लागली, असें म्हणतात. पुढें जबानींत अंतर पडलें, सबब खोटे साक्षीचा गुन्हा त्यावर करून त्यास सेशन कमिट केलें. नंतर नगरचे सेशनकोर्टांत इनसाफ होऊन ५० रुपये दंड, तो न दिल्यास तीन महिने केद या प्रमाणें शिक्षा त्यास ठराविली. पुढें त्याच्या दंडाची तजवीज नगरचे स्कुलमास्तर नंबर १ व नंबर २ यांणीं करून त्या व्यर्थ केदेंत सांपडलेल्या मनुष्यास मुक्त केलें. आणखी केदी पोलिस पाटील यांणीं सदर फौजदारी अदालतीस अपील केलें, तेथें इनसाफ होऊन त्यास मुक्त करण्याचा ठराव होऊन तो मुक्त झाला. असो यासमयीं नगरचे सदरील मास्तर यांणीं परोपकार केल्याचें उदाहरण दाखविलें. आतां विष्णुविठ्ठल यांस त्यांचे जागेवर अद्याप शाळाखात्याकडील अधिकारी यांकडून तजवीज झाली नाहीं, परंतु ती होणें अशी आमची इच्छा आहे. कारण, ते मनुष्य चालीनें योग्य असून या कामांत ते निरपराधी खचीत आहेत.

---

कांहीं दिवसांमागें आम्ही आपल्या वाचणारांस कळविलें होतें कीं, विलायतेंत कालिंगउड या नांवें एका साहेबानें एक उडण्याचें यंत्र केलें आहे. आतां दुसऱ्या एका यंत्राचें वर्तमान आलें आहे, तें असें.—फ्रान्स देशांत एका शिपायानें असलें यंत्र केलें म्हणून तेथील बादशाहानें त्याला ५०,००० रुपये इनाम दिले. या यंत्रांत केल नामक महोसत्याच्या हाडांचें एक चौरंग करून तो रेशमानें मढविला आहे, त्याच्या दोहों बाजूंस दोन मोठाले पंख त्याच पदार्थांचे केले आहेत. ज्या मनुष्याला यांत स्वार होऊन अंतराळीं भ्रमण करावयाचें तो त्या चौरंगापासून समारें ४ फूट किंवा २½ हातांच्या अंतरावर टांगलेला असतो त्याचे दोन्ही पाय दोन कळींवर बसतात, तेणेंकरून ते पंख हालूं लागतात, आणि हातानें एक धाहार धरली म्हणजे तें यंत्र जिकडे पाहिजे तिकडे नेतां येतें. हा केवळ लाहानसा नमुना [illegible] ता, आतां मोठें यंत्रही होईल.

---

**पुणें**—येथील हवा उत्तरोत्तर थंड होत चालली आहे, रोगराई कांहीं नाहीं. आजरोजीं सायंकाळीं एथील पुस्तकगृहांत, व छावणींत, आणि शहरांत ठिकठिकाणीं रोशनाई लोक करणार आहेत. याचें कारण राणीसाहेबांचे राज्याचा आरंभ हिंदुस्थानांत झाला एतद्विषयीं हा उत्साह लोक खुषीनें करीत आहेत. [illegible] जपासून सर्व सरकारी कचेऱ्या बंद [illegible] कामगारांस या उत्साहाकरितां व दिपवाळीचा सण लगत आल्यामुळें एक आठवड्याची सुटी मिळाली आहे. एथील कलेक्टरसाहेब यांची स्वारी रजेवर विलायतेस जाणार म्हणून त्या जाग्यावर पुष्कळ साहेबलोकांचे डोळे लागले आहेत, असें ऐकतों. आतां ती जागा कोणास मिळेल याचा अद्यापि बनाव आहे. एथून पुष्कळ साहेब व नेटीव लोक मुंबईस मोठी रोशनाई करून दारू उडविणार आहेत ती पाहण्याकरितां गेले आहेत व आम्ही जाणार आहेत.

---

# सन १८५७ चा आक्ट २२ वा.

इंडियाचे लेजिस्लेटिव कौन्सिलानें ठरविला तो, गव्हरनर जनरल यांणी सन १८५७ चे डिसेंबर महिन्याचे ५ वे तारखेस मंजूर केला:—

परराज्यांतील मनुष्यांसंबंधीं आणखी ठराव करण्याविषयीं आक्ट.

हिंदुस्थानांतील इंग्रेजी मुलकांचे सरकारांचे अंमलांत बाहेरून परराज्यांतील रयतेस सदरहु मुलकांत फार किंवा थोडे दिवस पर्यंत राहण्याची किंवा, त्या मुलकांतून जाण्याची, किंवा त्यांत प्रवास करण्याची मनाई त्या सरकारांस करतां यावी, म्हणून आणखी ठराव करणें योग्य आहे; यास्तव खालीं लिहिलेल्या प्रमाणें ठरविलें आहे. — उद्देश.

१. ईस्ट इंडिया कंपनी सरकारचे कबजांतील व ताब्यांतील मुलका बाहेरील कोणते ही बंदराहून किंवा जागेहून, किंवा या आक्टांतील ठराव लागू नसणारे कोणतेही बंदरांतून किंवा जागेतून सदरहु मुलकाचे कोणते ही भागांत परराज्यांतील कोणी मनुष्य आला म्हणजे कोणते ही प्रेसिडेन्सींतील मुख्य शहरास आला तर, त्याणें पोलिस कमिशनरास आपण आल्याचा तत्काळ रिपोर्ट करावा. अथवा तो इतर कोणते ही जागीं आला असला तर, तेथील माजिस्त्रेटास, किंवा सदरहू प्रकारचे रिपोर्ट घेण्याविषयीं गव्हरनर जनरल इन् कौन्सिलानें ज्या इतर अं[illegible] नेमला असेल त्या अंमलदारास रिपोर्ट करावा; अथवा कोणतेही प्रेसिडेन्सीचें, किंवा जागेचें राज्यकारभार चालविणारें सरकार किंवा, पंजाबचे चीफ कमिशनर, किंवा अयोध्येचे चीफ कमिशनर, किंवा मद्र्चे, व कुर्गचे, व नागपूरचे, व सिंधचे, व पेगूचे आणि तेनासरीम, व मारताबान प्रांताचे कमिशनर आपआपले हद्दींत सदरहू प्रकारचे रिपोर्ट घेण्याविषयीं ज्या इतर अंमलदारास नेमितील त्या अंमलदारास रिपोर्ट करावा. परंतु असें ठरविलें आहे कीं, या कलमांतील कोणताही ठराव परराज्यांतील कोणी मनुष्य तारवाचा, किंवा गलबताचा मालक, किंवा कम्यांडर असेल किंवा तारवावर, किंवा गलबतांवर चाकरीस असेल त्यास लागू आहे असें समजूं नये. — परराज्यांतील कोणतेही मनुष्यानें आपण हिंदुस्थानांत आल्याचा रिपोर्ट करावा.

२. सदरहू प्रकारचा रिपोर्ट करणें तो लेखी करावा, आणि रिपोर्ट करणारे मनुष्यानें त्या रिपोर्टावर सही करावी; आणि त्यानें आपलें नांव, देश, गांव व आपली जात, व आपण कोणते जागेहून आलों ती जागा, व आपणास कोणकोणते जागीं जाण्याचें आहे त्या जागा, व आपला येण्याचा हेतु, व सदरहु मुलकांत आपण आल्याची तारीख, त्या रिपोर्टांत लिहावी. व अंमलदारास रिपोर्ट केला असेल त्यानें तो दफतरां- — रिपोर्टांत काय लिहावें.

दाखल करावा.

परराज्यांतील कोणी मनुष्य-तारवावरील किंवा गलबता वरील चाकरींतून निघाल्यावर त्यानें रिपोर्ट करावा.

३ १ले कलमांतील विशेष ठराव लागू असणारा कोणी मनुष्य तारवा वरील, किंवा गलबता वरील चाकरींतून निघाल्यावर तो सदरहू मुलकाचे कोणतेही भागांत राहील तर त्यानें फर्माविलेले रीती प्रमाणें त्याचा रिपोर्ट करावा.

रिपोर्ट करण्यास परराज्यांतील कोणी मनुष्य हयगय करील त्यावर कामचालविणें तें परवान्या वांचून प्रवास करणारे परराज्यांतील मनुष्या प्रमाणें चालावें.

४ या आक्ट्यांत फर्माविल्या प्रमाणें रिपोर्ट करण्यास परराज्यांतील कोणी मनुष्य हयगय करील तर त्यावर काम चालविणें तें, परवान्या वांचून प्रवास करणारे परराज्यांतील मनुष्यावर कामचालविण्या विषयीं, त्या आक्ट्यांत पुढें सांगितलें आहे त्या प्रमाणें चालावें.

परराज्यांतील मनुष्यानें हिंदुस्थानांत परवान्या वांचून प्रवास करूं नये.

५ परराज्यांतील कोणी मनुष्यानें ईस्ट इंडिआ कंपनी सरकारचे कबजांतील व ताब्यांतील मुलकाचे कोणतेही भागांत परवान्या वांचून प्रवास करूं नये, किंवा त्यांतून जाऊं नये.

परवाना कोणी द्यावा.

६ त्या आक्टा अन्वयें परवाने द्यायाचे [illegible] अधिकार इंडिया सरकाराचे फारेन डिपार्टमेंटांतील सेक्रेटरीस किंवा, मद्रास व मुंबई सरकारचे चीफ सेक्रेटरीस किंवा, पंजाबचे चीफ कमिशनरास किंवा, अयोध्येचे चीफ कमिशनरास किंवा, महिसूरचे, व कुर्गचे, व नागपूरचे व, सिंधचे व, पेगूचे आणि तेनासरीम व मार्तबान प्रांताचे कमिशनरास आहे, अथवा परवाना देण्याचा अकत्यार इंडियाचे गव्हरनर जनरल इन्कौन्सिलानें किंवा कोणतेही प्रेसिडेन्सीचे किंवा प्रांताचे राज्यकारभार चालविणारे सरकारानें किंवा वरसांगितलेले चीफ कमिशनरांनीं किंवा, कमिशनरांनीं, ज्या इतर अंमलदारांस मुद्दाम दिला असेल त्यांसही आहे

परवान्यांत काय लिहावें.

७ सदरहू प्रकारचे परवान्यांत खालीं लिहिलेला तपशील असावा; म्हणजे, ज्या मनुष्यास परवाना दिला असेल त्या मनुष्याचें नांव, किंवा नांवें; व, तो कोणते जातीचा आहे तें; आणि ज्या प्रांतांतून त्यास जाण्याची परवानगी दिली असेल तो प्रांत; किंवा ज्या हद्दींत त्यास प्रवास करण्याची परवानगी दिली असेल त्या हद्दी; व, परवाना किती मुदत पर्यंत चालेल ती मुदत ठरविली असल्यास परवान्यांत लिहावी.

- सदरहू प्रकारचा परवाना देणें तो त्याजी लिहिलेले शर्तीनिशीं द्यावा म्हणजे गव्हरनर जनरल इन् कोंनसिल किंवा, कोणतेही प्रेसिडेन्सीचे किंवा, जाग्याचे राज्यकारभार चालविणारें सरकार किंवा आपआपले हुकमतींत सदरहू चीफ कमिशनर किंवा कमिशनर यांनीं हुकूम करून शर्ती ठेविल्या असल्यास त्या शर्तीनिशीं किंवा, परवाना देणारे अंमलदारास ज्या शर्ती जरूर वाटतील त्या शर्तींनिशीं परवाना द्यावा. आणि तो परवाना कोणतेही वेळीं रद्द करण्याचा अधिकार गव्हरनर जनरल इन् कोंनसिलास किंवा कोणतेही प्रेसिडेन्सीचे किंवा जाग्याचे राज्यकारभार चालविणारे सरकारास किंवा परवाना देणारे अंमलदारास आहे.

परवाना शर्तींनिशीं देण्याचा व तो रद्द करण्याचा अधिकार आहे.

९ परराज्यांतील कोणी मनुष्य सदरहू प्रकारचे परवान्या वांचून सदरहू मुलकाचे कोणतेही भागांत प्रवास करील किंवा, त्यांतून जाण्यास यत्न करील अथवा परवान्यांत लिहिलेले प्रांताचे किंवा हद्दी बाहेर प्रवास करील किंवा जाण्यास यत्न करील; अथवा परवाना रद्द झाल्यावर सदरहू प्रमाणें करील, अथवा परवान्यांतील कोणतीही शर्त तोडील तर त्यास वारंटा वांचून धरण्याचा अधिकार माजिस्त्रेटास किंवा, डेपुटी माजिस्त्रेटास किंवा, माजिस्त्रेटाचे असिस्टंटास; अथवा राणीचे, किंवा ईस्ट इन्डिया कंपनीचे चाकरींतील कोणतेही युरोपिअन सनदी अंमलदारास; अथवा सरकारचे हुकुमावरून केलेले व्हालेंटिअर कोर त्या प्रकारचे पलटणींतील कोणी मनुष्य कामगिरी वर असेल त्यास, किंवा पोलिसाचे कोणतेही अंमलदारास आहे.

परराज्यांतील मनुष्य परवान्यावांचून किंवा परवान्याचे शर्तीविरुद्ध प्रवास करील तर त्यास धरण्याचा अधिकार आहे.

१० कोणी मनुष्य माजिस्ट्रेट किंवा पोलिस अंमलदार नसेल त्यानें कोणी मनुष्यास धरलें असतां त्यास बनू शकेल तितके लौकर पोलिस अमलदाराचे स्वाधीन करून माजिस्त्रेटा समोर न्यावा. आणि कोणी मनुष्यास माजिस्त्रेटानें धरला असेल, किंवा माजिस्त्रेटासमक्ष नेला असेल तेव्हां त्या माजिस्त्रेटानें आपले सरकारास त्या प्रकारचा तात्काळ रिपोर्ट करावा. आणि आपणा पुढें आणलेले मनुष्यास सोडावा, किंवा प्रेसिडेनसींतील मुख्य शहरास त्यास पाठवावा किंवा सरकारचा हुकूम येई तोंपर्यंत त्यास अटकावून ठेवावा.

माजिस्त्रेट किंवा पोलिस अंमलदार नसणारे मनुष्यानें धरला असतां काय करावें.

११ या आक्टाचे वरसांगितलेले ठरावा अन्वयें मनुष्यास धरतील किंवा अटकावून ठेवितील त्यांस जामीन घेऊन सोडण्याचा अधिकार माजिस्त्रेटास किंवा परवाना देण्याचा अधिकार असणारे मनुष्यांस आहे. आणि सदरहू मनुष्यें कैदेंत ठेविलें असतील तेव्हां त्यांस अडच-

धरलेले मनुष्यांचा जामीन घेण्याचा अधिकार आहे.

ण पडेलती जितकी कमी करवेल तितकी करावी.

परदेशी मनुष्यास घालवून देणें.

१२ सदरहूप्रकारचे मनुष्यांस सदरहू मुलकांतून जलमार्गानें किंवा सरकार फरमावील त्या इतरमार्गानें निघून जाण्यास फरमाविण्याचा अधिकार गव्हरनर जनरल इन् कौन्सिलास किंवा कोणत्येही प्रेसिडेन्सीचे किंवा जागेचे राज्यकारभार चालविणारे सरकारास आहे; अथवा आपणास योग्य वाटेल त्या मार्गानें व तरोरीतीनें सदरहू मुलकांतून त्यास घालवून देण्याचा अधिकार सरकारास आहे.

परराज्यांतील कोणतेही मनुष्यास निघूनजाण्यास सांगण्याचा सांगण्याचा अधिकार सरकारासआहे.


१३ गव्हरनरजनरल इन् कौन्सिलास, किंवा कोणतेही प्रेसिडेन्सीचे किंवा जागेचे राज्यकारभारचालविणारे सरकारास, किंवा या आक्टाचे ६ वे कलमांत सांगितलेले कोणतेही चीफ कमिशनरास किंवा कमिशनरास खालीलिहिल्या प्रमाणें करण्याचा अधिकार आहे; म्हणजे आपले हुकमतीस परराज्यांतील कोणी मनुष्य असेल त्यानें ईस्ट इन्डिआ कंपनी सरकारे कबजांतील व ताब्यांतील मुलकांतून निघून जावें किंवा अमुक रस्त्यानें सदरहू मुलकांतून निघून जावें असा हुकूम लेखी करण्याचा अधिकार आहे.

परराज्यांतील कोणी मनुष्य निघून जाण्यास नाही म्हणेल किंवा निघून गेल्यावर परत्यावर्तून परत येईल तर त्यास धरून कैदेंत ठेवण्याचा अधिकार आहे.

१४ परराज्यांतील कोणतेही मनुष्यास सदरहू मुलकांतून निघून जाण्यास सांगितल्यानंतर, किंवा सदरहू मुलकांतून अमुक रस्त्यानें निघून जाण्यास सांगितल्या नंतर तो मनुष्य तसें करण्यास हेंगेय करील किंवा नाही म्हणेल अथवा परराज्यांतील कोणी मनुष्य त्या आक्टांतील कोणतेही कलमा अन्वये केलेले हुकमा प्रमाणें सदरहू मुलकांतून निघून गेल्यावर किंवा सदरहू पैकीं कोणतेही ठरावा प्रमाणें सदरहू मुलकांतून घालवून दिल्यावर इन्डिआचे गव्हरनर जनरल इन् कौन्सिलाचे किंवा ज्या सरकारचे किंवा अंमलदाराचे हुकमा प्रमाणें तो निघून गेला असेल किंवा त्यास घालवून दिला असेल त्यानें लेखी परवाना दिल्यावांचून सदरहू मुलकांत पुन्हा परत येईल त्या मनुष्यास धरून खालीं लिहिलेले मुदती पर्यंत संभाळून कैदेंत ठेवावा, म्हणजे ब्रिटिश मुलकांत, व राणी व ईस्ट इन्डिआ कंपनी त्यांबरोबर स्नेहानें असणारे राजांचे मुलकांत व जवळचे राज्याचे, व संस्थानचे मुलकांत बंदोबस्त राहाण्या साठीं जे करार, व शर्ती गव्हरनर जनरल इन् कौन्सिलाचे किंवा राज्यकारभार चालविणारे सरकारचे किंवा चीफ कमिशनराचे किंवा कमिशनराचे नजरेस येईल त्या करारा अन्वयें व शर्ती अन्वयें सदरहू गव्हरनरजनरल इन् कौन्सिल याचे हुकमा अन्वयें किंवा राज्यका-

शून्यशराचा तारा रेवतीनक्षत्रांत येईल त्याजपासून अयनांश काढावे अ
ध वगैरे या अयनांशोंकरून पाहावें म्हणजे आम्हीं म्हणतों (क्रमारें ४ अंश)
आहेत ते सांपडतील. परंतु त्या मुख्य शराच्या नर जोशी बावांनीं कांहींच
ध मिळाले व सर्व आमचें बरोबर आहे. हें कसें काय याचा निर्णय व
त्यानंतर मळ्ळीनें इतकी खटपट करण्याची जरूर मिळून ज्या हिंदु लोकां
न आपले अशुध्द कल्याणें आच्छादून करीत आहेत. असो ईश्वर इच्छा स
नच आहे. हें कळण्या करितां फिरून भोगताऱ्याचा नकाशा छापून दर्शविला
वेधून म्हटला आहे तो असे व्यक्त दाखविले आहेत. त्यावरून पत्र दाचणारां

ताजाकलम, आणखी इतकेंच सुचवितों कीं, अजून पुढें रेवती योग
धास सांपडेल मग सांपडावयाचा नाहीं तर त्याचा कारण पाहणें असल्यास
चा नाहीं.



**ज्ञानप्रकाशकर्ते महाराज** —विज्ञापना विशेष, आपले मागील गुरुवार
वाटलें, तें असें कीं, तो लिहिणार म्हणतो कीं, आम्हीं पूर्वी (मार्च महिन्यांत तुमच्या
त्यामुळें सांप्रत हिंदी पंचांगांत फेर आहे तें, वेदशास्त्रसंपन्न रा. रा. शंकर जोशी
म्हणून पूर्वी (वर्तमानपत्रांत) छापलें होतें. तें खोटें त्यास याचें उत्तर मी आतां
रा आरंभस्थान आहे, व तो शून्य राशीचा असावा. असें स्पष्ट हिंदुज्योतिषग्रंथ
आहे. त्या ताऱ्याचा जोशी बोवांनीं निर्णय केला तो लिहून कळवितो, त्यावरून र
विचार करतील.

मागील तूळ विषुवानंतर २२ दिवसांनीं त्यांचें म्हणणें कीं त्यादिवशीं मध्यान्ह
रे आहेत तर आणि त्याप्रमाणें त्यादिवशीं एक तारा त्यांणीं लावलेल्या वेधांत
ळवला आहे, त्याची pω अशी खूण आहे तो रेवती नक्षत्राचे तारे इंग्रेजी ताऱ्यांचे
र नको; परंतु एथें विचार इतकाच करणें आहे कीं, सांगितल्या वेळेस तारा आ
गितल्याप्रमाणें मिळावे तें असें कीं, तो तारा शून्य राशीचा (म्हणजे क्रांतिवृत्ताव
रविला आहे, त्याजला तर तीन अंशांवर अधिक शर आहे. (म्हणून क्रांतिवृत्ता
त्याच पत्रांत आम्हीं कळविलें आहे कीं, आम्हीं जो तारा म्हणतों तो ζ त्या खु
वृत्तावर आहे.) त्यांणीं जो ताऱ्याला योग तारा म्हटला आहे, त्याला तर त्या
पडावयाचा नाहीं; असो पूर्वी या ताऱ्याचा निर्णय केल्याशिवाय सदर्हू पंचां
कारण कीं, हा योग तारा आरंभबिंदु आणि त्याचाच शोध नाहीं, तेव्हां त्यान
कांहीं निरयनमानें मोजावयाचीं व निरयन संक्रांती वगैरे व अधीकम
जोशी बावा निर्णय करीत नाहींत. जरी त्यांजला हें करण्याविषयीं सत्ता हिं
पुरविलें नाहीं. त्याचा निर्णय करण्याचा मार्ग सोपा हाच कीं, त्या दोन्हीं
ति आणाव्या, आणि त्यांतील जो तारा क्रांतिवृत्तावर असेल त्याची क्रांति
सनीं तितकी त्या ताऱ्याची क्रांति असते, तितकी ती आली म्हणजे त्या ता
वर नसेल तर त्याला शर आहे. तो इतका कीं, त्याच्या मध्यमक्रांति व श

ांत ज्योतिषप्रकरणीं मजकूर लिहिला त्, तो पाहून तर फारच आश्चर्य
प्र हार कळविलें होतें कीं, हिंदुजोशांचा सूर्य चंद्राचे गणितांत अंतर पड
ारां चंद्रजोशीप्रभृतीयांणीं वेध करून निर्णय केला कीं, फेर आगदी नाहीं;
ळवितों कीं, सर्व हिंदू ज्योतिषशास्त्रांतील ग्रह वगैरे यांचा रेवती योग ता-
र लाघव, सिद्धांतशिरोमणी, सूर्यसिद्धांत, ब्रह्मसिद्धांत वगैरेमध्यें
ा खरे खोटेपणाचा विचार तुमचे निःपक्षपाती व सत्येच्छु हिंदु वाचणारे

ास रेवती योगतारा याम्योत्तरीं येईल. जर त्याचें सायन २२ अयनांश व-
हराचीस आला तो तास जोशी मागील मार्च महिन्याचे पत्रांत लिहून क-
ाशांत काढली आहे त्याजविषयीं तें पत्र काढून पाहावें. एथें त्याचा विस्ता-
तो रेवतीचा इष्ट योगतारा म्हणावा, किंवा त्याचें लक्षण शास्त्रांत सा-
वती नक्षत्राचे अंतीं असावा) आणि हा जो तारा यांणीं रेवती म्हणून ठ
तो तारा नाहीं.) हें आम्हीं मागेंच सदरहू पत्रांत कळविलें आहे; परंतु
ा रेवती नक्षत्राचे अंतीं आहे तो शून्य शराचा आहे म्हणून तो क्रांति
वेधांत त्याचे दोषळ यंत्रामुळें किमानपक्ष दोन अंशाला कमी शर सां-
वीं आपून कळविलेलें खोटें म्हणणें हें केवळ ज्ञानाचें काम आहे!
तबंधानें वेध बरोबर मिळाले, ते काय, आणि त्या ताऱ्यावरून ग्रहाद
ादि सर्व हव्य कव्य त्याच निरयन मानानें आहेत आणि त्याचा तर
मेच्छु यांणीं पुष्कळ वेळ प्रार्थना केली होती, तरी त्याकडे त्यांणीं लक्ष
यांचे याम्योत्तर वेध घ्यावे, आणि त्यांणीं त्यावरून त्या ताऱ्याच्या क्रां-
ीच्या क्रांतिवृत्तावरील भोग त्याच ताऱ्या इतका असतां, जितकी अ-
ाला शून्य शर आहे. हा निर्णय होईल, आणि ज्याची क्रांति त्या बरो-
क्रांतिच्या वजा बाकी इतका असतो आणि असा ज्योतिषशास्त्रोक्त

सव ज्योतिष शास्त्रातील ग्रंथ ...गम... न. आणि ... ग्र हा ... का च व

...कीच चूक दिसून येईल. आणि म्हणून पंचांगांत वगैरे तुम्ही

सल्ला केला नाहीं, आणि उगेच पोकळ बोलणें कीं, आमचे वे

णांनीं करावा म्हणजे झालें.

...र्म कांडावरच फार निर्भर आहे. त्यांजला हे अशास्त्र समजावू-

न या देशाविषयीं जशी दिसत आहे, त्याला ही कृती अनुसरू-

हे, त्यांत शास्त्रोक्त योगतारा घ्याव्या जोशीबावांनीं योगतारा

...राल रेवती योगतारेचा निर्णय करावा.

तुमचा सेवक सत्यशोधक आणि हिंदुधर्माभिमानी,

...क्रमारें महिना रीउ महिना पर्यंत रेवती योगतारा याम्योत्तरवे

हावा कारण कीं, याम्योत्तरवेधाशिवाय शारानिर्णय व्हाव

६ या रेवुणेचा तारा क्रांतिवृत्ता वर शून्य शराचा आहे (हिंदु-
ज्योतिषशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें.)

५ या रेवुणेचा तारा पुण्यांतील ज्योतिष्यांनीं रेवतीचा यो-
गतारा म्हणून (ज्योतिष शास्त्राचे विरुध्ध) ठरविला
आहे.

शा० स० छा० ६

रभार चालविणारे सरकारचे हुकुमा अन्वयें किंवा; त्या आक्टाचे साहावे कलमांत सांगितलेले ज्या चीफ कमिशनराचे किंवा कमिशनराचे हुकमतींत त्या मनुष्यास धरून कैदेंत ठेविला असेल त्या चीफ कमिशनराचे किंवा कमिशनराचे कैदेतून मोकळा होई तोंपर्यंत त्यास कैदेंत ठेवावा.

१५ अमुक अमलदाराजवळ परवाना घेतल्या वांचून सदरहू मुलखाचे कोणतेही भागांत प्रवास करूनये, किंवा त्यांतून जाऊंनये; अथवा हिंदुस्थानाचे एके भागांतून दुसरे भागांत जाऊंनये असा हुकूम कोणतेही मनुष्यास किंवा कोणतेही ज्ञातीचे मनुष्यास करण्याचा अधिकार गव्हरनरजनरल इन् कौन्सिलास किंवा कोणतेही प्रेसिडेन्सीचे किंवा जागेचे राज्य कारभार चालविणारे सरकारास किंवा त्या आक्टाचे साहावे कलमांत सांगितलेले चीफ कमिशनरास किंवा कमिशनरास आहे. परंतु चवथे विलियम बादशाहाचे कारकीर्दीत झालेले ३ रे व ४ थे आक्टाचे ८५ वे धायेचे ८१ कलमाचे अर्था प्रमाणें राणीचे रयतेस सदर ठराव लागू नाहीं; आणि सदरहू प्रकारचा मनुष्य सदरहू प्रकारचा हुकूम बुध्या तोडील तर त्या आक्टाचे ९ वे कलमांत सांगितलेले अंमलदारांनीं त्यास वारंटा वांचून धरून माजिस्त्रेटा समक्ष न्यावा; व तो जर परराज्यांतील मनुष्य असता तर त्यावर १ ले कलमांतील ठरावा अन्वये ज्या रीतीनें काम चालतें, त्या रीतीनें त्यावर काम चालवावें; आणि ब्रिटिश राज्याचा बंदोबस्त राहाण्या साठीं जितकी मुदत सरकारास जरूर वाटेल तितके मुदती पर्यंत सदरहू प्रकारचे मनुष्यास संभाळून कैदेंत ठेवण्याविषयीं किंवा पोलिसचे नजर कैदेंत ठेवण्याविषयी हुकूम करण्याचा अधिकार सरकारास आहे.

राणीचे रयतेवेगळे असणारे मनुष्यास परवान्या वांचून हिंदुस्थानाचे कोणतेही भागांत प्रवास करण्याची किंवा जाण्याची मनाई करण्याचा अधिकार सरकारास आहे.

१६ ईस्ट इंडिआ कंपनी सरकारचे कबजांतील व ताब्यांतील मुलकांतले कोणते बंदरांतील किंवा जागेंतील तारवांत किंवा गलबतांत खालीं लिहिलेली चौकशी करण्या साठीं शिरण्याचा अधिकार पोलिस कमिशनरास, किंवा माजिस्त्रेटास, किंवा त्याचे असिस्टंटास किंवा त्या आक्टानें २ ले कलमांत सांगितलेले रिपोर्ट घेण्यासाठीं नेमलेले अंमलदारास, किंवा सदरहू प्रकारचे कमिशनराचे किंवा माजिस्त्रेटाचे हुकमा वरून चालणारे कोणतेही अंमलदारास आहे; म्हणजे आपण आल्या विषयीं या आक्टाचे २ ले कलमा प्रमाणें रिपोर्ट करणें ज्या परराज्यांतील मनुष्यास जरूर आहे असा कोणी मनुष्य त्या तारवावर किंवा गलबता वर आहे

तारवावर परराज्यांतला मनुष्य आहे किंवा नाहीं याची चौकशी करण्यासाठीं तारवावर जाण्याचा अधिकार पोलिस अंमलदारास आहे

रभार चालविणारे सरकारचे हुकुमा अन्वये किंवा; त्या आक्टाचे साहावे कलमांत सांगितलेले ज्या चीफ कमिशनराचे किंवा कमिशनराचे हुकमतींत त्या मनुष्यास धरून कैदेंत ठेविला असेल त्या चीफ कमिशनराचे किंवा कमिशनराचे कैदेतून मोकळा होई तोंपर्यंत त्यास कैदेंत ठेवावा.

१५ अमुक अमलदाराजवळ परवाना घेतल्या वांचून सदरहू मुलकाचे कोणतेही भागांत प्रवास करूनये, किंवा त्यांतून जाऊनये, अथवा हिंदुस्थानाचे एके भागांतून दुसरे भागांत जाऊनये असा हुकूम कोणतेही मनुष्यास किंवा कोणतेही ज्ञातीचे मनुष्यास करण्याचा अधिकार गव्हरनर जनरल इन कौन्सिलास किंवा कोणतेही प्रेसिडेन्सीचे किंवा जागेचे राज्य कारभार चालविणारे सरकारास किंवा त्या आक्टाचे साहावे कलमांत सांगितलेले चीफ कमिशनरास किंवा कमिशनरास आहे. परंतु चवथे विलियम बादशाहाचे कारकीर्दींत झालेले ३ रे व ४ थे आक्टाचे ८५ वे यायेचे ८१ कलमाचे अर्था प्रमाणें राणीचे रयतेस सदरहू ठराव लागू नाहीं; आणि सदरहू प्रकारचा मनुष्य सदरहू प्रकारचा हुकूम बुध्या तोडील तर त्या आक्टाचे ९ वे कलमांत सांगितलेले अंमलदारांनी त्यास वारंटा वांचून धरून माजिस्त्रेटा समक्ष न्यावा; व तो जर पर राज्यांतील मनुष्य असता तर त्या वर ११ कलमांतील ठरावा अन्वये जा रीतीनें काम चालतें, त्या रीतीनें त्यावर काम चालवावें; आणि ब्रिटिश राज्याचा बंदोबस्त राहाण्या साठीं जितकी मुदत सरकारास जरूर वाटेल तितके मुदती पर्यंत सदरहू प्रकारचे मनुष्यास संभाळून कैदेंत ठेवण्याविषयीं किंवा पोलिसचे नजर कैदेंत ठेवण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार सरकारास आहे.

राणीचे रयतेन सणारे मनुष्यास परवान्या वांचून हिंदुस्थानाचे कोणतेही भागांत प्रवास करण्याची किंवा जाण्याची मनाई करण्याचा अधिकार सरकारास आहे.

१६ ईस्ट इंडिआ कंपनी सरकारचे कबजांतील व ताब्यांतील मुलकांतले कोणते बंदरांतील किंवा जागेतील तारवांत किंवा गलबतांत खालीं लिहिलेली चौकशी करण्या साठीं शिरण्याचा अधिकार पोलिस कमिशनरांस, किंवा माजिस्त्रेटास, किंवा त्याचे असिस्टंटास किंवा त्या आक्टानें १ले कलमांत सांगितलेले रिपोर्ट घेण्यासाठीं नेमलेले अंमलदारास, किंवा सदरहू प्रकारचे कमिशनराचे किंवा माजिस्त्रेटाचे हुकमा वरून चालणारे कोणतेही अंमलदारास आहे; म्हणजे आपण आल्या विषयीं या आक्टाचे १ले कलमा प्रमाणें रिपोर्ट करणें ज्या पर राज्यांतील मनुष्यास जरूर आहे असा कोणी मनुष्य त्या तारवावर किंवा गलबता वर आहे

तारवावर पर राज्यांतला मनुष्य आहे किंवा नाहीं याची चौकशी करण्यासाठीं तारवावर जाण्याचा अधिकार पोलिस अंमलदारास आहे

किंवा नाहीं त्याची चवकशी करण्या मुळें त्यांच्या अधिकार आहे आणिखी सदरहू करण्या साठीं जे उपाय करणें वाजवी रीतीनें जरूर आहेत असें सदरहू प्रकारचे पोलिस कमिशनरास किंवा वर सांगितलेले इतर अमलदारास वाटतील ते उपाय करण्याचा अधिकार त्यास आहे.

नारवाचे मास्तरानें उतारूंची याद द्यावी.

उतारू लोक कोणते बंदरीं किंवा जागीं गलबतावर चढेल आणि कोणते बंदरीं किंवा जागीं उतरेल, किंवा उतरणार आहे हें लिहून उतारू लोकांची यादी द्यावी, म्हणून सदरहू प्रकारचे पोलिस कमिशनरास किंवा वर सांगितलेले इतर अमलदारानें सांगितलें असतां त्या प्रमाणें यादी गलबतावरील उतारू लोकांस उतरू देण्या पूर्वीं गलबताचे मास्तरानें किंवा कम्यांडरानें सदरहू प्रकारचे पोलिस कमिशनरास किंवा सदरहू प्रकारचे इतर अमलदारास दिली पाहिजे आणि गलबता वरील उतारू लोकां बाबद किंवा हिंदुस्थानांतील कोणते ही भागांत जे उतारू लोक उतरले असतील त्यांबद्दल पोलिस कमिशनर किंवा वर सांगितलेला इतर अमलदार सवाल करील व त्या सवालाचे जवाब आपले माहिती प्रमाणें मास्तरानें किंवा कम्यांडरानें दिले पाहिजेत. हिंदुस्थानाचे कोणते ही भागांत असणारे तारवांत किंवा गलबता वरला परराज्यांतील कोणी मनुष्य, आपले हिंदुस्थानांत काय काम आहे त्या विषयीं तपशील सांगण्यास नाहीं म्हणेल; किंवा जो तपशील सांगेल तो खात्री होण्या सारखा नसेल तर त्यास उतरू देण्यास नाहीं म्हणायाचा अधिकार किंवा परवान्या वांचून हिंदुस्थानांत फिरणारे परराज्यांतील मनुष्यावर ज्या रीतीनें काम चालवितात त्याच रीतीनें त्याज वर काम चालविण्याचा अधिकार सदरहू सांगितलेले अमलदारास आहे

अमलदारासह रकत करणें

१७ त्या आक्टा प्रमाणें आपणास मिळालेले अधिकार कोणी अमलदार चालवीत असतां त्यास कोणी बुध्या हरकत करील तर त्याजवर माजिस्त्रेटासमक्ष गुन्ह्याची शाबिती झाली असतां तो एक हजार रुपये पर्यंत दंडास, किंवा पराकाष्ठा ६ महिने पर्यंत कैदेचे शिक्षेस तो पात्र होईल.

रपोर्ट करण्या संमंधानें हयगय करील तर शिक्षा.

१८ कोणते ही तारवाचा किंवा गलबताचा मास्तर किंवा कम्यांडर त्या आक्टा प्रमाणें चालण्यास बुध्या हयगय करील किंवा नाहीं म्हणेल तर त्याज वर माजिस्त्रेटाच्या समक्ष गुन्ह्याची शाबिती झाली असतां दोन हजार रुपये पर्यंत दंडास पात्र होईल.

खोटें उत्तर

१९ कोणी मनुष्य त्या प्रश्नानें उत्तर देणें त्या आक्टा प्रमाणें अ

वश्य असेल त्या प्रमाणें तो बुध्या खोटें उत्तर देईल; किंवा खोटा रिपो र्ट करील तर त्याजवर माजिस्ट्रेटाच्या समक्ष गुन्ह्याची शाबिती झाली असतां तो फारतर पराकाष्ठा तीन वर्षें पावेतों कैदीची शिक्षा भोगण्यास पात्र होईल; व एक हजार रुपये पर्यंत दंडास पात्र होईल.

२० ज्यथे विल्यम चवथा ह्याचे कारकीर्दींत झालेले तिसरे व चवथे आक्याचे ८५ वे वाबीचे ८१ वे कलमा अन्वयें, कोणी मनुष्य राणीची रयत नसेल; किंवा ईस्ट इंडिआ कंपनी सरकारचे कबजांतील किंवा ताब्यांतील जागेंत जन्मलेला नसेल त्या मनुष्याचा त्या आक्टांतील "पर राज्यांतील मनुष्य" त्या शब्दावरून होतो असें समजावें. माजिस्ट्रेटाचे व जस्टिस आफ् दि पीसाचे संपूर्ण अधिकार चालविणारे मनुष्याचा समावेश "माजिस्ट्रेट" त्या शब्दांत होतो असें समजावें. अर्थ.

२१ अमुक मनुष्य परराज्यांतील मनुष्य आहे, व त्या आक्टांतील ठराव त्यास लागू आहेत असें म्हणत असतील, तो मनुष्य परराज्यांतील मनुष्य आहे; किंवा नाहीं किंवा त्यास त्या आक्टांतील ठराव लागू आहेत किंवा नाहींत; त्याजविषयीं तक्रार निघेलतर मी परराज्यांतील मनुष्य नाहीं व मला त्या अक्टांतील ठराव लागू नाहींत असें शाबित करण्याचें काम त्या मनुष्याकडे आहे. परराज्यांतील मनुष्य असण्या विषयीं पुरावा.

२२ हा आक्ट २ वर्षें पर्यंत अमलांत राहील; आणि तो प्रिन्स आफ् वेल्स ऐलंड, व सिंकापूर व मलाका त्या सेटलमेंटास किंवा आदनचे मुलकास लागू नाहीं. परंतु तो सदरहू सेटलमेंटास किंवा मुलकास लागू आहे असें इन्डिआचे गव्हरनर जनरल इन् कौन्सिल हुकूम ठरवितील तर तो त्यास लागू होईल. आक्याचा व्यापार

२३ कोणी परराज्याचा प्रधान असेल आणि त्याजवळ त्याचे सरकाराची असावी तशी सनद असेल त्यास किंवा कोणतेही कौन्सिलास किंवा व्हाइस कौन्सिलास किंवा चौदा वर्षांचे आंतील वयाचे मनुष्यास किंवा ब्रिटिश सरकारचे चाकरींतील कोणी मनुष्यास त्या आक्टाचे मागील ठराव लागू आहेत असें समजूं नये. कोणतेही मनुष्यास किंवा कोणते ही जातीचे मनुष्यास त्या आक्टांतील सर्व ठराव किंवा कोणतेही ठराव, कांहीं मुदती पर्यंत, किंवा इतर रीतीनें अगदीं, किंवा थोडके लागू नाहींत असें ठरविण्याचा अधिकार आणि तसा कोणताही ठराव कोणतेही वेळीं रद्द करण्याचा अधिकार अपवाद

ग्व्हरनर जनरल इन्कौन्सिलास किंवा आप आपले हुकमतीत कोणतेही प्रेसिडेन्सीचें किंवा जागेचें राज्यकार चालविणारे सरकारास किंवा त्या आक्टाचे साहावे कलमांत सांगितलेले कोणतेही चीफ़ कमिशनरास किंवा कमिशनरास आहे.

जोखिमांतून सोडविणें.

२४ सरकारचे कोणतेही अंमलदाराने, किंवा इतर अमलदाराने हा आक्ट ठरविण्यापूर्वी कोणतीही गोष्ट केली असेल त्या गोष्टीचें जोखीम हा आक्ट त्या वेळी अमलांत असता तर, त्यावर नसतें त्या प्रमाणेंच त्याजवर त्या गोष्टी बद्दल त्या कलमा अन्वये जोखीम नाहीं असें समजावें. आणि सदरहू प्रमाणें कोणतीही गोष्ट केल्या बद्दल कोणती ही फिर्याद करू होणार नाहीं किंवा इतर काम चालणार नाहीं.

---

(ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें)

पासून शिरांस आरंभ होतो त्या शिरानीं रक्त परत येतें या शिरा सर्व शरीरभर पसरल्या आहेत त्यांस जसें झाड किंवा आळें असतें तद्वत शरीर आहे. तेणेंकरून नळ्यांतून रक्त बाहेर जातें व शरीरद्वारें परत येतें आणि पिशवी ग्रहण करितें. या पिशव्या उघडतात व मिटतात अशी त्यांस शक्ती आहे. त्या किती त्वरित ह्मणाल तर घटकेंत सोळाशें वेळ हा व्यापार होतो या प्रमाणे वर्षोवर्ष दमल्याशिवाय सर्वकाळ चालत असतात. याणी त्यांच्या जागोजागचें कौशल्य पाहिलें तर हें यंत्र घडणाराचें ज्ञान आणि पराक्रम आणि रूपा स्पष्ट दिसून येतें तें कौशल्य असें कीं नळ्यांचें मांस जाडें आहे कारण कीं रक्ताचा प्रवेश जोराने मोठ्या पिशव्यांतून निघतें आणि नळ्यांत शिरतें ह्मणून होतो सबब ही तजवीज केली आहे. आणि त्या नळ्या हाडांच्या आश्रयास ठेविल्या आहेत तेणेकरून रक्ताचा धक्का त्या सोसतात पण फुटत नाहींत. शिरांस धक्का पोंचत नाहींत ह्मणून त्या पातळ केल्या आहेत तसेंच आणखी बोटाचे ठायीं कामकाज फार असतें ह्मणून हाडांचे पनळ करून त्यांतून नळ्या बसविल्या आहेत ह्मणजे सरासरी बोटावरून झाडून गेलें तरीं नळीस उपसर्ग होऊंनये आणि नळीस उपसर्ग झाल्याविना हाताची शक्ती जात नाहीं तेव्हां पाहा हें परमेश्वराचें कौशल्य त्याणे हा शरीराचा साचा काय विलक्षण आश्चर्यकारक रचिला आहे.

२ जसें वरती रक्त प्रवेशाचें प्रकरण लिहिलें आहे तसेंच अन्न पाचनाचें प्रकरण चमत्कारिक आहे. मनुष्याचे शरीरांत दोन भाग आहेत येक उर- दुसरें पोट. पोट ह्मणजे येक पिशवी आहे ते अन्नाचा साठा आहे त्याचे डावे अंगास छिद्र आहे त्याणे जे तोंडातून अन्न येतें तें घशाने तेथे आंत प्रविष्ट होतें तेथे त्याचा येकत्र गोळा होतो आणि त्या जवळ येक पडदा आहे त्यांत रस निर्माण होतो त्या रसाने तें अन्न निसरत निसरत आंतड्यांत जातें तेथे त्याची भेटी अशी होते कीं त्यास दुधासारखें रूप येतें नंतर त्यास यत्नें आकर्षून तेणेकरून तें वरती उराजवळ येतें आणि तेथे आलेतरी तें पुष्टता शरीरास

देण्यास योग्य नसतें यास्तव नक्यानी तें शरीरांत प्रवेश करून ज्या ठिकाणी श्वासोश्वास चालत आहे, तेथे जमतें आणि त्या दुधासारख्या रसाचा रुधिरवर्ण होतो नंतर त्याचा वायूच्या योगानें रक्तवर्ण होतो, ह्मणजे; तें रक्त होऊन पुष्टी करणाच्या योग्यतेस प्राप्त होतें, नंतर शरीरांत तें ज्या ज्या ठिकाणी प्रविष्ट व्हावयाचें, तेथे तेथे, होऊन जें शेष राहते, त्याचा वर्ण फिरून पुन्हा निघून जातें इतक्यांत अन्नाचे रसाची पुरवणी येत्ये या प्रमाणे अन्नाने ...चे थोर मनुष्य होतें गानें स्त ढ येणेकरून जीवन येणेकरूनच होतें.

या प्रमाणे वरती मनुष्यांचे शरीरांची स्थिती लिहिली आहे, या प्रमाणे रचना सर्व जीवांचे शरीरामध्यें आहे, केवळ जो प्राणी, उ- ळीख, यांचे देखील शरीरांत त्यांचे परिमाणाची यंत्रें असतात व कितीयेक, जीव असे सूक्ष्म आहेत की, त्यांची शरीरें पाहण्यास मनुष्यांचे नेत्र समर्थ नाहीत, असे जीव पाण्यात आहेत हे कोण प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज खरें मानील? असो त्या जीवांची देखील शरीरें ईश्वरसत्तेनें अशी युक्ती आणि कौशल्यपणानें घडलीं आहेत, आणि प्रत्येक काळ त्यांचे व्यवहार लाऊन दिल्हे आहेत, त्या, त्या, व्यवहारांचे ठायीं सर्व जीव रत असतात, पाहा! कीं मांजर खाण्याकरितां प्रयत्न करून मिळवितें, व निद्रादिक करेखकरून भोगून काळक्रमण करितें पोरें उत्पन्न झाहली ह्मणजे पाजित्ये, त्यांची खबरदारी जन्मादारभ्य करित्ये, जसा पंतोजी मुलांचे पाठीमागें सुशिक्षा करण्या विषयीं लागलाच आहे, अशी आपलाली कामें सर्व प्राणीमात्र करितात, त्यांस दुसरा कोणी सांगायास नको इतक्यांत सर्वांशी बुद्धीने श्रेष्ठ प्राणी मनुष्यमात्र यद्यपि थोर व सर्व जनावरांच्या वळिष्ठांच्या नियंता आहे तत्रापि आपले स्वकर्माचे ठायीं रत नहोऊन दुष्ट वासना दुष्ट कर्में यास अंगिकारितो आणि भ्रांतीनें आपला ईश्वरनिर्मित व्यवहार, आचार, कर्तव्य, हें सर्व विसरून जातो आणि पाहा कीं! मनुष्यास सुमार्गी वर आणण्याकरितां जितका बोध

प्रयत्न व शिक्षा करावी लागते इतकी कोणत्या जनावरासही करावी लागत नाहीं, अस्तु माझी अशी आशा आहे कीं मनुष्यें आपणाले वास्तवीक मार्ग जाणून स्वकर्माचे सर्व फल घेत असा काळ सत्वर ईश्वरकृपेनें प्राप्त व्हावा ही विनंती.

विचारी.

---

## ज्ञानप्रकाश.

तारीख १९ नवंबर सन १८४९

मागील येका विचारी याचे पत्राव र कांहीं दोष देणारा लोककल्याणेच्छू याचें पत्र छापलें आहे. आह्मास वाटते कीं त्याणे दोष दिल्हे ते काहीं यथार्थ नाहींत, व साधारणलोकांस समजण्याकरितां जो पत्र लिहितो त्याणे इतकें शोधून शब्दाची अवघड योजना केली तर समजावयास देखील कठीण होईल. "आकर" ह्मणजे खाण तीजपासून उत्पन्न जाहलें ते "आकरज" परंतु हे दोनींशब्द प्रसिध्द नाहींत व लोकांची समजूत ज्यास करावयाची असेल त्याणे हे कोशांतील शब्द घेऊन परिणाम नाहीं. जसे "बॉलट" पास कोशांत "गुप्तानुमती सूचिकागुलीका," असें लिहिलें आहे ह्मणून हेंच वाक्य जर कोणी लिहिलें तर त्या पेक्षां मूळचा इंग्रजी शब्द लिहिला तर बरें पडेल, कारण कीं इतक्या संस्कृत पदांना अर्थ करण्याजोगें सामर्थ्य आणण्याचे वेळेंत समग्र इंग्रजी भाषादेखील मनुष्य शिखेल, अस्तु दुसरें असें आहे; कीं महाराष्ट्र भाषा अद्याप सुधारली नाहीं व त्यांत शास्त्रसंज्ञा नाहींत यास्तव संज्ञाग्रंथ लिहितांलिहितां मुकरर होई तोंपर्यंत येकानें अकरज ह्मटलें व दुसऱ्यानें शिला ह्मणजे शीर्यते सा शिला जे फुटते पदार्थ आहेत ते. ह्मटले तरी येकच आहे पाउसाचे पाणी वरून पडतें त्यासदेखील मिनरल हा शब्द लागेल परंतु आकरज ह्मणण्यास खाण कोठे आहे, तस्मात् जों पर्यंत संज्ञा मुकरर झाल्यानाहींत तों पर्यंत अमुका आमचा शब्द घ्या हें वृथा पांडित्य आहे, तसेंच चुन्याच्या स्थानी हें प्रसिध्द आहे, यास्तव चुना हें अशुध्द नाही. याप्रमाणेंच सर्व दोष आहेत. ऐशा पिठावर रेघा सहज ओढता येतात, विचारी हा लोकांस अर्थ कळावयाजोगें श्रमानें

गेले. तेंव्हां परमेश्वराने किंवा कोठेकोठे असें लिहिलें आहे कीं श्री महादेवाने श्री विष्णूस पृथ्वीवर पाठऊन राज्य करा ह्मणून सांगीतलें तेंव्हांपासून राजा हें नाव चालू आहे यास्तव जितके राजे आहेत तितके विष्णूचे अंश अशी लोकांत रूढी आहे.

५ जोंकाळपर्यंत लोक अज्ञान अस्तात तोंपर्यंत येकेराजाचे अनुसंधानाने चालतात- व त्याची बुध्दी सर्वांहून वरिष्ठ मानून सर्व अधिकार त्यास देतात- आणि त्यास स्वताच देतात असें नाहीं त्याचे खानदानी कडेही देत त्याचे पाठीमागें त्याचे पुत्रास गादीवर बसवितात- तो ब्राह्मण असो अथवा नसो परंतु त्याचे कुळास राजकुळ ह्मणतात- आणि त्याची परंपरा चालवितात व राज्याचा अधिकार परंपरा चालवितात असें नाहीं त्याचे कामदाराचादेखील परंपरा चालवितात- ह्मणजे येक मनुष्य प्रतिनिधी झाला त्याचा मुलगा त्याचेकामावर अशी परंपरा सर्व कामाची चालत्ये.

६ परंतु ही परंपरा जें,जों,लोक शाहणे होतात तों,तों, मोडून टाकितात कारण की परंपरा चालिवण्याने फार अनर्थ होतात- व राजे सरदार, व कामदार सर्व येकसारखे मूर्ख होऊन कारभारांत पडतात आणि ते आपला धर्म विसरून लोकांपासून जो पट्टीचा पैसा वसूल करितात त्याचा फडशा आपल्या जातीच्या सुखाकरितां करितात. आणि विनाकारण पट्टी लोकांवर जास्ती घालतात- पुष्कळ पैसा उत्पन्न करून आपलीं वेतनें मोटीं करून लोकांस दरिद्री करून आपण सुख भोगितात ज्या कामाकरितां आपल्यास लोकानी नेमलें तें काम सोडून उलटा लोकांवर जुलुम करितात असे परिणाम वाईट राजा झाल्याने होतात

७ तेंव्हा हे परिणाम बंद होण्याकरितां युरोपखंडांत ज्या ज्या मुलखाचे लोक शाहणे, विद्वान, झाले आहेत व राज्य कारभार सर्वांस समजू लागला असे ज्या देशांत झाले आहेत त्या देशांतील लोकानी राज्य चालविण्याची रीती बदलून नवी रीती काढली आहे त्या सुधां तीन प्रकारची राज्यें आहेत त्यांचा नाव.

१ स्वतंत्र राजा.
२ लोकानुयायी राजा
३ लोकसत्तात्मक राज्य
१

४ स्वतंत्रराजाह्मणजे जसें पेशवे

यांचें राज्य होतें, गाईकवाडाचें आहे, हैदराबादचें, आहे हीं सर्व राज्यें स्वतंत्र राजाचीं आहेत ह्मणजे तेथील राज्यावर लोकांचा अधिकार किंवा सत्ता कांहींयेक चालत नाहीं. सर्व कारभार येक पुरुषाचे आज्ञेने होतो. सर्व अंमलदार, प्रधान, मुत्सद्दी; यांस बाहाल बरतर्फ तो करुशकतो. तो करील तो कायदा होतो.

९ लोकानुयायीराजा ह्मणजे राजा असतो परंतु त्यास कायदा लोक करून देतात. त्यास जें काय करणें असतें तें लोकांस पुसल्यावेरीज करतायेतनाहीं.

१० लोकसत्तात्मक ह्मणजे तेथे राजा नाहीं. त्या देशांत लोकांचा अधिकार चालतो- लोकच कायदा करितात व लोकच नेमणुकी करितात.

११ स्वतंत्रराजे- इराण, तुर्कस्थान, अबस्थान, व रुसस्थान; इत्यादि मुसलमानांचे देश, व चीनवगैरे येथे, व युरोपांत, अस्त्रिया, जरमनादेशांत, वगैरे राजे स्वतंत्र असून आपले स्वसत्तेनें राज्य करितात.

१२ लोकानुयायीराजांचा देश इंग्लंड. लोकसत्तात्मक राज्यें अमेरिकेंत व फरासिस लोकानीं गतवर्षी केलेंआहे. व सुईस इत्यादि लोकांचे देशांत आहेत.

१३ आपले लोकांस हीं राज्यें अशीं चमत्कारीक आहेत हें ऐकून आश्चर्य वाटेल कारण कीं त्यांस अगदी हें श्रुतच नाहीं. यास्तव इंग्लंड देश ह्मणजे ज्या देशाचे लोक हल्लीं हिंदुस्थानांत राज्य करीत आहेत त्यांचे राज्याचा प्रकार तपशीलवार लिहितो.

१४ विलायतेंत राजा किंवा हल्ली राणी आहे. तीची खानदानी परंपरेने राज्यावर बसते- परंतु त्या देशांत येक पार्लिमेंन्ट ह्मणून कोडत आहे. तेथे जितके राज्यांत परगणे आहेत. त्या दरयेक परगण्याच्या लोकास ताकीद फौजदार, मामलेदार याजकडून करून त्यांस कळवितात कीं पार्लिमेंन्टकोडतांत तुमच्यापेकीं तुमचे हिताची गोष्ट असेल ती प्रतिपादन करण्यास येक मुखत्यार पाठवा. नंतर जो कोणी सधन व शाहणा असेल तो लोकांचे घरोघर जाऊन वेतनावेरीज मानाकरिता त्यांचे मुखत्यारपत्र घेऊन कोडतांत येतो. याप्रमाणे सर्व परगण्याचे मुखत्यार जमलेह्मणजे तेथे राजा किंवा राणी ही प्रधानासहित येऊन बसते आणि सर्व मुत्सद्दी येऊन बसतात. आणि त्या कोडतांत सर्वांचे अनुमतास येईल असे बेत करितात व कायदे करितात. नंतर

ते कायदे चालविण्याचें काम राणीचें आहे. परंतु परगण्याचे मुक्त्याराचे संमताशिवा य कांहींयेक मोटेंकाम होत नाहीं व त्या मुक्त्यारास असा अधिकार आहे कीं रा ज्याचा हिशेब घ्यावा जे कर बसविण्यास सांगतील ते घ्यावे, ज्यास्ती उत्पन्न करुनये, लढाई राजाचे मनांत करावयाची असली तर मनाई करावी, राणीस गुजाऱ्याकरितां नेमणूक ठराऊन घ्यावी, राणीमात्र राज्या वरून दूर होत नाहीं. परंतु तीचे प्रधान दूर करण्याचा अधिकार मुक्त्यारास आहे परंतु मु क्त्याराची परवानगी पाहिजे. मुक्त्याराने दर सालचा ठराव बंद करून घ्यावा त्याप्रमाणें वर्तावें. याप्रमाणे राज्य चालतें. याचेंनाव लोकानुयायीराज्य.

१५ लोकसत्तात्मकराज्य ह्मणजे काय तें ऐका—अमेरिकेंत जितकीं राज्यें आहेत तितकीं सर्व याप्रमाणें आहेत ह्मणजे त्या देशांत राजा मुळींच नाहीं. दर येक परगण्याचा मुक्त्यार येऊन कोडत भरतात. आणि त्या मुक्त्यारांपैकीं येक मु ख्य नेमतात. त्याजला प्रसिदेन्द ह्मणतात त्याची बदली होते आणि त्यास वेतन देता त. तो मुक्त्याराचे संमताने राज्य चालवितो आणि आपलीं नेमणुकीचीं वर्षें भरलीं ह्म णजे कारभार सोडून देऊन दुसरा मुख्य होतो— परंपरेचें राज्य कुठें नाहीं. फराशि संचे देशांत परंपरेचें राज्य होतें. तें त्याणीं गतवर्षी मोडून टाकलें. सर्वलोकानी दं गा करून राजास दूर केला. त्याबदल ल ढाया झाल्या. शेवटीं लोकांचा बेत सिद्धी स गेला आणि त्याणी प्रसिदेन्द मुक्त्यार नेमून काम चालवितात. जो प्रसिदेन्द असतो तो मुक्त्यार बदलून दुसरे मु क्त्यार आणावेतो. याप्रमाणे राज्य चालतें.

१६ या तीन प्रकारचे राज्यापासू न लाभ काय व चांगलें कोणतें त्याचा विचार पुढले पत्रीं लिहूं हीविनंती.

इतिहास वाचणारा.

---

## ज्ञानप्रकाश.

तारीख २ दिसेंबर सन १८४९

मुंबईतील बाळंतिणीची धर्मशाळा याजविशीं टैमसपत्रावरून खाली लिहिल्याप्रमाणे समजतें.

मिस्तरवार्डिणसाहेब वगैरेसाहेबलोक व काळेलोक सेटसावकार याणी असा विचार केला कीं बाळंतपणाची रुजबोज

m2, M5
1849-A858
4939



नीट नसल्यामुळें कितीयेक गरीबांचीं मुलें मरतात व बायका मरतात यास्तव अशा स्त्रियांचें संरक्षण अशा प्रसंगीं व्हावें यास्तव धर्मशाळा स्थापावी ह्मणून लोकांपासून पैका उत्पन्न करण्याकरितां पट्टी केली ती येकंदर १५,००० रुपये जमले ते सरकारांत पांचरुपयांचे व्याजानें ठेविले आहेत.

सरजेमसेटजी जीजीभाय यांस हें वर्तमान कळलें तेव्हां त्याणीं आपले स्वाभाविक औदार्याप्रमाणें पत्र लिहून पाठविलें कीं माझें घर व जागा व मैदान व तळें इत्यादि के. इसपितळाजवळ आहे तें सर्व मी या धर्मकृत्यास देतो आणि अणखी १५,००० रुपये बंगला नवीन पाहिजे तसा सोईचा बांधण्यास देतो.

हें या पारशी सावकाराचें अतिशय धर्मकृत्य पाहून सर्वांनीं असें ठरविलें कीं ही धर्मशाळा सरजेमसेटजीची असें नाव कागदपत्रीं चालवावें हें योग्य आहे.

---

पारशी लोकांमध्यें पंचाईत होती ती आपले कज्ये आपसांत तोडीत असत. आलीकडे या पंचाईतीस कोणी मानीत नाहींत यामुळें आतां पारशी जातीचे कैदी कोडतांत व तुरुंगांत फार होत चालले. पूर्वीं असें नव्हतें.

---

## लंकेचा गवरनर.

सर ज्यार्ज आन्डरसन साहेब पुण्यांतील लोकांस माहीत आहेत ते आजपर्यंत मरीशस बेटांत इंग्रजांचे राज्याचे गवरनर होते. त्याणीं तेथें काम चांगलें करून सत्कीर्ति मिळविली यास्तव हल्लीं त्यांस लंका ह्मणजे शिलोन बेट येथें इंग्रजांचें राज्य आहे तें थोड शहर कोलंबो या ठिकाणचे गवरनर नेमले ते तेथें १९ अगस्टबरास निघून ७ नवंबरास पोचले. बरोबर कुटुंब आहे. मरीशस बेटांतील लोकांनीं जातेसमयीं मोठा मान केला व त्यांची मूर्ती करून बसविणार आहेत. मरीशस येथें जेनराल सदरलंड यांनीं गवरनरीचें काम चालवील.

---

## चीन.

चीनचे राज्यांत दंगे चालले आहेत. व फिरंगी लोकांवर सखतीचा हुकूम हल्लीं राजानें केला आहे. चिनाशीं लढाव यास परतें कालाहून आह्मज आली होतीं